श्रीशंकर.

# सुबोधवैद्यक.

## पूर्वार्ध.

'आर्यभिषक्' नांवाच्या, अत्युपयुक्त वैद्यक विषयाच्या मासिकपुस्तकांतून प्रसिद्ध होऊन निराळें बांधलेलें.

---

उपचारेण शमनमपचारेण कोपनम् ।
...र्यात् संशमनक्रियाम् ॥
...ारीतसंहितायां भगवानात्रेयः ।

REFBK-0002546

---

मुरलीधर एकनाथ केमकर यांनी केलेलें
सर्व हक्कासह विकत घेऊन,
**शंकर दाजी शास्त्री पदे, वैद्य,**
यांनी सुधारून,

**मुंबई:**
'जगदीश्वर' छापखान्यांत छापविलें.

---

शके १८१२–सन १८९०.

किंमत ८ आणे.

१८९०
म. ग्रं. सं. ठाण
विषय वैद्यक
सं. क्र. ७८०
REFBK-0002546

या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे अधिकार,
शं० दा० आ० पदे यांनी राखून ठेवले आहेत.

# सुबोधवैद्यक-पूर्वार्धाचा कोश.

वमन—ओकारी होण्याचें औषध.
रेचन—जुलाब होण्याचें औषध.
लंघन—उपवास.
कल्क—औषध चटणीसारखें वांटून गोळा करणें.
पथ्य—प्रकृतीस सोसणारे पदार्थ.
अपथ्य—प्रकृतीस बाधा करणारे पदार्थ.
संप्राप्ति—रोगाची उत्पत्ति.
अडसंधि—ज्या जाग्यावर बद होतात तें स्थान (वंक्षण).
अपानवायु—गुदाचे ठायीं राहणारा वायु.
दीपन—अग्नि प्रदीप्त करणारें.
गंगावती—भांबुर्डी.
कुलित्थ—हुलगे.
चील—एक भाजी.
पक्वाशय—नाभीचा अधोभाग.
विपर्यास—व्यतिक्रम, उलट.
मयाळ—एक भाजी.
सुखोष्ण—सोसेल असें उष्ण.
उद्वर्तन—अंगास उटणें लावणें.
कज्जली करणें—काजळासारखें बारीक खलणें.
चातुर्जात—दालचिनी, तमालपत्र, वेलची, नागकेशर.
कंचुकशाक—एक भाजी.
कालशाक—एक भाजी.
फालसा—एक फल आहे.
रोहिषतृण—रोशेल गवत.
त्रायमाण—एक औषधी.

# सुबोधवैद्यक-पूर्वार्धाचें शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३ | २ | यांहींकरून रसादि कारणांनीं. | इत्यादि कारणांनीं |
| ३ | १४ | एरंडमुळ. | एरंडमूळ. |
| ३ | २० | गूण. | गुण. |
| ९ | २२ | गेरू, सोनकाव | गेरू ( सोनकाव ), |
| १० | १२ | वेलघाव, | वेलची व |
| १२ | २४ | पांटुरोगाची | पांडुरोगाची. |
| १९ | ७ | बद्धगुहोदर | बद्धगुदोदर. |
| २२ | १३ | राईची | रुईची. |
| २८ | २८ | मुडदाड. सिंग | मुरदाडशिंग. |
| २९ | २५ | रेवाचिनीच्या | रेवाचिनीचा. |
| ३७ | १४ | मुड्दाडशिंग | मुरदाडशिंग. |
| ४२ | ६ | पुन्हाळीचा | उन्हाळीचा. |
| ४३ | ६ | मंदपीउयुक्त | मंदपीडायुक्त. |
| ५४ | १३ | कर्णमळ | कर्णमूळ. |
| ६३ | २७ | राईचें | रुईचें. |

# परिभाषा.

१. **औषधीयुक्तायुक्तविचार.**–सर्व कार्यांत नूतन औषधांचीच योजना करावी. परंतु वावडिंग, पिंपळी, गूळ, धणे, मध, तूप, हे सहा पदार्थ पुराणे (एका वर्षानंतरचे) असावे. गुळवेल, कुड्याची साल, अडूळसा, कोहळा, शतावरी, आसंध, कोरांटा, बडीशोप, चांदवेल हीं नऊ औषधें सर्वकाळ ओलींच घ्यावीं. ओलीं ह्मणून दुप्पट घेऊं नयेत. इतर औषधें सुकी असून नवीं घ्यावीं, व ओलीं असतां दुप्पट घ्यावीं. ज्या प्रयोगांत काळ सांगितला नाहीं तेथें प्रातःकाळ घ्यावा. ज्या औषधीचें अंग सांगितलें नाहीं तिचें मूळ घ्यावें. व ज्या प्रयोगीं भाग सांगितला नाहीं तेथें समभाग घ्यावें. ज्या प्रयोगांत एक औषध दोन वेळ सांगितलें असेल तेथें दुप्पट घ्यावें. चूर्ण, तेल, तूप आदिकरून स्नेहपदार्थ व अवलेह यामध्यें बहुधा श्वेत चंदन योजावा. काढे व लेप यांत रक्तचंदन योजावा. एक वर्षानंतर औषधांचें तेज व त्यांचे गुण कमी होतात; त्यांत चूर्ण दोन महिन्यानीं हीनवीर्य होतें; तूप तेलादिक हीं चार महिन्यांनीं हीनवीर्य होतात; औषधें व हलके पाक हे एका वर्षानंतर हीनवीर्य होतात; आसव आणि सोनें आदिकरून सर्व धातूंचीं भस्में, रसायणें हीं जितकीं जुनीं होतात तितका गुण विशेष होतो. तूप व मध हीं समान घेऊं नयेत; घेतलीं तर विषतुल्य होतात. शाका, जांभळें व मद्य यांशीं दूध प्यालें असतां तें सर्पासारखें मनुष्यांस मारतें. फणसाचे गरे खाऊन त्यावर तांबूल भक्षिलें असतां ते विषवत मारितात. दूध काढल्यापासून दहा घटिका झाल्या असतां तें विरस होतें व तेंच दूध वीस घटिकांनंतर विषासारखें होऊन प्राशन करणारास फार उपद्रव करितें. तापविलेलें दूध वीस घटकांपर्यंत हितावह होतें. रात्रीचें दूध दिवसास पिऊं नये.

२. **औषधी आणावयाचा प्रकार.**–औषधी आणावयास प्रातःकाळीं जावें उत्तम जाग्यावरील वनस्पति पाहून तिचें मूळ अथवा साल जें घेणें असेल तें घ्यावें. वारुळावरील, वाईट जाग्यावरील, जलमय जाग्या-

च्या आश्रयेंकरून असते ती, स्मशानांत होणारी, ज्या जाग्यावर तृण होत नाहीं त्या जाग्यावरची, चव्हाट्यावरची, कीड लागलेली, अग्नीनें जळालेली, थंडीनें करपलेली, अशा प्रकारची वनस्पति आणूं नये. अश्विन, कार्तिक या महिन्यांत सर्व औषधी रसभरित होतात, यास्तव सर्व कार्यांकरितां त्या दोन महिन्यांत वनस्पति आणून ठेवाव्या. रेच होण्याविषयीं व वांति होण्याविषयीं औषधी, वैशाख व ज्येष्ठ या दोन महिन्यांत आणाव्या. ज्या वृक्षाचें मूळ मोठें आहे त्या वृक्षाच्या मूळाची साल घ्यावी. ज्या वनस्पतीचें मूळ लहान आहे तिचें मूळच घ्यावें.

३. **स्वरसादि पांच प्रकारचे काढे.**—स्वरस ह्मणजे अंगरस. चांगली ओली वनस्पति आणून, त्याच वेळेस कुटून फडक्यांत घालून पिळून जो रस निघतो तो. दुसरा प्रकार.—सुकलेलें औषध सोळा तोळे आणून चूर्ण करून, त्याचे दुप्पट पाणी मडक्यांत घालून त्यांत तें चूर्ण आठ प्रहर भिजत घालावें. नंतर दुसरे दिवशीं कुसकरून तें पाणी घ्यावें. तिसरा प्रकार.—सुकलेली वनस्पति आणून त्यांत आठपट पाणी घालून, चवथा हिस्सा पाणी राही तोंपावेतों काढा करून घ्यावा. तो अंगरस जड आहे, ह्मणून घेणें तर २ तोळे घ्यावा. व रात्रीस भिजत घालून त्याचा सकाळीं काढा केला असतां तो ४ तोळे घ्यावा. मध, साखर, गूळ, सर्व क्षार, जिरें, तूप, तेल व चूर्णादिक, हे अंगरसांत घालणें तर अर्धेतोळा घालावें.

४. **काढ्याचा प्रकार.**—काढ्यांतील सर्व औषधें मिळून नित्य ४ तोळे घेऊन कुटावीं; त्यांत ६४ तोळे पाणी घालून मंदाग्नीनें मडक्यांत अगर भांड्यांत शिजवावीं. नंतर अष्टमांश ह्मणजे आठ तोळे उरवून कोमट आहे तोंच काढा घ्यावा. लहान मुलास काढा ३ माशांपासून एक तोळ्यापर्यंत पाजावा. काढ्यांत दूध, तूप, गूळ, तेल, चूर्ण हे पदार्थ घालणें झाल्यास १० मासे घालावे.

५. **चूर्ण.**—शुष्क ह्मणजे वाळलेलें द्रव्य घेऊन कुटून गाळावें. त्यास चूर्ण ह्मणतात. तें मोठ्या मनुष्यास ६ माशांपासून १ तोळ्यापर्यंत, व लहान मुलास १ माशापासून ३ माशांपर्यंत द्यावें. चूर्णांत गूळ समभाग

घालावा. साखर दुप्पट घालावी. घृतादिक द्रव्याशीं चूर्ण चाटणें झाल्यास चूर्णाच्या दुप्पट घृतादिक असावें. एकाद्या चूर्णास निंबाच्या रसाची वगैरे भावना ( पूट ) देणें झाल्यास जितक्या द्रव्यानें तें सर्व चूर्ण भिजेल इतकें असावें.

६. वटिका. ( गोळया ).—साखरेंत करणें तर चूर्णाच्या चौपट साखरेचा पाक करून त्यांत चूर्ण टाकून कराव्या. गुळांत करणें तर दुप्पट गूळ घ्यावा. मध व गुग्गुळ यांत करणें तर ते समभाग घेऊन कराव्या.

७. **फांट करावयाचा प्रकार.**—४ तोळे औषध आणून चांगलें कुटून ठेवावें. एका मडक्यांत १६ तोळे पाणी घालून, चांगलें उष्ण झाल्यावर त्यांत तें औषध टाकून चांगलें कढवून गाळून घ्यावें. हा फांट घेणें असेल तर ८ तोळे घ्यावा.

८. **हिम करावयाचा प्रकार.**—४तोळे औषधी आणून कुटून मडक्यांत २४ तोळे पाणी घालून, त्यांत तें औषध मिळवून रात्रीस भिजत घालावें व सकाळीं गाळून घ्यावें. याला हिम व शीतकषाय ह्मणतात. त्याचें घ्यावयाचें मान फांटासारखेंच जाणावें.

९. **कल्काचा प्रकार.**—ओलें औषध आणून चटणीसारखें बारीक वांटावें व सुकें असल्यास पाणी घालून वांटावें. त्याचें घ्यावयाचें मान १० मासे. कल्कांत मध, तूप, तेल हीं घालणें तर कल्काचे दुप्पट घालावीं. साखर समान घालावी. दूध, पाणी इत्यादि पातळ पदार्थ चौपट घालावे.

१० **औषधसेवनकाळ.**—काढे, अंगरस, चूर्णे वगैरे प्रातःकाळीं; अरुचि व अग्निमांद्य असतां भोजनाबरोबर; स्वरभंगास रात्रीं भोजनांत; धातुपुष्टीस प्रातःकाळीं व अस्तमानीं भोजनानंतर; कर्णांत तैलादिक घालावयाचें तें रात्रौ निजतेवेळीं. काढे, चूर्णे, रसायनें वगैरे औषधें देण्याचीं तीं ३, ७, १४, २१, किंवा ४२ दिवसपर्यंत. एक अथवा दोहीं सांज काढा अथवा निकाढा देणें. त्याचा चांगला विचार करून व रोगाचें मान चांगलें ध्यानांत आणून त्याप्रमाणें चालू करावें.

## परीक्षाप्रकरण.

१.* नाडीपरीक्षा.—प्रातःकाळीं उठून घटकाभर जो स्वस्थ बसलेला, त्याची नाडी पहावी ह्मणजे चांगली समजते. पुरुषाचा उजवा हात व स्त्रीचा डावा हात, लांब सरळ करून, आंगठ्याच्या मुळाजवळ तर्जनी, मध्यमा, अनामिका हीं बोटें ठेवून वात, पित्त, कफ हे दोष अनुक्रमानें जाणावे.

वांकडी व सर्प आणि जळू यांचे चालीप्रमाणें जी चालते ती वातनाडी. बेडूक, कावळा व चिमणी यांच्या सारखी त्वरेनें चालते ती पित्तनाडी. हंस, पारवे व मोर यांच्यासारखी मंदमंद चालते ती कफनाडी. लावा व तित्तिर पक्ष्याचे चालीप्रमाणें चालते ती सन्निपातनाडी. हळू व फिरून झरझर चालूं लागते ती द्विदोषांची. जी स्वस्थानांतून सुटली ती, राहून राहून चालते ती, फार क्षीण व फार थंड, अशा चार प्रकारच्या नाड्या प्राणनाश करितात.

सामान्य ज्वराचा कोप झाला असतां, नाडी उष्ण असून मोठ्या वेगानें चालते. चिंतेनें व भयानें क्षीण चालते. रक्ताचा कोप झाला असतां थोडी उष्ण असून पाषाणासारखी जड होते व आमयुक्त असतां फार जड होते. गर्भिणीची नाडी गंभीर, पुष्ट व हलकी चालते. मंदाग्नी, क्षीणधातु, निजलेला, आळशी, सुखी व निजून उठलेला यांचीं स्थिर चालते. भूक लागली ह्मणजे नाडी हलकी व वेगानें चालते. मळमूत्रानें व्याप्त असतां ज्वराप्रमाणें चालते. तुटक तुटक, अतित्वरेनें, काष्टाप्र-

---

* यावर फारच मोठा विस्तार करून व या परीक्षेचें खरें स्वरूप जगापुढें स्वतंत्रपद्धतीनें यावें, अशी आमची पुष्कळ दिवस इच्छा आहे व त्याप्रमाणें आह्मीं असें पुस्तक तयार करणारास ५० रुपयांचें बक्षीसही लाविलें होतें. परंतु फार वाईट वाटतें, कीं हें कोणी मनावर घेऊन चांगलें काम बजाविलें नाहीं. तथापि आह्मांकडे जो एक निबंध आला, त्यांत इंग्रजींतील वगैरे माहिती फारच मेहनतीनें दिलेली आहे इत्यादि गुण पाहून, पण पूर्ण गुण नसल्यामुळें, त्याच्या कर्त्यास उत्तेजनार्थ आह्मीं तीस रुपये बक्षीस दिलें आहे. या विषयासंबंधानें कोणास विशेष माहिती किंवा ग्रंथसंग्रह असल्यास त्या बद्दल आह्मांस कळविल्यास, आह्मीं या संबंधानें करीत असलेल्या प्रयत्नास मोठें साह्य होणार आहे.

माणें कठीण, स्थिर, वांकडी, क्षणांत हळू, क्षणांत जलद, अति उष्ण, मोठा वेग असून ज्वरानें व्याप्त, गुंतत चालून स्वस्थळ सोडिते, क्षणांत स्थानावर येते व अकस्मात् कोंपरापर्यंत जाते,—या सर्व नाड्या प्राणांतीच्या जाणाव्या.

२ मूत्रपरीक्षा.—कांचेच्या अथवा कांशाच्या पात्रांत पहांटेस रोग्याचे मूत्र, पहिली व शेवटली धार टाकून मधलेंच धरावें. त्यांत तेलाचा बिंदु गवताच्या काडीनें टाकावा. बिंदु टाकतांच पसरला तर साध्य, बिंदू तसाच राहिला तर कष्टसाध्य, तसाच तळास जाऊन वर आला व छिद्र दिसलें, किंवा मूत्र काळें, तांबूस, अथवा बिंदु तळास जाऊन बसला, किंवा बिंदु पसरून मूत्राबरोबर मिळून गेला तर रोगी असाध्य जाणावा. वाताधिक्यांत बिंदु टाकतांच पसरतो, व मूत्र पीतवर्ण व उष्ण असतें. कफाधिक्यांत मूत्र पांढरें दिसतें. सन्निपाताचें मिश्रवर्ण. धातु व इंद्रियरोग यांचें तेलासारखें. त्रिदोषांचें काळसर व मिश्रवर्ण असतें. तैलबिंदु टाकतांच मनुष्य, सर्प, वानर, विंचू व मांजर यांच्यासारखी आकृति झाली, किंवा दक्षिण, अग्नेय, नैऋत्य, वायव्य व ईशान्य या दिशेकडे बिंदु वाढल्यास रोगी असाध्य जाणावा. पूर्व, पश्चिम व उत्तर या दिशेस बिंदु वाढला, तर रोगी वांचेल. पश्चिम दिशेस बिंदु वाढून सर्पाकृति झाली तर उदर रोग जाणावा. मूत्र, तुपाच्या कण्यांसारखें झालें असतां जलोदर जाणावें.

३. मलपरीक्षा —वायूचा कोप झाला असतां मल फेनयुक्त, रूक्ष व धूम्रवर्ण व ज्याच्या शितड्या म्हणजे चोथापाणी असा असतो. पित्ताचा कोप झाला असतां हिरवट पिंवळा, गंधियुक्त, शिथिल, उष्ण असा असतो. कफाचा कोप झाला असतां श्वेतवर्ण व कांहीं शुष्क आणि कांहीं आर्द्र व स्निग्ध असा असतो. वातकफाचा आर्द्र व श्यामवर्ण, बुळबुळित शितड्यांनीं युक्त असा असतो. वातपित्ताचा पिंवळट काळसर, आर्द्र व आंत गुठळ्या असा असतो. पित्तकफाचा पिंवळट पांडुरवर्ण असतो. त्रिदोषाचा श्वेत, पिंवळा, काळसर, शिथिल व आंत गुठळ्या असा असतो. अजीर्णाचा दुर्गंधियुक्त असून शिथिल असतो. जीर्णज्वराचा

शितज्यायुक्त. जलोदराचा मोठा दुर्गंधि व श्वेतवर्ण. क्षयाचा श्यामवर्ण. रक्तकोपाचा पातळ व रक्तवर्ण. प्राणांतीचा दुर्गंधी व तांबूस असून किंचित् श्वेतवर्ण व मांसासारिखा आणि श्यामवर्ण असा असतो.

४. जिव्हापरीक्षा.—वायूचा कोप असतां जिव्हा खरखरीत, फुटलेली व पिंवळट असते. पित्ताची आरक्त असून त्यांतच किंचित् श्यामता असते. कफाची श्वेतवर्ण, आर्द्र व बुळबुळीत असते. त्रिदोषाची काळी, कांटे आलेली शुष्क असते. अरुचि व अतिसाराची मधुरवर्ण. प्रमेह व संग्रहणी यांची धूम्रवर्ण, उष्ण व कपिशवर्ण. विस्फोट रोगाची खरखरीत कांट्यासारखी असून आंतून पाणी गळतें. मरणकाळाची खरखरीत असून आंत ओढलेली, फेंसयुक्त, कठीण, लांकडासारखी, चलनवलनरहित अशी असते.

५. नेत्रपरीक्षा.—वायूचा कोप असतां डोळे निस्तेज, धूम्रवर्ण, दाहयुक्त, चंचल व उग्र असतात. पित्ताचे पिंवळे, तांबूसवर्ण, दाहयुक्त व दिवा पाहण्यास असमर्थ. कफाचे पांढरे, निस्तेज, स्रावयुक्त व चिकट. त्रिदोषाचे लाल असून किंचित् काळे व थिजल्या प्रमाणें दिसतात. ज्याचा एक डोळा थिजल्या सारखा असून वटारलेला उघडा असतो व दुसरा मिटलेला, तो रोगी एक प्रहरांत मरेल. डोळ्यांतील बाहुली भ्रमिष्ट होऊन नेत्र थिजल्या सारखे दिसतात तो रोगी एक दिवसांत मरेल.

६. रूपपरीक्षा.—प्रातःकाळीं रोग्याजवळ जाऊन त्याचें रूप पहावें, तें तेजोहीन, विचित्र व शामवर्ण असलें तर तो व्याधि वातजन्य जाणावा. पीतवर्ण कलाहीन मुख व किंचित् सुजीर असलें तर पित्तप्रकोप जाणावा. कलाहीन मुख असून तेलस दिसतें व डोळे विलक्षण चिकटलेले अशा लक्षणानें कफप्रकोप जाणावा; व डोळ्यानें पाहिलें असतां जसे रोग स्पष्ट दिसतील तशीं नांवें ठेवावीं. प्याहा, कावीळ, ग्रंथि, नळवायु, वायगोळा, डबा, जंतु व कठोरगुल्म हे रोग हातानें दाबून पाहून अमुक रोग आहे असा निश्चय करावा.

७. शब्दपरीक्षा.—वायूचा कोप असतां कंठांतून शब्द निघतो तो सौम्य ह्मणजे हलका निघतो. पित्ताचा कोप असतां शब्द स्पष्ट निघतो.

कफाचा कोप असतां शब्द जड व घर्घरयुक्त निघतो. द्विदोषाचा व त्रिदोषाचा कोप असतां शब्द, द्विदोषांचे व त्रिदोषांचे लक्षणांनीं युक्त असतो असें जाणावें.

८. **स्पर्शपरीक्षा.**—वायूचा कोप असतां शरीराचा स्पर्श, साग व पळस यांच्या पानांसारखा खरखरीत असून शीतल असतो. पित्ताचा कोप असतां स्पर्श उष्ण असतो. कफाचा कोप असतां शीतल असून आर्द्र असतो. द्विदोषाचा व त्रिदोषाचा कोप असतां द्विदोषांच्या व त्रिदोषांच्या लक्षणेंकरून युक्त असतो. ज्याच्या शरीराचा स्पर्श क्षणांत शीत व क्षणांत अति तप्त व रोगेंकरून व्याप्त असा आहे, तो रोगी असाध्य जाणावा.

९. **साध्यलक्षण.**—मुख तेजस्वी, नाडी सम, स्वर चांगला, मस्तकास कंडू, चिंतारहीत मन, अग्नि प्रदीप्त, सुगंधी पदार्थांची इच्छा, शिंका येणें, हीं लक्षणें असतां रोगी निःसंशय वांचेल.

१०. **असाध्यलक्षण.**—तीक्ष्ण ज्वर, बडबड करणें, डोळे व नखें लाल, अथवा पांढरीं, हात पाय थंड, मुख निस्तेज, कंठावरोध, उचकी, शरीर भयंकर, मूर्च्छा व भ्रम हीं लक्षणें असतां रोगी असाध्य जाणावा. ज्याचें नाक वांकडें झालें व नाकाचे सूर बंद होऊन तोंडांतून पाणी चाललें, तर तो एक दिवसानें मरेल. ज्याच्या डाव्या हाताची नाडी चालतां चालतां तुटते, व डावा सूर अगदींच बंद होतो तो तात्काल मरेल.

# विजेची आंगठी व पुतळी.

Health, Wealth & Prosperity



Electro-Galvanic
Rings and lockets.

रक्तशुद्धि होऊन सर्व रोगांचा नाश व्हावा, असा या वापरण्यापासून फायदा आहे. पितळी अंगठीस १॥ रु. चांदीची ३ रु. सोन्याची २० रु.

पितळी पुतळीस १।- रु. चांदीची २ रु. सोन्याची २२ रु. एकपासून सहा नग पर्यंत टपाल खर्च ६ आणे,

पत्ता—आर्यभिषक् कचेरी. मुंबई.

## बिवलकरांचीं रामबाण औषधें.

(१) **गर्मीसंबंधीं**—पर्मा, चट्टे, गांधी, सर्वविकार तोंड न येतां या गोळ्यांनीं १२ दिवसांत जातात. किं. दर डबीस २ दोन रुपये. (२) गजकर्ण—खरूज नायटे हे विकार ३ दिवसांत जातात. पुनः उठत नाहीं. औषध चुरचुरत नाहीं. किं. दर डबीस ८६. (३) स्त्रियांची तांबडी पांढरी मिश्र धुपणी, मूळव्याधि, पुरुषाचे लघवींत जाणारी धातु, खर, हे रोग ८।१० दिवसांत खात्रीनें बरे होतात. किं. दर डबीस १ रुपया. (४) **मलम.** हें चोळितांच छिद्रांनीं शरीरांत खोल भागापर्यंत भिनून, त्वचा, शिरा, संधि, कमर, आमाशय इ. सर्व शरीरस्थ वायु व खरूज, खवडे, आघपाईण, गळवें, खांडुकें, सर्व जखमा यानें जलद बऱ्या होतात. किं. दर ड० ८।१०. (५) **नेत्रांजन**—डोळ्यांतील फूल, साहरा, लाली, जळजळ, कंडू, फूट, स्राव, चिकटा, पोटाची सूज हे या गोळीनें जलद बरे होतात. गोळी मधांत अर्धी उगाळून दिवसरात्रींत दोन वेळां डोळ्यांत दररोज घालावी. किंमत दर ड० १ रु. (६.) **पटकी**, अजीर्ण इ०सर्व प्रकारचे जुलाब, २ दोन गोळ्यांत बंद होतात. १६ ड० १ रु. (७.) **आमांश** तांबडा पांढरा मिश्र. १६ गो० चे डबीस १ रु. (८.) **संग्रहणी**–जंत, कृमि, व तत्संबंधीं अतिसार, अग्निमांद्य, अरुची, ज्वर, पोटदुखणें इ० विकार बाल, तरुण, वृद्ध यांचे असाध्यही बरे होतात. किं० दर ड० १ रु० (९) **दंतरक्षक पूड**—ही चोळिल्यानें दंतसंबंधीं व्रण, कीड, रक्त, पू इ० सर्व रोग जाऊन दांत स्वच्छ व मजबूत होतात. किं० दर ड० ८६ आणे. (१०) **विंचूचें औषध**—लावितांच तात्काळ विष उतरतें. हें औषध विंचूवर रामबाण आहे. किं० दर पु० ८ आणे. एका पुडींतील औषध ४० मनुष्यांस पुरतें. (११.) **कामला** (कावीळ) यासंबंधीं नेत्र, त्वचा, इत्यादिकांचा पिवळेपणा, ज्वर वगैरे सर्व रोग फारच त्वरीत जातात. किं० दर ड० १ रु. डबी २ मनुष्यांस पुरते.

औषधें खातरीचीं असल्याबद्दल पुष्कळ पत्रें आहेत. औषधांत अपायकारक पदार्थ नाहींत. शिवाय इतर रोगांवर नवीं खातरीचीं व ग्रंथस्थ मात्रा, रसायनें धातूंचीं भस्में, पाक इत्यादि औ० माफक किंमतीस मिळतील अनुपानखर्डा सोबत देऊं. वर्गी नाटपेड. करूं. पत्रें पोष्टपेड पत्ता सुवाच्य. किंमत आगाऊ.

**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य.**

आंजर्ले, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

३||
२७

श्रीशंकर.

# सुबोधवैद्यक.

## ( पूर्वार्द्ध. )

## १. अजीर्णरोग.

**कारण**—फार पाणी पिणें, अकालीं भोजन करणें, मलमूत्रादिकांचा अवरोध करणें, निद्रेचा नियम नसणें, थोडें किंवा फार खाणें, व अपक्व, जड, शुष्क, थंड, केश वगैरे पदार्थ मिसळलेलें, द्दष्टाळलेलें, अशुद्ध, न आवडणारें, अथवा शिळें, इत्यादि अन्नादिकांचें सेवन करणें, क्षुधा लागली असतां त्या वेळीं न जेवणें, इत्यादि कारणांनीं अजीर्ण रोग उत्पन्न होतो. **याचीं साधारण लक्षणें**—शूळ, पोटफुगी, ढेंकर, शरीरास जडपणा, अनेक प्रकारच्या वायूच्या वेदना, ज्वर, मल आणि वायु यांचा अवष्टंभ. **यावर उपचार**—( १. ) कोणतेंही औषध देण्यापूर्वीं वमन आणि रेचन द्यावें. लंघन करावें व हिंगाष्टक चूर्ण द्यावें. ( २. ) पिकलेल्या अननसाचे बारीक बारीक तुकडे करून, त्यांत मिरे व सैंधव यांची पूड घालून द्यावें. ( ३. ) निंबु मधोमध चिरून, त्याच्या दोन्ही पुडांत पादेलोण, सैंधव, सुंठ व थोडा हिंग भरून निखाऱ्यावर ठेवावें, व चांगलें पक्व झालें ह्मणजे खालीं उतरून निवाल्यावर चोखावें. ( ४. ) पिंपळी, सैंधव, बाळहिरडे व सुंठ, यांचें चूर्ण, ऊन पाण्याशीं द्यावें. ( ५. ) हरभऱ्याची आंब ताकांत, पाण्यांत किंवा साखरेंत घालून द्यावी. ( ६. ) सुंठ-गूळ अथवा सुंठ-साकर द्यावी. ( ७. ) पिंपळी व गूळ खावा. ( ८. ) भोजनापूर्वीं आल्याच्या रसांत निंबाचा रस व सैंधव, हीं घालून तें प्राशन करावें. ह्मणजे अजीर्ण दूर होऊन अग्नि प्रदीप्त होतो. आणि वायु, कफ, मलबद्धता, आमवात, यांचा नाश होतो. ( ९. ) लवंगा व बाळहिरडे यांचा काढा, सैंधव घालून द्यावा. ह्मणजे सूक्ष्म रेच होऊन अजीर्णाचा नाश होईल. ( १०. )

मुळ्याच्या कंदाचे पातळ कापे करून, त्यांवर मीठ घालून, जोरानें मळून कांहीं वेळ तसेंच ठेवावें. नंतर पुनः जोरानें मळून त्यांतील पाणी पिळून टाकून, ते कापे चावून खावे. ह्मणजे अजीर्ण तात्काल नाहींसें होतें. ( ११. ) बाळहिरडे, सैंधव व सुंठ, यांचा कल्क करून प्यावा. ( १२. ) धणे व सुंठ यांचा काढा द्यावा. ह्मणजे अजीर्ण, आम, शूल, व ज्वर, यांचा नाश होतो. ( १३. ) सैंधव, पादेलोण, जंवखार, ओंवा, हिरडा, पिंपळी, सुंठ, मिरे, हिंग भाजलेला, वावडिंग यांच्या वस्त्रगाळ चूर्णास गायीचें तूप लावून, तें ४ मासे चूर्ण, भोजनसमयीं प्रथम पांच घांसांबरोबर खावें. ह्मणजे अजीर्ण, वात, गुदवात, गुल्मवात, वातप्रमेह, विषमवात, विषूचिका ( मोडशी ), कावीळ, पांडु, दमा, खोकला, यांचा नाश करील. ( १४. ) चित्रक, ओंवा, सैंधव, सुंठ व मिरे, यांचें चूर्ण ताकाशीं ७ दिवस द्यावें. ह्मणजे अजीर्ण व मूळव्याधि यांचा नाश होतो. ( १५. ) सुंठ ५ भाग, पिंपळी ४ भाग, अजमोदा ३ भाग, ओंवा २ भाग, बाळहिरडे १६ भाग, यांचें चूर्ण करून घ्यावें. ह्मणजे अजीर्ण, आम, गुल्म आणि मलावष्टंभ यांचा नाश होतो. **पथ्य**—अग्नीला प्रदीप्त करणारे व हलके असे पदार्थ, जुने मूग, तांबडे तांदूळ, चुका, चाकवत, कोंवळा मुळा, लसूण, जुना कोहळा, शेवगा, पडवळ, वांगें, आंवळे, नारिंग, दाळिंब, निंबू, मध, लोणी, तूप, ताक, मीठ, दहीं, हिंग, आलें, ओंवा, मेथी, धणे, तांबूल, उष्णोदक, कडू तिखट, आंबट असे रस, इत्यादिकांचें सेवन बरें आहे. **अपथ्य**—मल, मूत्र, वायु यांचा अवरोध, फार खाणें, जागरण, मिष्टान्न, शिंबी धान्यें, जांबूळ, अळू, जड पदार्थ, विरुद्ध अन्न-पान, इत्यादि वर्ज.

## २. अंडवृद्धि.

**कारण**—वायूला कुपित करणारे असे जे आहार त्यांहीं करून, शीतोदकांत बुडी मारून जें स्नान करणें तेणेंकरून, मूत्रादिकांचे प्राप्त झालेले जे वेग तेणेंकरून, अंगावर बहुत भार घेणें, फार मार्ग चालणें, चढ उतर करितांना अवघड जागेचे शिरेला उपद्रव होऊन

ती सरली असतां, व बळवंताशीं अंगयुद्ध केलें असतां, अति स्त्रीसंग, यांहींकरून रसादिकारणांनीं हा रोग होतो. ज्या प्रदेशांत पाणी चांगलें नसून हवा वाईट व कोंदट असते त्या प्रदेशांत या रोगाचा प्रादुर्भाव फार होतो. **संप्राप्ति**—वायु कांहीं कारणांनीं कुपित होऊन सूज, शूळ, यांना उत्पन्न करीत होत्साता अधोभागीं होऊन, अडसंधीच्या द्वारानें वृषणाप्रत जाऊन, वृषणवाहिनी ज्या शिरा, त्यांस दूषित करून, वृषणांतील गोळ्या व कोश-ह्मणजे त्यांजवरची त्वचा, यांची वृद्धि कारितो; त्या-रोगास वृद्धि असें ह्मणतात. अंत्रवृद्धि वगैरे या रोगाचींच नांवें आहेत. **उपचार**—( १. ) पायाच्या आंगठ्यास कळ लागे अशा आंगठ्या गच्च बसवाव्या. ( २. ) वृषणावर एरंडेल नित्य जिरवावें. ( ३. ) एरंडेलांत बाळहिरड्याचें चूर्ण द्यावें. ( ४. ) दूध व एरंडेल एकत्र करून एक महिना पर्यंत द्यावें. ( ५. ) दारुहळदीचें चूर्ण गोमूत्रांत दीड दोन मासे द्यावें. ( ६. ) रास्ना, गुळवेल, चिकणा, ज्येष्ठमध, गोखरू व एरंडमुळ, यांच्या काढ्यांत एरंडेल घालून द्यावें. ( ७. ) लघु कंवडळीच्या मूळाचें चूर्ण करून, एरंडेलांत खलून लावावें. व तें चूर्ण गाईच्या दुधांतून घ्यावें. ह्मणजे तीन दिवसांत रोग बरा होतो. ( ८. ) वेखंड व मोहऱ्या एकत्र करून वांटून लेप द्यावा. ( ९. ) तंबाखूचें पान नुसतें अगर शिलारस लावून बांधावें. फार रवरव झाल्यास सोडावें. ( १०. ) उंडीच्या झाडाची अंतर्साल बारीक कुटून वाढलेल्या शिरे-वर बसवून सतत तीन दिवस पट्टा बांधावा, ह्मणजे गूण कळूं लागतो; नंतर निखालस गुण येईपर्यंत हा पट्टा १० दिवस बांधावा. ( ११. ) उंची तपकीर व कळीचा ओला चुना एकत्र करून अगर गोमूत्रांत लेप करावा. व सोसवेल तितका शेक द्यावा. ह्मणजे वांती होऊन शिरें-तील पाणी पडेल. नंतर उंडणीच्या अंतर्सालीचें चूर्ण बसवून सतत तीन दिवस पट्टा बांधावा. ( १२. ) बिबा व हळकुंड एकत्र उगाळून त्याचा लेप करावा व गोंवरीच्या विस्तवानें शेकावें. ( १३. ) वांगीचें मूळ उगाळून लेप द्यावा. ( १४. ) त्रिफळा ( हिरडा, बेहडा, आंवळकटी. ) दुधांत द्यावा. ( १५. ) नांदरुखीच्या

पाल्याचा व काळयातुळसीच्या पाल्याचा रस काढून त्या रसांत तितकेंच तूप घालावें व अग्नीवर ठेवून सर्व रस आटवून तूप शेष उरवावें. या प्रमाणें २१ पुटें देऊन तूप तयार करावें. हें दिवसांतून, चार पांच वेळ चोळून जिरवावें; व जुनी वीट, काळा दगड अगर कौल तापवून, फडक्यांत गुंडाळून सोसवेल तितका शेक द्यावा. या उपायानें वृद्धींतील तिडका त्वरित बंद होतात (१६.) लाजाळूचा पाला वांटून ऊन करून बांधावा. (१७.) गायीच्या तुपांत सैंधव घालून वृषणावर वारंवार लेप करीत जावा. (१८.) बिब्याच्या झाडाचा पाला थोडासा चेंचून, त्यांत थोडी हळद टांकून, ऊन करावा. व तो वृषणावर, या कृतीनें ७ दिवस बांधीत जावा. **पथ्य**–तांदूळ, गहूं, मूग, वाटाणे, तूप, दूध, पडवळ, लसूण, शेवगा. **अपथ्य**–दहीं, उडीद, वाईट अन्न, फार जेवणें, उपवास, जडान्न, वेगावरोध, मिष्टान्न, मैथुन.

## ३. अतिसार. (हगवण.)

**कारण**–प्रमाणापेक्षां अधिक खाणें, जड पदार्थांचें सेवन करणें, अतिस्निग्ध, अतितीक्ष्ण, अतिरुक्ष, अत्यंत पातळ, असे पदार्थ खाणें, विरुद्धाशन; अन्नजीर्ण झालें नसतां त्याजवर पुनः भोजन करणें; अपक्व अन्न खाणें; अतिमद्यपान करणें; दुष्टजल व प्रकृतीस मानत नाहींत अशा पदार्थांचें भक्षण, मलमूत्रांचा अवरोध करणें, व जंतांचा कोप, इत्यादि कारणांनीं अतिसार उत्पन्न होतो. **लक्षणें**–हृदय, नाभि, गुद, ऊर, कुक्षि यांना व्यथा होणें; हातपाय गळणें; अपानवायूचा व मलाचा अवरोध होणें; पोट फुगणें; अन्न चांगलें पचन न होणें; इत्यादि लक्षणें होतात. ज्या अतिसारांत आंव पडते, त्यास आमातिसार व ज्या अतिसारांत रक्त पडतें त्यास रक्तातिसार ह्मणतात. **उपद्रव**–वांति, मूर्च्छा, उचकी, सूज, शूल, दमा, खोकला, अन्नद्वेष, हे उपद्रव संपूर्ण झाले असतां हा अतिसार असाध्य होतो. **आमातिसारावर उपचार**–कोणत्याही अतिसारावर उपचार करणें झाल्यास प्रथम आम पक्व झाला आहे कीं नाहीं याची चौकशी करून, आम पक्व झाला असल्यास दोषाप्रमाणें चिकित्सा

करावी. ( १. ) प्रथम बाळहिरडे व पिंपळी, यांचें चूर्ण उष्णोदकांत द्यावें. किंवा आंवेचा झाडा होण्याकरितां एरंडेल अथवा तूप उष्णोदकांतून द्यावें. ( २. ) सुंठीचें चूर्ण करून त्यांत थोडेसें तूप घालून गोळा करावा व त्यास एरंडाचीं पानें गुंडाळून वर शेणमातीनें लिंपून, नंतर फुंपाट्यांत भाजावें. माती जळूं लागली ह्मणजे बाहेर काढून, आंतील औषध काढून घ्यावें. व तें साखरेबरोबर अथवा गुळाबरोबर तीन माशापासून सहामासेपर्यंत द्यावें. ह्मणजे आमातिसार बंद होऊन जठराग्नि प्रदीप्त होतो. ( ३. ) सुंठ, गूळ, तूप यांची गोळी करून द्यावी; तेणेंकरून आंवेचें पाणी होऊन जठराग्नि प्रदीप्त होतो. ( ४. ) कोंवळे वाळुकाच्या, अंगाबरोबर फांका करून, त्यांत सैंधव व थोडासा हिंग भरून, एरंडाच्या पानांत गुंडाळून फुंपाट्यांत भाजून काढून तें कोमट वाळूक खावें; आंवेचें पाणी होऊन आमातिसार बंद होतो. ( ५. ) सुंठ, बडीशोप व खसखस अथवा सुंठ व बडीशोप, हीं तुपांत परतून बारीक कुटावीं. व त्याची फक्की घेत जावी.(६.) धणे व सुंठ यांचा काढा घ्यावा.( ७. ) सुंठ, अतिविष, हिंग भाजलेला, नागरमोथे, इंद्रजव, चित्रक, यांचें चूर्ण करून चूर्णाच्या चौपट उष्णोदकांत घ्यावें. ( ८. ) बालहरीतकी, अतिविष, सैंधव, पादेलोण, वेखंड, भाजलेला हिंग, यांचें चूर्ण उष्णोदकाशीं घ्यावें. (९.) सुरणाचा कांदा वाळवून चूर्ण करावें व तुपांत तळून द्यावें. (१०. ) जायफळ, सुंठ, राळ, मायफळ व खजूर, हीं प्रत्येकीं सहा सहा मासे घेऊन चूर्ण करावें व त्या चूर्णाच्या वजना इतकी त्यांत रानशेणीची राख मिळवून, तांदुळाच्या धुवणाशीं प्रतिवेळीं दीड मासा, याप्रमाणें प्रत्यहीं दोनवेळ दिलें असतां जीर्णातिसार, आमातिसार, व शूळ हे दूर होतात. (११.) लसुणीची कळी उभी चिरून, त्यांत उडदाचे दाण्या इतकी अफू भरावी व निखाऱ्यावर भाजून खावी. ह्मणजे आमातिसार त्वरित दूर होतो. **रक्तातिसारावर**–( १. ) जांभूळ, आंबा, आंवळी, यांच्या पानांचा अंगरस काढून त्यांत मध, तूप व दूध घालून घेतला असतां महान् रक्तातिसार जातो. ( २. ) लसूण ४ तोळे व थोडीशीं रुईचीं कोंवळीं पानें एकत्र वांटून त्यांचा रस ऊन करून ३

दिवस द्यावा. (३.) बेलफळ जरा फोडून भाजावें व त्याच्या गरांत गूळ घालून वांटून ऊन पाण्यांत सरबत करून पिण्यास द्यावें. (४.) कांदा बारीक चिरून चार पांच वेळ धुऊन टाकावा व तो गट्ठेदार चक्का दह्यांबरोबर खाण्यास द्यावा. (५.) गायीच्या लोण्यांत तिळांची पूड मिश्र करून उंबराच्या पानावरील फोड ५ व खडीसाखर घालून द्यावें. (६.) कुडेसाल, अतिविष, बेलकाचरी, वाळा, नागरमोथे, यांचा काढा द्यावा.(७.) डाळिंबसाल, कुडेसाल, बाळवेल, यांचा काढा मध घालून द्यावा. (८.) तांदुळांचे धुणांत उत्तम चंदन उगाळून त्यांत मध व साखर घालून द्यावें; ह्मणजे रक्तातिसार, दाह, शोष व मोह हीं दूर होतात. (९.) बाळवेलाचें चूर्ण गुळाबरोबर द्यावें; तेणेंकरून रक्तातिसार, पोटशूळ, आमशूळ, हे दूर होतात. (१०.) आंब्याची कोय ताकांत अथवा धुणांत उगाळून द्यावी. (११.) शतावरीचा रस साखर घालून द्यावा. **सर्वातिसारावर उपचार**–(१.) अफू व केशर समभाग घेऊन खलून अर्धगुंजप्रमाण गोळ्या कराव्या व १ गोळी मधाबरोबर द्यावी. (२.) निंबू कापून आंत राळ भरून ऊन करून द्यावें. (३.) कांद्याच्या रसांत अफू मिळवून द्यावी. (४.) निष्कंटक थोर बाभळीच्या पानांचा अथवा सालीचा रस किंवा टेंटूच्या सालीचा रस अथवा कुड्याच्या सालीचा रस, यांतून कोणताही अंगरस घेतला असतां सर्व अतिसार दूर होतात. (५.) अजमोदा, मोचरस (कांटे सांवरीचा चीक), सुंठ, धायटीचीं फुलें, यांचें चूर्ण, घुसळलेल्या गायीच्या दह्यांत द्यावें. ह्मणजे मोठाही अतिसार बंद होतो. (६.) वाळा, काळावाळा, नागरमोथे, धणे, मंजिष्ठ, बाळवेल, धायटीचीं फुलें, लोध्र व सुंठ यांचा काढा द्यावा. (७.) कोंवळें बेलफळ व आंब्याची कोय, यांचा काढा अथवा बेलफळाचा गीर व कोईंतला मगज, साखर व मध घालून घ्यावा.(८.) आंब्याची अंतर्साल अथवा कोय, दह्यांत वांटून द्यावी. ह्मणजे दाह व अतिसार दूर होतात. (९.) जायफळ, अफू व खारीक हीं समभाग घेऊन, नागवेलीच्या रसांत खलून वालप्रमाण गोळी, अतपाव ताकाशीं द्यावी. (१०.) अंकोलाच्या मुळीची साल, तांदुळांच्या धुणाशीं उगाळून मध घालून घ्यावी, ह्मणजे दुर्धरही अतिसाराचा नाश

होतो. (११.) वडाच्या पारंब्या तांदुळाच्या धुणांत वांटाव्या व त्यांत ताक घालून त्या द्याव्या. (१२.) राळ, साखरेंत घालून द्यावी. (१३.) पहाडमूळ, दह्यांत वाटून द्यावें. (१४.) अफू भाजून ती द्यावी. (१५.) कायफळ मधांत उगाळून द्यावें. (१६.) सोळा तोळे कुड्याची साल, तांदुळांच्या धुणांत वांटून गोळा करावा. मग तो जांभळीच्या पानांनीं गुंडाळून, त्यास सुतानें बांधून, वरती गव्हांचे पिठाचा लेप करून त्यावर मातीचा लेप करावा. नंतर त्या गोळयाच्या खालवर गोंवऱ्या घालून गोळयाची माती तांबडी होईपर्यंत अग्नि द्यावा. मग गोळा बाहेर काढून पानें व माती दूर करून, पिळून रस काढून तो थंड झाल्यावर, तो,मध मिळवून प्यावा. या कृतीस पुटपाक असें ह्मणतात.(१७.) टेंटूच्या सालीचा पुटपाकानें रस काढून, त्यांत मध व मोचरसाचें चूर्ण घालून द्यावें. (१८.) पक्व डाळिंबाचा पुटकानें रस काढून मध घालून द्यावा. (१९.) जिरे, भांग, बेलफळाचा मगज व अफू, हीं समभाग, दह्यांचे निवळींत खलून वालप्रमाण गोळी मधेशीं द्यावी.(२०.) **आर्द्रकुटजावलेह**: कुड्याच्या मुळाची साल ओली, एक तुळा (४०० तोळे) प्रमाण आणून त्यांत पाणी एक द्रोण (१०२४ तोळे) प्रमाण घालून, चवथाई पाणी राही तों पर्यंत काढा करून गाळून, नंतर लाजाळू, धायटीफूल, कोंवळें बेलफळ, पहाडमूळ, मोचरस, नागरमोथे, व अतिविष, हीं सात औषधें पल (४तोळे) प्रमाण घेऊन चूर्ण करून, त्या काढ्यांत टाकून फिरून, लोखंडाचे पळीला लेप लागे असा कढवून घट्ट करावा. मग हा लेह पाण्यांत अथवा शेळीचे दुधांत घ्यावा; तेणेंकरून वेदनायुक्त व नीलपीतादिक नानाप्रकारचे वर्ण ज्या अतिसारामध्यें आहेत व घोररूप, असे संपूर्ण अतिसार दूर होतात. व स्त्रियांस संपूर्ण प्रकारची धुपणी लागते ती व संपूर्ण मूळव्याधि व प्रवाहिकारोग ह्मणून अतिसाराचा भेद आहे तो, हे सारे रोग दूर होतात. **पथ्य**—वांति, लंघन, निद्रा, जुने तांदूळ, मसुरा, तुरी, तूप, मध, दहीं, तेल, दूध, ताक, लोणी, केळफूल, जांभूळ, आलें, कवीठ, बोर, दीपन व लघु असें अन्न व पेय पदार्थ. **अपथ्य**—मैथुन, मलमूत्रावरोध, गहूं, उडीद, जव, चाकवत, वाल, अंबा, दुधिया भोंपळा, गूळ,

पाले भाजा, तांबडा भोंपळा, जड व स्निग्ध असें भोजन, व्यायाम, विडा, कांकडी, मीठ, आंबट पदार्थ.

## २. अपस्मार. ( फेंपरें, घुरें, मिरगी. )

**स्वरूप**—वातादि दोष दुष्ट होऊन डोळ्यांपुढें आंधेरी येऊन स्मृतिरूप ज्ञान व अनुभवजन्यज्ञान नष्ट होतें. नेत्र व हातपाय हे विकल होतात. हृदयास कंप, अंगास घाम इ० लक्षणें होतात. याचा कोप कधीं दहा दिवसांनीं, कधीं पंधरा दिवसांनीं, किंवा महिन्याच्या महिन्यास दोषसंचय होऊन होतो. **उपचार**— ( १. ) निवडुंगाच्या पानास रुईच्या चिकाचीं २१ पुटें देऊन वाळवून चूर्ण करावें व तें तपकिरी प्रमाणें ओढावें. ह्मणजे नाकांतले किडे झडून रोग बरा होईल. ( २. ) देवडांगरीचा रस व निवडुंगाचा चीक एकत्र करून नस्य द्यावें. ( ३. ) मालकांगोणी, खुरासनी ओंवा, अक्कलकारा, जायफळ, लवंग, वेलदोडे, ओंवा, वावडिंगें, नागकेशर, हीं समभाग घेऊन माक्याच्या रसांत गोळी बोरा एवढी बांधून, दररोज एक गोळी पाण्याशीं द्यावी. ह्मणजे अपस्मार, चित्तभ्रम इत्यादि दूर होतात. ( ४. ) अगस्त्याच्या पानांच्या रसांत गोमूत्र व मिरपूड घालून त्याचें नस्य द्यावें. (५.) वांझकर्टोलीचें मूळ तुपांत उगाळून त्यांत साखर घालून त्याचें नस्य द्यावें. ( ६. ) ज्येष्ठमध, हिंग, वेखंड, तगर, शिरीष, व लसूण हे पदार्थ शेळीच्या दुधांत अथवा अजामूत्रांत उगाळून अंजन करावें. ( ७. ) वेखंडाचें एकतोळा चूर्ण मधांत द्यावें. ( ८. ) निगुंडीच्या रसांत अक्रोड उगाळून त्याचें नस्य किंवा अंजन करावें. ( ९. ) मोहच्या गोमूत्रांत वांटून त्याचा अंगास लेप करावा. ( १०. ) पांढऱ्या कांद्याचा रस नाकांत घालावा व अंजन करावें. ( ११. ) रानशेणीची राख रुईच्या चिकांत भिजवून, सुकल्यावर तपकिरी सारखी ओढावी. ( १२. ) रिठा, निंबाच्या रसांत उगाळून त्याचें नस्य द्यावें. ( १३. ) गंधकाची धुरी नाकांत द्यावी. ( १४. ) हत्तीचें मूत्र दोन्ही नाकपुड्यांत घालावें. ह्मणजे मस्तकांतील किडा पडून रोग बरा होतो. ( १५. )

वेखंड, गुळवेल, सुंठ, मिरीं, पिंपळी, मोहाचा डीक, रुद्राक्ष, सैंधव, रिंगणीचें फळ, समुद्रफळ, व लसूण हीं सर्व एकत्र वांटून नाकांत ओढावीं. ह्मणजे अपस्मार, वायु, कफ, मस्तकशूळ, बडबड, मोह, सन्निपात, व पीनस हे दूर होतात. **पथ्य**—मूग, गहूं, तूप, दूध, पडवळ, जुनें कोहाळें, चाकवत, डाळिंब, शेवगा, द्राक्षें, आंवळे, तांबूळ. **अपथ्य**—उष्ण पदार्थ, विरुद्धान्न, अति मैथुन, श्रम, पालेभाज्या, तोंडलें, उष्ण व जड असें भोजन.

## ५. आम्लपित्त.

**कारण**—शिळें, आंबलेलें अथवा विषादिकांनीं दुष्ट असें अन्न व पित्तप्रकोपी अन्न, विरुद्धान्न, दाहकारक पदार्थांचें भक्षण, इत्यादिकांच्या सेवनेंकरून पित्त दुष्ट होऊन संचित होतें, त्यास आम्लपित्त असें ह्मणतात. **लक्षण**—अन्न न पचणें, आयासावांचून श्रम होणें, मळमळ सुटणें, कंडू, आंबट ढेंकरा येणें, आंगास जडपणा येणें, हृदय व कंठ यांच्या ठायीं दाह, अन्नद्वेष होणें, हीं साधारण लक्षणें आहेत. हा रोग जून झाल्यावर कष्टसाध्य आहे. **उपचार**–( १. ) प्रथम वमन होण्यास गेळफळाचें ४।५ मासे चूर्ण मधांतून द्यावें. नंतर मृदुरेचक द्यावें. ( २. ) आंवळकटीच्या अथवा त्रिफळाच्या काढ्यांत निशोत्तराचें चूर्ण व मध घालून, तो काढा रेच होण्या करितां द्यावा. ( ३. ) सुंठ व कडू पडवळ यांचा काढा, कफ, पित्त, वांति, कंडू, ज्वर, विस्फोट, यांचा नाशक आहे; व हा घेतला असतां अन्नाचें पचन होतें, व अग्नि प्रदीप्त होतो. ( ४. ) सुंठ १ भाग व गेरू, सोनकाव २ भाग, यांचा विड्याच्या पानांच्या रसांत खल करून वालप्रमाण गोळ्या बांधाव्या. दररोज दोन गोळ्या सांज–सकाळ दूध व बत्तासा यांबरोबर द्याव्या. ( ५. ) मनुका १, हरितकी व साखर २ भाग, यांची गोळी द्रोन वालांची करून सांजसकाळ द्याव्या. ( ६. ) यवाच्या काढ्यांत आंवळ्याचा रस व मध घालून द्यावें. ( ७. ) काडेचिराईत, नागरमोथे सुंठ, व गुळवेल यांचा

काढा दिला असतां, आम्लपित्ताचा तत्काळ नाश करितो. ( ८. ) अडुळसा, गुळवेल व डोरली, यांचा काढा मध घालून घेतला असतां, आम्लपित्त, कफ, श्वास, ज्वर, ओकारी यांचा नाश होतो.( ९. ) पिंपळी मधेंतून द्यावी. ( १०. ) हरीतकी, पिंपळी, द्राक्षें, खडीसाखर, धणे, धमासा यांचें चूर्ण मधेशीं घेतलें असतां, घशांतील जळजळ, पित्त, कफ यांचा नाश करितें. ( ११. ) कडूनिंबाचीं पानें व आंवळकटी यांचा काढा घ्यावा. ( १२. ) रात्रीं धणे व सुंठ यांचा कल्क घ्यावा. ( १३. ) गोरखचिंचेचें सरबत करून त्यांत जिऱ्याची पूड व खडीसाखरेची पूड घालून तें घ्यावें. ( १४. ) आंवळकटी १ भाग, खडीसाखर २ भाग घेऊन, तें सर्व भिजेल इतकें साजूक तूप घालून घ्यावें. ( १५. ) केळीच्या कांद्याच्या रसांत आंवळकटीचें चूर्ण एक तोळा घ्यावें. ( १६. ) आमसुलें, वेलघात्र, साखर यांची चटणी करून ती खावी. ( १७. ) **नारिकेलखंडपाक**-बारीक वाटलेला १६ तोळे नारळ घेऊन, तो ४ तोळे तुपावर चांगला भाजून, त्यांत समभाग साखर व ६४ तोळे नारळाचें पाणी घालून, गुळाच्या पाका सारखा होईपर्यंत आटवून, त्यांत धणे, पिंपळी, नागरमोथे, वंशलोचन, जिरे, शहाजिरे, दालचिनी, एलची, तमालपत्र, नागकेशर, हे चार चार मासे घालून थंड झाल्यावर हा पाक सेवन करावा. ह्मणजे आम्लपित्त, अरुचि, क्षय, रक्तपित्त, शूळ, वांति, यांचा नाश होतो. हा धातुवृद्धिकारक आहे. ( १८. ) **अविपत्यकर चूर्ण.**—सुंठ, मिरे, पिंपळी, त्रिफळा, नागरमोथे, वावडिंग, वेलदोडे, तमालपत्र, हीं सर्व समभाग घेऊन, सर्वांचे बरोबर लवंगा घेऊन, जें चूर्ण होईल त्याचे दुप्पट तेडाचें चूर्ण घेऊन, सगळें चूर्णाबरोबर साखर घेऊन, राबलेल्या मडक्यांत ठेवून, भोजनाचेपूर्वीं आठमासे प्रमाण खावें. वरतीं थंड पाणी किंवा नारळाचें पाणी प्यावें, ह्मणजे आम्लपित्त, शूळ, मूळव्याध, प्रमेह, मूत्राघात, मूत्राश्मरी, यांचा नाश होतो. ( १९. ) जिरे व गहुला समभाग घेऊन तें ३ मासे चूर्ण साखरेशीं घ्यावें. ( २० ) गोरखचिंचेचा मगज ९, शेवग्याचा रस ४, माक्याचा रस ४, कवठाचा गीर ८, व आल्याचा रस १८

भाग, एकत्र करून खलून बोराच्या आठीप्रमाणें गोळ्या करान्या. नित्य एक गोळी, आल्याचा रस व खडीसाखर यांत अथवा नारळाचे पाण्यांत द्यावी. **पथ्य**—साळी, गहूं, जव, मूग, साखर, कारलें, कटोली, पडवळ, चाकवत, जुनें कोहाळें, केळफूल, उष्णपदार्थ, व कफ–पित्तहारक असें अन्नपान. **अपथ्य**—मीठ, तेल, तिखट, आंबट, तीळ, कुलित्थ, मेंढीचें दूध.

## ६. अरोचकरोग. ( अवढणें. )

**कारण व लक्षण**—वात, पित्त, कफ, यांनां कोपविणाऱ्या पदार्थांचें भक्षण, शोक, भय, क्रोध, अतिलोभ, मनाला चिळस अणणारें अन्न; व रूप, गंध यांहीं करून अरोचक रोग होतो. येणेंकरून तोंडांत अन्न वगैरे पदार्थ घातले असतां त्या पदार्थांची रुचि काय आहे हें समजत नाहीं **उपचार**–( १, ) पिंपळी, चवक, सुंठ, पिंपळमूळ, चित्रक, यांचें चूर्ण करून घेतलें असतां तोंडास रुचि येते, अग्नि प्रदीप्त होतो, अन्नाचें पचन होतें, मलबद्ध, कवळू, गुल्म, शूल, कफोदर हे रोग दूर होतात. ( २. ) वेलची, दालचिनी, तमालपत्र, नागकेशर, यांचें चूर्ण करून घ्यावें. ह्मणजे अरुचि, पित्त, कफसंबंधीं रोग हे दूर होतात. ( ३. ) संचळ. द्राक्षें, मिरे, जिरे, शहाजिरे बडीशोप, आमसोलें, डाळिंबदाणे, यांची चटणी करून, मध, गूळ घालून भक्षण करावी. ( ४. ) आमसोलें, गूळ किंवा साखर व एलचीदाणे यांची चटणी करून खावी. ( ५. ) यवानीखांडव चूर्ण द्यावें. ( ६. ) भोजनारंभीं आलें व सैंधव भक्षण केलें असतां तें रुचिकर, अग्नि प्रदीप्त करणारें व जिव्हा आणि कंठ यांची शुद्धि करणारें आहे. ( ७. ) साखर, सुंठ, मिरे, कवट यांची मधांत गोळी करून ती तोंडांत धरावी. ह्मणजे सर्व प्रकारच्या अरोचकाची शांति होते. ( ८. ) डाळिंब खावें. ( ९. ) पक्क झालेल्या अननसाचे बारीक तुकडे करून, त्यावर जिरे व सैंधवाची पूड घालून खावे. (१०.) तालिसादि चूर्ण द्यावें. ( ११. ) अकलकाराचूर्ण द्यावें. ( १२. )

महाळुंगाचे केशर तूप लावून, मिरे, सैंधव घालून द्यावें. **पथ्य**—गहू, मूग, तुरी, साळी, साठेतांदूळ, तांबडाभोंपळा, कांकडी, कोवळे मुळे, वांगीं, शेवग्याच्या शेंगा, केळें, पडवळ, दूध, तूप, लसूण, आंबा, दहीं, ताक, कंवठ, कारलें, कांदा, मोहरी, चाकवत, शेपू. **अपथ्य**—तहान, ढेकर, क्षुधा, यांच्या वेगाचें धारण, अधिक अन्न, रक्तमोक्ष, क्रोध, लोभ, भय, अनेक दुर्गंध व विद्रुपपदार्थदर्शन, हीं वर्ज.

## ७ अर्श—मूळव्याधि.

**कारण**—वातादि दोष, त्वचा, मांस आणि मेद यांनां व त्याठिकाणच्या रक्ताला दूषित करून, गुदस्थानीं नानाप्रकारच्या आकृतीचे मांसाचे अंकुर उत्पन्न करितात. त्या अंकुरांस अर्श ( मूळव्याधी ) ह्मणतात. अर्शाचे दोन भेद आहेत. एक सहज ह्मणजे देहाच्या बरोबर उत्पन्न होणारा, दुसरा उत्तरजन्म ह्मणजे जन्म झाल्या नंतर, मिथ्या आहारविहारादिकें करून वातादिक कुपित होऊन, तिहीं करून उत्पन्न होतात ते. तसेंच शुष्क व आर्द्र असे मोडाचे दोन प्रकार आहेत. गुदद्वाराच्या बाहेर असणारे रक्तस्रावरहित जे मोड ते शुष्क. यास लोकांत " मोडाची मूळव्याधी " असें ह्मणतात. दुसरे गुदद्वाराच्या आंतल्या बाजूस असणारे किंवा रक्तस्रावी जे मोड, ते आर्द्र. यास लोकांत " रक्तमूळव्याध " असे ह्मणतात. रक्तस्रावी मोड गुदद्वाराच्या आंतल्या बाजूस इंच दीड इंच वर असल्यामुळें नजरेस पडत नाहींत. परंतु शौचाच्या वेळीं कुंथल्यानें ते कधीं कधीं बाहेर पडतात. तेव्हां मात्र दृष्टीस पडतात. रक्तस्रावरहित मोड, गुदाचे बाहेरचे बाजूस असून ते जाड व कठीण असतात. ते कांहींसे चामखिळांसारखेच असतात. **पूर्वरूप**—सूज, अग्निमांद्य, अन्न न जिरणें, गुदघे दुखतात, अल्प पुरीषत्व, संग्रहणी व पांडुरोगाची पीडा, उदर रोगाची आशंका, रक्तनाश, बलहानि, पोटांत गुडगुड शब्द, ढेंकरा, हीं पूर्वरूपाचीं लक्षणें जाणावीं. **उपचार**—( १. ) गंगावतीचा रस १ तोळा व तूप १ तोळा एकत्र करून द्यावें. ( २. ) मुळ्याचा कंद किसून त्याचें पाणी

२ तोळे काढावें व त्यांत गाईचें तूप १ तोळा घालून द्यावें. ( ३. ) उन्हाळीच्या मुळया दह्यांत द्याव्या. ( ४. ) हरीतकी, सुंठ, चित्रक यांच्या काढ्यांत दालचिनी व जंवखार यांचें चूर्ण घालून द्यावें. ( ५. ) हरीतकी, मिरे, वावडिंग, चित्रक, ओंवा, सुंठ, यांचा काढा द्यावा. ( ६. ) टेंटू, चित्रकमूळ, इंद्रजव, करंज, सैंधव व सुंठ यांचें चूर्ण सात दिवसपर्यंत प्राशन केलें असतां गुदांतील मोड गळून पडतील. ( ७. ) कडूनिंबाचीं एकविस पानें बारीक वाटून सोलीव मुगाच्या वांटलेल्या दाळींत मिश्र करून त्याचे घारगे गाईच्या तुपांत परतून ते २१ दिवस खावे. ह्मणजे सर्व मोड गळून पडतील. मीठ खाऊं नये. सेंधेलोण थोडें खावें. ( ८. ) बाळहिरडे, तीळ, बिबे यांच्या चूर्णाच्या दुप्पट गूळ घालून गोळया कराव्या. त्या अनुपान पाहून द्याव्या. ह्मणजे मूळव्याधि पांडुरोग, ज्वर, कुष्ठ, कास, श्वास, पांथरी, हे रोग दूर होतात. ( ९. ) मलावष्टंभ झाला असला तर ओंवा व बीडखार यांणीं युक्त असें ताक प्यालें असतां, गुदांतील रोग ताकानें दूर झालेले असे पुनः उत्पन्न होत नाहींत. ताक प्याल्यानें वाहिनींतील रक्त शुद्ध होऊन रस, बल, पुष्टि, वर्ण, चांगले होतात. व हर्षही होतो. आणि वात कफ यांचे शेंकडो विकार दूर होतात. ( १०. ) सुरण १६ भाग, चित्रक ८ भाग, सुंठ १ भाग, मिरीं १ भाग, यांचें चूर्ण करून समान गूळ घेऊन गोळया करून द्याव्या. (११.) सुरणाच्या कंदास मातीचा लेप करून पुटपाकानें अग्नींत भाजून त्यांत तिळाचें तेल व सैंधव घालून तो भक्षावा. (१२. ) सैंधव, इंद्रजव, करंज व कडूनिंब यांची साल, हीं औषधें वांटून घ्यावीं. ( १३. ) वरधारा, भिलावा, सुंठ, हीं तीन औषधें समान घेऊन त्यांचें चूर्ण करून त्यांत त्याच्या दुप्पट गूळ घालून गोळया कराव्या व त्या भक्षाव्या. ( १४. ) पिंपळीचें चूर्ण ताकांत द्यावें. **रक्तार्शावर उपचार**— ( १. ) अघाड्याच्या बियांचा कल्क करून तो तांदुळाच्या धुवण्याशीं प्यावा. ( २. ) तीळ वांटून लोण्यांत कालवून खावे. ( ३. ) नागकेशर वांटून लोणी व खडीसाखर यांत कालवून द्यावें. ( ४. ) एकेरी मखमलीचीं सुमारें ४० फुलें आणून फुलाच्या खालील हिरवी गवसणी

काढून टाकून वांटून रस काढावा. हा रस एक तोळा व त्यांत तितकेंच गाईचें तूप घालून थोडें ऊन करून तें घ्यावें. याप्रमाणें तीन दिवस घेतल्यावर सर्व प्रकारचे रक्तस्राव बंद होतात. ( ५. ) विष्णूक्रांताचा पाला वांटून त्याची वडी गुदावर बसवावी. ( ६. ) ताजें लोणी भक्षावें. ( ७. ) इसबगोल, रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं हातानें चुरून तें गाळून घेऊन त्यांत खडीसाखर टाकून प्यावें. सर्व प्रकारचे रक्तस्राव, ज्वर व दाह हे शमन होतात.(८.)तूप४तोळे घेऊन गरम पाण्याबरोबर प्यावें. (९.) गाईचें लोणी ८ तोळे, पाणी १६ तोळे व खडीसाखर २ तोळे, एकत्र कढवून घृत सिद्ध करून द्यावें. लेप व धुरी–( १. ) कडू निंबाच्या बियां तेलांत तळून त्यांतच खलाव्या व त्यांत थोडी मोरचुताची लाही घालून तें मलम मोडांस लावावें. आग होईल. (२.)पपईच्या कच्च्या फळाच्या चिकाचा तीन दिवस लेप करावा. मोड गळून पडतात.(३.) सैंधव, देवडांगरीचें बीज कांजींत वाटून लेप करावा. ( ४. ) संगजिरे, कल्हई सफेता, सोनकाव, तुरटीची लाही, मुरडशेंग, मेण, हळद हीं शिळे लोण्यांत खलून लावावीं. ( ५. ) सोरा व रसकापूर यांचा लोण्यांत लेप करावा. ( ६. ) मोरचूत आणून निंबाच्या रसांत उगाळून त्यांत लोणी मिसळून त्याचा लेप करावा. ( ७. ) बिब्याच्या तोंठाचा पोटास लेप करावा. ( ८. ) शेवग्याच्या मुळाच्या रसांत सोमल उगाळून त्याचा लेप करावा. ( ९. ) निवडुंगाच्या व करंजाच्या रसांत हरताळ उगाळून लेप द्यावा. ( १०. ) मनुष्यकेश, सर्पाची कांत, वावडिंग, रुईचें मूळ, शमीचीं पानें, शिंगांचे मोड, हिंग, यांची धुरी द्यावी. ( ११. ) शिळेचें चूर्ण, शिरस व तेल एकत्र करून, धुरी द्यावी. ( १२. ) खारकेची बीं बारीक करून धुरी द्यावी. ( १३. ) कडू दोडकीचें बीं व चिंचेची साल यांची धुरी द्यावी. ( १४. ) श्वेत कण्हेर व जटामांसी यांचा लेप करावा. ( १५. ) वानराची विष्ठा, ओंव्याचें फूल व कळीचा चुना यांची धुरी ७ दिवस द्यावी. मोड गळून पडतात. **पथ्य**–साठे तांदुळ, मूग, कुळित्थ, तुरी, चाकवत, चील, बाळंतशोपा, कोहळा, पडवळ, कारलें, तोंडलें, सुरण, मोहरी, ताक, तूप,

कोंवळा मुळा, कोंवळीं वांगीं. अपथ्य—चणे, मठ, मसुरा, पावटे, चवळी, उंस, केळीं, फणसाचे गरे व भाजी, जड पदार्थ, सांवा, दूध, गूळ.

**सूचना**—ज्यानां बिबवा उफणत असेल, सोसत नाहीं, त्यानीं, तो, ज्या वरील उपायांत आहे, ते उपाय करूं नयेत. इतरांनीं करावे.

## ८. अस्थिभंग. ( हाड दुखावणें. )

कांहींएक निमित्तानें हाड मोडलें असतां किंवा ठेंचलें असतां, प्रथम थंडपाणी वर शिंपून शिपून हळूहळू थोपटावें. नंतर तांबडे मातीचा लेप करावा. ( १. ) शतधौत तूप व तांदुळांचें पीठ एकत्र करून तें मळून वर बांधावें. (२.) बाभळीच्या सालीचें अथवा बियांचें चूर्ण ६ मासे किंवा १ तोळा मधांत द्यावें. दि० ३. ( ३. ) सांधरुखाची किंवा हाडसंधीची साल ठेंचून मोडलेल्या हाडावर तीन दिवस बांधावी. ( ४. ) मंजीष्ठ ‑॥‑ तोळा, मोह्याची साल, चिंचेचा पाला हीं एकत्र वांटून ऊन्ह करून वर बांधावीं. (५.) पंचवल्कलांच्या ( वड, पिंपळ, नांदरूख, उंबर, पिंपरि ) काढ्यानें शेकावें. ( ६. ) अर्जुनसादड्याच्या सालीचें चूर्ण दुधाशीं द्यावें. व सालीचें चूर्ण तुपांत कालवून त्याचा घट्ट लेप करावा. ( ७. ) हाडमोडी ह्मणून शेरासारखा वेल असतो, तो आणून ठेंचून वर बांधावा. ( ८. ) किंचित् भाजलेल्या गव्हांचें चूर्ण मधाशीं खावयास द्यावें.(९.) मंजिष्ठ व ज्येष्ठमध हीं निंबाच्या रसांत खलून त्यांत १०० वेळा पाण्यानें धुतलेलें तूप व तांदुळांचे पीठ घालून वर लेप द्यावा. ( १०. ) लसूण, मध, व पिंपळाची लाख, वांटून त्यांत तूप व साखर घालून द्यावें. ह्मणजे त्वरित सांधा जमतो. ( ११. ) प्रवाळभस्म मधाशीं द्यावें. **पथ्य**—तांदूळ, गहूं, मूग, वाटाणे, तूप, दूध, पडवळ, लसूण, शेवगा. **अपथ्य**‑मीठ, तिखट, खारट, आंबट, मैथून, ऊन्ह.

## ९. आनाह. ( मलबद्धरोग. )

**कारण.**—आम किंवा मळ उदरांत फार दिवस सांचून वायूनें शुष्क होऊन खडा धरितो, व शौचास साफ होत नाहीं, या विकारास आनाह रोग ह्मणतात. **लक्षण.**—आमापासून आनाह झाला असतां तहान,

पडसें, मस्तकाचा दाह, आमाशयामध्यें शूळ, जडपणा, हृदयाला दाटा, ढेंकराचा प्रतिबंध, कंबर, पाठ, पुरीष, आणि मूत्र यांचा स्तंभ, शूळ, मूर्च्छा, मळाची वांति व श्वास हीं लक्षणें होतात. पक्काशयामध्यें आनाह झाला असतां आध्मानवातरोगादिक हीं लक्षणें होतात. **असाध्यलक्षण.**—तहानेनें पीडित, क्लेश पावलेला, क्षीण, शूळांनीं पीडलेला आणि मळ ओकणारा, अशा रोग्याला सोडावें. **उपचार**—( १. ) हिंग १, वेखंड ३, कोष्ट ५, सज्जीखार ७, व वावडिंग ९ भाग घेऊन, त्यांचें चूर्ण कोंबटपाण्याशीं द्यावें. ह्मणजे आनाह, विषूचि, हृद्रोग, गुल्म व अर्धांगवायु यांचा नाश होतो. ( २. ) निशोत्तर, २, पिंपळी ४, व हिरडे ५ भाग घेऊन, चूर्ण करून त्याच्या समभाग गूळ घालून खावें. हें दारुण आनाह नाशक आहे. **पथ्य**—तूप, भात, अभ्यंग, कोंवळे मुळे, महाळुंग. **अपथ्य**—वांति, मलमूत्रवेगांचा रोध, सर्वप्रकारच्या डाळी, जांभळें, कांकड्या, अळू, तुरटपदार्थ, जडान्न.

## १०. आमवात.

**कारण**—विरुद्ध आहाराचें भक्षण करणारा, अथवा विरुद्ध चेष्टा करणारा, मंदाग्नि, आळशी, स्निग्ध, अन्न खाऊन लागलीच मेहनत करणारा, अशा मनुष्याचा आम ( उदरांतील अपक्व पदार्थ ) वायूनें कफस्थानीं जातो व तेथून तो कफानें दूषित होऊन शिरांत जातो. तेथें कफ, वात, पित्त, यांनीं दुष्ट, अनेकवर्ण व चिकट असा होऊन स्रोतसाला कंपित करून वात व कफ यांस एककाळीं कोपवून ते त्रिकसंधींत (कटिभागांत ) प्रवेश करून गात्रांना स्तब्ध करितात; त्याला आमवात असें ह्मणतात. **लक्षणें**—अंग मोडून येणें, अरुची, तहान, आळस, अंगाला जडत्व, ज्वर, अन्न न पचणें, अंगाला सूज येणें, हीं चिन्हें होतात. आणि अधिक जाहला असतां हात, पाय, मस्तक, घोटे, कटिभाग, गुडघे, मांड्या व संधि यांस सूज व ठणका उत्पन्न होतो. वायूच्या योगानें ज्या ठिकाणीं आम जातो, त्या अंगास विंचू चावल्याप्रमाणें वेदना होतात. अग्निमांद्य, तोंडास पाणी सुटणें, अरुचि, अंगाला जडत्व, खरे,

तोंडाला विरसपणा, दाह, अतिमूत्र, कुशींत काठिण्य, शूळ, निद्रेचा विपर्यास, तहान, वांती, भ्रम, मूर्च्छा, हृदयशूळ, मलस्तंभ, जडत्व, आंतड्यांत शब्द होणें, पोट फुगणें इ० लक्षणें होतात. उपचार–( १. ) सुंठ व गुळवेल यांचा काढा नित्य घेतला असतां बहुत दिवसांचाही आमवात दूर होतो. ( २. ) सुंठ व गोखरू यांचा काढा नित्य सेवन केला असतां आमवात व कटिशूळ, पृष्ठिशूळ, यांचा नाशक, पाचक, व पीडानाशक आहे. ( ३. ) रास्ना, देवदार, बाहव्याचा मगज, सुंठ, मिरें, पिंपळी, एरंडमूळ, पुनर्नवा ( घेटुळी ) व गुळवेल यांच्या काढ्यांत सुंठीचा कल्क अ० सुंठीचें चूर्ण किंवा एरंडेल घालून तो घ्यावा. ( ४. ) सुंठीच्या काढ्यांत एरंडेल घालून द्यावें ह्मणजे आमवात, कंबर व कुशी या ठिकाणचा शूळ, पोटशूळ, हे बरे होतात. ( ५. ) दशमूळाच्या काढ्यांत एरंडेल घालून द्यावें. ( ६. ) एरंडमुळाच्या रसांत सुंठीचें चूर्ण कालवून गोळा करून त्यावर एरंडाचीं पानें गुंडाळून वर चिकणमातीनें सारवून पुटपाककृतीनें फोफाट्यांत भाजून नंतर तो गोळा बाहेर काढून पिळून रस काढून त्यांत मध घालून द्यावा. ( ७. ) लघुपंचमुळांच्या काढ्यांत एरंडेल घालून द्यावें. ( ८. )बृहत्पंचमुळाच्या काढ्यांत एरंडेल घालून द्यावें. ( ९. ) गुळवेळ, सुंठ, एरंडमूळ, आस्कंद, यांचा काढा द्यावा. ( १०. ) गुळवेलीच्या काढ्यांत एरंडेल द्यावें. ( ११. ) पावशेर खजूर कोळून पाजावा. ( १२. ) चित्रक, कुटकी, पहाडमूळ, इंद्रजव, अतिविष, गुळवेल, देवदार, नागरमोथा, सुंठ, बालहरीतकी, यांचें चूर्ण उष्णोदकांत द्यावें. ( १३. ) रात्रीं तीन मासे चिराइतांत दोनतोळे पाणी घालून भिजत ठेवावें. सकाळीं वस्त्रगाळ करून त्यांत दोनगुंजा कापूर, दोन गुंजा शिलाजित व अर्धतोळा मध, याप्रमाणें दररोज सेवन केल्यानें जीर्णज्वर व सर्व प्रकारचे अंगांत भिनलेले गर्मीचे रोग ७ दिवसांत दूर होऊन चांगली शक्ति येते. पथ्य–रुक्षपदार्थ, घाम काढणें,

१ सालवण ( रानगांजा, डाय. ) पिठवण ( रानभाल, ढवला, ) रिंगणी, डोरली ( रानवांगी, ) गोखरू हीं लघुपंचमूळें; वेल, शिवण, टाकळी, टेटू व पाडळ हीं बृहत् पंचमूळें; मिळून दशमूळें जाणावीं.

लंघन, स्नेहपान, जुने तांदूळ, जव, कुळित्थ, सांवे, वातकफघ्न असे पदार्थ, ताक, लसूण, पडवळ, कारलें, वांगें, शेवगा, ऊन्हपाणी, कडू, तिखट असे पदार्थ. **अपथ्य**—दहीं, गूळ, क्षारपदार्थ, मयाळ, उडदांचें पीठ, विरुद्धान्न, मलमूत्रादिकांचा रोध, जागरण, विषमाशन, जड व कफकारक पदार्थ.

## ११. उचकी. ( सं. हिक्का रोग. )

**कारण**—जड व मलबद्ध करणारे पदार्थांचें सेवन, थंड पाणी पिणें, थंड पाण्याचें स्नान, शिळें अन्न खाणें, धूर व धूळ नाकांत जाणें, ऊन्ह व वायु यांचें अतिसेवन, उपोषण करणें, इत्यादि कारणांनीं हा रोग होतो. **उपचार**—( १. ) पिंपळीचें चूर्ण व मोराचे पिसाचें भस्म मधांत कालवून वारंवार चाटावें. ह्मणजे उचकी व ओकारी यांचा त्वरित नाश होतो. ( २. ) ज्येष्ठमधाचें चूर्ण मधांत द्यावें. ( ३. ) निर्गुंडीचें बीज व पिंपळी यांचा काढा, भाजलेला हिंग एक मासाभर घालून द्यावा. ( ४. ) अलित्याचें नस्य द्यावें. ( ५. ) महाळुंगाच्या रसांत मध व संचळ घालून द्यावें. ( ६. ) धमाशाच्या काढ्यांत मध घालून द्यावा. ( ७. ) सोन्याचा वर्ख लोण्यांत द्यावा. ( ८. ) नागरमोथ्याचें बीज घेऊन तें आठपट पाण्यांत भिजत घालावें. मऊ झालें ह्मणजे वस्त्रावर गाळून त्याचें पाणी ४ तोळे वारंवार प्राशन करावें. ( ९. ) आंवळकठी, पिंपळी व सुंठ यांचा काढा, साखर घालून घेतला असतां प्राणाचा नाश करणाऱ्या उचकीचा नाश करितो. ( १०. ) कवठाचा अंगरस किंवा आंवळ्याचा अंगरस, मध व पिंपळी यांसहित घेतला असतां तो हिक्का व श्वास यांचा निवारक आहे. ( ११. ) निर्धूमअंगारावर ( विस्तवावर ) हिंग व उडीद यांचें चूर्ण घालून त्याचा धूर प्राशन करावा. ( १२. ) कढत दूध अथवा उसाचा रस प्यावा. ( १३. ) खोकल्यावरील व क्षयावरील सर्व उपचार वात, खोकला, उचकी आणि श्वास यांवर योजावें. **पथ्य**—गहूं, हुलगे; तांदूळ, जव, लसूण, पडवळ, मुळा. **अपथ्य**—वाल, उडीद, पेंढ, मेंढीचें दूध, आंबटपदार्थ, भोंपळा.

# १२. उदररोग.

**कारण**—अग्निमांद्य ( अग्निमांद्यानें सर्वच रोग होतात. आणि उदरें तर विशेषेंकरून होतात. ) अजीर्ण, विरुद्धाहार, मलावरोध, या कारणांनीं उदर रोग होतो. **लक्षणें**—आध्मान ( वायु धरणें, ) चालण्याविषयीं असामर्थ्य, दुर्बलता, अग्निमांद्य, सूज, ग्लानि, दाह, तंद्रा, हीं सामान्य लक्षणें होतात. **उदरांची संख्या**—पृथक् दोषेंकरून ( वात, पित्त, कफ ), सन्निपातानें, छिद्रोदर, बद्धगुदोदर, क्षतोदर व जलोदर, मिळून ८ प्रकारचीं उदरें होतात. **वातोदर**—वातोदरामध्यें हात, पाय, नाभि आणि कुशी यांच्या ठिकाणीं सूज, सांधे तुटणें, कोरडा खोकला, अंग मोडून येणें, कंबरेपासून खालीं जड वाटणें, मळ सांचणें, त्वचा, नख, नेत्रादिक काळीं तांबडीं होणें, पोट अकस्मात् मोठें व्हावें, लहान व्हावें, पोटावर चहुंकडे बारीक काळया शिरा उमटतात, पोटावर टिचकुली मारली असतां फुगलेल्या पखालीसारखा शब्द होतो, या उदरांत वायु चहूंकडे फिरून शूळ करितो व गुर्गुरतो. कोणी शोथोदर ह्मणून उदर रोगाचा एक निराळा प्रकार मानितात. त्यांत पोट मोठें होतें, सर्वांगास मोठी सूज उत्पन्न होते व रोगी तहाटल्यासारखा दिसतो; हीं लक्षणें होतात. **पित्तोदर**—ज्वर, मूर्च्छा, दाह, तृषा, तोंडाला कडूपणा, भ्रम, अतिसार, नख, नेत्रें यांस पिवळटी, पोट हिरवें, पिंवळया तांबड्या शिरांनीं व्याप्त, घामानें ओलसर, कढत असून जळजळीत होतें, आंतून धूर निघाल्यासारखें वाटतें, हाताला मऊ लागतें, लवकर पाक होतो, ह्मणजे जलोदरामत पावतें, व त्याला फार व्यथा होते; हीं लक्षणें होतात. **कफोदर**—कफोदरामध्यें हातपायांचे डवळे पडतात, स्पर्श कळत नाहीं, सूज येते, अंग जड होतें, झोंप येते, वांति होईलशी वाटते, अरुचि होते, श्वास लागतो, खोकला येतो, त्वगादिक पांढरीं होतात. पोट निश्चळ, तुळतुळीत, पांढऱ्या रेषांनीं व्याप्त व मोठें होतें; त्याची वृद्धि चिरकाळानें होते, कठीण व गार लागतें, जड व स्थिर असतें. **सन्निपातोदर**.—दुष्टचालीच्या स्त्रिया ज्या पुरुषास नखें, केश, मूत्र

विष्टा आणि विटाळ हीं कालवून अन्नपान देतात; अथवा ज्यास शत्रु विषप्रयोग करितात, त्यांस किंवा दुष्टांबु ( यांत सविषप्राणी; गवत, पानें कुजलेलीं आहेत असें उदक ) आणि दूषीविष ( मंदविष ), यांचें सेवन झालें असतां त्या योगानें रक्त आणि वातादि दोष लवकर कुपित होऊन, अत्यंत भयंकर त्रिदोषात्मक उदर उत्पन्न करितात, तें शीतकाळीं, किंवा गार वारा सुटतो त्यावेळीं अथवा ज्या दिवशीं पावसाची झड असेल त्यादिवशीं विशेषेंकरून कोप पावतें, आणि जळतें, “ कारण, त्याचवेळेस दूषीविषाचा कोप होत असतो. ” तो रोगी निरंतर विषयोगानें मूर्च्छा पावतो, पांडुरवर्ण व कृश होतो, आणि आयास केल्यानें शोष लागतो, याला “ दूष्योदर ” असें ह्मटलें आहे. **प्लीहोदर.**—विदाहि ( वंशकरीरादि) ह्मणजे दाह करणारीं आणि अभिष्पंदि ( दध्यादि ) स्रोतःस्रावक अशीं अन्नें निरंतर सेवन करणाऱ्या पुरुषाचें अत्यंत दुष्ट झालेलें रक्त आणि कफ वाढून प्लीहा ( कवळू )ची वृद्धि करितात, या उदराला ‘पाणथरी’ ह्मणतात. हें डावीकडे वाढत असतें. ज्या अवस्थेमध्यें रोगी फारच गळून जातो, अंगांत बारीक ज्वर असतो, अग्नि मंद असतो, आणि कफपित्तोदर लक्षणें यांत असतात, बळ क्षीण होऊन रोगी पांढरा फटफटीत होतो. प्लीहोदराप्रमाणेंच यकृतोदरही होतें. उजव्या बाजूला जें यकृत् ह्मणजे काळीज असतें तें दुष्ट ह्मणजे रोगयुक्त झालें असतां प्लीहोदरासारखेंच उदर होतें. त्याला यकृतोदर ह्मणतात. **बद्धगुदोदर.**—ज्या पुरुषाचें आंतडें उपलेपि ह्मणजे बुळबुळीत, अन्नांनीं ( शाकादिक ) अथवा बारीक बारीक खड्यांनीं दाटलें जातें, त्या पुरुषाचा दोषयुक्त मळ हळू हळू आंत, त्याच्या नळीमध्यें, जसा केरसुणीनें झाडलेला केर कोपऱ्यांत सांचतो तसा सांचतो, त्याच्या गुदामध्यें तो मळ गुंततो, तो मोठ्या कष्टानें ह्मणजे कुंथल्यानें वगैरे थोडथोडा बाहेर येतो. तें उदर, हृदय आणि नाभि यांच्यामध्यें मोठें होतें. त्याच्या त्या उदराला बद्धगुदोदर ह्मणतात. गुदाच्या वरतीं आंतडें बांधल्यासारखें होतें ह्मणून बद्धगुद होय असें **चरकानें** सांगितलें आहे. **क्षतोदर**—कंटकादि शल्य अन्नांत मिसळून पोटांत गेलें ह्मणजे पक्वाशयांतून विलोम ( वांकडें-

तिकडे ) गेलें असतां आंतड्याला भोंक पडतें. तें सरळ गेलें तर भोंक पडत नाहीं, अथवा जांभई, अत्यशन केल्यानें आंतडें फाटतें. त्या आंतड्यापासून गळलेला पाण्यासारखा स्राव पुनः गुदावाटे पाझरतो, पोट बेंबीच्या वरतीं मोठें होतें, टोंचल्यासारखें व भेदवत्पीडेनें अत्यंत व्यथित होतें, याला "परिस्रावि उदर" असेंही ह्मटलें आहे. **जलोदर.**—स्नेहपान केलेला, अनुवासन बस्ती घेतलला, वमन घेतलेला, ढाळक घेतलेला, अथवा निरूहबस्ति घेतलेला, असा पुरुष थंडपाणी पिईल तर त्याचीं तीं उदक वाहणारीं स्रोतसें तत्काळ दुष्ट होतील. तीं उदक व स्रोतसें, स्नेहानें उपलिप्त झालीं असतां पहिल्याप्रमाणें (ह्मणजे अन्नरस-उपस्नेहन्यायानें ) जलोदर ( ह्मणजे पाझरून बाहेर येऊन उदर उत्पन्न करितो. ) होतें. तें वरून तुकतुकीत दिसतें, मोठें होतें, बेंबीजवळ फार उंच होतें, चहूंकडे तिडका लागतात, पाण्यानें पोट अगदीं भरल्यासारखें होतें. जशी पाण्यानें भरलेली पखाल डचमळते, हालते, डबक डबक वाजते, तसें पोट होतें; त्यालाच जलोदर असें ह्मणतात. **साध्यलक्षण.**—सर्व प्रकारचें उदर जन्मतः अत्यंत कष्टसाध्य आहे. बलवान् पुरुषाला नवीन झालेलें, आंत पाणी झालें नसलें तर मोठ्या प्रयत्नानें साध्य होतें. **असाध्यलक्षण.**—ज्याच्या डोळ्याला टापशी आली असेल, शिश्न वांकडें झालें असेल, पोटाची त्वचा क्लेदयुक्त व पाताळ झाली असेल, बळ, रक्त, मांस व अग्नि, हे ज्याचे क्षीण झाले असतील तो रोगी सोडावा. तसेंच बरगड्या फुटणें, अन्नद्वेष, शोथ, अतिसार, यांनीं पिडलेला आणि रेच दिला असतां ज्याचें पोट पुन्हा भरतें, अशा रोग्याला वैद्यानें सोडावें. **शोथोदरावर**—( १. ) सर्व उदरांवर रेचक हें एक मुख्य औषध आहे, तें अर्धीं द्यावें. त्रिफळ्याचें चूर्ण गोमूत्राशीं द्यावें. ( २. ) पिंपळी व सुंठ, गुळांत द्यावी. ( ३. ) बाळहिरडे, सुंठ, देवदार, पुनर्नवा, व गुळवेल यांचा काढा गुग्गुळ व गोमूत्र घालून द्यावा. **सन्निपातोदरावर**—( १. ) बाळहिरडे व निर्गुडीचा पाला हीं एकत्र गोमूत्रांत वांटून त्याचा रस बलाबल पाहून प्यावा. ( २. ) त्रिकटु, जवखार, व सैंधव घालून ताक प्यावें. ( ३. ) घेरोसा व तांदुळज्याच्या मुळ्या पाण्यांत वांटून त्यांत

चौपट तूप घालून तुपाचे चौपट दूध घालून, तूप शेष राही तोंपर्यंत आटवावें, आणि प्यावें. म्हणजे सर्व कृत्रिम विषांचा नाश होईल. **प्लीहोदरावर**–(१.) निगुंडीचा रस २ तोळे व गोमूत्र २ तोळे एकत्र करून घ्यावें.(२.)रक्तरोहिडा व हरीतकी यांचा कल्क गोमूत्रांत अ०ह्मशीच्या मूत्रांत प्राशनार्थ द्यावा. ह्मणजे प्लीहा व सर्व उदरें, मेह, मूळव्याध, कृमि, गुल्म, यांचा नाश होतो. (३.)लसूण, पिंपळमूळ, व हिरडा एकत्र कुटून खावा व वर गोमूत्राचा घोट घ्यावा. (४.) शेवग्याच्या रसांत सैंधव, चित्रकमूळ, पिंपळी, पळसाचा क्षार, व यवक्षार,यांचें चूर्ण घालून खावें. (५.) काळा बोळ २, मिरीं ।., लवंग ।., डिकेमाली ।., बदाम ॥. भाग घेऊन पाण्यांत बोराच्या आठीप्रमाणें गोळ्या कराव्या व त्या द्याव्या. (६.) वेळूचा पाला ताकांत वांटून सैंधव घालून द्यावा. (७.) कोरफडीचा रस हळद घालून द्यावा. (८.) पिंपळी व मध घालून ताक प्यावें. (९.) राईचीं पानें व सैंधव, मडक्यांत, तोंड बंद करून गजपुटानें जाळावीं व ती राख दह्यांत द्यावी. (१०.) शेवग्याचे सालीचे काढ्यांत पिंपळी व मिरपूड घालून तें घ्यावें. यकृतोदरावरही हेच उपाय करावे. **बद्धगुदोदरावर**–(१.) थोरसेरणी, ओंवा, जिरें व सैंधव यांचें चूर्ण द्यावें. **जलोदरावर**-(१.) सुंठ, मिरीं, पिंपळी, सैंधव यांचें चूर्ण घालून तक्रपान करावें. (२.) सैंधव व मोहऱ्या समभाग एकत्र कुटून गोमूत्राबरोबर द्याव्या. (३.) पांढऱ्या बरूच्या मुळाचें चूर्ण मद्यांत द्यावें. (४.) देवदार, पळसाचीं फुलें, रुईचें मूळ, गजपिंपळी, शेवग्याची साल व आस्कंध हीं गोमूत्रांत वाटून पोटावर लेप द्यावा. ह्मणजे सर्व उदरांचा नाश होतो. (५.) ४५ तोळे कांद्याचें बीं वांटून चूर्ण करावें, व ४५ तोळे जुन्या कामळ्याच्या रकस्याची राख वस्त्रगाळ करून, त्या प्रत्येकांतून सहा सहा मासे घेऊन एकत्र करून एक तोळ्याची पुडी अशा ९० पुड्या बांधाव्या. दररोज एक पुडी पाण्याशीं घेत जावी, ह्मणजे सांचलेलें जलोदराचें पाणी लघ्वीद्वारें रोज झरून जाऊन रोग्यास आराम वाटेल व तीन महिन्यांत रोगी बरा होईल. पोटास नस्तर मारून पाणी काढल्यानें कित्येक रोग्यांस आराम वाटतो. परंतु पुष्कळ रोगी नस्तर मारल्यानें का-

ळीज लवकर सडून जाऊन मरतात. या करितां पाणी काढणें तें मोठ्या विचारानें काढावें. **सर्व उदरांवर उपचार.**–(१.) देवदार व चित्रक यांचा काढा द्यावा. (२.) चवक व नागरमोथे यांचा काढा द्यावा (३.) देवदार, शेवगा, मसुरा, अश्वगंध हे गोमूत्रांत वांटून प्राशनार्थ द्यावे ह्मणजे सर्व उदरें, कृमि, सूज, यांचा शीघ्र नाश होतो. (४.) चवक १, चित्रक २, सुंठ ३, देवदार ४ भाग, यांच्या काढ्यांत गोमूत्र व निशोत्तराचें चूर्ण घालून द्यावें. (५.) हरीतकी व निर्गुंडीचा पाला हीं गोमूत्रांत वांटून त्यांचा रस बलाबल पाहून द्यावा. ह्मणजे सर्व उदरें, मेह, अर्श, कृमि, गुल्म, यांचा नाश होतो. (६.) उंटिणीचें दूध प्यावें. (७.) मीठ, पादेलोण, सैंधव, जवखार, ओंवा, पिंपळी, चित्रकमूळ, सुंठ, हिंग व वावडिंग यांचें चूर्ण तूपभाताबरोबर द्यावें. ह्मणजे वातोदर, गुल्म, अजीर्ण, वायूचा प्रकोप, संग्रहणी, पांडु, भगंदर व मुळव्याध यांचा नाश होतो. (८.) वावडिंग, सज्जीखार, व बाळहिरडे हीं समभाग व यांतील एका औषधाच्या चतुर्थांश कांडे निवडुंगाचा चीक, हीं एकत्र खलून बळाबळ पाहून ऊन्ह पाण्याबरोबर द्यावीं.(९.) कडू इंद्रायणाचें फळ ह्मशीचे मूत्रांत शिजवून त्यांतील गीर थोडा खाण्यास द्यावा व तें मूत वर पाजावें. (१०.) खोबऱ्याची एक वाटी घेऊन दोन्हीं दाढांनीं चावून थोडी खावी. नंतर त्यावर एक भिलावा खावा. नंतर थोडी वाटी खाऊन त्याजवर दुसरा भिलावा खावा व त्याजवर राहिलेली वाटी खावी. याप्रमाणें एकसांज सात दिवसपर्यंत करावें. उन्हपाणी पिण्यास द्यावें व आठवे दिवशीं उतार हरभऱ्याची डाळ. **पथ्य**–हुलगे, मूग, जव, तांदुळ, ताक, लसूण, पडवळ, कारलें, शेवगा, दूध, विडा. **अपथ्य**–तळलेले पदार्थ, पाले भाज्या, तीळ, उष्ण, दाहक व खारट अशीं भोजनें, दिवा निद्रा.

## १३. उदावर्त रोग.

**कारण**—क्षुधा, तृषा, निद्रा, श्वास, ओकारी, शिंक, जांभई, ढेंकर, नेत्रसंबंधीं जल, शुक्रधातु, मलमूत्र, वायू, या तेरांचे प्राप्त झाले जे वेग, त्यांचा निरोध केला असतां वायु उर्ध्वगति होऊन तेरा प्रकारचा उदा-

चौपट तूप घालून तुपाचे चौपट दूध घालून, तूप शेष राही तोंपर्यंत आटवावें, आणि प्यावें. म्हणजे सर्व कृत्रिम विषांचा नाश होईल. **प्लीहोदरावर**–(१.) निगुंडीचा रस २ तोळे व गोमूत्र २ तोळे एकत्र करून घ्यावें.(२.)रक्तरोहिडा व हरीतकी यांचा कल्क गोमूत्रांत अ०ह्मशीच्या मूत्रांत प्राशनार्थ द्यावा. ह्मणजे प्लीहा व सर्व उदरें, मेह, मूळव्याध, कृमि, गुल्म, यांचा नाश होतो. (३.)लसूण, पिंपळमूळ, व हिरडा एकत्र कुटून खावा व वर गोमूत्राचा घोट घ्यावा. (४.) शेवग्याच्या रसांत सैंधव, चित्रकमूळ, पिंपळी, पळसाचा क्षार, व यवक्षार,यांचें चूर्ण घालून खावें. (५.) काळा बोळ २, मिरीं ।., लवंग ।., डिकेमाली ।., बदाम ॥. भाग घेऊन पाण्यांत बोराच्या आठीप्रमाणें गोळ्या कराव्या व त्या द्याव्या. (६.) वेळूचा पाला ताकांत वांटून सैंधव घालून द्यावा. (७.) कोरफडीचा रस हळद घालून द्यावा. (८.) पिंपळी व मध घालून ताक प्यावें. (९.) राईचीं पानें व सैंधव, मडक्यांत, तोंड बंद करून गजपुटानें जाळावीं व ती राख दह्यांत द्यावी. (१०.) शेवग्याचे सालीचे काढ्यांत पिंपळी व मिरपूड घालून तें घ्यावें. यकृतोदरावरही हेच उपाय करावे. **बद्धगुदोदरावर**–(१.) थोरसेरणी, ओंवा, जिरें व सैंधव यांचें चूर्ण द्यावें. **जलोदरावर**-(१.) सुंठ, मिरीं, पिंपळी, सैंधव यांचें चूर्ण घालून तक्रपान करावें. (२.) सैंधव व मोहऱ्या समभाग एकत्र कुटून गोमूत्राबरोबर द्याव्या. (३.) पांढऱ्या बरूच्या मुळाचें चूर्ण मधांत द्यावें. (४.) देवदार, पळसाचीं फुलें, रुईचें मूळ, गजपिंपळी, शेवग्याची साल व आस्कंध हीं गोमूत्रांत वाटून पोटावर लेप द्यावा. ह्मणजे सर्व उदरांचा नाश होतो. (५.) ४५ तोळे कांद्याचें बीं वांटून चूर्ण करावें, व ४५ तोळे जुन्या कामळ्याच्या रकट्याची राख वस्त्रगाळ करून, त्या प्रत्येकांतून सहा सहा मासे घेऊन एकत्र करून एक तोळ्याची पुडी अशा ९० पुड्या बांधाव्या. दररोज एक पुडी पाण्याशीं घेत जावी, ह्मणजे सांचलेलें जलोदराचें पाणी लघ्वीद्वारें रोज झरून जाऊन रोग्यास आराम वाटेल व तीन महिन्यांत रोगी बरा होईल. पोटास नस्तर मारून पाणी काढल्यानें कित्येक रोग्यांस आराम वाटतो. परंतु पुष्कळ रोगी नस्तर मारल्यानें का-

ळीज लवकर सडून जाऊन मरतात. या करितां पाणी काढणें तें मोठ्या विचारानें काढावें. **सर्व उदरांवर उपचार.**--(१.) देवदार व चित्रक यांचा काढा द्यावा. (२.) चवक व नागरमोथे यांचा काढा द्यावा (३.) देवदार, शेवगा, मसुरा, अश्वगंध हे गोमूत्रांत वांटून प्राशनार्थ द्यावे ह्मणजे सर्व उदरें, कृमि, सूज, यांचा शीघ्र नाश होतो. (४.) चवक १, चित्रक २, सुंठ ३, देवदार ४ भाग, यांच्या काढ्यांत गोमूत्र व निशोत्तराचें चूर्ण घालून द्यावें. (५.) हरीतकी व निर्गुडीचा पाला हीं गोमूत्रांत वांटून त्यांचा रस बलाबल पाहून द्यावा. ह्मणजे सर्व उदरें, मेह, अर्श, कृमि, गुल्म, यांचा नाश होतो. (६.) उंटिणीचें दूध प्यावें. (७.) मीठ, पादेलोण, सैंधव, जवखार, ओंवा, पिंपळी, चित्रकमूळ, सुंठ, हिंग व वावडिंग यांचें चूर्ण तूपभाताबरोबर द्यावें. ह्मणजे वातोदर, गुल्म, अजीर्ण, वायूचा प्रकोप, संग्रहणी, पांडु, भगंदर व मुळव्याध यांचा नाश होतो. (८.) वावडिंग, सज्जीखार, व बाळहिरडे हीं समभाग व यांतील एका औषधाच्या चतुर्थांश कांडे निवडुंगाचा चीक, हीं एकत्र खलून बळाबळ पाहून ऊन्ह पाण्याबरोबर द्यावीं.(९.) कडू इंद्रायणाचें फळ ह्मशीचे मूत्रांत शिजवून त्यांतील गीर थोडा खाण्यास द्यावा व तें मूत वर पाजावें. (१०.) खोबऱ्याची एक वाटी घेऊन दोन्ही दाढांनीं चावून थोडी खावी. नंतर त्यावर एक भिलावा खावा. नंतर थोडी वाटी खाऊन त्याजवर दुसरा भिलावा खावा व त्याजवर राहिलेली वाटी खावी. याप्रमाणें एकसांज सात दिवसपर्यंत करावें. उन्हपाणी पिण्यास द्यावें व आठवे दिवशीं उतार हरभऱ्याची डाळ. **पथ्य**--हुलगे, मूग, जव, तांदुळ, ताक, लसूण, पडवळ, कारलें, शेवगा, दूध, विडा. **अपथ्य**--तळलेले पदार्थ, पाले भाज्या,-तीळ, उष्ण, दाहक व खारट अशीं भोजनें, दिवा निद्रा.

## १३. उदावर्त रोग.

**कारण**--क्षुधा, तृषा, निद्रा, श्वास, ओकारी, शिंक, जांभई, ढेंकर, नेत्रसंबंधीं जल, शुक्रधातु, मलमूत्र, वायू, या तेरांचे प्राप्त झाले जे वेग, त्यांचा निरोध केला असतां वायु ऊर्ध्वगति होऊन तेरा प्रकारचा उदा-

चौपट तूप घालून तुपाचे चौपट दूध घालून, तूप शेष राही तोंपर्यंत आटवावें, आणि प्यावें. म्हणजे सर्व कृत्रिम विषांचा नाश होईल. **प्लीहोदरावर**–(१.) निगुंडीचा रस २ तोळे व गोमूत्र २ तोळे एकत्र करून घ्यावें.(२.)रक्तरोहिडा व हरीतकी यांचा कल्क गोमूत्रांत अ०ह्मशींच्या मूत्रांत प्राशनार्थ द्यावा. ह्मणजे प्लीहा व सर्व उदरें, मेह, मूळव्याध, कृमि, गुल्म, यांचा नाश होतो. (३.)लसूण, पिंपळमूळ, व हिरडा एकत्र कुटून खावा व वर गोमूत्राचा घोट घ्यावा. (४.) शेवग्याच्या रसांत सैंधव, चित्रकमूळ, पिंपळी, पळसाचा क्षार, व यवक्षार,यांचें चूर्ण घालून खावें. (५.) काळा बोळ २, मिरीं ।., लवंग ।., डिकेमाली ।., बदाम ।।. भाग घेऊन पाण्यांत बोराच्या आठीप्रमाणें गोळ्या कराव्या व त्या द्याव्या. (६.) वेळूचा पाला ताकांत वांटून सैंधव घालून द्यावा. (७.) कोरफडीचा रस हळद घालून द्यावा. (८.) पिंपळी व मध घालून ताक प्यावें. (९.) राईचीं पानें व सैंधव, मडक्यांत, तोंड बंद करून गजपुटानें जाळावीं व ती राख दह्यांत द्यावी. (१०.) शेवग्याचे सालीचे काढ्यांत पिंपळी व मिरपूड घालून तें घ्यावें. यकृतोदरावरही हेच उपाय करावे. **बद्धगुदोदरावर**–(१.) थोरसेरणी, ओंवा, जिरें व सैंधव यांचें चूर्ण द्यावें. **जलोदरावर**-(१.) सुंठ, मिरीं, पिंपळी, सैंधव यांचें चूर्ण घालून तक्रपान करावें. (२.) सैंधव व मोहऱ्या समभाग एकत्र कुटून गोमूत्राबरोबर द्याव्या. (३.) पांढऱ्या बरूच्या मुळाचें चूर्ण मधांत द्यावें. (४.) देवदार, पळसाचीं फुलें, रुईचें मूळ, गजपिंपळी, शेवग्याची साल व आस्कंध हीं गोमूत्रांत वाटून पोटावर लेप द्यावा. ह्मणजे सर्व उदरांचा नाश होतो. (५.) ४५ तोळे कांद्याचें बीं वांटून चूर्ण करावें, व ४२ तोळे जुन्या कामळ्याच्या रकळ्याची राख वस्त्रगाळ करून, त्या प्रत्येकांतून सहा सहा मासे घेऊन एकत्र करून एक तोळ्याची पुडी अशा ९० पुड्या बांधाव्या. दररोज एक पुडी पाण्याशीं घेत जावी, ह्मणजे सांचलेलें जलोदराचें पाणी लघ्वीद्वारें रोज झरून जाऊन रोग्यास आराम वाटेल व तीन महिन्यांत रोगी बरा होईल. पोटास नस्तर मारून पाणी काढल्यानें कित्येक रोग्यांस आराम वाटतो. परंतु पुष्कळ रोगी नस्तर मारल्यानें का-

ळीज लवकर सडून जाऊन मरतात. या करितां पाणी काढणें तें मोठ्या विचारानें काढावें. **सर्व उदरांवर उपचार.**–(१.) देवदार व चित्रक यांचा काढा द्यावा. (२.) चवक व नागरमोथे यांचा काढा द्यावा (३.) देवदार, शेवगा, मसुरा, अश्वगंध हे गोमूत्रांत वांटून प्राशनार्थ द्यावे ह्मणजे सर्व उदरें, कृमि, सूज, यांचा शीघ्र नाश होतो. (४.) चवक १, चित्रक २, सुंठ ३, देवदार ४ भाग, यांच्या काढ्यांत गोमूत्र व निशोत्तराचें चूर्ण घालून द्यावें. (५.) हरीतकी व निर्गुडीचा पाला हीं गोमूत्रांत वांटून त्यांचा रस बलाबल पाहून द्यावा. ह्मणजे सर्व उदरें, मेह, अर्श, कृमि, गुल्म, यांचा नाश होतो. (६.) उंटिणीचें दूध प्यावें. (७.) मीठ, पादेलोण, सैंधव, जवखार, ओंवा, पिंपळी, चित्रकमूळ, सुंठ, हिंग व वावडिंग यांचें चूर्ण तूपभाताबरोबर द्यावें. ह्मणजे वातोदर, गुल्म, अजीर्ण, वायूचा प्रकोप, संग्रहणी, पांडु, भगंदर व मुळव्याध यांचा नाश होतो. (८.) वावडिंग, सज्जीखार, व बाळहिरडे हीं समभाग व यांतील एका औषधाच्या चतुर्थांश कांडे निवडुंगाचा चीक, हीं एकत्र खलून बळाबळ पाहून ऊन्ह पाण्याबरोबर द्यावीं.(९.) कडू इंद्रायणाचें फळ ह्मशीचे मूत्रांत शिजवून त्यांतील गीर थोडा खाण्यास द्यावा व तें मूत वर पाजावें. (१०.) खोबऱ्याची एक वाटी घेऊन दोन्ही दाढांनीं चावून थोडी खावी. नंतर त्यावर एक भिलावा खावा. नंतर थोडी वाटी खाऊन त्याजवर दुसरा भिलावा खावा व त्याजवर राहिलेली वाटी खावी. याप्रमाणें एकसांज सात दिवसपर्यंत करावें. उन्हपाणी पिण्यास द्यावें व आठवे दिवशीं उतार हरभऱ्याची डाळ. **पथ्य**–हुलगे, मूग, जव, तांदुळ, ताक, लसूण, पडवळ, कारलें, शेवगा, दूध, विडा. **अपथ्य**–तळलेले पदार्थ, पाले भाज्या, तीळ, उष्ण, दाहक व खारट अशीं भोजनें, दिवा निद्रा.

## १३. उदावर्त रोग.

**कारण**—क्षुधा, तृषा, निद्रा, श्वास, ओकारी, शिंक, जांभई, ढेंकर, नेत्रसंबंधीं जल, शुक्रधातु, मलमूत्र, वायू, या तेरांचे प्राप्त झाले जे वेग, त्यांचा निरोध केला असतां वायु ऊर्ध्वगति होऊन तेरा प्रकारचा उदा-

वर्त रोग उत्पन्न होतो. त्यांमध्यें मल, मूत्र आणि वायु या तिघांच्या निग्रहेंकरून जो उदावर्त होतो तो मोठे घोर प्राणसंकट उत्पन्न करितो. **सामान्य लक्षण**--अतिशोष, ग्लानि, अति क्षीणता, शूळ, विष्टायुक्त वांति, अशीं लक्षणें ज्या उदावर्तांत होतात, तो असाध्य जाणावा. **उदावर्त रोगावर उपचार**--( १. ) जवखार, साखर एकत्र करून द्यावी. (२.) चौपट पाणी घालून दूध प्राशन करावें. ( ३. ) धमाशाचा स्वरस, किंवा केशराचा काढा; किंवा कांकडीचें बीज वाटून, त्याच्या पाण्यांत केळें मिश्र करून द्यावें. ( ४. ) गोमूत्रांत जवसाचें चूर्ण घालून प्यावें. (५.) एलचीचें चूर्ण दुधाशीं प्राशन करावें. ( ६. ) आवळ्यांचा स्वरस अथवा काढा तीन दिवस प्राशन करावा. ( ७. ) गाढवाच्या लिदीचा रस द्यावा. (८.) वाळलेला मुळा, आलें, पुनर्नवा, पंचमूळ, बाहव्याचा मगज यांचें तूप सिद्ध करून प्राशन करावें (. ९.) तिळाच्या कांडांची राख अ० क्षार १ मासा, दुधांत गूळ १ तोळा घालून घ्यावा. **पथ्य**--तांदूळ, दूध, लंघन, पाचन हीं हितावह. **अपथ्य**—वमन, मलमूत्र यांच्या वेगाचा रोध, द्विदल धान्यें, कमलकंद, जांबूळ, कांकडी, आळू, वेळूचे कोंब, तुरट पदार्थ व जडान्न.

## १४. उन्माद रोग.

**कारण**—भय, शोक, काम, इच्छित स्त्री अगर पुरुष याची प्राप्ति न होणें, विरुद्ध भोजन, बलिष्ट पुरुषादिकाशीं मस्ती केल्यानें, अल्पसत्व गुणी पुरुषाचे वातादि दोष कुपित होऊन आपला नित्याचा मार्ग सोडून अन्य मनोवाहिनी, त्या धमनी ( नाडी ), त्यांप्रत जाऊन जेव्हां चित्ताला विभ्रम करितात, तेव्हां त्या रोगास उन्माद असें ह्मणतात. **लक्षण**—विषय नसतां हांसणें, गाणें, नाचणं, प्रीति करणें, लज्जा सोडणें, बुद्धीस विपर्यास, रोदन, निद्रानाश, एकांतीं नेऊन कांहीं सांगितलें असतां उद्वेग करणें, भ्रम, हीं लक्षणें होतात. **असाध्य लक्षण**—जो रोगी तोंड वर किंवा खालीं करून राहतो, सर्वकाळ जागा राहतो व क्षीण, असा असाध्य जाणावा. **उपचार** ( १ ) अपस्मारावरचीं औषधें द्यावीं. ( २. )

नवसागर व चुना हीं एकत्र करून कुपींत भरून तें हुंगावयास द्यावें. ( ३. ) पांढऱ्या कांद्याच्या रसाचें अंजन करावें. ( ४. ) सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, सैंधव, वेखंड, कुटकी, शिरसाचें बीं, करंजबीं, पांढरे शिरस, हीं समभाग घेऊन गोमूत्रांत वांटून गोळी करून तिचें अंजन करावें. ह्मणजे चातुर्थिक ज्वर, उन्माद ( उन्मत्त वायु ), अपस्मार हे दूर होतात. ( ५. ) रोग्यास बांधून ठेवावें. सर्प इत्यादि भयंकर जनावरें दाखऊन भिववावा व आंगाला सर्षपाचें तेल लावून उन्हांत बसवावा अथवा उताणा निजवावा. कुहिली अथवा उष्णोदक त्याच्या आंगावर फेंकावें, किंवा लोहादिक तापऊन डाग देण्याचें भय दाखवावें. ( ६. ) ब्राह्मी, कोहळा, वेखंड, शंखपुष्पी, यांचे अंगरस वेगवेगळे काढून त्यांत मध व कोष्ठाचें चूर्ण मिळून प्यालें असतां सारे उन्माद रोग दूर होतात. ( ७. ) धोत्र्याच्या पानांचा रस अ० बिया ४ अथवा ५ तुपांत द्याव्या. ( ८. ) धमाशाचा अ० बाळहिरड्याचा काढा तूप घालून द्यावा. (९.) दशमूळांचा काढा तूप घालून द्यावा. **पथ्य**—गहूं, मूग, तांदूळ, धारोष्ण दूध, तूप, जून कोहोळा, पडवळ, चाकवत, तांदुळजा, नारळ, कवीठ, फणस. **अपथ्य**—उष्णभोजन, मद्य, विरुद्धाशन, निद्रा, क्षुधा व तृषा यांचा रोध करणें, व्यायाम करणें, कारलें, पालेभाज्या.

## १५. उपदंश. ( गरमी. )

**कारण.**—ज्या स्त्रिया बहुत पुरुषांशीं संग करितात अशा स्त्रियांशीं संग झाल्यानें; मैथुनानंतर शिश्न न धुतल्यानें; रजस्वला, बाळंतीण व रोगी अशा स्त्रियांशीं संग केल्यानें, अथवा शिश्नाचे ठायीं हात, नख व दंत यांचा कठोर स्पर्श झाल्यानें हा रोग होतो. **लक्षणें**—इंद्रियावर व इंद्रियाच्या आंतील बाजूस चट्टे पडणें, व मण्याच्या कडा सुजणें, दोन्हीं बाजूंच्या जांघेच्या मुळांतील नळाच्या तोंडाखालील ग्रंथि ( गांठी ) सुजून मोठ्या होणें, ह्मणजे ज्यास बद ह्मणतात ते होणें, व ते पक्वदशेस येऊन फुटल्यानंतर सर्व शरीरांतील रक्ताचा दुर्गंधि युक्त होऊन वाहून जाणें, धातुस्थान बिघडणें, आणि त्या योगानें सर्व शरीरांतील रक्त दू-

षित होऊन सर्वांगावर व हात, पाय, अंड व मूख यांवर नायस्यांसारखे चट्टे पडून त्यांचा परिणाम दुस्तर व्याधीसारखा ( महारोगासारखा ) होणें, आणि अतिशय दुःखानें ( गर्मीनें ) लिंगनाश, कृमि, मूत्रसंकोच, मूत्र जळजळणें, ग्रंथि इत्यादि विकार होणें, तिडका, इ. लक्षणें होतात.

**उपदंशापासून होणारे परिणाम**—या रोगावर त्वरित उपचार करावे. उपदंशाच्या योगानें मुख्यत्वेंकरून शरिरांतील शुक्र व शोणित ( धातु व रक्त ) बिघडून प्रथमतः सर्व वीर्यांचा नाश होतो; नंतर रक्त शोषण होतें; संततीचा अभाव होतो. शक्ति क्षीण झाल्यावर अर्थात् शरीर पांढरें निस्तेज होतें. अरुचि, अत्याहार हीं लक्षणें होऊन अंगांत ज्वराचा संचार होतो. त्यांतच खोकला उत्पन्न होतो व सर्व अस्थींतील तेज नष्ट होऊन क्षयरोग उत्पन्न होतो. बद उद्भवले असून ते ज्या वेळचे त्यावेळीं योग्य उपचार होऊन न वितुळलें किंवा फुटून त्यांतील दम निघून जाऊन त्यांचा उपशम न झाला, तर गर्मी आंगांत मुरून सर्व अंग, वृषण इंद्रियें या ठिकाणीं चट्टे पडून, ते पुळणास येऊन त्यांतून दुर्गंधीयुक्त लस व पू यांचा स्राव होतो. त्या योगानें शरीरांतील सर्व रक्त जळून जाऊन शोषण होतें. अंगास दुर्गंधि येऊं लागते. दांतावर मळ सांठतो. पोटांत किट्ट सांचतें. ज्वरोद्भव होतो. पायांस सूज येते व त्यांतच परिणाम होतो.

**प्रसंगेंकरून फिरंगोपदंशाची संप्राप्ति व लक्षण.**—फिरंग नामक देशांत हा रोग उत्पन्न होतो. फिरंगी लोक या देशांत आल्यापासून या रोगाचा फार प्रादुर्भाव झाला. हा रोग ज्या स्त्रीस व ज्या पुरुषास झाला असेल, त्याचा अति सहवास करणारे जे मनुष्य,त्यांसही हा होतो. त्याचे प्रकार—बाह्य फिरंग, यांत आंगावर फोड व त्याचे ठायीं वेदना मंद, ते फोड फुटले असतां व्रणा सारखे होतात. हा सुखसाध्य आहे. अभ्यंतर फिरंग, यांत शरीराचे आंत संधीचे ठायीं फोड होऊन फुटून व्रण होतात व ते फार दिवस राहतात. त्यांना वेदना फार असते. हा रोग कष्टसाध्य जाणावा. या दोहोंचे लक्षणानीं जो युक्त असतो तो बाह्याभ्यंतर जाणावा. **फिरंगोपदंशाचे साधारण उपद्रव**—कृशपणा, बलक्षय, अग्निमांद्य, दुर्धर व्रण, नाक झडणें, हाडें वांकडीं होतात, हे उपद्रव जाणावे. उपदं-

**शावर उपचार**–आधीं रेचक द्यावें. ( १. ) वरधारा, बारीक करून, बाळ हरीतकी, आस्कंध, गोखरू, याचें चूर्ण करून १ तो. गेचा रस, घालावें. व त्यांत गूळ १ तोळा मिळवून द्यावें. ( २. ) सागरगोटीच्या पाल्याचा रस काढून त्यांत तूप घालून तो ७ दिवस द्यावा. ( ३. ) तांबड्या गुंजेच्या पाल्याच्या रसांत जिऱ्याची पूड व खडीसाखर घालून तो रस द्यावा. दि. ७. पथ्य गव्हाची रोटी व तुरीचें वरण अळणी. ( ४ ) कडूनिंबाचा पाला व खडीसाखर एकत्र वांटून सकाळीं खाण्यास द्यावें. दि. ७. पथ्य पूर्वोक्त. ( ५. ) आवाड्याचें झाड मुळासुद्धां उपटून आणून नंतर त्याची मुळी कापून टाकावी, व राहिलेल्या झाडाचा रस ४ तोळे काढून त्यांत जिऱ्याची पूड पैसाभार घालून तो द्यावा. दि. ७. पथ्य पूर्वोक्त. उतारा-जास्वंद अ० बोर, दोहोंच्या पाल्याचा रस द्यावा. ह्मणजे आग राहील. ( ६. ) झिंझरुटीचा पाला मूठभर वांटून त्यांत थोडें जिरें व धणे घालून ७ दि. द्यावें. ( ७. ) शिवलिंगाच्या वेलीचा रस गाईच्या दुधांत ४ तोळेपर्यंत मिळवून त्यांत जिरें व साखर घालून द्यावा. (८.) कडूपडवळ, कडूनिंब, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, किराईत यांचा काढा द्यावा. किंवा खैर व असाणा यांचा काढा त्रिफलासहित, किंवा गुग्गुलसहित प्यावा, ह्मणजे सर्व प्रकारचे उपदंशाचा नाश होतो. ( ९. ) आंब्याच्या सालीचा चार तोळे स्वरस घेऊन १६ तोळे शेळीचे दुधांत घालून प्राशन करावा. दि.७. तो उपदंशव्रणाला हितकारक होतो. जाईच्या कोंवळया पाल्यांचा स्वरस २ तोळे, गाईचें तूप २ तोळे, व किंचित् राळ घालून,तो प्रातःकाळीं सेवन करावा.ह्मणजे पांची प्रकारच्या उपदंशाचा नाश करितो. यावर गहूं व तूप यांचें पथ्य करावें. ( ११. ) रुईच्या व रिंगणीच्या मुळाची साल, हिंगूळ, हरताळ अथवा बिबे हीं एकत्र कुटून चिलमींत घालून गुरगुडींत ओढायास द्यावी. तोंड येईल. नंतर रोग बरा झाल्यावर फटकी अथवा खैराची साल व बाभळीची साल, इत्यादिकांचा काढा करून त्याचया गुळण्या कराव्या.–**अंगांत भिनलेली गर्मी झडून जाण्यास**–( १. ) सराटे तोळा एक, कंकोळ पावतोळा व खडीसाखर १ तोळा यांचा अष्टमांश काढा द्यावा. ( २. ) सतत एक वर्षपर्यंत वांके-

षित होऊन सर्व्यां दुधांत उगाळून प्रत्यहीं एकवेळ प्रमाणें सेवन केलें असतां चट्टे पायांवर उठलेले डाग व साधारण चट्टे निखालस बरे होऊन शरीरांतील रक्त शुद्ध होतें, इतकेंच नव्हे; तर क्षय, नाडीव्रण, इत्यादि विकारांवरही हें दिव्य औषध आहे. ज्या रोग्यांच्या अंगावर चट्टे उठले असतील, त्यांनीं हेंच औषध थंड पाण्यांत उगाळून वर लावावें. ( ३. ) उंबराचें जें पाळ ( मूळ ) साधारण जांघेएवढें मोठें असेल, ती जागा खणून पाळ मोकळें करावें. त्या पाळाखालीं एक भांडें ठेवून करवतीनें तें पाळ कापावें. या प्रमाणें सायंकाळीं केलें असतां चार प्रहर रात्रींत त्या भांड्यांत उंबराचा द्रव सांठेल. तो वस्त्रगाळ करून बाटलींत भरून ठेवावा; व रोग्याच्या शक्त्यनुरूप ४ तोळे पर्यंत घेऊन, त्यांत जिऱ्याची पूड व खडीसाखर १॥ तोळ्या पर्यंत घालून सूर्य-उदय झाल्यावर प्रातःकाळीं व सूर्य अस्त होण्यापूर्वी दोन घटका दिवस असतां सायंकाळीं, या प्रमाणें एक सप्तक दिल्यानें चांगला गुण येतो. रोगी सशक्त व उष्ण प्रकृतीचा असेल त्यासच हें औषध द्यावें. या औषधानें तिडक्या परमाही जातो. पथ्य फक्त गव्हाची पोळी, तूप, साखर. ( ४. ) पांढऱ्या कमळाचा कंद आणून स्वच्छ धुवावा व ठेंचावा; ह्मणजे त्यांतून जो बलक येईल तो शक्तीनुरूप पावशेरपर्यंत घेऊन त्यांत आपट्याच्या अंतर सालीचें चूर्ण व गाईचें दूध घालून सर्व मिश्रण सारखें करावें. नंतर जिरें व खडीसाखरेचें चूर्ण घालून द्यावें. ( ५. ) चोपचिनीचें चूर्ण द्यावें. ( ६. ) चोपचिनीपाक द्यावा. **गर्मीच्या चट्ट्यावर उपचार**–( १. ) कण्हेरीचें मूळ वांटून त्याचा लेप शिश्नावर करावा ह्मणजे उपदंशसंबंधी असाध्यही पीडा दूर होते. ( २. ) कांटे धोत्र्याच्या ( बिलायताचा ) अ० मोगली एरंडाचा चीक चट्ट्यांवर लावावा, ह्मणजे चट्टे लवकर भरून येतात. ( ३.) त्रिफळ्याच्या काढ्यानें अ० माक्याच्या रसानें व्रण धुवावा. ( ४. ) मोचरस, चिकण्या सुपारीची राख, बोरीच्या सालीचें चूर्ण, शंखजिरे हीं औषधें बारीक करून त्यांचें चूर्ण क्षतावर दडपून बसवावें. ( ५. ) पांढराकाथ व चिकणी सुपारीची राख, यांचें चूर्ण क्षतावर घालावें. ( ६. ) रसकापूर, पांढराकाथ, मुडदाड. सिंग,

शंखजिरे, मायफळ, सुपारीचा कोळसा हीं औषधें बारीक करून, तुपांत खल करून लावावीं. (७.) मोह्ळाचें मेण, शेंदूर व कांगेचा रस, हें तोळा तोळा घेऊन आठ तोळे तुपांत कढवून दाट झाल्यावर उतरावें. हें मलम लाविल्यानें गर्मीचे चट्टे, व्रण, नाडीव्रण ( हाडच्याव्रण ) हे बरे होतात. ( ८. ) गोपीचंदन व मोरचूत पाण्यांत खलून लावावें. ( ९. ) संगजिरा निंबाच्या रसांत वांटून लावावा. व सराव्याच्या भुकटीचा धूर द्यावा. ( १०. ) हिंगूळ, रुईच्या व रिंगणीच्या मुळांची साल, यांची धुरी द्यावी अथवा धूम्रपान करावें. ह्मणजे सर्व व्रण, उपदंशव्रण, प्रमेह व अम्लपित्त यांचा नाश होतो. बद–गर्मी आंत होऊन, शिश्नाचे वरले संधींत लांबट मोठ्या गांठी येतात त्यास बद ह्मणतात. त्यांची उपेक्षा झाली असतां मोठ्या कष्टानें व बहुत काळानें पिकतात व वेदना अति दुःसह होते. बदावर उपचार–( १. ) चांगल्या गांठी बांधतात तोंच त्यास पुष्कळ जळवा लावून रक्त काढावें व कडू निंबाचा पाला, थोडें पाणी घालून वांटून, त्यांत हळद व तूप घालून ऊन्ह करून वर बांधवा. ( २. ) चुना, दगडीपाषाणभेद, भिलावा, एकत्र खलून त्याची पट्टी द्यावी. ( ३. ) लसूण, बिबवे व शेवग्याची साल एकत्र वांटून पिंडी बसवावी. ( ४. ) चित्रकाची मुळी निंबाच्या रसांत उगाळून लावावी. ( ५. ) धूप, गुग्गुळ, बोळ, बचनाग व गुंजेच्या डाळी, पाण्यांत उगाळून किंचित् गरम करून लेप लावून त्यावर अह्याळीव चिकटवावें. हा ओढा फारच आकर्षण करणारा व गांठ मोडणारा आहे. ( ५. ) चिकण्याच्या झाडाचीं आरक्तवर्ण कोंवळीं पानें आणून, गंधाप्रमाणें बारीक वांटून त्यांचा गोळा करून बदावर बसवून, त्या गोळयावर वारंवार थंड पाणी घालीत राहावें. या औषधानें कितीही वट्ट गांठी असल्या तरी त्या त्वरित पिकून सैल होतात, व त्याजवर सुरकुत्या पडतात. ( ६. ) गांठ निबर आहे तोंच त्यास काथ व रेवाचिनीच्या शिरा, रुईच्या चिकांत उगाळून दिवसांतून दोन वेळां, याप्रमाणें तीन दि० लेप करावा, ह्मणजे गांठ बसते. ( ७. ) त्रिधारी निवडुंगाचे झाडाचे मुळाचा रस लावून, वर त्याच झाडाचे मुळाजवळील माती लावावी. ह्मणजे ३ दिवसांत गुण येतो. ( ८. ) साबू,

चुना व बिबा उगाळून लेप द्यावा. ह्मणजे सर्व प्रकारच्या गांठी बसतात. **पथ्य**–वमन, रेचन, जव, तांदूळ, मुगाचें कढण, तूप, कारलीं, पडवळ, कोंवळा मुळा, कडू व तुरट पदार्थ, मद्य, तिळाचें तेल. **अपथ्य**–दिवा निद्रा, मूत्ररोध, जडअन्न, मैथून, गूळ, आयास, आंबट पदार्थ, तेलकट पदार्थ, वातुळ पदार्थ.

## १६. कर्णरोग.

**कारण.**–थंडी, जलामध्यें क्रीडा करणें, कान खाजिवतांना दुखविणें, शस्त्रादिकांचा मिथ्यायोग, व अन्यदोष कोपविणारे हेतु, यांणीं दोपाचा कोप होऊन, कर्णशिरांमध्यें प्रवेश करून, त्या मानानें शूल उत्पन्न करितो. हे कर्णरोग २८ प्रकारचे आहेत. कानांत रसादिक घालणें ते भोजनाच्या पूर्वी घालावे, व तैलादिक अस्तमाना नंतर घालावें. **कर्णशूलावर.**–(१.) आल्याचा रस, मद्य, सैंधव, शिरसाचें तेल, एकत्र करून, तेल शेषराही पर्यंत पचन करावें; तें थोडें गरम असतांनाच कानांत घालावें. (२.) लसूण, आलें, शेवगा, वायवर्णी, मुळा व केळ, यांचा रस उन्ह करून कानांत घालावा. (३.) रुईच्या पिकल्या पानास तूप लावून अग्नीवर शेकून त्याचा रस काढून कानांत घालावा. (४.) दिड्यांचे मुळांचा कल्क करून त्यांत तेल घालून पचन करावें; तें कानांत घालावें ह्मणजे त्रिदोष जनित कर्णशूलांचा नाश होतो. (५.) हिंग, सैंधव, सुंठ, यांच्या कल्कांत तेल घालून पचन करून तें कानांत घालावें. (६.) शेराच्या डिऱ्यांचा, फुंफाट्यांत घालून रस काढून तो कानांत घालावा. (७.) निंबूरसांत किंवा गुरगुडींतील पाण्यांत कवडीभस्म घालून तें कानांत घालावें. (८.) माक्याचा रस, टाकळीच्या मुळ्यांचा रस, लसुणाचा रस, कागेच्या पानांचा रस, आल्याचा रस, हे एकत्र ऊन्ह करून कानांत घालावे. (९.) समुद्रफेसाची वस्त्रगाळ पूड कानांत घालून त्यावर निंबूचा रस पिळावा. **कर्णस्राव**–ह्म० कानांतून पू वाहतो त्यास–(१.) सेंदूर मद्यांत कालवून कानांत घालावा. (२.) वेखंड, समुद्रफळाचें चूर्ण व कापूर, तिळाचे तेलांत कढवून तें कानांत घालावें. (३.)

मेलेला विंचू तेलांत कढवून, तें तेल कानांत घालावें ह्मणजे सर्व कर्णरोगांचा नाश होतो. ( ४. ) सुंठ, सैंधव, देवदार, हिंग, वेखंड, यांचे काढ्यांत तेल घालून, कढवून, तेल सिद्ध झाल्यावर तें कानांत घालावें ह्मणजे तिडका,स्राव हे बंद होतात. ( ५. ) सत्रागीची लाही करून कानांत घालावी. ( ६. ) बदामाचें तेल कानांत घालावें व वर निंबाचा रस पिळावा. ( ७. ) तुरटीच्या लाहीची पिचकारी द्यावी. अ० पूड करून कानांत घालावी. ( ८. ) राळेच्या तिप्पट तेल घेऊन एकत्र कढवून नंतर गाळून तें कानांत घालावें. ( ९. ) काळ्या तुळसीचा रस व माक्याचा रस दिवसांतून चार पांच वेळ कानांत घालावा. ( १०. ) शेवग्याच्या वाळलेल्या फुलांचे चूर्ण अथवा तेल सिद्ध करून कानांत घालावें. ( ११. ) रुईचे फुलांचा व भुईआवळीचा रस कानांत घालावा. ( १२. ) मध कानांत घालावा. ( १३. ) बाभळीच्या सालीच्या काढ्यानें, त्रिफळांच्या काढ्यानें, अ० काथाचें पाणी करून त्यानें कान धुवावा. ( १४. ) तिळांचे तेलांत लसुणाच्या पाकळ्या तळून तें तेल कानांत घालावें. ( १५. ) महाळुंगाचे रसांत सज्जीखार घालून तो कानांत घालावा ह्मणजे ठणका व स्राव हे बंद होतात. ( १६. ) समुद्रफेसाचें चूर्ण कानांत घालावें. तें स्राव, व्रण, चिकटा यांचा नाश करितें. ( १७. ) गोमूत्र मंदोष्ण करून, त्याणें, बाहव्याच्या काढ्यानें, तुळशीच्या रसानें, कान धुवावा. (१८.) रसांजन, स्त्रीच्या दुधांत उगाळून त्यांत मध घालून तें कानांत घालावें.(१९.)जाईच्या रसांत तेल पचवून तें कानांत घालावें.(२०.)सबज्याचा रस कानांत घालावा. (२१.)वड, आंबा, जांभूळ व मोहाचे कोवळे पानांचे कल्कांत, तिळांचें तेल चौपट घालून, तेल सिद्ध करून कानांत घालावें. **कृमिकर्ण** ( कानांत किडे पडतात किंवा गोमाशा अंडीं घालतात त्यावर )—( १. ) शिरसाचें तेल कानांत घालावें. ( २. ) रिंगणीच्या फळांचा धूर द्यावा. ( ३. ) निर्गुंडी, शेवगा, किंवा कळलावीचा कांदा, या प्रत्येकाचा रस कानांत घालावा. ( ४. ) कापुराचें पाणी करून कानांत घालावें. ( ५. ) फांगळ्याचें मूळ, गोमूत्रांत उगाळून कानांत घालावें **गोमाशा, किडे, गोम वगैरे**

**कानांत गेल्यास.**–( १. ) कागेचा, उतरणीचा, अथवा तिळव-णीचा रस कानात घालावा. ( २. ) ...कासविंद्याचा अथवा शेवग्याचा रस कानांत घालावा. ( ३. ) ताडल्या... ...ळीं जमलेलें ... पानाचा रस व तेल कानांत घालावें. ( ४. ) समईच्या ... अ० मध किंवा एरंडेल कानांत घालावें. ( ५. ) तगर व परवे तेल ... ...स यांचें मूळ दांतांनीं चावून त्याची लाळ ... कानांत घालावी, ती तत्काळ गोमाशीचा नाश करिते. ( ६. ) क... ...ळावी, निळामाका, सुंठ, मिरीं, पिंपळी, यांना एकत्र करून वस्त्रांत बांधून ती पोटली कानांत पिळावी. कर्णजलौका, कृमि, मुंग्या वगैरेचा नाश होतो. **कर्णनाद**–ह्म० वायूची ... ...हिनी शिरांत गेली असतां नौबद, मृदंग, शख इत्यादिकांच्या शब्दा सारखे शब्द ऐकूं येतात त्यास–( १. ) कांगेचा रस कानांत घालावा ह्मणजे कर्णनाद व बाधिर्य यांचा नाश होतो. ( २. ) अघाड्याच्या क्षाराचें पाणी व अघाड्याचा कल्क, यांत तिळाचें तेल घालून सिद्ध करावें; व कानांत घालावें ह्मणजे कर्णनाद व बाधिर्य यांचा नाश होतो. ( ३. ) हिंग, तिरफळ, व सुंठ, हीं सिरसेलांत घालून कढवून तें कानांत घालावें; ह्मणजे कर्णनाद व बाधिर्य यांचा नाश होतो. ( ४. ) हिंग्वादितेल.–हिंग, नागरमोथे, देवदार, बडीशेप, मुळ्याची राख, भूर्जपत्र, यवक्षार, सैंधव, पादेलोण, सोरा, शेवगा, सुंठ, सज्जीखार, बिडलोण, सुरमा, महाळुंग, केळ, यांचे रस व मधुसूक्त ( निंबूचा रस ६४ तोळे, मध १६ तोळे, व पिंपळी४तोळे घालून, तुपाच्या भांड्यांत भरून बंद करून. भाताच्या राशींत पुरून ठेवावें. एक महिना झाल्यावर काढावें, त्याला मधुसूक्त ह्मणतात. ) हें घालून, त्यांत तिळांचें तेल घालून सिद्ध करावें, तें कर्णरोग, कर्णनाद, बाधिर्य, व भिवया, मस्तक, कान, कानाची पाळी, यांतील शूल याचा नाश करितें. हें, चरक व सुश्रुत यांना मान्य आहे. ( ५. ) कापशीच्या बोंडांचा रस नित्य कानांत घालावा. **बाधिर्यावर**–( १. ) गोमूत्रांत बेलफळें वांटून त्यांत पाणी, शेळीचें दूध व तेल घालून पचवून सिद्ध करावें व तें कानांत घालावें. ( २. ) बृहत्पंचमूलांचीं कांडें आणून, तीं आठ अंगुल प्रमाण करून घ्यावीं; त्यांस कापूस गुंडाळून

तेलांत बुडवून पेटवावी. त्यांतून जें तेल स्रवतें तें सुखोष्ण कानांत घालावें. ( ३. ) कांजी, महाळुंगाचा रस, मध, गोमूत्र, यांत, किंवा मध, आल्याचा रस, शेवग्याच्या कांद्याचा रस, व केळीच्या कांद्याचा रस यांत, अथवा सुंठ, धणे, हिंग, यांच्या कल्कांत तेल सिद्ध करून कानांत घालावें. ( ४.) निर्गुडी, जाईचा पाला, रुई, माका, लसूण, केळ, कापशी, शेवगा, तुळस, आलें, कारलें, यांच्या रसांत तिळांचें तेल घालून, त्यांत बचनाग घालावा आणि पचन करावें, तें कानांत घालावें ह्मणजे बाधिर्य, कर्णनाद, कृमि, ठणका व पू यांचा नाश करितें. ( ५. ) सुंठ, सैंधव, पिंपळी, नागरमोथे, हिंग, वेखंड, व लसूण यांच्या कल्कांत तिळांचें तेल घालून त्यांत रुईचा व पळसाचा रस घालून सिद्ध करावें; तें कर्णरोग, बहिरेपणा यांचा नाश करितें. पथ्य.—गहूं, तांदूळ, मूग, जव, तूप, पडवळ, शेवगा, वांगें, कारलें. अपथ्य—डोकीवरून स्नान, व्यायाम, कफकारक व जड असे पदार्थ.

## १७. कामलारोग. ( कामीण, कावीळ. )

**कारण व लक्षण**—अति पित्तकारक पदार्थांच्या सेवनें करून पित्त, रक्त व मांस हीं दूषित होऊन त्वचा, नखें, मुख, हीं हळदी सारखीं पिंवळीं होतात. मळ व मूत्र हीं रक्तवर्ण व पीतवर्ण होतात, व दाह, अग्निमांद्य, दुर्बलपणा, अरोचक इ० लक्षणें होतात. उपचार–( १. ) एरंडाच्या पानांचा अ० डेंखाचा रस ४ तोळे काढून त्यांत गाईचें दूध घालून द्यावा. ( २. ) गहूं घेऊन त्यावर पळी विस्तवांत लाल करून दाबावी व तीस जो घाम येईल तो डोळ्यांत घालावा. ( ३. ) दुधांत सुंठीचें चूर्ण घालून द्यावें. ( ४. ) देवकापशीच्या बोंडाचा रस नाकांत घालावा. ( ५. ) देवडांगरीच्या फळाचें चूर्ण तांदूळभर नाकांत ओढावें ह्मणजे नाकांतून पिंवळा स्राव होऊन २ प्रहरांनीं कावीळ उतरते. ( ६. ) कडू दोडकीचें चूर्ण १ तांदूळभर नाकांत ओढावें. (७.) सकाळीं तांबडा ऊंस खात जावा. ( ८. ) कडू निंबाच्या अंतरसालीचा काढा अ० रस काढून त्यांत मध व किंचित् सुंठीची पूड घालून द्यावा.

( ९. ) एरंडाचें मूळ मधांत उगाळून चाटावें. ( १०. ) पांढरा कांदा व गूळ एकत्र वाटून त्यांत थोडी हळद घालून खावें. ( १०. ) गुळवेलीचा रस मध घालून द्यावा. पथ्य—जव, गहूं, तांदूळ, मूग, मसुरा, तुरी, पडवळ, तांदूळजा. अपथ्य—पालेभाज्या, हिंग, पेंड, तांबूल, तिखट, आंबट, उष्णअन्न.

## १८. कासरोग. ( खोकला. )

कारण—तोंडांत व नाकांत फार धूर गेल्यानें, अति व्यायामानें, अम्ल पदार्थ भक्षिल्यानें, सत्वर भोजन केल्यानें, व मल, मूत्र, वायू शिंका यांच्या अवरोधास प्राणवायु दुष्ट होऊन उदानवायूला मिळून कासरोग उत्पन्न करितो. उपचार—(१.) रुईच्या फुलांतील कळे घेऊन, त्याच्या समभाग मिरपूड घालून, खलून, गोळया चार चार वालांच्या कराव्या, रोज एक गोळी द्यावी ह्मणजे कास व श्वास ( दमा ) हे दूर होतात. ( २. ) अडुळशाचा रस मधांतून द्यावा. ( ३. ) लवंगादिवटिका द्यावी. ( ४. ) मरीचादिगुटिका द्यावी. ( ५. ) सुंठ, बाळहरीतकी, नागरमोथे हीं कुटून त्यांत दुप्पट गूळ घालून गोळया कराव्या व एकेक गोळी तोंडांत धरावी ह्मणजे कास, श्वास दूर होतात. ( ६. ) बेहड्याची साल तोंडांत धरून त्याचें पाणी गिळावें. ( ७. ) हिरडा, बेहडा यांचें चूर्ण मधांत द्यावें. ( ८. ) शेळीच्या मूत्रांत बेहडेदळाच्या गोळया कराव्या व मधांतून गोळी द्यावी. ह्मणजे कास श्वास जातात. ( ९. ) आल्याचा रस मधांत घालून द्यावा. कास, श्वास दूर होतात. ( १०. ) रिंगणीमुळाचा काढा करून त्यांत पिंपळीचें चूर्ण व मध घालून द्यावा. (११.) डोरलीचा काढा, पिंपळी व खडीसाखर घालून द्यावा. (१२.) उन्हाळीच्या मुळीचें धूम्रपान करावें. (१३.) बोरीचा पाला वांटून, सैंधव व तूप घालून तव्यावर परतून घ्यावा. ( १४. ) काळया धोत्र्याचें पंचांग ( मूळ, पानें, साल, वगैरे. ) ओढावें. ( १५. ) धमाशाचें मूळ ओढावें. ( १६. ) रिंगणी व पिंपळीचें चूर्ण मधाशीं द्यावें. ( १७. ) बेहडे २ भाग व पिंपळी १ भाग यांचें चूर्ण मधाशीं द्यावें ( १८. ) पिंपळी, पिंपळमूळ,

सुंठ व बेहडे यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. पथ्य–तांदूळ, गहू, सांवे, जव, उडीद, मूग, कुलित्थ, तूप, दूध, चाकवत, वांगें, मुळा, लसूण, तोंडलें, उष्णोदक. अपथ्य–दाहकारक पदार्थ, कंद, दुध्याभोपळा, फार खाणें, जड, शीतळ, आंबट व दुष्ट असें अन्नपान.

## १८. कुष्ठरोग. ( कोड. )

**कारण व संप्राप्ति**–विरुद्ध पदार्थांचें सेवन, मलमूत्रादिवेगांचे संधारण, अति स्त्रीसेवन, मद्य, मांस आणि दुष्ट जल यांचें अतिसेवन, दहीं, लवण, अम्ल, उडीद, मुळे, दिवानिद्रा, अति व्यायाम, अति संताप, इत्यादि कारणांनीं वातादि दोष कुपित होऊन, त्वचा, रक्त, मांस व उदक यांतें दूषित करून कुष्ठरोगास उत्पन्न करितात. गजकर्ण, खरूज इ० हे कुष्ठरोगाचेच भेद आहेत. हल्लींच्या काळांत दूधदुभत्याचा अभाव होत चालल्यामुळें या देशांत कुष्ठरोगाचा फारच प्रादुर्भाव झाला आहे. **उपचार**–( १. ) जळवा लावून वारंवार रक्त काढावें. ( २. ) खैराची अंतरसाल, त्रिफला, कडूनिंबाची साल, कडू पडवळ, गुळवेल, अडुळशाचीं पानें, यांचा काढा करून द्यावा म्हणजे सर्व कुष्ठें दूर होतात. ( ३. ) आवळकठी व खैराची अंतरसाल यांचा काढा करून, त्
बावंचीचें चूर्ण ३ मासे मिळवून प्याल्यास श्वेत कुष्ठ दूर होतें. ( ृत
खैराचे पंचांगाचा ( मूळ, पान, फूल, साल, फळ. ) काढ्हणजे
ठेवावा. त्यानें स्नान, पान, भोजन, उद्वर्तन, व लेप करावा म्हण,लंबाचा
दूर होतात. ( ५ ) शुद्ध गंधक, पारा, मनशीळ, हरताळ, आवळया-
आंबेहळद, शेंदूर, मोरचूत, टाकळ्याचें बीज, बावंच्या, ( खल क-
या तेरा औषधांचें बारीक चूर्ण करून, त्यांत निंबाचा र नाश होतो.
लोखंडाचे कढईंत लोखंडाचे वरयानें ४ प्रहर घो शतधौत तुपांत
म्हणजे दद्रु, पामा, कंडू इ० रोग बरे होतात. ( ५लून तें लावावें
मूळ पाण्यांत उगाळून लेप करावा, श्वेत कुष्ठांचा नाश होतो.
पिंवळी जाई, हिराकस, वावडिंग, मनशीळ, गळून लावावी. ( ९. )
वांटून लेप करावा म्हणजे श्वेत कुष्ठ दूर हो प्रत्येक तोळा तोळा,

कळयाचें बीज, कोष्ठ, पिंपळी, हीं बोकडाच्या मूत्रांत वांटून लेप करावा ह्म० श्वेत कुष्ठ दूर होतें. ( ९. ) लाख, विशेष धूप, कोष्ठ, किंवा वावडिंग, हळद, दारूहळद, पांढरें शिरस, सुंठ, मिरीं, पिंपळी, मुळयाचें बीज, टाकळयाचें बीं, हीं समभाग घेऊन चूर्ण करावें. कुष्ठ, शिबीं, किटिभ कुष्ठ आणि खरूज यांवर याचा, पाण्यांत अ० बोकडाचे मूत्रांत लेप करावा. ( १० ) मनशीळ, हिराकस, व मोरचूत हीं गोमूत्रांत वांटून लेप करावा, तो किटिभ, विसर्प, व सर्व कुष्ठें यांचा नाश करितो. ( ११. ) घोऱ्याच्या बिया, व सैंधव यांचा पाण्यांत कल्क करून शिरसाचे तेलांत पचन करून, तें तेल वैदादिक कुष्ठ ह्मणजे ज्याच्या योगानें हात पाय फुटून चिरा पडतात त्यावर लावावें. ( १२. ) टाकळयाचें बीं, आवळकटी, राळ, निवडुंगाचा चीक, हे कांजींत वांटून त्याचा, दद्रु ह्मणजे कुष्ठावर लेप करावा. ( १३. ) हिंगुळ, गंधक, पारा, पिंपळी, बचनाग, वावडिंग, हळद, चित्रक, मिरीं, हरीतकी, सुंठ, नागरमोथा, समुद्रफेस, बावंच्या, कुटकी, बाहवा, टाकळयाचें बीं, हे पदार्थ समभाग घेऊन, त्यांचा निंबाच्या रसांत खल करावा. त्यांचा लेप केला असतां दद्रु, कंडू, विसर्प, लूत, भगंदर, मंडल कुष्ठ, यांचा क्षणांत नाश होतो. ( १४. ) पारा, गंधक, नागकेशर, हीं शिरसाचे तेलांत खलून तोंडांत चोळावें ह्मणजे सर्व कुष्ठाचा नाश होतो. ( १५. ) करंजाचें मर्यात चक्रयाचें बीं, कोष्ठ हीं गोमूत्रांत वांटून लेप करावा, तो कुष्ठावर व मधांतून . ( १६. ) पांढरे कण्हेरीचा रस, वावडिंग, चित्रकमुळाची रस मधांत घांत टाकून कढवून तें अंगास लावावें. ( १७. ) त्रिफला, वामुळाचा काढा यांचें चूर्ण मधाबरोबर चाटावें, ह्मणजे कुष्ठ, कृमि, प्रमेह, डोरलीचा काढा, । यांचा नाश होतो. ( १८. ) पारा, गंधक, यांची मुळीचें धूम्रपान कोलांत खलून नंतर माक्याचे रसांत खलून लेप तव्यावर परतून त्यांचा नाश होतो. ( १९. ) पांढऱ्या कण्हेरीच्या साल, वगैरे. ) ओळाने यांची साल, दारुहळद व जाईचा पाला यांचा रिंगणी व पिंपळीचें चूर्ण शिलाजित, कपिला, ज्येष्ठमध, तुरटी, राळ, पळी १ भाग यांचें चूर्ण मेळे घेऊन, त्यांचा लोण्याशीं, स्रवणाऱ्या कु—

ष्ठ वर लेप करावा. ( २१. ) खैराचे झाडाखालीं खळगा करून, त्यांत खापर ठेवून खैराचें मूळ दुखवून त्यावर अग्नि करावा; ह्मणजे त्याचा खापरांत रस जमतो. त्यांत आवळयाचा रस व मध घालून द्यावा. तो कुष्टाचा नाश करितो व रसायनही आहे. ( २२. ) निंबाचीं १०० पानें, निंबोळया, आंवळे, वावडिंग, बावंची यांचा कल्क प्राशन करावा. ( २३. ) मोर्चुताचे पाण्यांत सातवेळ मालकांगोण्यांचें तेल पचन करावें. तें अंगास लावलें असतां पांढरा कोड जातो. ( २४. ) वज्रतैल.–सातवीण, करंज, रुई, जाई, कण्हेर, निवडुंग, आणि शिरसवृक्ष यांचीं मुळें; तसेंच चित्रक, रानमोगरी यांचीं मुळें; करंजाचें बीज, हिरडा, बेहडा, आंवळकठी, सुंठ, मिरीं, पिंपळी, हळद, दारुहळद, श्वेतशिरस, वावडिंग, टाकळा यांचा गोमूत्रांत कल्क करून त्यांत तैल सिद्ध करावें. हें अंगास लावलें असतां कुष्ठ, नाडीव्रण, आणि दुष्टव्रण यांचा नाश होतो.

**खरूज, कंडू, गजकर्ण इत्यादिकांवर.**–( १. ) पारा, गंधक, काथ, मोरचूत, पाषाणभेद, मुरदाडशिंग, हीं समभाग, व यांचे चौपट तूप घेऊन, तांब्याच्या भांड्यांत खलून तें लावावें, म्हणजे खरूज, गजकर्ण, विस्फोटक, दाद, नायटे, आगपैण हीं दूर होतात. ( २. ) आंवळया गंधक व मिरीं यांच्या चौपट तूप घेऊन तांब्याचे भांड्यांत खल करून त्याचा लेप तीन दिवस करावा, व लेप केल्यावर कांहीं वेळ उन्हांत बसावें. ( ३. ) नारळाच्या करवंट्यांचें तेल पाडून लेप करावा म्हणजे खरूज व गजकर्ण यांचा नाश होतो. ( ४. ) चंदनीतेल, लिंबाचा रस आणि कापूर यांचा खल करून तें लावावें. ( ५. ) आंवळयागंधक, कापूर, टाकणखार, व किंचित् मेण, यांचा खोबरेलांत खल करून तें मलम लावावें; म्हणजे खरूज व गजकर्ण यांचा नाश होतो. ( ६. ) मुरदाडशिंग व तुरटीची लाही हीं एकत्र करून शतधौत तुपांत खलून लावावीं. ( ७. ) शतधौत तुपांत रसकापूर खलून तें लावावें म्हणजे खरूज, गजकर्ण, खवडे, नायटे, आगपैण यांचा नाश होतो. ( ८. ) पारा व गंधक यांची कज्जली लोण्यांत खलून लावावी. ( ९. ) कबाबचिनी, गेरू, कोष्ट, मोरचूत, हिं, मिरीं हीं प्रत्येक तोळा तोळा;

मनशील, गंधक व पारा हीं सहा सहा तोळे; आणि तूप २० तोळे घालून ताम्रपात्रामध्यें घालून खल करावा. त्याचा तीन दिवस लेप करावा म्हणजे तीव्र गजकर्णव्यथा दूर होते. ( १०. ) गुंजा, चित्रक, शंखभस्म, हळद, दूर्वा, हरीतकी, कळलावी, निवडुंग, सैंधव, कोरफड, नागरमोथा, रुईचा चीक, घेरोसा, पारा, बावंचा, टाकळा, वावडिंग, मिरीं हीं मद्यांत घोटून लेप करावा; म्हणजे कंडू, दद्रु व गजकर्ण यांचा नाश होतो. (११.)दूर्वा, हरीतकी, सैंधव, टाकळयाच्या बिया, आजवला, व कांजी एकत्र करून वांटून लेप करावा; म्हणजे तीन लेपांनीं बद्धमूळ अशी दद्रू व कंडू यांचा नाश होतो. कुष्ठरोगावर लावलेलें औषध दुसरे दिवशीं रिठे लावून चांगलें धुवून टाकावें, नंतर त्यावर औषध लावावें. ( १२. ) गंधक, टांकणखार, मायफळ, कापूर हीं मेंढीचे दुधांत खलून लावावीं. ( १३. ) तरवडाचें अगर टाकळयाचें बीं, लसूण व कडूनिंबाचा पाला, हीं तेलांत परतावीं. जळालीं म्हणजे त्याचें मलम करून लावावें. **पथ्य.**—जव, गहूं, तांदूळ, तूप, मूग, तुरी, मसूर, पडवळ, लसूण, चाकवत, घोसाळी, कडू पदार्थ. **अपथ्य.**—वाम काढणें, मैथुन, ऊंस, गूळ, दहीं, दूध, अम्लपदार्थ, तीळ, उडीद, मद्य.

## १९. कृमिरोग. ( जंत. )

**कारण.**—भक्षण केलेलें जिरलें नसतां फिरून खाणें, नित्य मधुराम्ल खाणें, भोजनास वेळेचा नियम नसणें, दुग्धादिक पिणें, मिष्टान्न व गूळ, साखर इत्यादि भक्षण करणें, व्यायाम न करणें, हीं कृमिरोगाचीं साधारण कारणें जाणावीं. **लक्षण**—ज्वर, निस्तेजपणा, शूळ हृदयाला पीडा, ओकारी, भ्रम, अन्नद्वेष, अतिसार इत्यादि लक्षणें जाणावीं. **उपचार**—( १. ) किरमाणी ओंवा प्रातःकाळीं शिळ्या पाण्यांत घेतला असतां कृमिरोग दूर होतो. याच किरमाणी ओंव्याचें जें सत्व काढलें आहे, त्यास इंग्रेजी भाषेंत " सांटोनाईन " असें म्हणतात. ( २. ) पळसपापडी अर्धीकच्ची भाजून, मुगाच्या डाळिंबी एवढी तुपाशीं द्यावी. किंवा पळसपापडी एक कुटून भिजत घालावी व तें पाणी गाळून घेऊन, शक्तीप्रमाणें

मध घालून द्यावें. ( ३. ) वावडिंगाचा काढा गूळ घालून द्यावा. (४.) सुंठ, वावडिंग, बिबवा यांचें चूर्ण मधांत द्यावें. ( ५. ) खाजकुहिली. वरचीं कुसें दुधांत घालून द्यावीं. अगदीं लहान मुलास हें देऊं नये. (६.) पुदिन्याचा रस व सबजाचा रस एकत्र करून द्यावा. ( ७. )महाळुंगाच्या सालीचा काढा द्यावा. ( ८. ) अननस खावा; ह्मणजे जंतांचें पाणी होईल. ( ९. ) सागरगोटीच्या पाल्याच्या रसांत आंबेहळद उगाळून पोटांत द्यावी. ( १०. ) सागरगोटा व हिंग भाजून त्यांत मीठ घालून तुपांत खलून पोटांत द्यावें. ( ११. ) वडाचे पारंब्याचे कोंवळे अंकूर वाटून त्यांचा रस तीन दिवस द्यावा. ( १२. ) एरोंडस खावयास द्यावा, किंवा चूर्ण करून मधांतून द्यावें, हें खावयास गोड आहे. (१३.) किरमाणी ओंवा एक तोळा, वायवर्ण्याची साल एक तोळा, खडीसाखर ३ तोळे, यांचें चूर्ण, मोठ्या मनुष्यास ६ माशां पासून १ तोळयापर्यंत, व लहान मुलास २ किंवा ३ गुंजा द्यावें. ( १४. ) उंदीरकानीचे पाल्याचा रस बोंडलेंभर पाजावा; किंवा त्याच्याच वाळल्या पानांचें चूर्ण अर्धमासा, मधा बरोबर द्यावें. (१५.) कापूर अर्धा गुंज व थोडें केशर, हीं रात्रीं द्यावीं; ह्मणजे सकाळीं कृमि पडतात. ( १६. ) इंद्रजवाचें चूर्ण, थोडा हिंग घालून द्यावें. ( १७. ) एक गुंज तुरटी, मधाशीं द्यावी.(१८.) बकाणनिंबाच्या अथवा पांगाऱ्याच्या आणि बकाणनिंबाच्या अंतरसालीचें चूर्ण २ मासे मधांत अथवा दुधांत द्यावें. ( १९. ) वायवर्ण्याची साल, एरोंडस, किरमाणी ओंवा, सुंठ, वावडिंग, संचळ, यांचें चूर्ण मधांत द्यावें. (२०.) कापिलाचूर्ण गुळांत द्यावें. (२१.) नागरमोथे, वावडिंग, पिंपळी, उंदिरकानी, टेटूमूळ, डाळिंबसाल, बेलफळ, यांचें चूर्ण मधाशीं द्यावें.**पथ्य.**–तांदूळ,गहूं, तूप, तुरी, मूग, कोंवळें वांगें, कवठ. **अपथ्य**–गूळ, साखर, दूध, केळें, बोर, कोहळा, तेल.

## २०. गंडमाला, गलगंड व अपची.

**गंडमालेची संप्राप्ति**–लहान बोरासारखे व मोठ्या बोरासारखे व आंवळयाएवढे असे ग्रंथि (गांठी), त्या काख, बाहुमूळ, मान, गळा, यांच्या ठायीं कफानें मेद दुष्ट होऊन होतात; त्यांस गंडमाला ह्मणतात. त्या गं-

डमाला बहुत ग्रंथींनीं युक्त असून, चिरकालेंकरून हलक्या पाकदशेप्रत जातात असें जाणावें. त्या पूर्वोक्त गंडमालांच्या गांठी कांहीं पिकून फुटून स्रवतात, व नाहींशा होऊन फिरून दुसऱ्या उत्पन्न होतात व त्यांचा संबंध बहुत असतो; त्या रोगाला **अपची** ह्मणतात. **गलगंडाची संप्राप्ति**—मान, गळा व हनुवटी यांच्या संधीचे ठायीं वृषणासारखी ग्रंथिरूप सूज लोंबूं लागतें, व ती सूज लहान अथवा मोठी असते तिला गलगंड ह्मणतात. तो गलगंड वायु, कफ हे गळ्याच्या ठायीं दुष्ट होऊन त्यापासून होतो. **उपचार**—( १. ) हिराकस, रुईच्या चिकांत उगाळून लेप द्यावा. ( २. ) बचनाग, निंबाच्या रसांत उगाळून लेप करावा.(३.) कडू पिकलेल्या भोपळयांत पाणी घालून ठेवून नंतर तें पाणी प्राशन करावें. दि० ७. ( ४. ) चित्रक, बिबवे, हिराकस, निवडुंगाचें मूळ रुईच्या चिकांत वांटून लेप करावा. ( ५. ) कांचनवृक्षाचे सालीचा काढा करून त्यांत सुंठीचें चूर्ण घालून द्यावा. ( ६. ) वायवर्णाचे सालीचा काढा करून त्यांत मध घालून द्यावा. ( ७. ) एरंडमूळ व पळसाचें मूळ, तांदुळाचे धुणांत उगाळून लेप करावा. यानें गलगंडही दूर होतें. ( ८. ) कडूभोपळयाचा रस आणि शिरसेल एकत्र करून अग्नीवर कढवून रस जळाला ह्मणजे तें तेल लावावें. ( ९. ) उन्हाळीचें मूळ व हळद, गाईच्या दुधांत उगाळून लेप द्यावा. ( १०. ) कडू शेवग्याची साल व इंद्रावणाच्या मुळाची साल समभाग एकत्र कुटून, ती भुकटी गुडगुडींत ओढावी. (११.) रुईचा चीक, सैंधव, समुद्रफळ, व पळसबीं हीं निंबाच्या रसांत खलून लावावीं. ( १२. ) मुळयाचें बीं, शिरस, शेवग्याचें बीं, तागाचें बीं, सातू व जवस हीं आंबट ताकांत वांटून लावावीं; ह्मणजे गंडमाला व गलगंड यांचा नाश होतो.(१३.) भुयचाफ्याची मुळी, कुचल्याची बीं व बचनाग, थंड पाण्यांत उगाळून लेप द्यावा. या लेपानें ओढा लागतो. येणेंकरून गंडमाळा, गलगंड, किंवा कोणत्याही गांठी त्वरित बसतात. फुटलेल्या गांठी भरून येण्यास मलमाच्या पट्या लावाव्या. ( १४. ) चंदन, हरीतकी, लाख, वेखंड, कुटकी, यांणीं तेल सिद्ध करून प्राशन करावें; ह्मणजे अपचीचा नाश होतो. ( १५.) बाहव्याचें मूळ, तांदळांच्या धु-

णाशीं वांटून नाकांत सोडावें आणि त्याचा लेपही करावा. ( १६. ) कुळित्थ व मिरीं यांचा काढा द्यावा. गल गलगंडावर-(१.)हरताळ गोमूत्रांत उगाळून लेप करावा. ( २. ) चुना, गूळ, घेरोसा एकत्र करून लेप द्यावा. यानें गालाची सूजही दूर होते. ( ३. ) धोत्र्याचा पाला वांटून त्यांत चुना मिळवून तो वर बांधावा. पथ्य—जुनी तांबरसाळ, जव, मूग, पडवळ, शेवगा, कारलीं, ऊंस, रुक्ष, तिखट, अग्निदीपक असे पदार्थ. अपथ्य—दूध व उंसापासून जे पदार्थ होतात ते, मिष्टान्न; आम्ल, मधुर, जड व कफकारक असें अन्न.

## २१. गुल्मरोग.

**कारण व संप्राप्ति**—मिथ्या आहार आणि विहार, यांहीं करून वातादिक दोष कुपित होऊन, पोटामध्यें ग्रंथिरूप पांच प्रकारचे गुल्म उत्पन्न करितात.तो ग्रंथि बांठ्यासारखा असून, चल अथवा अचल आणि वाटोळा असतो व कधीं मोठा व कधीं लहान असा होतो. या रोगास गुल्म असें ह्मणतात. **पूर्वरूप**—फार ढेंकरा, मलबद्धता, अन्नावर अरुचि, आंतडीं कुरकुर वाजतात व दुखतात, पोटफुगी व अग्निमांद्य हें गुल्मरोगाचें पूर्वरूप जाणावें. **उपचार**-( १. ) पिंपळी व जवखार यांचें चूर्ण आल्याचा रस व मध यांशीं द्यावें; ह्मणजे गुल्म व श्वासकास दूर होतात. ( २. ) चिरफळ, सैंधव, पादेलोण, बिंडुलोण,अजमोदा, एरंडमूळ, जवखार,बाळहिरडे, भाजलेला हिंग, वावडिंग, हीं दहा औषधें समभाग घ्यावीं व निशोत्तर ३भाग घ्यावें. सर्वांचें चूर्ण करून तें उन्हपाण्याशीं घ्यावें. ह्मणजे गुल्म, शूळ, पोटफुगी, उदर हे रोग दूर होतात. ( ३. ) हिंगाष्टकचूर्ण द्यावें. ( ४. ) जासवंदीच्या पाल्याचा रस प्रत्यहीं नवटांक द्यावा. दि०७. ह्मणजे वातगुल्म ( वायुगोळा ) दूर होतो. ( ५. ) आपट्याच्या पाल्याच्या रसांत मिऱ्यांची पूड व तिळाचें तेल ७ थेंब घालून द्यावें. दि० ३. ह्मणजे वातगुल्म दूर होतो. ( ६. ) शेवग्याच्या पाल्याचा रस पावशेर, त्यांत २ तोळे खडीसाखर मिसळून ३ दि० घ्यावा. ह्मणजे वातगुल्म दूर होतो. ( ७. ) रिंगणी मुळासहीत सुकवावी. नंतर तिचें चूर्ण करून गरम

पाण्यांत नित्य १० मासे वजन, याप्रमाणें दोन वेळ घ्यावें. याप्रमाणें ७ दिवस करावें; ह्मणजे पोटांतील कोणत्याही आजाराची गांठ असली तरी दूर होते. ( ८. ) सागरगोटा भाजून त्याचें चूर्ण गुळांत दिलें असतां प्रसूतकाळीं उठलेला वायगोळा दबतो. ( ९. ) दशमूळाच्या काढ्यांत जवखार व सैंधव घालून द्यावा. ह्मणजे गुल्म, शूल हृद्रोग व श्वास यांचा नाश होतो. ( १०. ) पुन्हाळीचा क्षार व हरीतकीचूर्ण हे दोन्ही चारचार मासे एकत्र करून, ऊन पाण्याशीं घ्यावे. **रक्तगुल्माचें लक्षण.**— स्त्री नूतन बाळंत असतां अथवा अपक्व गर्भपात झाला असतां किंवा ऋतुकाळीं अपथ्य पदार्थ सेविले असतां, तिच्या गर्भाशयाच्या ठायीं वायु रक्ताला जमवून, शूळ व दाह यांहीं करून युक्त अशा गुल्माला उत्पन्न करितो. हा गुल्म बहुत दिवस पिंडीभूत होत्साता अवयव नसतां गर्भासारखा ढुसण्या करितो; शूळयुक्त असतो; गर्भाचीं लक्षणें जीं आर्त व प्रतिबंध, स्तनाचीं अग्रें कृष्णवर्ण, इत्यादि लक्षणेंकरून युक्त असतो. याची चिकित्सा दहा महिन्या नंतर करावी. **रक्तगुल्मावर.**— ( १. ) दंतीमूळ, हिंग, जवखार, कडूभोंपळयाचें बीं, पिंपळी, गूळ, हीं निवडुंगाच्या चिकांत खलून तोळाप्रमाण गोळी करून भक्षण करावी. ह्मणजे रक्तगुल्माचा नाश होतो, व गेलेला विटाळही येतो. ( २. ) पळसाच्या क्षारानें घृत सिद्ध करून तें प्राशन करावें. ( ३ ) शतावरी, करंजाची साल, दारुहळद, भारंगमूळ, पिंपळी, यांचें चूर्ण तिळांच्याकाढ्या बरोबर घ्यावें. (४.) तिळांचा काढा, गूळ, तूप, व सुंठ, मिरीं,पिंपळी, भारंगमूळ, यांचें चूर्ण घालून घ्यावा. ह्मणजे रक्तगुल्म व नष्टार्तव यांचा नाश होतो. ( ५. ) भारंगमूळ, पिंपळी, करंजाची साल, पिंपळमूळ, देवदार, यांचें चूर्ण तिळांच्या काढ्या बरोबर घ्यावें. ( ६. ) मुंडी व वंशलोचन यांचें चूर्ण, शर्करा व मध यांशीं युक्त, रक्तगुल्मावर रेचक द्यावें. (७) रिठ्याचे पाण्यांत कडूइंद्रावणीचें मूळ उगाळून द्यावें. **पथ्य.**—जुने तांदूळ, दूध, कुळित्थ, डाळिंब, आवळे, निंबू, ताक, लसूण, कोंवळा मुळा, चाकवत, शेवगा, हिंग, उष्ण अन्न. **अपथ्य.**—उडीद, जव, मधुर फळें, वांगें, कोहोळा, मुळा, द्विदलधान्य, जडान्न, नेलकट.

## २२. ग्रंथिरोग व अर्बुदरोग.

**ग्रंथिरोगाची संप्राप्ति**—वातादिरोग व मांस व रक्त हीं दुष्ट होऊन मेद व शिरा यांतें दूषित करून, वाटोळी, उंच व गांठीसारखी सूज उत्पन्न करितात; त्या रोगाला ग्रंथि ह्मणतात. **अर्बुदरोगाची संप्राप्ति**—शरीराच्या ठायीं वातादिदोष कुपित होऊन, रक्त व मांस यांतें दूषित करून वाटोळा, स्थिर, मंदपीडयुक्त, मोठा, खोल मूळ गेलेला, चिरकालानें वाढणारा व पिकणारा, असा मांसाचा गोळा उठवितात; त्याला अर्बुद असें ह्मणतात. **ग्रंथिरोग व अर्बुद यांवर उपचार**— ( १. ) व्रणावर जे उपचार सांगितले आहेत ते योजावे. ( २. ) सज्जीखार, हळद अथवा मुळयाचा खार, शंखचूर्ण, हीं पाण्यांत वांटून लेप द्यावा. ( ३. ) हळद, लोध्र, पतंग अ० रक्तचंदन, घेरोसा, गूळ, मणशील हीं मद्यांत वांटून लेप द्यावा. ( ४. ) कोष्ठ, तमालपत्र, वडाचे दुधांत वांटून लावावें व वरून वडाचीं पानें बांधावीं; ह्मणजे सात दिवसांत अर्बुदाचा नाश होतो. ( ५. ) शेवग्याचें बीं, मुळयाचें बीं, शिरस, तुळस व इंद्रजव हीं आंबीचे ताकांत वांटून लेप करावा. **पथ्यापथ्य**—गुल्मरोगाप्रमाणें.

## २३. ज्वर.

**कारण**—मिथ्या आहार आणि मिथ्या विहार यांपासून दुष्ट झालेले वातादिक दोष, आमाशयाचा आश्रय करून, कोष्ठाग्नीला बाहेर काढून रसधातूला मिळून ज्वर उत्पन्न करितात. या ज्वराचे अनेक भेद वर्णिले आहेत. **ज्वराचें पूर्वरूप**—जांभया, अंग दुखणें, चित्ताचा अव्यवस्थितपणा, नेत्राचा दाह, जडता, अरुचि, शरीरावर रोमांच उभे राहणें, डोळयांपुढें अंधारी, हस्तपाद थंड, चित्तास आनंद नसणें, शीत, वायु, आणि ऊन्ह, यांविषयीं वारंवार इच्छा आणि वारंवार द्वेष, अन्न न पचणें, बल, शरीर, कांति यांची हानि, वायूचें प्राधान्य असतां जांभया फार येतात. पित्ताचें प्राधान्य असतां नेत्रांचा फार दाह होतो. कफाचें प्राबल्य असतां अन्नावर अरुचि असते. द्विदोषांचा कोप असतां दोहोंचीं लक्षणें होतात. त्रिदोषांचा कोप झाला असतां सर्व लक्षणें होतात.

**वातज्वरलक्षण**—शरीरास कंप, कंठ, ओंठ हे शुष्क होणें; मलावरोध, शिंका न येणें, मस्तक, पोट, कंबर, डोळे व अंग हीं दुखणें; झोंप न येणें, ज्वर केव्हां फार व केव्हां थोडा होणें, अरुचि, जांभया येणें, पोट फुगणें, अजीर्ण, भ्रम, मोह, शूळ हे होणें; अंगावर रोमांच उभे राहणें, डोळ्यांवर झांपड, सुखा खोकला, दांत शिवशिवणें, हीं लक्षणें होतात. **पित्तज्वरलक्षण**—शरीर पीतवर्ण, सर्व अंगाचा दाह, तृषा, मूर्च्छा, अल्पनिद्रा, तोंड कडू, ओकारी, भोंवळ, बडबडणें, अतिसार, ज्वराचा वेग तीव्र, कंठ, ओंठ, मुख, नाक यांवर फोड, कैफ घेतल्यासारखें होणें, थंड पदार्थांवर इच्छा, मलमूत्र, नेत्र आणि त्वचा हीं पीतवर्ण, हीं लक्षणें पित्तज्वरामध्यें होतात. **कफज्वरलक्षण**—शरीरास जडपणा, कोरडी ओकारी, तोंड गोड, पडसें, अरुचि, खोकला, आळस, तृप्ति, अंग थंड, मळ, मूत्र आणि नेत्र हीं शुभ्रवर्ण, श्वास, स्वरभंग, उचकी, शब्द जड, नाकांतून पाणी वाहणें, मस्तक दुखणें, निद्राधिक्य, अंगावर रोमांच, धाप, डोक्यावर झांपड, डोक्यांस पांढुरकी हीं लक्षणें होतात. **वातपित्तज्वरलक्षण**—तहान, मूर्च्छा, भ्रम, दाह, निद्रानाश, मस्तकशूळ; गळा, तोंड, यांचा शोष, मळ, रोमांच, अरुचि, अकस्मात अंधारांत पडल्यासारखें भासणें, सांध्याच्या ठायीं वेदना, जांभया, हीं लक्षणें होतात. **वातकफज्वरलक्षण**—अंग आर्द्रवस्त्रानें गुंडाळल्यासारखें भासणें, सांध्यानां फूट, निद्रा फार येणें, अंग जड, मस्तकावर भार, पडसें, खोकला, किंचित् घाम येणें, शरीराचा दाह, ज्वराचा वेग मध्यम हीं लक्षणें होतात. **कफपित्तज्वरलक्षण**—तोंड कडवट असून चिकट, झांपड, मोह, खोकला, अरुचि, तहान, वारंवार दाह होणें, व वारंवार थंडी वाजणें, हीं लक्षणें होतात. **विषमज्वर (हिंवताप) याचें कारण व लक्षण**—ज्वरानें नुकताच सोडलेल्या मनुष्याला अपथ्य सेवन झालें असतां, त्याचा दोष पुनःथोडा कुपित होऊन, रसरक्तादि धातूंपैकीं कोणत्याही धातूप्रत जाऊन विषमज्वर उत्पन्न करितो, अथवा पहिल्या पासूनही विषम ज्वर होतो. यांत ज्वर येण्यास काळाचा नेम नाहीं. केव्हां थंडी वाजून मोठ्या वेगानें येतो, केव्हां शरीराचा दाह होऊन मोठ्या वेगानें येतो हीं लक्षणें होतात.

**विषमज्वराचीं नांवें व संख्याः**—संतत, सतत, अन्येद्यु (द्व्याहिक), तृतीयक (त्र्याहिक), आणि चतुर्थक (चातुर्थिक), असे पांच प्रकारचे विषमज्वर आहेत. **मधुराज्वराचें लक्षणः**—ज्वर, दाह, मोहभ्रम, अतिसार, ओकारी, तृषा, निद्रानाश, तोंडावर लाली, तालु, जिव्हा यांना शुष्कता, टाळयावर पांढऱ्या शिरसासारख्या पुळया येतात, डोळयांवर झांपड, दांत व ओंठ हे शामवर्ग व ज्वर आल्यापासून सात दिवसांनंतर त्या पुळया येऊं लागून २१ दिवसांपर्यंत पुऱ्या होतात. या मधुऱ्याचा कृष्णमधुरा म्हणून एक भेद आहे, त्यांत रोग्याचे दांत, ओंठ, जिव्हा, कंठ, तोंड व नाक हीं सर्व कृष्णवर्ण होतात. **आगंतुक ज्वरः**—शस्त्र, मातीचें ढेंकूळ, बुक्की, काठी इत्यादिकांनीं मारण्यानें किंवा श्येनादि याग केल्यानें अथवा उलट सुलट मंत्रांनीं लोखंडाच्या स्रुचीनें सर्षपादिकांचा होम केल्यानें, किंवा कामादिक व भूतादिकांचे उपद्रव झाल्यानें, एकाद्या उग्र औषधीच्या वासानें, अथवा ब्राह्मण, गुरु, वृद्ध, सिद्धपुरुष, यांच्या शापानें, आगंतुक ज्वर उत्पन्न होतो; तो पुढें, जे जे दोष कुपित होतील त्या त्या लक्षणावरून जाणावा. **विषजन्य आगंतुक ज्वर.**—स्थावरजंगम विषभक्षणानें जो ज्वर येतो; त्यांत तोंड श्यामवर्ण होतें, आणि दाह, अतिसार, अन्नद्वेष, तहान, सुया टोंचल्याप्रमाणें पीडा आणि मूर्च्छा हीं लक्षणें होतात. **कामज्वरः**—कामज्वर म्हणजे इच्छिलेल्या स्त्रीची प्राप्ति न झाल्यामुळें जो ज्वर येतो, तेणेंकरून चित्तभ्रंश, झांपड, आळस, जेवणावर इच्छा नसणें, हृदयांत पीडा हीं लक्षणें होतात व त्या पुरुषाचें शरीर वाळत जातें. **भय शोक आणि कोप यांपासून झालेला ज्वर**—भयापासून झालेल्या ज्वरामध्यें बडबड फार असते. शोकापासून झालेल्या ज्वरांतही बडबड असते. कोपापासून झालेल्या ज्वरामध्यें कांपरें सुटतें. **भूताभिषंगज्वर (भूतावेशज्वर):**—भूतबाधेनें ज्वर आला तर चित्त उद्विग्न होतें, हंसणें, रडणें आणि कांपणें हीं लक्षणें होतात. **दुर्जलजनित ज्वरः**—प्रवासांत अनेक ठिकाणचें पाणी प्यावें लागतें तें न मानल्यामुळें, त्यापासून जो ज्वर उत्पन्न होतो तो. **सप्तधातुगत ज्वरांचीं नांवें:**—रसगत, रक्तगत, मांसगत, मेदोगत, अस्थिगत,

मज्जागत व शुक्रगत ज्वर. **रसगतज्वरः**—जडपणा, हृदयस्थ दोष ओकून पडेलसा वाटणें, ग्लानि, ओकारी, अन्नद्वेष आणि दैन्य ह्मणजे मनाला खेद हीं लक्षणें होतात. **रक्तगतज्वरः**—रक्ताचा बेडका, दाह, मोह, ओकारी, भ्रम, बडबड, अंगावर गांठी, किंवा फुटकुळया व तृषा हीं लक्षणें होतात. **मांसगतज्वर.**—पोटऱ्या वळणें, तहान, मळमूत्रांचा विसर्ग होणें, तलखी, अंतर्दाह, हात पाय चाळविणें व ग्लानि, हीं लक्षणें होतात. **मेदोगतज्वर.**—अत्यंत घाम येणें, तहान, मूर्च्छा, बडबड, वांति, अंगाला दुर्गंधि, अन्नावर अरुचि, ग्लानि व वेदना सहन न होणें, हीं लक्षणें होतात. **अस्थिगतज्वरः**—हाडें फुटल्यासारखीं वाटणें, कुंथणें, श्वास, रेच, ओकारी, हातपाय चाळविणें हीं लक्षणें होतात. **मज्जागतज्वर.**—अंधारांत शिरल्याप्रमाणें भासणें, उचकी, खोकला, थंडी वाजणें, ओकारी, अंतर्दाह, महा श्वास व मर्मच्छेद (हृदय भेद) हीं लक्षणें होतात. **शुक्रगतज्वर.**—रसादि धातुगतज्वरांपैकीं शुक्रस्थानीं ज्वर गेला असतां रोगी मरण पावतो. या ज्वरामध्यें शिश्नास ताठपणा असतो, शुक्राचा स्राव विशेष होतो व दुसरे रक्तादि पदार्थांचाही थोडा थोडा स्राव होतो. **प्राकृत आणि वैकृत ज्वर.**—वर्षाऋतु, शरदृतु, व वसंतऋतु, यांमध्यें वातादिकांनीं क्रमेंकरून जो ज्वर होतो तो प्राकृत ज्वर, ह्मणजे वर्षाकाळीं वातज्वर, शरत्कालीं पित्तज्वर, व वसंतकाळीं कफज्वर; याहून जो दुसरा ज्वर होतो तो वैकृतज्वर. जसे वर्षाकाळीं पैतिक, शरत्कालीं श्लैष्मिक व वसंतकाळीं वातिक. हा वैकृतज्वर दुःसाध्य आहे आणि वातजन्य प्राकृतज्वरही दुःसाध्य आहे. ज्वरामध्यें ऋतु आणि दोष हे तुल्य असावे. प्रमेहांत दूष्यें तुल्य असावीं, आणि रक्तगुल्म जुनें असावें, हें सुखसाध्याचें लक्षण आहे. **जीर्णज्वराचें कारण व लक्षण.**—पूर्वी मोठा ताप आला असतां, त्या तापाचे तीन अंश औषधींनीं गेले व एक अंश तसाच शरीरांत राहिला तर तो पुढें हाडांत प्रवेश करितो, व त्याची उपेक्षा केली असतां, त्याचा परिणाम, पांडु व क्षय हे होतात. या जीर्णज्वरांत उत्तरोत्तर मंदगतीनें आहार कमी कमी होत जातो, अन्नपचन होत नाहीं, पाणथरी उत्पन्न होते, मलशुद्धि साफ होत नाहीं,

हाडें धगधगीत राहतात, तोंडास पाणी सुटतें हीं लक्षणें होतात.—**अजीर्णज्वर.**—पूर्व दिवशीं चणे, तुरट पदार्थ, वाल, पावटे, स्निग्धान्न, शाका, फळें, कंद, यांचे अतिभक्षणानें, व भोजन केलें असतां लागलेंच भोजन केल्यानें, जडान्न भक्षिल्यानें, अति मद्यपान केल्यानें अजीर्णज्वर उत्पन्न होतो. या ज्वरांत ढेंकरा, वांति, भ्रम, मस्तकास पीडा, कटि, बरगड्या, गुद, पोट हीं दुखतात, अन्नावर अरुचि, शोष, मोह उचकी हीं लक्षणें होतात. **उलटलेला ज्वर.**—ज्वर निघाल्यानंतर अपथ्यानें पुनःज्वर येऊन त्रास देऊं लागतो तो. **ज्वराचे दहा उपद्रव होतात ते.**—श्वास, मूर्च्छा, अरुची, तृषा,वांति,अतिसार, मलबद्धता, उचकी, खोकला, अंगाचा दाह हे दहा ज्वराचे उपद्रव आहेत. **चिकित्सा करण्यासाठीं आम पच्यमान, आणि निरामज्वर यांचीं लक्षणें.**—लाळेचा स्राव, ओकारी होईलसें वाटणें, उरांत जड वाटणें, अरुचि, झांपड, आळस, अन्नाचा पाक न होणें, तोंड बेचव, अंगाला जडपणा, क्षुधा नसणें, वारंवार मूत्र होणें, अंग ताठल्यासारखें होणें, अंगांत ज्वर पुष्कळ असणें, हीं अपक्व ज्वराचीं लक्षणें जाणावीं. या ज्वरावर औषध देऊं नये. अपक्व दोषाला औषध दिलें तर ज्वर वाढतो; शोधन किंवा शमन औषध दिलें तर विषम ज्वरावर घालवितें. **पक्वज्वर किंवा निरामज्वराचें लक्षण.**—क्षुधा लागणें, शरीर कृश होणें, अंग हलकें होणें, मंदज्वर, अधोवायूची प्रवृत्ति होणें, व मनाला उत्साह वाटणें हें निरामज्वराचें लक्षण जाणावें. **साध्यज्वर.**—बलवान् पुरुषास दोष अल्प असून जो श्वासादि उपद्रवरहित ज्वर होतो तो साध्य जाणावा. **असाध्यज्वर.**—जो ज्वर बहुत प्रबल कारणांनीं झालेला व ज्यामध्यें लक्षणें पुष्कळ असतात, तो ज्वर प्राणांत करणारा होतो, आणि जो ज्वर उत्पन्न होतांच एकाद्या चक्षुरादि इंद्रियाची शक्ति नष्ट ( ह्मणजे आंधळा, बहिरा इ. ) करितो तो असाध्य जाणावा. क्षीण व सूज आलेल्या पुरुषाचा ज्वर असाध्य होय. अंतर्धातुस्थ किंवा अंतर्वेगज्वर आणि फार दिवस राहणारा ज्वर असाध्य होय; आणि जो बलवान् आणि ज्याच्या योगानें केशांमध्यें भांग पडतात, तोही असाध्य होय. अंतर्दाह, तहान, दोषांनीं अत्यंत ताठल्यासारखें वाटणें, श्वास,

खोकला, यांची उत्पत्ति, या लक्षणांनीं गंभीर ज्वर जाणावा. ज्याचा ज्वर मुळापासून विषम झाला आहे तो; ज्याचा ज्वर फार दिवसांचा आहे तो आणि क्षीण, व अत्यंत रूक्ष पुरुषाचा गंभीर ज्वर मृत्युप्रद होतो. जो ज्वरी बेसावध होऊन मोह पावतो, आणि जो सर्वदा अंथरूणावर पडून असतो ह्मणजे त्याच्यानें उठवतच नाहीं, बाहेरून थंडी वाजते आणि अभ्यंतरीं दाह होतो, अशा प्रकारच्या ज्वरानें रोगी मरतो. ज्याच्या अंगावर रोमांच उभे राहतात, डोळे लाल होतात, हृदयामध्यें एकादी गांठ जमून जशी पीडा व्हावी तशी होते, आणि केवळ तोंडानेंच श्वास टाकतो, अशा पुरुषाला ज्वर मारतो. उचकी, श्वास, तृषा, यांनीं व्याप्त झालेला, मोह पावलेला, डोळे इकडे तिकडे फिरवणारा, निरंतर श्वासानें पिडलेला, अशा मनुष्याला ज्वर खपवितो. इंद्रियांची शक्ति नष्ट झालेला किंवा शरीरकांति निस्तेज झालेला आणि इंद्रियें नष्ट झालेला, कृश व अन्नद्वेषानें फारच पीडलेला आणि गंभीर व तीक्ष्ण वेगानें पीडित झालेल्या अशा ज्वरी पुरुषाला वैद्यांनीं सोडावा. जो स्वप्नामध्यें प्रेतांबरोबर मद्य पितो, किंवा ज्याला कुत्रीं ओढून नेतात, तो भयंकर ताप येऊन मरतो. ज्याला पूर्वाण्हीं मोठा ज्वर येतो, कोरडा खोकला असतो, आणि बलमांसें नष्ट होतात तो प्रेतासमान जाणावा. ज्याला अपराण्हीं ज्वर येऊन कफ, खोकला फार असतो, व बल, मांस नाहींशीं होतात, तो प्रेता सारखा जाणावा. अकस्मात् ज्वराचा दाह, तृषा, मूर्च्छा आणि बलक्षय, सांधे ढिले पडणें, हीं लक्षणें आसन्नमरणाचीं होत. पहाटेस ज्याच्या तोंडावरून पुष्कळ घाम निघतो, आणि लेपज्वरानें व्याप्त होतो त्याचें वांचणें दुरापास्त होतें. ज्याचे कपाळावर थंडगार घाम येतो, थंडी फार वाजते, अंग बुळबुळीत होतें. आणि गळयावरचा घाम उरःस्थलावर येत नाहीं, तो मनुष्य यमाच्या घरीं लवकर जातो. ज्याला दाट व बुळबुळीत घाम चहूंकडे सर्वांगाला येतो, आणि अंग थंड होतें, तेव्हां तत्क्षणीं त्या रोग्याचें मरण होईल ह्मणून जाणावें. **ज्वरमुक्तीचें पूर्वरूप**—दाह, घाम, भ्रम, तहान, कांपरें, मळ पातळ होणें, बेशुद्धि, कुंथणें, अंगाला अत्यंत दुर्गंधी, हीं लक्षणें ज्वर सोडीत असतां होतात. यावर कोणी

अशी शंका करील कीं, दोषक्षय झाल्यावांचून व्याधि कसा जाईल? आणि दोष क्षीण झाला तर असें दाहादि लक्षण कसें करील? त्यावर असें समाधान आहे कीं, कोणाएकाचा असा स्वभाव असतो कीं, क्षीण असतां-ही विनाश काळीं आपली शक्ति दाखवावी. उदाहरण, दिव्यांतलें तेल सरून तो जाऊं लागला ह्मणजे त्याची जोत पहिल्यापेक्षां चार पांच वेळां मोठी होऊन मागून तो विझतो. ही गोष्ट सर्वांच्या पाहण्यांत आहेच. अथवा दोषांनीं पीडलेल्या धातूंचा दोष गेल्यावर क्षोभ होऊन दाहादिक लक्षणें होतात असें जाणावें. **ज्वरमुक्तिलक्षण.**—घाम येणें, शरीरास हलकेपणा, डोक्याला कंड सुटणें, मुखपाक ह्मणजे तोंड येणें, शिंक येणें, आणि अन्नावर वांच्छा होणें, हीं लक्षणें झालीं ह्मणजे ज्वरानें सोडलें असें समजावें. **ज्वर येतांच प्रथम काय करावें.**—ज्वरास प्रथम लंघन करावें, व क्षुधा लागेल तरच अन्न द्यावें. परंतु वातज्वरी, क्षयी, क्षुधित, गर्भिणी, दुर्बल, बालकें, तृषित, ऊर्ध्वश्वासी यांणीं लंघन करूंनये. मूग, मसुरा, चणे, कुळिथ, मठ या पंचधान्यांचा यूष अ० मंड (कढण) करून द्यावा. अथवा तांदुळांची किंवा गव्हांची कणेरी द्यावी. **ज्वरावर पाचन-** सुंठ, देवदार, धणे, रिंगणी, डोरली या पांच औषधांचा काढा करून ज्वर आल्यावर दोन तीन दिवसांनीं द्यावा; ह्मणजे आमज्वराचें पाचन होतें. पाचन ह्मणजे पूर्वीं अपक्वज्वर असतो त्याचें पक्व होणें. **वातज्वरावर उपचार.**—(१.) गुळवेल, सुंठ, पिंपळमूळ यांचा काढा निकाढा तयार करून, त्यांत मध घालून ज्वराचे सातवे दिवसापासून तीन दिवस सकाळ संध्याकाळ देत जावा; ह्मणजे ज्वराचें पाचन होतें. (२.) धमासा, सुंठ, नागरमोथे, गुळवेल यांचा काढा द्यावा. (३.) निद्रा येत नसल्यास पिंपळमूळाचें चूर्ण गुळाशीं द्यावें. किंवा कावळीचें मूळ शेंडीस बांधावें. **पित्तज्वरावर उपचार.**—(१.) कायफळ, इंद्रजव, पहाडमूळ, कुटकी, नागरमोथे, यांचा काढा दहा दिवसानंतर, ज्वरपाचनार्थ तीन दिवस द्यावा. (२.) पित्तपापडा, वाळा, रक्तचंदन, धणे, सुंठ, यांचा अथवा नुसत्या पित्तपापड्याचा काढा द्यावा. (३.) उंबराच्या पाळाचें स्रवलेलें पाणी साखर घालून द्यावें. **कफज्वरावर उपचार.**—(१.) नागरमोथा,

सुंठ, धमासा, अडुळसा, यांचा काढा बारा दिवसांनंतर पाचनार्थ द्यावा. हा काढा ज्वर, श्वास, खोकला, शूळ यांचा नाशक आहे. (२.) नागरमोथे, धमासा, सुंठ, भारंगमूळ, अडूळशाचीं पानें यांचा काढा द्यावा.(३.) त्रिकटु (सुंठ, मिरें, पिंपळी.) चूर्ण, आल्याचा रस व मधाशीं द्यावें. तें खोकला, श्वास, ओकारी, अरुचि, शैत्य, वायु व कफज्वर यांचा नाश करितें. **वातपित्तज्वरावर.**– (१.) गुळवेल, पित्तपापडा, नागरमोथे, किराईत, सुंठ यांचा काढा द्यावा. (२.) मनुका, किराईत, गुळवेल, अडुळसा, षट्कचोरा यांचा काढा द्यावा. **वातकफज्वरावर.**– (१.) रिंगणी, सुंठ, गुळवेल, एरंडमूळ यांचा काढा द्यावा. (२.) रिंगणी, ओंवा, गुळवेल यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून दिला असतां, कफ,वातज्वर, श्वास, शूल, पडसें, खोकला यांचा नाश होतो. घाम अतिशय आल्यास कुळित्थ भाजून, त्यांचें पीठ अंगास लावावें ह्मणजे घाम बंद होतो. **कफपित्तज्वरावर.**–(१.) रिंगणी, गुळवेल, सुंठ, किराईत, पुष्करमूळ अथवा कोष्ट यांचा काढा घ्यावा. तो सर्व ज्वरांस तत्काल दूर करितो. (२.) अडुळशाच्या पानांचा, फुलांसहित रस काढून, त्यांत साखर व मध घालून द्यावा, ह्मणजे कफपित्तज्वर, रक्तपित्त, कावीळ हीं दूर होतात. हा काढा साखर न घालतां घेतला तर श्वास कास जातो. **विषमज्वरावर.**–(१.) भुईतरवड, बाळहिरडे, काळीं द्राक्षें, जिरें, यांचा काढा, विषमज्वरपाचनार्थ द्यावा. (२.) कोरफडीचा कांदा १० मासे पर्यंत घेऊन, तो कोमट पाण्याशीं द्यावा. ह्मणजे वांति होऊन कफाशयाचें शोधन होतें व विषमज्वर दूर होतो. (३.) निंबादिचूर्ण–कडूनिंबाचा पाला ४ तोळे, सुंठ, मिरीं, पिंपळी हीं१२तोळे, जवखार,सज्जाखार हे आठ तोळे,व ओंवा २०तोळे यांचें चूर्ण करावें. तें एकाहिक,द्व्याहिक, त्र्याहिक, चातुर्थिक, संततज्वर घालवितें. (४.) अगस्त्याचे पाल्याचा रस काढून नाकांत घालावा. ह्मणजे चातुर्थिकज्वर व अर्धशिशी दूर होते. (५.) रविवारीं सहदेवीचें मूळ रोग्याचे दंडांत अगर शेंडीस बांधावें. (६.) पांढऱ्या कण्हेरीची मुळी रविवारीं कानास बांधावी. (७.) पांढरा मांदार, पांढरी गोकर्णी व सहदेवी यांच्या मूळाचा रस काढून तो दोन तोळे पर्यंत द्यावा. (८.) पां-

ढऱ्या चाफ्याच्या कळ्या देंठासुद्धां घालून, तीन विडे करून ताप येण्यापूर्वी एक एक घटकेच्या अवकाशानें विडा खावा.(९.) जुन्या तरटाची राख मधांत अगर तुपांत द्यावी. (१०.) चिकणामूळ व सुंठ यांचा काढा द्यावा. (११.) बाळहिरडे व इंद्रजव यांचें चूर्ण गुळाशीं द्यावें. (१२.) पटोल, इंद्रजव, देवदार, त्रिफळा, नागरमोथे, मनुका, ज्येष्ठमध, गुळवेल, अडुळसा यांचा काढा मध घालून द्यावा. ह्मणजे नवज्वरादिक सर्व ज्वर दूर होतात. **मधुराज्वरावर.**–(१.) नागरमोथे, पित्तपापडा, ज्येष्ठमध, काळीं द्राक्षें यांचा काढा मध घालून द्यावा. (२.) वडाचीं पक्व पानें, व बाजरीचें पीठ यांचा काढा करून द्यावा. (३.) पुदिना, रानतुळस, काळी तुळस यांचा अंगरस काढून, त्यांत खडीसाखर घालून तो तीन किंवा सात दिवस द्यावा. (४.) मानेवर व गळ्यावर फोड येतात, त्यांच्या प्रतीकारार्थ मोत्यांचा हार गळ्यांत घालावा. हा उपचार आह्मी एथें सांगितला, परंतु मोत्यांच्या ऐवजीं शिंपल्याही मिळण्याची सध्यां मारामार आहे; इतकी परकीयांनीं आमच्या हिंदुस्थानांतील संपत्ति लुटून व धुऊन नेली ! ! (५.) अजमोदाचें चूर्ण करून तें मधांत द्यावें. (६.) अडुळसा, द्राक्षें व हरीतकी यांचा काढा, मध व साखर घालून दिला असतां, रक्तपित्तज्वर, दमा, खोकला, व मंथर ज्वर यांस जिंकितो. (७.) वेड्या उंसाचा रस द्यावा. (८.) नागरमोथे, कपुरी मधुरी, रानतुळस, पित्तपापडा व सुंठ यांचा काढा द्यावा. **जीर्णज्वरावर.**–(१.) कुटकी, किराईत, नागरमोथे, पित्तपापडा, गुळवेल, यांचा काढा सतत सेवन केला असतां, असाध्यही ज्वर दूर होतो. (२.) कायफळ, नागरमोथे, कुटकी, कचोरा, काकडशिंगी, पुष्करमूळ अगर कोष्ट, यांचें चूर्ण मधाशीं अ० आल्याच्या रसाशीं द्यावें, तें जीर्णज्वर, खोकला, दमा, अरुचि, वायु, शूळ, ओकारी, क्षय यांचा नाश करितें. (३.) तालिसादि चूर्ण द्यावें. (४.) मधाशीं पिंपळी घ्यावी. ह्मणजे मेद, श्वास, कास, ज्वर, पांडुरोग, व प्लीहा यांचा नाश करिते. (५.) साखर, तूप, सुंठ, खारीक व काळी द्राक्षें, हीं सर्व औषधें, गाईच्या दुधांत घालून तें आटवून घ्यावें. म्हणजे संपूर्ण ज्वर दूर होतात. व शक्ति येते. (६.) गुळवेलीचें सत्व, तूपसाखरेबरोबर किंवा मधसाखरेबरोबर घ्यावें. (७.) जिऱ्या-

चें चूर्ण,जुन्या गुळांतून घ्यावें. (८.) जीर्णज्वरावर दुग्धपान हें अमृतासमान आहे. गाईच्या दुधांत पिंपळया ५।७ टाकून,तें दूध आटवून घ्यावें. दि० २१.(८.) वेलदोडे,बेलफळ,पुनर्नवा(वसु), दूध व पाणी एकत्र करून दूध शेष राहीपर्यंत कढवून प्राशन करावें, म्हणजे तें सर्व ज्वरपरिहार करितें. (९.) तुळशीचा रस, मिरपूड व मध घालून द्यावा. (१०) द्राक्षें, गुळवेल व सुंठ, यांचे काढ्यांत पिंपळीचें चूर्ण घालून द्यावें.म्हणजे श्वास, शूल, कास अग्निमांद्य, जीर्णज्वर व तृषा यांचा नाश होतो. **भूतावेशज्वरावर.**–(१) तुळशीचीं आठ पानें घेऊन, त्या रसांत थोडी त्रिकटूची पूड घालून तो रस नाकांत सोडावा. (२.) गंधक व आवळकठीचें चूर्ण तुपांत द्यावें. **विषजन्य आगंतुकज्वरावर.**–पित्तशामक व विषांवरील उपचार करावे. **कामज्वरावर.**–सुस्वरूप, शृंगारित, सुगंधचर्चित, रसिक, कामानें रसरसलेल्या व शृंगारिक भाषण करणाऱ्या अशा तरुण स्त्रियांचें आलिंगन, संभाषण, स्पर्शादि केलें असतां, कामज्वर शांत होतो. निर्मळस्थळें, कमळें, सुगंधि फुलांवरून आलेला वायु, जलक्रीडा, सुंदर बागांतून फिरणें, सुस्वरूप स्त्रियांचा समागम, या उपचारांनीं कामज्वर जातो. कामज्वरितानें स्त्रीसंग करूं नये. **दुर्जलजनित ज्वरावर.**–(१.) कडू पडवळ, नागरमोथे, गुळवेल, अडुळसा, सुंठ, धणे, किराईत, व कुटकी, यांचा काढा मध घालून द्यावा. (२.) सुंठ व जवखार यांचें अथवा हळद व जवखार यांचें चूर्ण ऊन्ह पाण्याशीं द्यावें. (३.)बाळहिरडे, कडूनिंबाचा पाला, पिंपळी, सैंधव, चित्रक, यांचें चूर्ण उष्णोदकाशीं द्यावें. **सप्तधातुगतज्वरावर.**–गुळवेलीचें सत्व, आवळकठी, जिरें, पिंपळी, चित्रकमूळ, कवचबीज, हरीतकी,यांचें चूर्ण करून मधांत अथवा एक वर्षाचे जुने गुळांत गोळया करून, त्या गाईचे दुधांत द्याव्या. **अजीर्णज्वरावर.**–(१.) रिंगणी व पित्तपापडा यांचा काढा द्यावा. (२.) नागरमोथे, सुंठ, यांचा काढा द्यावा. (३.) किराईत, गुळवेल, सुंठ, मुस्ता, पिंपळी यांचा काढा द्यावा. (४.) अजमोदा, हरीतकी, कचोरा, संचळ, यांचें चूर्ण उष्णोदकांत द्यावें. (५.) आवळकठी, चित्रक, बाळहिरडे, पिंपळी, सैंधव यांचें चूर्ण उष्णोदकाशीं घ्यावें, म्हणजे सर्व ज्वर

दूर होतात व मळादिकांचा भेद होतो, रुचि येते, कफ दूर होतो, अग्नि प्रदीप्त होऊन अन्न पचन होतें. उलटलेल्या ज्वरावर.—(१.) रोगी बलिष्ट असेल तर लंघन करावें. कुटकी, नागरमोथे, पित्तपापडा, व गुळवेल यांचा काढा द्यावा. (२.) कुटकी, पिंपळमूळ, नागरमोथे, बाळहिरडे, व बाहव्याच्या शेंगांतला मगज यांचा काढा द्यावा. (३.) कुटकी, वाळा, नागरमोथे यांचा काढा ३ दि० द्यावा. सर्व ज्वरांवर.—(१.) गुळवेल, पिंपळमूळ, पिंपळी, हरीतकी, लवंग, कडुनिंबाची साल, श्वेतचंदन, सुंठ, कुटकी, किराईत, यांचें चूर्ण उष्णोदकाशीं द्यावें. (२) आवळकटी, चित्रक, बाळहरीतकी, पिंपळी यांचा काढा द्यावा अथवा या चार जिनसांत सैंधव घालून त्याचें चूर्ण करून तें उष्णोदकाशीं द्यावें ह्मणजे सर्व ज्वर दूर होतात. (३.) सुदर्शनचूर्ण द्यावें. (४.) पटोल, सुंठ, किराईत, यांचा काढा मध घालून द्यावा. (५.) किराईत, सुंठ, डिकेमाली यांचा काढा एकदम करून ठेवावा. व नित्य सकाळीं, तिसरे प्रहरीं व सायंकाळीं या प्रमाणें तीन वेळ घेण्याचा क्रम ठेवावा ह्मणजे साधारण ज्वर, आगंतुकज्वर व जीर्णज्वर हे दूर होतात. (६.) गोरोचन, मिरे, रास्ना, कोष्ठ, पिंपळी, यांचें चूर्ण ऊन्ह पाण्याशीं द्यावें. (७.) धमासा, वाळा, नागरमोथा, सुंठ, कुटकी, यांचें चूर्ण ऊन्ह पाण्याशीं द्यावें. ह्मणजे तें सर्व ज्वराचा नाश करून अग्नि प्रदीप्त करितें. (८.) भारंगमूळ, काकडशिंगी, चवक, तालीसपत्र, मिरीं व पिंपळमूळ, हीं प्रत्येक आठ आठ तोळे; सुंठ २४ तोळे; व आठ आठ तोळे पिंपळी; चातुर्जात, आणि वाळा हीं चार चार तोळे; व साकर ४ तोळे हीं सर्व चूर्णें एकत्र करावीं. हें भारंग्यादिचूर्ण आठ प्रकारचे ज्वर, खोकला, श्वास, सूज उदर, पोटाची फुगवटी आणि त्रिदोष, यांचा नाश करितें. पथ्य—तांदुळजा, चाकवत, कोंवळा मुळा, पित्तपापडा, पडवळ, वायवरणा, गुळवेल, कालशाक, माठ, पाथरी, चुका, वांगें, कंचुकशाक, दोडकी, पडवळ, कांटोल (कटोल), एक वर्षांचे जुने तांदूळ. अपथ्य—विरुद्धान्न, विदाही व जड पदार्थ, दुष्टोदक, क्षार, आंबट पालेभाज्या, तांबूल, कलिंगड, फणस, नवें धान्य, पिठाचे पदार्थ, व पौष्टिक हे पदार्थ सोडावे. तसेंच मेह-

नत, स्त्रीसंग, स्नान, क्रीडा इत्यादि ज्वरमुक्त रोग्यानें शक्ति आल्यावांचून, करूं नये.

## सन्निपातज्वर. *

**कारण**—आंबट, स्निग्ध, ऊष्ण, विदाहि, तिखट, मधुर, मद्य, ऊन, शेक घेणें, काम, क्रोध, अति रूक्ष, जड पदार्थांचें आकंठ भोजन, मांसभक्षण, शीत पदार्थसेवन, शोक, श्रम, चिंता, पिशाचबाधा, अति स्त्रीप्रसंग, या कारणानीं आणि चैत्र, वैशाख, आश्विन, कार्तिक, श्रावण, भाद्रपद, या महिन्यांत सन्निपाताचा प्रायः प्रकोप होतो. सन्निपातज्वर ह्मणजे त्रिदोषज्वर; हा केवळ मृत्यूच आहे. सन्निपाताला जो वैद्य जिंकितो, तो मृत्युंजय ह्मणजे साक्षात् परमेश्वरच समजला पाहिजे. त्याच्या उपकारार्थ सर्वस्व दान केलें तरी पुरेसें होत नाहीं. वातादि त्रिदोष,कांहीं निमित्तानें प्रक्षुब्ध झाले असतां,त्यांपासून जो

---

* **कर्णमळ**—सन्निपातज्वराचें अंतीं कर्णाच्या मूळाशीं जी दारुण सूज येते तीस कर्णमूळ असें ह्मणतात. ही सूज आली ह्मणजे रोगी बहुशः वांचत नाहीं. ज्वराच्या पूर्वीं, मध्यें किंवा अंतींही कर्णमूळाचेठायीं सूज येते. व ती आली असतां, तो ज्वर क्रमानें साध्य, कष्टसाध्य आणि असाध्य जाणावा. इतर ज्वराचे प्रसंगीं अशी सूज आली असतां, ती साध्य व कधीं तर सुसाध्यही आहे. **कर्णमूळावर**—(१.) जळवा लावून वारंवार रक्त काढावें, व घृत पाजावें. (२.) बचनाग निंबाच्या रसांत उगाळून लेप करावा. (३.) धोत्र्याच्या बिया, मोहऱ्या, गूळ एकत्र वांटून लेप करावा. (४.) खच्या नागाचें (कळलावीचें) मूळ उगाळून लेप करावा. (५.) हिंगणबेट, हळद, कौंडळ, सैंधव, देवदार, रुईचा चीक, यांचा एकावर एक असा वारंवार लेप करावा. (६.) शेवग्याची साल व मोहऱ्या हीं वाटून लेप करावा ह्मणजे सूज उतरते. (७.) पुष्करमूळ, दालचिनी, चित्रक, गूळ, कायफळ, कोष्ट, हिराकस हीं रुईचे चिकांत वांटून लेप करावा ह्मणजे सात दिवसांत कर्णमूळाचा नाश होतो. (८.) दंतीमूळ, चित्रकमूळ, निवडुंग, रुईचा चीक, गूळ, बिबव्याची आंतील गोडंबी व हिराकस यांचा लेप करावा. (९.) वज्रमुष्टि ह्मणजे लुतीचा कांदा उगाळून लावावा. (१०) रक्तरोडा, पीलूची साल, मोत्याची शिंप, कंवडळ, लघुकारली, भारंगमूळ, मोरचूत, हरताळ, शिरस, मनशीळ, नवसागर, गंधक, हिराकस, कोष्ट, कडू पडवळ, रक्तलाजाळू, करंज, गुग्गुळ व जवखार यांचा लेप करावा. तो तत्काळ कर्णमूळाच्या वेदना दूर करितो.

ज्वर येतो तो सन्निपातज्वर. हा कष्टसाध्य आहे, कारण तिघांचा प्रकोप आहे, अतएव एकाच्या उपशमनार्थ औषध द्यावें तर दुसरे अधिक होतात. **सन्निपातज्वरलक्षण.**—क्षणांत दाह व क्षणांत शीत, हाडें, संधि, मस्तक यांचे ठायीं शूळ, डोळ्यांना पाणी येणें, व ते गढूळ, लाल, वटारलेले असतात, कानांत शब्द होतो व शूळ होतो, गळ्यांत भाताचें कूस लागल्यासारखें दुखतें, झांपड, मोह, बडबड, खोकला, श्वास, अरुचि-भ्रम व जीभ कडांकडेस जळल्यासारखी व सागाचे पानासारखी खरख-रीत, अत्यंत अंग गळणें, रक्तपित्तानें मिश्रित असा कफाचा बेडका येतो, व मस्तक डोलतें, तहान, झोंप न येणें, उरांत दुखणें, घाम, मूत्र, मळ हे फार वेळानें थोडे होतात, गात्रें अत्यंत कृश होत नाहींत, निरंतर गळा घुरघुर वाजतो, मधमाशी चावल्यासारख्या गांधी येतात, काळसर व तांबू-सवर्ण चकंदळें उठतात, व वाचा बसते, कान, नाक, तोंड, यांचे ठि-काणीं फोड येतात, व पोट जड होतें, वात, पित्त, कफ, यांचा पाक कालेंकरून होतो, हें सन्निपातज्वराचें स्वरूप जाणावें. सन्निपातज्वराचे तेरा प्रकार आहेत व ते निरनिराळ्या लक्षणांनीं निरनिराळ्या प्रकारचे वर्णिले आहेत.

**सन्निपातांचीं नांवें**—संधिक, अंतक, रुग्दाह, चित्तविभ्रम, शीतांग, तंद्रिक, कंठकुब्ज, कर्णक, भुग्ननेत्र, रक्तष्ठीवी, प्रलापक, जिव्हक व अभिन्यास.

**त्यांची दिनमर्यादा.**—संधिकाला ७, अंतकाला १०, रुग्दा-हास २०, चित्तविभ्रमाला २४, शीतांगाला १५, तंद्रिकाला २५, कंठकुब्जाला १३, कर्णकाला तीन महिने (९० दिवस), भुग्ननेत्राला ८०, रक्तष्ठीवीला १०, प्रलापकाला १४, जिव्हकाला १६, अभिन्यासाला १६ दिवस, ही आयुष्याची परमावधि सांगितली आहे, परंतु रोगी तत्क्षणीं मरतो.

**साध्यासाध्यविचार.**—संधिक, तंद्रिक, कर्णक, कंठकुब्ज, जि-व्हक, चित्तविभ्रंश, हे सहा साध्य, बाकीचे राहिलेले सात ते मारक आहेत. **संधिक.**—ज्याच्या पूर्वरूपामध्यें शूल, शोष, वायूच्या फार

वेदना, श्लेष्मोद्रेक, संताप, बलहानि, जागरण, हीं लक्षणें होतात, त्याला संधिक असें ह्मणावें. **अंतक.**—दाह करितो, संतापाला वाढवितो, मोह देतो, शीर कांपवितो, उचकी करितो, आणि कास वाढवितो. सन्निपातवेत्त्यांहीं सोडलेला असा हा अंतकसन्निपात जाणावा. **रुद्दाह.**—बडबड, संताप, बळकट मोह, मंदत्व, अनायासानें श्रम, भोंवळ, या वेदनांनीं युक्त, कंठ, मान, हनुवटी, यांचे ठायीं वेदना, निरंतर तृषा लागणें, श्वास, कास आणि उचकी या लक्षणांनीं व्याप्त असा हा रुग्दाह कष्टसाध्य आहे. हा सन्निपात मारितो. **चित्तभ्रम**—जर कोणत्याही प्रकारानें शरीराला पीडा होत आहे, व भ्रम, धोतरा खाल्ल्यासारखी अवस्था, संताप, मोह, विकलपणा, डोळे व्याकुळ होणें, हंसणें, गाणें, नाचणें आणि बडबड करणें, हीं लक्षणें होतात. हा कोणी असाध्य आहे असें ह्मणतात. **शीतांग**—शरीर बर्फासारखें थंड, कंप, श्वास, उचकी, संपूर्ण आंग ढिलें होणें, स्वर खोल जाणें, अभ्यंतरीं उग्र संताप, अनायासें श्रम, मनाला संताप, खोकला, वांति, अतिसार, या लक्षणांनीं युक्त झालेल्या सन्निपातास शीतगात्र ह्मणावा. हा प्राणाचा त्वरित नाश करितो. **तंद्रिक**—तंद्रिकसन्निपातामध्यें झांपड फार असते, शूळ, ज्वर, कफ, तहान यांनीं रोगी फार पीडित होतो, जीभ श्यामवर्ण, दडस, कठिण आणि कांटाळलेली होते, व अतिसार, श्वास, ग्लानि, तलखी, कर्णशूळ, घशांत जडत्व, आणि रात्रंदिवस झोंप हीं लक्षणें होतात. हा असाध्य आहे. **कंठकुब्ज**—कपाळ दुखणें, गळा दुखणें, दाह, बेसावधपणा, कंप, ज्वर, रक्तवातसंबंधीं पीडा, हनुवटी जखडणें, संताप, बडबड, आणि मूर्च्छा, या लक्षणांनीं युक्त झालेल्या सन्निपाताला कंठकुब्ज ह्मणावा. हा कष्टसाध्य आहे. **कर्णक**—बडबड, बधिरपणा, गळा धरणें, अंगांत तिडीक, श्वास, खोकला, लालास्राव, ज्वर, संताप, कर्ण व गाल, यांचे ठायीं पीडा, या लक्षणांनीं युक्त असा हा कर्णक होय. हा कष्टसाध्य आहे. **भुग्ननेत्र**—ज्वरानें बलक्षय, स्मृतिनाश, श्वास, वक्रदृष्टि, बेसावधपणा, बडबड, भ्रम, कंप, आणि सूज हीं लक्षणें भुग्ननेत्र सन्निपातांत होतात. हा रोगी लवकर मरतो. **रक्तष्ठीवी**—रक्ताची गुळणी, ज्वर, वांति, तृषा, मूर्च्छा, शूळ, अतिसार,

उचकी, पोट फुगणें, चक्राच्या भ्रमणासारखें भोंवणें, तलखी, श्वास, संज्ञानाश, जिव्हा काळी किंवा रक्तवर्ण होते, व तिच्यावर मंडलें उठतात, या लक्षणांनीं जो सन्निपात, त्याला रक्तष्ठीवी ह्मणतात. हा प्राणाचा नाशक आहे. **प्रलापक**—कंप, बडबड, संताप, कपाळ दुखणें, प्रौढ गोष्टी सांगणें, आणि रोगी स्वच्छपणाविषयीं आसक्त, दुसऱ्याची काळजी करणारा, बुद्धिनाश झालेला, विकल आणि पुष्कळ बडबड करणारा, असा हा प्रलापकसन्निपातरोगी यमसदनास जातो. **जिव्हक**—खोकला, दमा आणि संताप, याणीं विव्हल, कठिण व कांट्यांनीं व्याप्त झालेली जिव्हा, बहिरेपणा, मुकेपणा आणि बलहानि या लक्षणांनीं युक्त असा हा जिव्हक सन्निपात कष्टसाध्य आहे. **अभिन्यास**—त्रिदोषांच्या कोपानें तोंडावर तुळ तुळीतपणा, झोंप, विकळपणा, निचेष्ट पडणें, मोठ्या प्रयासानें एकादा शब्द बोलणें, बलनाश, श्वासादिकांचा अवरोध, हीं लक्षणें अभिन्यास सन्निपातांत होतात. हा केवळ भयंकर मृत्युतुल्य आहे. **हारिद्रक**—देह, नख, नेत्र, हात, पाय, हे हळद लावल्यासारखे पिंवळे असणें, ज्वर, थुंका, आणि खोकला या लक्षणानीं हारिद्रक सन्निपात ओळखावा. हा ज्वररूपी काळच होय. हा वैद्यास साध्य होतच नाहीं. हा त्रयोदश सन्निपातांखेरीज आहे. हा विरळा पाहण्यांत येतो.

**सन्निपात झाल्यावर** तत्काळ तीन, पांच, सात, दहा, आणि बारा दिवस उलटून २१ दिवस लोटले ह्मणजे शुद्ध होऊन सन्निपातरोगी जगतो. **त्रिदोषज्वराची साधारण मर्यादा**—त्रिदोष झाल्या दिवसापासून ७ किंवा १४ आणि ९ किंवा १८, तसेंच ११ किंवा २२ दिवसपर्यंतहीं त्रिदोषाची मर्यादा जाणावी. या पुढें ज्वर जातो, किंवा मृत्यु येतो. ७।९ आणि ११ ही मर्यादा वाताधिक, पित्ताधिक आणि कफाधिक सन्निपाताची क्रमानें जाणावी. पित्त, कफ आणि वायु, यांच्या वृद्धीनें क्रमें करून दहा दिवसांनीं, बारा दिवसांनीं आणि सातां दिवसांनीं, त्रिदोषजन्य ज्वर धातुपाक झाला असतां मारतो आणि मलपाक झाला असतां रोग्याला सोडतो. **धातुपाकलक्षण**—निद्रानाश, हृदय ताठल्यासारखें होणें, मूत्र-पुरीषांचा अवष्टंभ, शरीराला जडपणा, अन्नद्वेष, अस्वस्थपणा,

आणि बलाचा नाश, हीं लक्षणें धातुपाक झाला असतां होतात. धातुपाक ह्मणजे उत्तरोत्तर रोगाची वृद्धि आणि बलाची हानि होऊन शुक्रादि धातूसहीत मूत्रादिकांचा जो पाक होणें त्यास धातुपाक ह्मणावें. **मलपाक**—दोषांचा स्वभाव पालटणें, ज्वर हलका होणें, शरीर हलकें होणें, इंद्रियांस निर्मलता, हें मलपाकाचें लक्षण जाणावें. धातुपाक आणि मलपाक होणें हें केवळ दैवावर आहे,याविषयीं दुसरा कांहीं हेतु दिसत नाहीं. **सन्निपाताचें असाध्य लक्षण**—मलादिक व पित्तादिक दोष बद्ध झाले असतां आणि अग्नि शांत झाला असतां, आणि वातादि सर्व दोषांचीं संपूर्ण लक्षणें झालीं असतां, सन्निपातज्वर असाध्य होतो, आणि याच्या उलट ह्मणजे दोषप्रवृत्ति असून, अग्नि थोडासा दीप्त असून, सर्वांचीं लक्षणें थोडथोडीं झालीं असतां, सन्निपातज्वर कष्टसाध्य होतो. **संधिकसन्निपातावर**—(१.) रास्ना, सुंठ, गुळवेल, कोरांटा, नागरमोथा, शतावरी, हरीतकी, देवदार, कटुकी, कचोरा, अडुळसा, एरंडमूळ, व दशमुळें यांचा काढा संधिकसन्निपात, मन्यास्तंभ, अंत्रवृद्धि, सर्व प्रकारचे ज्वर, पिटिका, कंबर व संधि यांतील शूळ आणि सर्वांगांतील कळा यांचा नाश करितो. (२.) देवदार, कचोरा, गुळवेल, रास्ना व सुंठ यांचा काढा गुग्गुळ घालून घ्यावा; ह्मणजे संधिक सन्निपात व वायु यांचा नाश होतो.( ३. ) वेखंड, धमासा, गुळवेल, भारंगमूळ, कोराटा, देवदार, नागरमोथा, सुंठ, वरधाडा, रास्ना, गुग्गुळ, अश्वगंध, एरंडमूळ, शतावरी, यांचा काढा संधिक सन्निपात, जडता, ग्लानी, भोवळ व पक्षघात यांचा नाश करितो. (४.) गुळवेल, एरंडमूळ, सुंठ, देवदार, रास्ना, हरीतकी यांचा काढा प्रातःकाळीं घेतला असतां सर्व वातरोगाचा नाश होतो. ( ५. ) निर्गुडी, गुग्गुळ, मोहऱ्या, कडूनिंबाचीं पानें, व राळ यांचा धूप संधिक सन्निपाताचा नाश करितो.**अंतक सन्निपातावर**—(१.) नाचण्याचें पीठ लसुणाच्या रसांत मळून, त्याची भाकर तेलांत किंवा तुपांत अथवा एरंडेलांत भाजून, ती गरम अशी मस्तकावर बांधावी. ( २. ) हिरडा,अडुळसा, फालसा, देवदार, कुटकी, रास्ना, गुळवेल, कोष्ट यांचा काढा द्यावा. **रुग्दाह सन्निपातावर**—( १ ) नागरमोथे, रक्तचंदन, सुंठ, वाळा, काळावाळा व पि-

त्तपापडा याचा काढा थंड झाल्यावर द्यावा. (२.) हरीतकी, पित्तपापडा, नागरमोथा, कुटकी, बाहव्याचा मगज, द्राक्षे यांचा काढा द्यावा. (३.) नागरमोथा, कुटकी, वेखंड, वाळा, बाहवा, कटुकी, त्रिफला, चिकणा, कडूनिंब, कडूदोडका, दशमूळ, काडेकिराईत, यांचा काढा सकल वातव्याधी व रुग्दाह सन्निपात यांचा नाशक आहे. (४) कृष्णागरु, कापूर, सालई, नखला, तगर, वाळा, चंदन व राळ, यांचा धूप द्यावा. (५.) बोरांचा पाला दह्यांत कालवून अंगास लेप करावा; अथवा कापूर, चंदन, निंबाचा पाला हीं ताकांत वाटून त्यांचा लेप करावा ह्मणजे दाह शमतो.(६)दाह ववांतीयाणीं कृश झालेला,अन्न चालत नाहीं व तृषार्त अशा रोग्याला लाह्याचें पीठ,साकर व मध घालून पाजावें. (७.) सुरूप, पीनस्तनी, विलासचतुर अशा स्त्रीचें आलिंगन करावे ह्मणजे रुग्दाह शमतो. मैथुनवर्ज. (८.) हरीतकीचें चूर्ण,तूप अथवा मध याशीं द्यावें. ह्मणजे दाह, ज्वर, कास, रक्तपित्त, विसर्प, श्वास, वांती यांचा नाश होतो.

**चित्तविभ्रमसन्निपातावर.**—(१.) मोहाची साल, नखला, सांवरीची साल, पिंपळी, अर्जुनसादड्याची साल, हरीतकी, एकांगी, मुरा, अगरु, रक्तचंदन, यांचा काढा द्यावा. (२.) द्राक्षे, देवदार, नागरमोथा, आवळकटी, गुळवेल, हरीतकी, बाहाव्याचा मगज, किराईत, पित्तपापडा, कडूपडवळ, यांचा काढा द्यावा. (३.) ब्राह्मी, द्राक्षे, कडूपडवळ, वाळा, हरीतकी, पित्तपापडा, बहाव्याचा मगज, कुटकी, शंखपुष्पी, यांचा काढा, चित्तभ्रम शमवितो. (४.) हिरडा, पित्तपापडा, काळीं द्राक्षें, शंखपुष्पी, कुटकी, नागरमोथा, देवदार, बाहव्याचा मगज,ब्राह्मी यांचा काढा द्यावा. (५.) पिंपळी, मिरीं, सैंधव, वेखंड, करंजाचें बीज, हळद, आवळकठी,हरीतकी, बेहडा,मोहऱ्या, सुंठ, व हिंग यांच्या चूर्णास बकऱ्याच्या मूत्रांत खलून गोळया करून ठेवाव्या, हिचे नेत्रांत अंजन केलें असतां चेतना देते व चित्तभ्रम, अपस्मार (उन्माद), भूतबाधा, मस्तकरोग, नेत्ररोग, व भ्रम यांचा नाश होतो. (६.) अगस्त्याचे पाल्याच्या रसांत गूळ, सुंठ व पिंपळी घालून द्यावें. (७.) एकांगी,मुरा, केश, ज्येष्ठमध,चंदन, देवदार, मध, नखला, पित्तपापडा, अ—

गरु, पीत वाळा, वेलदोडे, यांचा धूप चित्तभ्रम सन्निपात व ग्रहदोष यांचा नाशक, लक्ष्मीकारक व कांतिप्रद आहे. **शीतांगसन्निपातावर**—( १. ) रुईचें मूळ, जिरे, त्रिकटू, भारंगमूळ, रिंगणी, काकडशिंगी व पुष्करमूळ, यांचा काढा गोमूत्रांत सिद्ध करून द्यावा अगर पाण्यांत करून गोमूत्र घालून द्यावा. ( २. ) महाळुंग, किराईत, पिंपळमूळ, देवदार, दशमूळें, अजमोदा, व सुंठ यांचा काढा द्यावा. ( ३. ) कर्टोलीचा कांदा, पित्तपापडा, कुळित्थ, पिंपळी, वेखंड, कायफळ, शहाजिरे, काडेकिराईत, चित्रक, कडूभोंपळा व हिरडा यांचें चूर्ण अंगास चोळलें असतां, शीतमस्त्र सन्निपाताचा नाश होतो. **तंद्रिकसन्निपातावर**—(१.)भारंगमूळ, गुळवेल, नागरमोथा, रिंगणी, हरीतकी, पुष्करमूळ, सुंठ यांचा काढा द्यावा. ( २. ) गुळवेल, कडूपडवळ, अडुळसा व त्रिकटु यांचा काढा द्यावा. ( ३. ) पिंपळी, मनशीळ व हरताळ यांचें अंजन करावें. ( ४. ) गुळवेल व कडूपडवळ यांचा काढा त्रिकटूचें चूर्ण घालून द्यावा. **कंठकुब्जसन्निपातावर**—( १. ) त्रिकटु, इंद्रजव, कुटकी, त्रिफला, दारुहळद, हळद यांचा काढा द्यावा. ( २. ) पिंपळी व अघाड्याचा रस यांचें किंवा त्रिकटु व कडूभोंपळयाचें बीज पाण्यांत उगाळून त्याचें नस्य द्यावें. ( ३. ) किराईत, कटुकी, पिंपळी, इंद्रजव, रिंगणी, कचोरा, बेहडा, देवदार, हरीतकी, मिरें, कायफळ, नागरमोथा, अतिविष, आवळकठी, पुष्करमूळ, चित्रक, काकडशिंगी, अडुळसा व सुंठ यांचा काढा द्यावा. **कर्णक सन्निपातावर**—(१.) रास्ना, आस्कंध, नागरमोथा, रिंगणी, भारंगमूळ, वेखंड, पुष्करमूळ, कुटकी, काकडशिंगी, हरीतकी यांचा काढा द्यावा. ( २. ) दशमूळें, कुटकी, पिंपळी, त्रिफला, सुंठ, किराईत, मिरीं यांचा काढा द्यावा. ( ३ ) ऊन्हपाण्यांत मिरे, पिंपळी व सैंधव उगाळून नस्य द्यावें. **भुग्ननेत्र सन्निपातावर**—(१.) दारुहळद, कडूपडवळ,नागरमोथा, रिंगणी, कुटकी,हळद, कडूनिंब, हिरडा, बेहडा, आवळकठी यांचा काढा द्यावा. ( २. ) पिंपळी, कडू पडवळ, कुटकी, नागरमोथा, कडूनिंब, देवदार व रिंगणी यांचा काढा पित्तज्वर, व उग्रसन्निपातज्वर यांचा नाश करितो. (३.) किराईत, वेखंड,

पिंपळी, मिरें, लसूण व मोहऱ्या यांचें चूर्ण मद्यांत द्यावें व सैंधव आणि पिंपळी यांचें अंजन करावें. **रक्तष्ठीवी सन्निपातावर.**--(१.) पित्तपापडा, धमासा, अडुळसा, सुगंधरोहिस तृण, यांचा काढा साखर घालून द्यावा आणि त्रिफळयाच्या काढ्याचें नस्य द्यावें. ( २. ) नागरमोथा, पद्मकाष्ठ, पित्तपापडा, चंदन, जाई, शतावरी, ज्येष्टीमध, मध, कडूनिंब, वाळा, चित्रक, रक्तचंदन, यांचा काढा द्यावा. ( ३ ) दूर्वांच्या रसाचें, कांद्यांच्या रसाचें, किंवा डाळिंबाच्या फुलाचें नस्य द्यावें. **प्रलापक सन्निपातावर.**--( १. ) नागरमोथा, वाळा, दशमूळें, सुंठ, पित्तपापडा, रक्तचंदन, धावड्याची साल, अडुळसा यांचा काढा द्यावा. (२.) तगर, अस्कंध, कुंभ्याची साल, शंखपुष्पी, देवदार, ब्राह्मी, जटामांसी, नागरमोथा, बाहवी, हिरडा व द्राक्षें यांचा काढा द्यावा. **जिव्हक सन्निपातावर.**--( १. ) वेखंड, रिंगणी, धमासा, रासना, गुळवेल, सुंठ, कुटकी, काकडशिंगी, पुष्करमूळ, ब्राह्मी, भारंगमूळ, किराईत, अडुळसा व कचोरा यांचा काढा द्यावा. (२.) रिंगणी, सुंठ, पुष्करमूळ, कुटकी, रास्ना, गुळवेळ, भारंगमूळ, काकडशिंगी, कचोरा, धमासा, अडुळसा, नागरमोथा, ब्राह्मी, वेखंड व किराईत यांचा काढा द्यावा. ( ३ ) देवदार, कडूनिंब, बेहडा, हिरडा, कडूपडवळ, हळद, दारुहळद, सुंठ, रिंगणी, पुष्करमूळ, नागरमोथा, गुळवेल व अडुळसा यांचा काढा द्यावा. **अभिन्यास सन्निपात.**--( १. ) रिंगणी डोरली, गुळवेल, द्राक्षें, जिरे, सुंठ, मिरीं, पिंपळी, काकडशिंगी, वावडिंग यांचा काढा करून, त्या काढ्यानें तांदूळ तुपांत भाजून त्याची पेज करावी, आणि ती उन्हऊन्ह प्यावी, ह्मणजे, श्वास, उचकी, कास, अभिन्यास सन्निपात, आणि वायु, मल, मूत्र यांचा अवरोध दूर होतो. ( २. ) कडू वृंदावन, त्रिफला, कटुकी, व बाहाव्याचा मगज यांचा काढा जवखार घालून द्यावा, तो रेचक व सर्व ज्वरनाशक आहे. ( ३. ) रिंगणी, धमासा, भारंगमूळ, कचोरा, काकडशिंगी व पुष्करमूळ, यांचा काढा द्यावा ह्मणजे कफ, उदर दुखणें व अभिन्यास सन्निपात हे दूर होतात. (४.) काकडशिंगी भारंगमूळ, हिरडे, जिरें, पिंपळी, किराईत, पित्तपापडा देवदार, वेखंड, कोष्ठ, धमासा, कायफळ, सुंठ, नारमोथा, धणें, कुटकी

इंद्रजव, पहाडमूळ, रेणूकबीज, गजपिंपळी, आघाडा, पिंपळमूळ, चित्रक, कडूइंद्रावण, बाहाव्याचा मगज, कडूनिंब, कचोरा, बावंचीबीज, वावडिंग, हळद, दारुहळद, ओंवा, किरमाणी ओंवा, यांचा काढा करून, त्यांत हिंग व आल्याचा रस घालून तो घेतला असतां, तेरा प्रकारचे सन्निपात, झांपड, मोह, कर्णमूळ, उचकी, श्वास, खोकला व ज्वराचे सर्व उपद्रव यांचा नाश होतो. **तेरा प्रकारचे सन्निपातावर उपचार.**—(१.) सन्निपातावर पूर्वी कफनाशक औषध द्यावें, नंतर पित्त शमवावें. कायफळ, देवदार, त्रिफळा, रक्तचंदन, फालसा, कुटकी, पद्मकाष्ठ, वाळा, यांचा काढा द्यावा. तो त्रिदोष, दाह व तृष्णा यांना शमवितो व दीर्घकाळ ज्वरितास केवळ अमृतोपम होतो. ( २. ) मध, तूप व द्राक्षें एकत्र खलून, त्याचा लेप जिभेला करावा ह्मणजे जीभ सरस मृदु होते. ( ३. ) सैंधव, त्रिकटु यांची आल्याच्या रसांत गोळी करून तोंडांत ठेवावी. ह्मणजे गळयांत दाटलेला कफ बाहेर पडून जाऊन शरीरास हलकेपणा येतो व ज्वर, मूर्च्छा, श्वास, गलरोग, तोंडाला पाणी सुटणें, या व्याधि दूर होतात. ( ४. ) कायफळ, पुष्करमूळ, काकडशिंगी, त्रिकटु, धमासा, अजमोदा, यांचें चूर्ण मधाशीं द्यावें, तें दारुण सन्निपात, उचकी, श्वास, कास व कंठरोग यांचा नाश करितें. ( ५. ) समुद्रफळ पाण्यांत उगाळून अंजन करावें. (६.) लाह्यांचें पीठ सैंधव घालून द्यावें. तें जर निर्विघ्नपणें जिरलें तर रोगी निश्चयानें वांचेल. नुसतें लाह्यांचें पीठ शीत आहे. तें सन्निपातावर कधींही देऊं नये, व थंड पाणी देऊं नये. ( ७. ) किराईत, कुटकी, कोष्ठ, ओंवा, इंद्रजव, कचोरा यांचें चूर्ण अंगास चोळावें व संधीच्या ठायीं विशेष चोळावें, ह्मणजे कफानें झालेला कंठावरोध व सन्निपातज्वर यांचा नाश होतो. ( ८. ) धमासा, गोखरू, व रिंगणी यांच्या काढ्यांत सिद्ध केलेला आहार द्यावा, त्याणें दोषशांति होवे व बळ आणि अग्नि हे वाढतात व तो त्रिदोषी रोग्याला हितकारक होतो. (९.) शिरसाची साल, पिंपळी, मिरीं व सैंधव हीं गोमूत्रांत उगाळून अंजन करावें, अथवा मनशीळ व वेखंड यांचें लसुणीच्या रसांत अंजन करावें. ( १०. ) कायफळ, नागरमोथे, वेखंड, पहाडमूळ, पुष्करमूळ, जिरे,

पित्तपापडा, देवदार, हरीतकी, काकडशिंगी, पिंपळी, किराईत, सुंठ, भा-
रंगमूळ, इंद्रजव, कुटकी, कचोरा, रोहिष तृण व धणे यांचा काढा क-
रून, त्यांत हिंग व आल्याचा रस घालून तो द्यावा. ह्मणजे कर्णमूळ, मान
व गळा यासंबंधीं सूज, कफवातज्वर, श्वास, कास, उचकी, हनुग्रह, ग-
लगंड, गंडमाला, कफापासून, झालेला स्वरभेद, मस्तकाची जडता, बहिरे-
पणा, कफ व मेद यांची वृद्धी, दहा प्रकारचे ज्वर, सन्निपात, अभि-
न्यास, आणि संज्ञानाश यांचा नाश होतो. ( ११. ) कचोरा, पुष्कर-
मूळ, रिंगणी, कांकडशिंगी, धमासा, इंद्रजव, कडूपडवळ व कुटकी,
यांचा काढा सान्निपातज्वर, दमा, खोकला, दिवानिद्रा, रात्रौ जागरण, मु-
खशोष, तहान, आणि त्रिदोष यांचा नाश करितो.( १२. ) भारंगमूळ,
किराईत, कडूनिंब, नागरमोथे, कुटकी, वेखंड, सुंठ, मिरीं, पिंपळी, अ-
डुळसा, कडूइंद्रावण, रास्ना, धमासा, कडूपडवळ, देवदार, हळद, पहाड-
मूळ, कुचला, ब्राह्मी, दारुहळद, गुळवेल, निशोत्तर, अतिविष, पुष्कर-
मूळ, त्रायमाण, रिंगणी, डोरली, इंद्रजव, त्रिफला, कचोरा, यांचा काढा
करावा. याचें नाव बत्तिशी काढा. हा तेरा प्रकारचे सन्निपात, शूल, खो-
कला, उचकी, दमा, पोटफुगी, ऊरुस्तंभ, अंत्रवृद्धि, गलरोग, अरुचि,
व संधिग्रह यांचा जसा हत्तीच्या पंक्तीचा सिंह नाश करितो, त्याप्रमाणें
हा काढा नाश करितो. ( १३. ) किराईत, देवदार, दशमूळें,
सुंठ, नागरमोथा,कुटकी, इंद्रजव, धणें व गजपिंपळी यांचा काढा करून
द्यावा. हा अष्टदशांगकाढा झांपड, बडबड, खोकला, अरुचि, दाह,
मोह, दमा, यांणींयुक्त सर्व ज्वरांचा नाश करितो. हा काढा मृत्युतुल्य
ज्वराचा नाश करितो. ( १४. ) दशमुळें, पुष्करमूळ व पिंपळी यांचा
किंवा दशमूळांचा, अ० दशमूळें व गुळवेल यांचा काढा द्यावा ह्मणजे
दमा, खोकला व सन्निपात यांचा नाश होतो. ( १५. ) सुंठ, देवदार,
कचोरा, पित्तपापडा, रिंगणी, कुटकी, किराईत, नागरमोथे व धमासा यां-
चा काढा, पिंपळीचें चूर्ण व मध घालून द्यावा म्हणजे तो सन्निपात,जी-
र्णज्वर, खोकला यांचा नाश करितो. ( १६.) राईचें मूळ, धमासा, कि-
राईत, देवदार, रास्ना, निर्गुंडी, वेखंड, ऐरण, शेवगा, पिंपळ-

मूळ, चवक, चित्रक, सुंठ, अतिविष आणि माका, यांचा काढा द्यावा. हा अर्कादिकाढा तीव्र असे त्रिदोष, धनुर्वात, वायूनें दांतखिळी बसते ती, अंगांतील फार शीतता, श्वास, खोकला, बाळंतरोग यांचा करितो. (१७.) देवदार, सुंठ, किराईत, धणे, कुटकी, इंद्रजव, गजपिंपळी, दशमूळें व नागरमोथा, या अठरा औषधांचा काढा द्यावा. हा देवदार्व्यादि काढा अत्यंत कठीण मृत्युसारखा ज्वर, सन्निपातज्वर, खोकला, हृदयशूल, पार्श्वपीडा, दमा, उचकी, आणि वांति याचा नाश करितो. (१८.) पिंपळमूळ, इंद्रजव, देवदार, गुग्गूळ, वावडिंग, भारंगमूळ, माका, चित्रक, कायफळ, पुष्करमूळ, रास्ना, हरीतकी, रिंगणी, डोरली, ओंवा, निर्गुडी, किराईत, वेखंड, चवक व पहाडमूळ यांचा काढा, सर्व सन्निपात बुद्धिभ्रंश, घाम, शैत्य, बडबड, पोटफुगी, विद्रधि, कफवात, वातरोग व सूतिकारोग यांचा नाश करितो.

---

## पूर्वार्ध समाप्त.

श्रीशंकर.

# सुबोधवैद्यक.

## उत्तरार्ध.

[library stamp]

'आर्यभिषक्' मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झालेलें.

उपचारेण शमनं अपचारेण कोपनम् ।
एवं विज्ञाय सद्वैद्यः कुर्यात् संशमनक्रियाम् ॥

हारीतसंहितायां भगवानात्रेयः ।

शंकर दाजी शास्त्री पदे,
चिकित्सक, आर्यभिषक्कर्ते.

मुंबई,
'निर्णयसागर' छापखान्यांत छापविलें.

( सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

सन १८९२.—शके १८१३.

किंमत १ रुपया.

श्रीशंकर.

# ग्रंथोद्देश.

होतां होईल तों बहुतेक रोगांचीं कारणें, निदानें, लक्षणें व त्यांवर उपचार यांची माहिती, सुलभ व स्पष्ट रीतीनें सर्वांस व्हावी या उद्देशानें हें पुस्तक केलें आहे. आमचे मित्र रा. मुरलीधर एकनाथ केमकर वैद्य, यांनीं या पुस्तकाची जुळणी करतांना, बहुतेक चिकित्सा व निदान-ग्रंथ पाहूनच व्यवस्था केली होती; व आमच्या हेतूप्रमाणें त्यांत पुष्कळांशीं साधतां येतील तितक्या सुधारणा करून, हें पुस्तक, पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा विभागांनीं लोकांच्या पुढें मांडलें आहे. परंतु आमची इच्छा सर्वस्वी पुरी करण्याकरितां व लोकहितकारक पुस्तकें बाहेर पाडण्याकरितां लोकांचा जसा आश्रय मिळाला पाहिजे, तसा तो देणें हें लोकसमूहावर अवलंबून असल्यामुळें, येथें विशेष न लिहितां, कृति तर लोकांसमोर ठेवलीच आहे; आतां आश्रयाची वाट पहात बसतों.

# सुबोधवैद्यक-उत्तरार्ध-अनुक्रमणिका.


| रोगाचें नांव. | पृष्ठ. |
|---|---|
| तृष्णारोग Disease of Thirst | १ |
| दाहरोग Inflammation ... | १ |
| देवी Small Pax ... ... | २ |
| नारू Guinea worm ... | ३ |
| नासारोग Diseases of Nose | ४ |
| नेत्ररोग Diseases of Eyes | ६ |
| पांडुरोग Scrofula ... ... | १२ |
| प्रमेह (परमा) Gonarrhaa ... | १५ |
| बालरोग Diseases of children ... ... ... | १६ |
| भगंदर Fistula ... ... | २२ |
| भस्मकरोग Anemia ... ... | २३ |
| मुखरोग Diseases of Face | २३ |
| मूर्च्छारोग Fainting ... | २५ |
| मूत्रकृच्छ्र Urithrites ... | २६ |
| मूत्राघात Retention of Urine ... ... ... | २७ |
| मुतखडा Urinary calsuli | २८ |
| मूत्ररेचनाची आवश्यकता व औषधें Necesserity of Dentric Medicines ... | २९ |
| मेदोरोग Obesity ... ... | ३० |
| रक्तपित्त ... ... ... ... | ३० |
| रेचनाची आवश्यकता व औषधें Necessity of Pargetn Medicine ... ... | ३१ |
| वमनाची आवश्यकता व औषधें... | ३२ |
| व्रणरोग Uleers ... ... | ३२ |
| वातरक्त (रक्तपिती) Liprosy | ३७ |
| वातरोग Rhmmahe disease... ... ... ... | ३८ |
| वांतिरोग Vomitting ... | ४६ |
| विद्रधि (गळू) Abscess ... | ४६ |
| विषरोग Disease of poisons | ४७ |
| विषूचिका. (महामारी, पटकी.) Cholera ... ... ... | ५९ |
| विसर्प Erysipilas ... ... | ६० |
| विस्फोट. (फोड) Sruption | ६१ |
| शिरोरोग Diseases of Brain | ६२ |
| शीत.. त ... ... ... ... | ६६ |
| शूलरोग Belly-ache ... | ६६ |
| शोथरोग Swelling disease | ६८ |
| शोषरोग ... ... ... ... | ६९ |
| श्वास. (दमा,) Asthama ... | ६९ |
| श्लीपद. (हात किंवा पाय मोठा होणें.) Elephentixs ... | ७१ |
| संग्रहणी Dysentery ... | ७२ |
| स्वरभेद Aphonia ... ... | ७४ |
| स्त्रीरोग. Diseases of Women ... ... ... | ७४ |
| हृद्रोग Heart Diseases ... | ८८ |
| क्षयरोग Consumption ... | ८९ |
| क्षुद्ररोग Common disease | ९२ |
| वाजीकरण व धातुपुष्ट औषधें Aphrodisiacs Medicine ... ... ... | ९७ |
| चूर्णे Powders ... ... | १०० |
| गुटिका Pills ... ... ... | १०४ |
| पाक Confections... ... | १०६ |

उपयुक्त माहितीविषयीं सुप्रसिद्ध मासिकपुस्तक.

सन १८८९ च्या जुलैपासून अगदीं नियमित पहिल्या तारखेस निघत असतें.

# आर्यभिषक्.

**वैद्यकसंबंधी हरएक प्रकारची माहिती ओतप्रोत असते.**

**गुणाविषयीं**

नामांकित डाक्टर, वैद्य, वर्तमानपत्रकार, मासिकपुस्तककार व इतर सद्गृहस्थ अशा सर्वांचे फारच उत्तम अभिप्राय आले आहेत व येत आहेत. वर्षाची वर्गणी फक्त २८६ व लायब्ररीस तर अवघी १॥ रुपये.

**असें असून,**

याच्या वर्गणीदारांस निराळा टपालखर्च न पडतां 'राजवैद्य' मासिकपत्र,

# दरमहा फुकट मिळतें.

पुस्तकाचा नमुना पहा; ह्मणजे खात्री होऊन साहजिक वाटेल,

**कीं, हें प्रत्येकाजवळ असलेंच पाहिजे!**

फुटकळ अंकास ६ आणे; टपालखर्च अर्धा आणा. आजपर्यंतचे सर्व अंक विक्रीस तयार आहेत. शिवाय आमच्याकडचीं पुस्तकें व औषधें वगैरेसंबंधी माहिती पाहिजे असेल तर अर्ध्या आण्याचें टिकीट पाठवा.

मुंबई, नवा नागपाडा, नं० १६०–१६१ 'आर्यभिषक्' कचेरी. } **शंकर दाजी शास्त्री पदे,** चिकित्सक, आर्यभिषक्कर्ते.

**वरील ठिकाणींच खालील पुस्तकें विकत मिळतील.**

| पुस्तकाचें नांव. | किंमत. | ट.ख. | पुस्तकाचें नांव. | किंमत. | ट.ख. |
|---|---|---|---|---|---|
| औषधी–बाड, कापडी पुठ्याचें. | २॥ | ८= | गोवैद्यक.... ... ... | ८= | ८॥ |
| ,, कागदी पुठ्याचें. | २ | ८= | प्राणिज औषधी ... ... | ८≡ | ८॥ |
| वनौषधी–गुणादर्श, भाग १ ला. | ०॥। | ८– | अश्वरोगपरिज्ञान ... ... | ८॥। | ८॥ |
| ,, भाग २ रा. | १ | ८– | अर्शोघ्नसुधाकर ... ... | ०।= | ८– |
| सुबोधवैद्यक, पूर्वार्ध... ... | ०॥ | ८– | समासादर्श... ... ... | ०।= | ८– |
| ,, उत्तरार्ध. ... | १ | ८– | सुंदराबाई-चरित्र ... ... | ०।= | ८– |

श्रीशंकर.

# सुबोधवैद्यक.

## उत्तरार्ध.

### १. तृष्णारोग. ( तहान. )

**कारण**—भय, श्रम, बल, हानि, यांहीं करून व तिखट आंबट पदार्थांच्या योगानें, किंवा क्रोधोपवासादिकेंकरून वायूसहवर्तमान जें पित्त, तें कुपित होऊन तालुस्थानाप्रत जाऊन तृषेला उत्पन्न करितें. **तृष्णेचें स्वरूप**—मनुष्याला सर्वकाळ पाणी प्यावयाची इच्छा होते, आणि पाणी प्यालें असतांही तहान रहात नाहीं, पुनः इच्छा होते; तिला तहान ह्मणतात. **उपचार**—( १ ) आंवळकाठी, कमळ, कोष्ट, साळीच्या लाह्या, वडाच्या कोंवळ्या पारंब्याच्या ड्याच्या, यांचें चूर्ण करून त्यांत मध मिळवून गोळी करून तोंडांत धरली असतां, तहान फार लागते ती व तोंडास कोरड फार पडते ती हीं दोन्ही दूर होतात. ( २ ) श्रीखंड—पूर्वदिवशीं विरजलेलें सुंदर चक्कादहीं २ शेर, पांढरी शुभ्र खडीसाखर १ शेर, तूप ४ तोळे, मध४तोळे, मिरें २ तोळे, सुंठ २ तोळे, वेलचीदाणे २तोळे, इतके पदार्थ बारीक अशा स्वच्छ फडक्यांत घालून कापराच्या चूर्णानें सुगंधित अशा पात्रामध्यें चांगलें मर्दन करून तयार करावें; याला श्रीखंड ह्मणतात. हें सेवन केलें असतां तृषा दूर होते. ( ३ ) सोनें, रुपें, लोखंड तापवून पाण्यांत विझवून तें पाणी द्यावें. ( ४ ) पाण्यांत साखर अथवा मध घालून द्यावें. ( ५ ) काळीं द्राक्षें, ज्येष्ठीमध यांचा काढा करून द्यावा. ( ६ ) तांदुळांचें धुवण मध घालून द्यावें. ( ७) थंडपाणी व मध एकत्र करून शेरभर पाजावें. वमन होईल. नंतर तृषा व दाह शमेल. ( ८ ) तूप व दूध एकत्र करून प्यावें. ( ९ ) नाना प्रकारचीं पन्हीं व सरबतें प्यावीं. ( १० ) जव भाजून पीठ करून थंडपाण्यांत-फार पातळ नाहीं व फार दाट नाहीं अशा बेतानें तें कालवून त्यांत तूप मिळवून प्यालें असतां, तहान व दाह, रक्तपित्त हे दूर होतात. **पथ्य**—हरीक, तांबूल, लाह्यांचें पीठ, भाजलेले मूग व हरभरे, केळफूल, कवठ, बोर, चिंच, कोहोळा, मयाळ, कर्टोली, आवळे, ईडानिंबु, करवंद, महाळुंग, गाईचें दूध, कडू व मधुर पदार्थ, चंदनाची उटी. **अपथ्य**—घाम काढणें, अंजन, तैलाभ्यंग, धूम्रपान, व्यायाम, नस्य, ऊन्ह घेणें, दंतकाष्ठ, जडान्न, आम्ल लवण, तुरट, त्रिकटु, अति तीक्ष्ण पदार्थ.

### २. दाहरोग.

**कारण व लक्षण**—अति उष्ण पदार्थांचें सेवन, पित्तकारक पदार्थांचें भक्षण, मर्माभिघात, महा शस्त्रादिकांचा प्रहार, या कारणांनीं हा रोग होतो. शरीर शुष्क व तप्त होणें, नेत्र आरक्त किंवा पीतवर्ण, हीं दाहरोगाचीं लक्षणें जाणावीं. **उपचार**—( १ ) धणे, अ० धणे व बडीशोप अर्धवट कुटून, रात्रीं २४ तोळे पाण्यांत भिजत घालून सकाळीं तें पाणी गाळून घेऊन त्यांत खडीसाखर ४ तोळे टाकून प्यावें. ( २ ) शतधौत घृत अंगास लावावें. ( ३ ) रिठ्याचा फेंस किंवा कडुनिंबाचा पाला वांटून त्याचा फेंस अंगास

चोळावा. ( ४ ) चंदनादि चूर्ण दुधांत द्यावें; ह्मणजे दाह, पित्त व उन्हाळी हे दूर होतात. ( ५ ) साळीच्या लाह्या व खडीसाखर यांचा काढा करून तो वारंवार देत जावा. ( ६ ) खजुराचें सरबत करून प्यावें. ( ७ ) गुळवेलीचें सत्व, जिरे व खडीसाखर यांशीं द्यावें. गोंवर व देवी यांच्या दाहावरही हें द्यावें. ( ८ ) तांदुळाचे धुवणांत रक्तचंदन उगाळून त्यांत थोडी खडीसाखर घालून तें प्यावें. **पथ्य**—तांदूळ, मूग, मसुरा, हरभरे, जव, साखर, तूप, दूध, लोणी, कांकडी, कोहोळा, दाळिंब, पडवळ, मधुर रस. **अपथ्य**—मार्ग चालणें, खारट, पित्तकर असे पदार्थ, ऊन्ह घेणें, ताक, तांबूल, हिंग, मैथून, कडू, तिखट, उष्ण पदार्थ.

## ३. देवी ( सं. मसूरिका. ) व गोंवर.

**कारण**—तिखट, आंबट, खारट, शिळें व आंबलेलें अन्न व विषादिकांनीं दुष्ट झालेलें अन्न, यांच्या सेवनेंकरून वातादि दोष कुपित होऊन दुष्ट झालेलें जें रक्त, त्याशीं मिळून शरीराचे ठायीं मसुरांसारख्या पुळ्या व उडदासारख्या पुळ्या उत्पन्न करितात, त्यांना मसूरिका किंवा देवी ह्मणतात. या रोगाचीं-ज्वर, कंडू, गात्रभंग, भ्रम, त्वचेचे ठायीं सूज, हीं लक्षणें होतात. जशा देवी येतात तसाच गोंवरही येतो. गोंवर हा फक्त मुलासच येतो. देवी मोठ्या मनुष्यासही येतात. देवीच्या रोगाविषयीं स्वच्छता ठेवावी. **उपचार**—( १ ) कडू पडवळ, कडुनिंब, कुटकी, नागरमोथे, अडुळसा यांचा काढा द्यावा; ह्मणजे अपक्क देवी असल्या तरी पक्क होऊन त्यांचें शोधन होतें. (२) बोरीच्या पाल्याचा रस ह्मशीचे दुधांतून द्यावा. ( ३ ) गोरोचन अ. ह्मशीचें तूप ३ दिवस ह्मशीचे दुधांतून शक्तीप्रमाणें द्यावें. अ. गाढवीचें दूध पाजावें; ह्मणजे देवी चांगल्या उठतात. ( ४ ) राळ, हिंग, लसूण यांची धुरी द्यावी; ह्मणजे क्षतांत किडे पडत नाहींत. ( ५ ) गोंवराचा व देवीचा मुलांच्या अंगांत दाह वसतो तो निघण्यास गुलकंद द्यावा; सराट्याचें चूर्ण तूपसाखरेशीं द्यावें; गाईच्या निरशा दुधांत तूप व खडीसाखर घालून तें द्यावें; गाईच्या लोण्यांत जिऱ्याचें चूर्ण व खडीसाखर घालून तें द्यावें. ( ६ ) गारांचें पाणी अथवा पोईसराच्या पानावरील पाणी द्यावें. ( ७ ) देवीमध्यें फोड फुटून दाह होतो त्यास गोंवऱ्यांची राख, वाटाणे व रक्तरोड यांचें चूर्ण लावावें; ह्मणजे सुकतात. ( ८ ) कडूपडवळ, गुळवेल, नागरमोथे, अडुळसा, धमासा, किराईत, कडुनिंब, कुटकी व पित्तपापडा यांचा काढा द्यावा. हा आममसूरिकेला शमवितो व पाक झाला असतां त्याचें शोधन करितो. व हा काढा दाह, ज्वर, विसर्प, व्रण व पित्तव्रण यांवर द्यावा. देवीचा ज्वर शांत करण्याविषयीं याहून दुसरें औषध नाहीं. ( ९ ) नेत्रांमध्यें देवी आल्या असतां कसईचें बीं व ज्येष्ठमध यांच्या काढ्यानें नेत्र धुवावे. ( १० ) कडुनिंबाच्या पाल्याच्या काढ्यानें देवीचे व्रण धुवावे. ( ११ ) वड, उंबर, पिंपळ, पिंपरी व नांदरुखी यांचें चूर्ण, वाहणाऱ्या देवींवर उधळावें, किंवा गोंवऱ्यांची राख अथवा गोंवऱ्यांचें चूर्ण उधळावें. ( १२ ) चाकवताचा अ० ब्राह्मीचा रस मधाशीं द्यावा. ( १३ ) देवीनें डोळ्यांत फुलें पडल्यास-मोगली एरंडाचे चिकांत पांढरी गुंज उगाळून अंजन करीत जावें. ( १४ ) चिंचोक्याचें व हळदीचें समभाग चूर्ण थंडपाण्याशीं, किंवा अडुळशाचा रस व ज्येष्ठीमध, अ० चमेलीचा रस व ज्येष्ठीमध यांतून एक औषध-देवीची सांत गांवांत येतांच-आरंभीं तीन किंवा ७ दिवस प्राशन करावें; ह्मणजे त्याला देवी कधींही येणार नाहींत. **पथ्य**-तांदूळ, चणे, मूग, मसुरा, जव,

पडवळ, कारलें, केळें, शेवगा, डाळिंब, धातुवर्धक अन्नपान, ऊंस, तूप. **अपथ्य**--ऊन्ह, तिखट, आंबट, श्रम, वारा घेणें.

## ४. नारू. ( सं०स्नायुक )

**नारूच्या उत्पत्तीचें कारण**—ज्यांत फार जिवंत पाणी नसतें, ज्यांचा प्रवाह नाहीं व ज्यांत कपडे वगैरे धुतले जातात, असे जे लहान तलाव अथवा विहिरी, त्यांचें पाणी व नासलेलें पाणी पिण्यापासून अथवा तें वापरल्यापासून शरीरांत नारू उत्पन्न होतात. नारूच्या योगानें सूज उत्पन्न होते, ती फुटते व त्यांतून सुतासारखा वाटोळा व पांढरा असा जीव उत्पन्न होतो, तो त्या क्षतापासून हळूहळू बाहेर निघतो व तो तुटला असतां जास्त कोप पावतो, पुनः स्थानांतरीं उत्पन्न होतो व तो बाहेर निघाला असतां सुजेची शांति होते. या रोगाला स्नायुक ( नारू ) ह्मणतात. नारू, हाताच्या किंवा पायाच्या धक्यानें दुखावला किंवा तुटला असतां अंग आंखडतो, किंवा वांकडें करितो. नारू शरीरांत उत्पन्न व्हावयाचा असला ह्मणजे आधीं कोणा कोणाच्या अंगावर पित्तासारखा लाल गांधी उत्पन्न होतो, व तेणेंकरून देहाची फार आग होते. **स्नायूकरूप**—वाताधिक नारू काळा व रूक्ष असतो; त्यांत ठणका लागतो; पित्तानें नील व पीतवर्ण असून दाहयुक्त असतो; कफानें जाड, मोठा, जड असा असतो. द्वंद्वापासून उत्पन्न होतो तो दोन दोषांच्या लक्षणांनीं युक्त असतो; रक्तानें होतो तो आरक्तवर्ण असतो, त्यांत दाह फार होतो, आणि त्रिदोषापासून होतो तो तीन दोषांच्या लक्षणांनीं युक्त असतो. नारूवर विसर्पावरचे उपचार करावे. **उपचार**– ( १ ) वातज नारूवर फणी निगडुंगाचें मूळ गोमूत्रांत वांटून लेप करावा. ( २ ) पित्तज नारूवर वड, उंबर, पिंपळ, नांदरुख व वेतस यांच्या सालीच्या कल्कानें लेप करावा. ( ३ ) कफज नारूवर कांचनाच्या सालीच्या कल्कानें लेप करावा. ( ४ ) द्वंद्वज नारूवर पूर्वी सांगितलेल्या दोन औषधांनीं लेप करावा व त्रिदोषजावर त्या सर्व औषधांचा लेप करावा. ( ५ ) रक्तज नारूवर वड व चिंच यांच्या सालीचा लेप करावा. ( ६ ) कोष्ठ, हिंग, सुंठ, शेवगा, याचें चूर्ण वांटून प्यावें व यांचाच लेपही करावा. ( ७ ) शेवग्याचें बीं व मूळ वांटून, सैंधव कांजीसहित एकत्र खलून लेप करावा; अथवा लसूण, चित्रक, मोहच्या यांचा लेप करावा. तेणेंकरून स्नायुकपिंडिका ह्मणजे पोटऱ्यांचे गोळे इत्यादिक शांत होतात. ( ८ ) बाभळीचें बीं गोमूत्रांत वाटून त्याचा लेप करावा. ( ९ ) चुना व बिडलोण पाण्यांत कालवून त्याचा लेप करावा. ( १० ) तानीचें ( वासनवेलीचें ) मूळ पाण्यांत वांटून प्यावें. ( ११ ) ताकाशीं किंवा तेलाशीं आस्कंधाचा, किंवा पांढऱ्या गोकर्णीचा किंवा शेवग्याचे मूळांचा लेप करावा. ( १२ ) पुरुषाच्या मूत्रांत हळद वांटून लेप करावा. ( १३ ) डोरलीचें मूळ पुरुषाच्या मुताशीं किंवा अश्वत्थपत्रांशीं वांटून ऊन्ह करून त्याचा पेंड बांधावा. ( १४ ) गुळवेलीच्या रसांत टाकणखार प्यावा. ( १५ ) तागाचें बीं व गव्हाचें पीठ एकत्र करून तुपांत तळून गुळा- [illegible] र खावें. ( १६ ) निर्गुंडीचे पाल्याचा रस २ तोळे, त्यांत गाईचें तूप २ [illegible] द्यावा. या प्रमाणें ७ दिवस करावें. ( १७ ) हिंग, टाकणखार हे प्रत्येक ३ [illegible] र्ण करून सात रोज सांजसकाळ द्यावें; ह्मणजे निश्चयानें नारूचा नाश होतो. [illegible] मूळ थंडपाण्यांत वाटून प्यावें किंवा कस्तुरी तुपांत टाकून प्यावी; ह्मणजे मोठा [illegible] रू शांत होतो. ( १९ ) अतिविष, नागरमोथा, पिंपळी, भारंगमूळ, बेहेडे

यांचें चूर्ण गरमपाण्याशीं प्राशनार्थ द्यावें. ( २० ) पारव्याची विष्ठा मधांत कालवून गोळी करून गिळून जावी. ती मोठ्या वाढलेल्या नारूचा नाश करिते. ( २१ ) वांगें भाजून दह्याशीं भरित करून नारूवर सात दिवस बांधावें. ( २२ ) धोत्र्याचे पाल्याचा रस २ तोळे व तूप २ तोळे एकत्र करून द्यावें, अंमल येईल, त्यास दुसरे दिवशीं उतारा दहींभात द्यावा. ( २३ ) रुईच्या अ० शेराच्या चिकाचा लेप करावा. ( २४ ) धोत्र्याचीं पानें २॥ विड्यांत भक्षावयास द्यावीं (२५) पापडखाराचें चूर्ण ३ मासे अतपाव दह्यांत घालून द्यावें, या प्रमाणें दिवसांतून तीन चार वेळ द्यावें. दिवसास भोजन वर्ज्य. रात्रौ भोजन करावें. या प्रमाणें एक दिवस द्यावें. ( २६ ) एक नारळ पोखरून, छिद्रांतून त्यांत नवसागराची पूड तीन माशांपासून ६ मासे पर्यंत भरावी व छिद्र बंद करून ठेवावें. दुसरे दिवशीं प्रातःकालीं त्यांतील सर्व पाणी प्यावें व खोबरें खावें. संध्याकाळपर्यंत पाणी न पितां उपोषित राहावें. सूर्यास्तानंतर आंगास शेण लावून ऊन्ह पाण्यानें स्नान करावें. नंतर दहींभात खावा. ह्मणजे अंगांतील सर्व नारू मरून जातात. (२७) नारूच्या फोडावर कळलावीचा कांदा उगाळून त्याचा वारीक ठिपका द्यावा; ह्मणजे फोड फुटतो. नंतर त्याच्या छिद्रावर काडीनें वरील औषधाचा एक ठिपका द्यावा. ( २८ ) कोंबड्याची विष्टा, पारव्याची विष्ठा व हिंग, हीं तिन्हीं समभाग घेऊन वडी करून ती नारूवर वसवावी. (२९) विड्यांतून अ० गुळांतून कातणीचें घर अगर सर्पाची कात १।२।३ दिवस खावी. ( ३० ) कुचल्याची बी अ० कुचल्याची बी व सोमल यांचा तीन दिवस लेप द्यावा. (३१) शेवग्याची साल कुटून बांधावी. (३२) तागाचें बीं वांटून ऊन्ह करून सोसवेल तितकें ऊन्ह ऊन्ह नारूवर बांधावें. (३३) सावण व कांद्याच्या पाकळ्या तुपांत तळून नारूवर बांधाव्या. (३४) हिंगणीची मुळी व हिंग हीं वांटून त्यांची ३ दिवस पिंडी बांधावी. ( ३५ ) नारू फुटल्यावर रिठा व पांढरा काथ हीं समभाग पाण्यांत उगाळून त्याचा लेप, विड्याचे चार पांच पानांस देऊन तीं पानें एकावर एक अशीं नारूवर बसवून बांधावीं, व तीन दिवस सोडूं नये; ह्मणजे नारू मरून जातो. ( ३६ ) लसूण, चित्रक व मोहऱ्या हीं पाण्यांत वांटून त्याची वडी नारूवर बांधावी. ( ३७ ) नवसागराची पूड अर्धतोळा तूपभाताशीं खावी. ( ३८ ) ६ गुंजा हिंग विस्तवावर भाजून, या प्रमाणें दिवसांतून तीन वेळां द्यावा. ( ३९ ) ३ मासे फटकीची लाही गुळांत कालवून ३ दिवस द्यावी; ह्मणजे अंगांतील सर्व नारू जळून जातात व पुनः जन्मभर नारू होण्याची भीति राहत नाहीं. ( ४० ) नारू फुटला ह्मणजे त्यावर रामेठ्याचा ओला पाला वांटून बांधावा; ह्मणजे नारू चार प्रहरांत मरून बाहेर येतो.

## ५. नासारोग.

**कारण**—धुकें, वायु, अतिभाषण, अतिनिद्रा, अतिजागरण, निर्वातिक व उंच असें उपधान, जलप्राशन, भलतेच दुष्ट उदकाचें प्राशन, जलक्रीडा, वांति व रडणें यांचा निग्रह, यांणीं वातप्रधान दोषांचा कोप होऊन, ते नासारोगाला उत्पन्न करितात. हे नासिका रोग ३४ प्रकारचे आहेत. **पूतिनास**—गळा व टाळा यांमध्यें र २ दिव[illegible] वायु मिश्रित होऊन, नाक व तोंड यांच्या मार्गानें दुर्गंधयुक्त श्लेष्म घालून तो हळदीचें सम- पूतिनास ह्मणतात. **नासापाक**—नासिकाश्रित पित्त दुष्ट होऊन [illegible] घेऊन चूर्ण व ज्येष्ठीमध आणि नाक आंतून पिकतें, व पुवानें ओलें असतें, गंधयुक्त ल[illegible] १८ ) पिंपळी दिवस प्राशन ह्मणतात. **पूयरक्त**—मस्तकांत वातादि दोष आपापल्या कारणांनें कु[illegible] ना[illegible] मसुरा, जव,

शरीराची त्वचा पांडुवर्ण होते, या रोगास पांडुरोग असें ह्मणतात. वात, पित्त, कफ, सन्निपात व मृत्तिकाभक्षणजन्य असा पांच प्रकारचा पांडुरोग आहे. **पूर्वरूप**—त्वचा फुटणें, तोंडाला थुंका, अंग गळणें, मृत्तिकाभक्षण, नेत्र व गालांना सूज; मळ, मूत्र यांना पिंवळटपणा; अन्नाचा पाक न होणें हीं लक्षणें पांडुरोग होण्याचे पूर्वी मनुष्याला होतात. **वातपांडु**—त्वचा, मूत्र, डोळे इत्यादिकांस रूक्षता, काळेपणा, तांबडेपणा असतो व कंप, सुया टोंचल्यासारखी पीडा, पोट फुगणें, भ्रम इत्यादि होतात. **पित्तपांडु**—मूत्र, विष्ठा व डोळे हीं पिंवळीं होतात; दाह, तहान, ज्वर, यांनीं तो पीडित असतो; मळ पातळ होतो व शरीरकांति अत्यंत पिंवळी होते. **कफपांडु**—मुखावाटे कफाचा स्राव, सूज, झांपड, आळस, शरीराला भार, त्वचा, डोळे व तोंड यांना श्वेतत्व हीं होतात. **सन्निपातपांडु**—वर सांगितलेल्या तीन लक्षणांनीं युक्त असतो. **मृत्तिकाभक्षणजन्यपांडु**—माती खाण्याची ज्याला संवय लागली आहे, त्याच्या वातादिकांपैकीं एकादा दोष कुपित होतो; माती तुरट रसाची असली तर वायु कुपित होतो; खारी असली तर पित्त कोपतें; गोड असली तर कफ कुपित होतो; ती माती पोटांत गेल्यावर रसादिक धातूंना रूक्ष करिते, व रौक्ष्य गुण प्रबल झाला ह्मणजे जें अन्न खावें तें रूक्ष होऊन जातें; ती माती कोष्ठादिकांच्या अग्नींनीं पाक झाल्यावांचून रस वाहणाऱ्या स्रोतसां( मार्गां )मध्यें शिरते, व त्यांचा रोध करिते, तेणेंकरून इंद्रियांचें बळ ह्मणजे स्वविषयग्रहणशक्ति नष्ट होते; शरीराची दीप्ति, शक्ति व ओज ह्मणजे सर्व धातूंचें सार ( हृदयांत असतें तें ) क्षीण होऊन पांडुरोग उत्पन्न होतो; त्यामध्यें बल, वर्ण, अग्नि यांचा नाश होतो. विशेष लक्षण—नेत्रगोल, गाल, भृकुटि, पाय, नाभि, शिश्न यांना सूज; कोठ्यांत कृमि व रक्तकफमिश्रित ढाळ हीं लक्षणें होतात. या प्रकारास कोणी "कृमिपांडु" असेंही नांव देतात. **असाध्य लक्षणें**—फार दिवसांचा पांडुरोग, काल बहुत लोटल्यामुळें जरठ झाला ह्मणजे साध्य होत नाहीं; सर्व शरीराला सूज आली असून जो रोगी सर्व पदार्थ पिंवळे पहातो तो रोगी असाध्य जाणावा; ज्या मनुष्याला बांधलेला थोडा मळ हिरव्या रंगाचा कफमिश्रित पडतो तो असाध्य आणावा; जो पुरुष दीन ह्मणजे ग्लान होतो व पांढरा फटफटीत पडतो, व ओकारी, मूर्च्छा, तृषा यांनीं पिडतो तो असाध्य जाणावा; रक्तक्षयापासून जो पांडुरोगी पांढरा होतो तो असाध्य जाणावा; ज्याचे दांत, नखें, डोळे पिंवळे झाले आहेत तो असाध्य जाणावा; जो पांडुवर्णाचे पदार्थसमुदाय पहातो तो असाध्य जाणावा; हात, पाय, डोकें यांच्या ठिकाणीं सूज, मध्यदेह ज्याचा शुष्क झाला आहे तो असाध्य; याच्या उलट साध्य जाणावा; मध्यदेहाला सूज, हात, पाय, डोकें हीं शुष्क झालेलीं, गुद व शिश्न यांचे ठायीं सूज, मृतप्राय झालेला, तसाच अतिसार व ज्वर यांनीं पीडलेला रोगी वैद्यानें सोडावा. **पांडुरोगांत कामला** ( कावीळ ) होते—जो पांडुरोगी अत्यंत पित्तल द्रव्यें सेवन करितो, त्याचें पित्त, रक्तमांसाला जाळून दुष्ट करून कामलारूप रोग करण्यास समर्थ होतें. त्याचे डोळे अत्यंत पिंवळे होतात; त्वचा, नखें, तोंड हीं पिंवळीं होतात; मूत्र, पुरीष, लाल व पिंवळीं होतात; तो पुरुष पावसाळ्यांतल्या बेडकासारखा पिंवळा होतो; इंद्रियांची शक्ति नष्ट होते; दाह, अन्न न पचणें, दुर्बलता, अंगग्लानि, अन्नद्वेष यांनीं तो रोगी पीडित होतो; जीमध्यें पित्तप्रबल अशी ही कामला एक कोष्ठाश्रय, आणि दुसरी शाखा( रक्तादि धातु )श्रित असते. जसा राजयक्ष्मा

यांचें चूर्ण गरमपाण्याशीं प्राशनार्थ द्यावें. ( २० ) पारव्याची विष्ठा मधांत कालवून गोळी करून गिळून जावी. ती मोठ्या वाढलेल्या नारूचा नाश करिते. ( २१ ) वांगें भाजून दह्याशीं भरित करून नारूवर सात दिवस बांधावें. ( २२ )घोटयाचे पाल्याचा रस २ तोळे व तूप २ तोळे एकत्र करून द्यावें, अंमल येईल, त्यास दुसरे दिवशीं उतारा दहींभात द्यावा. ( २३ ) रुईच्या अ०शेराच्या चिकाचा लेप करावा. ( २४ ) घोटयाचीं पानें २॥ विड्यांत भक्षावयास द्यावीं (२५) पापडखाराचें चूर्ण ३ मासे अतपाव दह्यांत घालून द्यावें, या प्रमाणें दिवसांतून तीन चार वेळ द्यावें. दिवसास भोजन वर्ज्य. रात्रौ भोजन करावें. या प्रमाणें एक दिवस द्यावें. ( २६ ) एक नारळ पोखरून, छिद्रांतून त्यांत नवसागराची पूड तीन माशांपासून ६ मासे पर्यंत भरावी व छिद्र बंद करून ठेवावें. दुसरे दिवशीं प्रात:कालीं त्यांतील सर्व पाणी प्यावें व खोबरें खावें. संध्याकाळपर्यंत पाणी न पितां उपोषित राहावें. सूर्यास्तानंतर आंगास शेण लावून ऊन्ह पाण्यानें स्नान करावें. नंतर दहींभात खावा. ह्मणजे अंगांतील सर्व नारू मरून जातात. (२७) नारूच्या फोडावर कळलावीचा कांदा उगाळून त्याचा बारीक ठिपका द्यावा; ह्मणजे फोड फुटतो. नंतर त्याच्या छिद्रावर काडीनें वरील औषधाचा एक ठिपका द्यावा. ( २८ ) कोंबड्याची विष्टा, पारव्याची विष्टा व हिंग, हीं तिन्ही समभाग घेऊन वडी करून ती नारूवर बसवावी. (२९) विड्यांतून अ०गुळांतून कातणीचें घर अगर सर्पाची कात १।२।३ दिवस खावी. ( ३० ) कुचल्याची बी अ०कुचल्याची बी व सोमल यांचा तीन दिवस लेप द्यावा. (३१)शेवग्याची साल कुटून बांधावी. (३२)तागाचें बीं वांटून ऊन्ह करून सोसवेल तितकें ऊन्ह ऊन्ह नारूवर बांधावें.(३३)सावण व कांद्याच्या पाकळ्या तुपांत तळून नारूवर बांधाव्या. (३४) हिंगणीची मुळी व हिंग हीं वांटून त्यांची ३ दिवस पिंडी बांधावी. ( ३५ ) नारू फुटल्यावर रिठा व पांढरा काथ हीं समभाग पाण्यांत उगाळून त्याचा लेप, विड्याचे चार पांच पानांस देऊन तीं पानें एकावर एक अशीं नारूवर बसवून बांधावीं, व तीन दिवस सोडूं नये; ह्मणजे नारू मरून जातो. ( ३६ ) लसूण, चित्रक व मोहऱ्या हीं पाण्यांत वांटून त्याची वडी नारूवर बांधावी. ( ३७ ) नवसागराची पूड अर्धतोळा तूपभाताशीं खावी. ( ३८ ) ६ गुंजा हिंग विस्तवावर भाजून, या प्रमाणें दिवसांतून तीन वेळां द्यावा. ( ३९ ) ३ मासे फटकीची लाही गुळांत कालवून ३ दिवस द्यावी; ह्मणजे अंगांतील सर्व नारू जळून जातात व पुन: जन्मभर नारू होण्याची भीति राहत नाहीं. ( ४० ) नारू फुटला ह्मणजे त्यावर रामेठ्याचा ओला पाला वांटून बांधावा; ह्मणजे नारू चार प्रहरांत मरून बाहेर येतो.

## ५. नासारोग.

**कारण**—धुकें, वायु, अतिभाषण, अतिनिद्रा, अतिजागरण, निर्वातिक व उंच असें उपधान, जलप्राशन, भलतेच दुष्ट उदकाचें प्राशन, जलक्रीडा, वांति व रडणें यांचा निग्रह, यांणीं वातप्रधान दोषांचा कोप होऊन, ते नासारोगाला उत्पन्न करितात. हे नासिका रोग ३४ प्रकारचे आहेत. **पूतिनास**—गळा व टाळा यांमध्यें र २ ।दव[illegible]मा[illegible] [illegible]डा-वायु मिश्रित होऊन, नाक व तोंड यांच्या मार्गानें दुर्गंधयुक्त [illegible] घालून तो हळदीचें सम-पूतिनास ह्मणतात. **नासापाक**—नासिकाश्रित पित्त दुष्ट होऊन [illegible] घेऊन चूस व ज्येष्ठीमध आणि नाक आंतून पिकतें, व पुवानें ओलें असतें, गंधयुक्त ल[illegible] १८ ) पिंपळ दिवस प्राशन ह्मणतात. **पूयरक्त**—मस्तकांत वातादि दोष आपापल्या कारणांनें कु[illegible] ना[illegible], मसुरा, जव,

शरीराची त्वचा पांडुवर्ण होते, या रोगास पांडुरोग असें ह्मणतात. वात, पित्त, कफ, सन्निपात व मृत्तिकाभक्षणजन्य असा पांच प्रकारचा पांडुरोग आहे. **पूर्वरूप**—त्वचा फुटणें, तोंडाला थुंका, अंग गळणें, मृत्तिकाभक्षण, नेत्र व गालांना सूज; मळ, मूत्र यांना पिंवळटपणा; अन्नाचा पाक न होणें हीं लक्षणें पांडुरोग होण्याचे पूर्वी मनुष्याला होतात. **वातपांडु**—त्वचा, मूत्र, डोळे इत्यादिकांस रूक्षता, काळेपणा, तांबडेपणा असतो व कंप, सुया टोंचल्यासारखी पीडा, पोट फुगणें, भ्रम इत्यादि होतात. **पित्तपांडु**—मूत्र, विष्ठा व डोळे हीं पिंवळीं होतात; दाह, तहान, ज्वर, यांनीं तो पीडित असतो; मळ पातळ होतो व शरीरकांति अत्यंत पिंवळी होते. **कफपांडु**—मुखावाटे कफाचा स्राव, सूज, झांपड, आळस, शरीराला भार, त्वचा, डोळे व तोंड यांना श्वेतत्व हीं होतात. **सन्निपातपांडु**—वर सांगितलेल्या तीन लक्षणांनीं युक्त असतो. **मृत्तिकाभक्षणजन्यपांडु**—माती खाण्याची ज्याला संवय लागली आहे, त्याच्या वातादिकांपैकीं एकादा दोष कुपित होतो; माती तुरट रसाची असली तर वायु कुपित होतो; खारी असली तर पित्त कोपतें; गोड असली तर कफ कुपित होतो; ती माती पोटांत गेल्यावर रसादिक धातूंना रूक्ष करिते, व रौक्ष्य गुण प्रबल झाला ह्मणजे जें अन्न खावें तें रूक्ष होऊन जातें; ती माती कोष्ठादिकांच्या अग्नींनीं पाक झाल्यावांचून रस वाहणाऱ्या स्रोतसां( मार्गां )मध्यें शिरते, व त्यांचा रोध करिते, तेणेंकरून इंद्रियांचें बळ ह्मणजे स्वविषयग्रहणशक्ति नष्ट होते; शरीराची दीप्ति, शक्ति व ओज ह्मणजे सर्व धातूंचें सार (हृदयांत असतें तें) क्षीण होऊन पांडुरोग उत्पन्न होतो; त्यामध्यें बल, वर्ण, अग्नि यांचा नाश होतो. विशेष लक्षण—नेत्रगोल, गाल, भृकुटि, पाय, नाभि, शिश्न यांना सूज; कोठ्यांत कृमि व रक्तकफमिश्रित ढाळ हीं लक्षणें होतात. या प्रकारास कोणी "कृमिपांडु" असेंही नांव देतात. **असाध्य लक्षणें**—फार दिवसांचा पांडुरोग, काल बहुत लोटल्यामुळें जरठ झाला ह्मणजे साध्य होत नाहीं; सर्व शरीराला सूज आली असून जो रोगी सर्व पदार्थ पिंवळे पहातो तो रोगी असाध्य जाणावा; ज्या मनुष्याला बांधलेला थोडा मळ हिरव्या रंगाचा कफमिश्रित पडतो तो असाध्य आणावा; जो पुरुष दीन ह्मणजे ग्लान होतो व पांढरा फटफटीत पडतो, व ओकारी, मूर्च्छा, तृषा यांनीं पिडतो तो असाध्य जाणावा; रक्तक्षयापासून जो पांडुरोगी पांढरा होतो तो असाध्य जाणावा; ज्याचे दांत, नखें, डोळे पिंवळे झाले आहेत तो असाध्य जाणावा; जो पांडुवर्णाचे पदार्थसमुदाय पहातो तो असाध्य जाणावा; हात, पाय, डोकें यांच्या ठिकाणीं सूज, मध्यदेह ज्याचा शुष्क झाला आहे तो असाध्य; याच्या उलट साध्य जाणावा; मध्यदेहाला सूज, हात, पाय, डोकें हीं शुष्क झालेलीं, गुद व शिश्न यांचे ठायीं सूज, मृतप्राय झालेला, तसाच अतिसार व ज्वर यांनीं पीडलेला रोगी वैद्यानें सोडावा. **पांडुरोगांत कामला** (कावीळ) होते—जो पांडुरोगी अत्यंत पित्तल द्रव्यें सेवन करितो, त्याचें पित्त, रक्तमांसाला जाळून दुष्ट करून कामलारूप रोग करण्यास समर्थ होतें. त्याचे डोळे अत्यंत पिंवळे होतात; त्वचा, नखें, तोंड हीं पिंवळीं होतात; मूत्र, पुरीष, लाल व पिंवळीं होतात; तो पुरुष पावसाळ्यांतल्या बेडकासारखा पिंवळा होतो; इंद्रियांची शक्ति नष्ट होते; दाह, अन्न न पचणें, दुर्बलता, अंगग्लानि, अन्नद्वेष यांनीं तो रोगी पीडित होतो; जीमध्यें पित्तप्रबल अशी ही कामला एक कोष्ठाश्रय, आणि दुसरी शाखा( रक्तादि धातु )श्रित असते. जसा राजयक्ष्मा

२

स्वतंत्र होतो तशी ही स्वतंत्र होते. हिचीच दुसरी अवस्था **कुंभकामला**—कालांतरानें जरठ झालेली जी कुंभकामला ती कष्टसाध्य होते. कुंभ ह्मणजे कोष्ठ, तद्गत जी कामला ती कुंभकामला. पांडुरोगांत **हलीमक** रोग होतो—ज्या वेळेस पांडुरोग्याचा वर्ण हिरवा, निळा किंवा पिंवळा होतो, व बल, उत्साह यांचा नाश; झांपड, अग्निमांद्य, बारीक ज्वर, स्त्रीसंभोगाचे इच्छेचा अभाव, अंग मोडून येणें, दाह, तृष्णा, अन्नद्वेष, भ्रम हे उपद्रव होतात, तेव्हां वातपित्तापासून त्याला हलीमक रोग झाला आहे असें समजावें. **उपचार**—(१) लोहपात्रांत तापवून ठेवलेलें दूध सात दिवस प्यावें व पथ्य करावें ह्मणजे पांडुरोग, क्षय व संग्रहणी हे रोग दूर होतात. (२) दशमुळें व सुंठ यांचा काढा घ्यावा ह्मणजे कफयुक्त पांडु, ज्वर, अतिसार, सूज, संग्रहणी, खोकला, अरुचि, कंठरोग, हृद्रोग यांचा नाश होतो. (३) त्रिफला, गुळवेल, अडुळसा, कुटकी, किराईत, कडूनिंब यांचा काढा मध घालून प्यावा ह्मणजे पांडु व कामला यांचा नाश होतो. (४) पुनर्नवा, कडूनिंब, कडुपडवळ, सुंठ, कुटकी, गुळवेल, दारुहळद, हिरडा यांचा काढा—सर्वांगसूज, उदर, पांडु, स्थूलता, तोंडांत नेहमीं खांकरा येणें व कफरोग यांचा नाशक आहे. (५) अडुळसा, गुळवेल, कडुनिंब, किराईत व कुटकी यांचा काढा मध व तूप घालून द्यावा ह्मणजे कामला, पांडु, रक्तपित्त, हलीमक, कफादिक व्याधि यांचा नाश होतो. (६) शिलाजित, मध, वावडिंग, हरीतकी, साखर यांचें समभाग चूर्ण करून तुपांत द्यावें ह्मणजे पंधरा दिवसांत देह बलवान होतो. (७) चित्रकचूर्णाला आवळकाठीच्या काढ्याच्या तीन भावना द्याव्या, नंतर तें गाईच्या तुपांतून रात्रौ घेत जावें. (८) देवदारीच्या पंचांगाचें चूर्ण दुधांतून किंवा पाण्यांतून ४ मासे घेत जावें ह्मणजे एक महिन्यांत पांडुरोगाचा नाश होईल. (९) हरीतकी गोमूत्रांत २१ दि० भिजत घालावी व त्यांतून एकेक भक्षण करावी. (१०) समूळ कांसाळू घेऊन त्याचें चूर्ण करून तें घ्यावें. (११) नागकेशर, ज्येष्ठीमध, पिंपळी व निशोत्तर यांचा काढा करून त्याच्या भावना मातीला द्याव्या; नंतर ती माती खाणारास द्यावी ह्मणजे खाल्लेली माती पडून विकार दूर होतो. (१२) हरीतकीचें चूर्ण मध व तूप यांशीं घ्यावें. (१३) गोखरूचा काढा मध साखर घालून प्यावा. (१४) गुळवेलीचें सत्व तूप व मध यांशीं घ्यावें. (१५) हिंगाष्टकचूर्ण चतुर्गुणित तुपाशीं प्रथम ग्रासाशीं भोजनांत घ्यावें ह्मणजे अग्नि वाढतो. (१६) प्रवाळभस्म दूधसाखरेशीं घ्यावें. (१७) सुंठ, मिरें, पिंपळी, चित्रकमूळ व बाळहरीतकी यांचें चूर्ण करून त्यांत दुप्पट गूळ घालून तीन तीन माशांच्या गोळ्या कराव्या व त्या पाण्याशीं घ्याव्या ह्मणजे पांडुरोग व मुळव्याध यांचा नाश होतो. (१८) वांकेरीचें भातें थंडपाण्यांत अगर दुधांत उगाळून प्रत्यहीं दुक्तप्रमाणें सतत तीन महिने घ्यावें; ह्मणजे पांडु, जीर्णज्वर, नाडीव्रण, भगंदर, गंडमाला, कथली गर्मी वगैरे अनेक रोगांचा नाश होऊन रक्तवृद्धि होते. **पथ्य**—जुने यव, गहूं, भात, मूग, तुरी व मसुरा यांचे यूष; पडवळ, जुना कोहळा, जुनें केळें, गुळवेल, काळा ऊंस, तांदुळजा, पुनर्नवा, वांगें, कांदा, लसूण, पक्क आंबा, तोंडलें, आंवळे, ताक, तूप, तेल, यव व गहूं यांची कांजी; लोणी, हळद, तुरट पदार्थ, केशर. **अपथ्य**—रक्तस्राव, धूमपान, वांति, मलमूत्रादिकांच्या वेगांचें धारण, घाम, मैथुन; शेंगा व पाला यांची भाजी; हिंग, उडीद, पेंड, तांबूल, शिरस, मद्य, आंबट पदार्थ, विरुद्धान्न, जड व विदाहि अशीं अन्नें.

## ८. प्रमेह. ( परमा. )

**कारण**—एके ठिकाणीं निश्चेष्ट बसणें, निद्रा, दधिभक्षण, गांवांतील व पाण्यांतील अनूप मांसाचे रस; व दूध, नवान्न, नवोदक यांचें सेवन; गुळादिकांचे पदार्थ व कफकारक पदार्थ हे प्रमेह होण्यास कारण जाणावे. **सामान्य लक्षण**—मूत्र फार असून गढुळल्यासारखें होतें. मूत्रवर्णभेदेंकरून प्रमेहाचे २० भेद कल्पिले आहेत. व्यवहारांत लघ्वीच्या वेळीं ज्या प्रमेहांत अतिशय आग होते त्यास तिडक्या परमा असें ह्मणतात. लघ्वीच्या वेळीं आग होत नाहीं त्याला थंड्या परमा ह्मणतात. लघ्वीचे आरंभीं तंतु किंवा गोळी पडते व ती काडीनें उचलली तर हात दोन हात लांबीची तार होते त्यास तंतुमेह, तारमेह किंवा लालामेह ह्मणतात. ज्या प्रमेहांत धातु पडते त्यास धातुपरमा ह्मणतात. ज्यांत पू पडतो त्यास पूपरमा असें ह्मणतात. कांहीं तुरट व मधुर असा जो परमा लघ्वीबरोबर पडतो त्यास मधुमेह ह्मणतात. मधुमेही ज्या ठिकाणीं लघ्वी करितो त्या ठिकाणीं मुंग्या जमतात. अलीकडे प्रमेहरोगाचा फारच प्रादुर्भाव झाला आहे. प्रमेह हा पुरुषांनाच होतो. स्त्रियांना प्रतिमासीं रजप्रवृत्ति होते, तेणेंकरून शरीरसंबंधीं सर्व दोष शुद्ध होतात; ह्मणून स्त्रियांस प्रमेह होत नाहीं. **तिडक्या प्रमेहावर**—( १ ) पांढऱ्या गोकर्णीची मुळी थंड पाण्यांत उगाळून द्यावी. ( २ ) गाईचे निरसे दुधांत बिबा उगाळून तें दूध प्यावें. ( ३ ) आंवळीच्या सालीचा रस दोन तोळेपर्यंत काढून त्यांत किंचित् हळद व मध घालून तो घ्यावा. ( ४ ) उंबराचा द्रव दरवेळेस दोन तोळे घेऊन त्यांत किंचित् जिऱ्याचें चूर्ण व खडीसाखर १ तोळा घालून तो दुवक्त घ्यावा. **मधुमेहावर**—( १ ) जांभळीची साल नित्य २ तोळेपर्यंत खावी किंवा पक्व जांभळें अ० जांभळाची पूड खावी. ( २ ) कुड्याचे मुळावरची साल, असाण्याची साल, नागरमोथे, त्रिफळा यांचा काढा द्यावा. **बहुमूत्रावर**—( १ ) त्रिफला, वेळूचीं पानें, नागरमोथा, पहाडमूळ, यांचा काढा मध घालून प्यावा ह्मणजे तो त्वरित बहुमूत्राचा शोष करील. ( २ ) आल्याचा रस, खडीसाखर घालून दुवक्त घेत जावा. ( ३ ) कळकीच्या वाळलेल्या पाल्याचा काढा दुवक्त घेत जावा. **सर्व प्रमेहांवर उपचार**—( १ ) गुळवेलीचा अंगरस मधांत द्यावा. ( २ ) हिरडा, बेहडा, आवळकाठी, देवदार, दारुहळद, नागरमोथे यांचा काढा मध घालून द्यावा. ( ३ ) पळसाचे फुलांचा काढा साखर घालून द्यावा. ( ४ ) वडाचे अंकुरांचा काढा मध घालून द्यावा. ( ५ ) वावडिंग, हळद, ज्येष्ठीमध, सुंठ, गोखरूं यांचा काढा मधाशीं द्यावा. तो दुस्तर प्रमेहाचा नाश करील. ( ६ ) भुयआवळी, दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, कंकोळ, २० मिरें हीं एकत्र वाटून खावीं, म्हणजे असाध्यही प्रमेहाचा नाश होईल. ( ७ ) निर्मळीचें बीं एक तोळा ताकांत वाटून प्यावें. ( ८ ) बकाणनिंबाचीं फळें तांदुळाचे धुणांत वाटून तूप घालून खावीं ह्मणजे त्वरित प्रमेहाचा नाश होईल. ( ९ ) बाभळीचा अ० शमीचा कोंवळा पाला, थोडीं जिरें घालून बारीक वाटून, गाईचे निरसे दुधांत कालवून त्यांत १ तोळा खडीसाखर घालून प्रत्यहीं दोन वेळ घ्यावा. ( १० ) कबाबचिनी १ तोळा घेऊन काढा करून त्यांत चंदनी तेलाचे चार थेंब टाकून तो घ्यावा. ( ११ ) वंशलोचन १ तोळा, व वेलदोड्यांतील दाणे १ तोळा, कंकोळ १ तोळा, पांढरा कात १ तोळा, मायफळ १ तोळा घेऊन चूर्ण करून तें चूर्ण भिजेइतकें त्यांत

तें द्यावें. **टाळू पडते त्यावर** ( तानेवर )—( १ ) हरीतकी, वेखंड, कोष्ठ, यांचा कल्क करून त्यांत मध घालून तो अंगावरच्या दुधाशीं पाजावा. ( २ ) सांबरशिंग गाईचे दुधांत किंवा तुपांत उगाळून ताळवेवर लेप द्यावा आणि गाईचे दुधांत सांबरशिंग उगाळून पाजावें. ( ३ ) वेखंड व जायफळ दुधांत अगर तुपांत उगाळून ताळवेवर लेप द्यावा आणि सांबरशिंग दुधांत उगाळून पाजावें. ( ४ ) वासनवेलीचा ( तानीच्या वेलाचा ) अगर पाडळीच्या वेलाचा पाला बारीक वाटून वडी करून ती टाळूवर बांधावी. ( ५ ) कडुकारेळे व आंबीहळद यांचें चूर्ण लोण्यांत कालवून त्याची वडी टाळवेवर बसवावी व वरून एरंडाचीं पानें बांधावीं. दि० ३. ( ६ ) कारिवण्याच्या पाल्याचा अ० कांद्याचा रस काढून त्यांत जिऱ्याची पूड व खडीसाखर घालून तो द्यावा. ( ७ ) कांदा भाजून वाटून त्याचा लेप द्यावा व संध्याकाळीं तो काढून टाळूवर गाईचें तूप घालावें. ( ८ ) जवखार व मध बोटावर घेऊन टाळवेवर चोळावा. **धांवऱ्यांवर**—( १ ) तांबड्या कण्हेरीचीं फुलें आणि तांदूळ समभाग वजनानें घेऊन रात्रीं थंडपाण्यांत भिजत घालून तें भांडें दवांत उघडें ठेवावें. सकाळीं वाटून त्याचा लेप द्यावा. ( २ ) पांढऱ्या गुंजेचा पाला वाटून लेप द्यावा. ( ३ ) गुलबाशीचा कंद पाण्यांत उगाळून लेप द्यावा. ( ४ ) सागाचीं पानें व कांबळ्याचा तुकडा यांची राख करून तेलांत खलून लावावी. ( ५ ) गोपीचंदन उगाळून लावावें. **ससणीवर**—( १ ) सुरवारी हिरडा, बेहडा, ज्येष्ठीमध हीं उष्णोदकांत उगाळून त्यांत थोडेंसें सैंधव व मध घालून तें चाटण द्यावें. ( २ ) विड्याचीं पिकलेलीं पानें यांस एरंडेल लावून तीं कोमट कोमट पोटावर ठेवून पोट शेकावें. ( ३ ) गुळांत चण्याचे डाळिंबीहून कमी पापडखार अगर सज्जीखार घालून त्यांत थोडें अंगदूध घालून पाजावें. ओकारी होईल. ( ४ ) गोरोचन व हळद विड्याचे पानांचे रसांत द्यावी. ( ५ ) विड्याबरोबर कडूजिरें खाऊन त्याचा गरळा हळद घालून द्यावा. ( ६ ) कारलीचे पाल्याचा रस काढून त्यांत हळद घालून तो पाजावा. ( ७ ) बाफळीची बी विड्याचे पानाचे रसांत, दुधांत अगर पाण्यांत उगाळून पाजावी. ( ८ ) सतापाचे पाल्याचा रस मध घालून पाजावा. ( ९ ) गोमूत्र एक दोन वेळ गाळून हळद घालून पाजावें. ( १० ) डिकेमाली, रेवाचिनीचा शिरा व काळाबोळ उन्हपाण्यांत वांटून बेंबी सोडून पोटावर लेप द्यावा. **आंकडीवर**—( १ ) पांढरा कांदा थोडासा चिरडून नाकाशीं धरावा व हुंगावा. ( २ ) गुलाबपाणी कापसाचे बोळ्यानें टाळूशिवाय सर्व मस्तकास व नाकामागें व कपाळावर आणि डोळ्यांवर लावावें. ( ३ ) सुरवारी हिरडा थंडपाण्यांत उगाळून, हिरड्यांस व जिभेखालीं व थोडासा जिभेलाही लावावा. इतक्यानें उपशम न होईल तर हिरडा, आवळकाठी आणि खडीसाखर उगाळून अंजन करावें आणि कांद्याचा उपाय मधून मधून चालू ठेवावा. **डब्यावर**—( १ ) कडूवृंदावन, ह्मशीचे मूत्रांत शिजवून त्या मूत्रासुद्धां खलावें. मग तें वालभर घेऊन एक गुंजभर पापडखार अथवा संचळ ( पादेलोण ) याची पूड याजबरोबर मधांत द्यावें. ( २ ) गोमूत्रांत साखर आणि मीठ समभाग घालून तें पाजीत जावें. ( ३ ) काळाबोळ व डिकेमाली एकत्र करून पाजावी. ( ४ ) खबुतराची अथवा पारव्याची विष्ठा मधांत चाटवावी. ( ५ ) तोळाभर पापडखार, एक मोठें वांगें अशीं कल्हईचे भांड्यांत शिजवून त्याचा गोमूत्रांत खल करून त्यांतून दोन वाल घेऊन गुळाचे पाण्यांत पाजीत जावें. ( ६ ) रिंगणी व डोरली यांचे काढ्यांत तोळाभर पापडखार खलून तें एकेक बोंडलें पाजावें. ( ७ ) कडू-

पडवळीचें मूळ गाईवीचे दुधांत उगाळून मध्यान्हरात्रीस पाजावें. ( ८ ) वेड्या उंसाचा रस थोडा दुधाशीं पाजावा. ( ९ ) सूर्यकमळाचे फुलांचा रस दहा थेंब शक्त्यनुरूप दुधांतून द्यावा. ( १० ) खोरेतीची साल, नारळाची करवंटी व पाणीशोक हीं गोमूत्रांत उगाळून प्रत्यहीं दोन वेळ शक्तीप्रमाणें २१ दिवस द्यावीं. ( ११ ) खोरेतीची साल, चित्रकाची मुळी व अघाड्याची मुळी, हीं गोमूत्रांत उगाळून द्यावीं. ढाळ जाहल्यास उतार दहींभात. **कवलूवर**—डब्यावरचे उपचार करावे. **उत्फुल्लिका रोगावर**—( १ ) जळवा लावून रक्त काढावें व कटोली, सुंठ, नागरमोथे, कंकोळ, आणि अतिविष यांचें चूर्ण आईला पाजावें ह्मणजे दुग्धदोषाचें निवारण होतें. ( २ ) पोट शेकावें व बेलमूळ, नागरमोथे, पहाडमूळ, त्रिफला, रिंगणी, डोरली यांचा काढा गूळ घालून पाजावा. **दंतोद्भवावर**—दांत येण्याचे वेळीं धायटीचीं फुलें, पिंपळी आणि आंवळ्याचा रस यांत मध घालून दांतांच्या हिरड्यांना चोळावें ह्मणजे बालकाला दंत पीडा देत नाहींत. ( २ ) दंतांची पीडा फार झाली असतां, पांढऱ्या निर्गुडीचें पूर्वेकडील मूळ आणून गळ्यांत बांधावें म्हणजे दंतसंबंधीं उपद्रव, कुरंड आणि एक अंड उतरतो याचा नाश होतो. **बालकाचे ज्वरावर**—( १ ) पद्मकाष्ठ, कडूनिंब, धणे, गुळवेल, रक्तचंदन, यांचा काढा बालकाला व आईला द्यावा ह्मणजे सर्व ज्वरांचा नाश होतो. ( २ ) ज्येष्ठमध, वंशलोचन, लाह्या, रसांजन यांचा लेह बालांला द्यावा. तो सर्व ज्वरांचा नाश करितो. ( ३ ) नागरमोथा, पित्तपापडा, वाळा, काळा वाळा, पद्मकाष्ठ यांचा काढा शीत झाल्यावर द्यावा. तो दाह, वांति आणि ज्वर यांचा नाश करितो. ( ४ ) भद्रमोथे, हरीतकी, कडूनिंब, कडूपडवळ, ज्येष्ठमध यांचा मंदोष्ण काढा द्यावा, तो बाळकाच्या निःशेष ज्वराचा नाश करितो. ( ५ ) दशमूळांचा काढा करून त्यांत पिंपळीचें चूर्ण घालून द्यावें; तो मोह, झांपड आणि सन्निपातज्वर यांचा नाश करितो. ( ६ ) नागरमोथा, रक्तचंदन, अडूळसा, सुंठ, ज्येष्ठमध, गुळवेल यांचा काढा–पित्त, तृषा, दाह आणि ज्वर यांचा नाश करितो. ( ७ ) अडुळसा, पित्तपापडा, वाळा, कडूनिंब, किराईत यांचा काढा द्यावा; तो वांति, दमा, खोकला, पित्त व ज्वर यांचा नाश करितो. ( ८ ) पिंपळीचें चूर्ण मधांत द्यावें ह्मणजे ज्वर, दमा, खोकला, कावीळ, अग्निमांद्य यांचा नाश होतो. **बालकाचे अतिसारावर**—( १ ) पिंपळी, मंजिष्ठ, कांकडशींगी व नागरमोथे यांचें चूर्ण मधांतून द्यावें ह्मणजे ज्वर, खोकला, वांति व अतिसार यांचा नाश होतो. ( २ ) डाळिंबपाक द्यावा. ( ३ ) कुड्याच्या मूळावरील साल ताकांत वाटून हिंग घालून द्यावी. ( ४ ) कुडेपाक द्यावा म्हणजे संग्रहणी व अतिसार यांचा नाश होतो. ( ५ ) लाह्या, सैंधव आणि आंब्याची कोय, यांचें समभाग चूर्ण मधाशीं द्यावें. तें वांति आणि अतिसार यांचा नाश करितें. ( ५ ) पिंपळी, रसांजन, आंब्याची कोय यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें वांति व अतिसार यांचा नाश करितें. ( ६ ) धायटीचीं फुलें, बेलफळ, धणे, लोध्र, इंद्रजव, वाळा यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें ज्वर व अतिसार यांचा नाश करितें. ( ७ ) लोध्र, पिंपळी व वाळा यांचें चूर्ण द्यावें. ( ८ ) वावडिंग, अजमोदा व पिंपळीचे तांदूळ यांचें चूर्ण गरम पाण्याशीं आमातिसारावर द्यावें. ( ९ ) सुंठ, अतिविष, नागरमोथा, वाळा आणि इंद्रजव यांचा काढा सर्वातिसारांचा नाश करितो. ( १० ) वाळा, साखर, मध हे तांदुळांच्या धुणाशीं द्यावें ह्मणजे रक्तातिसार, खोकला, दमा, वांति यांचा नाश होतो. **बालकास देण्याचीं सूक्ष्म रेचकें**—( १ ) सोनामुखीचा काढा गूळ घालून

चंदनी तेल घालून लहान बोराएवढ्या गोळ्या कराव्या. नंतर ती गोळी सकाळसंध्याकाळ ४ तोळे थंड पाण्यांत कालवून त्यांत खडीसाखर अर्ध तोळा घालून तें प्यावें. या औषधानें धुपणीही जाते. (१२) त्रिफलाचूर्ण ३ भाग, हळदीचें चूर्ण १ भाग, खडीसाखर ३ भाग, मधांत द्यावें, ह्मणजे ७ दिवसांत दुस्तर प्रमेहाचा नाश होतो. (१३) अदपाव गहूं रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं वांटून वस्त्रगाळ करून त्या पाण्यांत १ तोळा खडीसाखर घालून तें ७ दि० द्यावें. **प्रमेहपीटिका**—प्रमेहाचे उपेक्षेनें पीटिका होतात. त्या सर्व संधीचेठायीं होतात. तृष्णा, श्वास, मांसाचा संकोच, मेह, हिक्का, मद, विसर्प, मर्मसंरोध (मर्मस्थानास पीडा), हे पीटिकांचे उपद्रव जाणावे. **प्रमेहपीटिकेवर**—(१) उंबराचे चिकाचा लेप करावा. (२) बावंच्या वाटून लेप करावा. (३) व्रणावरची चिकित्सा करावी. **पथ्य**—तांदूळ, जव, सांवे, मठ, गहूं, कुलित्थ, मूग, तुरी, हरभरे यांचें कढण, शेवगा, पडवळ, कारलें, लसूण. **अपथ्य**—मूत्रवेगाचा अवरोध, धूम्रपान, दिवानिद्रा, मैथुन, वाल, मिष्टान्न, तेल, ताक, गळ, दुध्या, कोहळा, ऊंस, आंबट, खारट असे पदार्थ.

## ९. बालरोग.

**कारण**—आईचें जडान्नादि भक्षण, विषमाशन, दोषकारक अन्न भक्षण, यांनीं देहामध्यें दोषप्रकोप होऊन अंगावरील दुग्ध विकृत होतें; त्या कारणांनीं बालकाला व्याधि उत्पन्न होतात. तसेंच मातापितरांचीं उत्पत्तिस्थानें व्यथित असणें, मुलांस अनियमित आहार, भलत्याच वेळीं निजविणें, भलत्याच वेळीं पाणी पाजणें, उन्हांतून बाहेर नेणें, दुग्धादि पदार्थ उघडे ठेवल्यामुळें विकृत झालेले असे पाजणें, वगैरे कारणांनीं बालरोग उत्पन्न होतात. दूध पिणारा, दूध व अन्न खाणारा, आणि केवळ अन्न खाणारा असा तीन प्रकारचा बालक असतो. तीं अन्नें व दुग्धें दुष्ट नसलीं तर बालक निरोगी असतो, आणि दुष्ट असलीं तर रोगी असतो. दंतोद्भव हा सर्व बालरोगांचें कारण आहे, परंतु त्याचेठायीं विशेषेंकरून ज्वर, विड्भेद, कृशत्व, ओकारी, कपाळ दुखणें, अभिष्यंद, शोथ, विसर्प हे उपद्रव होतात. **लेंकरांच्या अंतर्गत वेदना जाणण्याचा उपाय**—मुलांच्या रडण्यावरून त्यांची कमजास्त पीडा समजावी. तो बालक ज्या ठिकाणीं वारंवार हात लावील त्याठिकाणीं व जेथें आपणास हात लावूं देणार नाहीं, त्याठिकाणीं त्याचें कांहींतरी दुखत आहे असें समजावें; डोळे मिटण्यावरून मस्तक दुखतें ह्मणून समजावें; मलावरोध, ओकारी, स्तन चावणें व पोटांत गुरगुरणें, पोट फुगणें, आणि पोट उचलणें या लक्षणांनीं त्याच्या कोठ्यांत पीडा आहे ह्मणून समजावें. मळमूत्र कोंडणें, डचकणें आणि चहूंकडे पाहणें इहींकरून त्याच्या बस्तींत आणि गुह्यस्थानीं पीडा होत आहे ह्मणून समजावें; वैद्यानें त्यांचीं स्रोतसें (नाक, तोंड, कान वगैरे द्वारें), हात पाय वगैरे अवयव आणि संधि वारंवार पहावे. **बालकाला औषध देण्याचें प्रमाण**—बाल उत्पन्न झाला ह्मणजे त्याला वावडिंगाच्या फळाएवढें अथवा गुंजप्रमाण औषध द्यावें; त्याच मानानें दर महिन्यास वाढवावें. एक वर्षाउपरांत एकेक मासा वाढवीत जावें. **कुकूणक** (बाळखुपऱ्या)—हा रोग दुधाच्या दोषानें होतो, त्या योगानें मुलाचे डोळे खाजतात व गळ लागते. त्या डोळ्यांला खुपूं लागल्या ह्मणजे लेंकरूं कपाळ, डोळे आणि नाक चोळतें व त्याला उन्हाकडे पाहवत

नाहीं व डोळे उघडवत नाहींत. **पारिगर्भिक** ( अवथणें अ० आयनेर )—गर्भिणी मातेचें दूध, लेंकरूं प्यालें असतां त्याला खोकला, अग्निमांद्य, वांति, झांपड, अरुचि आणि भ्रम हे होतात; तें रोड होतें व त्याचें पोट मोठें होऊन टिचटिचित दिसतें; या रोगाला पारिगर्भिक किंवा परिभव ह्मणतात. यावर अग्निदीपन औषध द्यावें. **तालुकंटक** ( टाळू पडणें अ० तान पडणें )—टाळूच्या मांसामध्यें कफ कुपित होऊन तालुकंटक रोग होतो, तेणेंकरून टाळूला खळगा पडतो; व टाळा खालीं लोंबतो; लेंकरूं थान घेत नाहीं, पिऊं लागलें तर मोठ्या कष्टानें पितें, पातळ मळ होतो, तहान लागते, डोळे, घसा आणि तोंड हीं दुखतात, मान सांवरत नाहीं आणि जें दूध पितें तें ओकतें. **महापद्मविसर्प** ( धांवरें, रक्तबाऊ, मोनेंरक्त. ) लेंकराच्या डोक्याला किंवा बस्तीला धांवरें होतें, त्यामुळें लेंकरूं जगत नाहीं, तें धांवरें, तांबड्या कमळाच्या पानाप्रमाणें लाल असतें. हा महापद्मरोग त्रिदोषज आहे. हा आंखावर उत्पन्न होऊन उरापर्यंत येतो, अथवा हृदयावर होऊन गुदापर्यंत जातो. **ससणी.** ( सुशी, उडतें. )—लहान मुलाची प्रकृति कफप्रधान असते, त्यामुळें त्यास प्रायः कफाश्रयाचे रोग होतात. कफकारक पदार्थ सेवन केल्यानें हा रोग होतो. पोटांत कफाचें जाळें होऊन तें वायूचे नैसर्गिक गतीस अवरोध करितें व तें वर चढतां चढतां काळजास व्यापून पुढें कंठावरोध होतो. पोट एकसारखें उडत असतें. या ससणीप्रमाणें अतिसत्वर वर्धिष्णु असा प्राणघातक दुसरा रोग नाहीं. **आंकडी**—आईनें उष्ण व वातुळ पदार्थ सेवन केल्यानें तिचें दूध दूषित होतें; तें मुलानें प्राशन केलें असतां त्याचा मेंदू तप्त होऊन प्राणवाहक तंतु ( मज्जातंतु ) क्षुब्ध होतात, तेणेंकरून हस्तपादाद्यवयव थरथर होऊन डोळे वटारले जातात, हातापायांस वारंवार आंचके बसतात, शुद्धि नष्ट होते व स्तनपानादिक व्यापार बंद होतात. आंकडी हा मोठा भयंकर व प्राणनाशक रोग आहे. या रोगांत अपस्माराचीं सर्व लक्षणें होतात. या रोगांतून मूल निभावणें मोठें कठीण असतें. ज्या मुलाचे मस्तकांत उष्णता फार असते त्यास प्रायः आंकडीचा रोग होतो. **डबा**—हा रोग दुधाचें सायटें किंवा अशा प्रकारच्या पदार्थांचें सेवन झाल्यानें पोटांत सायच्यासारखा किंवा बेडकासारखा आकार होऊन आंतड्यांत चिकटून राहतो; मग उत्तरोत्तर त्यावर सायच्यासारखीं पुटें बसून बसून तो वाढत जातो; मग त्याचा आकार डब्यासारखा जमतो; त्यास खालीं किंवा बाजूस अथवा वर छिद्र असतें, तें त्याचें तोंड. त्यांत जो ऊर्ध्वमुख असतो तो साध्य; बाजूस तोंड असतें तो कष्टसाध्य आणि अधोमुख असतो तो बहुधा असाध्य. हा रोग सहा महिन्यांचे उपरांत वयाचे मुलास होतो. **कवळू**—हा रोग पानथरीसारखा पोटांत डावे बाजूस खापरखुंटीसारखा होत असतो. **उत्फुल्लिका**—जीमध्यें पोट फुगतें व दमा, सूज यांनीं युक्त अशी बाळाच्या उजवे कुशीमध्यें उत्फुल्लिका होते. **बाळखुपऱ्यांवर**—( १ ) त्रिफळा, लोध्र, पुनर्नवा, आलें, रिंगणी, डोरली हीं वाटून, कढवून, त्या कल्काचा सुखोष्ण असा लेप द्यावा. ( २ ) जस्ताचें फूल डोळ्यांत घालावें. ( ३ ) कुरुंदाचे निशाण्यावर लोखंड घांसून ती पूड वस्त्रगाळ करून खुपऱ्यांवर घालावी. **आयनेरावर**—( १ ) पिंपळी मधांत घालून चाटण द्यावें. ( २ ) सुरवारी हिरडा व दालचिनी हीं थंड पाण्यांत उगाळून द्यावीं. ( ३ ) ओंवा, अजमोदा, जिरें, शहाजिरें व सुंठ यांचें चूर्ण मधांत द्यावें. ( ४ ) प्रवाळभस्म गुलकंदांत अगर मध व तुपांत द्यावें. ( ५ ) मिरीं पाण्यांत उकळून त्यांत साखर घालून

तें द्यावें. **टाळू पडते त्यावर** (तानेवर)—(१) हरीतकी, वेखंड, कोष्ठ, यांचा कल्क करून त्यांत मध घालून तो अंगावरच्या दुधाशीं पाजावा. (२) सांबरशिंग गाईचे दुधांत किंवा तुपांत उगाळून ताळवेवर लेप द्यावा आणि गाईचे दुधांत सांबरशिंग उगाळून पाजावें. (३) वेखंड व जायफळ दुधांत अगर तुपांत उगाळून ताळवेवर लेप द्यावा आणि सांबरशिंग दुधांत उगाळून पाजावें. (४) वासनवेलीचा (तानीच्या वेलाचा) अगर पाडळीच्या वेलाचा पाला बारीक वाटून वडी करून ती टाळूवर बांधावी. (५) कडुकारेळे व आंबेहळद यांचें चूर्ण लोण्यांत कालवून त्याची वडी टाळवेवर बसवावी व वरून एरंडाचीं पानें बांधावीं. दि० ३. (६) कारिवण्याच्या पाल्याचा अ० कांद्याचा रस काढून त्यांत जिऱ्याची पूड व खडीसाखर घालून तो द्यावा. (७) कांदा भाजून वाटून त्याचा लेप द्यावा व संध्याकाळीं तो काढून टाळूवर गाईचें तूप घालावें. (८) जवखार व मध बोटावर घेऊन टाळवेवर चोळावा. **धांवऱ्यांवर**—(१) तांबड्या कण्हेरीचीं फुलें आणि तांदूळ समभाग वजनानें घेऊन रात्रीं थंडपाण्यांत भिजत घालून तें भांडें दवांत उघडें ठेवावें. सकाळीं वाटून त्याचा लेप द्यावा. (२) पांढऱ्या गुंजेचा पाला वाटून लेप द्यावा. (३) गुलबाशीचा कंद पाण्यांत उगाळून लेप द्यावा. (४) सागाचीं पानें व कांबळ्याचा तुकडा यांची राख करून तेलांत खलून लावावी. (५) गोपीचंदन उगाळून लावावें. **ससणीवर**—(१) सुरवारी हिरडा, बेहडा, ज्येष्ठीमध हीं उष्णोदकांत उगाळून त्यांत थोडेंसें सैंधव व मध घालून तें चाटण द्यावें. (२) विड्याचीं पिकलेलीं पानें यांस एरंडेल लावून तीं कोमट कोमट पोटावर ठेवून पोट शेकावें. (३) गुळांत चण्याचे डाळिंबीहून कमी पापडखार अगर सजीखार घालून त्यांत थोडें अंगदूध घालून पाजावें. ओकारी होईल. (४) गोरोचन व हळद विड्याचे पानांचे रसांत द्यावी. (५) विड्याबरोबर कडूजिरें खाऊन त्याचा गरळा हळद घालून द्यावा. (६) कारलीचे पाल्याचा रस काढून त्यांत हळद घालून तो पाजावा. (७) बाफळीची बी विड्याचे पानाचे रसांत, दुधांत अगर पाण्यांत उगाळून पाजावी. (८) सतापाचे पाल्याचा रस मध घालून पाजावा. (९) गोमूत्र एक दोन वेळ गाळून हळद घालून पाजावें. (१०) डिकेमाली, रेवाचिनीचा शिरा व काळाबोळ उन्हपाण्यांत वाटून बेंबी सोडून पोटावर लेप द्यावा. **आंकडीवर**—(१) पांढरा कांदा थोडासा चिरडून नाकाशीं धरावा व हुंगावा. (२) गुलाबपाणी कापसाचे बोळ्यानें टाळूशिवाय सर्व मस्तकास व नाकामागें व कपाळावर आणि डोळ्यांवर लावावें. (३) सुरवारी हिरडा थंडपाण्यांत उगाळून, हिरड्यांस व जिभेखालीं व थोडासा जिभेलाही लावावा. इतक्यानें उपशम न होईल तर हिरडा, आवळकाठी आणि खडीसाखर उगाळून अंजन करावें आणि कांद्याचा उपाय मधून मधून चालू ठेवावा. **डब्यावर**—(१) कडूवृंदावन, ह्मशीचे मूत्रांत शिजवून त्या मूत्रासुद्धां खलावें. मग तें वालभर घेऊन एक गुंजभर पापडखार अथवा संचळ (पादेलोण) याची पूड याजबरोबर मधांत द्यावें. (२) गोमूत्रांत साखर आणि मीठ समभाग घालून तें पाजीत जावें. (३) काळाबोळ व डिकेमाली एकत्र करून पाजावी. (४) खबुतराची अथवा पारव्याची विष्ठा मधांत चाटवावी. (५) तोळाभर पापडखार, एक मोठें वांगें अशीं कल्हईचे भांड्यांत शिजवून त्याचा गोमूत्रांत खल करून त्यांतून दोन वाल घेऊन गुळाचे पाण्यांत पाजीत जावें. (६) रिंगणी व डोरली यांचे काढ्यांत तोळाभर पापडखार खलून तें एकेक बोंडलें पाजावें. (७) कडू-

पडवळीचें मूळ गाढवीचे दुधांत उगाळून मध्यान्हरात्रीस पाजावें. ( ८ ) वेड्या उंसाचा रस थोडा दुधाशीं पाजावा. ( ९ ) सूर्यकमळाचे फुलांचा रस दहा थेंब शक्त्यनुरूप दुधांतून द्यावा. ( १० ) खोरेतीची साल, नारळाची करवंटी व पाणीशोक हीं गोमूत्रांत उगाळून प्रत्यहीं दोन वेळ शक्तीप्रमाणें २१ दिवस द्यावीं. ( ११ ) खोरेतीची साल, चित्रकाची मुळी व अघाड्याची मुळी, हीं गोमूत्रांत उगाळून द्यावीं. ढाळ जाहल्यास उतार दहींभात. **कवलूवर**—डब्यावरचे उपचार करावे. **उत्फुल्लिका रोगावर**—( १ ) जळवा लावून रक्त काढावें व कर्टोली, सुंठ, नागरमोथे, कंकोळ, आणि अतिविष यांचें चूर्ण आईला पाजावें ह्मणजे दुग्धदोषाचें निवारण होतें. ( २ ) पोट शेकावें व बेलमूळ, नागरमोथे, पहाडमूळ, त्रिफला, रिंगणी, डोरली यांचा काढा गूळ घालून पाजावा. **दंतोद्भवावर**—दांत येण्याचे वेळीं धायटीचीं फुलें, पिंपळी आणि आंवळ्याचा रस यांत मध घालून दांतांच्या हिरड्यांना चोळावें ह्मणजे बालकाला दंत पीडा देत नाहींत. ( २ ) दांतांची पीडा फार झाली असतां, पांढऱ्या निर्गुडीचें पूर्वेकडील मूळ आणून गळ्यांत बांधावें म्हणजे दंतसंबंधीं उपद्रव, कुरंड आणि एक अंड उतरतो याचा नाश होतो. **बालकाचे ज्वरावर**—( १ ) पद्मकाष्ठ, कडूनिंब, धणे, गुळवेल, रक्तचंदन, यांचा काढा बालकाला व आईला द्यावा ह्मणजे सर्व ज्वरांचा नाश होतो. ( २ ) ज्येष्ठमध, वंशलोचन, लाह्या, रसांजन यांचा लेह बालांला द्यावा. तो सर्व ज्वरांचा नाश करितो. ( ३ ) नागरमोथा, पित्तपापडा, वाळा, काळा वाळा, पद्मकाष्ठ यांचा काढा शीत झाल्यावर द्यावा. तो दाह, वांति आणि ज्वर यांचा नाश करितो. ( ४ ) भद्रमोथे, हरीतकी, कडूनिंब, कडूपडवळ, ज्येष्ठमध यांचा मंदोष्ण काढा द्यावा, तो बाळकाच्या निःशेष ज्वराचा नाश करितो. ( ५ ) दशमूळांचा काढा करून त्यांत पिंपळीचें चूर्ण घालून द्यावें; तो मोह, झांपड आणि सन्निपातज्वर यांचा नाश करितो. ( ६ ) नागरमोथा, रक्तचंदन, अडूळसा, सुंठ, ज्येष्ठमध, गुळवेल यांचा काढा–पित्त, तृषा, दाह आणि ज्वर यांचा नाश करितो. ( ७ ) अडुळसा, पित्तपापडा, वाळा, कडूनिंब, किराईत यांचा काढा द्यावा; तो वांति, दमा, खोकला, पित्त व ज्वर यांचा नाश करितो. ( ८ ) पिंपळीचें चूर्ण मधांत द्यावें ह्मणजे ज्वर, दमा, खोकला, कावीळ, अग्निमांद्य यांचा नाश होतो. **बालकाचे अतिसारावर**—( १ ) पिंपळी, मंजिष्ठ, कांकडशींगी व नागरमोथे यांचें चूर्ण मधांतून द्यावें ह्मणजे ज्वर, खोकला, वांति व अतिसार यांचा नाश होतो. ( २ ) डाळिंबपाक द्यावा. ( ३ ) कुड्याच्या मूळावरील साल ताकांत वाटून हिंग घालून द्यावी. ( ४ ) कुडेपाक द्यावा म्हणजे संग्रहणी व अतिसार यांचा नाश होतो. ( ५ ) लाह्या, सैंधव आणि आंब्याची कोय, यांचें समभाग चूर्ण मधाशीं द्यावें. तें वांति आणि अतिसार यांचा नाश करितें. ( ५ ) पिंपळी, रसांजन, आंब्याची कोय यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें वांति व अतिसार यांचा नाश करितें. ( ६ ) धायटीचीं फुलें, बेलफळ, धणे, लोध्र, इंद्रजव, वाळा यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. तें ज्वर व अतिसार यांचा नाश करितें. ( ७ ) लोध्र, पिंपळी व वाळा यांचें चूर्ण द्यावें. ( ८ ) वावडिंग, अजमोदा व पिंपळीचे तांदूळ यांचें चूर्ण गरम पाण्याशीं आमातिसारावर द्यावें. ( ९ ) सुंठ, अतिविष, नागरमोथा, वाळा आणि इंद्रजव यांचा काढा सर्वातिसारांचा नाश करितो. ( १० ) वाळा, साखर, मध हे तांदुळांच्या धुणाशीं द्यावें ह्मणजे रक्तातिसार, खोकला, दमा, वांति यांचा नाश होतो. **बालकास देण्याचीं सूक्ष्म रेचकें**—( १ ) सोनामुखीचा काढा गूळ घालून

शक्तीप्रमाणें द्यावा. (२) सुरवारी हिरडा ऊन पाण्यांत उगाळून पाजावा. (३) रेवाचिनीचा शिरा गुंज अगर दोन गुंजा मधांतून अगर गुळांतून द्यावा. (४) गुलाबकळी, बाळहिरडे व सोनामुखी यांचा काढा द्यावा. (५) एरंड्या व उंदराच्या लेंड्या यांचें चूर्ण निंबूचे रसांत खलून, गुद व नाभी यांजवर लेप द्यावा. **बालकाचे संग्रहणीवर**—(१) ओंवा, जिरें, मिरीं, पिंपळी, इंद्रजव व सुंठ यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. (२) पिंपळी, भांग आणि सुंठ यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. (३) पिंपळी, सुंठ, बेलफळ, नागरमोथा, आणि ओंवा यांचें चूर्ण मध व तूप यांशीं द्यावें. (४) सुंठ व बेलफळ यांचें चूर्ण गुळाशीं द्यावें. त्रिदोषसंग्रहणीचा नाश होतो. (५) नागरमोथा, अतिविष, बेलफळ, इंद्रजव यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. **बालकाच्या श्वासकासावर**—(१) धणे व खडीसाखर हीं तांदुळांच्या धुणांत द्यावीं. (२) धमासा, पिंपळी, द्राक्षें, हरीतकी यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. (३) पिंपळी, धमासा, द्राक्षें, कांकडशिंगी, टाकळा, यांचें चूर्ण मध व तूप यांशीं द्यावें; तें श्वास, कास व ज्वर यांचा नाश करितें. (४) कांकडशिंगी, नागरमोथे, अतिविष यांचें चूर्ण मधाशीं द्यावें; तें खोकला, ज्वर, वांति यांचा नाश करितें. (५) वंशलोचनाचें चूर्ण मधाशीं द्यावें. (६) अतिविषाचें चूर्ण मधाशीं द्यावें ह्मणजे कास, श्वास, ज्वर, ओकारी व सूतिकारोग यांचा नाश होतो. (७) पांढऱ्या अडुळशाचीं पानें, ओल्या फडक्यांत गुंडाळून फुंपाट्यांत भाजून रस काढावा व त्यांत मध, पिंपळी व तेल्या टांकणखाराची लाही घालून चाटण द्यावें. (८) अडुळसा, सुंठ, रिंगणी, गुळवेल यांचा काढा मध घालून द्यावा. कृमि इत्यादि रोगांवर त्या त्या रोगावर सांगितलेलीं औषधें द्यावीं. **उचकीवर**—(१) सोनगेरूचें चूर्ण मधाशीं द्यावें. (२) पिंपळी व रेणुकबीज यांच्या काढ्यांत हिंग व मध घालून तो द्यावा. (३) कुटकीचें चूर्ण मधाशीं द्यावें; तें उचकी व फार दिवसांची वांति यांचा नाश करितें. **वांतीवर**—(१) हरीतकीचें चूर्ण मधाशीं द्यावें. (२) पिंपळाच्या सालीची राख पाण्यांत घालून तें पाणी पाजावें. (३) आंब्याची कोय, लाह्या व सैंधव यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. दूध पिऊन ओकणाऱ्या बालकाला पिंपळी, पिंपळीमूळ, चवक, चित्रक व सुंठ या पंचकोलाचें चूर्ण मधाशीं द्यावें. (४) महाळुंगीचें मूळ दुधांत उगाळून द्यावें. (५) बाळआंबा, ज्येष्ठमध व पिंपळी मधांत उगाळून चाटण द्यावें. **तृषेवर**—(१) पिंपळी, ज्येष्ठमध व आम्रपल्लव यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. (२) काळीं द्राक्षें व ज्येष्ठिमध यांचा काढा द्यावा. **आनाहवायूवर**—(१) सैंधव, सुंठ, एलची, भारंगमूळ यांचें चूर्ण तुपाशीं द्यावें; तें आनाह, वातशूल यांचा नाश करितें. **रोदन करणाऱ्या बालकास**—त्रिफळा व पिंपळी यांचें चूर्ण मध व तुपाशीं द्यावें. **बाळाच्या क्षीणतेवर**—(१) भुईकोहळा, गहूं व यव यांचें चूर्ण करून त्यांत तूप घालून द्यावें व मागाहून लागलेंच दुधांत साखर व मध घालून द्यावें. (२) उंबरफळांचें चूर्ण, कोष्ठ, वेखंड यांचें चूर्ण, मध आणि तूप यांतून, किंवा कावळी, शंखपुष्पी आणि उंबर यांचें चूर्ण मध व तूप घालून द्यावें; अथवा अर्कपुष्पी, उंबरें यांचें चूर्ण मध व तूप घालून द्यावें; अथवा उंबराचें चूर्ण, कायफळ व पांढऱ्या दूर्वा यांचें चूर्ण मध व तूप यांशीं द्यावें; हे चार प्राश्य, बालांना देह, बुद्धि, बल आणि पुष्टि यांना करितात. (३) आस्कंधाचा कल्क १ भाग आणि दूध ८ भाग यांत तूप घालून पचन करून तें बालकाला द्यावें ह्मणजे पुष्टि करितें व बलाला वाढवितें. **सुजेवर**.—(१) नागरमोथे, कोहाळ्याचें बीं, देवदार व इंद्र-

जव यांचा पाण्याशीं वाटून लेप द्यावा. ( २ ) पुनर्नव्याचें मूळ वाटून लेप द्यावा. ( ३ ) नाभीला सूज आली असतां, मातीचें ढेंकूळ तापवून त्यावर दूध शिंपावें व गरम आहे तोंच त्यानें नाभीला शेक द्यावा. **नाभिपाकावर** ( बेंबी पिकणें )—( १ ) हळद, लोध्र, गहुला, ज्येष्ठमध, यांच्या काढ्यांत तैल सिद्ध करून तें वर लावावें व यांचेंच चूर्ण करून तें वर टाकावें. ( २ ) शेळीच्या लेंड्या दुधाशीं वाटून लेप करावा. ( ३ ) दालचिनी आणि चंदन अथवा क्षीरवृक्ष यांचें चूर्ण वर टाकावें. **गुदपाकावर**—( १ ) पित्तनाशक क्रिया करावी. बालकाला विशेषेंकरून प्राशन व लेपन यांविषयीं रसांजन हितकारक आहे. ( २ ) शंख, ज्येष्ठमध व रसांजन यांचें चूर्ण वर लावावें. **क्षत, फोड** इत्यादिकांवर—( १ ) कडूपडवळ, त्रिफला, कडूनिंबाची साल व हळद यांचा काढा द्यावा ह्मणजे क्षत, फोड, ज्वर हे शांत होतात. ( २ ) पिंपळाची साल, रक्तचंदन अगर रेवाचिनीचें लांकूड पाण्यांत उगाळून लेप द्यावा. **खरजेवर**—( १ ) घेरोसा, हळद, कोष्ठ, मोहऱ्या व इंद्रजव हीं ताकाशीं वाटून लेप करावा; तो शिबीं, खरूज व कुष्ठ यांचा नाश करितो. ( २ ) गंधक व कापूर खोबरेलांत खलून लेप द्यावा. ( ३ ) रेचक द्यावें. **मुखपाकावर**—( १ ) जाईचा पाला, दूध, द्राक्षें, पहाडमूळ व त्रिफळा यांच्या काढ्यानें चूळ भरावे. ( २ ) पिंपळाची साल व पानें यांच्या चूर्णाचें लेपन करावें. ( ३ ) तवकीर लावावी. **आगपैणीवर**—( १ ) शमीचा पाला गाईचे दह्यांत वाटून लेप द्यावा. ( २ ) तांदुळांच्या कण्या दूर्वांच्या रसांत वाटून लेप द्यावा. ( ३ ) कापिला अगर सोनगेरू दह्यांत वाटून लेप द्यावा. ( ४ ) गोपीचंदन उगाळून लावावें. **मस्तकावर पुरूळ येतो त्यावर**—( १ ) चंदन व आगर गुलाबपाण्यांत वाटून लेप द्यावा. ( २ ) गोपीचंदनाचा लेप द्यावा. ( ३ ) सोनगेरू, रक्तचंदन, गुलेअरमाती यांचा थंड पाण्यांत अगर गुलाबपाण्यांत वाटून लेप द्यावा; यानें आगपैणही जाते. **घामोळें येतें त्यावर**—( १ ) चंदन, धणे, वाळा यांचा गुलाबपाण्यांत लेप द्यावा. ( २ ) आवळकाठी, धणे, वाळा, नागरमोथे यांचा लेप द्यावा. ( ३ ) चण्यांचें पीठ थंड पाण्यांत कालवून लावावें, व सुकल्यावर स्नान करावें. **पोटदुखीवर**—एक निंबू चिरून त्याच्या एका फोडीवर डिकेमाली भरून दुसरे फांकीचा रस तिजवर पिळून डिकेमाली भरलेली फांक निखाऱ्यावर ठेवून खतखतूं द्यावी; मग काढून चोखावी ह्मणजे पोटदुखी बंद होते, जठराग्नि प्रदीप्त होतो व कोठा शुद्ध होतो. **मुलांस गरळा**—विड्यांत चिमूटभर ओंवा, अर्धीमूठ बाळंतशोप, थोडी हरीतकी व थोडें पादेलोण हीं घालून विडा चांगला चावून सर्वांचें एकरूप झाल्यावर तो रस बोंडल्यांत गाळून दोन तीन बोंडलीं पाजावीं. हा गरळा आठ दहा दिवसांनीं देण्याचा क्रम ठेवावा ह्मणजे कफवातजन्य वगैरे विकार होऊं शकत नाहींत. **मूत्रकृच्छ्रावर**—( १ ) गाईचे दुधांत गूळ घालून तें उष्ण करून द्यावें. ( २ ) एरंडेलांत दूध किंवा गोमूत्र घालून त्यांत गुग्गुळ घालून तें प्यावें ह्मणजे मूत्ररोग व वातरोग यांचा नाश होतो. **मूत्रनिग्रहावर**—पिंपळी, सुंठ, मिरीं, वेलदोडे, सैंधव यांचें चूर्ण करून त्याचा साखरेच्या पाकांत लेह करून द्यावा. **गंडमाळेवर**—( १ ) बचनाग अगर खड्यानाग यांचा गोमूत्रांत लेप करावा. ( २ ) अरण्यकापशीचीं मुळें तांदळाशीं मिळवून त्याचें पीठ करून भाकर भाजून खावी. **अपस्मार व उन्मादावर**—( १ ) शिरसवृक्ष व करंज यांचे बीज उगाळून नेत्रांत घालावें ह्मणजे उन्मादं,

अपस्मार व अपतंत्रक यांचा नाश होतो. (२) कोहळ्याचे रसांत ज्येष्ठीमधाचें चूर्ण घालून तें सात दिवस प्राशन करावें. (३) गाईचें तूप, दहीं, दूध व शेणाचा रस यांत घृत सिद्ध करून तें द्यावें ह्मणजे अपस्मार, उन्माद व चातुर्थिकज्वर यांचा नाश होतो. **मूर्च्छेवर**—(१) बेलाच्या आंब्या, पद्मकाष्ठ, वाळा, चंदन, नागकेशर यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. (२) द्राक्षें, आंवळे हे शिजवून वाटावे आणि मधाशीं द्यावे ह्मणजे संपूर्ण दोषांपासून झालेली ज्वरयुक्त मूर्च्छा दूर होते. (३) धमाशाचा काढा गोघृत घालून पाजावा. **दाहावर**—(१) पद्मकाष्ठ, चंदन, वाळा यांचें चूर्ण दुधाशीं द्यावें. (२) कापूर, चंदन, वाळा व कायफळ यांचें चूर्ण अंगास लावून नंतर पल्लवांच्या बिछान्यावर निजवावें. **देवींवर**—(१) गाढवीचें दूध पाजावें किंवा तुलसीपत्राचें भक्षण करावें. (२) रक्तचंदन, अडुळसा, नागरमोथा, गुळवेल व द्राक्षें यांचा काढा थंड करून द्यावा. (३) कडूनिंबाचे सालीचा हिम करून द्यावा; तेणेंकरून अंतर्दाह, ज्वर, जीर्णज्वर, देवींच्या योगानें अंगांत मुरलेली कडकी हीं दूर होतात. **मुलें माती खाऊन रोगी होतात त्यावर**—मातीच्या बद्दल सोनकाव (सोनगेरू) खाण्यास द्यावी ह्मणजे रेच होऊन माती खाण्यापासून झालेला विकार दूर होतो. **बालघुटी**—सुरवारी हिरडा, बेहडा, अतिविष, नागरमोथे, इंद्रजवाचा एक दाणा, वावडिंगाचे तीन दाणे, अक्कलकारा, ज्येष्ठमध, हीं औषधें अर्धमूठ घेऊन बडिशेप व बाळंतशेपा चिमुटभर घेऊन अर्धवट कुटून, कढवून त्या पाण्यांत वरील जिनसा उगाळून त्यांत थोडें सैंधव व मध घालून तें बोंडलेंभर पाजावें. याप्रमाणें मूल एक महिन्याचें झाल्यावर नित्यक्रम चालवावा. मूल सहा महिन्यांचें झाल्यावर घुटी दोन अडीच बोंडलेंपावेतों वाढवावी. लहान मुलास खारीक उगाळून पाजूं नये, तेणेंकरून पोटांत जाळें बांधतें व कोठ्यांत गरमी होते.

## १०. भगंदररोग.

**कारण**—मुळव्याधीचे परिणाम, गर्मी भरली असतां तिचे उपशमार्थ अति दुःसह औषधें सेविल्यानें, तिखट पदार्थाचे अति भक्षणानें, व अति जागल्यानें भगंदररोग होतो. **लक्षण**—गुदापासून दोन अंगुळांवर व वृषणापासून २ अंगुळें मागें, पीडा करणारी अशी पुटकुळी उत्पन्न होऊन फुटून गुद, बस्ति व भग यांचें विदारण करिते; त्यास भगंदररोग असें म्हणतात. कमरेच्या कपालास्थीला टोंचणी लागते, आग होते, कंडू सुटते, ठणका लागतो; हीं भगंदर व्हावयाचा असला ह्मणजे अशीं लक्षणें होतात. **उपचार**—(१) सोन्याची काडी तापवून छिद्र मोठें करावें; नंतर अग्निव्रणावरचा उपाय करावा. (२) खैर, हिरडा, बेहडा, आवळकाठी यांचा काढा महिषीचें तूप व वावडिंगाचें चूर्ण घालून प्यावा. (३) चित्रक, रुई, तेड, पहाडमूळ, बावची, कण्हेर, निवडुंग, वेखंड, कळलावी, हरताल, सज्जीखार, मालकांगोणी, या औषधांसहित तेल कढवावें, याला स्यंदनतैल ह्मणतात. तें भगंदरावर लावावें. हें शोधन, रोपण व वर्ण नीट करणारें आहे. (४) हळद, रुईचा चीक, सैंधव, चित्रक, उन्हाळी, मंजिष्ठ, कुडा यांनीं सिद्ध केलेलें तेल भगंदरनाशक आहे. याला निशादि तैल म्हणतात. (५) करवीरतैल—पांढऱ्या कण्हेरीचें मूळ, हळद, दांतीमूळ, कळलावी, मीठ, चित्रक, महाळुंगाचा रस, आणि रुईचा चीक घालून तैल पचन करून भगंदरावर लावावें. (६)

कोष्ठ, तेड, तीळ, दांतीमूळ, पिंपळी, सैंधव, मध, हळद, हरडा, बेहडा, आवळकठी, मोरचूत, यांचा लेप करावा. (७) पांढरा अजवला, इटकर, सुंठ, गुळवेल, पुनर्नवा यांचा लेप करावा. (८) तीळ, तेड, थोर दांती, तूप आणि सैंधव यांचा मध घालून लेप करावा. (९) तीळ, हरितकी, लोध्र, कडू निंबाचा पाला, हळद, वेखंड, कोष्ट, घेरोसा यांचा लेप करावा; तो भगंदर, नाडीव्रण, उपदंशव्रण व दुष्टव्रण यांना शोधन व रोपण असा आहे. (१०) पाणकणसा( रामबाण )वरील कुसें रंध्रांत भरीत जावीं ह्मणजे जखम भरून येते. (११) मोगली एरंड्यांचे तेलांत कापूस भिजवून व्रणावर लावावा. **पथ्य**—तांदूळ, मूग, पडवळ, शेवगा, सर्व कडू पदार्थ, तूप, दूध. **अपथ्य**—व्यायाम, मैथुन, वाहनावर बसणें, जडान्न एक वर्षभर वर्ज करावें.

## ११. भस्मकरोग.

**जठराग्नीचे प्रकार**—जठराग्नीचे विकार चार प्रकारचे आहेत. वातदोषेंकरून विषमाग्नि, पित्तदोषेंकरून तीक्ष्णाग्नि, कफदोषेंकरून मंदाग्नि, वातपित्तदोषेंकरून भस्मकाग्नि यालाच तीक्ष्णाग्नि असेंही ह्मणतात. भूक फार लागते ह्मणून वारंवार अन्न भक्षण करितो व तें पचन होतें, परंतु अंगाला लागत नाहीं व शरीर कृश होतें, तो भस्मकाग्नि जाणावा. **भस्मकरोगाचें कारण**—गांजा, हिंग, मोहऱ्या, गंधक, इत्यादि अति तीक्ष्णपदार्थांचें व ताम्रभस्माचें अतिसेवन व काकमांस, मार्जारमांस यांचे भक्षणानें पित्त अतिकुपित होतें, तेणेंकरून तीक्ष्णाग्नि होतो; तो कितीही भक्षिलें असतां त्यांचे पचन न होतां, भस्म होऊन नेहमीं प्रदीप्त असतो, तोच भस्मकरोग; तो वात, पित्त, कफ या क्रमेंकरून वृद्ध, अति वृद्ध व क्षीण झाले असतां उत्पन्न होतो. **उपचार**—(१) म्हशीचें दहीं, दूध, तूप यांचें सेवन करावें. (२) वारंवार क्षीर भक्षावी. (३) काळें व पांढरें निशोत्तर घालून आटलेलें दूध रेचनार्थ द्यावें. (४) बोराच्या बीच्या आंतला मगज पाण्यांत वाटून प्यावा. (५) स्त्रीचे दुधांत उंबराची साल वाटून प्यावी. (६) पांढरे तांदूळ, पांढरें कमळ व शेळीचें दूध यांची क्षीर करून तूप घालून १२ दिवस खावी. (७) त्रिफला, नागरमोथे, वावडिंग, पिंपळी, साखर व पांढऱ्या अघाड्याचें बीं यांनीं केलेला लेह घ्यावा. (८) अघाड्याचें बीं सडून (स्वच्छ करून) त्याची दुधांत खीर करून खावी. (९) ४८ दिवसपर्यंत प्रातःकाळीं २४ तोळे पिकलेलीं केळीं तुपाशीं खावीं; ह्मणजे तीं अग्नीची, संपूर्ण तीव्रता व भस्मकरोग यांचा नाश करितात. (१०) भुईकोहळ्याचा रस दूध व तूप घालून द्यावा. (११) केळीच्या काल्याचें पाणी प्यावें. (१२) उंबराच्या मुळाचें पाणी प्यावें; येणेंकरून रक्तविकार, अंगांतील भिनलेली गर्मी व कडकी हेही विकार दूर होतील. **पथ्यापथ्य**—अजीर्णावर जें पथ्यापथ्य सांगितलें आहे तें करावें.

## १२. मुखरोग.

**कारण**—जलचर प्राण्यांचें मांस, दूध, दहीं, उडीद वगैरे पदार्थांच्या सेवनानें कुपित झालेले कफादिक दोष मुखामध्यें रोग उत्पन्न करितात; तसेंच दांत न घांसणें, धूम्रपान येणेंकरूनही हा रोग होतो. **मुखरोगाची संख्या**—दंतरोग ८, ओष्ठरोग ८, दंतमूलरोग १५, तालूचे ९, जिव्हेचे ५, कंठरोग १७, आणि सर्वसर ३ एकूण ६५

मुखरोग आहेत. **दंतरोगावर.**—( १ ) सुंठ व शिरस ( पांढरे ) यांचा काढा करून त्यानें किंवा त्रिफळ्याच्या काढ्यानें चूळ भरावे, ह्मणजे हिरड्यांतून रक्त निघतें तें, मांस-झडून जातें व हिरडी पिकते त्याचा नाश होतो. ( २ ) लोध्र, पतंग, ज्येष्ठमध, लाख यांचें चूर्ण करून त्यांत मध घालून त्याचे चूळ भरावे ह्मणजे दांतांतून रक्त व पू वाहतात ते बंद होऊन हालत असलेले दांत घट्ट होतात. ( ३ ) कोरांटीचा रस व मध दांतांस लावावा म्हणजे रक्तविकार बंद होतो. ( ४ ) तुरीची डाळ, विबवे, कोरांटीचें मूळ हीं मडक्यांत घालून राख करून दांतांस लावीत जावी ह्मणजे दंतरोग दूर होतात. ( ५ ) लोहचूर, वेलदोडे, हिराकस व मायफळ, यांचें चूर्ण करून नित्य दांतांस लावीत जावें. सर्व दंतरोग शमतात. ( ६ ) मोगली एरंडाच्या ओल्या काडीनें दांत घांसावे व त्याचा चीक दांतांस लावावा. ( ७ ) जिरें, मीठ, हिरडे, सांवरीचे कांटे यांच्या चूर्णानें दांत घांसावें ह्मणजे दंतमूळांचीं क्षतें, चिरा पडतात त्या, ठणका, रक्तस्राव, दांत हालणें, सूज, यांचा नाश होतो. ( ८ ) पिंपळी, सैंधव, जिरें यांचें चूर्ण दंतमूलांला घांसावें. ( ९ ) तुरटीची पूड, मध-तुपांत कालवून लावावी ह्मणजे रक्त बंद होतें व मुखपाक दूर होतो. ( १० ) जाईचा पाला, गेळफळ, गोखरू, वेहकळ, मंजिष्ठ, लोध्र, खैराची साल, ज्येष्ठ मध, यांचा काढा करून त्यांत तेल घालून पचन करावें; तें दंतनाडीचा नाश करितें. ( ११ ) गुळवेल पाण्याशीं वाटून त्यांत रुईचा चीक घालून कढवावें; त्यानें दांत घांसावे ह्मणजे हालणारे दांत घट्ट होतात. ( १२ ) जाईचा पाला, पुनर्नवा, गजपिंपळी, कोरांटा, वेखंड, सुंठ, ओंवा, हिरडे, तीळ यांचें चूर्ण तोंडांत धरिलें असतां, दुर्गंध, दांतांचा ठणका, दांत हालणें, व्रण, सूज, कंडू व कृमि, यांचा नाश करितें. **दंतकृमीवर**—( १ ) कापूर, अ० भाजलेला गरम हिंग दाढेखालीं धरावा. ( २ ) कोरांटीचीं पानें अथवा मूळ चावावें. ( ३ ) अक्कलकाढा दाढेंत धरावा ह्मणजे दंतशूल राहतो. ( ४ ) सुंठ १ व तुरटीची लाही २ भाग एकत्र करून तें २।३ वेळ लावावें ह्म० दंतशूल त्वरित राहतो. ( ५ ) रिंगणीचीं सुकलेलीं फळें निखाऱ्यांवर घालून त्यावर नरसाळ्यासारखें झांकण ठेवून नळीवाटे तोंडांत धूर घ्यावा ह्मणजे कृमि दूर होतात. कानासही हा धूर दिल्यास कर्णकृमि दूर होतात. ( ६ ) निळी निर्गुडी, काकजंघा ( कांग किंवा कावळी ), व कडू भोपळी या प्रत्येकीच्या मुळांचें चूर्ण करून दांतांत धरावें ह्मणजे कृमीला पाडून टाकितें. ( ७ ) पांढऱ्या उपरसाळीचीं पानें आणून त्यांची लुगदी करून दांतांत धरावी ह्मणजे कृमि पडून दांत घट्ट होतात. ( ८ ) हिराकस, हिंग, तुरटी, देवदार, पाण्याशीं वाटून गोळी करून दांतांत धरावी ह्मणजे कृमिज दंतशूलाचा नाश होतो. **दांत बळकट होण्यास**—( १ ) बकुळीची अंतरसाल नित्य चावीत जावी ह्मणजे दांत घट्ट होतात. ( २ ) बदामाचीं सालें जाळून त्यानें दांत घांसावे. ( ३ ) नागरमोथा, हिरडे, सुंठ, मिरीं, पिंपळी, वावडिंग, कडूनिंबाचा पाला हे गोमूत्रांत वाटून गोळी करून सावलींत सुकवून ती रात्रीं तोंडांत धरून निजावें ह्मणजे दांत वज्रतुल्य घट्ट होतात. **कंठरोग** ( गलरोग ) यावर—( १ ) जवखार, तेजबळ, पहाडमूळ, रसांजन, दारुहळद, व पिंपळी यांच्या चूर्णाची मधाशीं गोळी करून तोंडांत धरावी. ( २ ) दारुहळद, दालचिनी, कडूनिंब, रसांजन व इंद्रजव यांचा काढा द्यावा किंवा हरीतकीचा काढा मध घालून द्यावा. **कंठसर्प** ( घाटसर्प )—गळ्यांत कफानें उंच, लांबट अशी गांठ उत्पन्न होते, तेणेंकरून घशाचा अवरोध होतो, अन्न पाणी जात

नाहीं, बोलण्यास भारी कठीण पडतें व कफाचा अतिशय प्रकोप होऊन प्राणांतिक स्थिति होते. यास "वलयकंठरोग" असें वैद्यशास्त्रांत नांव आहे. यावर—( १ ) रानबोरीची साल १ तोळा वाटून प्यावयास द्यावी. ( २ ) वासनवेलीचें मूळ वाटून पाजावें. ( ३ ) मोहाचे फळांतील बी ( टोळंबी ) पाण्यांत उगाळून पाजावी. ( ४ ) वेहळ्याचे झाडाची अंतरसाल पाण्यांत वाटून तें पाणी पाजावें. ( ५ ) कंवडळ, शिशवी लांकडाचा चूर किंवा कडू दोडकीचें फळ गुरगुडींत घालून ओढावें. ( ६ ) कांतणीचें घर व मलयागरु समभाग चूर्ण करून चिलमींत घालून ओढावें. ( ७ ) केवड्याचे कणसांतील फूल चिलमींत घालून ओढावें. ( ८ ) तोरणीचा पाला चुरून तोंडांत धरून ठेवावा, व थोडा चावून रस घशांत जाऊं द्यावा; ह्मणजे कफ पडून घसा मोकळा होतो. ( ९ ) खुळखुळ्याचें फळ चिलमींत घालून ओढावें. ( १० ) खुळखुळा, शिरसाच्या शेंगेचीं सालपटें व परिपाठ ( धण्याच्या झाडासारखें झाड आहे. ) हीं चिलमींतून ओढावीं.

**मुखपाक** ( तोंडांत चट्टे पडणें ) यावर—( १ ) पंचवल्कलें, अथवा बाभळीची साल किंवा त्रिफळा यांच्या काढ्यानें गुळण्या कराव्या. ( २ ) तुरटीची लाही पाण्यांत घालून त्यानें गुळण्या कराव्या. ( ३ ) जाईचा पाला नित्य चावीत जावा. ( ४ ) कंकोळ व खडीसाखर दाढेखालीं धरून रस गिळीत जावा. ( ५ ) तुरटीची लाही व वेलदोड्याची पूड तोंडांत फांसून लाळ गळूं द्यावी. ( ६ ) अक्कलकाऱ्याची पूड तोंडांत जिभेला फांसावी. ( ७ ) पांढऱ्या गुंजेचा पाला चावावा. ( ८ ) अडुळशाच्या रसांत मध घालून त्यांत उपरसाळीचें मूळ उगाळून त्याचा तोंडांत लेप करावा. ( ९ ) शंखजिरें लोण्यांत कालवून त्याचा तोंडांत लेप करावा. ( १० ) माक्याचा अथवा तुरीचा पाला चावून पिंक टाकीत रहावें; ह्मणजे त्वरित गुण येतो. ( ११ ) पिंपळी, मिरें, कोष्ठ, इंद्रयव यांचें तीन दिवस चर्वण करावें; ह्मणजे मुखपाक, लस आणि दुर्गंध यांची शांति होते. चुन्यानें तोंड भाजल्यास खोबरें खावें, तीळ खावे अथवा तिळांच्या तेलाच्या गुळण्या कराव्या. ( १२. ) खैराची साल ४०० तोळे घेऊन तिचा १०२४ तोळे पाण्यांत अष्टमांश काढा करून गाळून घ्यावा; त्यांत जायफळ, कापूर, चिकणी सुपारी, दालचिनी, एलची, तमालपत्र, नागकेशर, कस्तूरी हे प्रत्येक तोळा तोळा घेऊन चूर्ण करून त्या काढ्यांत मिळवावे; त्याची हरभऱ्याएवढी गोळी करून ती तोंडांत धरली असतां सर्व मुखरोग, जिव्हारोग, ओष्ठरोग, दंतरोग, गलरोग व तालुरोग यांचा नाश करिते. **पथ्य**—देवभात, जव, मूग, कुलित्थ, कारलें, पडवळ, कोंवळा मुळा, विडा, तिखट व कडू रस. **अपथ्य**—आंबट, दहीं, दूध, गूळ, उडीद, रूक्षान्न, कठिणान्न, जड, पौष्टिक असें अन्न; दिवानिद्रा.

## १३. मूर्च्छारोग.

**कारण व संप्राप्ति**—क्षीण झालेला, पुष्कळ दोष सांचलेला, विरुद्ध आहार सेवन करणारा अशा पुरुषास मलमूत्रादि वेग धारण केल्यानें, अभिघातानें, अथवा ज्या पुरुषाचा सत्वगुण क्षीण झाला अशा पुरुषाच्या बाहेरच्या व आंतल्या मनोवह स्रोतसांमध्यें जेव्हां दोष प्रवेश करितात तेव्हां मनुष्यांस मूर्च्छा येते. ह्मणजे संज्ञा वाहणाऱ्या नाडी वातादिकांनीं आवृत झाल्या असतां, सुखदुःखाचें ज्ञान नष्ट करणारें असें तम ह्मणजे अ-

ज्ञान अकस्मात् प्राप्त होतें; सुखदुःखाचें ज्ञान नष्ट झालें ह्मणजे मनुष्य काष्ठवत् पडतो; या रोगाला मोह किंवा मूर्च्छा ह्मणतात. मूर्च्छेमध्यें पित्त हें व्यापक असतें. **पूर्वरूप**—हृदयांत पीडा, जांभया, ग्लानि, भ्रांति, हीं पूर्वरूपें होत. **मूर्च्छा, भ्रम, तंद्रा** व **निद्रा** यांचा **भेद**—मूर्च्छेमध्यें पित्त व तमोगुण अधिक; रजोगुण, पित्त व वायु यांपासून भ्रम होतो. तमोगुण, वायु व कफ यांपासून तंद्रा व कफ आणि तमोगुण यांपासून निद्रा उत्पन्न होते. मूर्च्छादिकांपेक्षां **संन्यास** वेगळा आहे तो—दोषांचा वेग गेला असतां मदमूर्च्छादिक आपल्याआपण शांत होतात; परंतु संन्यास हा आपल्याआपण शांत होत नाहीं. संन्यासानें पीडलेला मनुष्य काष्ठ होऊन मेल्यासारखा पडतो, त्याला सुया टोंचणें, कुहिली लावणें वगैरे उपाय केल्यानें तो शुद्धीवर येतो. **उपचार**—(१) अंगावर पाणी शिंपणें, स्नान करणें, रत्नें व रत्नांचे हार व थंड लेप यांचें धारण, विंझण्याचा वारा, सुगंध व शीत अशीं पानें या उपचारांनीं मूर्च्छा दूर होते. (२) धमाशाचा काढा तूप घालून द्यावा; ह्मणजे भ्रमाची शांति होते. (३) पंचमूलांचा काढा मध व साखर घालून द्यावा व जे ज्वरनाशक कषाय तेही दोष पाहून द्यावे. (४) रिंगणी, गुळवेल, पिंपळमूळ, सुंठ व वायवर्णी यांचा काढा द्यावा. (५) काळीं द्राक्षें, साखर, डाळिंबसाल, लाजाळू, तांबडें कमळ, निळें कमळ व कमळ यांचे काढे द्यावे. (६) बोराचे आठींतला मगज, पिंपळी, वाळा, नागकेशर हीं पाण्यांत वाटून प्यावीं अथवा मधाशीं पिंपळी खावी. (७) रात्रीस मधाशीं त्रिफळा घ्यावी व गूळ आलें एकत्र करून प्रातःकाळीं त्रिफळाचूर्ण खावें. (८) नारळाच्या पाण्यांत सातूंचें पीठ व साखर घालून प्यावें; ह्मणजे हृदयांतला कफ, तृष्णा, मूर्च्छा, भ्रम, हे भयंकर जरी असले तरी त्यांचा नाश होईल. (९) लसूण, वेखंड, मनशील यांचें अंजन करावें. **पथ्य**—रेचन, वांति, लंघन, मृदु, कडू रस, लाह्यांचा मंड, जुने यव, तांबड्या साळी, मूग व वाटाणे यांचें यूष, दूध, साखर, जून कोहळा, पडवळ, केळें, डाळिंब, नारळ, तांदुळजा. **अपथ्य**—तांबूल, पालेभाज्या, दांत घांसणें, ऊन्ह घेणें, विरुद्ध भक्षण, प्राशन, मैथुन, तिखट पदार्थ, मलमूत्रांचा रोध व ताक.

## १४. मूत्रकृच्छ्र. (उन्हाळी.)

**कारण**—व्यायाम, तीक्ष्णौषध, रूक्ष पदार्थ, दररोज मद्यप्राशन, निरंतर घोड्यावर बसून प्रवास करणें, जळाजवळ संचार करणाऱ्या पक्ष्यादिकांचें मांस, व मत्स्य; जेवणावर जेवण, व कच्चे पदार्थ इत्यादिकांच्या सेवनानें मूत्रकृच्छ्ररोग होतो. हा आठ प्रकारचा आहे. संप्राप्ति—स्वकारणांनीं कुपित झालेले वातादि दोष अथवा सर्व दोष बस्तीमध्यें कोप पावून जेव्हां मूत्राचा मार्ग पीडित करितात, तेव्हां मनुष्याला मोठ्या कष्टानें मुतायाला होतें. **उपचार**—(१) गोखरू, बाहवा, दर्भ, काश, धमासा, आंवळकाठी, पाषाणभेद, हिरडे यांचा काढा मध घालून प्यावा; ह्मणजे कठीणही अश्मरी व मूत्रकृच्छ्र यांचा नाश होईल. (२) वेलडोडे, पाषाणभेद, शिलाजित, गोखरू, कांकडीचें बीं, सैंधव, केशर यांचें चूर्ण तांदुळांच्या धुणाबरोबर प्यावें; ह्मणजे आसन्नमृत्यु जरी मूत्रकृच्छ्री असला तरी तो वांचेल. (३) द्राक्षें, खडीसाखर एकत्र कुटून तीं दह्याच्या मंडाबरोबर प्यावीं. (४) दूध उष्ण करून गूळ घालून प्यावें; ह्मणजे सर्व मूत्रकृच्छ्र, शर्करा,

वातरोग यांतें दूर करील. ( ५ ) नारळाचें पाणी, गूळ, धणे यांनीं युक्त करून प्यावें; तें दाहसहित मूत्रकृच्छ्र व रक्तपित्त यांचा नाश करील. ( ६ ) शतावरीचा काढा मध घालून प्यावा, तो त्रिदोषज मूत्रकृच्छ्राचा नाश करितो. ( ७ ) जवखार पांच मासे, साखरेशीं खावा. ( ८ ) गोखरूचे काढ्यांत जवखार घालून प्यावा. ( ९ ) आंवळकाठीचा काढा करून त्यांत गूळ घालून द्यावा; तो रक्त, दाह आणि शूल यांनीं युक्त मूत्रकृच्छ्राचा नाश करील. ( १० ) आंवळ्याच्या रसाशीं वेलदोडे खावे. ( ११ ) कुरडूचें बीं ताकाबरोबर घ्यावें. ( १२ ) खजूर, आंवळकाठी, पिंपळी, शिलाजित, वेलदोडे, ज्येष्ठीमध, पाषाणभेद, चंदन, शेंदाडाचें बीं, धणे यांचें चूर्ण, साखर, ज्येष्ठीमधाचे काढ्याबरोबर प्यावें; तें–अंग, लिंग, गुद, वंक्षण, शुक्र, या ठिकाणचा दाह; शर्करा, अश्मरी, शूल, यांचें नाशक; बल्य, वृष्य, असें आहे. ( १३ ) त्रिफळा, वायवर्णा, कंकोळ, सैंधव यांचें चूर्ण करून घ्यावें. ( १४ ) शिलाजित, पाषाणभेद, पिंपळी, वेलदोडे यांचें चूर्ण पाण्याशीं प्यावें. ( १५ ) रिंगणीचा रस मधाशीं घ्यावा. ( १६ ) मुळासुद्धां गोखरूचे झाडाचा काढा साखर व मध घालून प्यावा, तेणेंकरून मूत्रकृच्छ्र व उष्णवात हे दूर होतात. ( १७ ) उंदराच्या लेंड्या वाटून त्यांचा बस्तीवर किंचित् उष्ण लेप करावा. ( १८ ) गाईचे दुधांत कुड्याची साल वाटून प्यावी; ती भयंकर मूत्रकृच्छ्राचा नाश करील. ( १९ ) कांटेसावरीच्या सालीचें चूर्ण साखरेशीं घ्यावें. **पथ्य**—स्नान, शीतळ उटणें, जुनें तांबडें भात, ताक, दूध, दहीं, मुगांचें काट, साखर, जून कोहळा, पडवळ, आलें, कांकडी, खजूर, नारळ, तांदुळजा, शीतळ अशीं अन्नें, पानें. **अपथ्य**—मद्य, श्रम, मैथुन; हत्ती, घोडा यांवर बसणें; विषमाशन, विरुद्धाशन, तांबूल, मत्स्य, मीठ, तैलपक्क, पेंड, हिंग, तीळ, शिरस, मूत्रवेग, उडीद, वेळूचे कोंब, अतितीक्ष्ण, विदाही, रूक्ष, आंबट पदार्थ.

## १८. मूत्राघात. ( मूत्र बंद होणें. )

**कारण**—मूत्रपुरीषादि वेगांच्या विघातानें वातादि दोष कुपित झाले असतां वातकुंडीलिकादिक त्रयोदश प्रकारचे मूत्राघात होतात. मूत्रकृच्छ्र व मूत्राघात, या उभयतांचा भेद इतकाच कीं, मूत्रकृच्छ्राचे ठायीं क्लेश अधिक असून विबंध अल्प असतो व मूत्राघाताचे ठायीं विबंध असून क्लेश अल्प असतात. **उपचार**—मूत्रकृच्छ्र, मूत्राश्मरी यांवर जें औषध सांगितलें असेल, तें देश व काल जाणणाऱ्यानें सर्व मूत्राघातावर योजावें. ( १ ) सुंठ, मिरीं, पिंपळी, त्रिफळा, हे समभाग व सर्वांच्या समभाग शुद्ध गुग्गुळ घेऊन, त्याची गोखरूच्या काढ्यांत गोळी करावी. ही घेतली असतां कोणत्याही खाण्यापिण्याचा प्रतिबंध नाहीं. ही प्रमेह, वातरोग, वातरक्त, मूत्राघात, मूत्रदोष, प्रदर यांचा नाश करिते. ( २ ) तापवून थंड झालेलें दूध, जटामांसी, चंदन, तांदुळांचें धूण, साखर हे एकत्र करून प्यालें असतां रक्तसहित उष्णवाताचा नाश होतो. ( ३ ) धमासा किंवा अडुळसा यांचा काढा प्यावा. ( ४ ) दशमूळांचा काढा, शिलाजित व साखर घालून घ्यावा. ( ५ ) गोखरूचा काढा, शिलाजित व गुग्गुळ घालून घ्यावा. ( ६ ) वायवर्णा, गोखरू, सुंठ यांचा काढा, गूळ व जवखार घालून घ्यावा; ह्मणजे तो मुतखडा, मूत्राघात, मूत्रशर्करा यांचा नाश करितो. ( ७ ) ताडाचें मूळ तांदुळांच्या

धुणांत वाटून त्यांत साखर घालून घ्यावें. ( ८ ) रात्रीस पाण्यांत केशर भिजत घालून सकाळीं त्यांत मध घालून कुवळून प्यावें. ( ९ ) शुद्ध शिलाजित, साखर व कापूर हीं एकत्र करून खावीं. ( १० ) कांकडीचें बीं, सैंधव, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, यांचें चूर्ण गरम पाण्याशीं प्यावें. ( ११ ) काळा वाळा, वाळा, तमालपत्र, कोष्ट, आंवळकाठी, सफेतमुसळी, वेलदोडे, रेणुकाबीज, द्राक्षें, केशर, नागकेशर, कमळांतले केशर, कापूर, चंदन, रक्तचंदन, त्रिकटु, लाख्या, आस्कंध, शतावरी, गोखरू, कांकडशिंगी, जाई, कंकोळ, गठोना हीं समभाग घेऊन चूर्ण करावें व एक भाग चूर्ण, दोन भाग तूप व साखर याप्रमाणें खावें; अथवा खडीसाखर व मध यांच्याबरोबर प्रातःकाळीं सेवन केलें असतां, तें क्षय, रक्तपित्त, पाददाह, असृग्दर, मूत्राघात, मूत्रकृच्छ्र, रक्तस्राव, ऐंशी प्रकारचे वायु, विशेषेंकरून मेह यांचा नाश करील. ( १२ ) वेलची, पाषाणभेद, पिंपळी, शिलाजित एकत्र करून तांदुळांचे धुणांतून घ्यावें. **पथ्य**—तांबड्या साळी, ताक, दूध, दहीं, जून कोहळा, पडवळ, शेंदाड, खजूर, नारळ, ताडफळ. **अपथ्य**—विरुद्ध अन्नें, मार्ग चालणें; रूक्ष, विदाही, विष्टंभी असे पदार्थ; मैथुन, मूत्रादिकांचा वेग धारण करणें, वेळूचे अंकुर, वमन.

## १६. मुतखडा. ( सं० अश्मरी. )

वात, पित्त, कफ यांपासून व चवथा शुक्रापासून अश्मरीरोग ( मुतखडा ) होतो. या अश्मरी बहुतकरून कफाश्रित असतात. यांस चांगली चिकित्सा न मिळाली तर त्या प्राण हरण करितात. **संप्राप्ति.**—ज्या वेळेस वायु बस्तींतलें शुक्रयुक्त किंवा पित्तयुक्त मूत्र किंवा कफ यांतें शोषितो, तेव्हां अश्मरी होते. जसें गाईच्या पित्तामध्यें गोरोचन जमतें, तसें बस्तीमध्यें शुक्रादिक गोठून खडा होतो. **पूर्वरूप.**—सर्व अश्मरी अनेक दोषाश्रित आहेत. बस्ती फुगणें, बस्तीच्या आसपास अत्यंत पीडा होणें, मुताला बोकडाच्या मुताची घाण, मूत्रकृच्छ्र, ज्वर आणि अरुचि, हें अश्मरीचें पूर्वरूप होय. **सामान्य लक्षण.**—नाभि, शिवण आणि बस्तीचें अग्र यांच्या ठिकाणीं शूळ, अश्मरीच्या योगानें मूत्राचा मार्ग कोंडला ह्मणजे मुताची धार फाटते, अश्मरी मूत्रमार्गापासून पलीकडे गेली ह्मणजे मुतायाला इजा होत नाहीं, आणि मूत्र स्वच्छ गोमेदमण्यासारखें होतें; अश्मरीच्या योगानें बस्तीमध्यें क्षत झालें असतां रक्तमिश्रित मूत्र होतें व मुततांना जोर केला तर फार क्लेश व पीडा होते. त्रिदोषज अश्मरी बहुधा बालकांसच होते. शुक्राश्मरी मात्र मोठ्या मनुष्यांस होते. **उपचार.**—( १ ) कुड्याची साल दह्यांत उगाळून प्यावी. ( २ ) पांढरा एरंड, रिंगणी, डोरली, गोखरू, काळा ऊंस यांचीं मुळें दह्यांत वाटून प्यावीं. ( ३ ) शिलाजित मधाशीं खावा. ( ४ ) गोखरूचे काढ्यांत जवखार घालून घ्यावा. ( ५ ) हिंग, वेलदोडे, दूध, तूप हें एकत्र करून प्यालें असतां मूत्ररोग, शुक्ररोग यांचें नाशक आहे. ( ६ ) आलें, जवखार, हिरडा, दारुहळद, काळा शेवगा, हीं शेळीचे दुधांत वाटून प्यावीं; ह्मणजे मूत्राश्मरी फुटून पडते. ( ७ ) तीळ, अघाडा, कारली, सातू यांचीं कांडें; पळसाचें काष्ठ, हीं सर्व समभाग घेऊन मडक्यांत घालून पुट देऊन जाळावीं; नंतर त्यांची चार मासे राख घेऊन शेळीचे मुतांत गोळी करून खावी. याप्रमाणें सात दिवस खाल्ली असतां अश्मरीचा नाश होतो. ( ८ ) गो-

खरूचें चूर्ण-मधुयुक्त-मेंढीचे दुधांत घालून सात दिवस प्यावें. ( ९ ) जुन्या तुपांत केशर घालून तीन दिवस प्राशन केल्याने शर्करेचा नाश होतो. ( १० ) तिळांचे फुलांचा क्षार, मध, दूध एकत्र करून तीन दिवस प्यावें अथवा सैंधव व महाळुंग सेवन करावें. ( ११ ) चिबुडाचें मूळ शिळे पाण्यांत वाटून प्यावें; ह्मणजे तीन दिवसांत अश्मरी पाडील.. ( १२ ) अर्कपुष्पी ह्मणजे शिरदोडी हिचें मूळ गाईचे दुधांत वाटून प्रातःकाळीं तीन दिवस प्यावें; ह्मणजे दाहयुक्त तीव्र अश्मरीचा नाश होतो. ( १३ ) शतावरीच्या मुळांचा रस गाईचे दुधाशीं प्यावा ह्मणजे फार दिवसांच्याही अश्मरीचा नाश होईल. ( १४ ) वायवर्ण्याची साल, सुंठ, गोखरू, जवखार, गूळ, यांचा काढा करून थंड झाल्यावर द्यावा. तो मूत्राश्मरी, शर्करा, मूत्रकृच्छ्र, मूत्राघात यांचा नाश करितो. ( १५ ) वायवर्ण्याचे सालीचा काढा गूळ घालून प्यावा. ( १६ ) शेवग्याचे मुळाचा काढा--तिखट, उष्ण, अश्मरी पाडणारा आहे; अथवा गठोण्याचें मूळ तांदुळांचे धुणांत वाटून प्यावें. दूधभात खावा. ( १७ ) तुषोदकांत ( जवांचे कांजींत ) हळद व गूळ घालून प्राशन करावें. ( १८ ) मेंढीचें दूध मध मिश्र करून घ्यावें. ( १९ ) निशोत्तर व इंद्रजव यांचें चूर्ण दुधाशीं किंवा तांदुळाचे धुणाशीं घ्यावें. ( २० ) कुळथांचा काढा ८ तोळे, उन्हाळीचें चूर्ण व सैंधव दोन मासे घालून प्यावा. ( २१ ) कोहळ्याचा रस, हिंग, जवखार एकत्र करून प्यावा. **पथ्य**—यव, कुळीथ, जुनें भात, जून कोहळा, आलें, वेळूचे कोंभ. **अपथ्य**—मूत्र, मल, शुक्र यांचा रोध; व विष्टंभकारक, जड, असें अन्न व पान; विरुद्धान्न.

## १७. मूत्ररेचनाची आवश्यकता व औषधें.

ज्यास गरमी, परमा, मूत्राघात वगैरे रोग झाले आहेत त्यास मूत्ररेचन द्यावें. **मूत्ररेचन देण्यास औषधें.**—( १ ) सोरा, कबाबचिनी, एलचीदाणे, रेवाचिनी हीं समभाग घेऊन चूर्ण करून तें ६ मासे चूर्ण, पावशेर दूध व पावशेर पाणी एकत्र करून त्यांतून द्यावें. ( २ ) सोनामुखी २ तोळे रात्रौ पावशेर पाण्यांत भिजूं घालून सकाळीं तें गाळून त्यांत खडीसाखर १ तोळा टाकून तें द्यावें; यानें रेचही होतात. ( ३ ) गाईचें दूध कढत ठेवून त्यांत निंबें पिळावीं व खडीसाखर घालून ७ पदरांवर गाळून तें पाणी सात वेळ उलटापालट करून द्यावें. ( ४ ) एक शेर दुधांत एक शेर पाणी मिश्र करून त्यांत २ मासे सोरा व ६ मासे सोनकाव घालून तें ढवळून उभें राहून पोटभर प्यावें व फिरत रहावें; ह्मणजे मूत्ररेच होतील. ( ५ ) दूध दोनशेरपर्यंत घेऊन कल्हईचे भांड्यांत तापत ठेवावें, त्यांत पाणी अगदीं घालूं नये. चांगलें तापत आल्यावर त्यांत तुरटीची पूड २ मासेपर्यंत टाकावी; ह्मणजे तें दूध फाटून चोथा व पाणी असा प्रकार होतो. मग अग्नीवरून उतरून गाळून देऊन त्यांत वेलदोड्याची पूड व पिठीसाखर घालून थंड झाल्यावर तें प्राशन करावें. ( ६ ) पळसाचीं वाळलेलीं फुलें सुमारें १० तोळेपर्यंत घेऊन तीं धुवून त्यांत पाणी घालून वर झांकण ठेवून मंदाग्नीवर वाफ येईपर्यंत शिजवावीं; नंतर तीं पिळून तें पाणी पावशेरपर्यंत घेऊन त्यांत २ मासे सोरा घालून तें प्यावें व शिल्लक राहिलेल्या पाण्यांत तीं शिजवलेलीं फुलें कालवून पोटावर बांधावीं. ( ७ ) काळीं द्राक्षें चार तोळे, रात्रौ थंड पाण्यांत भिजूं घालून सकाळीं तीं कुसकरून

त्यांचें पाणी गाळून घ्यावें व त्या पाण्यांत थोडी जिऱ्याची पूड घालून तें पाणी शक्त्यनुरूप एक शेरपर्यंत प्राशन करावें; ह्मणजे मूत्रद्वारें अंगांतील कडकी निघून जाते. यानें कोणास रेचही होतात. **पथ्य**—तांदूळ, दूध, तूप, तुरींची डाळ, साखर, गहूं. **अपथ्य**—गूळ, तिखट, आंबट, तेलकट, वातूळ पदार्थ.

## १८. मेदोरोग. ( स्थूलता. )

**कारण**—कफकारक पदार्थ, मधुर अन्न, मधुर रस, स्नेहन अन्न–ह्मणजे घृतपक्व गोधूम, क्षिप्रादिक, यांच्या सेवनेंकरून मेद वाढतो. **लक्षण**—मेद वाढल्यामुळें अन्य धातु जे अस्थ्यादि त्यांचें पोषण होत नाहीं; आणि मेद वाढल्यामुळें सर्व कर्मांविषयीं अशक्त होतो, आणि अल्पश्वास, तृषा, मोह, निद्रा, श्वासावरोध, निजेमध्यें फार घोरणें, शरीराचे ठायीं ग्लानि, शिंका, घामाला दुर्गंधि, अल्पप्रमाण, अल्पमैथुन इत्यादि उपद्रव होतात, व त्याचे उदराची प्रायः वृद्धि होते. वायु अग्नीला प्रदीप्त करून आहाराला शोषवितो; यास्तव मनुष्यानें भक्षिलेलें अन्न लौकर जीर्ण होऊन दुसऱ्या आहाराची इच्छा करितो. कदाचित् भोजनाची वेळा चुकली असतां मोठा घोर विकार होऊन, प्रमेहपीटिका, ज्वर, भगंदर, यांतून एकादा रोग होतो आणि हे, अग्नि व वायु हे उपद्रव करीत होत्साते मेदोरोग्याचें शरीर जाळितात. **उपचार**—( १ ) त्रिफळ्याचे काढ्यांत मध १ तोळा घालून तो प्यावा. ( २ ) प्रातःकाळीं थंड आणि स्वच्छ पाणी ४ तोळे घेऊन मध घालून प्यावें, अ० ऊन्ह पाणी थंड करून मध घालून प्यावें, ह्मणजे तनु कृश होते. ( ३ ) चवक, जिरें, सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, पादेलोण, चित्रक, यांचें चूर्ण मधाशीं खावें; तें मेदनाशक व अग्निदीपक आहे. **पथ्य**—चिंता, श्रम, जागरण, मैथुन, व्यायाम, तांदूळ, जव, हरभरे, मसुरा, कुळीथ, मूग, तुरी, तिखट, ताक, तेल, पालेभाजी. **अपथ्य**—गहूं, ऊंस, उडीद, दिवानिद्रा, सुगंधि पदार्थ, मधुरान्न, वमन.

## १९. रक्तपित्त.

**कारण व स्वरूप**—उष्ण, अग्नीचा शेक, परिश्रम, शोक, मार्ग चालणें, मैथुन इत्यादिकांच्या अतिसेवनेंकरून, तीक्ष्ण, उष्ण, खारट, आंबट या पदार्थांच्या अतिसेवनेंकरून पित्त क्षुभित होऊन रक्ताला क्षुभित करितें. मग ऊर्ध्व–मुखावाटे व अधोभागीं गुदावाटे रक्त पडूं लागतें; त्यास रक्तपित्त असें ह्मणतात. **रक्तपित्ताचे उपद्रव**—अन्न पचन न होणें, वांति, तृषा, श्वास, खोकला, बलहानि, पांडुरता, भोजन केलें असतांही दाह, भ्रम, मस्तकसंताप, अतिसार, क्षुधानाश इत्यादि उपद्रव होतात. मुखावाटे रक्त पडतें तें साध्य; गुदावाटे पडतें तें कष्टसाध्य; मुखावाटे व गुदावाटे पडतें तें असाध्य जाणावें. **उपचार**—( १ ) अडुळशाचा रस व मध समभाग करून द्यावा. ( २ ) अडुळसा, मनुका, बालहरीतकी यांचा काढा द्यावा. ( ३ ) बकरीच्या दुधांत मध व साखर घालून द्यावें. ( ४ ) गाईच्या दुधांत पांचपट पाणी घालून कढवावें. पाणी जळालें ह्मणजे तें दूध द्यावें. ( ५ ) आंवळ्याचा अ० हरीतकीचा मुरंबा द्यावा. ( ६ ) आंवळकाठीचें चूर्ण, साखर व तूप एकत्र करून द्यावें; अ० आंवळकाठी तुपांत भाजून टाळूवर वडी बसवावी. ( ७ ) ज्येष्ठीमध, धणे, रक्तचंदन, अडुळसा, वाळा,

यांचा काढा, मध साखर घालून द्यावा; ह्मणजे शोष, दाह, रक्तपित्तज्वर यांचा नाश होतो. ( ८ ) शंखजिरें, तूप, साखर हीं एकत्र करून द्यावीं. ( ९ ) दुधाची साय द्यावी. ( १० ) द्राक्ष, बेदाणा, धणे यांचा काढा साखर घालून द्यावा. ( ११ ) उंबराचीं पिकलीं फळें गुळाशीं अ० मधाशीं द्यावीं. **पथ्य**—जुने सांठे तांदूळ, हरीक, राळे, देवभात, जव, मूग, मसुरा, चणे, तुरी, मठ, तुरट पदार्थ, दूध, तूप, फणस, केळें, तांदुळजा, पडवळ, जून कोहोळा, दुध्या भोपळा, कलिंगड, ऊंस, साखर. **अपथ्य**—व्यायाम, मार्ग चालणें, ऊन्ह घेणें, मलमूत्रांच्या वेगाचा रोध, घोड्यावर बसणें, वाफारा, धूमपान, मैथुन, कुळीथ, गूळ, वांगीं, तीळ, उडीद, दहीं, क्षारपदार्थ, तांबूल, लसूण, शिंबीधान्य, विरुद्धाशन, कडू, आंबट पदार्थ, मीठ.

## २०. रेचनाची आवश्यकता व औषधें.

**रेचन देण्यास जे योग्य ते**—जीर्णज्वर, बचनागादिक विषदोष, वातरक्त, भगंदर, मुळव्याध, पांडुरोग, उदर, हृद्रोग, परमा, गुल्म, प्लीहा, ओकारी, विषूचिका ( मोडशी ), कुष्ठ, उपदंश, कृमि, वातरोग, शूळ, मूत्राघात, इतक्यांतून एकाद्या रोगेंकरून व्याप्त जो मनुष्य तो रेचन देण्यास योग्य जाणावा. अशक्त, लहान मूल, गर्भिणी, यांना रेचक देऊं नये. **रेचन देण्याचीं औषधें.**—( १ ) ज्याचा मृदु कोठा आहे त्यास एरंडेल त्रिफळ्याचे काढ्याशीं किंवा सुंठीचे काढ्याशीं १ तोळा द्यावें; किंवा बाळहरीतकी व सोनामुखी यांचें ६ मासे चूर्ण, थोडा गूळ घालून गरम पाण्याशीं द्यावें. ( २ ) मध्यम कोठा ज्याचा आहे त्यास–निशोत्तर व खडीसाखर हीं समभाग घेऊन चूर्ण करून, त्या चूर्णांत तोळ्यास ४ वाल या मानानें पिंपळीचें चूर्ण कालवून तें चूर्ण शक्तीप्रमाणें ६ मासेपर्यंत द्यावें. ( ३ ) वरील चूर्णाप्रमाणेंच दंतीमुळाचेंही चूर्ण करून घ्यावें. ( ४ ) रेवाचिनीचा शिरा शक्त्यनुरूप १ मासापर्यंत साखरेंतून द्यावा. ( ५ ) क्रूर कोठा ज्याचा आहे त्यास–पिसोळा अथवा कांटेधोत्रा यांच्या मूळाचें चूर्ण एक तोळापर्यंत गरम पाण्यांत साखर टाकून तें घ्यावें. सर्वसाधारण रेचकें–बाहव्याचा मगज शक्त्यनुरूप पाण्यांत कढवून तें पाणी प्यावें. ( ६ ) गुलाबकळी, काळीं द्राक्षें, सोनामुखी ( पानांचे देंठ काढलेली, ) व बाळहिरडे हीं रात्रीं पाण्यांत भिजूं घालून सकाळीं कढवून तें पाणी प्यावें. ( ७ ) सुरवारी हिरडा, बेहडा, आंवळकाठी यांचें चूर्ण ऊन्ह पाण्याशीं घ्यावें; अथवा यांचा काढा घ्यावा ह्मणजे रेच होतात. ( ८ ) सुखेंकरून ढाळ होण्याविषयीं अभयादिमोदक–हरीतकी, मिरें, सुंठ, वावडिंग, आंवळकाठी, पिंपळी, पिंपळमूळ, दालचिनी, तमालपत्र, नागरमोथे हीं दहा औषधें समभाग, दांतीचें मूळ तीन भाग, निशोत्तर आठ भाग व खडीसाखर ६ भाग, याप्रमाणें घेऊन चूर्ण करून मधांत, गोळी १० मासे वजनाची या मानानें गोळ्या कराव्या. ही गोळी प्रातःकाळीं घेऊन वर थोडें थंड पाणी घ्यावें. जोंपर्यंत ढाळ होतात तोंपर्यंत उष्ण पदार्थाचें सेवन करूं नये; नियमित वर्तन करावें; तेणेंकरून विषमज्वर, अग्निमांद्य, पांडुरोग, खोकला, भगंदर, कुष्ठ, गुल्म, अर्श, गलगंड, भ्रम, उदर, विदाह, कवळू, परमा, राजयक्ष्मा, नेत्ररोग, वातरोग, पोटफुग्गी, मूत्रकृच्छ्र, अश्मरीरोग; व पाठ, पार्श्व, कंबर, उदर, यांचे ठायीं ज्या पीडा होतात त्या, हे सर्व रोग दूर होतात. हा अभयामोदक निरंतर सेविला असतां, पलित ह्मणजे मनुष्याचे पांढरे केश

होतात ते येणेंकरून काळे होतात, व हा मोदक उत्तम रसायनरूप आहे असें जाणावें. **रेच बंद होण्यास**—( १ ) खडीसाखर पाण्यांत विरघळून द्यावी. ( २ ) शरीर थंड पाण्यांत भिजवावें. ( ३ ) तांदुळांचे धुणांत मध मिळवून हलकी ओकारी करवावी. ( ४ ) आंव्याची साल गाईचे दह्यांत वाटून नाभीवर लेप करावा. ( ५ ) शेळीचें दूध प्यावें. ( ६ ) डाळिंब वगैरे शीतळ पदार्थांचें सेवन करावें. ( ७ ) तूप–भात किंवा दहीं–भात खावा.

## २१. वमनाची आवश्यकता व औषधें.

**वमन देण्यास जे योग्य ते**—कफ, विषदोष, अग्निमांद्य, हृद्रोग, कुष्ठ, वातरक्त, भ्रम, कास, श्वांस, ज्वर, अतिसार, अरुचि हे रोग आहेत व इतक्यांतून एकादा रोग आहे त्यास वमन द्यावें. **वमन होण्यास औषधें**—( १ ) कफ पडावयास—पिंपळी, गेळफळ व सैंधव यांचें चूर्ण कोमट पाण्याशीं प्यावें. ( २ ) पित्त पडावयास—पटोल, अडुळसा, कडूनिंब यांच्या पानांचें चूर्ण करून थंड पाण्यांत घालून प्यावें. ( ३ ) कफवायूची पीडा असतां, गेळफळाच्या मगजाचें चूर्ण दुधांत घालून प्यावें. ( ४ ) अजीर्णावर—कोमट पाण्यांत सैंधव घालून प्यालें असतां, मनुष्य ओकून अजीर्ण दूर होतें. ( ५ ) ज्येष्ठमधाचा काढा, ३ मासे मोहऱ्यांचें चूर्ण घालून द्यावा; ह्मणजे विषदोष, अजीर्ण व कफ हे पडतात. ( ६ ) तोळा दीड तोळा मोहरीचें चूर्ण ऊन्ह पाण्यांत कालवून घ्यावें. ( ७ ) पाव तोळ्यापासून अर्ध तोळ्यापर्यंत रुईच्या मुळाच्या सालीचें चूर्ण ऊन्ह पाण्याशीं घ्यावें. यानें थोडें रेचकही होतें. एक वर्षाच्या आंतील मुलांस २॥ पासून ४ गुंजांपर्यंत द्यावें. ( ८ ) कारलीच्या किंवा अडुळशाच्या पानांचा रस घ्यावा. ( ९ ) गुंज किंवा अर्धगुंज प्रमाण मोरचुदाची लाही ऊन्ह पाण्याशीं देऊन वरून पोटभर पाणी पाजावें; ह्मणजे उलट्या होऊन विषदोष आदिकरून पडतात. ( १० ) उलटी बंद होण्यास—हलकेंसें रेचक द्यावें किंवा मकेचें कणीस दाण्याखेरीज जाळून त्याची राख अर्ध पैसाभार पाण्यांतून द्यावी; अथवा पिंपळाच्या ढलप्या जाळून पाण्यांत विझवून तें पाणी प्यावें.

## २२. व्रणरोग.

**कारण**—व्रण दोन प्रकारचे आहेत. शारीर व आगंतुक. पहिला शारीरदोषांनीं होतो; दुसरा शस्त्रादिक घाय लागल्यानें होतो. वातादि दोष आपापल्या कारणेंकरून कुपित होऊन त्वचा, रक्त, मांस, मेद यांतें दूषित करून व्रणास उत्पन्न करितात. **नाडीव्रण**—जो मनुष्य पिकलेली सूज अपक्व आहे ह्मणून फोडीत नाहीं, किंवा पुष्कळ पू झालेल्या व्रणाची उपेक्षा करितो त्याचा पू, त्वचा, मांस, नाडी, इत्यादि विदारण करून मार्ग पाडितो, व आंत लांब घर करितो, आणि तो पू नाडीसारखा वाहतो, यास्तव यास नाडीव्रण ( हाड्याव्रण ) अथवा नासूर असें ह्मणतात. **उपचार**—व्रणाला पूर्वीं विम्लापनक्रिया करावी; नंतर अवसेचन ( रक्त काढणें ), उपनाह ( पेंड बांधणें ), पाटन ( फोडणें ), शोधन, रोपण ( भरून आणणें ), आणि सातवा विकृतीचा नाश करणें असे सात अनुक्रमानें उपचार करावे. **विम्लापन**—अभ्यंग करून ती जागा फुंकण्या ता-

पवून त्यांणीं शेकावी व अंगुष्ठानें तेल लावून रगडीत जावें. **रक्तावसेचन**—जर व्रणाला फार सूज आणि ठणका हे विकार असतील तर प्रथम रक्त काढावें. प्रथमतः रक्ताला विकार होतो, तें रक्त काढलें असतां तत्संबंधीं विकार शांत होतो, याकरितां संपूर्ण क्रियांहून रक्त काढणें ही क्रिया चांगली आहे. **उपनाह**—अळशी ( जवस ), जव ( सातू ), गहूं, ताग, यांपैकीं एकाचे पिठांत थोडें तेल किंवा तूप घालून मळून त्याची वडी करून ती गरम असतांच सुजेवर बांधावी; ह्मणजे सूज नाश पावते. **पाटन** ( फोडणें )—व्रणाच्या मुखामध्यें पू झाला व बाजूच्या स्थानींही पू झाला अथवा व्याधी पसरूं लागला असतां त्याला फोडावा. ( १ ) करंज, चित्रक, दांती, कण्हेर यांचे मुळांचा किंवा पारव्याचे विष्ठेचा लेप करावा; ह्मणजे व्रणाची सूज फुटते. ( २ ) सज्जीखार, जवखार, टाकणखार, इत्यादि क्षारांचा लेप करावा; ह्मणजे व्रणाची सूज फुटते, ( ३ ) पिसोळ्याचे मुळांचा लेप करावा. ( ४ ) ताग, मुळा, शेवगा यांचें बीं, तीळ, शिरस, सातू व अळशी एकत्र वाटून त्यांचा लेप करावा; तो व्रणशोथाला फोडणारा आहे. ( ५ ) दंतीमूळ, चित्रकाचे मुळाची साल, निवडुंगाचा चीक, रुईचा चीक, गूळ, बिब्याची आठी, हिराकस व सैंधव यांचा लेप द्यावा. ( ६ ) हस्तिदंत पाण्यांत उगाळून सुजेच्या तोंडावर एक बिंदु द्यावा; ह्मणजे फार कठीण सुजेला पिकवून फोडितो. ( ७ ) जव, गहूं यांच्या पिठांत क्षार घालून लेप करावा; किंवा हळदीची राख व चुना; अथवा शेळीचे लेंड्यांच्या राखेचा क्षार व सांबरमीठ एकत्र करून त्याचा लेप करावा; तो फोडण्याविषयीं उत्तम आहे. **शोधन**—( १ ) तीळ, सैंधव, ज्येष्ठमध, कडूनिंबाचा पाला, हळद आणि तेड यांचें चूर्ण मधांत घोंटून त्यानें लेप करावा; तो व्रणाला शोधन करणारा आहे. ( २ ) तिळांचा कल्क, मीठ, हळद, दारुहळद, निशोत्तर ( तेड ), तूप, ज्येष्ठीमध आणि कडूनिंबाचा पाला यांचा लेप व्रणाला शुद्ध करितो. ( ३ ) कडूनिंब व बोर यांचा पाला वाटून लेप करावा; किंवा निंबाचा पाला, तिळांचा कल्क, यांचा मधाशीं लेप करावा; अथवा निंबाचा पाला, तीळ, दंतीमूळ, निशोत्तर, सैंधव आणि माक्षिक ( मध ) यांचा लेप करावा. ( ४ ) हरीतकी, निशोत्तर, दंती, कळलावी, मध, सैंधव, कारलीचीं पानें, धोतऱ्याचा पाला, बाभळीचा पाला आणि आजवला, यांचा पृथक् लेप केला असतां गंभीर व्रणाला शोधन करितात. ( ५ ) कडूनिंबाचा पाला व मध, यांचा लेप व्रणशोधन करितो; किंवा एकटें उपरसाळीचें मूळ वाटून लेप करावा ह्मणजे व्रणाची शुद्धि होते. ( ६ ) कडूनिंबाचा पाला, तूप, मध, दारुहळद व ज्येष्ठीमध यांचें चूर्ण एकत्र करून त्याचा लेप करावा; अथवा याची वात करून घालावी ह्मणजे ती शोधन करून भरून आणते. **रोपण**—( १ ) वड, उंबर, पिंपळ, कळंब, पिंपरी, वेतस, कण्हेर, रुई आणि कुटकी, यांच्या काढ्यानें व्रण धुवावा; ह्मणजे व्रण लवकर भरून येतात. ( २ ) सातविणाची साल दुधांत वाटून लेप करावा, तो दुष्टव्रणशामक आहे. ( ३ ) उन्हाळीच्या मुळाचें चूर्ण मधाशीं लावावें, तें सर्व व्रणाला भरून आणतें. ( ४ ) पंचवल्कलांचें चूर्ण, शिंपीचा चुना, धायटीचीं फुलें व लोध्र यांचें चूर्ण वर लावावें. ( ५ ) तिळांचे कल्काचा लेप करावा. ( ६ ) तीळ आणि ज्येष्ठीमध यांचें चूर्ण वर लावावें. ( ७ ) कडूनिंब व कडूपडवळ यांच्या काढ्यानें अथवा अर्जुनसादड्याच्या काढ्यानें व्रण धुवावे; ह्मणजे लवकर भरून येतात. **व्रणांतील कृमि दूर होण्यास**—( १ ) क-

रंज, कडूनिंब आणि निर्गुडी यांचा रस व्रणांतील कृमींचा नाश करितो. ( २ ) लसुणाचा लेप करावा. ( ३ ) निंबाचा पाला, वेखंड, हिंग, तूप, मीठ व सैंधव यांचा धूप द्यावा; तो कृमि, राक्षस, व्रण आणि कंडू यांचा नाश करितो. ( ४ ) फांगळ्याच्या पाल्याचा रस व्रणावर पिळावा व त्याच पाल्याची वडी करून व्रणावर बसवावी. ( ५ ) कापुराच्या पाण्यानें व्रण धुवावा. ( ६ ) कडूनिंब, बाहवा, जाई, रुई, सातवीण, श्वेतकण्हेर, आणि गोमूत्र यांनीं व्रण धुवावा. **अग्निदग्धव्रणावर**—( १ ) शिरगोळा भाजून बारीक करून तेलांत खलून तें मलम लावावें. ( २ ) सातू जाळून तिळांचे तेलांत खलून लेप करावा. ( ३ ) साळीच्या तुसाची राख तुपांत खलून लावावी. ( ४ ) कोरफडीचा बलक अथवा मध लावावा, ह्मणजे आग शांत होते. ( ५ ) तिळांचे तेलांत चतुर्थांश चुन्याची निवळी घालून काडीनें ढवळावें ह्मणजे मलमासारखें होईल, तें मोराच्या पिसानें व्रणावर लावावें. ( ६ ) शंखजिरें लोण्यांत खलून लावावें. ( ७ ) धायटीच्या फुलांचें चूर्ण जवसांचे तेलांत खलून लावावें, ह्मणजे अग्निदग्धव्रण, विसर्प, कीटव्रण, लूताव्रण, फार दिवसांचे दुष्ट नाडीव्रण जलद बरे होतात. ( ८ ) कडूपडवळाचा काढा आणि कल्क यांनीं शिरसाचें तेल सिद्ध करावें, तें अग्निदग्धव्रण, ठणका, स्राव, दाह आणि फोड यांचा हटकून नाश करितें. ( ९ ) गाईचें तूप लावावें. ( १० ) सांवरीचा कापूस वाटून पाण्यांतून लेप करावा. ( ११ ) त्रिफळा व रेशीम यांची राख तेलाशीं लावावी. ( १२ ) मेण, ज्येष्ठीमध, लोध्र, राळ, मोरवेल, चंदन, मंजिष्ठ यांच्या कल्कांत घृत सिद्ध करून तें लावावें. ( १३ ) पिंपळाच्या सुकलेल्या सालीचें चूर्ण तुपांत कालवून लावावें. ( १४ ) केश जाळून त्याची राख तेलांत खलून लावावी. ( १५ ) राळ बारीक वस्त्रगाळ करून त्यामध्यें तिळांचें तेल व पाणी घालून खलावें, व तें पिसानें अथवा कापसाच्या बोळ्यानें लावावें. ( १६ ) भोंकरीची साल, हिरडा, बेहडा, आंवळकाठी व दारुहळद यांच्या काढ्यांत गोरोचन घालून त्यानें डोळे धुवावे; नंतर डोळ्यांस गाईचें तूप अ० लोणी लावावें, ह्मणजे डोळे भाजले किंवा निवडुंग, रुई, यांच्या चिकानें बिघडले असतां नीट होतात. ( १७ ) रसकापूर, पांढरा काथ एक एक भाग, व अर्धा भाग शेंदूर या तीन जिनसांचा एकत्र खल करून त्याच्या चौपट तूप घेऊन त्यास २१ वेळ पाण्यानें धुवावें व तें काशाच्या ताटांत घालून त्यांत खललेलें औषध टाकून काशाच्या वाटीनें चांगला खल करावा व तें मलम भाजलेल्या भागावर लावावें. या मलमापासून आगंतुकव्रण, उपदंशव्रण, कर्णसंबंधी व्रण व इसब हे रोगही बरे होतात. **आगंतुकव्रणावर**—( १ ) आगंतुकव्रणावर ज्येष्ठीमधाचें चूर्ण व तूप यांचा किंचित् उष्ण लेप करावा. आणि शक्त्यनुसारेंकरून किंचित् पित्तकारक, रक्तशोधक व उष्ण असे पदार्थ व तूपमध हीं रात्रौ सेवन करावीं. ( ३ ) छिन्न, भिन्न आणि विद्ध या प्रकारच्या व्रणाला प्रथम रेशमानें बांधावा, आणि रोगी वारंवार जसा दुःख पावणार नाहीं तसे उपचार करावे. ( ३ ) जात्यादितैल—जाई, कडूनिंब, कडूपडवळ व करंज यांचा पाला, मेण, ज्येष्ठीमध, कोष्ठ, हळद, दारुहळद, कुटकी, मंजिष्ट, पद्मकाष्ठ, लोध्र, हरीतकी, निळें कमळ, मोरचूत, उंपरसाल आणि करंजाचें बीज हे समभाग घेऊन त्यांच्या कल्कांत तैल सिद्ध करावें. तें विषव्रण, संपूर्ण स्फोट, खरूज, कंडू, विसर्प; कृमीचा दंश, शस्त्रप्रहार, दग्ध, विद्ध यांचीं क्षतें; आणि नखें, दंत यांपासून झा-

## २३. वातरक्त. (सुनबहिरी, रक्तपिती.)

**कारण**—लवण, आम्ल, तिखट, क्षार, स्निग्ध, उष्ण, अपक्क, आंबलेलें, शुष्क, अशा पदार्थांचें सेवन व मत्स्यादिकांचें मांस व पेंड, मुळे, कुळिथ, पावटे आदिकरून शिंबी धान्यें; शाकादिक, भाजल्या तिळांची कोंद, इक्षुरस, दहीं, कांजी, आंबलेली पेज, आंबलेलें शिळें अन्न, तक्र, सुरा, मद्य, विरुद्धान्न, अध्यशन इत्यादि पदार्थांच्या सेवनानें; क्रोध व दिवानिद्रा, रात्रौ जागरण, या कारणांनीं प्रायः सुकुमार पुरुष व मिथ्या आहार विहार करणारा; व स्थूल, सुखी अशा मनुष्याचें वातरक्त कुपित होतें. **संप्राप्ति**—हत्ती, अश्व, उंट, यांवरून गमन करणारा, व विदाहजनक अन्न भक्षण करणारा, अशा मनुष्याच्या सर्व शरीरांतील रक्त पायांत दूषित होऊन जमतें. नंतर दुष्टवायूशीं मिळतें. या रोगांत वायूचें प्राबल्य आहे, यास्तव यास वातरक्त असें ह्मणतात. **पूर्वरूप**—फार घाम येतो, किंवा अगदीं येत नाहीं, अंगाला काळसरपणा, स्पर्शाचें अज्ञान, क्षतामध्यें फार ठणका, आळस, अंग गळल्यासारखें होणें, अंगावर गांधी, मांड्या, पोटऱ्या, गुडघे, कमर, खांदे, हात, पाय इत्यादिकांच्या संधींत शूळ, अंगाचें स्फुरण, ठणका, जडपणा, अंगाला बधिरपणा, कंडू, संधीमध्यें शूळ, वारंवार दाह होऊन नष्ट होतो व पुनः दाह होतो, वर्णाचा बदल होतो, व अंगावर मंडलाची उत्पत्ति, हीं वातरक्ताचीं पूर्वरूपें जाणावीं. **असाध्यलक्षण**—जें गुडघ्यापर्यंत व्याप्त झालेलें, भेगावलेलें, स्राव होणारें, व बल, मांस, क्षयादि उपद्रव यांनीं युक्त जें वातरक्त तें असाध्य, व एकवर्षावर झालेलें वातरक्त याप्य जाणावें. **उपचार**—( १ ) गुळवेलीच्या काढ्यांत शुद्ध केलेलें शिलाजित घालून द्यावें. ( २ ) **मंजिष्ठादि काढा**—मंजिष्ठ, कुडा, गुळवेल, नागरमोथा, वेखंड, सुंठ, हळद, दारुहळद, अडुळसा, पित्तपापडा, उपलसरी, अतिविष, धमासा, कंवडळ, वाळा, रिंगणी, कडूनिंबाची साल, कडूपडवळ, कोष्ट, कुटकी, भारंगमूळ, वावडिंग, चित्रक, मोरवेल, देवदार, इंद्रजव, माका, पिंपळी, मेंदी, पहाडमूळ, शतावरी, खैर, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, काटेकिराईत, बकाणानिंब, असाणा, बाहवा, काळें तेड, बांवचा, चंदन, वायवर्णी, करंज, व साग, या समभाग सर्व औषधांचा काढा करून नित्य प्यालें असतां, त्वचेचा दोष, अठरा कुष्ठें, वातरक्त, सुनबहिरी, विसर्प, विद्रधी, व सर्व दोष यांचा लवकर नाश करितो. ( ३ ) लघु मंजिष्ठादि काढा.—मंजिष्ठ, त्रिफला, कुटकी, वेखंड, दारुहळद, गुळवेल, कडूनिंबसाल यांचा काढा, वातरक्त, खरूज, कापालिक कुष्ठ, व रक्तमंडल यांचा नाशक आहे. ( ४ ) अडुळसा, गुळवेल व कुटकी यांचा काढा द्यावा. ( ५ ) गुळवेलीच्या काढ्यांत एरंडेल घालून द्यावें. ( ६ ) सुरवारी हिरड्याचें चूर्ण गुळांत कालवून द्यावें. ( ७ ) मेण, मंजिष्ठ, राळ यांच्या तेलानें किंवा रत्तया बोळाच्या तेलानें अभ्यंग करावें, म्हणजे वातरक्ताची पीडा दूर होईल. ( ८ ) एरंडमूळ, अडुळसा, गुळवेल यांचा काढा घ्यावा. ( ९ ) खैराचा काढा दोन वेळा द्यावा. वर तूप भात आणि निवांत स्थान हें पथ्य सांगावें, ह्मणजे कुष्ठादि सर्व रोगांचा नाश होतो. ( १० ) शुद्ध केलेला कळलावीचा कंद, सुंठ, मिरीं, पिंपळी, मीठ यांचें चूर्ण एकत्र मिश्र करावें. तें मध व गाईचें तूप यांतून १० मासे द्यावें; ह्मणजे अनेक रक्तविकार, पाददोष, पाय फुटतात ते, मर्मांतील दुःख, असाध्य वातरक्त व कुष्ठ यांचा नाश करितें.

( ११ ) गोरखमुंडी व कुटकी यांचें चूर्ण, मध व तूप यांशीं द्यावें. ( १२ ) कडू निंबाच्या पानांचा अंगरस किंवा तो पाला गाईच्या दुधांत वाटून रस काढावा व तो द्यावा. ( १३ ) खजुराचा कल्क काढून त्यांत एरंडेल घालून तो द्यावा; तेणेंकरून वातरक्त व धनुर्वात हे दूर होतात. ( १४ ) मोगली एरंडाच्या बियांचें तेल रोगग्रस्त अशा सर्व जागीं दिवसांतून चार पांच वेळा लावीत जावें. ( १५ ) पांढऱ्या गुलबाशीचा १ तोळा कंद, गाईच्या निरशेदुधांत उगाळून दिवसांतून तीन वेळा घेत जावा. हें औषध सतत ३ महिने घ्यावें. ( १६ ) **अमृताघृत**—गुळवेल आणून थोडी कुटून त्यांत तिचे चौपट पाणी घालून चवथाई पाणी राहीतोंपर्यंत काढा करून त्यांत काढ्याचे चतुर्थांश तूप घालावें, व तुपाचे चतुर्थांश गुळवेलीचा कल्क करून व दूध, तुपाचे चौपट त्यांत घालून, तूप शेष राही तोंपर्यंत पाक करून नंतर तें तूप गाळून पोटांत घ्यावें. तेणेंकरून वातरक्त व कुष्ठ हे रोग लवकर दूर होतात. **पथ्य**—तांबड्या साळी, गहूं, हरभरे, मूग, तुरी, मठ, व शेळी, मेंढी, म्हैस व गाय यांचें दूध, मयाळ, कावळी, वेताचे अंकुर, कुरडू, चाकवत, कारलें, तांदुळजा, पडवळ, आंवळा, आलें, सुरण, शेवगा, साखर, द्राक्षें, जून कोहळा, लोणी, ताजें घृत, कडू पदार्थ. **अपथ्य**—दिवानिद्रा, शेक घेणें, उद्योग, मैथुन, उडीद, कुळिथ, वाल, पावटे, वाटाणे, व खार यांचें सेवन, मांस, विरुद्ध भोजन, दहीं, ऊंस, मुळा, मद्य, विडा, कांजी, तीळ, तिखट, उष्ण, गुरु, चिकट, मीठ व पिठाचे पदार्थ.

## २४. वातरोग.

**कारण**—रूक्ष, शीत, अल्पप्रमाण आणि लघु असें अन्न भक्षण केल्यानें, अति मैथुनानें, अत्यंत जागरण केल्यानें, विषम उपचार केल्यानें दोष ( कफ, पित्त, मल, मूत्र इ० ) आणि रक्त यांचा स्राव केल्यापासून, एकादा खाडा वगैरे उडी मारून ओलांडल्यानें, नदींत वगैरे पोहण्यानें, अति मार्गक्रमण केल्यानें, अत्यंत आयास केल्यानें, अत्यंत विरुद्ध चेष्टा ( उड्या वगैरे ) केल्यानें, रसरक्तादि धातूंचा क्षय झाल्यामुळें, काळजीमुळें, शोक वगैरे यांनीं कृशत्व आल्यामुळें, मळमूत्रादिकांचा वेगरोध केल्यामुळें, आमामुळें, काष्ठादिकांचा अभिघात झाल्यामुळें, उपवास केल्यानें, हृदयादि सर्व मर्मांचे ठायीं अभिघात झाल्यामुळें, हत्ती, उंट, घोडे, इत्यादि शीघ्र यानावर बसण्यानें, कुपित झालेला बलवान् वायु देहांतील रिकामीं स्रोतसें भरून सर्वांग किंवा एकांग व्यापणारे असे नाना तऱ्हेचे व्याधि उत्पन्न करितो. **पूर्वरूप**—त्या वक्ष्यमाण वातव्याधीचें जें अस्पष्ट लक्षण त्यालाच पूर्वरूप असें म्हटलें आहे. तें ज्वरादिकांप्रमाणें विशिष्ट नाहीं, आणि जें रूप व्यक्त होतें, म्हणजे दोषादिभेदेंकरून चागलें दिसण्यांत येतें, तेंच त्याचें लक्षण होय. अपान ह्मणजे वायूच्या चंचलत्वामुळें स्तंभ-संकोच-कंपादिकांचा कदाचित् अभाव होतो, आणि शरीराची लघुता ती वायूनें शोषण केल्यामुळें, अथवा अपाय लघुता—ह्मणजे सर्व वातविकारांचा अपाय म्हणजे अभाव होतो, आणि वातविकारांची लघुता म्हणजे अल्पत्वेंकरून स्थिति निःशेष निवृत्ति होत नाहीं. **नाना प्रकारचे व्याधि करितो** असें सांगितलें ते व्याधि—संधींचा संकोच आणि स्तंभ, अस्थींचा आणि संधींचा भंग, म्हणजे फुटल्यासारखी पीडा, रोमांच, असंबद्ध भाषण, हात, पाय, डोकें यांचा ग्रह—ह्मणजे

जखडणें, खंजत्व, पांगळेपणा, कुबडेपणा, अंगाला सूज, निद्रानाश, गर्भधारण न होणें, शुक्र आणि रज (स्त्रीचें आर्तव) यांचा नाश, कंप, अंगाला मेहरी; मस्तक, नासिका, डोळे, जत्रू आणि मान, हीं आंत जाणें, किंवा वांकडीं होणें; भेदवत्पीडा, टोंचल्याप्रमाणें पीडा, शूळ, आक्षेप, मोह, श्रम, कुपित झालेला वायु, याप्रमाणें लक्षणें करितो. तो, हेतु आणि स्थान यांच्या भेदानें विशिष्ट रोग उत्पन्न करणारा होतो. जसें–कफानें आवृत झाला म्हणजे मन्यास्तंभ करणारा होतो, पक्वाशयांत असला म्हणजे अंत्रकूजनादि करितो. वायुरोग ८० प्रकारचा आहे; त्याचीं लक्षणें आणि नांवें पुढें दिलीं आहेत. **आक्षेपक**—वायु कुपित होऊन संपूर्ण शिरांत शिरून, हत्तीवर बसून जसें मनुष्याचें शरीर डुलतें तसें शरीर वारंवार डोलवितो, त्या वायूला आक्षेपक असें ह्मणतात. **हनुस्तंभ**—वायु कुपित होऊन हनुवटीचा स्तंभ करितो व तोंड आंखडून धरितो, अथवा तोंड 'आ' केल्यासारखें करितो; त्याला हनुस्तंभ असें ह्मणतात. **ऊरुस्तंभ**—वायु, कफ आणि मेद यांशीं मिळून मांड्यांत शिरून, मांड्या जड करून जखडून धरितो, तेणेंकरून मांड्या अचेतन होऊन चालण्याचें सामर्थ्य राहत नाहीं; त्याला ऊरुस्तंभ म्हणतात. **शिरोग्रह**-जो वायु रक्ताश्रित होऊन मस्तकाला धरणाऱ्या ज्या शिरा, त्यांना निस्तेज करून वेदना उत्पन्न करितो; त्याला शिरोग्रह ह्मणतात. तो असाध्य जाणावा. **बाह्यायाम**—जो वायु पाठीकडून मनुष्याला धनुष्यासारखें लववितो त्याला बाह्यायाम म्हणतात. **अभ्यंतरायाम**—जो वायु उराकडून मनुष्यास धनुष्यासारखें लववितो त्याला अभ्यंतरायाम म्हणतात. **पार्श्वशूळ**—जो वायु कोष्ठाचेठायीं कुपित होऊन पार्श्वाचेठायीं शूळ करितो, त्याला पार्श्वशूळ म्हणतात. **कटिग्रह**—जो वायु कंबरेचा स्तंभ करितो त्याला कटिग्रह म्हणतात. **दंडापतानक**—जो वायु दंडासारखा गात्रांचा स्तंभ करितो त्याला दंडापतानक ह्मणतात. **खल्ली**—जो वायु पाय, पोटऱ्या, गुडघे, मांड्या व हात यांचेठायीं क्रमेंकरून शिरून शूळ उत्पन्न करितो, त्याला खल्ली म्हणतात. **जिव्हास्तंभ**—जो वायु वाग्वाहिनी म्हणजे शब्दवाहिनी ज्या शिरा त्यांप्रत जाऊन जिभेचा स्तंभ करितो, तेणेंकरून अन्न पाणी मोठ्या कष्टेंकरून घशांत उतरतें व बोलवत नाहीं; त्याला जिव्हास्तंभ म्हणतात. **अर्दित**—जो मनुष्य उंच पदार्थांना हस्तादिकेंकरून ओळंबून काढून घेतो, फार कठीण पदार्थ भक्षितो, फार हंसतो, अंगावर फार भार घेतो व विषमशयन करितो—म्हणजे झोंपेंत मनुष्याची मान अथवा शरीर वांकडेंतिकडे उंच नीच होतें—इत्यादि सर्व कारणेंकरून वायु कुपित होऊन मस्तक, नाक, ओंठ, गाल, ललाट, डोळे, यांचे संधीप्रत तोंड वांकडें फिरवितो, तेणेंकरून मानही वांकडी होते, मस्तक कांपतें, तोंडांतून शब्द येत नाहीं, भिंवया व डोळे हीं वांकडींतिकडीं होतात; त्या वायूला अर्दित म्हणतात. **पक्षाघात**—वायु अर्ध्या अंगांत जाऊन शिरा व स्नायु यांचें शोषण करून संधींचीं बंधनें शिथिल करीत होत्साता अर्धे अंग चेतनारहित करितो; त्याला पक्षाघात म्हणतात. कोणी अर्धांग वायु म्हणतात. **क्रोष्टुशीर्ष**—वायु मलाश्रित होऊन गुडघ्यांत शिरून सूज उत्पन्न करितो, तेणेंकरून त्या सुजेनें गुडघा, कोल्ह्याचे मस्तकासारखा मोठा होतो आणि त्याचेठायीं वेदना फार होतात; त्याला क्रोष्टुशीर्ष म्हणतात. **मन्यास्तंभ**—जो वायु कफाश्रित होऊन मान स्तंभासारखी स्तब्ध करितो, तेणेंकरून मान इकडेतिकडे फिरवितां येत नाहीं; त्याला मन्यास्तंभ म्हणतात. **पंगुवायु**—वायु कंबरेंत शिरून मांड्यांच्या मोठ्या ज्या शिरा, त्यांप्रत

जाऊन मनुष्याचे दोन्ही पाय लुले करितो; त्याला पंगु ( पांगळा ) म्हणतात. **कलायखंज**—ज्या वायूकरून मनुष्य चालतेवेळेस शरीरेंकरून कांपत कांपत खंजरित पक्ष्यासारखे पाय वांकडेतिकडे करून चालतो; त्याला कलायखंज म्हणतात. **तूनी**—ज्या वायूकरून *पक्वाशय व मूत्राशय यांचेठायीं तिडिक उत्पन्न होऊन, गुद व उपस्थ* यांचेठायीं तिडिक होते; त्याला तूनी म्हणतात. **प्रतितूनी**—ज्या वायूंच्या योगानें गुद व उपस्थ यांचेठायीं तिडिक उत्पन्न होऊन, पक्वाशय व मूत्राशय यांचेठायीं तिडिक उत्पन्न होते; त्याला प्रतितूनी म्हणतात. **खंज**—जो वायु पंगुवायूचे लक्षणेंकरून युक्त असून, मनुष्याचा एक पाय लुला करितो; त्याला खंज (लंगडा) म्हणतात. **पादहर्ष**—जो वायु कफाश्रित होऊन त्यापासून पायांला झिणझिण मेहरी येते; त्याला पादहर्ष म्हणतात. **गृध्रसी**—जो वायु पाठ, कंबर, मांड्या, गुडघे, पोटऱ्या व पाय यांचेठायीं क्रमानें प्रवेश करून, या स्थानांतून त्या स्थानीं असा वारंवार थोडा थोडा फिरत होत्साता स्तंभ व शूळ, क्लेश यांतें करितो; त्याला गृध्रसी म्हणतात. **विश्वाची**—जो वायु हाताचेठायीं तळहाताकडचीं जीं बोटें त्यांजवरल्या ज्या मोठ्या शिरा त्यांप्रत प्रवेश करून, बाहूंपर्यंत त्या शिरांला व्यापून वायूचे कर्मांचा क्षय करितो— म्हणजे हात उचलत नाहीं—त्याला विश्वाची म्हणतात. **अपबाहुक**—जो वायु बाहूमध्यें जाऊन बाहूसंबंधीं शिरांचें आकर्षण करून बाहूंचा स्तंभ करितो—म्हणजे बाहूंला जखडून धरितो—त्याला अपबाहुक म्हणतात. **अपतानक**—जो वायु हृदयांत जाऊन दृष्टीचा स्तंभ करून ज्ञान नष्ट करितो व कंठांतून विलक्षण शब्द होतो आणि तो वायु हृदयांतून निघाला असतां मनुष्य सावध होतो, फिरून हृदयांत गेला असतां पुनः मनुष्य मोह पावतो, त्याला अपतानक म्हणतात. **व्रणायाम**—जो वायु अभिघातनिमित्तेंकरून उत्पन्न झालेल्या व्रणांत शिरून त्यापासून पीडा करितो, त्याला व्रणायाम म्हणतात. **वातकंटक**—मनुष्याचा चालतां चालतां वांकडा अथवा उंचनीच पाय पडला असतां अथवा चालण्याचे श्रम झाले असतां, जो वायु पायांचे घोट्यांत जाऊन वेदना करितो, त्याला वातकंटक ( खुडवात ) म्हणतात. **अपतंत्रक**—जो वायु ऊर्ध्वगति होऊन हृदय, मस्तक, शंख आणि गात्रें यांना पीडित करून धनुष्यासारखें शरीर नमवितो; तेणेंकरून दृष्टि स्तब्ध होते, मोह पडतो व कपोतपक्ष्यासारखा मनुष्य शब्द करितो, त्याला अपतंत्रक म्हणतात. **अंगभेद**—जो वायु सर्वांगास पीडा करितो त्याला अंगभेद म्हणतात. **अंगशोष**—जो वायु सर्व शरीराचें शोषण करितो त्याला अंगशोष म्हणतात. **मिण्मिण**—ज्या वायूकरून नाकांत मनुष्य बोलतो—म्हणजे गेंगणा बोलतो—त्याला मिण्मिण म्हणतात. **कल्लता**—ज्या वायूकरून कंठांतून शब्द स्पष्ट निघत नाहीं, त्याला कल्लता म्हणतात. **अष्ठीलिका**—ज्या वायूकरून नाभीचे अधोभागीं पाषाणासारखी असून उंच, वाटोळी, संचार करणारी अथवा स्थिर, व घन अशी गांठ उत्पन्न होते; मळ, मूत्र, वायु यांचा निरोध करिते, व तिच्याठायीं वेदना मंद असते, त्या वायूला अष्ठीलिका म्हणतात. **प्रत्यष्ठीला**—त्या अष्ठीलिका वायूची गांठ वांकडी, तिरपी, लांबट असून तिच्येठायीं वेदना फार असतात व मळ, मूत्र आणि वायु यांचा निरोध हीं होतात, त्याला प्रत्यष्ठीला म्हणतात. **वामनत्व**—जो वायु दुष्ट होऊन गर्भाशीं मिळून गर्भाला विकृति करितो, तेणेंकरून मनुष्य लहान उत्पन्न होतो; त्याला वामनत्व म्हणतात. **कु-**

ब्जत्व—वायु, शिरागत दुष्ट होऊन त्यापासून पाठीला अथवा छातीला कुबड येतें; त्याला कुब्जत्व म्हणतात. **अंगपीड**—ज्या वायूकरून सर्वांगाला पीडा होते, त्याला अंगपीड म्हणतात. **अंगशूळ**—ज्या वायूकरून सर्वांगास शूळ उत्पन्न होतो, त्याला अंगशूळ म्हणतात. **संकोच**—ज्या वायूपासून सर्वांगाचा संकोच होतो—म्हणजे शिरादिक आंखडतात—त्याला संकोच म्हणतात. **स्तंभ**—ज्या वायूपासून शरीर स्तब्ध होतें त्याला स्तंभ म्हणतात. **रूक्ष**—जो वायु शरीर निस्तेज करितो त्याला रूक्ष म्हणतात. **अंगभंग**—ज्या वायूपासून अंग ठणकतें त्याला अंगभंग म्हणतात. **अंगविभ्रंश**—ज्या वायूकरून शरीराचा एकादा अवयव काष्ठासारखा चेतनारहित होतो, त्याला अंगविभ्रंश म्हणतात. **विड्ग्रह**—ज्या वायूकरून मळाचा अवष्टंभ होतो—म्हणजे मळ साफ होत नाहीं—त्याला विड्ग्रह म्हणतात. **बद्धविट्कता**—पक्काशयामध्यें वायु कुपित होऊन मळाचे खडे करितो, त्याला बद्धविट्कता म्हणतात. **मूकत्व**—ज्या वायूपासून कंठांतून शब्दवर्ण अगदींच निघत नाहीं, त्याला मूकत्व म्हणतात. **अतिजृंभ**—जो वायु दुष्ट होऊन त्यापासून जांभया फार येतात, त्याला अतिजृंभ म्हणतात. **अत्युद्गार**—आमाशयामध्यें वायु कुपित होऊन त्यापासून ढेंकरा फार येतात, त्याला अत्युद्गार म्हणतात. **अंत्रकूजन**—जो वायु पक्काशयांत राहून आंतड्यांत जाऊन शब्द करितो, त्याला अंत्रकूजन म्हणतात. **वातप्रवृत्ति**—जो वायु गुदावाटे फार सरतो त्याला वातप्रवृत्ति असें ह्मणतात. **स्फुरण**—ज्या वायूपासून अंग फुरफुरतें—ह्मणजे जागोजागीं अंग हालतें—त्याला स्फुरण ह्मणतात. **शिरापूरण**—जो वायु शिरागत होऊन शिरा फुगवितो त्याला शिरापूरण म्हणतात. **कंप**—जो वायु सर्व शरीर कांपवितो त्याला कंपवायु म्हणतात. **कार्श्य**—जो वायु सर्व शरीर कृश करितो त्याला कार्श्य ह्मणतात. **श्यावता**—ज्या वायूपासून शरीर श्यामवर्ण होतें त्याला श्यावता म्हणतात. **प्रलाप**—ज्या वायूपासून मनुष्य असंबद्ध भाषण करितो त्याला प्रलाप म्हणतात. **क्षिप्रमूत्रता**—ज्या वायूपासून मनुष्य मुतावयास फार वेळ जातो त्याला क्षिप्रमूत्रता म्हणतात. **निद्रानाश**—ज्या वायूपासून निद्रा येत नाहीं त्याला निद्रानाश असें म्हणतात. **स्वेदनाश**—ज्या वायूपासून शरीरास घाम येत नाहीं त्याला स्वेदनाश म्हणतात. **दुर्बलत्व**—ज्या वायूपासून मनुष्य दुर्बल म्हणजे शक्तिहीन होतें, त्याला दुर्बलत्व म्हणतात. **बलक्षय**—ज्या वायूपासून मनुष्य अगदींच शक्तिहीन होतें त्याला बलक्षय ह्मणतात. **शुक्रातिप्रवृत्ति**—जो वायु शुक्रधातुगत होऊन धातूला क्षणोक्षणीं गळवितो, त्याला शुक्रातिप्रवृत्ति म्हणतात. **शुक्रकार्श्य**—जो वायु शुक्रधातूला किंचित् क्षीण करितो त्याला शुक्रकार्श्य म्हणतात. **शुक्रनाश**—जो वायु शुक्रधातूला फार क्षीण करितो त्याला शुक्रनाश ह्मणतात. **अनवस्थितचित्तत्व**—ज्या वायूपासून चित्त स्वस्थ राहात नाहीं त्याला अनवस्थितचित्त म्हणतात. **काठिण्य**—ज्या वायूपासून शरीर कठिण होतें त्याला काठिण्य ह्मणतात. **विरसास्यता**—ज्या वायूपासून तोंडाचा स्वाद जातो त्याला विरसास्यता म्हणतात. **कषायवक्रता**—ज्या वायूपासून तोंड तुरट होतें त्याला कषायवक्रता ह्मणतात. **आध्मान**—जो वायु पक्काशयांत राहून भात्यासारखें पोट फुगवून गुडगुड शब्द करून पीडा करितो, त्याला आध्मान म्हणतात. **प्रत्याध्मान**—जो वायु आमाशयांत जाऊन कफाला मिळून पोट फुगवून पीडा करितो,

त्याला प्रत्याध्मान ह्मणतात. **शीतता**—ज्या वायूपासून शरीर थंड होतें त्याला शीतता म्हणतात. **रोमहर्ष**—जो वायु त्वचागत होऊन शरीराचेठायीं रोमांच करितो त्याला रोमहर्ष ह्मणतात. **भीरुत्व**—ज्या वायूपासून भय उत्पन्न होतें त्याला भीरुत्व म्हणतात. **भेदवायु**—ज्या वायूपासून सुयांनीं टोंचल्याप्रमाणें पीडा होते त्याला भेद ह्मणतात. **कंडू**—जो वायू शरीरास कंडू उत्पन्न करितो त्याला कंडू म्हणतात. **रसाज्ञता**—ज्या वायूपासून मधुरादिपदार्थांचा स्वाद कळत नाहीं त्याला रसाज्ञता म्हणतात. **शब्दाज्ञता**—ज्या वायूपासून कानानें शब्द ऐकूं येत नाहीं त्याला शब्दाज्ञता म्हणतात. **प्रसुप्ति**—ज्या वायूपासून त्वचेच्या ठायीं स्पर्श केला असतां समजत नाहीं, त्याला प्रसुप्ति म्हणतात. **गंधाज्ञत्व**—ज्या वायूपासून सुगंधाचें अथवा दुर्गंधाचें ज्ञान होत नाहीं त्याला गंधाज्ञत्व ह्मणतात. **दृष्टिक्षय**—ज्या वायूपासून दृष्टीचा नाश होतो, म्हणजे दिसेनासें होतें त्याला दृष्टिक्षय म्हणतात.

**साध्यासाध्य विचार**—हनुस्तंभ, अर्दित, आक्षेप, पक्षघात, अपतानक, हे वातव्याधि बहुत दिवसांनीं मोठ्या प्रयत्नानें साध्य होतात, अथवा कधीं साध्य होत नाहींत; परंतु बलवान् पुरुषाचे हे व्याधि नवे असून उपद्रवरहित असले तर ते साधावे—म्हणजे त्यांवर चिकित्सा करावी. **असाध्य लक्षण**—ज्या पक्षघातादिक वायूंचे ठायीं विसर्प, दाह, शूल, मूर्च्छा, अरुचि, अग्निमांद्य, या उपद्रवांनीं मनुष्याचें बळ, मांस, हीं क्षीण होतात ते वायु असाध्य जाणावे. ज्या वातरोगांत सूज, त्वचेला स्पर्श न समजणें, नानाप्रकारच्या पीडा, शरीरास वक्रता, कंप, पोटफुगी हीं लक्षणें होतात तो असाध्य जाणावा. **वातरोगांवर उपचार**—( १ ) पिंवळा कोरांटा, देवदार, सुंठ, यांचा काढा एरंडेल घालून घ्यावा, म्हणजे वायूनें शरीर जखडलें असलें तरी तो नीट होऊन पाहिजे तसा चालेल. ( २ ) महारास्नादि काढा—रास्ना, एरंडमूळ, गुळवेल, वेखंड, पीतकोरांटा, चवक, किराईत, नागरमोथा, भारंगमूळ, ओंवा, रक्तधमासा, किरमाणी ओंवा, पहाडमूळ, देवदार, वावडिंग, कांकडशिंगी, सुंठ, चिकणामूळ, मोरवेल, कुटकी, मंजिष्ठ, काळें व पांढरें अतिविष, कचोरा, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, पिंपळी, जवखार, रक्तचंदन, बाहव्याचा मगज, कायफळ, कुड्याचे मुळाची साल, रक्तपुनर्नवा, व दशमुळें हीं सर्व समभाग घेऊन त्यांचा अष्टमांश काढा करावा; हा सर्वांगवात, एकांगवात, श्वास, कास, घाम, शैत्य, अतितंद्रा, शूल, तूनी, प्रतूनी, गलरोग, सर्वांगांतला ठणका, कंपवात, खल्लीवात, विश्वाची, श्लीपद, आमवात, संपूर्ण बाळंतरोग, सुप्तिवात, जिह्वास्तंभ, अपतान, ठणका, दुखणें, क्लीबवात, आक्षेपक, कुब्जवात, सूज, आटोप, अपतंत्र, अर्दित, खुडवात, हनुग्रह, गृध्रसी, पादशूल, व वातश्लेष्मव्याधि यांचा नाश करितो. ( ३ ) दुसरा प्रकार—रास्ना २ भाग, धमासा १, चिकणा, एरंडमूळ, देवदार, कचोरा, वेखंड, अडुळसा, सुंठ, हरीतकी, चवक, नागरमोथा, पुनर्नवा, गुळवेल, वरधारा, शोपा, गोखरू, आस्कंध, अतिविष, वाहवा, शतावरी, पिंपळी, कोरांटा, धने, रिंगणी व डोरली हीं समभाग घालून अष्टमांश काढा करून आंत सुंठीचें चूर्ण, किंवा पिंपळीचें चूर्ण, अथवा योगिराजगुग्गुल, अजमोदा, किंवा एरंडेल घालून घ्यावा; म्हणजे सर्वांगवात, कुब्जवात, पक्षघात, अवबाहुक, गृध्रसी, आमवात, श्लीपद, अपतान, अंत्रवृद्धि, आध्मान, जंघावात, जानुवात, अर्दित, शुक्रदोष, मेंढूवात, वंध्येचे

योनिरोग, इतक्यांचा हा नाश करितो. हा गर्भधारक आहे. ( ४ ) मोठ्या चिकण्याचें मूळ, सुंठ, यांचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून घ्यावा; म्हणजे हा शीतवात, कंपवात व दाह, यांचा दोन दिवसांत नाश करितो. ( ५ ) पंचमूलांचा अथवा दशमूलांचा काढा मन्यास्तंभावर घ्यावा. ( ६ ) आस्कंध, चिकणा, मोठा चिकणा, लघुचिकणा, बोर, लघुबोर, रास्ना यांचा काढा वातनाशक आहे. ( ७ ) बिव्याचे तुकडे दीड तोळा व पाणी १६ तोळे, यांचा काढा चतुर्थांश शेष उरवून त्यांत साखर अर्धतोळा, तूप २ तोळे व गाईचें दूध ४ तोळे घालून प्यावा; म्हणजे सर्व वायूंचा नाश होतो. याला समीरदावानल असें म्हणतात. ( ८ ) कडू इंद्रावणी अगर कंवडळीचें मूळ, पिंपळी व गूळ हीं एकत्र करून तें एक तोळाभर भक्षण करावें; म्हणजे संधिवात नाश पावतो. ( ९ ) दशमूळांचा काढा प्राशन करावा अथवा याचेंच नस्य द्यावें; म्हणजे धनुर्वाताचा नाश होतो. ( १० ) एरंडमूळ, बेलमूळ, रिंगणी, डोरली, पादेलोण, मिरीं, सुंठ, पिंपळी, हिंग, महाळुंगाचें मूळ व सैंधव, यांचा काढा द्यावा; म्हणजे धनुर्वाताचा नाश होतो. ( ११ ) उडीद, कुहिलीचें मूळ, एरंडमूळ, लघुचिकणामूळ यांचा काढा, हिंग व सैंधव एक एक मासा घालून घ्यावा; म्हणजे पक्षाघाताचा नाश होतो. ( १२ ) पिंपळमूळ, चित्रक, पिंपळी, सुंठ, रास्ना व सैंधव, यांचा कल्क करून उडदांच्या काढ्याशीं त्याचें तैल सिद्ध करून अंगाला लावावें; म्हणजे पक्षाघाताचा नाश होतो. ( १३ ) उडीद, चिकणामूळ, कुहिलीचें मूळ, कट्तृण, रास्ना, आस्कंद व एरंड यांचा काढा, हिंग व सैंधव घालून प्रातःकाळीं घ्यावा. तो पक्षघात, मन्यास्तंभ, कर्णनाद व अर्दितवायू, यांचा सात दिवसांत नाश करितो. ( १४ ) राळेचें चूर्ण करून त्याचें नलिकायंत्रानें तेल काढावें व अंगाला मर्दन करावें; ह्मणजे पक्षघातवायूचा नाश होतो. ( १५ ) कडू पांढऱ्या भोंपळ्याचें बीं वाटून त्याचा किंवा कडूनिंबाच्या बियांच्या तेलाचा लेप करावा; म्हणजे पक्षवायूचा नाश होतो. ( १६ ) सुंठीचें चूर्ण २८ तोळे, तूप २८ तोळे घालून, ती सुंठ तुपांत भाजावी. नंतर लसूण सोलून वाटून २८ तोळे त्यांत घालावा व अग्निबल पाहून द्यावें; म्हणजे पक्षघात, हनुस्तंभ, कटिभंग, बाहुपीडा व वातरोग यांचा नाश होतो. ( १७ ) उडदांचें पीठ किंवा वडे लोण्याबरोबर खाऊन दशमूळांचा काढा प्यावा; म्हणजे अर्दितवायूचा नाश होतो. ( १८ ) लसुणाचा कल्क तिळांचें तेल मिळवून प्यावा; म्हणजे अर्दितवायूचा नाश होतो. ( १९ ) त्रिफळा, कडू लिंबाच्या लिंबोळ्या, अडुळसा व कडू पडवळ यांचा काढा करून, त्यांत गुग्गुळ घालून द्यावा; म्हणजे अर्दित वायूचा नाश होतो. ( २० ) चार तोळे किंवा दोन तोळे लसुणीच्या रसांत हिंग, जिरें, सैंधव, पादेलोण व त्रिकटु, हीं प्रत्येक मासाप्रमाण घेऊन चूर्ण करून घालावीं. नंतर यथाशक्ति भक्षण करावें; याला अनुपान एरंडमूळांचा काढा, हा प्रातःकाळीं दररोज एक महिना सेवन केला असतां, सामान्य वातरोग, अर्दित, अपतंत्रक, एकांगवात, सर्वांगवात, ऊरुस्तंभ, गृध्रसी, शूल, हृद्रोग, कृमि, कटिरोग, पृष्ठरोग व पोटांतला वायु, इतक्यांचा नाश होईल. ( २१ ) हनुग्रह, हनुस्तंभ, मानेचा स्तंभ व अर्दित यांवर दशमुळें व पिंपळी यांचा काढा द्यावा, किंवा पिंपळाच्या रसांत पिंपळी घालून द्यावी. ( २२ ) लसूण सोलून तिळांच्या तेलांत वाटून सैंधव घालून खावा; म्हणजे हनुस्तंभ दूर होतो. ( २३ )

एरंडेल गोमूत्रांत घालून एक महिनापर्यंत सेवन करावें; म्हणजे तें गृध्रसी व ऊरुस्तंभ यांचा नाश करील. (२४) तेल किंवा तूप यांशीं आलें व महाळुंगाचा रस प्यावा किंवा आंवट चुक्याचा रस व गूळ हीं एकत्र करून प्यावीं; म्हणजे कंबर, मांड्या, पाठ, व माकडहाड या ठिकाणचा शूल, गुल्म, उदावर्त, व गृध्रसीवायु यांचा नाश होईल. (२५) एरंड्या सोलून कुटून त्यांची दुधांत शिजवून लापशी करावी. ही सेवन केली असतां कंबरेचा शूल व गृध्रसी यांचा नाश होईल. (२६) बकाणनिंबाच्या मुळाचा अथवा नागाचा कल्क घ्यावा; म्हणजे गृध्रसीचा नाश होतो. (२७) अडुळसा, दंतीमूळ व बाहवा यांचा काढा एरंडेल मिश्र करून प्यावा; म्हणजे ज्याचें चालणें बंद झालें, स्पर्श कळत नाहीं, अशा गृध्रसीवायूचा रोगी शीघ्र गमन करणारा होईल. (२८) मंदाग्नी-वर केलेला काळ्या निर्गुंडीच्या पानांचा काढा प्यावा म्हणजे गृध्रसीचा नाश होईल. (२९) आस्कंध व खडीसाखर यांचें चूर्ण तुपाशीं द्यावें; म्हणजे कटिशूलाचा नाश होतो. (३०) गुळवेल व त्रिफला यांचे काढ्यांत गुग्गुळ घालून प्यावा. अथवा ४ तोळे दु-धाशीं १ तोळा एरंडेल अथवा वरधारेचें चूर्ण सेवन करावें; म्हणजे क्रोष्टुशीर्षाचा नाश होतो. (३१) दूध, तेल, तूप, किंवा साठके भाताबरोबर दोन दोन तोळे लसूण चढत्याप्रमाणानें सात दिवस भक्षण केला असतां, वातापासून झालेले व्याधि, विषमज्वर, शूल, गुल्म, अग्निमांद्य, प्लीहा; व भुज, पार्श्व, आणि मस्तक यांचा शूल व शुक्रदोष यांचा नाश होतो. (३२) सुंठ, एरंडमूळ, देवदार, गुळवेल व कोरांटा, यांचा काढा घेतला असतां, आस्थिगत व संधिगत वायूचा नाश होतो (३३) अहाळीव, खसखस, खारीक, मेथ्या, तीळ, शोप, बाळंतशोप, गोडंब्या, बदाम, डीक व चारोळ्या हीं प्रत्येक ४ तोळे, व गूळ, तूप हीं प्रत्येक ३२ तोळे घेऊन यांचे दोन तोळ्यांचे लाडू करावे. त्यांतून प्रातःकाळीं एक भक्षण करावा. तो कटिवायूचा नाश करितो व धातूचें स्तंभन आणि धातूची वृद्धि करितो. (३४) पिंपळमूळ दुधांत वाटून, त्यांत अडुळशाचा रस घालून द्यावें; म्हणजे ऊर्ध्ववात (फार ढेंकरा येणें) नाश पावतो. (३५) **लघुरास्नादि-काढा**—रास्ना, एरंडमूळ, देवदार, वेखंड, सुंठ, धमासा, हरीतकी, अतिविष, नागर-मोथा, शतावरी व अडुळसा, यांचा काढा प्राशनार्थ द्यावा; ह्मणजे खोकला, आमवात, श्लेष्मवात, संधिवात; व मज्जा, अस्थि व स्नायु यांतील वायु आणि सर्वांगवायु हे निश्चयानें नाश पावतात. (३६) **आभादिचूर्ण**—बाभळीचें बीं, रास्ना, गुळवेल, शतावरी, महाशतावरी, सुंठ, बडीशेप, आस्कंध, शेरणी, वरधारा, ओंवा, अजमोदा, हीं समभाग घेऊन यांचें चूर्ण करून यूष तक्र, ऊन पाणी, तूप व दह्यांचा मंड यांतून एका अनु-पानाशीं २ तोळेप्रमाणें खावें; म्हणजे अस्थि, स्नायु, मज्जा व कंबर या ठिकाणचा वायु, गृध्रसी, मन्यास्तंभ, हनुग्रह व कोष्ठगत रोग या सर्वांचा नाश होईल. हें चूर्ण सर्वव्याधि-नाशक आहे. (३७) **अजमोदादि चूर्ण** द्यावें. (३८) **अजमोदादिवटी**—ओंवा, पिंपळी, वावडिंग, बडीशोप, नागरमोथा, मिरीं व सैंधव हीं प्रत्येक एक एक भाग, हरीतकी ५ भाग, सुंठ १० भाग, वरधारा १० भाग, व भारंगमूळ ३६ भाग याप्रमाणें औषधाचीं चूर्णें घेऊन गुळाच्या पाकांत वटी करावी. ती गरम पाण्याशीं द्यावी; म्हणजे संधिवात, आमवात, संपूर्णवात, आढ्यवात, हनुस्तंभ, शिरोवात, अपतानकवात; व भ्रु-कुटि, आंख, कान, नाक, डोळे व जीभ यांचा स्तंभ; पंगुवात, सर्वांगवात, एकांगवात

आर्दित, पादहर्ष, पक्षाघात यांचा नाश होतो. ( ३९ ) मिऱ्यांचें चूर्ण, तूप आणि तुळशीचा रस, याला लघुराजमृगांक ह्मणतात. हा संपूर्ण वातरोगांचा नाश करितो. ( ४० ) **लशुनपाक**—लसूण चांगला सोलून ६४ तोळे घेऊन १०२४ तोळे दुधांत १६ तोळे तूप घालून शिजवावा. त्याचा चांगला पाक होऊन मधुवर्ण झाला ह्मणजे त्यांत १२८ तोळे साखर, सुंठ, मिरीं, पिंपळी, दालचिनी, एलची, तमालपत्र, नाकेशर, पिंपळमूळ, चवक, चित्रकमूळ, वावडिंग, हळद, दारुहळद, शेरणी, वरधारा, पुष्करमूळ, ओंवा, लवंगा, देवदार, पुनर्नवा, गोखरू, कडूनिंब, रास्ना, शोप, शतावरी, कचोरा, आस्कंध व कवचबीज, यांचीं प्रत्येकीं तोळा तोळा चूर्ण घालून तयार करावा. हा अग्नि व बल पाहून सेवन करावा; ह्मणजे संपूर्ण वातरोग, शूल, अपस्मार, उरःक्षत, गुल्म, उदर, वांति, प्लीहा, अंडवृद्धि, कृमि, मलबंध, आनाहवात, सूज, अग्निमांद्य, बलक्षय, उचकी, दमा, खोकला, अपतंत्रकवात, धनुर्वात, अंतरायाम, पक्षाघात, अपतानवायु, अर्दितवायु, आक्षेपक, कुब्ज, हनुग्रह, शिरोग्रह, विश्वाची, खल्ली, गृध्रसी, पंगु, संधिवात, बधिरपणा, व संपूर्णशूल, यांचा अतिजलद नाश करितो. हा लशुनपाक वातव्याधिरूप हत्तीचा सिंहासारखा नाश करितो, आणि कफव्याधीला शांत करून बल व पुष्टि यांना करितो. ( ४१ ) वातव्याधीवर निर्गुडीच्या पानांचा पेंड बांधावा. ( ४२ ) इंद्रजव, चित्रक, सुंठ यांचें चूर्ण तुपाशीं द्यावें; तें संपूर्ण वातविकारांचा नाश करितें. ( ४३ ) दशमूळाच्या काढ्यांत किंवा कल्कांत तैल सिद्ध करून तें अंगास लावावें; म्हणजे अनेक प्रकारच्या वायूंचा नाश होतो. ( ४४ ) मालकांगोणी, चंद्रसूर ( रानमेथी ), कलौंजी, जिरें, ओंवा, मेथ्या व तीळ यांचें चूर्ण करून, त्याचें यंत्रांत तेल काढावें व अंगास लावावें, म्हणजे सर्व वातव्याधींचा नाश होतो. ( ४५ ) नारायणतैल—शतावरीच्या मुळांचा रस, तेल व दूध हीं प्रत्येक ६४ तोळे व वायवरणा, टेंटू, देवदार, शिलाजित, जटामांसी हीं प्रत्येक चार तोळे घेऊन, कल्क घालून तैल सिद्ध करावें; याला नारायणतैल म्हणतात. हें अनेक प्रकारच्या वातव्याधींवर अभ्यंगार्थ योजिलें असतां हितकारक होतें. ( ४६ ) रुईच्या चिकाचा जाड लेप देऊन, त्यावर मोहरीची बारीक पूड बसवून पट्टा बांधिला असतां, चमक भरणें, अंग धरणें वगैरे वातविकार दूर होतात. ( ४७ ) वायवर्ण्याचा पाला बारीक वाटून लेप करावा व वर केळीचें पान बांधावें; म्हणजे गुडघे, सांधे वगैरे धरले असतां ते सुटतात व चमक आणि तिडकाही राहतात. ( ४८ ) विशेष धूप व गुग्गुळ एकत्र वाटून पाण्यांत कालवून गरम करून लेप द्यावा व त्यावर अहाळींव बसवावें; म्हणजे याच्या लेपानें वातसंबंधीं अनेक प्रकारच्या वेदना व सूज हीं दूर होतात. ( ४९ ) वावळ्याची व शेवग्याची साल बारीक कुटून, धरलेल्या किंवा आंखडलेल्या जागीं पेंड बांधावा. हा दोन तीन वेळ लाविला असतां गुण येतो. ( ५० ) **माषतैल**—उडीद ६४ तोळे घेऊन ते २५६ तोळे पाण्यांत पचन करावे, चतुर्थांश शेष राहिला म्हणजे त्यांत तिळांचें तेल ६४ तोळे व जीवनीयगणाचीं आठ औषधें—ऋद्धि, वृद्धि, मेदा, महामेदा, काकोली, क्षीरकाकोली, रानमूग, रानउडीद,—बडीशेप, सैंधव, रास्ना, कुहिलीच्या बिया, ज्येष्ठमध, चिकणा, सुंठ, मिरीं, पिंपळी, गोखरू, हीं प्रत्येकीं तोळा तोळा घेऊन त्यांचे कल्क घालून तैल सिद्ध करावें; तें पक्षघात, अर्दितवायु, कर्णशूल, बाधिर्य, तिमिररोग, सन्निपातजरोग, हस्तकंप, शिरःकंप, बाहुशोष, अपबाहुक व कलायखंज

यांवर पोटांत घेणें किंवा अंगास लावणें, बस्तिकर्म, यांविषयीं योजावें. हें माषतैल ऊर्ध्वजत्रुगतरोगनाशनाविषयीं श्रेष्ठ आहे. (५१) **लघुमाषतैल**—उडीद, सैंधव, चिकणामूळ, दशमुळें, हिंग, वेखंड, शतावरी व सुंठ, हे पदार्थ घेऊन तैल सिद्ध करावें; तें सर्व वातनाशक आहे. (५२) **कल्याणकावलेह**—हळद, वेखंड, कोष्ठ, पिंपळी, सुंठ, जिरें, अजमोदा, ज्येष्ठमध व तूप, यांचा लेह ( चाटण ) एकवीस दिवस सेवन केला असतां, तो बहिरेपणा, तोत्रेपणा व मुकेपणा यांचा नाश करून चांगला मेघासारखा, किंवा नौबतीसारखा गंभीर किंवा कोकिळासारखा मंजुळ शब्द करितो. (५३) आल्याचा रस ८।· शेवग्याचा रस ८।· शेळीचें दूध ८।· पाणी शेर एकत्र करून तेल ८।· घालून कढवावें. पाणी जळून तेल उरलें म्हणजे गाळून ठेवावें. हें तेल वायूला फार चांगलें आहे. **पथ्य**—दूध, तूप, तेल, गोड असे रस; नवे तीळ, गहूं, उडीद, एक वर्षाचे जुने साळे तांदूळ, कुळिथांचें कढण, पडवळ, शेवगा, लसूण, डाळिंब, आंबा, स्निग्ध व उष्ण असे भक्ष्यपदार्थ. **अपथ्य**—चिंता, जागरण, मलमूत्रांचा अवरोध, वमन, श्रम, उपवास, चणे, वाटाणे, देवभात, कांग, हरीक, सांवे, चवळ्या, मूग, जांभळें, कचरा, सुपारी, भिशीं, वाल, ताडफळ, कारलें, शिंबीधान्य, पत्रशाक, उंबर, थंड पाणी, विरुद्ध अन्न, क्षार, शुष्कमांस, रक्तस्राव; तुरट, कडू, तिखट हे रस; मैथुन, वाहनांवर बसून फिरणें.

## २५. वांतिरोग ( ओकारी ).

**कारण**—अति अजीर्ण, अति खारट, अति अप्रिय पदार्थ यांचें भक्षण, अति शीघ्र भोजन करणें, अति पातळ पदार्थ खाणें, अकाळीं भोजन करणें, श्रम, भय, उद्वेग व अति चिळस वाटणारे पदार्थांचें दर्शन किंवा भक्षण, व तशा पदार्थांचे दुर्गंध घेणें, या कारणांनीं वांति उत्पन्न होते. **उपचार**—( १ ) आंवळकाठीचें चूर्ण, चंदनाचें गंध व मध यांशीं द्यावें. ( २ ) बाळहरीतकी, मध, लाह्या, आंवळकाठी, हीं तोळा तोळा घेऊन त्यांत पाणी १६ तोळे घालून हातानें चोळून गाळून द्यावें. ( ३ ) सैंधव तुपांत द्यावें. ( ४ ) मधपोळीचें मेण मधांतून द्यावें. ( ५ ) कावळीची मुळी व हिंग हीं एकत्र करून द्यावीं. ( ६ ) हरीतकीचें चूर्ण मधांत द्यावें. ( ७ ) वावडिंग, त्रिफळा, सुंठ यांचें चूर्ण मधांत द्यावें. ( ८ ) पिंपळाच्या झाडावरील खपल्या जाळून पाण्यांत विझवून तें पाणी गाळून द्यावें. म्हणजे वांति व उचकी यांचा नाश होतो. ( ९ ) बेलाचे सालीचा अ० गुळवेलीचा काढा मध घालून द्यावा, म्हणजे त्रिदोषजनितवांति दूर होते. ( १० ) पित्तपापड्याचा काढा मध घालून द्यावा. ( ११ ) वाळलेल्या निंबाची राख मधांतून द्यावी. ( १२ ) मसुरा भाजून पीठ करून मग पिकल्या डाळिंबाच्या दाण्यांचें पाणी करून, त्यांत तें पीठ कालवून भक्षावें; म्हणजे त्रिदोषजन्य वांति दूर होते. **पथ्य**—तांदूळ, मूग, वाटाणे, गहूं, जव, आंवळे, बोरें, साखर, कवींठ, डाळिंब, नारळ, ईडनिंबू. **अपथ्य**—उष्ण पदार्थ, दुध्या भोपळा, तोंडलें, डांगर, व्यायाम, दुष्ट अन्नपान.

## २६. विद्रधिरोग ( गळूं ).

**कारण व लक्षण**—आपल्या कारणेंकरून वातादि दोष कुपित होऊन, त्वचा,

रक्त, मांस व मेद, यांस दूषित करून, अस्थि ह्मणजे हाडें यांप्रत जाऊन हळू हळू मोठा घोर व ज्यांचीं मुळें फार खोल व उत्पत्तिकालापासून पीडायुक्त व वाटोळा अथवा लांबट असा ग्रंथिमय शोथ ( सूज ) उत्पन्न करितात; त्या रोगास विद्रधि म्हणतात. **उपचार**—( १ ) वड, उंबर, पिंपळ, पिंपरी अथवा पारोसा पिंपळ आणि वेत या पंचवल्कलांच्या साली शेवग्याच्या रसांत वाटून लेप करावा. ( २ ) हिराकस, सैंधव, शिलाजित, हिंग, यांच्या चूर्णानें मिश्रित वायवर्ण्याचा काढा, आंतला अपक्क, मोठा, शोफयुक्त, अशा विद्रधीचा नाशक आहे. ( ३. ) श्वेतपुनर्नवा व वायवर्णी यांच्या मुळांचा काढा द्यावा. ( ४. ) धमाशाचें मूळ तांदुळांच्या धुणांत उगाळून मध घालून प्यावें. ( ५. ) हिरडा, सैंधव, धायटीचें फूल यांचें चूर्ण, मध व तूप यांशीं खावें. ( ६. ) शेवग्याचा डीक, हिंग व सैंधव, यांचें चूर्ण प्रातःकाळीं सेवन करीत जावें. ( ७. ) शेवग्याचें मूळ पाण्यांत उगाळून त्यांत मध घालून प्यावें व त्याच रसांत बचनागाचें चूर्ण घालून लेप करावा; म्हणजे अंतर्विद्रधीचा नाश होईल. ( ८. ) **गळवें पिकवण्यास**.—सातू, गहूं, मूग, जवस, ताग, यांतून एकाचें पीठ शिजवून त्याचें पोटीस बांधावें; म्हणजे थोड्या अवकाशांत अपक्क विद्रधि पक्क होतो. ( ९ ) चिकण्याचा पाला वाटून वर बांधावा; म्हणजे विद्रधि पक्क होऊन फुटेल. ( १० ) मोरचूत व साबण किंवा टाकणखार उगाळून लेप करावा; म्हणजे पक्क झालेली सूज फुटेल. ( ११ ) पुंगळवेलीचा पाला वाटून वर बांधावा; म्हणजे पक्क झालेली सूज क्षणांत फुटेल. **पथ्य**—सांवे, तांदूळ, कुलित्थ, लसूण, वाल, कारलें, तूप, तेल, मूग, पडवळ, तापवून थंड केलेलें पाणी. **अपथ्य**—सुकलेल्या शाका, गूळ, दहीं, खिचडी, अम्ल, लाह्या, फार खाणें, दाहक पदार्थ, मैथुन.

## २७. विषरोग.

विष तीन प्रकारचें आहे. स्थावर, जंगम आणि दूषीविष. मूलादिक विष तें स्थावर; जें सर्पादिकांचे विष तें जंगम; आणि विषनाशक औषधींनीं हतवीर्य झालेलें विष, किंवा वणवा, वारा आणि ऊन्ह यांणीं शोषून टाकिलेलें, जें स्वभावानें व गुणानेंच कमी आहे व जुनें झालेलें असें स्थावर-जंगमात्मक विष, तें दूषीविष जाणावें. विषाद ह्मणजे खेद करितें ह्मणून विष ह्मणतात. **स्थावरविष**—मूळ, पान, फळ, फूल, साल, चीक, नार, डीक, धातु व कंद असें १० प्रकारचें स्थावरविष आहे. **जंगमविष**—दृष्टि, निश्वास, दंत, नख, मूत्र, पुरीष, शुक्र, लाळ, केश, चिमटा, विशर्धित ह्मणजे पादणें, गुद, अस्थि, पित्त, शूक, आणि शव अशीं १६ प्रकारचीं जंगमविषें आहेत. **दूषीविष**—देश, काल, अन्न, व दिवानिद्रा, यांणीं वारंवार दूषित झालेलें विष, शरीरधातूला दुष्ट करितें; ह्मणून त्याला दूषीविष ह्मणतात. दूषीविष हें दोन प्रकारचें आहे; एक कृत्रिम, दुसरें गरसंज्ञक. सविष पदार्थांपासून जें होतें तें कृत्रिमविष आणि निर्विष द्रव्यांच्या संयोगापासून जें होतें तें गर असें जाणावें. **विष प्याल्याचें लक्षण**—वातयुक्त व घेरोशासारखा अशा मळाचा अतिसार होतो. आणि तोंडावाटे फेंसाची वांति होते; त्यानें विष प्यालें असें जाणावें. **स्थावर-विषाचें सामान्य लक्षण**—स्थावर-विषापासून ज्वर, उचकी, दांत शिवशिवणें, गळा धरणें, तोंडांतून फेंसाचा स्राव, ओकारी, अरुची, श्वास, मूर्च्छा इ०उपद्रव

होतात. **कंदविषाचें सामान्य लक्षण**—उग्र वीर्य अशीं कंदविषें तेरा आहेत. हीं सर्व दशगुण जाणावीं. जें स्थावर, जंगम आणि कृत्रिम विष दहा लक्षणांनीं युक्त असेल तें तत्काल मारितें. **जंगमविषाचें लक्षण**—जंगमविषाच्या योगानें झोंप, तंद्रा, ग्लानि, दाह, अन्नाचा अपाक, रोमांच उभे राहणें, सूज आणि अतिसार हीं लक्षणें होतात. **विषाचीं दहा लक्षणें**.—रूक्ष, उष्ण, शीत, सूक्ष्म, आशुकारी, व्यवायि, विकाशी, विशद, लघु आणि अपाकि हे दहा विषाचे गुण जाणावे. **मूलादि विषांचीं लक्षणें**.—मूलविषानें हाता-पायांला रेंपा येतात, बडबडतो व मोह पावतो. पत्रविषानें जांभया, कंप, श्वास, मोह हे विकार होतात. फलविषानें तोंड सुजतें, दाह, अन्नद्वेष हीं होतात. पुष्पविषानें ओकारी, पोट फुगणें, श्वास हे होतात. साल, नार, डीक या तीन प्रकारच्या विषांनीं तोंडाला दुर्गंधि, अंगाला खरखरीतपणा, डोकें दुखणें, तोंडांतून कफस्राव हे होतात. क्षीरविषानें तोंडाला फेंस, ढाळ व जीभ जड होते. धातुविषानें उरांत दुखतें, मूर्च्छा येते, टाळ्याचा दाह होतो. **दूषीविषलक्षण**—दूषीविष हें अल्पवीर्य आहे; म्हणून तत्काळ मारक होत नाहीं. दूषीविषानें पीडित झालेल्या मनुष्याला ढाळ होतात, त्याचा रंग पालटतो, तोंडाला घाण येते, रुचि राहत नाहीं, तृषा लागते, मूर्च्छा येते, घेऱ्या येतात, तुटकतुटक बोलतो, वांति होते, वेडेचार करितो, व त्याला चैन पडत नाहीं. **दूषीविषाचीं आणखी लक्षणें**—दूषीविषानें झोंप, जडपणा, जांभया, अंगाला शिथिलता, रोमांच उठणें, अंग मोडणें, हीं पूर्वीं होऊन जेवल्यावर हर्ष वाटणें, अन्नपचन न होणें, अरुचि, अंगावर नानाप्रकारचीं मंडलें, चकंदलें व गांधी उठणें; मांसक्षय, हातापायांस सूज, मूर्च्छा, वांति, ढाळ, श्वास, तृषा, ज्वर, उदररोग, हे विकार होतात; व आणखी नानाप्रकारचे विकार होतात ते असे:—एकाद्या विषापासून उन्माद, एकाद्यापासून दाह, एकाद्यापासून नपुंसकत्व, खेद, कुष्ठ, विसर्प, मोठे फोड असे नानाप्रकारचे रोग उत्पन्न होतात. आपल्या हातीं सर्व मिळकत किंवा अधिकार यावा किंवा पतीनें आपल्या आज्ञेनें वागावें; याकरितां बायका आपल्या नवऱ्यास विषाऱ्या प्राण्याचा घाम, विटाळ, अंगावरील ठिकठिकाणचे मळ, अन्नांत मिसळून देतात; किंवा शत्रु, गरविषाचा प्रयोग करितात; त्या योगानें मनुष्य पांढरा फटफटीत होतो, त्याचा अग्नि मंद होतो, ज्वर येतो, मर्माला पीडा होते, पोट फुगतें, हातापायांला सूज येते, उदररोग, ग्रहणीरोग, राजयक्ष्मा, पांडु, गुल्म, क्षयजन्यज्वर या व्याधींचीं व दुसऱ्या अशा प्रकारच्या अनेक व्याधींचीं लक्षणें होतात. **स्थावर–जंगम–विषावर सामान्य उपचार**—सैंधव, मिरें समभाग व या दोहींचे बरोबर निंबोळ्या घेऊन वाटून मध–तुपाबरोबर खाव्या; म्हणजे स्थावर–जंगम–विषाचा नाश होतो. सर्पविष. **सर्पांच्या जाति व त्यांचीं लक्षणें**—भोगी, मंडली, राजील हे क्रमानें—वात, पित्त, कफ, अशा प्रकृतीचे आहेत. अंतर म्हणजे दोघांचा ज्यांत विशेष आहे; असें उदाहरण—कृष्णसर्पापासून मंडल किंवा घोणस यांच्याठायीं झालेले सर्प, किंवा घोणसापासून झालेले सर्प, अथवा काळ्या नागिणीचेठायीं घोणसापासून झालेले, याप्रमाणें दुसऱ्या मिश्रजाति कल्पाव्या;—ते द्वंद्व प्रकृतीचे सर्प. भोगी म्हणजे ज्या सर्पाला फणा असून रंग काळा असतो तो. राजिल म्हणजे ज्यावर चित्रविचित्र रेषा असतात तो. चक्र, नांगर, छत्र, स्वस्तिक, अंकुश यांतें धारण करणारे व फणा करणारे आणि शीघ्र गमन करणारे असे असतात त्यांना, दर्वीकर (नाग)

म्हणतात. सर्पांत अनेक जाति आहेत; परंतु त्या सर्वच विषारी नसतात. विषारी सर्पास वरचे जाभाड्याचे आंतले बाजूस एक मांजराच्या नखासारखी दांतांची जोडी असते; हे दांत नेहमीं मिटलेले असतात व त्या दांतांचा मध्यभाग पोकळ असतो, व टोंकास एक छिद्र असतें. दांतांच्या मागच्या बाजूस टाळ्यांत एक पिशवी असते. त्या पिशवीचें तोंड दांतांस जोडलेलें असतें, यामुळें साप जेव्हां दंश करितो तेव्हां हे दांत बाहेर काढून जोरानें मनुष्याचे कातडीवर मारितो; त्यासरशी कातडीस जखम होते आणि विषाच्या पिशवींतला पातळ पदार्थ दांतांच्या टोंकांतील छिद्रावाटे जखमेंत पडतो. **भोगीप्रभृति सर्पांनीं केलेल्या दंशांचें लक्षण**—कृष्णसर्पानें केलेला दंश काळा असतो आणि सर्व वातविकारांना करितो, मंडलीचा डांस पिंवळा असतो, सूज मऊ असते व सर्व पित्तविकार करितो, आणि राजिलाचा डांस बुळबुळीत व तुळतुळीत असतो; त्याची सूज टणक असते व त्यांतून दाट रक्त निघतें आणि सर्व कफाचे विकार होतात. फुरसें हा सर्प वीत दीडवीत लांब असून अंगुष्ठाइतका जाड असतो; याचा रंग काळसर जांभळा असतो. फुरशाच्या दंशानें राजिलाच्या दंशाप्रमाणेंच विकार होतात. कांडरास फणा नसते. हा सर्पाप्रमाणेंच असतो. याच्या दंशानें सर्वांगांतील रक्ताचा कफ होतो व तो कफ घशापर्यंत येऊन घसा भरतो. घोणस हा हिरव्या रंगाचा असतो. यांत आग्या घोणस व कुसडा घोणस अशा दोन जाति आहेत. आग्या घोणसाच्या दंशानें सर्वांगाचा अग्नि लागल्याप्रमाणें दाह होतो. अंगावर मोठमोठ्या गांठी येतात. मूत्रस्थानीं फारच सूज येते व वारंवार थेंब थेंब लघवी होते. कुसड्या घोणसाच्या दंशानें प्रथम दंशस्थानीं खाज उठते व चार प्रहरांत ती जागा कुजल्यासारखी होऊन दिवसेंदिवस ती फैलावत जाऊन अंगही कुजतें. मण्यार हे सर्प वितीपासून दोन वितींपावेतों लांब व हाताच्या आंगठ्याएवढे जाड असतात. त्यांचा रंग हिरवा व जांभळा असतो. मण्यारींत तीन चार जाति आहेत. एक जातीची मण्यार आहे ती रात्रीं अंगावरून गेली अथवा तिची छाया अंगावर पडली असतां सूर्योदय होण्याच्या संधीस मनुष्य निचेष्ट पडतें. दुसऱ्या जातीची मण्यार आहे तिनें अंग चाटलें असतां किंवा कोणत्याही पदार्थावर तिची गरळ पडलेली असून तो पदार्थ खाण्यांत आला अथवा ती गरळ अंगास लागली असतांही विष बाधतें. या विषाराच्या योगानें घेऱ्या येतात. हिची छाया बाधत नाहीं. तिसऱ्या जातीच्या मण्यारीचा दंश दिवसा झाला तर रात्र होण्यापूर्वीं व रात्रीं झाला तर सूर्योदय होण्यापूर्वीं मनुष्यास विषार बाधतो. **सर्पदंश ओळखण्याची खूण**—अशी आहे कीं, विड्याचें पान क्षतावर चेपून धरावें म्हणजे विषार असल्यास क्षताइतकाच त्या पानावर अग्नीनें शेकून चट्टा पडल्याप्रमाणें डाग पडेल; व हेंच पान चुरून दंशावर चोळलें असतां दंश काळसर होईल; विषार नसल्यास हा प्रकार होणार नाहीं. सर्पदंश झालेल्या मनुष्यास मिरची, मीठ व कडूनिंबाचा पाला खाण्यास दिला असतां त्यास या पदार्थांची रुचि अगदीं समजत नाहीं. त्यास हे पदार्थ अगदीं गोड लागतात, यावरूनही सर्पदंश झाला किंवा नाहीं हें समजतें. काळी माती खाण्यास द्यावी, तिखट लागेल तर सर्पदंश व गोड लागेल तर उंदराचें विष असें जाणावें. करवंदीचें मूळ पाण्यांत उगाळून थोडें पाजावें. विषार असल्यास वमन होणार नाहीं, नसल्यास वमन होईल. सर्पदंश झालेल्या मनुष्यास औषध देऊन उतार झाल्याबरोबर त्यास वरील तिन्ही पदार्थ खाण्यास दिले तर त्यास त्यांची रुचि

समजते. याजकरितां हे पदार्थ त्यास खाण्यास देऊन औषध गुणावह झालें कीं नाहीं तें अवश्य पहावें. सर्पदंश झाल्याबरोबर पहिला उपाय हा करावा कीं, तत्क्षणीं सर्प चावलेल्या जाग्याचे वरचे बाजूस अजमासें चार बोटें अंतरावर एक दोरी अथवा फडकें घेऊन जोरानें तो भाग आंवळावा, तेणेंकरून विषानें मिश्रित झालेलें रक्त तेथल्या तेथेंच राहतें. सर्व शरीर व्यापून टाकीत नाहीं. नंतर जखमेस टोंचून तींतून रक्त वाहूं द्यावें, म्हणजे तो मनुष्य दगावण्याची भीति नसते. रक्त बरेंच वाहून गेल्यावर ती जखम कोलतीनें भाजून काढावी; म्हणजे तेथें लागलेलें विष जळून जातें. **असाध्य लक्षणें**.—पिंपळाखालीं, देवळांत, स्मशानांत, वारुळाजवळ, बागांत, जुन्या विहिरींत, वडाखालीं, वाळलेल्या वृक्षाखालीं, वृक्षावर हीं स्थानें व संध्याकाळीं चव्हाट्यावर, भरणी नक्षत्रीं आणि मर्मस्थानीं सर्पदंश झाला असतां तो मनुष्य असाध्य जाणावा. आर्द्रा, मघा, मूळ, कृत्तिका, भरणी, श्रवण, विशाखा, पूर्वा, चित्रा, हीं नक्षत्रें; पंचमी, अष्टमी, पौर्णिमा, अमावास्या, चतुर्दशी, या तिथि; मध्याह्न, सायंकाळ, प्रातःकाळ, मध्यानरात्र, यावेळीं आणि मर्मस्थान, यांच्याठायीं दंश झाला असतां जर मनुष्यादिकांचें साह्य असेल तर मोठ्या कष्टानें वांचतो. अजीर्ण, पित्त, सूर्यसंताप यांणीं पीडलेले, बाळ व म्हातारे, कृश झालेले, व्रणरोगी, मेही, कुष्ठी, रूक्ष, निर्बळ आणि गरोदर स्त्री यांना सर्पदंश झाला असतां तत्काळ मारितो. ज्याचें सर्वांग विषव्याप्त झालें त्याला कापल्यास रक्त येत नाहीं, मारिल्यास वळ उठत नाहीं व थंड पाणी अंगावर घातलें तरी अंगावर रोमांच उभे राहत नाहीं; तो रोगी साध्य नाहीं. ज्याचें मुख वांकडें होतें, केंस गळतात, नाकाचें अग्र वांकडें होतें, मानेचा कांटा मोडल्यामुळें मान सांवरत नाहीं व चावल्याजागीं लाल व काळी अशी सूज येते, हनुवटी खिळते, हालत नाहीं, अशा लक्षणांनीं युक्त रोग्यास वैद्यानें सोडावें. ज्या मनुष्याच्या तोंडावाटे दाट लाळेचा लोंढा वाहतो, व नाक, तोंड, गुद, यांतून रक्त स्रवतें व चार दांत लागलेला तो असाध्य जाणावा. अत्यंत उन्मत्त झालेला व ज्वर अतिसार इत्यादि उपद्रवांनीं व्याप्त, बोलण्यास शक्ति नाहीं, व काळा ठिक्कर पडलेला, नाक मोडून कुलक्षणांनीं युक्त झाला, व ज्याला वेग आणि गोळा उचलत नाहीं, असा विषरोगी किंवा मळमूत्रादि वेगरहित, असा रोगी असाध्य जाणावा. **सर्पदंशावर उपचार**.—(१) वांझकर्टोलीचा कांदा पाण्यांत उगाळून प्यावा आणि लेप करावा; म्हणजे सर्प, उंदीर, मांजर, विंचू इत्यादिकांच्या विषांचा नाश होतो. (२) तांदुळजाच्या मुळ्या तांदुळाच्या धुवणांत वाटून द्याव्या. (३) तूप, मध, लोणी, पिंपळी, आलें, मिरीं, सैंधव हीं एकत्र करून भक्षावीं. (४) शिरसवृक्षाच्या फुलांच्या रसांत मिऱ्यांना सात भावना देऊन त्याचें सेवन व अंजन करावें. (५) करंजाचें फळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, बेलमूळ, हळद, दारुहळद, तुंबरूचीं (तिरफळाचीं) फुलें व शेळीचें मूत यांचें अंजन करावें. (६) कळलावीचा कंद पाण्यांत वाटून त्याचें नस्य द्यावें. (७) रुईची मुळी पाण्यांत उगाळून प्राशनार्थ द्यावी. (८) पाण्यांत टांकणखार घालून प्राशनार्थ द्यावा. (९) तुरटीचा खडा डोळ्यांतून फिरवावा व पाणी करून प्यावें. (१०) रिठ्याचें पाणी करून प्यावें व अंजनही करावें. (११) पारव्याची विष्ठा, मनुष्याचे केश, गाईचें शिंग, मोराचे पिसाचा शेंडा, सातू, धणे, तूस, कापसाच्या सरक्या, शिळ्या माळा, यांचा धूप घरामध्यें करावा, तेणेंकरून सर्प व उंदीर हे घरांतून पळून जातात. (१२) पांढऱ्या गुंजेचें मूळ

उगाळून प्यावें. ( १३ ) सापसंदीचें मूळ उगाळून प्यावें. ( १४ ) नागदवणीचें मूळ उगाळून प्यावें म्हणजे सर्व विषें उतरतात. ( १५ ) पांढऱ्या कण्हेरीचें मूळ पाण्यांत उगाळून तें शक्तीप्रमाणें पाजावें. ( १६ ) देवडांगरीचें फळ पाण्यांत वाटून पाजावें. ( १७ ) नागवेलीचें मूळ विड्यांत घालून विडे १।२।३ द्यावे. ( १८ ) कडूइंद्रावणीचें मूळ विड्यांत घालून खावें. ( १९ ) गुळवेल पाण्यांत वाटून प्यावी म्हणजे उलटी होऊन विष उतरतें; अथवा गुळवेलीचा कांदा अगर मूळ सर्पविषानें मूर्च्छित झालेल्या मनुष्याच्या टाळवेवर फांसण्या घालून चोळावें म्हणजे विष उतरतें. गुरांस हें देणें झाल्यास जिभेवर चोळावें. ( २० ) लसुणाच्या रसांत समुद्रफळ उगाळून अंजन करावें. ( २१ ) पांढऱ्या चांफ्याची व बेलाची साल एकत्र कुटून त्यांचा रस पाजावा. ( २२ ) एरंडाचे पाल्याचा रस काढून त्यांत थोडें पाणी घालून तो पाजावा. ( २३ ) दवण्याचे मुळ्यांचा रस द्यावा. ( २४ ) कडूनिंबाचा पाला चावून खात जावा, सर्पविष अंगांत आहे तोंपर्यंत गोड लागेल. विष उतरल्यावर कडू लागेल. **फुरशाचे विषावर**—( १ ) भुयपाडळीचें ( वासनवेलीचें ) मूळ उगाळून पोटांत द्यावें. ( २ ) तांबड्या कुंभ्याच्या सालीचा रस मिरपूड घालून द्यावा. उतार काळे तुळशीचा रस द्यावा. ( ३ ) धायटीचें मूळ पाण्यांत उगाळून द्यावें व कंवडळीचें मूळ उगाळून दंशावर व अंगावर लावावें. ( ४ ) फांगळ्याचें अगर घोटवेलीचें मूळ उगाळून ३ तोळे पर्यंत पोटांत द्यावें. ( ५ ) कांजीच्या वेलीचें मूळ उगाळून द्यावें. ( ६ ) शेराच्या डिऱ्या पानांत गुंडाळून फुंफाट्यांत वाफून काढाव्या व त्याचा रस संध्येच्या दोन पळ्यापर्यंत पिण्यास द्यावा आणि थोडा टाळवेवर व दंशस्थानीं चोळावा. ( ७ ) काळ्या कुड्याचें मूळ उगाळून पाजावें. ( ८ ) सर्पाक्षीचा रस पाजावा. ( ९ ) सर्पदंशावरील उपचार करावे. **फुरशाच्या विषानें मूत्रावरोध झाल्यास**—पळसाचीं फुलें वाफून नाभीच्या खालीं बांधावीं. विषार उमळून रक्त वाहूं लागल्यास सागाचे कोंवळे अंकुर बारीक वाटून पाण्यांत कालवून तें पाणी ७ तोळेपर्यंत पिण्यास द्यावें; अथवा धायटीचे कोंवळे अंकुर व ७ मिरें एकत्र कुटून गोळी करून खाण्यास द्यावी. **सूज** आल्यास—धोत्र्याच्या पाल्याचा रस काढून ऊन करून त्यांत कुळित्थांचें पीठ घालून निवाल्यावर सुजेवर लावावा अथवा उकशीचें मूळ गोमूत्रांत उगाळून वर लावावें. डोकीस **भार** चढेल तर—काळ्या कुड्याचें मूळ उगाळून डोकीस लेप द्यावा. **पोटांत दुखेल** तर—तेंच पोटांत घेण्यास द्यावें. **शोष** लागल्यास—आंवळीची साल खाण्यास द्यावी. पोटांत विषाचें **पेढ** धरेल तर—अगस्त्याच्या झाडाची उत्तरेकडील साल पाण्यांत उगाळून पोटांत द्यावी. अंगावर विष **गोठल्यास**—कडू कारेल्याचा पाला ऊन करून अंगास पेंड बांधावा अथवा त्याचाच रस अंगास चोळावा. **कांडराचे विषावर**—( १ ) रिठ्याचें पाणी करून वारंवार पाजावें. ( २ ) दोन तीन गुंजा मोरचूत भाजून लाही करून ती दह्यांतून द्यावी. **घोणसाचे विषावर**—( १ ) घोणसकांड्याच्या रसांत घणसरीचें मूळ, रिठा व कडू कारेलें वाटून गोमूत्र घालून दंशावर लेप द्यावा. ( २ ) कुडकाचें मूळ पाण्यांत उगाळून थोडथोड्या अवकाशानें पोटांत द्यावें. ( ३ ) घणसरीचें मूळ व सुंठ उगाळून तें पोटांत द्यावें; व गांठी वगैरे आल्यास लेप द्यावा. ( ४ ) भारंगमूळ पाण्यांत उगाळून द्यावें. ( ५ ) गुरांस घोणसकांड्याचा रस शेरभर द्यावा. **मण्यारीचे विषावर**—( १ ) काळ्या तुळशीचा रस पिण्यास द्यावा व

मस्तकावर चोळावा. ( २ ) धायटीचे पाल्याचा रस पोटांत द्यावा व मस्तकावरही चोळावा. ( ३ ) काजूचे सालीचा रस शक्तीप्रमाणें पावशेर पासून अच्छेर पर्यंत पोटांत द्यावा व त्यावर दूर्वांचा रस द्यावा; व ताळवेवरही रस चोळावा. ( ४ ) सर्पदंशावरचे उपचार करावे. **श्वानविष**—कुत्र्याचे कफाधिक दोष ज्ञान वाहणाऱ्या नाडींत राहून ज्ञान नाहींसें करितात आणि धातुक्षोभ करितात, त्या योगानें तोंडांतून लाळ गळते, तो आंधळा व बहिरा होऊन इकडे तिकडे धांवतो; त्याचें शेंपूट, हनुवटी, खांदे गळतात; डोकें दुखतें व तोंड खालीं होतें, हीं पिसाळलेले कुत्र्याचीं लक्षणें जाणावीं. **कुत्र्याच्या दंशाचें लक्षण**—पिसाळलेला कुत्रा डसला म्हणजे तोंडास मेहरी येते, त्यापासून काळें रक्त वाहतें, त्या योगानें छातींत व मस्तकांत दुखतें, ताप येतो, अंग ताठतें, तहान लागते, मूर्च्छा येते, बुद्धिभ्रंश, संताप, श्वास, कास, नेत्रांना पीतता, मुतांत किडे, उन्माद, कुत्र्यासारखें भोंकणें, दुसऱ्या मनुष्यास चावणें, इत्यादि लक्षणें होतात. त्याच्या उपायाला कालातिक्रम झाल्यावर पावसाच्या प्रारंभीं तो विशेष विकल होतो व असाध्यही होतो, आणि हें विष केवल वातप्रधान असून सर्व दोष कोपवितें. जो रोगी पाण्याचा शब्द, स्पर्श व अवलोकन यांच्या योगानें भितो, त्याला "जलसंत्रास" असें वैद्यकांत नांव दिलें आहे. हा असाध्य जाणावा. वर सांगितलेल्या लक्षणांवरून दंष्ट्राप्रहार करणारे कोल्हे, खेंचर, घोडे, अस्वल, चित्ता, वाघ, लांडगा, मांजर, इत्यादिकांच्या दंशाचें लक्षण जाणावें. **सविष व निर्विष दंशाचें लक्षण**—कंडू, टोंचणी, रंग बदलणें, मेहरी, लस, ज्वर, भ्रम, दाह, लाली, ठणका, सूज, व्रण पिकणें, गांठी आंकसणें, व्रण फाटणें, फोड, कर्णिका, मंडलें हीं लक्षणें सविष दंशाचीं जाणावीं. यांच्या विपरीत लक्षणें दृष्टीस पडलीं तर निर्विष आहे असें जाणावें. पिसाळलेलें कुत्रें चावलेला रोगी निरोगी मनुष्यास चावला तर त्यासही तो दंश बाधतो. **असाध्य लक्षण**—ज्या प्राण्याचा दंश ज्यास झाला आहे तो त्या प्राण्यासारख्या चेष्टा करितो, ओरडतो; व आरसा, पाणी वगैरे पदार्थांमध्यें त्याचेंच प्रतिबिंब पाहतो तो रोगी नाश पावतो. **कुत्र्याचे विषावर**—( १ ) काळ्या उंबराचें मूळ व धोतऱ्याचें फळ हीं तांदुळाच्या धुणांत वाटून द्यावीं. ( २ ) कुचल्याच्या बिया तुपांत परतून त्या दुधांत उगाळून, रोज वृद्धीनें सेवन कराव्या व कुचल्याची बी उगाळून दंशावर लेप करावा. ( ३ ) अघाड्याचें मूळ एक तोळा कुटून मधावरोबर खावें व दंशावर कोरफडीचें पान व सैंधव बांधावें; म्हणजे तीन दिवसांत कुत्र्याचे विषाचा नाश होतो. ( ४ ) बाभळीच्या पाल्याच्या रसांत गाईचें तूप व कस्तूरी घालून तें प्राशनार्थ द्यावें. ( ५ ) देवबाभळीचें ताजें मूळ थंड पाण्यांत एक तोळ्यापासून चार तोळेपर्यंत उगाळून त्यांत थोडें पाणी घालून प्रत्यहीं दुवक्त पिण्यास द्यावें. दि० ७. ( ६ ) कुत्रें चावल्याबरोबर तो डांस भाजून काढावा, म्हणजे रोगी दगावणार नाहीं. ( ७ ) शतावरीच्या मुळांचा रस व गाईचें तूप एकत्र करून प्राशन करावें. ( ८ ) गूळ, तेल व रुईचा चीक यांचा दंशावर लेप करावा. ( ९ ) तिळाचें तेल, तिळकूट, गूळ, रुईचा चीक हीं समभाग घेऊन एकत्र करून प्यावीं. ( १० ) कोंबड्याचे विष्टेचा लेप करावा. ( ११ ) बकाणनिंबाच्या मुळांचा रस काढून तो पोटांत घ्यावा. ( १२ ) जुना गूळ, कडू भोंपळा, गुरगुडीचा कीट व झिंझरुटीचें बीं हीं एकत्र कुटून पोटांत द्यावीं. दि० ३. ( १३ ) कडू दोडक्याच्या आंतील शिरें पाण्यांत कोळून तें पाणी पिण्यास

द्यावें. विषाचा जोर जसजसा कमी होत जाईल तसतशी या औषधापासून वांति होऊं लागेल. ( १४ ) पिकलेल्या रानकेळ्यांचें बीं वाटून पाण्यांत कालवून प्यावें व दंशावरही लेप द्यावा. ( १५ ) अंकोलमूळाचा काढा तूप घालून प्यावा. ( १६ ) घोड्याच्या लेंड्या दोन व मिरें अडीच हीं पावशेर पाण्यांत कालवून तें पाणी पाजावें. (१७) बाभळीच्या पानांचा रस प्रत्यहीं चार पैसेभार, तीन दिवसपर्यंत द्यावा. (१८) पुनर्नव्याचा रस द्यावा. ( १९ ) रिंगणीचा रस तूप घालून द्यावा. ( २० ) पाथरीचा काढा तूप घालून द्यावा. लूताविष· **लूता ( कोळी, कांतण ) दंशाचें सामान्य लक्षण**—लूतांनीं दंश केला असतां तो सडतो व त्यांतून रक्त वाहतें; आणि ज्वर, दाह, अतिसार व त्रिदोषरोग, नानाप्रकारचे फोड, मोठमोठीं मंडलें व मोठी, मऊ, काळी, तांबडी, हिरवी, निळीं व चंचळ अशी सूज येते. **दूषीविषलूतांचें दंशलक्षण**—ज्या दंशाचा मध्यभाग काळासांवळा, जाळ्यासारखा, वर उचललेला, वारंवार पिकणारा, लस वाहणारा, असा असतो, त्यामुळें अंगावर गांधी व ज्वर हे होतात. **प्राणहर-लूता-विष लक्षण**—सर्पाचा मल व मूत्र यांपासून, किंवा मेलेला सर्प सडून कुजतो त्यापासून दूषीविष असे किडे होतात, ते प्राणनाशाला कारण आहेत; त्यांचे डांस सुजतात, व ते पांढरे, काळे, तांबडे, पिंवळे, असे होतात, त्यांवर पुरळ येतो व रोग्यास ताप येतो, दाह होऊन उचकी लागते व कपाळशूळ होतो. **लूताविषावर**—( १ ) हळद, दारुहळद, मंजिष्ठ, पतंग व नागकेशर यांना थंड पाण्याशीं वाटून लेप करावा, तो तत्काळ लूताविषांचा नाश करितो. ( २ ) काळी व पांढरी गोकर्ण, भोंकर, पहाडमूळ, रक्त व श्वेत पुर्नवा, कंवठ व शिरसाच्या झाडाचें बीज यांना वाटून लेप करावा. ( ३ ) काळ्या तुळशीचे पाल्याचे रसांत पांढरी गुंज व पांढरी गोकर्ण यांचीं मुळें उगाळून तें पोटांत द्यावें. **आखु( उंदीर )विषलक्षणें**—विषारी उंदीर चावला असतां डांसांतून रक्त वाहतें, तें पांढरें असतें, अंगावर मंडलें उठतात व ज्वर, अरुचि, अंगांत शहारे आणि अंगाचा दाह, हीं लक्षणें होतात. प्राणहर–मूषकविषलक्षण—मूर्च्छा येते, उंदराचे अंगासारखी सूज येते, रंग बदलतो, क्लेद, बहिरेपणा, ज्वर, मस्तकाला जडत्व व तोंडांतून लाळ व रक्त यांची वांति, अशीं लक्षणें झालीं तर प्राणहर–उंदराचा दंश जाणावा. **उंदिराचे विषावर**—( १ ) घेरोसा, मंजिष्ठ, हळद व सैंधव हीं वाटून लेप द्यावा. ( २ ) पांढऱ्या घोसाळीचीं पानें वाटून लेप द्यावा. ( ३ ) सापाच्या कांतणीची धुरी तीन दिवस द्यावी व पथ्य करावें. ( ४ ) चित्रकाच्या मूळांचें चूर्ण तेलांत पचन करावें; तें वस्त्यानें ब्रह्मरंध्रावर क्षत करून त्यावर चोळावें; म्हणजे उंदराचें विष नाश पावतें. ( ५ ) चिंच ४ तोळे, घेरोसा २ तोळे जुने तुपांत खलून तें ७ दिवस खावें. ( ६ ) पारा, गंधक, कापूर, घेरोसा, शिरस, हीं रुईचे चिकांत वाटून लेप करावा; म्हणजे तो सर्व विषांचा नाशक व विशेषेंकरून उंदिराचे विषाचा नाशक आहे. ( ७ ) सुंठ, मिरें, पिंपळी, कडूनिंबाच्या निंबोळ्या, सैंधव यांचें ३ मासे चूर्ण, साखर व मध यांशीं द्यावें. ( ८ ) उंदीरकानीच्या पाल्याचा अंगरस १ तोळ्यापासून २ तोळेपर्यंत द्यावा व अंगासही चोळावा. दि० ७. अ० उंदीरकानीचा कांदा गाईच्या दुधांत वाटून प्यावा. ( ९ ) अघाड्याच्या कोंवळ्या तुऱ्यांचा रस काढून तो मधाशीं ७ दिवस द्यावा अथवा अघाड्याचें बीं मधांतून द्यावें. ( १० ) हेंदीच्या अंकुराचा रस ४ पैसेभार व तूप दोन पैसेभार एकत्र

करून द्यावें. ( ११ ) भारंगमूळ पाण्यांत उगाळून अदमासें पावशेर पोटांत द्यावें व अंगास लावावें. चढ झाल्यास गाईचें निरसें दूध पाजावें. ( १२ ) कडू दोडकीचा लेप द्यावा. ( १३ ) खऊट खोबरें मुळ्याच्या रसांत उगाळून लेप करावा. ( १४ ) तुळशीचे रसांत अफू खलून लावावी. नखदंतविष. **नखदंतविषावर**—कडूनिंब, शमी व वडाचे पारंबे यांच्या कल्कांत गरम पाणी घालून त्याचा दंशावर थलक द्यावा; म्हणजे नखें, दांत, यांच्या दुःसह संपूर्ण विषांचा नाश होईल. **कृकलास( सरड )दष्टलक्षण.**—सरडा चावला असतां अंगाचा हिरवा, काळा, निळा, किंवा अनेकप्रकारचा रंग होतो, व त्या रोग्याला भ्रांति, अतिसार हे होतात. **सरड्याचे विषावर**—( १ ) रुईचें मूळ थंड पाण्यांत वाटून द्यावें. ( २ ) नारळीच्या कोंवळ्या पात्या पाण्यांत उगाळून त्यांत अमसूल घालून ऊन करून लेप द्यावा. **वृश्चिक( विंचू )विष.** - **उत्पत्ति**—सर्पाची विष्ठा, मूत्र व मळ उकिरड्यावर पडून कुजलेला असतां त्यापासून विंचू, इंगळा इत्यादिक उत्पन्न होतात. **वृश्चिकविषलक्षण**—विंचू चावला असतां त्या जागीं पहिल्यानें अग्नि लागल्यासारखी आग होते; नंतर ती पीडा ऊर्ध्वगतीनें शरीरामध्यें भेद करिते; नंतर दंशस्थळाजवळ येऊन फुणफुण राहते. **असाध्यवृश्चिकदंशलक्षण.**—हृदय, नाक, जीभ, या जागीं विंचू डसला असतां आणि मांस गळून अत्यंत वेदना होऊं लागल्या असतां मनुष्य मरतो. **विंचवाचे विषावर**—( १ ) कापशीचा पाला व मोहऱ्या वाटून त्याचा किंवा बचनागाचा लेप करावा. ( २ ) पांढरी वसु किंवा कापशी यांचें मूळ रविवारीं काढावें, त्याचें चर्वण केलें असतां अ० लेप केला असतां विंचवाचें विष उतरतें. ( ३ ) जेपाळ पाण्यांत वाटून लेप करावा म्हणजे तत्काल विष उतरतें. ( ४ ) नवसागर व हरताल पाण्यांत वाटून लेप करावा म्हणजे तत्काल विष उतरतें. ( ५ ) मोरचूत दह्यांत उगाळून लावावा व शेकावें. ( ६ ) थोडा रिठा गुळांतून खावा अथवा रिठ्याचें धूम्रपान करावें. ( ७ ) हिंग रुईचे चिकांत वाटून लेप करावा. ( ८ ), तांदुळजाचा रस साखर घालून द्यावा. ( ९ ) शेराचा चीक लावावा. ( १० ) कडूनिंबाचा पाला चावून वाफ जाऊं न देतां दंशाच्या विषमभागाकडील कानांत फुंकावा अथवा कडूनिंबाच्या पाल्याचें धूम्रपान करावें. ( ११ ) हळदीची पूड व मोराच्या पंखाचा डोळा चिलमींत घालून ओढून धूर गिळावा व दंशस्थानीं धुरी द्यावी. ( १२ ) चिंचोका भाजून वरील साल काढून टाकावी आणि डांसाचे ठिकाणीं तो जोरानें दाबावा. ( १३ ) पाण्यांत तुरटीची पूड घालून तें पाणी डोळ्यांत घालावें. ( १४ ) पांढऱ्या सावरीचें मूळ पाण्यांत भिजवून विंचू चावलेल्या ठिकाणापासून एक बोट अंतरावर धरून, तें चावलेल्या ठिकाणापर्यंत तसेंच वारंवार ओढीत जावें; म्हणजे विंचवाचे वेग मूळाबरोबर खालीं उतरत जातात; व चावल्या ठिकाणींही हें मूळ एक बोटभर अंतरावर धरावें म्हणजे वेदना कमी होत जातात. वेदना कमी झाल्या नाहींत तर मूळ उगाळून दंशावर लावावें. ( १५ ) धोत्र्याचा पाला हातावर चोळून दंशावर लावावा. ( १६ ) अघाड्याचें मूळ चावून खावें व दंशावर लेप द्यावा. **उच्चिडिंगविषलक्षण**—उच्चिडिंग ( इंगळी ) ही एक विंचवाची जाति आहे. ही डसली असतां अंगावर रोमांच उभे राहतात; शिश्न ताठतें; फार वेदना होतात व सर्वांगावर गार पाणी ओतल्याप्रमाणें वाटतें. **इंगळीचे दंशावर**—( १ ) कापशीचें लांकूड उगाळून लेप द्यावा; अथवा कापशीचा

पाला, बचनाग व मोहऱ्या वाटून लेप करावा. (२) रानहुऱ्याचा चीक लावावा. **मंडूकविषलक्षण**—मंडूक (बेडूक) चावला असतां त्याचा एक दांत लागतो, तेथें पिंवळी सूज येते, ठणका, तहान, ओकारी व निद्रा हीं लक्षणें होतात. **मंडूकविषावर**—(१) शिरसवृक्षाचें बीं निवडुंगाच्या चिकांत वाटून लेप करावा. **मत्स्यविषलक्षण**—विषयुक्त मत्स (मासा) चावला असतां दाह, सूज व शूल हीं लक्षणें होतात. **मत्स्यविषावर**—(१) काळ्या वेताच्या कल्कांत तूप घालून कढवून त्याचा लेप करावा. (२) मोराच्या पिसाची धुरी द्यावी. **पालीचें विषलक्षण**—दाह होतो, सूज येते, टोंचणी लागते, घाम येतो व अंगावर तांबूस रंगाच्या पुटकळ्या उठतात. **पालीचे विषावर**—(१) करटोलीचा कांदा पाण्यांत उगाळून द्यावा. **शतपदी (घोण, गोम) विषलक्षण**—गोम चावली असतां चावल्याजागीं घाम येतो, शूल होतो व आग होते. **शतपदीचे विषावर**—(१) पेटलेल्या तेलाचा थंड करून लेप करावा; किंवा हळद, दारुहळद व मनशीळ यांचा लेप करावा. (२) गुग्गुळाचा धूर द्यावा. (३) काळी खजूर तेलांत उगाळून लेप द्यावा. (४) गूळ जाळून लावावा. (५) बदामांचें तेल चोळावें. **मशक (डांस) दष्टलक्षण.**—सूज येते, कंड सुटते व थोडी पीडा होते. डोंगरावर विषारी डांस असतात त्यांच्या डांसाचें क्षत असाध्य कीटकाच्या क्षताप्रमाणें असाध्य होतें. **सविषमक्षिकादंशाचें लक्षण.** सविष माशी चावली असतां त्या ठिकाणीं काळी गांध येते, ती लागलीच वाहूं लागते, व त्या जागीं आग होते; तिच्या योगानें मूर्च्छा व ज्वर येतो; या मक्षिकांमध्यें स्थविका (आघी) नामक जी मक्षिका आहे ती प्राण घेणारी जाणावी. **चतुष्पादादिकांचें साधारण विषलक्षण.**—व्याघ्रादि चतुष्पाद जनावरें व मनुष्य–वानरादि द्विपाद यांच्या नखांचें व दांतांचें विष सुजतें, पिकतें, वाहतें व ताप येतो. **विष उतरल्याचें लक्षण.**—ज्या पुरुषाचे वातादिदोष निर्मळ झाले, रक्तादिधातु आरोग्यावस्थेंत असल्याप्रमाणें असतात, अन्नावर इच्छा होते, मळमूत्र साफ होतात, शरीराची कांति, इंद्रियें, मन व इंद्रियांचे व्यापार चांगले होतात, त्या रोग्याचें विष उतरलें म्हणून समजावें. **गांधीलमाशीचे विषावर**—मिरीं, सुंठ, संचळ (पादेलोण) यांना नागवेलीच्या रसाशीं वाटून लेप करावा. **माशा, वनमाशा, मधमाशा, मुंग्या, मुंगळे** यांच्या दंशावर वारुळाची काळी माती व त्रिफला यांचा गोमूत्राशीं लेप करावा. **सर्व कीटविषावर**—वेखंड, मिरीं, सुंठ, पिंपळी, हिंग, वावडिंग, सैंधव, गजपिंपळी, पहाडमूळ, अतिविष यांचा काढा करून प्यावा. **मक्षिकापिटिकेवर**—रिठा, लघुराळेचा वृक्ष, पाथरी, हंसपादी, हळद, दारुहळद व गेरू यांचा लेप माशीच्या दंशसंबंधीं पिटिकेचा नाश करितो. **भ्रमरविषावर**—(१) सुंठ, पारव्याची विष्ठा, हरताळ व सैंधव यांचा महाळुंगाच्या रसाशीं खलून लेप करावा. (२) म्हशीचें लोणी लावावें. (३) निवडुंग व पिंपळी वाटून लेप द्यावा. **विषावर वमन**—कडू घोसाळीचा काढा मध तूप घालून प्यावा, अथवा कडू भोंपळ्याचें मूळ किंवा पानें पाण्यांत वाटून प्यावीं ह्मणजे विषाचा नाश होतो. **विषावर लेप**—शिरसवृक्षाचें मूळ, साल, पानें, फुलें व बीज, हें पंचांग घेऊन गोमूत्रांत वाटून लेप करावा, तो अत्यंत विषनाशक आहे. **परिषेक**—संपूर्ण जातीचें विष अत्यंत उष्ण

व तीक्ष्ण आहे, याकरितां त्या सर्वांवर थंड पाण्याचा अभिषेक करावा. विषामध्यें उष्णता व तीक्ष्णता आहे म्हणून तें पित्ताला कोपवितें; याकरितां प्रथम वामक औषधें देऊन नंतर शीतळ पाणी अंगावर शिंपावें. **सोमलाचें विष. लक्षणें**—सोमल पोटांत गेल्यावर अर्ध्या किंवा एक तासांत विषप्रयोग झाल्याचीं चिन्हें दिसूं लागतात. ग्लानि येते, पोटांत आग होऊं लागते, वांति होऊं लागते, पोटांत अतिशय दुखूं लागतें; नंतर जुलाब होऊं लागतात व अतिशय तहान लागते. लघवीस अतिशय आग असून एक दोन थेंबच पडतात, सर्वांगाचा दाह होऊन आजारी तळमळूं लागतो. डोळे लाल झालेले असतात व जीभ पांढरी होते. **सोमलावर उपचारः**—(१) वमन होण्याचे उपाय योजावे. एक किंवा दोन तोळे मोहऱ्यांची पूड व थोडें मीठ हीं पावशेर गरम पाण्यांत घालून पिण्यास द्यावीं; म्हणजे उलट्या होऊं लागतील. चांगली वरचेवर वांति होण्याकरितां गरम पाणी पिण्यास द्यावें. पोटांतील आग कमी होण्याकरितां पुष्कळ दूध किंवा दहीं पिण्यास द्यावें व तें वांतीच्या योगानें पाडून टाकावें. (२) इसबगोल पाण्यांत कुसकरून, गाळून, त्यांत बेदाणा, दहीं व गुलाबपाणी हीं मिश्र करून प्यावीं; म्हणजे सोमलाचें विष उतरतें. (३) शेवग्याचे सालीचा रस ४ पैसे भार व दूध अच्छेर एकत्र करून द्यावें. (४) काथाचें पाणी करून वारंवार पाजावें; अथवा गाईच्या दुधांत काथ उगाळून द्यावा. (५) तांदुळजाचा रस साखर घालून द्यावा. (६) कडूनिंबाच्या पाल्याचा रस द्यावा. (७) अदपाव लोण्यांत ६ मासे मिऱ्यांचें चूर्ण द्यावें. (८) गुरांस ढोरगुंजेच्या (आस्कंधाच्या) मुळ्या ताकांत वाटून त्यांत शिकेकाईच्या दोन चार बियांचें चूर्ण घालून तें पाजावें. (९) केळीच्या सोपांचा पावशेर रस पोटांत घ्यावा. **तांब्याचा कळंक. लक्षणें**—ज्या तांब्याच्या भांड्यास कल्हई नाहीं त्यांत अन्न ठेविलें असतां तें कळंकतें व तें खाल्लें असतां, जीभ सुकी व पोळल्यासारखी होते; पोटांत फार दुखतें; रक्ताचा झाडा होतो व उलट्या होतात. यावर उलट्या होण्याचे उपाय करावे. **जंगलाचें विष**—जंगल ही हिरव्या रंगाची पूड आहे. हींत सोमल असल्यामुळें ती पोटांत गेली असतां सोमलाप्रमाणेंच विकार होतात. **जंगलाचे विषावर.**—सोमलावरचे उपाय करावे. **हरताळ व मनशील यांचीं विषें.**—या दोन्ही पदार्थांत सोमल असतो; यांच्या विषाचीं सोमलाप्रमाणें लक्षणें होतात. **हरताळ, मनशीळ व जंगल यांचे विषावर**—(१) सोमलावरचे उपचार करावे. (२) जिरें व साखर ७ दिवस द्यावी. (३) कोहळ्याचा रस द्यावा. (४) धमासा, राजहंस, पिंवळी जुई, किराईत, यांतून एकाचा काढा द्यावा. (५) सर्पाक्षीचा रस साखरेंत द्यावा. (६) पांढऱ्या गोकर्णीच्या पाल्याचा रस द्यावा. (७) अळशीचें बीज, खबाजीचें बीज हे उकळून मध घालून प्यावें म्हणजे उलटी होते. उलटी झाल्यावर दूध, बेदाण्याचा लुआब असे खाण्यास द्यावे. (८) अदपाव दुधांत ५ तोळे तूप व तितकीच साखर घालून तें द्यावें. **रसकापुराचें विष.** या विषापासून सोमलाप्रमाणेंच विकार होतात; जुलाब मात्र जास्त होतात, व आजाऱ्याचे जिभेस कळकटपणाची रुचि भासते. **रसकापुरावर**—(१) पुष्कळ दूध पिण्यास द्यावें व तें वांतीच्या योगानें पाडावें. वांति झाल्यावर मायफळाचें किंवा आंवळकाठीचें चूर्ण ऊन पाण्यांत घालून द्यावें. (२) तूप पुष्कळ पाजावें. **कांचेची पूड**—कांचेची बारीक पुड पोटांत गेली असतां विष-प्र-

योगाप्रमाणें विकार होतात. कांचेच्या तुकड्यांस फार तीक्ष्णधारा असतात, त्या पोटांतील आंतड्यास बोंचल्यामुळें त्यास इजा होते; वांति, जुलाब, पोट फुगून दुखूं लागणें, ज्वर, तृषा, दाह, इ० विकार होतात. **उपचार**—(१) पुष्कळ दहीं, दूध, आंबील अगर कण्हेरी प्यावी व वांति करवून ती पाडावी. (२) उंडेल पाजावें. (३) नवसागर अथवा गोपीचंदन उगाळून द्यावें. **बचनागाचे विषावर**—(१) गाईचें दूध, तूप, लोणी व बेदाण्याचा लुआब (कोळून गाळून घ्यावें तें) हें भक्षण करावें. (२)कापूर पाण्यांत घालून प्यावा. (३) ऊन ऊन दूध पाजावें. (४) उंबराच्या सालीचा रस दुधांत घालून ऊन करून द्यावा. (५) पिठवणीचा रस ४ तोळे साखर घालून द्यावा. (६) मुळासुद्धां तांदुळजाच्या रसांत गाईचें दूध घालून द्यावें. **मुरदाडशिंगाचे विषावर**—(१) उलटी करवावी. जुलाबाचीं औषधें द्यावीं. (२) मुळे व शोपा हीं खावीं. (३) गाईचें दूध, साखर घालून प्यावें. (४) डाळिंबाचा रस द्यावा. **शेंदुराचे विषावर**—(१) अक्कलकाढा व वेखंड पाण्यांत उगाळून द्यावें. (२) निंबूचा रस साखर घालून द्यावा. (३) गुंजेचा पाला चावून खावा. दि० ७. (४) घसा बसल्यास विड्यांत चतुर्थांश बिबा सांजसकाळ खावा. **मोरचुदाचे विषावर**—(१) ईडनिंबाचा रस साखर घालून द्यावा. (२) लाह्यांचा मंड (१४ पट पाणी घालून शिजवून पेज काढून घ्यावी तो) एलचीचे सालांची राख व खडीसाखर घालून द्यावा. (३) दुधांत खडीसाखर घालून द्यावी. (४) वमन द्यावें. (५) काथाचें पाणी करून पाजावें. ।(६) मांजराची विष्ठा पाण्यांत कोळून द्यावी. **हिंगुळाचे विषावर**—अर्धाशेर चिंचोकें चार शेर पाण्यांत कढवून त्याच्या गुळण्या धराव्या. दि० ७. **पाऱ्याचें विष.**—अशुद्ध पारा अडाणी वैद्य औषधांत घालून देतात; तो अंगावर फुटून त्यापासून कित्येकांचे हात पाय आंखडतात, शरीरावर क्षतें पडतात, खरूज उत्पन्न होते, अंगांत ठिकठिकाणीं चमक मारते, कृष्णवर्ण चट्टे उठतात, वगैरे अनेक विकार होतात. **पाऱ्याचे विषावर**—(१) शुद्ध गंधक दुधांत द्यावा. (२) नागवेलीच्या पानांच्या रसांत १ मासा गंधक द्यावा. (३) पाथरीच्या रसांत गंधक घालून द्यावा. (४) नागवेल, माका, तुळस यांचा रस ६४ तोळे एकत्र करून शरीरास मर्दन करावें; मग दोन प्रहरांनंतर स्नान करावें. दि० ३. (५) वेळूच्या पाल्याचा रस साखर घालून द्यावा. (६) कारलीची मुळी पाण्यांत वाटून प्राशन करावी. (७) अगस्त्याच्या पाल्याचा रस, माक्याचा रस व सोरा हे ताकांत वाटून, तें ताक ४ तोळे प्यावें, म्हणजे मूत्रमार्गानें पारा निघून जातो. (७) कासविंद्याच्या पाल्याचा रस काढून पाजावा. (८) पाथरीच्या मुळांचा रस प्यावा, अंगास लावावा व पाथरीची भाजी करून खावी. **गंधकाचे विषावर**—(१) दुधांत तूप घालून द्यावें. **अफूचें विष.**—अफू फार खाण्यांत आली असतां मनुष्य बेशुद्ध होऊन पडतो; श्वासोच्छ्वास अगदीं सावकाश व हळू चालूं लागतो; डोळ्यांतील टिकल्या आकुंचित होऊन अगदीं सुईच्या टोंकाइतक्या बारीक होतात. हाक मारून उठविलें असतां मनुष्य उठत नाहीं, हे विकार होतात. **अफूचे विषावर**—(१) वमन द्यावें. (२) तुरटीचें चूर्ण व कापशीच्या बियांचें चूर्ण एकत्र करून द्यावें. (३) हिंग पाण्यांत कालवून तें पाणी पाजावें. (४) मालकांगणीच्या पाल्याचा रस पाजावा. (५) देवकापशीच्या पाल्याचा रस पाजावा.

( ६ ) रिठ्यांचें पाणी करून पाजावें. **जेपाळाचे विषावर**—( १ ) वेलदोडे दह्यांत वाटून द्यावे. ( २ ) धण्यांचें चूर्ण, साखर व दहीं एकत्र करून द्यावें. **भांग. भांगेस**—( १ ) दहीं किंवा ताक पाजावें. ताकभात खावा. ( २ ) पेरू खावे. ( ३ ) तुरीची डाळ वाटून प्यावी. ( ४ ) गाईचें दहीं सुंठीचें चूर्ण घालून द्यावें. **कण्हेरीचें विष.**—कण्हेरीच्या झाडाच्या सर्व भागांत विष असतें. कण्हेरीच्या विषानें मनुष्यास पटकीच्या आजाराप्रमाणें लक्षणें होतात. **कण्हेरीचे विषावर**—( १ ) लोण्याची विरघळ द्यावी. ( २ ) दुधांत अथवा दह्यांत साखर घालून द्यावी. **कुचल्याचे विषावर**—( १ ) काळ्या पानवेलीच्या देंटांचा रस पावशेर द्यावा. दि० ३. **धोतऱ्याचें विष.**—धोत्र्याचीं पानें किंवा बीं पोटांत गेल्यास घशांत कोरड पडते; डोळ्यांतील टिकल्या मोठ्या होतात; स्मृति नष्ट होऊन बडबड करितो; दिव्याचा प्रकाश पाहिल्यावर अंमल जास्त चढतो; हीं लक्षणें होतात. **धोतऱ्याचे विषावर**—( १ ) समुद्रफळ गोमूत्रांत उगाळून द्यावें. ( २ ) दहींभात व वेखंड द्यावें. ( ३ ) दुधांत साखर घालून पाजावी. ( ४ ) तिळांचें तेल व गरम पाणी एकत्र करून प्यावें. ( ५ ) दुधांत द्राक्षांचा शिरका घालून प्यावा. ( ६ ) लाल एरंडाचें मूळ पाण्यांत वाटून प्यावें. ( ७ ) तूप पाजावें. ( ८ ) वांग्याचा रस ४ तोळे काढून द्यावा. ( ९ ) कापशीच्या बिया व फुलें यांचा काढा द्यावा. **मद्यावर.**—( १ ) तूप साखर चाटावी. ( २ ) डोक्यावर थंड पाणी ओतावें. ( ३ ) कोहळ्याचा रस गूळ घालून द्यावा. ( ४ ) कंवठाचा गीर, द्राक्षा, डाळिंबाचा रस व दहीं हीं समभाग घेऊन त्यांत धण्यांची पूड व साखर घालून द्यावी. ( ५ ) मध, खजूर, द्राक्ष, आमसोल, डाळिंब, फालसा हीं एकत्र करून द्यावीं. ( ६ ) कांकडी खावी. **कोद्रूवर.**—( १ ) कोहळ्याचा रस गूळ घालून द्यावा. ( २ ) थंड दूध द्यावें. ( ३ ) पारिजातकाच्या पाल्याचा रस काढून गुरांस पाजावा. **सुपारी लागल्यास**—( १ ) गूळ खावा अथवा खडीसाखर पाण्याशीं खावी. ( २ ) गार पाणी प्यावें. ( ३ ) नखल्याच्या चूर्णाचा वास घ्यावा. **निवडुंगाचे विषावर**—( १ ) थंड पाण्यांत साखर घालून द्यावी. ( २ ) चिंचेचा पाला वाटून लेप करावा. **कुहिलीचे विषावर**—तूप, साखर व मध एकत्र करून द्यावें. **बिब्यावर**—( १ ) शिरस, तांदुळजा व लोणी यांचा लेप करावा. ( २ ) दारुहळद, शिरस, नागरमोथा व लोणी यांचा लेप करावा. ( ३ ) लोणी, तीळ व दूध यांचा लेप करावा. ( ४ ) बकरीचें दूध अ० खोबरेल लावावें. ( ५ ) कोथिंबीर वाटून लावावी. ( ६ ) बदामाची बी उगाळून लावावी. ( ७ ) दुधाची साय व साखर लावावी. ( ८ ) तीळ वाटून त्यांत काळी माती घालून उतल्याजागीं लेप द्यावा. ( ९ ) ज्येष्ठीमध, तीळ, लोणी व दूध यांचा लेप करावा. ( १० ) अर्जुनसादड्याची साल व पानें वाटून लेप करावा. ( ११ ) बेहड्याचे मगजाचा लेप करावा. ( १२ ) ज्येष्ठीमध, नागरमोथा, कंवठीचीं पानें यांचा लेप द्यावा. **गुंजेचे विषावर**—तांदुळजाचा रस साखर घालून द्यावा. **रुईचे विषावर**—चिंचेचा पाला वाटून लेप करावा. **शेराचे विषावर**—( १ ) पाण्यांत मध घालून द्यावा. ( २ ) लोणी भक्षावें व लेपही करावा. ( ३ ) दहीं किंवा आंबट ताक द्यावें. **केरोसीन तेल पोटांत गेल्यास त्यावर**—बाभळीच्या गोंदाचें नवटांक पाणी करून पाजावें, नंतर पावशेर दूध पाजावें, व गोड्या तेलाच्या

गुळण्या वरचेवर टाकाव्या; म्हणजे तोंडास फोड व चट्टे येणार नाहींत. **विषावर पथ्य**—साळ्या, साळी, हरीक, राळे, मूग, वाटाणे, तेल, तूप हे कधीं भोजनांत देऊं नये; आणि वांगें, चुका, आंवळे, जीवशाक, तांदुळजा, कालशाक, लसूण, डाळिंब, सैंधव हे विषार्ताला पथ्यकारक आहेत. **अपथ्य**—विरुद्धान्न, भोजनावर लागलेंच भोजन, क्रोध, क्षुधा, भय, आयास, मैथुन, दिवानिद्रा हे पदार्थ विषार्तानें मुक्त झाला तरी सोडावे.

## २८. विषूचिका. ( मोडशी, महामारी, तरळ, पटकी. )

**कारण**—विषूचिका हा एक अजीर्णाचाच प्रकार आहे. ज्या अजीर्णांत सुयांनीं टोंचल्यासारिखी शरीरास वायूची पीडा होते, तिला विषूचिका असें ह्मणतात. ज्यांचा आहार परिमित आहे व ज्यांना वैद्यशास्त्राचें प्रमेय कळतें, त्यांना ही विषूचिका होत नाहीं. जे अज्ञानी व ज्यांचीं इंद्रियें स्वाधीन नाहींत आणि जे खाण्याचे लालची असतात अशा मनुष्यांस ही विषूचिका अवश्य होते. ही होण्याचें मूळकारण अजीर्ण हें आहे. मांसाहारी लोकांत खाण्यापिण्याचा नियमितपणा नसल्यामुळें, त्यांच्यांत या रोगाचा प्रादुर्भाव विशेष असतो. हल्लींच्या काळांत ज्यास "पटकी" असें ह्मणतात तो रोग पूर्वीं इकडे मुळींच नव्हता. देवीच्या साथीप्रमाणें पटकीची साथ येऊन हजारों लोक मरण पावतात, व ज्या ठिकाणीं अतिशय दाट वस्ती व घाण असते तेथें हा रोग लवकर फैलावतो, यावरून युरोपियन वैद्यांचें असें मत आहे कीं, या रोगाचें मूळ कारण अस्वच्छता हें आहे; परंतु ही केवळ त्यांची भ्रांति आहे. अस्वच्छताच जर या रोगाचें मूळकारण असतें, तर भंगी वगैरे जे लोक नित्य घाणींत काम करितात त्यांस नित्य या रोगाची बाधा कां होत नाहीं? जर होत नाहीं, तर हें कारण अगदीं शुष्क आहे. एवढें मात्र खरें, कीं या रोगाचा उद्भव आला असतां त्यास घाण ही साह्यभूत होऊन या रोगाचा लवकर प्रादुर्भाव होतो. परिमित आहार करणारास या रोगाची भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. **विषूचिकेचें लक्षण**—मूर्च्छा, ढाळ, ओकारी, शोष, शूल, भोंवळ, पायांना पेटके ( गोळे ) येणें, जांभया, दाह, शरीराचा वर्ण बदलणें, कांपरें सुटणें, उरांत दुखणें व मस्तकशूळ हीं लक्षणें होतात. **असाध्य लक्षण**—ज्याचे दंत, ओष्ठ, नखें, काळसर झालीं; शक्ति फार क्षीण झाली, ओकारीनें फार पीडा झाली, नेत्र खोल गेले, स्वरही फार सूक्ष्म झाला, सर्व संधि शिथिल झाल्या, इत्यादि लक्षणांनीं युक्त जो रोगी तो असाध्य जाणावा. **विषूचिकेचे उपद्रव**—निद्रानाश, अरति, कंप, मूत्रनिरोध, मूर्च्छा हे पांच उपद्रव होतात. **उपचार**—( १ ) अजीर्णनाशक निंबू आहे, ह्मणून तें सेवन केलें असतां विषूचिकेची बाधा होणार नाहीं. ( २ ) केशर निंबाचे रसांत पाजावें. ( ३ ) लसूण, जिरें, सैंधव, पादेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, याचें चूर्ण निंबाचे रसांत कालवून खावें. ( ४ ) अघाड्याचें मूळ पाण्यांत उगाळून प्यावें. ( ५ ) कारलीचा रस तेलाबरोबर प्यावा. ( ६ ) ताकांत सातूचें चूर्ण घालून ऊन करून जवखार घालून प्यावें. ( ७ ) बेल व सुंठीचा काढा किंवा बेल, सुंठ, कायफळ यांचा काढा घ्यावा; ह्मणजे ओकारी, विषूचिका यांचा नाश होतो. ( ८ ) लवंगादिचूर्ण–८ मासे लवंगा, एलची व जायफळ हीं अर्धतोळा व अफीम १ मासा, या सर्वांचें चूर्ण करून तें ऊन पाण्याशीं

अर्ध तोळा द्यावें; म्हणजे दारुण तराळ, शूल, अतिसार व वांति यांचा नाश होतो. (९) विषूचिका अति वाढली असतां ताक किंवा दहीं समभाग पाणी घालून द्यावें. (१०) हरभऱ्याची आंब थंड पाण्याशीं द्यावी. (११) तृषा किंवा उमासा यांवर लवंग किंवा जायफळ अथवा नागरमोथा यांचें पाणी तापवून निवालेलें द्यावें. (१२) निंबाचे रसांत जुनी चिंच कुवळून पाजावी. (१३) आल्याचा रस दोन तोळे व पांढऱ्या कांद्याचा रस दोन तोळे मिश्र करून थोडें तूप घालून द्यावा. नंतर वारंवार दोन दोन तोळे कांद्याचा रस देत राहावें. (१४) ३ मासे जायपत्री दुधांत वाटून द्यावी. (१५) चिंच ९ व बिबवे ८ भाग एकत्र वाटून पांढऱ्या कांद्याच्या रसांत कालवून गाळून तो रस २ तोळे द्यावा; म्हणजे ओकारी व ढाळ हे तत्काळ बंद होतात व सविष जंतही पडून मरतात. (१५) हिंग, बिडलोण, वेखंड, सुंठ, ओंवा, बाळहरीतकी, यांचें ६ मासे चूर्ण अदपाव ताकांत द्यावें; तें मोडशी, शूळ, मुळव्याध, अग्निमांद्य, मलावरोध, उदर यांचा नाश करितें. (१७) मोगली एरंडाचें मूळ ताकांत उगाळून हिंग व सैंधव लावून द्यावें. **पथ्यापथ्य**—अजीर्णावर जें पथ्यापथ्य सांगितलें तेंच विषूचिकेवरही जाणावें.

## २९. विसर्परोग.

**कारण.**—लवण, अम्ल, कटु, उष्ण; व हिरवीशाक व पेंड वगैरे भक्षिल्यानें वातादिक दोष कुपित होऊन सात प्रकारचे विसर्पाला करितात. हा रोग शरीरावर सर्पासारखा पसरतो, म्हणून **विसर्प** म्हणतात; व लोकांत धांवरें, विसर्प, असें म्हणतात. **अग्निविसर्प.**—वातपित्तापासून झालेला विसर्पज्वर, वांति, मूर्च्छा, अतिसार, तृषा, घेरी, हाडें फुटणें, अग्निमांद्य, अंधारी, भ्रम, द्वेष, या लक्षणांनीं युक्त असतो. याच्या योगानें सर्व शरीर रसरशीत निखारे ओतल्याप्रमाणें होतें. ज्या ज्या ठिकाणीं तो विसर्प पसरत जातो, तें तें ठिकाण कोळशाप्रमाणें काळें, निळें, तांबडें होऊन त्वरित सुजतें; अग्नीनें भाजल्याप्रमाणें वर फोड येतात; त्याची शीघ्रगति असते, यामुळें तो झटकन हृदयाला जाऊन भिडतो. अथवा तो अत्यंत बलवान होतो; म्हणून अंगाला व्यथा करितो. संज्ञा आणि निद्रा यांचा नाश करितो. श्वास वाढवितो व उचकी उत्पन्न करितो. अशी मनुष्याची अवस्था होते. अस्वास्थ्यपणामुळें भुईवर, अंथरुणावर, किंवा बसूनही कोठें सुख होत नाहीं; हालचाल करूं लागला असतां क्लेश होतात; मनाला व देहाला क्लेश झाल्यानें उत्पन्न होणारी अशी दुर्बोध निद्रा (मरणरूप निद्रा), त्याला प्राप्त होते; या रोगाला अग्निविसर्प (आग्याधांवरें) असें म्हणतात. **ग्रंथिविसर्प.**—स्वकारण-कुपित कफानें वायूचा रोध होऊन तो कफाचा भेद करून किंवा वाढलेल्या रक्ताचा भेद करून, त्वचा, शिरा, स्नायु आणि मांस यांप्रत आणून दुष्ट करून लांबट, लहान, वाटोळ्या, मोठ्या खरखरीत तांबड्या गांठीच्या माळा करितो, त्या गांठींना ठणका फार लागतो, कडक ताप येतो, श्वास, खोकला, अतिसार, तोंडाला कोरड, उचकी, ओकारी, घेरी, भ्रांति, वर्ण, किरणें, मूर्च्छा, अंग मोडणें, अग्निमांद्य हीं लक्षणें होतात; या रोगाला **ग्रंथिविसर्प** (गांठ्या विसाप) म्हणतात. हा कफवायूच्या कोपानें उत्पन्न होतो. **क्षतज विसर्प.**—बाह्य कारणानें क्षत होऊन त्यापासून वायु कुपित होऊन, तो रक्तसहित पित्ताला व्रणांत आणून विसर्प उत्पन्न करितो,

त्यावर हुलग्यासारखे श्यामवर्ण फोड येतात, सूज येते, ताप येतो, ठणका लागतो आणि दाह होतो, त्याचें रक्त काळसर होतें. **उपचार**—( १ ) सन्निपातज विसर्पावर शतधौतघृताचा वारंवार लेप करावा. ( २ ) शिरसवृक्षाचीं फुलें अ० साल किंवा मूळ, ज्येष्ठमध, तगर, चंदन, एलची, जटामांसी, हळद, दारुहळद, कोष्ठ आणि वाळा या दहा औषधांचा कल्क करून त्यांत तूप घालून लेप द्यावा. तो विसर्प, कुष्ठ, व्रण आणि सूज यांचा नाश करितो. ( ३ ) जटामांसी, राळ, लोध्र, ज्येष्ठमध, रेणुकबीज, मोरवेल, निळें कमळ, शिरसवृक्षाचीं फुलें यांचा लेप द्यावा. तो अग्निविसर्पनाशक आहे. ( ४ ) वड, उंबर, पिंपळ, पिंपरी व वेतस या पांच सालींचा कल्क करून त्यांत शतधौत तूप घालून लेप करावा. तो दाहयुक्त विसर्पाचा नाश करितो. ( ५ ) वडाच्या पारंब्या, गुंज, केळीचें सोप ( काल ) याचा शतधौतघृतयुक्त लेप द्यावा; म्हणजे ग्रंथिविसर्पाचा नाश होतो. ( ६ ) शिरसवृक्षाच्या सालीचें चूर्ण शतधौत घृतांत घालून त्यानें लेप करावा, म्हणजे कर्दम-विसर्पाचा नाश होतो. ( ७ ) करंज व सांतवीण यांची साल; कळलावी, निवडुंग व रुई यांचा चीक; चित्रक, माका, हळद यांचे कल्क व बचनाग आणि गोमूत्र यांणीं तेल सिद्ध करावें. तें विस्फोट, विसर्प आणि विचर्चिका यांचा नाश करितें. ( ८ ) कडूपडवळ, अडुळसा, किराईत, कडूनिंब, कुटकी, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, चंदन, यांचा गुग्गुळ घालून काढा करावा; तो संपूर्ण दोषांपासून झालेला उग्र विसर्प, वांति, दाह, ज्वर, सूज, कंडू, विस्फोटक, भ्रांति आणि तहान यांचा नाश करितो. ( ९ ) धमासा, पित्तपापडा, गुळवेल व सुंठ, यांना रात्रीं भिजत घालून वाटून कल्क करून द्यावा. तो तृष्णा व विसर्प यांची शांति करितो. ( १० ) एरंड, कडूभोंपळा, कडूनिंब, टाकळा यांचें बीं, बांवच्या, अंकोलाचें बीं, हीं समभाग घेऊन पाताळयंत्रांत तेल काढून चोळावें, म्हणजे विसर्पादिक जातात. ( ११ ) गुंजेच्या पाल्याच्या रसाचा लेप करावा. **पथ्य**—गहूं, साठकें भात, मूग, मसुरा, चणे, तुरी, कारलें, पडवळ, द्राक्षें. **अपथ्य**—जडान्न, जडपान, लसूण, कुळिथ, तीळ, उडीद, मीठ, आंबट, तिखट, मद्य.

## ३०. विस्फोटरोग. ( फोड. )

**कारण**—तिखट, आंबट, तीक्ष्ण ( मोहऱ्या वगैरे ), उष्ण, विदाही, रुक्ष, क्षार, अशा रससेवनानें व अजीर्ण, अधिक भोजन, ऊन्ह, ऋतुदोष म्हणजे शीतोष्णातियोग व ऋतुविपर्यय ( ऋतूंचा पालट ) इत्यादि कारणांनीं वातादि दोष कुपित होऊन त्वचेचा आश्रय करून, रक्त, मांस आणि अस्थि यांना दूषित करून भयंकर विस्फोट ( फोड ) उत्पन्न करितात, ते होण्याचे पूर्वी बळकट ताप येतो. सन्निपातज व रक्तज विस्फोट हे शेंकडों अनुभविक उपचार केले तरी साध्य होत नाहींत. **स्वरूप**—रक्तपित्तापासून झालेले असे अग्नीनें भाजल्यासारखे फोड अंगावर कांहीं ठिकाणीं किंवा सर्व अंगावर येतात; व त्यामुळें ज्वर येतो; त्यांना विस्फोट असें ह्मणतात. **उपचार**—( १ ) किराईत, कडूनिंब, ज्येष्ठमध, नागरमोथा, पित्तपापडा, कडूपडवळ, अडुळसा, वाळा, त्रिफला व इंद्रजव यांचा काढा द्यावा व पथ्य करावें, म्हणजे द्वंद्वज, त्रिदोषज व रक्तज अशा विस्फोटाचा नाश करितो. ( २ ) गुळवेल, अडुळसा, कडूपडवळ, नागरमोथे, सांतवीण, खैराची साल, काष्ठागरु, वेताचे कोम, कडूनिंबाचा पाला, हळद, दारुहळद,

यांचा काढा, विसर्प, कुष्ठ, विस्फोट, कंडू, मसूरिका व पित्तज्वर यांचा नाश करितो. (३) कडूपडवळ, गुळवेल, काडेकिराईत, अडुळसा, कडूनिंब, पित्तपापडा, खैर व नागरमोथा यांचा काढा विस्फोटज्वरनाशनार्थ द्यावा. (४) दूर्वा, वेखंड, उंबर, जांभूळ, अर्जुनसादडा, सांतवीण, पिंपळ, यांचा काढा आटवून त्याणें सिद्ध केलेलें तूप सर्व ज्वर, दाह, पाक, विस्फोट, शोफ, यांचा नाश करितें. (५) कडूनिंबाची साल, खैराची अंतरसाल, गुळवेल व इंद्रजव यांचा काढा मध घालून द्यावा. तो विस्फोट व ज्वर यांचा नाश करितो. (६) किराईत, अडुळसा, कुटकी, कडूपडवळ, त्रिफळा, चंदन व कडूनिंब यांचा काढा, विसर्प, दाह, ज्वर, सूज, कंडू, विस्फोट, भ्रांति, तहान आणि वांति यांचा नाश करितो. (७) चंदन, नागकेशर, शिरसाची साल, जाईचा पाला यांचा तांदुळजाच्या रसांत वाटून लेप करावा, तो दाहनाश करितो. (८) बोरीचीं कोंवळीं पानें व बाभळीचीं कोंवळीं पानें पाण्यांत वाटून, जिरें व खडीसाखर घालून द्यावें. म्हणजे विस्फोट व दाह यांचा नाश होतो. **पथ्य**—भात, यव, मूग, तूर, मसुरा, यांच्या काढ्यांत सुंठ घालून तें; कुरडू, वेताचे अंकुर, तांदुळजा, कर्टोल, पडवळ, शतावरी, पित्तपापडा, वाटाणा, कारलें, कडूनिंबाचा पाला, बेलाचा पाला, आणि कडू असे यूष, यांणीं भोजन द्यावें. **अपथ्य**—तीळ, उडीद, कुळिथ, मीठ, आंबट, तिखट, दाहकारक पदार्थ, रुक्ष आणि उष्ण पदार्थ.

## ३१. शिरोरोग.

**कारण**—धूर, आतप, तुषार, जलक्रीडा, अतिनिद्रा, अतिजागरण, उंच ठिकाणचा पूर्वेचा वारा, बाष्पांचा निग्रह, रडणें, अति उदक किंवा मद्य यांचें प्राशन, कृमि, मल व मूत्र यांच्या वेगाचें धारण, धांवणें, झाडणें, द्वेष, डोळे लावून फार वेळ अवलोकन करणें, दुष्ट गंध, दुष्टान्न व मोठ्यानें भाषण, या कारणांनीं मस्तकरोग उत्पन्न होतो. वात, पित्त, कफ, यांनीं; सन्निपातानें, रक्तानें, क्षयानें, कृमींनीं, सूर्यावर्त, अनंतवात, अर्धावभेदक, शंखक, असे ११ प्रकारचे शिरोरोग (मस्तकशूळ) होतात. **कृमिज शिरोरोग**—मस्तकांत भाले मारल्यासारखी पीडा होते; व मस्तकांतील मगज किडे खातात असें वाटतें, व तें मस्तक आंत फुरफुरतें; नाकांतून पू, रक्त आणि किडे पडतात; त्यास **कृमिज शिरोरोग** ह्मणतात. हा मोठा भयंकर आहे. **सूर्यावर्त**—सूर्योदयाबरोबर कपाळ दुखण्यास हळू हळू आरंभ होऊन जसजसा सूर्य चढतो तसतसा तो शूळ, डोळे व भिवया यांमध्यें अधिक होऊं लागतो, आणि सूर्याबरोबर वाढून सूर्य मावळला म्हणजे नाहींसा होतो; शीत किंवा उष्ण उपचारानें मनुष्याला सुख होतें, या विकारास **सूर्यावर्त** म्हणतात. **अनंतवात**—तिन्ही दोष दुष्ट होऊन मानेच्या मागल्या शिरांस बळकट जखडून, डोळे, भिवया व आंख, या ठिकाणीं राहून राहून अत्यंत तीव्र वेदना करितात; व कानाच्या पुढल्या भागांवर कंप होतो; हनवटी जखडते; नेत्ररोग होतात; या त्रिदोषजन्य मस्तकरोगाला **अनंतवात (नंदवायु)** असें म्हणतात. **अर्धावभेदक**—रूक्षान्न, अतिभक्षण, अध्ययन, पूर्वेदिशेकडचा वारा, दंव, मैथुन, वेगधारण, आयास, व्यायाम, या कारणांनीं कुपित झालेला केवळ वायु, किंवा कफयुक्त वायु, अर्धें मस्तक धरून, मानेच्या शिरा, भिंवई, आंख, कान, डोळा, ललाट, हीं सर्व एका बाजूचीं

धरून, कुऱ्हाडीनें घाव घातल्यासारखी वेदना करितो; त्याला **अर्धावभेदक (अर्धशिशी)** ह्मणतात. हा रोग फार वाढला असतां त्या बाजूचा डोळा जातो, किंवा कान बहिरा होतो. **शंखक**—दुष्ट झालेलें पित्त, रक्त आणि वायु, फार वाढून आंखावर भयंकर सूज उत्पन्न करितात; तिला ठणका फार लागतो, आग फार होते; व ती लाल फार होते; ती विषवेगाप्रमाणें वाढून गळ्यांत जाऊन त्वरित त्याचा रोध करिते; या शंखकरोगानें तीन दिवसांत प्राणनाश होतो. **वातज शिरोरोगावर**—(१) कोष्ठ, एरंडमूळ, सुंठ, हीं ताकांत वाटून गरम करून मस्तकास लेप करावा. (२) मुचकुंदाच्या फुलांचा लेप करावा. (३) सुंठ अ० दालचिनी उगाळून गरम करून लेप द्यावा. (४) नवसागर व चुना बाटलींत घालून हुंगावयास द्यावें. **पित्तज शिरोरोगावर**—(१) साखर, दूध व पाणी यांणीं मस्तकावर सिंचन करावें अथवा थंड पाण्याची घडी ठेवावी. (२) गाईचें तूप चोळावें किंवा शतधौतघृताचा लेप करावा. (३) चंदन, वाळा, कमळ, ज्येष्ठमध, चिकणामूळ, निवडुंगमूळ, यांना दुधांत वाटून लेप द्यावा. **कफज शिरोरोगावर**—(१) चंदनाचा लेप करावा. (२) रेणुकबीज, तगर, शिलाजित, नागरमोथे, एलची, कृष्णागर, देवदार, जटामांसी, एरंडमूळ यांचा मंदोष्ण लेप करावा. (३) सुंठ, कोष्ठ, टाकळ्याचें मूळ, देवदार, म्हशा गुग्गुळ, यांना गोमूत्रांत वाटून गरम करून सुखोष्ण असा लेप द्यावा. **सन्निपातज शिरोरोगावर**—(१) गेळफळ, तिळवणीचें बीं, नाकशिंकणीचीं पानें, हे समभाग, वडाचें बीज व साल यांचें चूर्ण अर्धा भाग घालून, त्याचें बारीक वस्त्रगाळ तपकिरीसारखें चूर्ण करून ओढावयास द्यावें; ह्मणजे तत्काल मस्तकशूळ, प्रलाप, कफ, झांपड व सन्निपात यांचा नाश करितें. **रक्तज शिरोरोगावर**—(१) शतधौत घृताचें मस्तकावर धारण करावें. (२) सुंठीच्या कल्कांत दूध घालून त्याचें नस्य द्यावें; तें नानादोषांपासून उत्पन्न झालेल्या तीव्रमस्तकशूलाचा नाश करितें. (३) कमळ व रास्ना यांना वाटून लेप करावा. (४) उंबराचें पिकलेलें फळ घेऊन तें तुपांत साकर घालून पचवावें; त्यांत एलची व मिरीं घालून भक्षणार्थ द्यावें; ह्मणजे रक्तस्रावाची शांति होते. (५) रिंगणीच्या फळांचा रस काढून मस्तकावर लिंपावा, तो मस्तकशूलाचा नाश करितो. **कृमिज शिरोरोगावर**—(१) सुंठ, मिरीं, पिंपळी, करंजसाल, शेवग्याची साल, यांना शेळीच्या मुतांत वाटून नस्य द्यावें. (२) वावडिंग, सज्जीखार, दंतीमूळ, हिंग, यांना गोमूत्रांत वाटून त्या कल्कांत शिरसाचें तेल घालून पचन करून त्याचें नस्य करावें. (३) कोरांटीचे पाल्याचा रस व तूप एकत्र करून नाकांत पिळावें. (४) रिंगणीच्या फळांची विडी करून नाकांतून धूर काढावा, व दोन तीन दिवस झाल्यानंतर कडूदोडक्याचें चूर्ण नाकांत ओढावें म्हणजे सर्व कृमि पडतील. (५) कडूनिंबाचा पाला व मिरीं वाटून तो रस नाकांत घालावा. **सूर्यावर्तावर**—(१) गूळ घालून तूप प्यावें, व तीळ दुधांत वाटून त्याचा लेप करावा; तो तीन दिवसांत सूर्यावर्ताला जिंकतो. (२) दूध, तूप यांचें भक्षण व नस्य करावें व त्यांशींच रेचक द्यावें. (३) दशमुळांचा काढा करून त्यांत तूप व सैंधव घालून त्याचें नस्य द्यावें; तें अर्धशिशी, सूर्यावर्त व मस्तकशूल यांचा नाश करितें. (४) उपरसाळ, निळें कमल, कोष्ठ, वेखंड, पिंपळी व ज्येष्ठमध, यांना कांजींत वाटून त्यांत तूप व तेल घालून, त्याचा सूर्यावर्त व अर्धशिशी यांवर लेप क-

द्यावा. (५) माक्याच्या रसांत समभाग बकरीचें दूध घालून सूर्यकिरणांत तापवावें; व त्याचें नस्य द्यावें. (६) शिरसवृक्षाच्या मुळाची किंवा फळांची, किंवा वेखंड, पिंपळी यांची पोटली हुंगण्यास द्यावी. (७) गुंजेचें मूळ उगाळून नस्य द्यावें म्हणजे सूर्यावर्त, रातांधळें, नेत्रांत पटलें येतात तीं, मस्तकशूल, हे दूर होतात. **अनंतवात शिरोरोगावर**—(१) अनंतवातावर सूर्यावर्तनाशक विधि करावे. (२) मध, मस्तु (दह्यांवरची साय), करंजा, घिवर, तूप, पुरी हे व वातपित्तनाशक आहार द्यावा. (३) अनंताचे झाडाची उत्तरदिशेकडील मुळी काढून आणून थंड पाण्यांत गंधाप्रमाणें उगाळून सर्व मस्तकास लेप द्यावा, व ताळवेवर चोळीत राहावें आणि मुळीचा एक तुकडा केशांत ठेवावा; व शक्तिप्रमाणें थंड पाण्यांत मुळी उगाळून पोटांतही द्यावी. (४) काळ्या कासाळूचा कांदा किसून त्याच्या पोटल्या तव्यावर गरम करून मस्तकास शेक द्यावा. नंतर कांहीं वेळानें तोच कीस गरम करून त्याचा मस्तकावर पेंड बांधावा. (५) रिठा हातावर चोळून त्याच्या फेंसाचें एक दोन वेळ अंजन करावें. वायु उतरल्यावर डोळ्यांत लोणी घालीत जावें. या अंजनानें महान् सर्पाचेंही विष उतरतें. (६) नीवार ह्मणजे देवभाताच्या तांदुळांचा भात करून खावयास द्यावा. हा भात विषमज्वर व विषार झालेल्या मनुष्यास हितकर आहे. **अर्धशिशीवर**.—(१) शेळीच्या दुधांत अ० पाण्यांत सुंठ उगाळून त्याचें नस्य द्यावें. तें मस्तकशूलनाशक आहे. (२) शेवग्याच्या पाल्याच्या रसांत मिरीं खलून त्याचा लेप द्यावा. (३) पिंपळी, सैंधव यांचें चूर्ण तेलांत किंवा तुपांत पचन करावें व नस्य द्यावें. अ० पाण्यांत उगाळून नस्य द्यावें. (४) कोष्ठ, एरंडमूळ व टाकळ्याचें मूळ हीं कांजींत वाटून लेप करावा. (५) अगस्त्याच्या पानांचा अथवा फुलांचा रस, ज्या भागाचें कपाळ दुखत असेल त्याच्या दुसऱ्या भागाच्या नाकपुडींत पहिल्यानें दोन थेंब जास्त घालून मग दुसऱ्या नाकपुडींत घालावा; याच्या योगानें चातुर्थिक ज्वराचाही नाश होतो. (६) केशर व तूप एकत्र खलून याचें नस्य द्यावें, तें तत्क्षणीं अर्धशिशीचा नाश करितें. (७) रिंगणी आणि जटामांसी यांच्या कल्कांत तूप घालून पचन करावें; त्याचें नस्य दिल्याबरोबर अर्धशिशीचा नाश होतो. (८) बिब्याचें तेल बारीक काडीवर घेऊन, ज्या बाजूचें कपाळ दुखत असेल त्याहून दुसरे बाजूचे डोळ्याचे नाकाजवळचे कोंपऱ्यांत जेथें तांबडी जागा असते त्या जागेवर तें लावावें. बिब्याचे तेलाचा अंश डोळ्यांतून पाणी बाहेर येतेवेळीं बाहेर लागूं नये ह्मणून बाहेरचे बाजूस तूप लावावें. या योगानें दुःसहही अर्धशिशी दूर होते. (९) तुरीचीं पानें व दूर्वा यांचा रस एकत्र करून त्याचें नस्य द्यावें, तें तत्क्षणीं अर्धशिशीचा नाश करितें. (१०) वावडिंग, काळे तीळ, समभाग घेऊन वाटून त्याचा लेप व नस्य द्यावें. (११) गोकर्णीचें फळ किंवा मूळ पाण्यांत वाटून त्याचें नस्य करावें; किंवा मूळ कानांत बांधावें. (१२) मिरीं व तांदूळ, माक्याच्या रसांत वाटून त्याचा लेप द्यावा. (१३) दूध किंवा नारळाचें पाणी, साखर घालून प्यावें किंवा थंड पाणी प्यावें अथवा तुपाचें नस्य द्यावें. (१४) खडीसाखर व गेळफळ गाईच्या दुधांत उगाळून त्याचें सूर्य उगवण्यापूर्वीं नस्य द्यावें. (१५) करंजाची बी उगाळून त्यांत गूळ घालून त्याचें गरम पाण्याशीं नस्य द्यावें. (१६) रास्ना, सुंठ, वावडिंग, एरंडमूळ, त्रिफळा, दशमूळें, हरीतकी यांचा काढा द्यावा; तो वातरोग, अर्धशिशी, आढ्यवात, अर्दित,

खंजवात, नेत्ररोग, मस्तकशूल, ज्वर, अपस्मार, यांचा नाश करितो. (१७) कडूदोडक्याची पूड नाकांत ओढावी ह्मणजे श्लेष्मादिक दूषितभाग निघून जाऊन अर्धशिशी दूर होते. (१८) मोठ्या पहांटेस दोन किंवा तीन जेपाळाच्या बियांतील मगज घेऊन निंबूच्या रसांत उगाळून, ज्या बाजूचें मस्तक दुखत असेल त्या बाजूच्या डोळ्यावरील भिंवईवर तें काडीनें लावावें, ह्मणजे अर्धशिशी त्वरित दूर होते. (१९) निर्गुंडीचे रसांत मिरीं उगाळून नस्य द्यावें. (२०) आंवळकाठीचें चूर्ण तूपसाखरेशीं घ्यावें. (२१) दुधाचा खवा साखरेशीं खावा. (२२) दुधांत बदामाची खीर करून खावी. (२३) आलें व गूळ एकत्र कुटून पुरचुंडी करून नाकांत रस पिळावा. (२४) सकाळ संध्याकाळ गाईचें साजूक तूप नाकांत घालावें; ह्मणजे सात दिवसांत अर्धशिशी दूर होते. (२५) समुद्रफळ शेळीच्या मूत्रांत उगाळून नस्य द्यावें. (२६) नाकशिंकणीचें चूर्ण, प्रथम विषम नाकपुडींत ओढून नंतर दुसऱ्या नाकपुडींत ओढावें. (२७) रिठा तुपांत उगाळून नाकांत नस्य करावें. **शंखक शिरोरोगावर.**—(१) केशर व साखर समभाग, व दोहोंच्या समान तूप आणि तुपाच्या चौपट पाणी घालून घृत शेष राहीपर्यंत पचन करावें, व त्याचें नस्य करावें; म्हणजे शंखक, मस्तक व नेत्र यांचा शूल नाश पावतो. (२) दारुहळद, मंजिष्ठ, कडूनिंब, पद्मकाष्ठ यांचा लेप करावा. (३) थंड पाण्याचा अभिषेक करावा किंवा थंड पाणी शिंपावें. (४) चिकणा, निळें कमळ, दूर्वा, काळे तीळ व पुनर्नवा, यांचा लेप द्यावा; तो शंखक, अनंतवात व सर्व मस्तकरोग यांचा नाश करितो. (५) करंज व शेवगा यांचें बीं, तमालपत्र, शिरस, दालचिनी यांचें नस्य द्यावें, तें सर्व शिरोरोगांवर प्रशस्त आहे. (६) गूळ, आल्याचा रस, पिंपळी, सैंधव, पाण्यांत उगाळून नस्य द्यावें म्हणजे भुजस्तंभादिक रोग, सर्व शिरोरोग, हे दूर होतात. (७) साखर आणि केशर तुपांत तळून त्याचें नस्य करावें; तेणेंकरून वायु, रक्त यापासून भिंवया, आंख, कर्ण, डोळे या ठिकाणचा शूल, अर्ध मस्तकाचा शूल, सूर्यावर्त, हे दूर होतात. (८) देवदार, तगर, कोष्ठ, वाळा, सुंठ, हीं कांजींत वाटून त्यांत तेल घालून लेप करावा;म्हणजे मस्तकशूलाचा नाश होतो. (९) उन्हाळी व नवसागर एकत्र खलून हुंगावयास द्यावें; म्हणजे मस्तकांतील वातकफसंबंधीं पीडेचा नाश होतो. (१०) सुंठ, मिरीं, पिंपळी, पुष्करमूळ, हळद, रास्ना, देवदार व वेखंड, यांचा काढा नाकानें प्राशन करावा, तो मस्तकरोगजालाचा नाश करितो. (११) गूळ व सुंठीचा कल्क यांचें नस्य द्यावें, तें मस्तकशूलनाशक आहे; व सुंठीच्या कल्कांत दूध घालून त्याचें नस्य द्यावें, तें नानादोषांनीं झालेल्या मस्तकपीडेचा नाश करितें. (१२) एरंडमूळ, तगर, शतावरी, जीवंती, रास्ना, सैंधव, माका, वावडिंग, ज्येष्ठमध, सुंठ, काळ्या तिळांचें तेल, शेळीचें दूध हें सर्व एकत्र करून, त्यांत माक्याचा रस घालून पचन करावें; या तेलाचे सहा बिंदू नाकांत घालावे म्हणजे तें सर्व मस्तकविकार नाश करील; गळलेले केश, हालणारे दांत यांना घट्ट करील, आणि गरुडासारखी दृष्टि करून बाहूंना अधिक बल देईल. (१३) त्रिफळा, किराईत, हळद, कडूनिंब, गुळवेल यांचा काढा करून त्यांत गूळ घालून प्यावा. तो भ्रुकुटी, आंख, कान, या ठिकाणचा शूल, अर्धशिशी, सूर्यावर्त, शंखक, दंतशूल, रातांधळें, पटल, शुक्र व नेत्रपीडा यांचा नाश करील. (१४) कडूनिंबाच्या पाल्याचा रस पाणी घालून काढून त्यांत मिरीं घालून नस्य द्यावें. मस्तक-

शूल, अपस्मार हे दूर होतात व कृमिही पडतात. **क्षयज शिरोरोग** ( मस्तकांतील मेंदू शुष्क होऊन भयंकर मस्तकशूल होतो. ) यावर.—( १ ) गूळ, तूप व पुऱ्या भक्षणार्थ द्याव्या; व दूध, तूप यांचें नस्य व पान द्यावें. ( २ ) दुधांत बदाम वाटून खीर करून साजूक तूप व खडीसाखर घालून द्यावी; व मस्तकावर बदामाचें तेल जिरवीत जावें. **पथ्य.**—तूप, दूध, तांदूळ, पडवळ, शेवगा, चाकवत, कारलें, आंबा, आंवळे, डाळिंब, तुरी, गहूं, मूग. **अपथ्य.**—मलमूत्रांचा अवरोध, दुष्टपाणी, विरुद्धान्न, दिवानिद्रा,

## ३२. शीतपित्त. ( पित्त उठणें. )

**कारण व लक्षण.**—शीतल वायूच्या संपर्ककरून कफ व वायु हे दुष्ट होऊन पित्ताला मिळून अभ्यंतरीं रक्तादि धातूंचेठायीं व बाहेर त्वचेचेठायीं गांधिलमाशा चावून जशा गांधी येतात तशा गांधी उत्पन्न करितात. त्यांना कंडू, पीडा व दाह हे उपद्रव असतात. **उपचार.**—( १ ) सैंधव तुपांत वाटून लावावें. ( २ ) त्रिफळ्याचें ६ मासे चूर्ण एक तोळा मधांत द्यावें. ( ३ ) मिरपूड तुपांत कालवून अंगास चोळावी. ( ४ ) निर्गुडीचे पाल्याच्या २ तोळे रसांत गाईचें तूप १ तोळा घालून तीन दिवस द्यावें. ( ५ ) कवठीचा पाला बारीक वाटून त्याचा लेप करावा; व कवठीचे पाल्याचा रस दुधाशीं पोटांत द्यावा. ( ६ ) शिवणीचीं सुकीं फळें शिजवून तीं वाटून त्यांचा कल्क दुधाशीं द्यावा, व पथ्य करावें. ( ७ ) गुळवेल, हळद, कडूनिंब व धमासा या प्रत्येकाचा काढा शीतपित्तावर द्यावा. तो प्राण्याच्या प्राणाचें संरक्षण करितो. ( ८ ) गूळ आणि ओंवा एकत्र करून सात दिवस भक्षावा. ( ९ ) टाकळीच्या मुळाचें चूर्ण तुपाशीं प्राशनार्थ द्यावें. ( १० ) तुळशीचा रस अंगास चोळावा. ( ११ ) कडूनिंबाचीं पानें वाटून तुपाबरोबर किंवा आंवळकठीबरोबर खावीं; तेणेंकरून विस्फोट, उदर्द, कोष्ठ, क्षत, शीतपित्त, कंडू, रक्तपित्त हीं नाश पावतात. ( १२ ) घोंसाळीच्या पाल्याचा रस तुपांत घालून लेप द्यावा. ( १३ ) बाहव्याचें मूळ दुधांत उगाळून प्यावें, ह्मणजे कंडु व शीतपित्त ३ दिवसांत दूर होतें. **पथ्य.**—तांदूळ, मूग, कुळित्थ, कारलें, डाळिंब, ऊन्हपाणी, कफपित्तहारक पदार्थ. **अपथ्य.**—स्नान, ऊन्ह, आंबट आणि जडान्न.

## ३३. शूलरोग.

**कारण**—उदरांत वायूचा प्रकोप झाला ह्मणजे हृदय, कुक्षि, पाठ, माकडहाड, ओंटी, पोट यांचेठिकाणीं तिडीक उत्पन्न होते त्याला शूल म्हणतात. **शूलाचे प्रकार**-पृथक् दोषांनीं तीन, सन्निपातानें एक, आमानें एक आणि द्वंद्वज तीन, मिळून आठ प्रकारचा शूल होतो. या सर्व शूलांत बहुतकरून वायु हा प्रबल आहे. शूलाचे, परिणामशूल व अन्नद्रवशूल असेही आणखी भेद आहेत. **शूलाचे उपद्रव**—वेदना, तृषा, मूर्च्छा, मलबद्धता, कफ, अरुचि, कास, श्वास, उचकी हे उपद्रव होतात. **उपचार**—( १ ) दशमूळांचे काढ्यांत एरंडेल, हिंग, पादेलोण हीं घालून प्यावीं; ह्मणजे पोटाची फुगवटी व शूल यांचा नाश होतो. ( २ ) सुंठ व एरंडमूळ यांच्या काढ्यांत हिंग व पादेलोण घालून द्यावें ह्मणजे तत्काल शूलाचा नाश होतो. ( ३ ) पादेलोण, आम्लवेतस, बिडलोण, सैंधव, अतिविष व त्रिकटु यांचें चूर्ण महाळुंगाच्या रसाशीं द्यावें; म्हणजे गुल्म व शूल यांचा नाश होतो. ( ४ ) एरंडमूळ, धणे, बिडलोण, जवस, हरीतकी व हिंग

यांचें चूर्ण पाण्याशीं द्यावें; म्हणजे शूल व गुल्म यांचा नाश होतो. (५) पंचलवणें (बांगडखार, सैंधव, मीठ, बिडलोण, पादेलोण) समभाग घेऊन आल्याच्या रसांत पंधरा दिवस पचन करावीं. नंतर, त्याची चण्याएवढी गोळी करून ती वातशूलावर द्यावी. (६) हिंग, तैल, सैंधव यांला गोमूत्राशीं पचन करून त्याचा नाभीवर लेप करावा, तो वेदनायुक्त शूलाचा नाश करितो. (७) रिंगणी, गोखरू, एरंडमूळ, कुश, काश (कसई), ऊंस यांच्या मुळांचा काढा द्यावा. (८) त्रिफला व बाहव्याचा मगज यांचा काढा साखर व मध घालून प्यावा. तेणेंकरून रक्तपित्त, दाह व पित्तशूल, प्रदर हे दूर होतात. (९) महाळुंगाच्या रसांत गूळ घालून द्यावा; तो कफशूल, हृद्रोग, वातशूल, गुल्म यांचा नाश करितो. (१०) कायफळ, पोखरमूळ, काकडशिंगी, नागरमोथे, सुंठ, मिरें, पिंपळी, कचोरा यांचें चूर्ण, आल्याचा रस किंवा मध यांशीं द्यावें; म्हणजे कफ, शूल, वायु, अवडणें, ओकारी, कास, श्वास, क्षय हे दूर होतात. (११) चित्रक, पिंपळमूळ, एरंडमूळ, सुंठ, धणे यांचा काढा, हिंग, सैंधव व बिडलोण घालून द्यावा. (१२) मोहऱ्या व त्रिफला यांचें चूर्ण मध व तूप यांतून द्यावें, तें सर्व शूलनाशक आहे. (१३) ओंवा, सैंधव, हरीतकी, सुंठ यांचें चूर्ण करून घ्यावें; तें शूल व मंदाग्नि यांचा नाश करितें. (१४) बेल, एरंड व चित्रक यांचीं मुळें, सुंठ, हिंग, सैंधव यांचें चूर्ण घ्यावें, तें तत्काळ शूल निवारण करितें. (१५) शतावरीचा रस मधाशीं द्यावा. (१६) एलची, हिंग, जवखार, सैंधव यांचा काढा एरंडेल घालून द्यावा; तो कंबर, हृदय, उदर, नाभि, पाठ, कुक्षि, मस्तक, कर्ण व नेत्र या ठिकाणचा शूल यांचा अतिवेगानें नाश करितो. (१७) सुंठीच्या काढ्यांत एरंडेल, हिंग व पादेलोण घालून द्यावें. (१८) बेहडा १, सुंठ १, हिंग १, हरीतकी १ व सागरगोट्याचे गोळे ३ भाग यांचें चूर्ण एरंडेलांत घोंटून द्यावें म्हणजे सर्व शूलाचा नाश होतो. (१९) नाराचचूर्ण द्यावें. (२०) क्षारयोग—पळसमुळे, अर्जुनसादड्याची साल, धावड्याची साल, अघाडा, केळीचीं सोपटें, तीळ, हरणदोडी, धोतरा, हळद, कोहळ्याची वेल, अडुळसा, सुरण हीं एकत्र करून मडक्यांत घालून जमिनींत खळगा खणून गोंवऱ्यांचें पूट देऊन राख करावी. ती राख पाण्यांत कालवून पाणी गाळून तें प्राशनार्थ द्यावें; म्हणजे शूल, आनाहवायु, मलबंध, गुल्म, कफसंबंधी रोग, कावीळ, विद्रधि, हृदयशूल, पांडु, संग्रहणी, सूज, मुळव्याध, पडसें, अग्निमांद्य, उदर, पीनस, प्लीहा व मेह इत्यादिकांचा नाश होतो; आणि दगड भक्षण केले तथापि हा क्षार भस्म करून टाकितो. (२१) सुंठ, सज्जीखार व हिंग यांचें चूर्ण ऊन्हपाण्याशीं द्यावें, तें क्षणांत संपूर्ण शूलांचा नाश करील. (२२) पादेलोण, हिंग व सुंठ यांचें समभाग चूर्ण करून ऊन्हपाण्याशीं द्यावें. तें कफवातापासून हृदय, कुशी, पाठ, पोट यांमध्यें झालेला शूल, विषूचिका, यांचा नाश करितें. मळबंधावर यवांचे काढ्यांत द्यावें. (२३) चित्रकादिवटी—चित्रकमूळ, मीठ, पहाडमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी, बांगडखार, सैंधव, मीठ, बिडलोण, संचळ, जिरें, धणे, जटामांसी, ओंवा, पिंपळमूळ हीं समभाग घेऊन त्यांचीं सूक्ष्म चूर्ण करावीं. तीं एकत्र करून त्यांच्या लिंबाच्या रसांत खलून गोळ्या कराव्या. त्या हृदयशूल, पार्श्वशूल, आमशूल, अरुचि, ८० प्रकारचे वायूचे व्याधि यांचा तत्क्षणीं नाश करितात. (२४) सुंठ, तीळ व गूळ यांचा कल्क दुधाशीं करून प्यावा म्हणजे परिणामशूल (अन्न जिरत असतां जो शूल होतो) व आमवात यांचा नाश

होतो. ( २५ ) इंद्रावणीचें मूळ पाण्यांत उगाळून त्यांत सुंठ, मिरीं, पिंपळी, यांचें चूर्ण घालून घ्यावें. तें अत्यंत दुःसह शूलाचा नाश करितें. ( २६ ) एरंडमूळ, चित्रक, लहान शंख, पुनर्नवा, गोखरू, हीं समभाग घेऊन पुटांत जाळून तें भस्म पाण्याबरोबर घ्यावें. ( २७ ) पाण्यासुद्धां सगळा नारळ घेऊन तोंडास भोंक पाडून त्यांत मीठ भरून बाहेरून माती लावून वाळवून गोंवऱ्यांचे अग्नींत जाळावा. नंतर बारीक चूर्ण करून पिंपळीचे चूर्णाबरोबर तें चूर्ण शक्तीप्रमाणें खावें; म्हणजे परिणामशूल, वात्त, पित्त, कफ, सन्निपात यांपासून झालेला शूळ यांचा नाश होतो. ( २८ ) क्षुद्रशंखाचें भस्म ऊन पाण्याशीं द्यावें. तें, तत्क्षणीं पंक्तिशूलाचा नाश करितें. ( २९ ) भुईतरवडाचें मूळ ऊन पाण्याशीं द्यावें. ( ३० ) गेळफळ, कुटकी पाण्यांत वाटून किंचित् ऊन करून बेंबीवर लेप करावा. ( ३१ ) एकच सागरगोटा तीनशें शूलांचा नाश करील; मग लसूण, सैंधव, हिंग यांच्याशीं युक्त सेवन केला तर संशयच नाहीं. ( ३२ ) उडदांचे वडे सैंधवयुक्त, मऊ, तैलपक्क असे तुपाशीं खावे; म्हणजे अन्नद्रवशूलाचा नाश होतो. ( ३३ ) घोडीची लीद पिळून त्याचा रस काढून त्यांत हिंग घालून द्यावा. किंवा कुळिथांच्या काढ्यांत हिंग, सुंठ व बिडलोण यांचें चूर्ण घालून द्यावें; म्हणजे महान् शूलाचा नाश होतो. ( ३४ ) सांवे, कोद्रु, कांग यांच्या तांदळांची खीर करून खावी; ती अन्नद्रवशूलावर हितकारक आहे. ( ३५ ) गव्हांचें पीठ, तूप, गूळ घालून शिजवावें अथवा दूध, साखर घालून मळून शिजवावें आणि मंडलपर्यंत ( ४८ दिवस ) खावें म्हणजे अन्नद्रवशूलाचा नाश होतो. ( ३६ ) विष्णुक्रांताचे मुळांचा कल्क, साखर, मध, तूप हीं घालून घ्यावा; ह्मणजे परिणामशूल दूर होतो. ( ३७ ) शंखभस्म अथवा चिंचेच्या सालीचें भस्म उष्णोदकांत द्यावें. **पथ्य**—एक वर्षाचें जुनें भात, तापलेलें दूध, पडवळ, शेवगा, कारलें, चाकवत, मीठ, शोप, लसूण, वांगें, आंबा. **अपथ्य**—विरुद्ध अन्नपान, जाग्रण, विषमाशन; रूक्ष, कडू, तुरट, शीतळ, गुरू या पदार्थांचें सेवन; उद्योग, मैथुन, मद्य, द्विदल (तुरी, वाटाणे इ०), तिखट पदार्थ, शोक, क्रोध.

## ३४. शोथरोग. ( सूज. )

**कारण.**—वमन-विरेचकादि शोधन, ज्वरादि रोग, उपवासानें कृश व दुर्बल झालेल्या पुरुषांस खारट, आंबट, तिखट उष्ण आणि जड अशा पदार्थांचें सेवन; दहीं, अपक्क, मृत्तिका, भाजा, क्षीर, मत्स्यादि, विरुद्धसंयोगज विषानें दूषित झालेलें अन्न, यांचें सेवन; मुळव्याध, अव्यायाम, शोधनास योग्य दोष झाला तरी शोधन न घेणें, हृदयादि मर्मांस दोषांनीं केलेला उपघात, आम, गर्भपतनादि वाईट प्रसूति, वमनादि पंचकर्मांचा मिथ्यायोग, हे सर्व दोष सुजेला कारण आहेत. **लक्षण.**—अंगाला जडत्व, चित्त स्वस्थ नसणें, सुजेला उंचवटा आणि दाह, शिरा बारीक होणें, रोमांच येणें आणि अंगाचा रंग बदलणें हें सुजेचें सामान्य लक्षण आहे. **उपचार.**—( १ ) पुनर्नवा, दारुहळद, हळद, सुंठ, बाळहिरडे, गुळवेल, चित्रक, भारंगमूळ, देवदार यांचा काढा सर्वांगाची सूज दूर करितो. ( २ ) बचनाग, सुंठ, पुनर्नव्याचीं मुळें गोमूत्रांत वाटून लेप करावा. ( ३ ) घोसाळीचे पानांचा रस गोमूत्रांत घालून ऊन करून लावावा. ( ४ ) सागरगोटी, रुई व एरंड यांचीं पानें वाटून उन्ह करून सुजेवर लेप करावा; म्हणजे तीन दिवसांत सूज

उतरते. (५) आल्याचा रस किंवा सुंठीचा काढा दुधांत घालून प्यावा आणि तो जिरल्यावर त्रिफळ्याचे काढ्यांत शिलाजित घालून प्यावें, म्हणजे त्रिदोषशोथाचा नाश होईल. (६) पादेलोण व मोहऱ्या वाटून लेप करावा. (७) काळी निर्गुंडी, चित्रक, सुंठ, नागरमोथे, जिरें, रिंगणी, पहाडमूळ, हळद, पिंपळी, गजपिंपळी, जटामांसी यांचें चूर्ण मंदोष्ण पाण्यांत कालवून द्यावें; यापेक्षां शोथनाशक दुसरें औषध नाहीं. (८) गूळ, पिंपळी, सुंठ, यांचें चूर्ण, सूज, आमाजीर्ण, शूल यांचें नाशक व बस्तिशोधक आहे. (९) त्रिफळ्याचा काढा महिषीचें तूप घालून प्यावा म्हणजे सूज, प्रमेह, नाडीव्रण, भगंदर, यांचा नाश होतो. (१०) अडुळसा, गुळवेल, डोरली यांचा काढा मध घालून द्यावा म्हणजे दुर्धर सूज, श्वास, कास, ज्वर, ओकारी यांचा नाश होतो. (११) पुनर्नवा (घेटूळी), चित्रक, निर्गुंडी, गुग्गुळ, एरंडाचीं पानें, कोरांटी, हीं पाण्यांत घालून पाणी तापवावें, याचा वाफारा द्यावा. (१२) विटेचा तुकडा तापवून त्यावर गोमूत्र व कडूकारेळे आणि आंबे हळदीची भुकटी घालून, त्याची सुजेस धुरी द्यावी. **पथ्य**.—रेचक, उष्णोदकांचा शेक, जुने तांदूळ, कुळित्थ, जव, मूग, कारलें, लसूण, गाजरें, पडवळ, दूध, कडू, तिखट व अग्नि प्रदीप्त करणारे असे पदार्थ, ऊन पाणी. **अपथ्य**—नवें अन्न, सुकलेल्या शाका, गूळ, पीठ, दहीं, खिचडी, आम्ल, लाह्या, जडान्न, दाहक पदार्थ, मैथुन.

## ३५. शोषरोग.

**कारण व लक्षण**—क्षयाचाच भेद शोषरोग आहे; तो सहा प्रकारचा आहे. स्त्रियांचे अतिसेवनेंकरून जो शोष होतो तो; कांहींएक शोक होऊन त्यापासून होतो तो; शरीरव्रण किंवा आगंतुक व्रण होऊन त्यापासून होतो तो; मार्गानें फार चालण्याचे श्रमेंकरून होतो तो; शरीराला फार श्रम होऊन त्यापासून होतो तो व शरीर जरेंकरून व्याप्त झालें असतां होतो तो, याप्रकारें सहा प्रकारचा शोषरोग जाणावा. रसादि धातूंचें शोषण होऊन शरीर क्षीण होतें त्याला शोष असें म्हणतात. **उपचार**—(१) जेष्ठीमध, आंवळकाठी, खडीसाखर, धणे, लवंग यांचा काढा द्यावा. (२) साळीच्या लाह्यांचा काढा द्यावा. (३) वावडिंग, आंवळकाठी, जेष्ठमध यांचा काढा द्यावा. (४) पित्तपापड्याचा काढा द्यावा. (५) कोष्ठ, ज्येष्ठमध, निळें कमळ, वडाच्या डिऱ्या यांचें चूर्ण करून मध घालून चाटण करून द्यावें. तें वरचेवर चाटीत जावें म्हणजे तृषा शांत होईल. (६) आमलक्यादि गुटिका—आंवळकाठी, कमळ, कोष्ठ, साळीच्या लाह्या, वडाच्या कोंवळ्या पारंब्यांच्या डिऱ्या, यांचें चूर्ण मधांत मिळवून गोळी करून तोंडांत धरली असतां, तहान फार लागते ती व तोंडास कोरड पडते ती हीं दूर होतात. पथ्य क्षयावर सांगितल्याप्रमाणें करावें.

## ३६. श्वासरोग. (दमा.)

**कारण**—जें कारण कासरोग उत्पन्न होण्यास सांगितलें तेंच कारण श्वासरोगाचेंही जाणावें. **पूर्वरूप**—हृदयास पीडा, शूल, पोट फुगणें, पोट ताणल्यासारखें, तोंड बेचव आणि शंखाचे ठायीं टोंचल्यासारखी पीडा हें श्वासरोगाचें पूर्वरूप जाणावें. **संप्राप्ति**—ज्या वेळेस वायु कफयुक्त होऊन प्राणान्नोदकवह स्रोतसांचा मार्गरोध करून चहूंकडे जातो, तेव्हां तो श्वास उत्पन्न करतो. महाश्वास, ऊर्ध्व, छिन्न, तमक व

क्षुद्र या भेदांनीं श्वासरोग ५ प्रकारचा आहे. **उपचार**—(१) शृंग्यादि चूर्ण—कांकडशिंगी, सुंठ, मिरें, पिंपळी, त्रिफला, आंवळकाठी, रिंगणी, भारंगमूळ, पोखरमूळ, जटामांसी, सैंधव, पादेलोण, बिडलोण, काचलवण व मीठ यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर प्यावें म्हणजे तें हिक्का, श्वास, ऊर्ध्ववात, खोकला व अरुचि यांचा नाश करील. (२) सुंठ ६, पिंपळी ५, मिरें ४, विड्याचीं पानें ३, दालचिनी २ व वेलदोडा १, याप्रमाणें घेऊन चूर्ण करून बरोबरीनें साखर घालून खाल्लें असतां, मुळव्याध, अग्निमांद्य, खोकला, अरुचि, श्वास, कंठरोग व हृद्रोग यांचा नाश होतो. (३) कवचबीजांचें चूर्ण मध व तूप यांबरोबर चाटावें. (४) भारंगमूळ व सुंठ यांचें चूर्ण आल्याचे रसाशीं घ्यावें म्हणजे कठीणही श्वासाचा नाश होईल. (५) विडंगादि चूर्ण—वावडिंग, पिंपळी, एला, दालचिनी हीं एकेक तोळा, मिरीं २ तोळे, सुंठ १६ तोळे, या सर्वांच्या समान साखर घालून तें १ तोळा घ्यावें; ह्मणजे तें श्वास, कास, ज्वर, प्लीहा व पांडुरोग यांचा नाश करितें. (६) बेहडा तोंडांत धरावा म्हणजे श्वासकासांचा नाश होतो. (७) अडुळशाचा रस व गाईचें लोणी एकत्र कढवून त्यांतून त्रिफलाचूर्ण द्यावें. (८) रिंगणी, जिरें व आंवळकाठी यांचें चूर्ण मधांत घ्यावें म्हणजे सर्व श्वास क्षणांत दूर होतात. (९) आल्याचा स्वरस मध घालून प्राशन करावा म्हणजे कास, श्वास, पडसें व कफ हीं दूर होतात. (१०) बेहडेदळ शेळीचे मूत्रांत पचन करून मग त्याचें चूर्ण मधाशीं चाटावें म्हणजे श्वास व कास हे दूर होतात. (११) काळीं द्राक्षें, हिरडा, नागरमोथा, कांकडशिंगी व धमासा यांचा लेह, मध व तूप घालून करावा. तो खाल्ला असतां मोठा भयंकर श्वास दूर होईल. (१२) दशमूळांचा काढा करून त्यांत एरंडमूळांचें चूर्ण घालून प्राशन केलें असतां श्वास व पार्श्वशूल हे नाश पावतात. (१३) गूळ व शिरसाचें तेल खावें. (१४) कांकडशिंगी, सुंठ, पिंपळी, नागरमोथा, एरंडमूळ, कचोरा व मिरीं, यांचें चूर्ण समभाग करून, गुळवेल, अडुळसा व पंचमूळ यांचा काढा करून त्या काढ्यांत चूर्ण व साखर घालून प्राशन केलें असतां, मोठा घोररूप श्वास तीन दिवसांत नाहींसा होतो. (१५) सुंठ व भारंगमूळ यांचा काढा पाजावा. (१६) कोहळ्याच्या मूळाचें चूर्ण कोमट पाण्याशीं प्राशन केलें असतां दारुणही श्वास व कास शीघ्र शमतात. (१७) हळद, मिरें, द्राक्षें, पिंपळी, रास्ना, सुंठ व गूळ यांचें चूर्ण शिरसाच्या तेलाशीं चाटिलें असतां प्राणाचा नाशकारक जरी श्वास असला तरी त्याचा नाश होतो. (१८) द्राक्षें, गुळवेल व सुंठ यांच्या काढ्यांत पिंपळीचें चूर्ण घालून द्यावें म्हणजे श्वास, शूल, खोकला, अग्निमांद्य, जीर्णज्वर, तृषा यांचा नाश होतो. (१९) कुळिथ, सुंठ, रिंगणी, अडुळसा व पुष्करमूळ यांचा काढा प्राशन केला असतां, श्वास व कास यांचें निवारण होतें. (२०) अडुळसा, हळद, पिंपळी, गुळवेल, भारंगमूळ, नागरमोथे, सुंठ व रिंगणी यांचा काढा मिऱ्यांचें चूर्ण घालून द्यावा. (२१) गूळ, डाळिंब, द्राक्षें, पिंपळी, सुंठ यांचें चूर्ण महाळुंगाच्या रसांतून द्यावें. (२२) वासावलेह—अडुळसा ४०० तोळे व ३२०० तोळे पाणी घेऊन त्याचा चतुर्थांश काढा करून त्यांत हरीतकीचूर्ण २५६ तोळे व खडीसाखर २५६ तोळे घालून पुनः पचन करावा. दाट झाला म्हणजे उतरून थंड झाल्यावर मध ३२ तोळे, वंशलोचन ८ तोळे, पिंपळी २ तोळे व चातुर्जात ४ तोळे घालून त्यांतून दोन तोळे घेत जावा; म्हणजे श्वास, कास, क्षय, रक्तपित्त, कफ, पडसें, हृद्रोग,

कृशता, विद्रधि, उरःक्षत व रक्ताची वांति यांचा नाश होतो. ( २३ ) लवंगादिवटी— लवंग, मिरीं, त्रिफळा यांचें चूर्ण समभाग व या तिहींचे समान खदिरसार एकत्र करून त्याची बाभळीच्या सालीच्या काढ्यांत गोळी करावी. ती श्वास व कफ यांचा नाश करिते. ( २४ ) हिरडा, बेहडा, आंवळकाठी, तल्या टांकणखाराची लाही यांचें चूर्ण समभाग घेऊन एकत्र करून त्याला विड्याच्या पानांच्या रसांत घोंटून गोळी मिऱ्यायेवढी करावी व ती द्यावी. ( २५ ) दोन वाल निवडुंगाचें दूध घेऊन गुळाशीं खावें म्हणजे खोकला, श्वास, क्षय व हृद्रोग यांचा नाश होतो. ( २६ ) रुईचे फुलांतील फळें घेऊन त्यांच्या समभाग मिरपूड घालून खलून गोळ्या चार वालांच्या कराव्या व त्या द्याव्या, म्हणजे श्वास, कास दूर होतात. (२७) कोष्ठ, सैंधव, नागरमोथे, धमासा, जिरें, शहाजिरें, जवखार, सज्जीखार, चित्रकमूळ, अजमोदा, ओंवा, हरीतकी या सर्वांचे दुप्पट जुना गूळ घेऊन यांचा अवलेह करून मध घालून द्यावा. तेणेंकरून कास, श्वास, अग्निमांद्य, कावीळ, पांडु, गुल्म, उचकी, राजयक्ष्मा, ज्वर, अर्श, प्याहा, ऊर्ध्ववात, आनाहवायु यांचा नाश होतो. ( २८ ) सुंठ, बालहरीतकी, नागरमोथे हीं औषधें कुटून त्यांत दुप्पट गूळ घालून गोळ्या कराव्या. मग एकेक गोळी तोंडांत धरावी. तेणेंकरून सर्व कास, श्वास दूर होतात. ( २९ ) अडुळशाचा काढा साखर व मध घालून प्यावा. ( ३० ) केळ्याच्या आंतील केसरयुक्त भाग पोखरून त्यांत मिऱ्यांचें चूर्ण भरून रात्रीस ठेवावें व सकाळीं तें मंदाग्नीवर भाजून खावें म्हणजे श्वास, कास दूर होतात. ( ३१ ) दोन पैसेभार उष्णोदकांत साजूक तूप, मध, खडीसाखर व थोडें सैंधव टाकून प्यावें. याप्रमाणें दोनचार दिवस केलें असतां कफ पातळ होऊन पडतो व श्वास, कास दूर होतात. ( ३२ ) अघाड्याचे झाडाची राख करून तीं मधांतून द्यावी. ( ३३ ) यवासा किंवा धमासा, काळा धोत्रा, तमाखू व ओंवा समभाग घेऊन यांचें चूर्ण साधारण कुटून गुरगुडींत घालून ओढावें व धूर गिळावा. या योगानें त्वरित गुण येतो. ( ३४ ) पावशेर दुधांत सहा मासे समुद्रफळ व तितकीच पांढऱ्या गोकर्णीची मुळी उगाळून तें प्यावें. एक वांति अथवा रेच होऊन श्वास त्वरित मोकळा होतो. ( ३५ ) अडुळशाचा रस ४ तोळे काढून त्यांत अघाड्याचे मुळाची राख ४ मासे व मध २ तोळे एकत्र घोंटून चाटण करून ठेवून, तें दिवसांतून २।३ वेळ द्यावें. ( ३६ ) रुईचीं फुलें, अघाड्याचीं मुळें व गोकर्णीचीं मुळें यांस त्रिधारी निवडुंग फोंपाऱ्यांत भाजून त्याचा रस काढून त्या रसाचीं १४ पुटें देऊन भस्म करावें. व नित्य तीन मासे मधांत बेहडा उगाळून त्यांतून २ गुंजाप्रमाणें द्यावें. ( ३७ ) रुईच्या कोंवळ्या तुंबऱ्या व फुलें एकत्र वाटून गुळांत चांगला पाक करावा आणि नित्य प्रातःकाळीं सुपारीइतका हा पाक सतत सेवन करावा. ( ३८ ) पिंपळी ६४ प्रहर खलून तिचें चूर्ण मधांतून चाटावें. **पथ्य**—जुन्या साठच्या साळी, कुळिथ, गहूं, यव, दूध, पडवळ, वांगें, लसूण, तोंडलें, तांदुळजा, उष्णोदक. **अपथ्य**—रक्त काढणें, शेळीचें दूध, तूप, कंद, मोहऱ्या, रूक्ष व जड अन्न व पान.

## ३७. श्लीपदरोग. ( पाय किंवा हात मोठा होणें. )

**संप्राप्ति**—जी सूज ज्वरेंकरून युक्त असून अडसंधि यांचेठायीं पीडा देऊन क्रमेंकरून मनुष्याचे पायांचेठायीं उतरते, त्या रोगास “श्लीपद” असें ह्मणतात. कोणी

क्षुद्र या भेदांनीं श्वासरोग ५ प्रकारचा आहे. **उपचार**—(१) शृंग्यादि चूर्ण— कांकडशिंगी, सुंठ, मिरें, पिंपळी, त्रिफला, आंवळकाठी, रिंगणी, भारंगमूळ, पोखरमूळ, जटामांसी, सैंधव, पादेलोण, बिडलोण, काचलवण व मीठ यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर घ्यावें म्हणजे तें हिक्का, श्वास, ऊर्ध्ववात, खोकला व अरुचि यांचा नाश करील. (२) सुंठ ६, पिंपळी ५, मिरें ४, विड्याचीं पानें ३, दालचिनी २ व वेलदोडा १, याप्रमाणें घेऊन चूर्ण करून बरोबरीनें साखर घालून खाल्लें असतां, मुळव्याध, अग्निमांद्य, खोकला, अरुचि, श्वास, कंठरोग व हृद्रोग यांचा नाश होतो. (३) कवचबीजांचें चूर्ण मध व तूप यांबरोबर चाटावें. (४) भारंगमूळ व सुंठ यांचें चूर्ण आल्याचे रसाशीं घ्यावें म्हणजे कठीणही श्वासाचा नाश होईल. (५) विडंगादि चूर्ण—वावडिंग, पिंपळी, एला, दालचिनी हीं एकेक तोळा, मिरीं २ तोळे, सुंठ १६ तोळे, या सर्वांच्या समान साखर घालून तें १ तोळा घ्यावें; ह्मणजे तें श्वास, कास, ज्वर, प्लीहा व पांडुरोग यांचा नाश करितें. (६) बेहडा तोंडांत धरावा म्हणजे श्वासकासांचा नाश होतो. (७) अडुळशाचा रस व गाईचें लोणी एकत्र कढवून त्यांतून त्रिफलाचूर्ण द्यावें. (८) रिंगणी, जिरें व आंवळकाठी यांचें चूर्ण मधांत घ्यावें म्हणजे सर्व श्वास क्षणांत दूर होतात. (९) आल्याचा स्वरस मध घालून प्राशन करावा म्हणजे कास, श्वास, पडसें व कफ हीं दूर होतात. (१०) बेहडेदळ शेळीचे मूत्रांत पचन करून मग त्याचें चूर्ण मधाशीं चाटावें म्हणजे श्वास व कास हे दूर होतात. (११) काळीं द्राक्षें, हिरडा, नागरमोथा, कांकडशिंगी व धमासा यांचा लेह, मध व तूप घालून करावा. तो खाल्ला असतां मोठा भयंकर श्वास दूर होईल. (१२) दशमूळांचा काढा करून त्यांत एरंडमूळांचें चूर्ण घालून प्राशन केलें असतां श्वास व पार्श्वशूल हे नाश पावतात. (१३) गूळ व शिरसाचें तेल खावें. (१४) कांकडशिंगी, सुंठ, पिंपळी, नागरमोथा, एरंडमूळ, कचोरा व मिरीं, यांचें चूर्ण समभाग करून, गुळवेल, अडुळसा व पंचमूळ यांचा काढा करून त्या काढ्यांत चूर्ण व साखर घालून प्राशन केलें असतां, मोठा घोररूप श्वास तीन दिवसांत नाहींसा होतो. (१५) सुंठ व भारंगमूळ यांचा काढा पाजावा. (१६) कोहळ्याच्या मूळाचें चूर्ण कोमट पाण्याशीं प्राशन केलें असतां दारुणही श्वास व कास शीघ्र शमतात. (१७) हळद, मिरें, द्राक्षें, पिंपळी, रास्ना, सुंठ व गूळ यांचें चूर्ण शिरसाच्या तेलाशीं चाटिलें असतां प्राणाचा नाशकारक जरी श्वास असला तरी त्याचा नाश होतो. (१८) द्राक्षें, गुळवेल व सुंठ यांच्या काढ्यांत पिंपळीचें चूर्ण घालून द्यावें म्हणजे श्वास, शूल, खोकला, अग्निमांद्य, जीर्णज्वर, तृषा यांचा नाश होतो. (१९) कुळिथ, सुंठ, रिंगणी, अडुळसा व पुष्करमूळ यांचा काढा प्राशन केला असतां, श्वास व कास यांचें निवारण होतें. (२०) अडुळसा, हळद, पिंपळी, गुळवेल, भारंगमूळ, नागरमोथे, सुंठ व रिंगणी यांचा काढा मिऱ्यांचें चूर्ण घालून द्यावा. (२१) गूळ, डाळिंब, द्राक्षें, पिंपळी, सुंठ यांचें चूर्ण महाळुंगाच्या रसांतून द्यावें. (२६) वासाद्यवलेह—अडुळसा ४०० तोळे व ३२०० तोळे पाणी घेऊन त्याचा चतुर्थांश काढा करून त्यांत हरीतकीचूर्ण २५६ तोळे व खडीसाखर २५६ तोळे घालून पुनः पचन करावा. दाट झाला म्हणजे उतरून थंड झाल्यावर मध ३२ तोळे, वंशलोचन ८ तोळे, पिंपळी २ तोळे व चातुर्जात ४ तोळे घालून त्यांतून दोन तोळे घेत जावा; म्हणजे श्वास, कास, क्षय, रक्तपित्त, कफ, पडसें, हृद्रोग,

कृशता, विद्रधि, उरःक्षत व रक्ताची वांति यांचा नाश होतो. ( २३ ) लवंगादिवटी— लवंग, मिरीं, त्रिफळा यांचें चूर्ण समभाग व या तिहींचे समान खदिरसार एकत्र करून त्याची बाभळीच्या सालीच्या काढ्यांत गोळी करावी. ती श्वास व कफ यांचा नाश करिते. ( २४ ) हिरडा, बेहडा, आंवळकाठी, तेल्या टांकणखाराची लाही यांचें चूर्ण समभाग घेऊन एकत्र करून त्याला विड्याच्या पानांच्या रसांत घोंटून गोळी मिऱ्यायेवढी करावी व ती द्यावी. ( २५ ) दोन वाल निवडुंगाचें दूध घेऊन गुळाशीं खावें म्हणजे खोकला, श्वास, क्षय व हृद्रोग यांचा नाश होतो. ( २६ ) रुईचे फुलांतील फळें घेऊन त्यांच्या समभाग मिरपूड घालून खलून गोळ्या चार वालांच्या कराव्या व त्या द्याव्या, म्हणजे श्वास, कास दूर होतात. (२७) कोष्ठ, सैंधव, नागरमोथे, धमासा, जिरें, शहाजिरें, जवखार, सज्जीखार, चित्रकमूळ, अजमोदा, ओंवा, हरीतकी या सर्वांचे दुप्पट जुना गूळ घेऊन यांचा अवलेह करून मध घालून द्यावा. तेणेंकरून कास, श्वास, अग्निमांद्य, कावीळ, पांडु, गुल्म, उचकी, राजयक्ष्मा, ज्वर, अर्श, प्याहा, ऊर्ध्ववात, आनाहवायु यांचा नाश होतो. ( २८ ) सुंठ, बालहरीतकी, नागरमोथे हीं औषधें कुटून त्यांत दुप्पट गूळ घालून गोळ्या कराव्या. मग एकेक गोळी तोंडांत धरावी. तेणेंकरून सर्व कास, श्वास दूर होतात. ( २९ ) अडुळशाचा काढा साखर व मध घालून प्यावा. ( ३० ) केळ्याच्या आंतील केसरयुक्त भाग पोखरून त्यांत मिऱ्यांचें चूर्ण भरून रात्रीस ठेवावें व सकाळीं तें मंदाग्नीवर भाजून खावें म्हणजे श्वास, कास दूर होतात. ( ३१ ) दोन पैसेभार उष्णोदकांत साजूक तूप, मध, खडीसाखर व थोडें सैंधव टाकून प्यावें. याप्रमाणें दोनचार दिवस केलें असतां कफ पातळ होऊन पडतो व श्वास, कास दूर होतात. ( ३२ ) अघाड्याचे झाडाची राख करून तीं मधांतून द्यावी. ( ३३ ) यवासा किंवा धमासा, काळा धोत्रा, तमाखू व ओंवा समभाग घेऊन यांचें चूर्ण साधारण कुटून गुरगुडींत घालून ओढावें व धूर गिळावा. या योगानें त्वरित गुण येतो. ( ३४ ) पावशेर दुधांत सहा मासे समुद्रफळ व तितकीच पांढऱ्या गोकर्णीची मुळी उगाळून तें प्यावें. एक वांति अथवा रेच होऊन श्वास त्वरित मोकळा होतो. ( ३५ ) अडुळशाचा रस ४ तोळे काढून त्यांत अघाड्याचे मुळाची राख ४ मासे व मध २ तोळे एकत्र घोंटून चाटण करून ठेवून, तें दिवसांतून २।३ वेळ द्यावें. ( ३६ ) रुईचीं फुलें, अघाड्याचीं मुळें व गोकर्णीचीं मुळें यांस त्रिधारी निवडुंग फोंपाट्यांत भाजून त्याचा रस काढून त्या रसाचीं १४ पुटें देऊन भस्म करावें. व नित्य तीन मासे मधांत बेहडा उगाळून त्यांतून २ गुंजाप्रमाणें द्यावें. ( ३७ ) रुईच्या कोंवळ्या तुंबऱ्या व फुलें एकत्र वाटून गुळांत चांगला पाक करावा आणि नित्य प्रातःकाळीं सुपारीइतका हा पाक सतत सेवन करावा. ( ३८ ) पिंपळी ६४ प्रहर खलून तिचें चूर्ण मधांतून चाटावें. **पथ्य**—जुन्या साठक्या साळी, कुळित्थ, गहूं, यव, दूध, पडवळ, वांगें, लसूण, तोंडलें, तांदुळजा, उष्णोदक. **अपथ्य**—रक्त काढणें, शेळीचें दूध, तूप, कंद, मोहऱ्या, रूक्ष व जड अन्न व पान.

## ३७. श्लीपदरोग. ( पाय किंवा हात मोठा होणें. )

**संप्राप्ति**—जी सूज ज्वरेंकरून युक्त असून अडसंधि यांचेठायीं पीडा देऊन क्रमेंकरून मनुष्याचे पायांचेठायीं उतरते, त्या रोगास "श्लीपद" असें ह्मणतात. कोणी

" वारूळ " म्हणतात. ज्या देशांत सर्वकाळ पाणी सांचलेलें फार असतें, त्या देशांत व जे देश सर्व ऋतूचेठायीं शीतळ असतात त्या देशांत फारकरून हा रोग उत्पन्न होतो. **उपचार**—( १ ) प्रथम रक्त काढावें. ( २ ) धोत्रा, एरंडमूळ, निर्गुडी, पुनर्नवा म्ह० घेटुळी, शेवगा, शिरस यांचा लेप, चिरकालाचें श्लीपद दारुण असलें तरी त्याचा नाश करितो. ( ३ ) वरधाराचूर्ण, गोमूत्र किंवा कांजीबरोबर घेतल्यास मोठें कष्टसाध्य वर्षापलीकडलें असें श्लीपद नाश पावेल. ( ४ ) पळसाचे मुळांचा अंगरस व पांढरे शिरसाचें तेल दोन्ही समान घेऊन प्यावीं. ( ५ ) पांढऱ्या एरंडाचे तेलानें हरीतक्या तळून गोमूत्राबरोवर ७ दि० खाव्या ह्मणजे श्लीपदाचा नाश होतो. ( ६ ) सागाचे सालीचा काढा करून गोमूत्र घालून प्यावा म्हणजे श्लीपद व मेदोरोग हे दूर होतात. **पथ्य**—तांदूळ, जव, कुळित्थ, लसूण, पडवळ, शेवगा, कारलें, कडू व तिखट व अग्निदीपन करणारे पदार्थ. **अपथ्य**—पिष्टान्न, गूळ घालून जे दुधाचे पदार्थ करावे ते, गोड, आंबट पदार्थ, जड व कफकारक पदार्थ.

## ३८. संग्रहणीरोग.

**कारण**—अतिसार बंद झाला असतां अग्नि मंद असतो, त्यांत विरुद्धाहार झाला तर त्यापासून आमांश होऊन अग्नीचें स्थान दुष्ट होतें, यास्तव आमरूपच मळ पडूं लागतो; त्याला संग्रहणी असें म्हणतात. अथवा अतिसारावांचूनच मिथ्याहारादिकेंकरून संग्रहणी होते. जी संग्रहणी प्रतिदिवशीं आंवेचा संग्रह करून वारंवार शूळयुक्त क्षुभित होऊन आंव सोडिते तिचें नांव न्यासग्रहणी. **लक्षण**—आंव पडते त्या आंवेला दुर्गंधि आणि मुरडा असतो, व वायूनें क्षणोक्षणीं बंद पडते, पित्तानें क्षणोक्षणीं पडते, ती कच्ची आंवच पडते अथवा त्या आंवेचा पाक होऊन पडतो. **पूर्वरूप**—तहान,आळस, शक्तिक्षीणता, हीं लक्षणें होतात. जठराग्नि मंद होतो. त्याकरितां अन्नविदग्ध होतें म्हणजे करपल्यासारखें होतें, आणि त्या अन्नाचा पाक लवकर होत नाहीं व शरीराला जडपणा इ० लक्षणें होतात. **उपचार**.—( १ ) सुंठीच्या कल्कांत तूप घालून अग्नीवर सिद्ध करावें. तें तूप वाताचें अनुलोमन करितें; व ग्रहणी, पांडुरोग, प्लीहा, कास व ज्वर यांचा नाश करितें. ( २ ) संग्रहणीच्या शांत्यर्थ तक्रसेवन करावें म्हणजे रोग दूर होतो. ताक पिणें तें सुंठीचें चूर्ण घालून प्यावें; अन्न हळू हळू कमी करावें व ताक वाढवीत जावें, इतकें कीं ताकच अन्नावांचून आहार होईल. मैथुन व क्रोध हे वर्जावे. ( ३ ) हिंग, जिरें व सैंधव यांणीं युक्त केवळ दहीं घुसळलेलें ताक द्यावें. तें संग्रहणी, अर्श, अतिसार व वायु यांचा नाश करितें. ( ४ ) कोंवळ्या बेलफळाच्या कल्कांत सुंठीचें चूर्ण व गूळ घालून द्यावें व ताकभात पथ्याला द्यावा. ( ५ ) ओंवा, पिंपळमूळ, दालचिनी, तमालपत्र, एलची, नागकेशर, सुंठ, धायटीचीं फुलें, चिंच, पिंपळी आणि वाळा हीं एकेक तोळा व साखर सहा भाग या सर्वांचें चूर्ण करून रोज एक तोळा द्यावें. वर शेळीचें दूध प्यावें म्हणजे संग्रहणी, पित्तसंग्रहणी व प्रवाहिका यांचा नाश होतो. ( ६ ) ज्याला कष्टानें आणि कठीण असा मळ होतो त्याला तुपांत मीठ घालून पाजावें. ( ७ ) **तालिसादि वटी**—तालीसपत्र, चवक, मिरें, हीं चार चार तोळे, पिंपळी व पिंपळमूळ हीं आठ तोळे, सुंठ बारा तोळे, चातुर्जात व वाळा हें एक एक तोळा, या सर्वांचें

चूर्ण आणि चूर्णाचे तिप्पट गूळ यांत दोन तोळ्यांची गोळी करावी. ती भक्षण केली असतां कष्टतर संग्रहणी, ओकारी, खोकला, दमा, ज्वर, अरुचि, सूज, गुल्म, उदर व पांडु यांचा नाश करिते. (८) काळी मुसळी ताकांत किंवा तांदुळाचे धुवणांत वाटून एक तोळा द्यावी व पथ्याला ताकभात द्यावा. (९) शंखभस्म व सैंधव समभाग करून तीन मासे मधाशीं द्यावें, म्हणजे मोठाही ग्रहणीरोग नाश पावतो. (१०) कांकायनगुटी द्यावी. (११) पुनर्नवामूळ, मिरें, उन्हाळी, सुंठ, चित्रकमूळ, बाळहिरडे, करंजसाल, बाळवेल यांचा काढा करून घ्यावा; म्हणजे मुळव्याध, गुल्म, ग्रहणी या सर्वांचा नाश होतो. (१२) अतिविष, नागरमोथा, वाळा, धायटीफूल, कुड्याची साल, लोध्र, पहाडमूळ यांचा काढा घ्यावा; म्हणजे संग्रहणी, सर्व ज्वर, अरोचक व अग्निमांद्य यांचा नाश होतो. (१३) तालिसादि चूर्ण—तालीसपत्र, वेखंड, हळद, सुंठ, मिरीं, पिंपळी, पिंपळमूळ, चित्रक, चवक, आंबेहळद, बेलफळ, अजमोदा, कचोरा, चातुर्जात, लवंग, धायटीफूल, अतिविष, जायफळ, ओंवा, पहाडमूळ, सांवरीचा चीक, आमसोल, पंचलवणें (मीठ, सैंधव, पादेलोण, बीडलोण, बांगडखार), जिरें, शहाजिरें, वावडिंग, अम्लवेतस, चिंच, त्रिफला, पळसपापडी, जटामांसी, तरवड, वाळा, एलची, ब्राह्मी, जवस, भुयआंवळी, कोष्ठ हीं समभाग व सर्वांच्या बरोबर थोडा चिकणा, त्या सर्वांच्या बरोबर हरीतकी, तीसुद्धां सर्वांच्या बरोबर खडीसाखर घालून चूर्ण करावें. तें १५ दिवस घेतलें असतां संग्रहणी, क्षय, खोकला, दमा, अरुचि, प्लीहा, मुळव्याध, अतिसार, ज्वर, वायु, स्थूलता, प्रमेह, अपस्मार, पांडु, गुल्म, उदर, कफज व्याधि, पित्तज व्याधि, उन्माद, पोट फुगणें व विषूचिका यांचा नाश करितें. हें वाचा देणारें आहे व अग्निमांद्य, संपूर्ण रोग यांचा नाश करितें; व पुष्टि, आयुष्य, बल, कांति, बुद्धि, स्मृति, धारणा यांतें देणारें आहे. (१४) मसुरांच्या काढ्यांत बेलफळाचा मगज शिजवावा व द्यावा, तो संपूर्ण कुक्षिरोग, संग्रहणी, पांडु व कामला यांचा नाशक होतो. (१५) दशमुळें व सुंठ यांचा काढा, सूज व आमसंग्रहणीचा नाश करितो. (१६) भल्लातकक्षार—बिबवे, सुंठ, मिरीं, पिंपळी, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, शेंदेलोण, पादेलोण, मीठ व घेरोसा, हे आठ तोळे घेऊन गोंवऱ्यांच्या अग्नींत जाळावे. त्याचा क्षार तुपाशीं अथवा भोजनांत द्यावा म्हणजे हृद्रोग, पांडुरोग, संग्रहणी, गुल्म, उदावर्त, शूल यांचा नाश होतो. (१७) चवक, चित्रक, बेलफळ व सुंठ, यांचें चूर्ण ताकाबरोबर घ्यावें म्हणजे फार दुष्ट संग्रहणीचा नाश करील. (१८) पादेलोण, चित्रक, मिरें यांचें चूर्ण ताकाबरोबर सेवन करावें म्हणजे संग्रहणी, उदर, गुल्म, मुळव्याध, अग्निमांद्य, पाणथरी यांचा नाश होतो. (१९) **कपित्थाष्टकचूर्ण**—कंवठ ८ भाग, साखर ८ भाग आणि डाळिंबसाल, चिंचेची साल, कोंवळें बेलफळ, धायटीफुलें, अजमोदा व पिंपळी हीं तीन तीन भाग, व मिरें, जिरें, धणे, पिंपळमूळ, वाळा, संचळ, अजमोदा, दालचिनी, विलायची, तमालपत्र, नागकेशर, चित्रक, सुंठ हीं १३ औषधें एक एक भाग घ्यावीं व साऱ्यांचें चूर्ण करावें. हें कंठाचे रोग, अतिसार, क्षय, गुल्म व संग्रहणी यांचा नाश करितें. **पथ्य**—जुन्या साठक्या साळी, मसुरा, तुरी, मूग यांचे रस; निःशेष लोणी काढलेलें ताक, दूध, लोणी, दहीं, तिळांचें तेल, मध, फणस, डाळिंब, केळफूल, जून केळें, चुका, कवठ, जांभूळ, घेंडशी, पांढरा भोंपळा, तुरट पदार्थ. **अपथ्य**—गहूं, पावटे,

वाटाणे, उडीद, जव, चवळ्या, मयाळ, चाकवत, कोंवळा शेवगा, कंद, तांबूल, ऊंस, बोर, आंबा, कांकडी, सुपारी, गूळ, नारळ, पालेभाज्या, क्षार, द्राक्षें, आंबट, मीठ, जडान्न.

## ३९. स्वरभेद.

**कारण**—अति आंबट पदार्थ खाणें, मोठ्या स्वरानें गायन करणें, शेंदूर खाणें, कंठावर दंडादिकांचा प्रहार, विषभक्षण, या कारणांनीं कंठाच्या स्वराचा भेद होतो. **उपचार**—(१) गाईच्या दुधांत आंवळकाठीचें चूर्ण द्यावें. (२) भोजन झाल्यावर तूप, मिरपूड घालून प्यावयास द्यावें. (३) पिंपळी, पिंपळमूळ, मिरें, सुंठ, यांचें चूर्ण गोमूत्रांत द्यावें. (४) सुंठ, मिरें, पिंपळी, हरडा, वेहडा, आंवळकाठी, जवखार यांचें चूर्ण द्यावें. (५) कोळिंजन अथवा पुष्करमूळ, किंवा बोरीचें मूळ तोंडांत धरून ठेवावें व पाणी गिळावें. (६) बोरीचीं पानें भाजून वाटून त्यांत सैंधव घालून द्यावें. (७) ज्येष्ठमध, आंवळकाठी, खडीसाखर, यांचा काढा द्यावा. (८) गाईच्या गरम दुधांत साखर व मिरपूड टाकून तें प्यावें. **पथ्य**—जव, तांबडे तांदूळ, कोंवळा मुळा, द्राक्ष, महाळुंग, लसूण, लवंग, आलें, तांबूल, मिरें, तूप. **अपथ्य**—आम्ल, कवीठ, कमळकंद, जांभळें, टेंमुर्णीचें फळ, तुरट पदार्थ, वमन, निद्रा, बहुत भाषण, विरुद्धान्न.

## ४०. स्त्रीरोग.

**प्रदररोग. कारण**—विरुद्ध भक्षण, मद्य, अध्यशन, विरुद्धाहार, अजीर्ण, गर्भपात, अति मैथुन, फार चालणें, अतिशोक, उपवासादिकांनीं कर्शन, जड ओझें वाहिल्यानें, काष्ठादिकांच्या प्रहारानें, दिवसा निजल्यानें, या सर्व कारणांनीं कफ, पित्त, वायु व सन्निपात, या चार भेदांनीं प्रदररोग (धुपणी) होतो. **प्रदराचे उपद्रव**—सर्व प्रदरांत अंग मोडून येतें व हातापायांस फूट लागते. तो प्रदर अति वाहला असतां शक्ति कमी होते, थकवा येतो, मूर्च्छा व गुंगी येते, तृषा लागते व दाह होतो. रोगी स्त्री बडबड करते; अंग पांढरें फटफटीत होतें. डोळ्यांस झांपड पडते, व वातज रोग, आक्षेपकादिक होऊं लागतात. **कफज प्रदर**—आम, भोकरीचे फळासारखा बुळबुळित, किंचित् पांढरा तांदुळाच्या धुणासारखा स्राव होतो याला श्वेत प्रदर ह्मणतात. **पित्तज प्रदर**—किंचित् पिंवळा, निळा, काळा, तांबडा व कढत असा प्रदर वाहतो; त्यांत दाह, चिमचिमणें, इत्यादि पित्ताच्या पीडा होतात; व त्या प्रदराचा वेग अति असतो. **वातज प्रदर**—रूक्ष, तांबूस, फेंसाळलेला, थोडथोडा, मांस धुतलेल्या पाण्यासारखा, असा प्रदर वाहतो, व त्यांत वायूच्याही पीडा होतात. **त्रिदोषज प्रदर**—जो प्रदर, मध, तूप, हरताळ व मज्जा यांच्या रंगासारखा व दुर्गंधयुक्त असतो, तो त्रिदोषज जाणावा; हा असाध्य आहे. लोकांत या रोगाचे **श्वेतप्रदर** व **रक्तप्रदर** असे दोन प्रकार मानितात. **श्वेतप्रदरावर**—(१) बोखेड्याच्या (काळा उंबर) फळाचा रस काढून मधाशीं द्यावा ह्मणजे पांढरी व तांबडी धुपणी दूर होते. पथ्य दूधभात. (२) काकजंघा अ० कांगेच्या मुळांचा रस, लोध्र व मध घालून द्यावा. (३) अडुळशाच्या पानांचा अ० गुळवेलीचा रस मधाशीं द्यावा. (४) रक्तरोड्याच्या मुळांचा कल्क मधाशीं द्यावा. (५) कापशीचें मूळ तांदुळाच्या धुणाशीं दुवक्त उगाळून प्यावें, अ० फळें किंवा मूळ द्यावें. (६) आवळ्याचा रस किंवा चूर्ण मधाशीं द्यावें. (७) दररोज प्रातःकाळीं व

रात्रौ निजावयाचे वेळीं गाईचे १४ तोळे दुधांत २१ तोळे पाणी व ४ मासे सुंठ घालून कढवून पाणी अटवून फक्त दूध शेष उरवावें, व त्यांत ६ मासे खडीसाखर घालून तें प्यावें. (८) खडीसाखर व जिरें यांचें चूर्ण तांदुळाच्या धुणांत द्यावें. (९) कांकडीच्या बियांतील मगज १ तोळा व पांढऱ्या कमळाच्या पाकळ्या १ तोळा, बारीक वाटून त्यांत जिरें व खडीसाखर घालून तें ७ दिवस घ्यावें. (१०) उडदांचें पीठ, ज्येष्ठमधाचें चूर्ण, भुयकोहळ्याचें चूर्ण, मध, साखर, गाईचें दूध, हीं एकत्र करून द्यावीं. (११) आंवळकाठीच्या बिया पाण्यांत वाटून त्यांच्या कल्कांत साखर, मध घालून ३ दि० द्यावें. (१२) नागकेशर ताकाशीं वाटून ३ दि० द्यावें व ताकभात खावा. **रक्तप्रदरावर.**—(१) अशोकाच्या सालीचा दुधांत व पाण्यांत मिळून दुग्धावशेष काढा करून थंड झाल्यावर प्यावा, तो तीव्र रक्तप्रदराचा नाश करितो. (२) शुद्ध स्थानावरील वाघांटीचें उत्तरेकडचें मूळ उत्तराभाद्रपदा नक्षत्रावर काढून घ्यावें व तें कंबरेस बांधावें. (३) केवड्याची मुळी धुणांत उगाळून खडीसाखर घालून द्यावी. (४) तवकीर, राळ व गेरू यांचें चूर्ण तुपाशीं द्यावें. (५) नागकेशराची पूड तुपांत भिजवून ठेवून सुपारीएवढी गोळी करून दुवक्त घेत जावी. (६) बाभळीच्या शेंगा, बाळआंबे, कांटेसांवरीची साल, व गोंधणीच्या बियांचें चूर्ण हीं एकत्र करून दुधांतून द्यावी. (७) उंदराच्या लेंड्या बलाबल पाहून दुधांत कालवून १।२।३ दिवस द्याव्या. (८) कथल्या गोंद रात्रीं पाण्यांत भिजत घालून सकाळीं खडीसाखर घालून द्यावा; म्हणजे रक्तप्रदर व प्रमेह यांचा नाश होतो. (९) जुन्या विटकरीचें चूर्ण ६ मासे, मायफळ ३ मासे व तूप गाईचें १ तोळा, हीं एकत्र करून ७ दिवस घ्यावीं. (१०) पेटारीच्या पाल्याचा रस २ तोळे काढून त्यांत नागकेशराचें चूर्ण दोन मासे घालून ७ दिवस घ्यावें. (११) केशर, वेलची, जायफळ, वंशलोचन, नागकेशर, शंखजिरें यांचें समभाग चूर्ण करून तें २ मासे चूर्ण, २ मासे मध, ६ मासे गाईचें तूप व ३ मासे खडीसाखर, यांतून सेवन करावें; म्हणजे रक्तप्रदर, रक्तप्रमेह, रक्तार्श, हे दूर होतात. हें औषध दुवक्त घेऊन वर गाईचें तापविलेलें दूध साखर घालून प्यावें. (१२) पिकलेलें केळें एक, अर्ध तोळा तुपाशीं दररोज सकाळ संध्याकाळ खावें. यापासून कोणास थंडी झाल्यास यांतच मध घालून तें घ्यावें, म्हणजे रक्तप्रदर व धातुविकार दूर होतात. (१३) साखरूंड (पडवास) याचीं फळें तिळांचे तेलांत ३ मासे द्यावीं म्हणजे सर्व प्रदरांचा नाश होतो. **सर्व प्रदरांवर**—(१) नूतन झालेल्या प्रदरावर एरंडेलाचें रेचक द्यावें व नित्य रात्रौ निजतेवेळीं गाईच्या तापविलेल्या दुधांत पिठीसाखर व थोडी सुंठीची पूड टाकून तें घ्यावें. (२) दर्भाचें मूळ तांदुळाच्या धुणांत वाटून ३ दि० प्यावें. (३) त्रिफला, सुंठ, दारुहळद, व लोध्र यांचा काढा मध व लोध्राचें चूर्ण घालून द्यावा; तो त्रिदोषज प्रदराचा नाश करितो. (४) बोखाड्याच्या अ० उंबराच्या फळांच्या चूर्णाचा साखर व मध घालून मोदक करून तो घ्यावा. (५) दारुहळद, रसांजन, अडुळसा, नागरमोथा, किराईत, बेलकाचरी, बिबा, यांचा काढा मध घालून प्यावा. (६) भुईआंवळीचें मूळ तांदळांच्या धुणाशीं तीन दि० प्यावें; म्हणजे तें दुःसाध्य प्रदराची शांति करितें. (७) धायटीच्या फुलांचा काढा तीन दि० प्यावा; अ० पाल्याचा रस साखरेशीं प्यावा. (८) त्रिफळा, देवदार, वेखंड, अडुळसा, लाह्या, दूर्वा, पिठवण, चिकणा, यांचा काढा मध घालून

द्यावा. ( ९ ) कोरांट्याचें मूळ, मोहाची साल, पांढरा चंदन, ज्येष्ठमध, हे वाटून तांदळांच्या धुणाशीं प्यावें. ( १० ) कंवठ व वेळू यांचा पाला वाटून तो कल्क मध घालून द्यावा. ( ११ ) अशोकाची साल वाटून रसांजन घालून तांदळांच्या धुणांत कालवून मध घालून द्यावी. ( १२ ) तांदुळजाचीं मुळें तांदळांच्या धुणांत वाटून त्यांत मध व रसांजन घालून तें घ्यावें. ( १३ ) उंदराच्या लेंड्या, धायटीचीं फुलें, रक्तयाबोळ हीं समभाग घेऊन चूर्ण करून तें १ तोळा घ्यावें; म्हणजे सात दिवसांत सर्व प्रदरांचा नाश होईल. ( १४ ) शेरणीच्या पाल्याचें चूर्ण तुपांत द्यावें, म्हणजे शूळयुक्त प्रदर दूर होईल. ( १५ ) दारुहळद, बिबा, लाजाळू, तिळाचीं फुलें, रसांजन, यांचा काढा करून द्यावा. (१६)कांटेसांवरीच्या सालीचें चूर्ण दुधांत द्यावें. ( १७ ) दारुहळदीचे काढ्यांत ३ मासे शिलाजित घालून ७ दि० द्यावें. (१८) खारका फोडून तुपांत तळून त्यांत गोपीचंदनाची पूड घालून तें घ्यावें. (१९) जास्वंदीच्या फुलांच्या कळ्या,सकाळ संध्याकाळ ४।६ घेऊन ६ मासे खडीसाखरेशीं खाव्या आणि वर ७ तोळे गाईचें दूध, साखर घालून प्यावें; ह्मणजे प्रदर व धातुविकार दूर होऊन पुष्टि येते. ( २० ) आस्कंधाचें चूर्ण गाईच्या दुधाशीं खडीसाखर घालून दुवक्त घ्यावें, म्हणजे प्रदर व धातुविकार दूर होऊन शक्तिही येते. ( २१ ) जास्वंदीचें मूळ गाईच्या दुधांत उगाळून खडीसाखर घालून दुवक्त प्यावें; म्हणजे प्रदर, धातुविकार, रक्तार्श हे दूर होऊन पुष्टिही येते. ( २२ ) गुलाबाचीं ताजीं फुलें दर वेळीं ५ घेऊन खडीसाखरेशीं खाऊन वर गाईचें दूध प्यावें; याप्रमाणें संध्याकाळींही घ्यावें, म्हणजे प्रदर, धातुविकार, मूत्रविकार, पित्त व रक्तार्श हे दूर होऊन शौचास साफ होतें. ( २३ ) बकुळीचीं ताजीं फुलें एक तोळा घेऊन त्यांत बदामाच्या तीन चार बिया टाकून खडीसाखरेबरोबर तें दुवक्त घ्यावें. त्यावर थंड पाणी १ तोळा प्यावें म्हणजे प्रदर व धातुविकार दूर होतात. ( २४ ) सकाळ संध्याकाळ सालंमिश्री, सफेद मुसळी व पंजाबी मिश्री यांचें समभाग चूर्ण ३ मासे घेऊन, दुधांत खडीसाखर घालून त्यांतून घ्यावें, म्हणजे प्रदर व धातुविकार हे दूर होतात. ( २५ ) पांढऱ्या जास्वंदीच्या मुळ्या, कमळकंद, पांढऱ्या सांवरीचा कंद अथवा साल यांची सहा मासे वस्त्रगाळ पूड, नित्य सकाळ सायंकाळ गाईच्या दुधांत खडीसाखर घालून त्यांतून घ्यावी; म्हणजे प्रदर व धातुविकार यांचा नाश होतो. ( २६ ) बोळक्यांत ४ भाग गोपीचंदन व १ भाग तुरटी घालून भस्म करावें. तें १ गुंजप्रमाण तांदुळांच्या धुणांत मध अ० साखर घालून द्यावें. **पथ्य.**—जुने तांदूळ, जव, मूग, मसुरा, चणे, तुरी, दूध, तूप, तांदुळजा, पडवळ, दुध्या भोंपळा, थंड पाणी. **अपथ्य.**—व्यायाम, मार्ग चालणें, ऊन, मैथुन, कुळित्थ, गूळ, वांगीं, तीळ, उडीद, दहीं, क्षार पदार्थ, तांबूल, शिंबीधान्य, आंबट पदार्थ, मीठ.

**सोमरोगकारण.**—स्त्रियांना मैथुनाचा अतिप्रसंग, शोक, श्रम, अतिसार, किंवा विषदोष यांणीं संपूर्ण शरीरांतील उदकें क्षोभ पावून तिच्या मूत्रमार्गाप्रत येऊन मूत्रद्वारानें स्रवतात. हा श्वेतप्रदरासारखाच एक रोग आहे. **लक्षण व निरुक्ति**—त्या काळीं त्यांच्या वेगाचें धारण न होतां केव्हांही सुख होत नाहीं, व तिचें मस्तक शिथिल होतें. तोंड व तालु शुष्क होतात, व मूर्च्छा, वडबड आणि आंगाच्या चर्माला अतिरूक्षता येते, व तिला भोजन, प्राशनीय पदार्थ, यांणीं तृप्ति होत नाहीं. उदकें शरीराचें धारण करितात, ह्मणून या उदकाला ही सोमसंज्ञा दिली आहे; त्या सोमाचा क्षय होतो, या-

करितां त्या व्याधीला सोमरोग असें म्हणतात. **मूत्रातिसार.**—त्या उदकरूप सोमाचा क्षय होतो याकरितां देहाला निश्चेष्टता येते. तो सोमरोग ज्या काळीं वेदनायुक्त स्रवतो आणि सोमलक्षणें होऊन फार दिवस जातात, आणि तो कांजीसारखें वारंवार मूत्र स्रवतो, त्या काळीं त्याला मूत्रातिसार असें ह्मणतात. हा बलनाश करितो. **सोमलक्षण.**—फार स्वच्छ, थंड, गंध व वेदना यांणीं रहित, पांढरा असा अतिस्राव होतो आणि ती स्त्री अति दुर्बळ होते. **उपचार.**—(१) काळी मुसळी, खारका, ज्येष्ठमध आणि भुईकोहळा यांचें चूर्ण, मध व साखर यांशीं द्यावें. (२) टाकळीच्या मुळ्या तांदुळांच्या धुणाशीं वाटून प्रातःकाळीं प्राशन कराव्या. (३) पिकलेलें केळें व आंवळ्यांचा रस एकत्र करून त्यांत साखर घालून द्यावें. **रजोदोषावर**—कांहीं स्त्रियांस अशी खोड असते कीं, प्रतिमहिन्यांतून दोन वेळा रजस्वला होतात, व रजस्वला झाल्यावर आठ आठ दिवसपर्यंत नित्य स्राव होत असतो; त्यामुळें क्षीणता, ग्लानी, हातापायांचा दाह हे विकार होतात. यावर—(१) कांडवेल फुंपाट्यांत भाजून दोन तोळेपर्यंत रस काढून त्यांत तितकेंच तूप, गोपीचंदनाची पूड १ तोळा व खडीसाखरेची १ तोळा घालून तो प्यावा. (२) शंखजिरें व पाषाणभेद यांचें चूर्ण दुधांत द्यावें. **शुद्धार्तवाचें लक्षण**—जें आर्तव (विटाळ) बुळबुळीत नसतें, ज्यांत दाह, शूल इत्यादि नसतात, जें महिन्यानें नियमेंकरून पांच दिवसपर्यंत असतें, जें फार नसून, अल्पही नसतें, मध्यम स्रवतें, तें शुद्ध असें समजावें. आणि जें सशाच्या रक्तासारखें किंवा अळत्यासारखें लाल असतें व ज्यांत वस्त्र भिजवून धुतल्यास डाग राहात नाहीं, तें आर्तव शुद्ध समजावें.

**योनिरोग. योनिशूलावर**—(१) रास्ना, आस्कंद, अडुळसा, हे घालून दूध सिद्ध करावें व तें घ्यावें. (२) गुळवेल, त्रिफळा व दंतीमूळ यांच्या काढ्यानें योनि शेकावी. (३) तगर, रिंगणी, कोष्ठ, सैंधव, देवदार यांच्या काढ्यांत तैल सिद्ध करून त्यांत कापूस भिजवून योनींत धारण करावा. (४) कापूस घेऊन तुपांत बुडवून त्यावर चंदनोदक शिंपडून योनींत धारण करावा. (५) जुन्या विटेच्या तुकड्यानें अ० मिठाच्या पोटलीनें शेक द्यावा. (६) सुंठ, मिरीं, पिंपळी, यांचें मधांत चाटण द्यावें. (७) बेलाचा पाला अथवा काचरी, कलौंजी जिरें, अडुळसा, सुंठ, मिरीं, पिंपळी, पिंपळमूळ, सुंठ, हीं औषधें वाटून उष्णोदकांत कालवून गाळून द्यावीं. (८) सुंठीची पूड एरंडेलांत कालवून अ० सुंठ, एरंडमूळ पाण्यांत उगाळून लेप करावा. (९) शेंधेलोण, अफू, रक्तबोळ, आंबेहळद, हीं औषधें कुटून पाण्यांत वाटून गोळी करून ती योनींत धरावी. (१०) कडूइंद्रावणीचें मूळ मेंढीच्या तुपांत किंवा दुधांत उगाळून आंत लेप द्यावा. (११) काळ्या धोतऱ्याचीं दोन तीन पानें बारीक वाटून सैंधव व तूप घालून पोटली करून योनींत धरावी, म्हणजे सर्व प्रकारचे शूळ राहतात. (१२) बिडलोण, बांवच्या, अडुळशाचें मूळ, पिंपळी, वेखंड, मिरी, पिंपळमूळ, सुंठ यांचा कल्क करून कोमट पाण्याशीं द्यावा. (१३) कळलावी, अघाडा, कंवडळीचें मूळ, योनीमध्यें धारण करावें म्हणजे योनिशूल व पुष्पावरोध यांचा नाश होतो. **योनिरोगावर**—(१) वड, पिंपळ, उंबर, पारोसा पिंपळ, पिंपरी, वेळू, मोह, अंबाडा, बोर, नांदरुख, कळंब, अर्जुन यांची साल, ज्येष्ठमध, चारोळ्या, तांबडा व पांढरा लोध्र, साळई, टेंटू, लहान जांभूळ, थोर जांभूळ,

आंबा, बाळहिरडे, असाणा, यांतून जीं मिळतील तीं मिळवून त्यांचा काढा करून द्यावा; म्हणजे योनिरोग, व्रण, अस्थिभंग, दाह, मेदोरोग, प्रमेह, विषदोष हे दूर होतात. ( २ ) शिवण, त्रिफळा, द्राक्ष, कासविंदा, आंबेहळद, हळद, गुळवेल, कोरांटीचें मूळ, शतावरी, पुनर्नवा, फालसें हीं औषधें तोळा तोळा घेऊन, सर्वांच्या सोळापट पाणी घालावें. अष्टमांश उरवून त्यांत शेरभर तूप घालून घृत सिद्ध करावें. तें नित्य भक्षिलें असतां योनीसंबंधीं सर्व रोग दूर होतात, आणि गर्भ राहतो. ( ३ ) पिंपळी, मिरीं, उडीद, शतावरी, कोष्ठ, सैंधव, यांचा योग करून बोटाएवढी वात करून योनींत धारण करावी. ( ४ ) गुळवेल, त्रिफळा, दंतीमूळ यांचा काढा करून, त्याची योनीवर धार धरून त्याणें धुवावी म्हणजे कंडूची शांति होते. (५) **योनिस्रावावर**—मुगांचीं फुलें, कात, हरीतकी, जायफळ, पहाडमूळ आणि सुपारी यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून योनींत घालावें; म्हणजे ती घट्ट होऊन तींतून पाणी वाहणार नाहीं. (६) आंवळ्यांचा रस साखर घालून द्यावा म्हणजे योनीचा दाह शांत होईल. **नष्टार्तव**—कधीं कधीं शारीररोगानें अगदीं तारुण्यावस्थेंतही स्त्रीचा विटाळ बंद पडतो, त्यामुळें तिला अतिशय क्षीणता प्राप्त होऊन कधीं कधीं प्राणावरही बेततें. कित्येक स्त्रिया योग्य वयांत आल्या तरी त्यांस शारीररोगानें लवकर ऋतु प्राप्त होत नाहीं असेंही पहाण्यांत येतें. **रजोदर्शनोपाय**—( १ ) काळ्या तिळांच्या काढ्यांत गूळ घालून तो थंड करून घ्यावा. ( २ ) तीळ, भोंकर, बडीशोप, यांचा काढा थंड करून गूळ घालून घ्यावा. ( ३ ) पांढऱ्या दूर्वांच्या रसांत डाळिंबीचे मोठमोठे कळे वाटून तो रस शिळे पेजेंतून द्यावा. ( ४ ) कडूभोंपळ्याच्या बिया, दंतीबीज, पिंपळी, गूळ, गेळ, दारू करण्याकरितां कुजवून तयार करतात तें किण्व, यवक्षार, निवडुंगाचा चीक एकत्र करून, त्याणें वात तयार करून ती योनींत धारण करावी, म्हणजे रजाला उत्पन्न करिते. ( ५ ) कांजी, तीळ, उडीद, दह्यांत पाणी घातल्याखेरीज केलेलें ताक व दहीं यांचें सेवन करावें, आणि मालकांगणीचें पान वाटून तें मोहऱ्या, वेखंड आणि असाणा यांचें चूर्ण थंड दुधाशीं तीन दिवस द्यावें. ( ६ ) पिंपळाची व चिंचेची साल पाण्यांत उगाळून द्यावी. ( ७ ) कडूइंद्रावणीचें मूळ योनींत ठेवावें अ० कडूइंद्रावणीचीं फळें लोण्याशीं खावीं. ( ८ ) तिळांचे काढ्यांत सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, भारंगमूळ यांचें तीन मासे चूर्ण घालून द्यावें; म्हणजे विटाळ येतो व रक्तगुल्महीं दूर होतो. ( ९ ) भारंगमूळ, सुंठ, मिरीं, पिंपळी यांचा काढा गूळ घालून घ्यावा. ( १० ) खिरणीचे बियांतील मगज काढून त्याची पोटली धरावी. (११) गाजराचें बीं पाण्यांत वाटून पांचसात दिवस घ्यावें. **योनिकंद**—दिवसास निजल्यानें, अत्यंत क्रोधानें, श्रम केल्यानें, अतिमैथुनानें, योनीस नखदंतांनीं क्षत झाल्यानें, वातादि दोष कुपित होऊन योनीमध्यें पू व रक्त यांच्या रंगासारख्या रंगाचा बोराएवढा वर्तुळ असा मांसाचा गोळा उत्पन्न होतो; त्याला योनिकंद म्हणतात. **उपचार**—( १ ) गेरू, आंब्याच्या आंठीचा मगज, हळद, सुर्मा, कायफळ यांचें चूर्ण मधांत कालवून योनींत धारण करावें; आणि त्रिफळ्याच्या काढ्यांत मध घालून त्याचें सेचन करावें. ( २ ) गुळवेल, त्रिफळा, दंतीमूळ, यांचे काढ्यांत पिंपळी, मिरीं, उडीद, शतावरी, कोष्ठ, सैंधव हीं वाटून त्याची वात आंगठ्याजवळचे बोटाप्रमाणें करून योनींत धरावी, म्हणजे ती योनींतले कृमि काढून योनि स्वच्छ करील. (३) नांदुरखी, पीत लोध्र हीं कुटून चिंचेबरोबर पक्व करून लेप करावा. (४) पळसपापडी

कुटून कणकींत मिळवून तळहाताएवढी पोळी करून त्या गोळ्यावर बांधावी. (५) कडूनिंबाच्या बिया तेलांत तळून त्यांतच खलाव्या, आणि त्यांत थोडी मोरचुताची लाही घालून तें मलम कंदावर लावावें म्हणजे कंद गळून पडतो. हें मुळव्याधीच्या मोडावरही लावावें.

**गर्भिणीरोग. गर्भधारण झालेल्या स्त्रीचीं लक्षणें**—गर्भधारण झाल्याबरोबर स्त्रीस तृप्ति व उल्हास वाटतो. ओंटीवर थंड पाणी शिंपडावें, जर तिला हींव वाजल्यासारखें झालें तर गर्भधारण झालें म्हणून समजावें. वरचेवर तिच्या अंगास जडत्व येतें, सूर्यकिरण पाहिल्यानें त्रास येतो, आळस येतो, सोंडास मळमळ सुटते, कोणत्याही पदार्थावर इच्छा जाते, अन्न पचन होत नाहीं, वांति, हृदय उडूं लागतें, ग्लानि व अंगावर शहारे येतात, हीं साधारण लक्षणें गर्भिणीला होतात. गर्भिणीच्या शरीरावर पांडुरता येऊं लागते व तिचीं कुचाग्रें काळसर होतात. गर्भिणी स्त्रीनें आपला आहार सात्विक ठेवावा. फार श्रम करूं नयेत व अगदींच बसून राहूं नये. बेतानें काम करावें; म्हणजे प्रसूतसमयीं जास्त इजा होणार नाहीं. गरोदर स्त्रीनें सहा महिन्यांनंतर पुरुषसहवास व प्रवास करूं नये, आणि तांबूल भक्षूं नये. **गर्भिणीच्या उरांत जळजळतें त्यास**—(१) आंवळकाठी व द्राक्षें यांचें चूर्ण खडीसाखरेबरोबर खावें. (२) गाईच्या दुधांत खडीसाखर टाकून त्यांतून गुळवेलीचें सत्व अथवा प्रवाळ घ्यावें. **ज्वरावर**—(१) चंदन, उपरसाळ, लोध्र, द्राक्षें यांचा काढा साखर घालून गर्भिणीच्या ज्वरावर द्यावा. (२) दुधी, उपरसाळ, पहाडमूळ, वाळा, नागरमोथे यांचा काढा थंड करून द्यावा. (३) मोहाची साल, चंदन, वाळा, उपरसाळ, ज्येष्ठमध, पद्मकाष्ठ, यांचा काढा मध घालून द्यावा. **पित्तज्वरावर**—द्राक्षें, पद्मकाष्ठ, वाळा, साळवण, चंदन, ज्येष्ठमध, दुधी, उपरसाळ, आंवळकाठी यांचा काढा द्यावा. **विषमज्वरावर**—सुंठ, शेळीच्या दुधांत वाटून प्यावी. **ज्वरातिसारावर**—मंजिष्ठ, ज्येष्ठमध, लोध्र, यांचें चूर्ण साखरेच्या पाकांत घालून द्यावें, म्हणजे गर्भिणीची प्रवाहिका आणि रक्तामातिसार यांचा नाश होतो. **साधारण अतिसारावर**—(१) चुन्याची निवळी लहान चमचाभर, दुधांतून द्यावी. (२) आंब्याची कोय भाजून खावयास द्यावी. (३) बाळवेल, जायफळ, मुरुडशेंग, हीं पाण्यांत उगाळून द्यावीं. (४) धायटीचें फूल, मोचरस, इंद्रजव हीं सर्व समभाग घेऊन चूर्ण करून तें २ मासे, पाण्यांतून द्यावें. (५) पिकलेलें उंबर मधाशीं द्यावें अथवा पिकलेलीं जांभळें द्यावीं. **संग्रहणीवर**—आंबे व जांभूळ यांच्या सालीच्या काढ्यांत साळीच्या लाह्या आणि सातू यांचें चूर्ण घालून चाटावयास द्यावें. **श्वास-कासावर**—(१) पिठवण, चिकणा, अडुळसा यांचा रस प्राशन करावा म्हणजे श्वास, कास, रक्तपित्त, कावीळ, सूज, ज्वर यांचा नाश होतो. (२) भारंगमूळ, सुंठ, पिंपळी, यांचें चूर्ण गुळाशीं द्यावें. **वांतीवर**—(१) धण्यांचा कल्क अ० कोथिंबिरीचा रस तांदुळांच्या धुणांत साखर घालून प्राशनार्थ द्यावा. (२) बेलफळाचा गीर व लाह्यांचें पाणी एकत्र करून द्यावें. (३) तरवडाचीं फुलें १ तोळा, गाईचे ८ तोळे दुधांत वाटून त्यांत खडीसाखर १ तोळा घालून द्यावीं. **वायूवर**—बेलफळ, टाकळा, किंवा पाडळमूळ आणि सुंठ हें घालून काढा करून तो थंड झाल्यावर द्यावा. **गर्भिणीच्या सुजेवर**—(१) चंदन, ज्येष्ठमध, वाळा, नागकेशर, तीळ, मेषशृंगी (मेढशिंगी), मंजिष्ठ, रुईचें मूळ, पुनर्नवा, यांचा लेप सुजेचा नाश करितो. त्यांत

गर्भिणीच्या सुजेचा विशेषेंकरून नाश करितो. ( २ ) काळें जिरें ( शहाजिरें ), पांढरें जिरें, कुटकी, यांचा काढा गर्भिणीच्या सुजेचा नाश करितो. ( ३ ) आस्कंधाचें ( ढोरगुंजेचें ) ओलें मूळ गोमूत्रांत अगर पाण्यांत उगाळून ऊन करून लेप द्यावा. (४) पांढऱ्या वसूचें ( पुनर्नवा ) मूळ उगाळून लेप द्यावा व याचाच काढा करून प्यावयास द्यावा. **गर्भिणीचा जठराग्नि प्रदीप्त होण्यास**—अजमोदा, सुंठ, पिंपळी, जिरें हीं समभाग चूर्ण करून, तें गूळ व मधाशीं द्यावें. **गर्भिणीच्या शूलावर**—(१) कुश, काश (कसई), एरंड, गोखरूं यांचीं मूळें घेऊन त्यांचा दुधांत काढा करून साखर घालून द्यावा. ( २ ) गोखरूं, ज्येष्ठमध, द्राक्षें, हीं दुधाशीं वाटून त्यांत साखर घालून प्यावें. ( ३ ) कचरा, शिंगाडे, पद्मकाष्ठ, निळें कमळ, रानमूग, ज्येष्ठमध, यांचा काढा साखर घालून द्यावा व दूधभात खावा; म्हणजे गर्भिणीचा शूल व अतिसार यांचा नाश होतो. **गर्भिणीच्या धुपणीवर**—(१) कुंभारणीच्या घराची माती, मोगरीचीं पानें, लाजाळू, धायटीचीं फुलें, गेरू, रसांजन, राळ यांतून मिळतील ते पदार्थ घेऊन त्यांचें चूर्ण करून मधाशीं द्यावें. ( २ ) वाळा, अतिविष, नागरमोथा, मोचरस, इंद्रजव, यांचा काढा गर्भाचें चलन, प्रदर व शूल, यांवर द्यावा. **गर्भिणीच्या आनाह ( मलबद्ध व मूत्रबद्ध रोग ) वायूवर**—वेखंड, लसूण घालून दूध तापवावें, त्यांत हिंग व पादेलोण घालून प्राशनार्थ द्यावें, म्हणजे सुखी होईल. **गर्भिणीचें मूत्र कोंडतें त्यावर**—(१) साळी, ऊंस, कुश ( दर्भ ), काश ( कसई ), व शरतृण या तृणपंचमूलाचा कल्क घालून दूध कढवावें; व तें प्राशन करावें म्हणजे मूत्रबंध, तृषा, दाह, रक्तपित्त यांचा नाश होतो. ( २ ) पळसाचीं फुलें वाफून ओंटीवर बांधावीं. ( ३ ) सोरा पाण्यांत वाटून नाभीवर लेप द्यावा. **गर्भिणी व बाळंतिणी यांच्या रक्तस्रावावर**—(१) वाळा, कमळ, रक्तचंदन, क्षीरवृक्षपंचक ( वड, उंबर, पिंपळ, पिंपरी, जांभूळ ), यांच्या साली, हीं औषधें पाण्यांत कुटून तूप घालून त्यांत तुरटी भिजवून योनींत ठेवावी व ओंटीवरही ठेवावी. ( २ ) शतधौतघृत अंगास चोळावें. ( ३ ) खडीसाखर, मध, नील कमळ, रक्त कमल, नागकेशर यांचा काढा करून त्यांत तूप व मध घालून द्यावें. ( ४ ) शिंगाडे, कचरा यांची लापशी, दुधांत करून द्यावी. ( ५ ) गहुला, कमळकंद, कोंवळीं उंबरें हीं दुधांत शिजवून तें दूध प्यावें. ( ६ ) तांदुळज्याच्या मुळ्या तांदुळांच्या धुणांत वाटून द्याव्या. ( ७ ) साखर, तीळ, जव, अ० पद्मकाष्ठ, यांचें एक तोळा चूर्ण मधांत द्यावें. ( ८ ) धणे, नागरमोथे, काळा वाळा, पांढरा वाळा, लाजाळू, गुळवेल, वावडिंग, पित्तपापडा, धमासा यांचा काढा करून तो थंड झाल्यावर द्यावा, म्हणजे रक्तस्राव व अतिसार हे दूर होतात. ( ९ ) पारव्याची विष्ठा, नागवेलीच्या रसांतून अ० धुणांतून द्यावी. (१०) नील कमल, रक्त कमल, कल्हार, कुमुद, श्वेत कमल, मोहाचीं फुलें या उत्पलादि गणाचा दुधांत काढा करून द्यावा; म्हणजे रक्तस्राव, दाह, तृषा, हृद्रोग, रक्तपित्त, मूर्च्छा, वांति व अरुचि यांचा नाश होतो. **गर्भिणी स्त्री रजस्वला झाल्यास**—आंवळकाठींतील बिया तांदुळांच्या धुणांत वाटून तें धूण पावशेरपर्यंत द्यावें. **गर्भिणीच्या स्तनांस क्षत व दाह होतो त्यास.**—( १ ) कोरफडीचें मूळ, हळद, मायफळ व तुरटी हीं पाण्यांत उगाळून ऊन करून लेप द्यावा. ( २ ) तुरटीच्या पाण्यानें स्तनांचीं बोंडें धुऊन कात उगाळून लेप द्यावा म्हणजे दाह शमन होतो. **गर्भि-**

णीस पुष्टिकर योग.—आस्कंधाच्या मुळांचा काढा करून द्यावा, गर्भिणी पुष्ट होऊन बालक सदृढ जन्मतें. **गर्भचलन**—स्त्रीच्या पोटांत गर्भ चलन पावतो, त्या योगानें तिला स्वस्थता नसते, कंबर, पाठ, पोटऱ्या दुखूं लागतात; पोटांत दुखतें व तेणेंकरून ती आजारी पडते; एकादे वेळीं गर्भ इतक्या योगानें चलन पावतो कीं, त्याच्या योगानें ती स्त्री बेशुद्ध होऊन पडते. गर्भचलनाचा असा हा प्रकार, गर्भिणीनें शक्तीपेक्षां जास्त काम करणें, किंवा गर्भाशयांत उष्णता प्रबल होणें, अथवा गर्भिणीस ज्या गोष्टी वर्ज्य सांगितल्या आहेत त्या करणें, इत्यादि कारणांनीं होतो. **प्रथम मासांत गर्भाला चलन झालें तर**—( १ ) द्राक्षें, ज्येष्ठमध, चंदन, रक्तचंदन हे गाईच्या दुधांत वाटून त्यांत तूप घालून तें प्राशन करावें म्हणजे गर्भ स्थिर होतो. ( २ ) निळें कमळ, वाळा, शिंगाडे, कचरा हे घेऊन थंड पाण्याशीं वाटून दुधांत कालवून प्राशनार्थ द्यावे; म्हणजे गर्भ पडत नाहीं व शूळाची शांति होते. **द्वितीय मास.**—दुसऱ्या महिन्यांत गर्भचलन होऊं लागल्यास कमळाचीं बिसें, नागकेशर वाटून दुधाशीं प्यावें. शूल असेल तर तगर, कमळ, बेलफळ, कापूर हे शेळीच्या दुधांत वाटून दुधांत कालवून प्यावे. **तृतीय मास**—नागकेशर वाटून दुधांत कालवून साखर घालून प्राशनार्थ द्यावें; व शूल असला तर पद्मकाष्ठ, चंदन, वाळा, कमळाचे नाळ हे थंड पाण्यांत वाटून दुधांत कालवून प्राशनार्थ द्यावे, म्हणजे गर्भ पडत नाहीं व शूळाची शांति होते. **चतुर्थ मास.**—चवथ्या महिन्यांत चलन झाल्यास तहान, शूळ, दाह आणि ज्वर हे झाले असतां,केळीचा कांदा, निळें कमळ, वाळा, हीं वाटून दुधाशीं प्राशनार्थ द्यावीं. **पंचम मास.**—डाळिंबीचीं पानें व चंदन वाटून त्यांत दूध दहीं घालून प्राशनार्थ द्यावें; व निळें कमळ, कमळाचीं बिसें व बोरीचीं पानें, नागकेशर, पद्मकाष्ठ हे पाण्याशीं वाटून दुधाशीं पिण्याकरितां द्यावें; म्हणजे गर्भ स्थिर होऊन शूळाची शांति होते. **षष्ठम मास.**—गेरू, गाईच्या शेणाची राख, पिंपळी व गोपीचंदन यांचा काढा करून थंड झाल्यावर त्यांत दूध, साखर व चंदन घालून द्यावा. **सप्तम मास.**—वाळा, गोखरूं, नागरमोथे, लाजाळूकंद, नागकेशर, पद्मकाष्ठ, यांचा काढा साखर घालून द्यावा. **अष्टम मास.**—लोध्र व पिंपळी यांचें चूर्ण मधाशीं द्यावें. **नवम मास.**—नवव्या महिन्यांत प्रसूति होते. **गर्भस्राव व गर्भपात.**—चतुर्थ मासापर्यंत गर्भ पातळ असतो म्हणून स्रवूं लागतो, त्याला स्राव म्हणतात; त्यानंतर पांचव्या महिन्यापासून सहाव्या महिन्यापर्यंत कठीण होऊन देह तयारीस येतो, तो पडल्यास त्याला गर्भपात म्हणतात. सातव्यापासून प्रसूति होते. **गर्भस्राव व पात यांचीं कारणें.**—भय, अभिघात, विषमाशन, उंचावरून खालीं पडणें, अतिशय चढउतर करणें, क्रोध येणें, अत्यानंद वाटणें, तीक्ष्ण व उष्ण पदार्थांचें सेवन, जड ओझें उचलणें, अतिशय श्रम करणें, तीव्र रेचक इत्यादि कारणांनी स्राव अथवा पात होतो. गर्भस्राव होऊं लागला म्हणजे दाह, पार्श्व ( बरगड्या ), व पृष्ठ ( पाठ ) यांमध्यें शूळ, प्रदर, आनाह आणि मूत्रबंध हे उपद्रव होतात. गर्भपात झाला असतां गर्भकोष्ठशुद्धीकरितां व पीडेचा विसर होण्याकरितां.—( १ ) रिंगणी, डोरली, सालवण, पिठवण आणि गोखरूं; यांचा काढा करून त्यांत शिजवलेली पेज तूप घातल्याखेरीज द्यावी. ( २ ) कुळित्थ, शिजवून त्यांचें कढण प्यावयास द्यावें. पहिल्या महिन्यांत गर्भ स्रवत असला तर.—ज्येष्ठमध, सागाचें बीं शतावरी, देवदार या औषधि,

स द्यावीं. (४) शिंगले व कचरा यांची लापशी दुधांत करून खावी. (५) गहुला, कमळकंद व कोंवळीं डंबराचीं फळें हीं दुधांत शिजवून तें दूध द्यावें. **मूढगर्भावर** (१) फालशाच्या मुळाचा अथवा सालवणीच्या मुळाचा लेप, नाभि, बस्ति व भग यांना करावा, म्हणजे गर्भ नीट होतो. (२) मोरवेल, वेखंड, आस्कंध, मंजिष्ठ, नीली, शेरीचें मूळ यांचा चतुर्थांश काढा करून त्यांत गूळ १ तोळा घालून तो पाजावा. **मृतगर्भ बाहेर पडावयास**—(१) दीडपाव पाण्यांत गाईचें ५ तोळे शेण कालवून गाळून तें पाजावें. (२) मोहऱ्या, हिंग यांचें ३ मासे चूर्ण कांजींत घालून द्यावें. **गर्भपातकारक औषधें**—गाजराचें बीं, कळलावी, निर्गुंडी व चित्रकाचें मूळ, देवडांगरीचें फळ, कडवंचीचा कंद, हिंग व पळसपापडीची राख हीं गर्भपात० आहेत. (२) गाजराचें बीं, काळे तीळ व कालोंजी हीं गुळांतून खावीं म्हणजे गर्भ पतन पावतो. **प्रसूत स्त्रीची वार पडत नसल्यास**—(१) वार पडली नाहीं तर शूल, पोटफुगी व अग्निमांद्य हे उपद्रव होतात. वार पडण्यास-बोटाला केश गुंडाळून त्यानें तिचा कंठ घांसावा आणि सापाची मेंग, कडू भोंपळा, नागरमोथा आणि शिरस, यांचें चूर्ण मोहरीच्या तेलांत भिजवून त्याची योनीला धुरी द्यावी. (२) कळलावीच्या कंदाचा कल्क करून त्यानें हात व पायाचें तळवे यांना लेप करावा म्हणजे वार पडते. **योनि क्षतरहित होण्यास**—कडू भोंपळ्यांचीं अ० पांढऱ्या भोंपळ्यांचीं पानें व लोध्र हे समभाग घेऊन बारीक वाटावे व त्यांचा लेप योनींत करावा. **योनि घट्ट व संकुचित होण्यास**—(१) पळसपापडी आणि डंबराचीं फळें वाटून तिळाच्या तेलांत कालवून त्यानें योनीला लेप करावा म्हणजे चांगली घट्ट होते. (२) मायफळाचें चूर्ण व तुरटीची लाही एकत्र करून बारीक वस्त्रांत पोटली बांधून आंत धरावी. (३) मायफळ व कापूर मधांत खलून आंतून लेप द्यावा. (४) तालिमखान्याचे काढ्यांत त्याचेंच चूर्ण घालून आंतून लेप द्यावा. **निर्लोमकरण.**—(१) हरताळ १, राळ २, चुना ४ भाग यांत पाणी घालून किंचित गरम करून लेप करावा. (२) हरताळ १, शंखचूर्ण ५, पळसाचें भस्म १ भाग हीं एकत्र करून चोळावीं. (३) गुलबाशीचा कांदा पाण्यांत उगाळून त्याचा लेप द्यावा म्हणजे केश गळतात. **मक्कलशूल.**—बालक पृथ्वीवर पडल्यावर योनीला रगडून तींत वायु प्रवेश न करील असें तिचें संरक्षण करावें; कां तर, योनिगत वायु कोपून स्रवलेल्या रक्ताला रोधितो आणि सूतिकेच्या हृदय, मस्तक व बस्ति यांमध्यें शूल उत्पन्न करितो; त्याला मक्कलशूल म्हणतात. **मक्कलशूलावर.**—(१) जवखाराचें चूर्ण करून तें कोमट पाण्याशीं अथवा तुपाशीं प्राशन करावें. (२) पिप्पल्यादिगण–पिंपळी, पिंपळीमूळ, मिरीं, गजपिंपळी, सुंठ, चित्रक, चवक, रेणुकबीज, दालचिनी, अजमोदा, शिरस, हिंग, भारंगमूळ, पहाडमूळ, इंद्रजव, जिरें, दकाणनिंब, मोरवेल, अतिविष, कुटकी, वावडिंग, हा पिप्पल्यादि गण, कफ, वायु, गुल्म, शूल, ज्वर, यांचा नाश करितो. हा दीपन पाचन असा आहे. याचा काढा करून त्यांत मीठ घालून प्राशन केला असतां, मक्कलशूळ, गुल्म व कफवात यांचा नाश होतो. (३) सुंठ, मिरीं, पिंपळी, दालचिनी, तमालपत्र, एलची, नागकेशर, धणे, यांचें चूर्ण जुन्या गुळाशीं खावें. (४) हिंग भाजून तुपांत कालवून द्यावा. **बाळंतिणीचें पथ्य.**—प्रसूतस्त्रीनें युक्त असा आहार व विहार करावा, आणि व्यायाम, मैथुन, क्रोध व थंड पदार्थ

वर्ज्य करावे. प्रसूत स्त्रीच्या अपथ्यकारक आहारांनीं कष्टसाध्य किंवा असाध्य व्याधि होतो, यास्तव पथ्य अवश्य करावें. **गर्भधारणोपाय.**—गर्भधारणाचे उपचार करण्यापूर्वी शरीरांतील इतर व्याधि काढून टाकावयाचा उपचार करावा. शिवलिंगीचें फळ चौथे दिवशीं भक्षण करावें. नागकेशराचें चूर्ण तुपांत द्यावें. **गर्भधारणास उपचार.**—( १ ) एरंड्या आणि महाळुंगाच्या बिया वाटून तुपाशीं प्राशनार्थ द्याव्या. ( २ ) लक्ष्मणामूळ (पांढऱ्या रिंगणीचें मूळ) गळ्यांत बांधावें आणि तें तुपाशीं अगर दुधाशीं उगाळून नाकानें प्यावें; म्हणजे अत्यंत वीर्यवान् पुत्र उत्पन्न होतो. अथवा लक्ष्मणेची मुळी पुष्य नक्षत्रावर काढून, ती दुधाशीं कुमारीच्या हातानें वाटून ऋतुस्नात स्त्रीला प्राशनार्थ द्यावी. ( ३ ) तिळांचें तेल, दूध, काकवी, दहीं, तूप हे पदार्थ एकत्र करून हातानें घुसळून त्यांत पिंपळीचें चूर्ण घालून प्राशनार्थ द्यावे. ( ४ ) एका महाळुंगाच्या संपूर्ण बिया, दुधाशीं वाटून ऋतुमतीला प्राशनार्थ द्याव्या; म्हणजे पुत्रप्राप्ति होते. ( ५ ) आस्कंधाचा काढा घालून दूध आटवावें आणि त्यांत तूप घालून तें ऋतुस्नात स्त्रीला प्राशनार्थ द्यावें. ( ६ ) कोरांट्याचें मूळ, धायटीचीं फुलें, वडाचे पारंबे आणि निळें कमळ हीं वाटून दुधाशीं प्राशनार्थ द्यावीं. ( ७ ) पारोसा पिंपळ, जिरें, यांचें चूर्ण घेऊन पथ्य करावें; म्हणजे पुत्रोत्पत्ति खचीत होते. ( ८ ) कुहिलीची मुळी आणि कवठाचा गीर हे पदार्थ दुधाशीं प्यावे अथवा उभय लिंगीचें बीज दुधाशीं द्यावें म्हणजे स्त्रीला पुत्र होतो. कन्या होत नाहीं. ( ९ ) पळसाच्या बियांची राख करून ती पाण्यांतून प्यावयास द्यावी. ( १० ) ओंवा, रिंगणी, पिंपळी व नागकेशर यांचें चूर्ण गाईचे तुपांत द्यावें. ( ११ ) केळें १, कापूर तोळा १ व वंशलोचन तोळा १ हीं औषधें केळीच्या पानांत गुंडाळून आदले दिवशीं संध्याकाळीं तुळशीचे झाडाखालीं पुरून ठेवावीं. दुसरे दिवशीं संध्याकाळीं काढून, खलून त्याच्या तीन गोळ्या कराव्या. चौथे दिवसापासून तीन दिवस एकेक भक्षावी आणि संभोग करावा; म्हणजे गर्भ राहील. **गर्भधारणेस औषधोपचार करणारास अगत्याची सूचना.**—कोणी कोणतेंही औषध सांगतांच, त्याचा कोण्या सुज्ञ मनुष्याच्याकडून शोध काढल्याशिवाय तें कधींही घेऊं नये. कारण, कोणी एखादा दुष्ट हेतूनें किंवा अज्ञानानें अथवा प्रकृतीचें मान ध्यानांत न आणतां भलतेंच औषध सांगतो, व त्यामुळें एखादवेळ जन्माचें नुकसान होतें. याकरितां तीक्ष्ण, भेदक, उष्ण किंवा पौष्टिक असूनही—शरीरप्रकृती वातादिदोषांनीं विशेष दोषी झाली असेल तर-तसेंही औषध, अशीं औषधें घेऊं नयेत. पुढील औषधें तर गर्भनिवारक आहेत असा शोध आहे. ( १ ) पिंपळी, वावडिंग आणि टांकणखार, यांचें समभाग चूर्ण दुधाशीं ऋतुकाळीं जी स्त्री प्राशन करील तिला कधींही गर्भधारण होणार नाहीं. ( २ ) जास्वंदीचें फूल कांजीशीं वाटून जी रजस्वला प्राशन करून वर चार तोळे जुना गूळ भक्षण करील तिला गर्भधारण होणार नाहीं. ( ३ ) जी स्त्री सैंधवाचा तुकडा तेलांत बुडवून योनींत धारण करून नंतर पुरुषाशीं रमेल तर तिला कधींही गर्भधारण होणार नाहीं. ( ४ ) तांदुळजाच्या मुळ्या तांदुळाच्या धुणाशीं ऋतुस्नात स्त्री तीन दिवस प्राशन करील तर ती वांझ होईल. इत्यादि.—तेव्हां अशा औषधांबद्दल योग्य खबरदारी ठेवून औषध द्यावें. **सूतिकारोग.** ( बाळंतरोग. ) **लक्षण व कारण.**—अंग मोडून येणें, ज्वर, कांपरें, तृषा, अंगाला जडत्व, सूज, शूळ आणि ढाळ, हीं लक्षणें झालीं असतां सूतिकारोग

झाला आहे म्हणून समजावें. बाळंतिणीला भलत्या उपचारानें, किंवा दोषजनक अन्नपान सेवन केल्यानें अथवा विषप्राशन, अजीर्ण, भोजनादिकेंकरून जे रोग होतात ते मोठे भयंकर होतात; ते येणेंप्रमाणें:—ज्वर, ढाळ, सूज, शूळ, पोट फुगणें आणि अशक्तता; व कफवातजन्यरोगापासून उत्पन्न होणारे—तंद्रा, अन्नद्वेष आणि तोंडाला पाणी सुटणें, इत्यादि विकार, अशक्तता व अग्निमांद्य असल्यामुळें कष्टसाध्य होतात; त्या सर्व ज्वरादि रोगांना सूतिकारोग म्हणतात. यांपैकीं एकादा रोग प्रधान होऊन बाकीचे उपद्रवरूपानें असतात. सूतिकारोगाची हयगय केल्यास तो अकरा महिन्यांत रोग्याला मारितो. **सूतिकारोगावर.**—( १ ) वातनाशक अशी क्रिया करावी; पेंड बांधावे. ( २ ) दशमूळांचा काढा तूप घालून द्यावा. ( ३ ) **अमृतादिकाढा.**—गुळवेल, सुंठ, कोरांटा, चांदवेल, उत्कटारी, पंचमूळें, नागरमोथा यांचा काढा करून तो थंड झाल्यावर मध घालून घ्यावा. ( ४ ) **देवदार्वादिकाढा.**—देवदार, वेखंड, कोष्ठ, पिंपळी, सुंठ, कायफळ, नागरमोथे, किराईत, कुटकी, धणे, हिरडा, गजपिंपळी, रिंगणी, गोखरू, धमासा, डोरली, अतिविष, गुळवेल, बेल, शहाजिरे, यांचा काढा करून त्यांत सैंधव व हिंग टाकून बाळंतिणीला पाजावा; म्हणजे शूल, कास, ज्वर, श्वास, मूर्च्छा, कंप, मस्तकपीडा, बडबड, तृषा, दाह, तंद्रा, अतिसार, ओकारी, इतक्या उपद्रवांनीं युक्त व त्रिदोषात्मक अशा सूतिकारोगांचा नाश करील. ( ५ ) कोरांटा, कुळिथ, पुष्करमूळ, देवदार आणि वेत यांचा काढा, हिंग व मीठ घालून द्यावा; म्हणजे सूतिकेचा शूल व ज्वर यांचा नाश होतो. ( ६ ) पंचमूळांचा काढा करून त्यांत लोखंड तापवून बुडवावें आणि तो प्यावा. ( ७ ) अतिविषचूर्ण मधांत द्यावें. ( ८ ) रुईचें मूळ, धमासा, देवदार, किराईत, रास्ना, निर्गुंडीचा पाला, वेखंड, टाकळीमूळ, शेवग्याची साल, पिंपळी, पिंपळमूळ, जिरें, चवक, सुंठ, अतिविष, माका, यांचा काढा निकाढा द्यावा; तेणेंकरून सन्निपात, धनुर्वातादि वातरोग, दांतखिळी, अंगांतील शैत्य, श्वास, कास, बाळंतरोग हे दूर होतात. ( ९ ) **वाफारा.**—जुनाट निंब पाहून त्याची अंतरसाल काढून आणावी; तिचे बारीक तुकडे करून ते पाण्याच्या हंड्यांत घालावे. वर झांकण असावें. असे तीन हंडे पाणी आधण येईपर्यंत तापवावें. नंतर ज्या स्त्रियेस बाळंतरोग झाला आहे तिला एका बाजेवर निजवून प्रथम एक हंडा आणून तिच्या मस्तकाखालीं ठेवावा. त्यांतील वाफारा कमी झाल्यावर दुसरा हंडा आणून तो मस्तकाखालीं ठेवावा. व प्रथमचा हंडा कमरेखालीं ठेवावा. मस्तकाखालच्या हंड्याची वाफ कमी झाल्यावर तो कमरेखालीं ठेवावा; व कमरेखालचा पायांखालीं ठेवून चुलीवरील तिसरा हंडा मस्तकाखालीं ठेवावा. त्याची वाफ कमी झाल्यावर पायाखालीं ठेवावा. याप्रमाणें तीन दिवस वाफारा द्यावा; म्हणजे अंगांतील घामाच्या रूपानें सर्व व्याधि निघून जाऊन रोग बरा होतो. ( १० ) दशमूळें कुटून त्यांत पाणी घालून एक रात्र भिजत घालावीं, नंतर दुसरे दिवशीं नलिकायंत्रानें त्यांचा अर्क काढावा. हा अर्क नित्य प्रतिवेळीं दोन तोळेपर्यंत सेवन करावा. ( ११ ) **पंचजीरकपाक.**—जिरें, शहाजिरें, बडीशोप, बाळंतशोप, ओंवा, अजमोदा, धणे, मेथ्या, सुंठ, पिंपळी, पिंपळमूळ, चित्रक, हपुषा ( शेरणी ), कोहळ्याचें चूर्ण, कोष्ठ, टेंटू, हीं प्रत्येक चार तोळे, गूळ ४०० तोळे, दूध १२८ तोळे, तूप १६ तोळे, यांचा पाक सिद्ध करावा. तो बाळंतरोग, योनिरोग, ज्वर, क्षय, खोकला, दमा, पांडुरोग, कृशता व वात-

रोग यांचा नाश करितो. ( १२ ) **सौभाग्यसुंठी**—सुंठ ३२ तोळे, तूप ८०, दूध २५६, खडीसाखर २०० तोळे, शतावरी, जिरें, सुंठ, मिरीं, पिंपळी, दालचिनी, एलची तमालपत्र, ओंवा, बडीशेप, बाळंतशोप, चवक, चित्रक, नागरमोथे, या प्रत्येकाचें ४ तोळे चूर्ण घालून पाक पचन करावा. लेहासारखा झाला म्हणजे सिद्ध झाला. तो तुपाचे भांड्यांत भरून ठेवावा व अग्नि आणि बल पाहून द्यावा. हा बाळंतिणीला द्यावा; म्हणजे बल, वर्ण, पुष्टि, यांना देतो, व वलीपलित यांचा नाश करितो; आणि वयस्थापक, हृद्य, मंदाग्नीला वाढविणारा असा असून, आमवात, मक्कलशूल व बाळंतरोग यांचा नाश करितो. **( १३ ) महारास्नादि काढा.**—रास्ना, एरंडमूळ, गुळवेल, वेखंड, पीतकोरांटा, चवक, कवचबीज, नागरमोथा, भारंगमूळ, ओंवा, किरमाणी ओंवा, पहाडमूळ, देवदार, वावडिंग, काकडशिंगी, सुंठ, चिकणामूळ, मोरवेल, कुटकी, मंजिष्ठा, काळें व पांढरें अतिविष, कचोरा, हिरडा, बेहडा, आवळकाठी, पिंपळी, जवखार, रक्तचंदन, बाहव्याचा मगज, कायफळ, कुडा, पुनर्नवा व दशमूळें, हीं सर्व समभाग घेऊन यांचा काढा करून द्यावा; ह्मणजे सूतिकारोग, ८० प्रकारचे वायु, श्वास, कास, घाम, शैत्य, अतितंद्रा, शूल, गलरोग, सर्वांगांतला ठणका, कंप, श्लीपद, आमवात, नपुंसकत्व, सूज यांचा नाश होतो. ( १४ ) कोरांट्याचा काढा पिंपळीचें चूर्ण घालून द्यावा अथवा कोरांट्याचें मूळ चावून खावें. **स्तनरोग. कारण**—वातादिदुष्टदोष, गर्भिणी किंवा प्रसूत स्त्रीच्या–दुग्धानें भरलेले अथवा रिते–अशा स्तनाप्रत येऊन तेथील मांस व रक्त यांला दूषित करून स्तनरोग ( खांडूक )–कफ, वात, पित्त, सन्निपात व आगंतुक असे पांच प्रकारचे उत्पन्न करितात. त्या पांचांचीं लक्षणें रक्तविद्रधि खेरीज करून बाह्यविद्रधि लक्षणांसारखीं होतात; म्हणजे स्तनांचेठायीं सूज उत्पन्न होते; ती, वेदना, दाह, कंडू, इत्यादि लक्षणेंकरून युक्त असते; आणि विद्रधीसारख्या वेदना देऊन पिकन फुटते; अथवा हलकी सूज असली तर उपचार केला तर पिकल्याशिवाय बसते; असें समजावें. **स्तनरोगावर.**—स्तनांला सूज वगैरे आली असतां विद्रधीवरील चिकित्सा करावी. ( १ ) जळवा लावून रक्त काढावें व पेंड बांधावा. ( २ ) कंवडळ अथवा कडू इंद्रावणी यांचें मूळ उगाळून लेप करावा. ( ३ ) वनकापशीचें मूळ आणि कडू दुध्याभोंपळा गव्हाचे कांजींत वाटून लेप करावा. ( ४ ) हळद आणि लोध्र यांच्या कल्काचा लेप करावा. ( ५ ) कडू इंद्रावणीचें मूळ, कोरफडीचें मूळ व हळद हीं उगाळून गरम करून लेप द्यावा. ( ६ ) समुद्रशोकाचीं पानें ऊन करून बांधावीं. ( ७ ) वांझ कर्टोलीचें मूळ ऊन पाण्यांत उगाळून लेप द्यावा. ( ८ ) पिंपळाची साल भाजून पाण्यांत घालावी व त्यांत लोखंडाचा तुकडा वारंवार तापवून विझवावा, आणि तें पाणी गाळून सकाळीं व संध्याकाळीं प्यावयास द्यावें. ( ९ ) एरंडमूळ, महाळुंगीचें मूळ, गोखरू, रिंगणी, मोतीरिंगणी अ० डोरली, लकड्या पाषाणभेद, बेलमूळ या सात औषधांचे मूळांचा काढा करून एरंडेल व हिंग भाजलेला, सैंधव व जवखार यांचें चूर्ण घालून तो प्यावा; ह्मणजे स्तन, खांदे, कंबर, शिश्न, छाती यांचेठायीं ज्या वातसंबंधीं पीडा होतात त्या दूर होतात. **स्तनरोग.**—जड व दुष्ट अशा प्रकारच्या अन्नांनीं दोष दुष्ट होऊन आईचें अथवा उपमातेचें दूध नासतें, तेणेंकरून बालकाला नानातऱ्हेचे रोग होतात. **वातादिकांनीं दूषित दुग्धाचें लक्षण.**—जें दूध तुरट व पाण्यावर तरंगणारें असतें तें वातदूषित होय; जें

तिखट, आंबट आणि खारट असून ज्यावर पिंवळ्या रेषा दिसतात तें पित्तदूषित समजावें; जें दूध घट्ट व बुळबुळित असून पाण्यांत टाकलें असतां तळीं बसतें तें कफदुष्ट जाणावें. दोन दोन दोषांचीं लक्षणें ज्यांत दिसतात तें द्वंद्वज जाणावें आणि ज्यामध्यें तीन दोषांचीं लक्षणें तें त्रिदोषदुष्ट जाणावें. **शुद्ध दुग्धाचें लक्षण.**—जें दूध पाण्यांत घातलें असतां त्याशीं मिळतें व पांढरें आणि मधुर असून वेरंग नसतें तें शुद्ध समजावें. **दुग्धशोधक काढा.**—पहाडमूळ, मोरवेल, किराईत, देवदार, सुंठ, इंद्रजव, उपलसरी, तगर आणि कुटकी यांचा काढा द्यावा. तो स्तनशोधन करणारा आहे. वरील काढ्यांत तगराचे ऐवजीं गुळवेल घालून तो घेतला असतां स्तनांत दूध जास्त येतें. **स्तनांत दूध जास्त येण्यास.**—( १ ) भुयकोहळ्याचा ( विदारीकंद अथवा क्षीरविदारीकंद ) रस दुधांत साखर घालून द्यावा. ( २ ) शतावरीच्या मुळ्या दुधाशीं वाटून प्याव्या. ( ३ ) मंदोष्ण दुधांत पिंपळी घालून द्यावी. ( ४ ) अरण्यकापशी आणि ऊंस अथवा पित्तपापडा यांचीं मुळें कांजीशीं वाटून प्यावीं. ( ५ ) आस्कंध, भुयकोहळा, ज्येष्ठीमध यांचा काढा करून त्यांत गाईचें दूध घालून द्यावा. ( ६ ) गुळवेलीच्या मुळाचा काढा दूध घालून तीन दिवस द्यावा. ( ७ ) दुधांत अहाळीव घालून शिजवून क्षीर करावी. त्यांत थोडें तूप व खडीसाखरेची पूड घालून प्रत्यहीं प्रातःकाळीं एकवेळ याप्रमाणें चौदा किंवा २१ दिवसपर्यंत द्यावी. ( ८ ) मेथीची अथवा अळवाची भाजी खात जावी. ( ९ ) निजतेसमयीं विड्यांत अर्धी मूठ वाळंतशोपा खात जाव्या व सकाळींही अर्धी मूठ खाव्या; म्हणजे दूध निर्विकार होतें. **स्तनवर्धन.**—( १ ) शिवणीचा रस व कल्क यांनीं तिळांचें तेल सिद्ध करावें; तें तेल कापसाच्या घडीवर घालून ती घडी स्तनांवर बांधावी, म्हणजे पडलेले स्तन वर उचलतात आणि हत्तीच्या गंडस्थलांसारखे उंच वर येतात. ( २ ) नागबलेचें मूळ पाण्याशीं वाटून स्तनांला चोळावें; म्हणजे कठीण, पुष्ट, उंच असे होतात. ( ३ ) कमळाक्ष वाटून तें दूध व साखर यांशीं प्राशनार्थ द्यावें; म्हणजे स्त्रियांचे स्तन एक महिन्यांत घट्ट होतात. **पथ्य.**—जें रक्तपित्तावर पथ्य किंवा अपथ्य सांगितलें तें प्रदरावरही द्यावें; जें वातव्याधीवर पथ्य सांगितलें आहे तें, व साठक्या साळी, गहूं, मूग, लाह्या, सातू, तूप, दूध, मध, साखर, फणस, केळें, आंवळे, द्राक्षें, आम्ल, गोड, शीतळ, कस्तूरी, चंदन, कापूर, प्रिय असें अन्नपान. **अपथ्य.**—शोक, वांति, कदान्न, विषमाशन, अतिमैथुन, क्षारपदार्थ, आयास, भार घेणें, तिखट, आंबट, कडू, तुरट व वातुळ असे पदार्थ गर्भिणीनें वर्ज्य करावे. कारण, वातुळ पदार्थ भक्षिल्यानें गर्भ कुबडा, आंधळा, जड, खुजा, होतो; पित्तल पदार्थ भक्षिल्यानें गर्भाचें डोकें केशरहित होतें; तो पिंगटवर्ण होतो. व कफकारक पदार्थ भक्षिल्यानें गर्भ श्वेतकुष्टी व पांडुरोगी होतो.

## ४१. हृद्रोग.

**कारण.**—अलुण, आंबट, तुरट, कडू, असल्या पदार्थांच्या सेवनानें व श्रम, अभिघात, अध्यशन, मैथुन, मलमूत्रादिवेगविधारण, चिंता इत्यादि कारणांनीं हृद्रोग उत्पन्न होतो. **संप्राप्ति.**—वातादि दोष कुपित होऊन रसधातूला दूषित करून ते हृदयाचेठायीं पीडा उत्पन्न करितात; त्या व्याधीला हृद्रोग ह्मणतात. **उप-**

श्रीशंकर.

# अश्वरोगपरिज्ञान.

## ASHWAROGAPARIDNYAN.

('आर्यभिषक्' मासिकपुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें.)

---

घोड्यास होणाऱ्या व्याधी व त्यांचें परिहरण करणारीं औषधें, यांची माहिती.

Information regarding horse diseases and best remedies on them.

'भिषगौषधसंयोगैश्चिकित्सां कर्तुमर्हति ।'—चरकाचार्यः ।

---

**शंकर दाजी शास्त्री पदे,**

चिकित्सक, आर्यभिषक्कर्ते.

---

( सर्व अधिकार स्वाधीन ठेविले आहेत. )

---

ता. १ जून सन १८९१. शके १८१३ वैशाख वद्य ९.

मुंबई,—'निर्णयसागर' छापखान्यांत छापिलें.

किंमत पाऊण आणा.

**उपन्यास.**—जनावरांच्या रोगांवर उपचार ठाऊक झाल्यानें, तीं पाळणारांस व त्यांविषयीं कळवळा बाळगणारांस त्यापासून फायदा करून घेतां येईल; व प्रचलित वैद्यकीस आणखी एक रूढ दिशा दाखविल्यासारखें होईल; ह्मणून तशीं पुस्तकें काढण्याबद्दल पुष्कळांकडून लेखी व तोंडी सूचना आल्याप्रमाणें, आमचाही विचार कायम झाला. परंतु सवडीनुरूप त्याकडे लक्ष्य देण्याच्या संकेताप्रमाणें आज हें छोटेंसें पुस्तक प्रसिद्धीस आणलें आहे. लेखी जुने ग्रंथ शोधीत असतां, एका बाडांत हा भाग आमच्या पाहण्यांत आला; त्यावर त्याची शोधपूर्वक दुरुस्ति करून, आणि आणखी कुठेंकुठें लेखी पुस्तकांतील माहिती, अनुभव व शास्त्रसिद्धांत; इत्यादिकांचा विचार करून, मासल्याकरितां हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. लोकाभिरुचि, आश्रय व अवकाश या त्रयीचा विचार करून, या मासल्याचा पुढील उपक्रम केला जाईल.

यांतील माहितीच्या युक्तायुक्ततेबद्दल व अनुभवाबद्दल किंवा याहून विशेष माहितीबद्दल जर कोणी सुज्ञ गृहस्थ लिहून कळवितील, तर त्या सर्वांचा मी फार आभारी होईन.

**शं० दा० शा० पदे.**

श्रीशंकर.

# अश्वरोगपरिज्ञान.

१. **शिरव्यथा.**–घोड्याचें डोकें सुजतें व तो खालीं मान घालतो; तेव्हां त्यास ही व्यथा झाली असें समजावें. **उपचार**–बोरीची साल, पिंपळाची साल, अंकोलाची साल, एरंडमूळ या सर्व जिनसा समभाग घेऊन, पाण्यांत वाटून घोड्याचे मस्तकास लेप करावा. फिरणें, ऊन व हरएक त्रासकारक गोष्टी वर्ज कराव्या.

२. **मुखरोग.**–तोंड सुजतें, लाळ गळते, गवत खात नाहीं, हीं मुखरोग झाल्याचीं लक्षणें होत. **उपचार**–जवखार, शिरस, हळद, राई, सैंधव या सर्व जिनसा समभाग घेऊन, चिंचूक्याच्या खळींत खलून, तोंडांत व बाहेर लेप करणें.

३. **मुखवातादि सर्व वातविकारांवर.**–जवखार, शिरस, राई, शेपा, हळद, सैंधव, सर्व जिनसा समभाग घेऊन चिंचूक्याच्या खळींत खलून लेप करून फडक्यानें बांधणें.

४. **नाकपुड्यांतून रक्त वहात असल्यास.**–कावळीचें मूळ दुधांत उगाळून नाकांत घालणें. ( २. ) **थंडी** होऊन नाकातोंडांतून पाणी वाहतें, व वरचेवर झुंगीत असल्यास–हिरडा, काळें जिरें, हळद, सुंठ, मिरें, पिंपळी, गूळ, या सर्व जिनसा एकत्र कुटून, अदमासें एकपासून २ तोळ्यांपर्यंत दोहींसांज ७ दिवस देणें.

५. **नेत्ररोग.**–**फूल** अगर **वडस** असल्यास–दोन तीन दिवसांच्या मुलाची विष्ठा डोळ्यांत घालावी. ( २. ) माशाचें व शेळीचें पित्त मधामध्यें खलून सात दिवस अंजन करणें.–डोळा **तांबडा** होतो, पाणी वाहतें व सुजतो त्यास–सैंधव, संचळ, काचलवण, या सर्व समभाग जिनसा घेऊन, कांजींत खलून अंजन करणें.–डोळे **निळे-तांबडे**–झाले असल्यास–गूळ, कापूर, पारा, गोरोचन, सर्व समभाग जिनसा मधामध्यें खलून ३ दिवस अंजन करणें.–डोळे **स्वच्छ** होण्यास–सज्जीखार पाऊण मासा, अंबेहळद दीड मासा, हशागुग्गुळ (शुद्ध) पाव मासा, हशीच्या शिंगाची राख पाव मासा, माणसाच्या खोपरीची राख पाव मासा, एकंदर चूर्ण करून नित्य जुन्या गुळामध्यें दिल्यानें इतरही (वात, शूळ, मूत्ररोग) रोग दूर होतील. ( २. ) पिंपळी, सुंठ, पारा, ह्या जिनसा समभाग घेऊन मधेंत खलून अंजन करणें.

**६. ज्वर.**—संनिपातज्वरास—ओंवा पाव मासा, लसूण पाव मासा, हिंग पाव मासा, निर्गुडीचा पाला पाऊण मासा, या सर्वांचें चूर्ण तुपांत दोहींसांज देणें. शेक देणें. **आगंतुक ज्वरास**—माका ९ पानें व कडू निंबाच्या वाळलेल्या कांड्या ९ घेऊन, त्यांत ३ शेर पाणी घालून १ शेर काढा उरला ह्मणजे तो उतरून द्यावा. ३ दिवस. **लंघन** ( दाणा वैरण खात नाहीं, त्या ) **ज्वरास**—पत्रक, लवंग, कंकोळ, ज्येष्ठमध या सर्व जिनसा समभाग घेऊन चूर्ण करून, १ तोळा चूर्ण मधाशीं देणें. **संताप** ( तोंडास दुर्गंधि, दोन्ही कान ऊन, कपाळावर गाठ, ह्या लक्षणानें युक्त ) **ज्वरास**—केळीची मुळी, केवड्याचें पान, उंबराची साल, माजुमाची (?) साल, आंवळे, धणे, भुईकोहळा, सर्व समभाग घेऊन, चूर्ण १ तोळा, मधाशीं देणें. **मन्मथ** ( मूत्राबरोबर धातु जाणें, मूत्र पिंवळें होणें व घोड्याची वाट बंद पडणें अशा ) **ज्वरास**—सावरीची लाख व राळ्याचें पीठ, ५ शेर दुधांत शिजवून देणें. ३ दिवस. यानें ८ प्रकारचा ताप जाईल. ( २. ) गुळवेल, धणे, चिराईत, सुंठ, खारीक, हीं प्रत्येक तीन तीन मासे व वेलचीदाणे १ मासा, येणेंप्रमाणें चूर्ण करून मधांत देणें. ( ३. ) निंबाचीं पानें, हिरडा, तरवडाच्या मुळाची साल, लसूण, या सर्व समभाग जिनसांचें १ तोळा चूर्ण तुपांत देणें.

**७. उदरसंबंधी रोग.**—गाठ ढळणें, पोठांत कुणकुण होणें, कुंथून शौचास होणें, वरचेवर श्वास टाकणें, आळस व रोड होत जाणें या लक्षणांनीं युक्त रोगास—२१ दिवस तूप तेल एकत्र करून अंगास मर्दन करणें. **मंदाग्नीवर**—हिरडा, चित्रक, डोरलीमूळ, जिरें, वेखंड, भुईनिंब, भुई तरवड, रिंगणीमूळ, सैंधव, संचळ, वावडिंग, हळद, निर्गुडी, ओंवा, सुंठ, पिंपळमूळ, पिंपळी, चिराईत, माका हे सर्व जिन्नस समभाग घेऊन, गुळाबरोबर १ तोळा चूर्ण देणें. **तोंडांतून पिंवळें** पाणी वहात असेल व घाम येत असल्यास—आस्कंद पाव तोळा व पिंपळी पाऊण तोळा, गाईचे दुधांत देणें. **वर्तुशूल.**—श्वास, घायाळ होणें, कुशी आपटणें हीं लक्षणें

---

१. ज्वर कोणता आहे हें ओळखणें पुष्कळ कठीण जाईल असें वाटतें. अंग विशेष तप्त, ग्लानि, खाण्यावर इच्छा नसणें, इत्यादि प्रकारांचा कमीजास्त मान—चलनवलनादि व्यवहारांवरून—पाहून ज्वराचा साधारण अदमास बांधतां येईल; परंतु तो इतका खात्रीचा वाटणार नाहीं. तरी ज्याच्या आधारें आह्मी ही माहिती दिली आहे, त्या लेखी पुस्तकांत विशेष माहिती नसल्यामुळें व तिचा अनुभव नसल्यामुळें, यापेक्षां जास्त विस्तारानें माहिती देतां आली नाहीं.

असल्यास—पळसपापडी ४॥ मासे, चोर ओंवा २। मासे, हिंग १॥ मासा, महाळुंगाची साल २। मासे, हीं सर्व औषधें एकत्र करून तुपांत देणें. **श्रमविभ्रमशूळ.**—मंद चरणें, भ्रमासारखें वर्तन, लाळ वाहणें हीं लक्षणें. **उपचार.**—तुपांत तिळांचें तेल मर्दन करून ऊन पाण्यांत घालून व त्यांत गूळ, हळद, सुंठ, हिरडे या जिनसा समभाग घेऊन, १ तोळा चूर्ण घालून देणें. **देह वरचेवर** उचलणें, पायांचा संकोच करणें, पोट फुगणें, हीं लक्षणें असल्यास—हिंग तोळा ·|||·, लसूण तोळा २|·, सैंधव तोळा १|·, गूळ ·||· तोळा, हीं औषधें सर्व मिळवून आंबट दह्यांत देणें. **कृमिशूळ**[१].—वेखंड ९ मासे व पळसपापडी ४॥ मासे गुळांत देणें. **दारुणशूळ.**—भुईवर पडणें, कुंथणें, वैट लागणें, हीं लक्षणें असल्यास—वेखंड ९ मासे, कोष्ट ९ मासे, पाषाणभेद ४॥ मासे, दांतीमूळ ४॥ मासे, सैंधव ४॥ मासे, सर्व औषधें कांजींत वाटून देणें. **अष्टादश प्रकारच्या शूळांवर**—सैंधव, काचलवण, संचळ, गंधबीड, मीठ, मिरें, ओवा, पिंपळी, हिरडा, ब्याहाडा, आंवळकटी, सोनपडोळ, कोष्ट, वेखंड, वाभळीचा डिख, भारंगी, हिंग, हिंगणाची साल, पळसपापडी, इंद्रजव, कांटेसावरीच्या बिया, आस्कंद, रिंगणमूळ, निर्गुडी, खुरासनी ओंवा, हीं सर्व औषधें समभाग घेऊन चूर्ण २ तोळे, तुपांत अथवा गुळांत देणें. सात दिवस. **पोट वाजणें,**—वेळोवेळीं आंग जमिनीवर टाकणें, तापणें, मोडणें, हीं लक्षणें असल्यास—आवाड्याची व कांगेची मुळी, पळसबीज हीं औषधें प्रत्येक ४॥ मासे व हिंग ३ मासे घेऊन संदडीच्या पानांच्या रसांत देणें. **खडसशूळ.**—पोट फुगणें, लोळणें, मूत्र व मल यांचा प्रतिबंध होणें, हीं लक्षणें असल्यास—सावरीची साल व दंतीमूळ दीड तोळा, तिळांच्या तेलांत उगाळून देणें. **उदकशूळावर**—( पाणी प्याल्यावर नाचतो अथवा सैरावैरा धांवतो. ) सुंठ, पिंपळी, वेखंड हीं औषधें प्रत्येक ४॥ मासे; गजपिंपळी व सैंधव प्रत्येक २। मासे; व हिंग १॥ मासा; एकंदर औषधें तुपांत खलून देणें. दांत चावणें, भूमी चाटणें, चावणें, हीं लक्षणें असल्यास—त्रिकटु (सुंठ, मिरें, पिंपळी) ९ मासे, वावडिंग ९ मासे ओंवा, १ मासा, लसूण १ मासा; सर्वांचें चूर्ण करून तुपांत देणें. **लिदीबरोबर किडे पडतात त्यास**—हिंगणाची साल ३ मासे व पळसपापडी ९ मासे, गुळांत देणें. **संग्रहणीवर**--(लीद पातळ होणें व वरचेवर पडणें. ) बाळवेल, हिरव्या

---

१. प्रत्येक शूळाचीं निरनिराळीं स्पष्ट लक्षणें मिळालीं नाहींत. जेवढीं मिळालीं व अनुभवानें समजलीं तितक्यांचा संग्रह केला आहे. ज्यास्त कोणी कळविल्यास दुसऱ्या आवृत्तीच्या वेळीं उपयोग करूं.

दाळिंबाचे दाणे, धाइटीचें फूल, या जिनसा समभाग घेऊन १।। तोळा चूर्ण, दह्यांत देणें. ७ दिवस. ( २. ) हिरडा, आरंवळीची साल, मेथी, जिरें, समभाग सर्व जिनसा घेऊन, १।। तोळा चूर्ण, दह्यांत देणें. ३ दिवस. ( ३. ) बाळंतबोळ, हिरव्या दाळिंबाचे दाणे, धाइटीचें फूल, सर्व समभाग जिनसा घेऊन १।। तोळा चूर्ण दह्यांत देणें. ( ४. ) हिरडा, आरंबेळीची साल, मेथी, समभाग घेऊन दह्यांत १।। तोळा चूर्ण देणें. **उपवात.**—घोड्याचे डोळे वाहणें, पाय व मान सुजणें, दांतखिळी बसणें, खाणें वर्ज होणें, इत्यादि लक्षणें असल्यास—शेवग्याचीं मुळी, वारुळाची माती, चिंचेचा व निर्गुडीचा पाला हीं सर्व समभाग वाटून मस्तकास लेप करणें व पुढील औषध पोटांत देणें:—टाकळीचीं पानें १ तोळा, जुन्या गुळांत तीन दिवस देणें.

**८. अग्निमांद्य.**—घोडा, दाणा व गवत खात नसल्यास—रिंगणमूळ, डोरलीमूळ, निंबाचीं पानें, हिरडा, सुंठ, चिराईत, वावडिंग, अजमोदा, निर्गुडी, टाकळीचीं पानें, अडूळशाचीं पानें, हीं औषधें प्रत्येक दीड दीड मासा, व ओंवा पाऊण मासा, असें सर्व औषधांचें चूर्ण करून जुन्या गुळांत देणें. ७ दिवस.

**९. पादरोग.**—पायास **चक्रावळी** झाल्यास—शिंपीचा चुना, कवडीचा चुना, सेंड ( ? ) जाळून राख, सर्व समभाग मधांत खलून लावणें. पायास **गाठी** येतात त्यास—आधीं गाठी कापून त्यांतील पू काढणें. नंतर जवखार व सज्जीखार समभाग घेऊन, चिंचूक्याच्या खळींत लेप करणें. व सैंधव, लसूण, सुंठ, वावडिंग हीं प्रत्येक ३।२ मासे; व ओंवा १ मासा, असें चूर्ण करून जुन्या गुळांत पोटांत देणें.

**१०. अंडशोफ.**—( अंड सुजणें. ) सुंठ, डोरली, एरंडमूळाची साल, शेवग्याची साल, रिंगणी, मिरें, उंबराची साल, वेखंड, हीं सर्व समभाग औषधें घेऊन, १।। तोळा चूर्ण तुपांत देणें. व अंकोल्याचीं पानें कढवून अंडावर तें पाणीं ओतीत ओतीत शेक करावा. तसेंच, सदरहु चूर्ण तुपांत खलून त्यावरही थोडेसें चोळावें.

**११. मूत्ररोग.**—मूत्र **वरचेवर** होत असल्यास—द्राक्षें व काकडीच्या बिया यांचें बारीक चूर्ण करून, मधांत इंद्रियावर लेप करावा. **मूत्रशूळ.**—भुईवर पाय आपटणें, कुशींवर हाणून घेणें हीं लक्षणें असल्यास—पिंपळी व गजपिंपळी मिळून १ तोळा चूर्ण करून गुळांत देणें. **मूत्राबरोबर** रेत जात असल्यास—नागवेलीचा कंद, केळीचा कंद, भुईकोहळा, खारीक,

चिनी खडीसाखर हीं औषधें ३।३ मासे; व तवकीर १॥ मासा मिळून चूर्ण करून गायीच्या दुधांत देणें.

१२. **व्रणादिरोग.**—**हाडी** (हाडावर गोळ्याप्रमाणें सूज) होते तीस—प्रथम फासण्यानें रक्त काढावें. नंतर कडूनिंबाच्या काड्या एकत्र बांधून अग्नींत ऊन करून त्यांनें शेकणें. व जेपाळ, नवसागर, सैंधव समभाग घेऊन, निंबाच्या रसांत खलून लेप देणें. वर फडकें बांधून टाकावें.—**सुंभाचें मांस** सडून व पिंवळें पाणी निघत असल्यास—लोहचूर व हिरडा तेलांत खलून लेप करणें. व त्यावर एरंडाचीं पानें बांधून विटेनें शेकणें. तसेंच, लसूण, निर्गुडी, सैंधव ४॥-४॥ मासे, व ओंवा १ मासा, या औषधांचें चूर्ण गुळामध्यें पोटांत देणें. सात दिवस.—**खांडूक**, जखम व नारूवर—शेळीच्या लेंड्या, सैंधव व मीठ समभाग चूर्ण करून, पाण्यांत किंवा मधांत लेप करणें.—शरीरावर **गांठी** येऊन त्या वाहूं लागतात त्यास—धुमार (गृहधूम) व वेखंड समभाग घेऊन मधांत खलून लेप करणें. व सैंधव, वावडिंग, हिरडा, लसूण, हीं औषधें ३।३ मासे व ओंवा १ मासा, येणेंप्रमाणें चूर्ण करून तुपांत पोटामध्यें देणें.—**खरजेस**—कणीक व मीठ पाण्यांत भिजवून त्याचा रोटगा करून तो जाळणें. व तेलांत खलून लावणें.—**कुरकुरीवर**—काळा कुडा दह्यांत देणें.—**बेंबी सुजते** व काटवटी (?) होते त्यास—प्रथम हातापायांच्या शिरा चेपाव्या असें सांगितलें आहे. याचा यास काय उपयोग होईल तो कळत नाहीं. परंतु पुढील उपचार बरा वाटतोः—सुंठ, मिरें, पिंपळी, शिरस व हळद, हीं औषधें समभाग घेऊन, चिंचूक्याच्या खळींत लेप करणें. व वर फडकें बांधणें. आणि पोटांत—सुंठ ४॥ मासे, वेलची ·॥· मासा, लवंग १॥ मासा, कंकोळ २। मासे, कोथिंबीर २। मासे, हिरडा २। मासे, बेहडा २। मासे व आवळे २। मासे, यांचें एकत्र चूर्ण करून तुपांत देणें. ३ दिवस. **आयनीवाव** (?) झाल्यास—शेवाळ व तूप १।१ तोळा मिळवून देणें. **अग्निबाधा** झाल्यास—तेलाचा जुना घाणा फोडून त्याचे तुकडे तुकडे करावे. व त्याचें पाताळयंत्रानें तेल काढून लावावें.

१३. **विषबाधा** झाल्यास—हिंगूळ, सोमलखार व पांढरा काथ, हीं औषधें समभाग घेऊन आल्याच्या रसांत गोळी करून तीन दिवस द्यावी असें सांगितलें आहे. परंतु यांतील पहिलीं दोन औषधें शुद्ध करून घेतलीं पाहिजेत, तरच कदाचित् आल्यास गुण येईल असें वाटतें. या औ-

पथ्याचा फार विचार करून, व कोणास अनुभव असल्यास मात्र उपयोग करावा असें आमचें मत आहे.

**१४. घोडा तुफान** ( उन्मत्त ) झाला असल्यास—दोन्ही कानांत ( शुद्ध केलेला ? ) पारा घालावा; तोंडांत कापूस द्यावा; व पायाचे बदावर, पिसानी (?) वर व ढुंगणाचे मांसावर वाटोळे डाग द्यावे. शेक द्यावा. वरांत बांधून ठेवावा. ( २. ) आर्तवाचें ( स्त्री-अस्पर्शकाळच्या रक्ताचें ) चिरगूट व जुना गूळ अर्धा अर्धा तोळा एकत्र कुटून ३ दिवस देणें. ऊन पाणी पाजणें. बांधून ठेवणें.

**१५. क्षीणभाग हरण्यास**—मेण, हैसागुग्गुळ, भुईनिंब, काळें जिरें, लाख, सेंदूर, मिरें व गूळ समभाग घेऊन तूप व तेल यांत खलून चारी खुरांवर लेप करणें. व लोखंड ऊन करून किंचित् शेकणें.

समाप्त.

हें व इतर वैद्यकीय वगैरे पुस्तकें, मुंबई, नवानागपाडा, आर्यभिषक् कचेरींत विकत मिळतील.

श्रीशंकर.

# रसवैद्य.

'आर्यभिषक्' मासिकपुस्तकांतून प्रसिद्ध झालेलें.

एतत्तदमृतं साक्षाज्जगत्यायासवर्जितम् ।
याति हालाहलत्वं च सद्यो दुर्भाजनस्थितम् ॥—श्रीवाग्भटः ।

शंकर दाजी शास्त्री पदे,

चिकित्सक, आर्यभिषक्कर्ते.

मुंबईत,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिला.

( सर्व अधिकार स्वाधीन ठेविले आहेत. )

१ नोवेंबर, १८९१—आश्विन व० ३० शके १८१३.

किंमत १२ आणे.

# उद्देश.

रसायनांची माहिती, सरळ व साधारणपणें संपूर्ण अशी एकत्र करण्याच्या उद्देशानें हें पुस्तक तयार केलें आहे. आमचे मित्र रा. मुरलीधर एकनाथ केमकर यांनीं यास सर्वतोपरि योग्य साहाय्य केलें. अंशतः करवला तितका या कामीं—काल, लोकाभिरुचि व आश्रय या त्रयीच्या साम्यानुरूप—प्रयत्न केला आहे. लिहूं म्हटलें तर या संबंधानें पुष्कळ आहे; परंतु तूर्त तसें न करितां, हा अल्प प्रयत्नच वाचकांपुढें ठेवला आहे. व परमेश्वरी इच्छेनुरूप जो पुढील कार्यभाग घडेल त्यावर नजर देऊन आम्ही आपल्या उद्देश्य कार्याकडे वळतों.

शां० दा० शा० पदे.

# अनुक्रमणिका.


| नांव. | पृष्ठ. |
|---|---|
| अंबर ... ... | १ |
| अभ्रक ... ... | १ |
| कथील ... ... | ३ |
| कपिला ... ... | ६ |
| कलखापरी ... | ६ |
| कवडी ... ... | ६ |
| काडीखार ... | ८ |
| कांतलोह ... ... | ८ |
| कांसें ... ... | ८ |
| खडू ... ... | ९ |
| गंधक ... ... | ९ |
| गेरू ... ... | ११ |
| गोपीचंदन ... | ११ |
| घेरोसा ... ... | ११ |
| चुना ... ... | ११ |
| जवखार ... ... | १२ |
| जस्त ... ... | १३ |
| टांकणखार ... | १४ |
| तेल्या टांकणखार | १५ |
| तांबें ... ... | १६ |
| तुरटी ... ... | १७ |
| दगडी पाषाणभेद. | १८ |
| नवसागर ... ... | १८ |
| पाणीशोक... ... | १९ |
| पादेलोण ... ... | १९ |
| पापडखार... ... | १९ |
| पारा ... ... | २० |
| पितळ ... ... | ३१ |
| पोलाद ... ... | ३२ |
| प्रवाळ ... ... | ३३ |
| बांगडखार ... | ३४ |
| बीडलोण ... ... | ३४ |
| मनशीळ ... ... | ३५ |
| मीठ ... ... | ३५ |
| मुलतानमाती ... | ३६ |
| मुरदाडशिंग ... | ३६ |
| मोती ... ... | ३७ |
| मोत्याची शिंप ... | ३७ |
| मोरचूत ... ... | ३७ |
| रसकापूर ... ... | ३८ |
| रुपें ... ... | ३९ |
| रौप्यमाक्षिक ... | ४० |
| लोणारखार ... | ४० |
| लोहकीट ... ... | ४० |
| लोहचुंबक ... | ४१ |
| शंख ... ... | ४२ |
| शंखजिरा ... ... | ४२ |
| शिंप ... ... | ४३ |
| शिरगोळा... ... | ४४ |
| शिलाजित ... | ४४ |
| शिसें ... ... | ४५ |
| शेंदूर ... ... | ४६ |
| शेंधेलोण ... ... | ४७ |
| सज्जीखार ... ... | ४८ |
| सांबरलोण ... | ४८ |
| सुरमा ... ... | ४८ |
| सुवर्णमाक्षिक ... | ४९ |
| सोनें ... ... | ५० |
| सोमल ... ... | ५१ |
| सोरा ... ... | ५२ |
| हरताळ ... ... | ५३ |
| हिंगूळ ... ... | ५५ |
| हिराकस ... ... | ५६ |
| **परिशिष्ट.** | |
| लोहभस्माचे गुण | ५६ |
| अग्नि ... ... | ५९ |
| पुटें द्यावयाचा प्रकार | ५९ |
| यंत्रें ... ... | ५९ |

**उपर्युक्त माहितीविषयीं सुप्रसिद्ध मासिकपुस्तक.**

**सन १८८९ च्या जुलैपासून अगदीं नियमित पहिल्या तारखेस निघत असतें.**

# आर्यभिषक्.

**वैद्यकसंबंधी हरएक प्रकारची माहिती ओतप्रोत असते.**

## गुणाविषयीं

नामांकित डाक्टर, वैद्य, वर्तमानपत्रकार, मासिकपुस्तककार व इतर सद्गृहस्थ अशा सर्वांचे फारच उत्तम अभिप्राय आले आहेत व येत आहेत. वर्षाची वर्गणी फक्त २८६ व लायब्ररीस तर अवघी १॥ रुपया.

**असें असून,**

याच्या वर्गणीदारांस निराळा टपालखर्च न पडतां 'राजवैद्य' मासिकपत्र,

# दरमहा फुकट मिळतें.

पुस्तकाचा नमुना पहा; ह्मणजे खात्री होऊन साहजिक वाटेल,

**कीं, हें प्रत्येकाजवळ असलेंच पाहिजे !**

फुटकळ अंकास ६ आणे; टपाल खर्च अर्धा आणा. आजपर्यंतचे सर्व अंक विक्रीस तयार आहेत. शिवाय आमच्याकडचीं पुस्तकें व औषधें वगैरेसंबंधी माहिती पाहिजे असेल तर अर्धा आण्याचें टिकीट पाठवा.

मुंबई, नवा नागपाडा, नं० १६०–१६१ } **शंकर दाजी शास्त्री पदे,**
'आर्यभिषक्' कचेरी. } चिकित्सक, आर्यभिषक्कर्ते.

## वरील ठिकाणींच खालील पुस्तकें विकत मिळतील.

| पुस्तकाचें नांव. | किं. रु. | ट. ख. | पुस्तकाचें नांव. | किं. रु. | ट. ख. |
|---|---|---|---|---|---|
| औषधी–वाड, कापडी पुठ्याचें. | २॥ | ८= | गोवैद्यक. ... ... ... | ८= | ८॥· |
| ,, कागदी पुठ्याचें. | २ | ८= | प्राणिज औषधी ... ... | ८≡ | ८॥· |
| वनौषधी–गुणादर्श, भाग १ ला. | ·॥· | ८– | अश्वरोगपरिज्ञान ... ... | ८॥· | ८॥ |
| ,, भाग २ रा. | १ | ८– | अर्शोघ्नसुधाकर ... ... | ·।= | ८– |
| सुबोधवैद्यक, पूर्वार्ध ... ... | ·॥· | ८– | समासादर्श .... ... ... | ·।= | ८– |
| ,, उत्तरार्ध. ... | १ | ८– | सुंदराबाई-चरित्र ... ... | ·।= | ८– |

श्रीशंकर.

# रसवैद्य.

## १. अंबर.

अंबर हा एक खनिज पदार्थ आहे. याचे खडे असतात. हा भूमींत ओंड पुरलेला किंवा समुद्रांत तरना अथवा समुद्रकिनाऱ्यावर बहुतेक ठिकाणीं मिळतो. हा विशेषेंकरून बाल्टिक समुद्र, परशीयन समुद्र इत्यादि देशांत किनाऱ्यावर व पोलांड, जर्मनी, स्वीडन, सिसली, प्रशिया इत्यादि देशांतील जमिनींत मिळतो. अंबर–पिंवळा, काळा व पांढरा आणि त्यावर ठिपके असून तो गोल अरगजासारखा पिंगट रंगाचा असतो. पिंवळा अंबर श्रेष्ठ आहे, व काळा सर्वांत कमी किंमतीचा आहे. खरा अंबर महाग मिळतो; ह्मणून कित्येक लोक कृतीचाही करितात. खरा अंबर जो आहे त्याचे दोन खडे घेऊन एकावर एक घांशिले असतां, ते गरम होतांच सूक्ष्म पदार्थास लोहचुंबकासारखे आकर्षण करितात. दांतांखालीं चावला असतां थोडा आवाज होतो, पण विरघळत नाहीं; मात्र नरम होतो आणि त्यांत थोडी चिकास येते. अंबरास विस्तवांत टाकलें असतां त्याच्या धुरास सुवास चांगला येतो. अंबर सुगंधिक पदार्थांत घालतात. **अंबर**–धातुवर्धक, तृप्तिकारक, पुष्टिकर, कामोत्तेजक इंद्रियांस शक्ति देणारा, स्त्रीसमागमाविषयीं इच्छा उत्पन्न करणारा, अग्निवर्धक, कोठ्यांतील सर्दी व गर्मीची इजा दूर करणारा, तरुणास व ह्यातान्यास हितावह असा आहे. ( १. ) **कंपवायूवर**–१ गुंज अंबर मधाशीं घ्यावा. याप्रमाणें सात दिवस घेतला असतां कंपवायु दूर होतो. तसेंच त्यापासून कोठ्यांतील, आंतड्यांतील व सांध्यांतीलही रोग दूर होतात. ( २. ) **स्थावर–जंगमविषावर**–अंबर पाण्यांतून घ्यावा. ( ३. ) **विषूचिका ( पटकी ) रोगावर**–अंबराची धुरी द्यावी, व अंबर व कस्तूरी थोडी खावयासही द्यावी. ( ४. ) **क्षीणतेवर**–अंबराचें तूप साखरेंतून सेवन करावें ह्मणजे क्षीणता दूर होऊन शरीरावर तेज येतें व मगज शांत होतो.

## २. अभ्रक.

पांढरें, तांबडें, पिंवळें व काळें असें चार प्रकारचें अभ्रक आहे. औषधांत पांढरें व काळें घेतात. काळें अभ्रक गुणांनीं श्रेष्ठ आहे. **शोधन**–( १. ) कृष्णाभ्रक अग्नीवर तापवून गाईचें दूध, त्रिफळ्याचा काढा,

कांजी व गोमूत्र यांत सात सात वेळ बुडवावें ह्मणजे शुद्ध होतें. ( २. ) अभ्रक अग्नीवर तापवून बोरीच्या काढ्यांत बुडवावें आणि हातानें मर्दन करावें व वरचें पाणी टाकून शुष्क करून घ्यावें; तें धान्याभ्रकाहून चांगलें होतें. **धान्याभ्रक करण्याची कृति**—अभ्रकाच्या चतुर्थांश साळी अभ्रकांत मिळवून कांबळ्यांत बांधून तीन दिवस पाण्यांत भिजत ठेवावें आणि हातानें पुष्कळ मर्दन करावें; ह्मणजे अभ्रक पाण्यांत पडेल तें युक्तीनें बाहेर काढून सुकवून घ्यावें. **अभ्रक**—तुरट, मधुर, शीत, आयुष्य देणारें, धातुवर्धक असें आहे आणि क्षय, त्रिदोष, व्रण, मेह, कुष्ठ, प्लीहा, उदर, ग्रंथि, विष व कृमि यांचा नाश करितें. **मारण**—( १. ) धान्याभ्रक १ भाग आणि टांकणखार २ भाग हे एकत्र खलून अंधमुषेंत घालून तीव्राग्नीनें पचन करावें. नंतर दुधांत खलून पुट द्यावें ह्मणजे भस्म निश्चंद्र होतें. हें भस्म स्वभावानं शीतल आहे ह्मणून सर्व रोगांवर योजावें. ( २. ) धान्याभ्रक कासविंद्याच्या रसांत मर्दन करून पुट द्यावें; याप्रमाणें १० पुटें द्यावीं ह्मणजे त्याचें भस्म होतें. ( ३. ) धान्याभ्रक घेऊन रुईचे चिकांत एक प्रहर खलून त्याची वाटोळी चक्राकार वडी [illegible] भोंवतीं रुईचीं पानें गुंडाळून मातीचे शरावसंपुटांत घालून कापडमाती [illegible] गोंवऱ्यांचा गजपुट अग्नि द्यावा. याप्रमाणें रुईचे चिकांत एकेक दिवस ख[illegible] सात गजपुटें द्यावीं. नंतर वडाच्या पारंब्यांचा काढा करून, तें अभ्रक एकेक दिवस खलून तीन गजपुटें द्यावीं, ह्मणजे अभ्रकाचें भस्म चांगलें होतें. यापासून संपूर्ण रोग दूर होतात, अपमृत्यु दूर होतो, पांढरे केशांचे काळे केश होतात व जसजशा अनुपानांत द्यावें तसतसे गुण होतात. ( ४. ) धान्याभ्रकाला नागबला, भद्रमोथ, वडाचा चीक, किंवा पारंब्यांचा रस, हळदीचें पाणी, मंजिष्ठेचा काढा या संपूर्ण औषधांच्या, क्रमानें भावना द्याव्या आणि प्रत्येक भावनेला चांगलें पुट द्यावें ह्मणजे अरुणवर्ण भस्म होतें. शतपुटी व सहस्रपुटी अभ्रक करणें आहे तर कोरफडाचे रसांत खलून पुटें द्यावीं ह्मणजे रंगदार भस्म होतें. **मृताचें अमृतीकरण**—अभ्रकभस्माच्या समभाग गाईचें तूप मिळवून, लोहपात्रामध्यें पचन करावें. तूप जिरलें ह्मणजे तें भस्म सर्व कार्यांत योजावें. जें अभ्रकभस्म निश्चंद्र आणि काजळासारखें बारीक झालें तें मृत असें जाणावें; तेंच सचंद्र राहिलें तर विषासारखें, मृत्यु, व्याधि आणि रोग यांना करितें. **अभ्रकसत्वपातन**—अभ्रकाचें चूर्ण एक दिवस कांजींत व एक दिवस सुरणाचे रसांत ठेवावें. नंतर केळीच्या कांद्याच्या रसाची भावना द्यावी, आणि चतुर्थांश टांकणखार,

क्षुद्रमत्स्य यांशीं मिळवून ह्मशीच्या शेणाशीं मुटकळीं करून सुकवून खापरांत ठेवून खूप अग्नि द्यावा; ह्मणजे अभ्रकाचें सत्व पडतें. तें सर्व गोळा करून मित्रपंचकाशीं ( तूप, मध, गुग्गुल, गुंजा, टांकणखार ) मिळवून मुशींत घालून अग्नि द्यावा ह्मणजे त्याची कांशासारखी लगड होते. तें सत्व पारद्राच्या जारणाविषयीं योग्य आहे व संपूर्ण लोहांपेक्षां गुणांनीं अधिक आहे. **अभ्रकसत्वगुण**–शीत, त्रिदोषनाशक, रसायन, पुंस्त्वकारक व वय:स्थापक असें आहे. या अभ्रकसत्वासारखें दुसरें औषध भूमंडळांत नाहीं. **अभ्रकद्रावण**–अभ्रकाचें द्रावण भाग्योदयावांचून कधींही सिद्ध होत नाहीं, परंतु शास्त्रांत सांगितलें आणि केव्हां भाग्ययोगानें सिद्ध होईल तें समजत नाहीं. ( १. ) धान्याभ्रक घेऊन अगस्त्याच्या पानांच्या रसांत मर्दन करावें. नंतर सुरणाचे पोटांत घालून मातीचा लेप करून गोष्ठभूमींत हातभर जमिनींत एक महिना पुरून ठेवावें. नंतर काढिलें असतां पाण्या-सारखें पातळ होतें. **अभ्रकभस्माचीं अनुपानें**–( १. ) अभ्रकभस्म एक गुंजेपासून ४ गुंजांपर्यंत मध आणि पिंपळी यांत द्यावें; ह्मणजे प्रमेह, श्वास, विषरोग, कुष्ट, वायु, पित्त, कफ, कफक्षय, क्षतक्षय, संग्रहणी, पांडुरोग, भ्रम, कावीळ, गुल्म हे रोग दूर होतात. ( २. ) वावडिंग, सुंठ, मिरीं, पिंपळी, यांचे चूर्णांत वालभर द्यावें ह्मणजे क्षय, पांडु, संग्रहणी, शूळ, आंव, कुष्ट, श्वास, प्रमेह, अरुचि, कास, अग्निमांद्य, उदरसंबंधीं व्यथा, हे रोग दूर होतात, आणि बुद्धि चांगली होते व शुक्रधातूची वृद्धि होते. ( ३. ) वीस प्रकारचे प्रमेहास मध, पिंपळी, शिलाजित यांत द्यावें. ( ४. ) क्षयरोगास सोन्याचे वर्खाशीं. ( ५. ) धातुवृद्धीस रुपें व सोनें यांचे वर्खा-बरोबर अथवा भस्माबरोबर द्यावें. ( ६. ) रक्तपित्तास हरीतकी, गूळ अ-थवा एलचीदाणे, साखर यांजबरोबर. ( ७. ) क्षय, पांडु, मुळव्याध, यांस त्रिकटु, त्रिफला, चातुर्जात, साखर, मध, यांशीं. ( ८. ) प्रमेह व मूत्र-कृच्छ्र यांस एलचीदाणे, गोखरू, भूयआंवळी, खडीसाखर, गाईचें दूध यांशीं. ( ९. ) प्रमेहास गुळवेलीचें सत्व व खडीसाखर यांशीं. ( १०. ) जीर्णज्वरास मध-पिंपळींत. ( ११. ) नेत्ररोग व धातुपुष्टीस त्रिफलाचूर्ण व मध-तुपाशीं. ( १२. ) व्रणास मोरवेलीचें सत्व व त्रिकटूचें चूर्ण यांत. ( १३. ) बलवृद्धीस गाईचें दूध व भुईकोहळा यांत. ( १४. ) मुळव्या-धीस त्रिव्यांत. ( १५. ) वायुरोगास सुंठ, पुष्करमूळ, भारंगमूळ, मध, आसंध यांचे चूर्णाशीं. ( १६. ) कफरोगास कायफळ, पिंपळी, मध यांत. ( १७. ) जठराग्नि प्रदीप्त होण्यास, मूत्राघात, मूत्रकृच्छ्र व मुतखडा यांस

सर्व क्षारांबरोबर द्यावें. (१८.) धातुस्तंभनास भांगेंत. (१९.) धातुवृद्धीस लवंगा व मद्य यांशीं. (२०.) पित्तरोगास गाईचें दूध आणि साखर यांत द्यावें. बाकीच्या रोगांस यथोक्त अनुपानानें द्यावें.

## ३. कथील. (सं. वंग.)

**शोधन**—कथील पातळ करून निर्गुंडीच्या रसांत हळदीचें चूर्ण घालून त्यांत ओतावें. याप्रमाणें तीन वेळ ओतावें ह्मणजे शुद्ध होतें. कथील अंगावर उडून येतें सबब जपावें. **मारण**—(१.) शुद्ध केलेलें कथील कढईंत घालून चुलीवर ठेवावें व खालीं अग्नि लावावा. कथील पातळ झाल्यावर त्यांत चतुर्थांश अघाड्याचें चूर्ण घालून आंब्याच्या दांड्यानें जोंपर्यंत भस्म होईल तोंपर्यंत घोंटावें. चूर्ण वारंवार थोडें घालीत जावें. जोंपर्यंत कथलाचें चूर्ण होई तावत्पर्यंत तें अघाड्याचें चूर्ण संपवावें. नंतर तें भस्म एकत्र करून वर पणतीं चांगली झांकण घालून लाल होईपर्यंत खालीं तीव्राग्नि द्यावा. मग थंड झाल्यावर काढून घ्यावें. (२.) वंग कढईंत घालून पातळ करून थोडें थोडें ओंव्याचें चूर्ण, शिलाजतु, अघाड्याचें भस्म, किंवा चिंचेचें चूर्ण हे प्रत्येक वंगाचे मारक पदार्थ आहेत; ह्मणून यांतून एकेकानेंच वंगाचें भस्म होतें. नंतर पूर्वोक्त वंग भस्म घेऊन शुद्ध हरताल समान किंवा चतुर्थांश अथवा अष्टमांश त्यांत मिळवून निंबाचे किंवा कोरफडीचे रसांत प्रहर दोन प्रहर खल करून त्याच्या चाक्या बांधाव्या. त्या वाळवून शरावसंपुटामध्यें पिंपळाचे सालींत ठेवून गजपुट अग्नि द्यावा. याप्रमाणें सात वेळ पुट द्यावें, ह्मणजे सर्वोत्तम खडूसारखें वंगभस्म होतें. हें संपूर्ण कार्य करितें; यापासून वैद्याचें जीवन होतें. द्वितीयादि पुटाला तालक देऊं नये, नुसतें कुमारीरसांत घोंटावें आणि वारंवार पुटें द्यावीं. (३.) वंग शुद्ध करून त्याचे पातळ चांगले पत्रे करावे, आणि औषधीसहित ते ३२ तोळे पत्रे यंत्रावर ठेवावे. त्या औषधी—शेळीच्या लेंड्या ४ शेर, तीळ ४ शेर, हळद ४ शेर या सर्वांचीं एकत्र चूर्णें वस्त्रगाळ करून बोळक्यांत थोडा चूर्णाचा थर करून त्यावर वंगपत्रे, त्यावर चूर्ण, त्यावर वंगपत्रे, याप्रमाणें लावून वरतीं अर्धें चूर्ण घालून मातकापड करून गजपुट द्यावें. चांगलें थंड झाल्यावर काढून वाल किंवा अर्धा वाल, देहाचें बल जाणून द्यावें. हें यथायोग्य अनुपानाशीं संपूर्ण रोगांचा नाश करील. (४.) वंग खापरांत घालून चुलीवर पातळ करून शमीच्या काष्ठानें घोंटावें ह्मणजे भस्म होतें. (५.) हळदीचें चूर्ण करून तें खालीं शरावामध्यें अर्धें घालून त्यावर वंगाचे पत्रे ठेवून वर बाकीचें चूर्ण घालून मातकापड करून अग्नि

ह्मणजे वंगाचें भस्म होतें. तें भस्म घेऊन भस्माच्या चतुर्थांश सोरा मिळवून शरावसंपुटांत घालून एक घटिका मंदाग्नि द्यावा, आणि थंड झाल्यावर पांढरे शंख व कुंदपुष्पासारखें स्वच्छ भस्म घ्यावें, आणि सर्व रोगांवर अनुपानाशीं द्यावें. (६.) तरटाचा तुकडा घेऊन त्यावर तीळ व चिंचेची साल हीं एकत्र चेंचून तें चूर्ण त्या तरटावर अर्धा अंगुळ पसरून त्यावर वंगाचे पत्रे बारीक तोडलेले वर लावून त्यावर पुनः चूर्ण घालावें, व त्यावर पुनः तुकडे लावावे, पुनः चूर्ण घालावें. याप्रमाणें सर्व घालून बांधून मातीचा लेप करून गजपुट द्यावें. थंड झाल्यावर युक्तीनें काढून घ्यावें. तें जशा भाताच्या लाह्या होतात याप्रमाणें असून चोळलें असतां बारीक होतें, आणि सर्व कार्य करितें. या पूर्वोक्त भस्माला, प्राचीन वैद्यांनीं तालदानाची उपेक्षा केली आहे. (७.) शुद्ध केलेल्या वंगाच्या दशांश पारा घेऊन त्यांत खलून रुईच्या चिकांत खलावें, व खापरांत घालून पातळ करून खालीं तीव्राग्नि लावून, डाळिंबाच्या सोट्यानें घोंटावें ह्मणजे भस्म होतें. (८.) हरताळ पळसाच्या पाण्यांत खलून त्यानें वंगपत्र्यांना लेप करावा आणि गजपुट द्यावें ह्मणजे भस्म होतें. (९.) वंगाचे पातळ पत्रे करून ते दुधांत अथवा भांगेंत थरावर थर देऊन गोंवऱ्यांचें पुट द्यावें ह्मणजे भस्म होतें. **वंगभस्मगुण**—शुद्ध रीतीनें केलेलें वंगभस्म-बलकर, दीपन, पाचन, रुचिकर, बुद्धिप्रद, शीतळ, कांतिकारक, जरानाशक, निरोगताकारक, धातूला स्थिर करणारें आणि क्षय व संपूर्ण मेह यांचा नाश करितें. वंग भक्षण करणाऱ्या पुरुषांचा स्वप्नामध्येंही शुक्रक्षय होणार नाहीं. हें नित्य १ अगर २ गुंजा घ्यावें. **वंगानुपानें**—१ मुखगंधीस कापुराशीं. २ पुष्टीस जायफळाशीं, अथवा दुधाशीं. ३ प्रमेहास तुळशीपत्राबरोबर अ० मध व खडीसाखरेशीं. ४ पांडुरोगास तुपांत. ५ गुल्मरोगास टांकणखाराचे लाहीशीं. ६ रक्तपित्तास व ऊर्ध्वश्वासास हळदींत. ७ बलवृद्धीस मद्यांत. ८ पित्तास साखरेंत. ९ वीर्यस्तंभनास नागवेलीचे पानांत, भांगेंत अगर कस्तूरींत. १० अग्निमांद्यास पिंपळीशीं. ११ दुर्गंधीस चाफ्याच्या फुलांचे रसांत. १२ दाह झाल्यास निंबाचे रसांत. १३ चर्मपक्ष ह्मणजे पापण्यांच्या रोगास खैरांच्या सालींचे काढ्यांत. १४ अजीर्णास आंवळ्याबरोबर अथवा सुपारीशीं. १५ अस्थिगतज्वरास लोण्याशीं. १६ वायूस लसुणांशीं. १७ कुष्टास समुद्रफळांत अथवा निर्गुंडीचे रसांत. १८ पंढत्व नाश होण्यास अघाड्याचे मुळांत. १९ लिंगवृद्धीस लवंग व समुद्रफळ, नागवेलीचे रसांत उगाळून लेप करावा. २० मोहनास गोरोचन व लवंग यांत तिलक

करावा. २१ मस्तकरोगास एरंडमूळ उगाळून त्यांत वंग घालून लेप करावा. २२ प्लीहारोगास टांकणखाराचे लाहीशीं. २३ वायूस ओंव्याशीं अथवा आस्कंधांत. २४ जलोदरास बकरीचे दुधाशीं. २५ मूल होण्यास काथाशीं अथवा गाढवीच्या दुधांत. २६ मस्तकरोगास अघाड्याबरोबर. २७ धातुविकृतीवर जायफळ, पत्री, लवंग यांत. २८ कंबरेचे व्यथेस जायफळ, अष्टगंध यांशीं. २९ नाडीव्रणास नागवेलीबरोबर. ३० पोटांतील पीडेस हरीतकीबरोबर. ३१ वातगुल्मास ताकाबरोबर. ३२ फेंपरें येतें त्यास लसुणांचे तेलांत नस्य द्यावें. ३३ श्वासास जायफळ, लवंग व मध यांशीं. ३४ शरीर बळकट होण्यास तुळशीचे रसांत.

## ४. कपिला.

कपिला ही रंगानें तांबूसवर्ण असून विटेच्या चूर्णासारखी आहे. ही सुरतेकडे उत्पन्न होते. **कपिला**—रेचक, तिखट व उष्ण अशी आहे; आणि व्रण, कफ, खोकला, जंतु व कृमि यांचा नाश करिते. (१.) **रेच होण्यास व पित्तगुल्मावर**—मधामध्यें कपिला खलून द्यावी ह्मणजे रेच होतात व पित्तगुल्म निर्बल होतो. (२.) **कृमींवर**—कपिलाचूर्ण अर्ध तोळा, गुळाबरोबर भक्षावें ह्मणजे संपूर्ण कृमींचा नाश होतो.

## ५. कलखापरी. (सं. खर्परतुत्थ.)

कलखापरी ही जस्तापासून होते. हिचा रंग तांबूस असतो. **शोधन**—(१) कलखापरी मनुष्याचे मूत्रांत, घोड्याचे मूत्रांत किंवा गोमूत्रांत दोलायंत्रानें सात दिवस पचन करावी ह्मणजे शुद्ध होते. **कलखापरी**—संपूर्ण मेहनाशक, कफ, पित्त, नेत्ररोग, क्षय यांचा नाश करिते व लोह आणि पारद यांना रंगविते. **लघुमालिनीवसंत**—कलखापरी दोन भाग व मिरें एक भाग एकत्र करून त्याचा गाईच्या लोण्यांत खल करावा; नंतर त्यास निंबाच्या रसाच्या भावना, त्यांतील लोणी नाहींसें होईपर्यंत द्याव्या. हा वसंत, ज्वरावर दोनवालप्रमाणें मध व पिंपळीशीं द्यावा. हा जीर्णज्वर, धातुगतज्वर, अतिसार, रक्तातिसार, रक्तापासून झालेले विकार, मोठा पित्तविकार, प्रदर, अर्शसंबंधीं रक्त, विषमज्वर, नेत्ररोग व सर्व रोग यांचा नाश करितो. हा जयंतीच्या (टाकळीच्या) फुलाशीं गर्भिणीस दिला असतां संपूर्णज्वरांचा नाश करून गर्भाचें उत्तम पालन करितो. याला पथ्य दूधभात.

## ६. कवडी. (सं० वराटिका.)

कवड्या, आरबी समुद्रांतील लक्षद्वीप व मालदीव या बेटांजवळ सांपडतात. पांढरी, तांबडी व पिंवळी अशी तीन प्रकारची कवडी आहे.

त्यांत पिंवळी तीक्ष्ण, चक्षुष्य अशी आहे; तांबडी शीत व व्रणाला हितकारक अशी आहे, आणि जीवर पांढरे बहुत बिंदु व रेषा असतात ती बालग्रहनाशक नानाप्रकारच्या कौतुकांच्या उपयोगी आहे. जी रंगानें पिंवळी, पाठीवर गांठळ, ती रसयोगाचेठायीं घ्यावी. त्यांत, वजनानें दीड तोळा असते ती उत्तम, तोळाभर ती मध्यम व पाऊण तोळा ती कनिष्ठ जाणावी; कोणाच्या मतें जी पिंवळी कवडी, पाठीवर गांठळ, लांबट, वजनानें सहामासे असते ती उत्तम, चार मासे ती मध्यम व जी तीन मासे ती कनिष्ठ जाणावी. **कवडी**—तिखट, उष्ण, वृष्य, अग्निदीपक, कडू, शीत अशी आहे; व कर्णशूल, व्रण, नेत्ररोग, संग्रहणी, गुल्म, शूल, परिणामशूल, क्षय, वायु, कफ यांचा नाश करिते. **शोधन**—कवड्या, कांजींत पचन केल्या असतां शुद्ध होतात; अथवा एक रात्र ताकांत अ० निंबूरसांत भिजूं घालाव्या ह्मणजे शुद्ध होतात. **मारण**—(१.) कवड्या, कोळशांच्या अग्नींत चांगल्या फुलत तोंपर्यंत भाजून, शीत झाल्या ह्मणजे बारीक खलून औषधार्थ योजाव्या. (२.) कवड्या कुटून वस्त्रगाळ पूड करावी व ती एका बोळक्यांत भरून, सर्व पूड भिजून एक अंगुळ वर राही इतका निंबाचा रस पिळावा व बोळकें उन्हांत ठेवावें. याप्रमाणें नित्य निंबाचा रस घालून ७ पुटें द्यावीं. आठवे दिवशीं त्याचा दोन प्रहरपर्यंत खल करून उन्हांत सुकवून ठेवावें व उपयोगांत आणावें. हें दोन गुंजांपासून एक माशापर्यंत द्यावें. हें सर्व रोगांवर अनुपानपरत्वें द्यावें. (३.) कवड्या, अग्नींत लाल झाल्यावर निंबाच्या अथवा कोरफडीच्या रसांत चुन्याच्या कळीप्रमाणें विरवाव्या; नंतर शुष्क करून खलून ठेवाव्या. उपयोग—(१.) **कान वाहतो त्यास**—कवडीचें भस्म निंबाच्या रसांतून अ० गुरगुडींतील पाण्यांतून कानांत घालावें; अथवा आधीं कवडीचें भस्म कानांत घालून वर निंबाचा रस पिळावा. (२.) **अपस्मारावर**—कांद्याच्या फांकीवर कवडीचें भस्म घालून त्याची पोतंडी करावी व ती वारंवार नाकांत ओढावी. (३.) **क्षयावर**—कवडीचें २ गुंजा भस्म, खडीसाखर १ तोळा, मध १ तोळा व लोणी १ तोळा यांशीं द्यावें. (४.) **धातुविकारावर**—कवडीचें भस्म तूप व खडीसाखरेशीं द्यावें. (५.) **शूळावर**—कवडीचें भस्म उष्णोदकाशीं अ० साखरेशीं द्यावें. (६.) **श्वास, कास, ज्वर यांवर**—कवडीभस्म मधाशीं द्यावें. (७.) **प्रमेहावर व धुपणीवर**—कवडीभस्म तूप व खडीसाखरेशीं द्यावें, अगर गाईचें दूध व खडीसाखरेशीं द्यावें. (८.) **गजकर्ण, दाद, खरूज नाइटे यांस**—

तिळांचें तेल अर्धा पाव, कवडीभस्म तोळा १, गेरू तोळा अर्धा, एकत्र खलून लेप करावा.

## ७. काडीखार.

काडीखारास "नैत्रेट आफ् सिल्वर" व "ल्यूवर कास्टिक" असें इंग्रेजीभाषेंत ह्मणतात. हा रुप्यापासून बनवितात. काडीखाराच्या पेनशिलीसारख्या पांढऱ्या काड्या असतात. काडीखार उष्णपाण्यांत विरघळतो. हा त्वचेला लाविला असतां काळे डाग पडतात व फोड येतात. (१.) **डोळ्यांचा दाह, आलेले डोळे** व **खुपऱ्यांवर**—काडीखार उष्णपाण्यांत विरघळवून त्याचा थेंब पिसानें डोळ्यांत सोडावा. (२.) **गर्मीच्या चट्ट्यांस**—चट्टा उद्भवतांच त्यावर काडीखार लावावा ह्मणजे चट्टे पसरत नाहींत व त्यांतील विष जळून जातें. (३.) **आगंतुक सूज, अवाळू** व **चामखीळ यांवर**—काडीखार लावावा. (४.) **एक वर्षाचे आंतील डोळ्यांचे फुलावर**—मृगनक्षत्राचें किंवा हस्तनक्षत्राचें पाणी धरून बाटलींत ठेवून त्यांत १८ तोळ्यांस १ गुंज काडीखार घालून तोंड बांधून ठेवावें. १०।१२ दिवस झाल्यानंतर तें पाणी पिसानें डोळ्यांत घालावें. पाणी घालतेवेळीं हालवून घ्यावें.

## ८ कांतलोह.

कांतलोह हें चुंबकापासून होतें. यांत भ्रामक व चुंबक असे प्रकार आहेत. कांतलोह फार दुर्मिळ आहे. हें सर्व लोहांत श्रेष्ठ आहे. **कांतलक्षण.**—कांताच्या भांड्यांत पाणी भरून त्यांत तैलबिंदु टाकिला असतां प्रसर होत नाहीं, आणि पाण्याला हिंगाचा वास येतो; व निंबाचा रस कांतपात्रांत ठेविला असतां कडू होतो, आणि भांड्यांत दूध तापविलें असतां ऊत आला कीं बाहेर जात नाहीं; उंच तसाच वाढतो. कांताचें भांडें तापवून त्यांत पाणी लावलेले हरभरे टाकिले असतां साल जळते, त्याला कांतलोह ह्मणावें. **मारण**—कांतलोहाचें मारण पोलादाच्या मारणाप्रमाणें करावें. याचें भस्म पोलादाच्या भस्माहून शतपट गुणांनीं अधिक आहे.

## ९. कांसें. (सं. कांस्य.)

कांसें ही मिश्र धातु आहे. आठ भाग तांबें व दोन भाग कथील, असे दोन धातुरस करून एकत्र केले असतां कांसें होतें. त्याचें भोजनपात्र शुभकारक आहे. कांसें दोन प्रकारचें आहे, एक पुष्पक व दुसरें तैलक. त्यांत पुष्पक पांढरें असतें आणि तैलक कफ करितें. पहिलें रोगशांतीविषयीं घ्यावें. श्वेत, चकचकीत, मऊ, लखलखीत, शब्द होणारें, स्निग्ध,

निर्मळ, घनांगि, सरळ, असें कांसें उत्तम जाणावें. **शोधन**–( १. ) कांशाचे पत्रे करून तापवून ते तेल, ताक, गोमूत्र, कांजी व कुळित्थाचा काढा यांत तीन तीन वेळ बुडवावे ह्मणजे शुद्धि होते. ( २. ) कांशाचे पातळ पत्रे करून गोमूत्रांत प्रहरभर शिजवावे किंवा आम्लद्रव्यांत शिजवावे ह्मणजे कांसें शुद्ध होतें. **मारण**–कांसें व पितळ यांचें मारण तांब्यासारखेंच करावें. ( १. ) तांबें, पितळ व कांसें यांचे मारणाविषयीं–समानभाग गंधक घेऊन तो रुई, वड, गाईचें दूध, व निर्गुंडी यांचे चिकांत वेगळा वेगळा मर्दन करून पत्र्यांस लेप देऊन वेगळीं वेगळीं २ गजपुटें द्यावीं ह्मणजे भस्म होतें. ( २. ) कांसें किंवा पितळ यांचे समभाग गंधक घेऊन रुईच्या चिकांत खलावा; आणि चांगले शुद्ध केलेले पत्रे घेऊन त्यांस त्या गंधकानें लेप करावा. वाळवून पणतींत घालून मातकापड करून गजपुट द्यावें. याप्रमाणें दोन पुटांनीं कांसें व पितळ यांचें भस्म होतें. **कांस्यभस्मगुण**–तुरट, कडू, उष्ण, लेखन, स्वच्छ, सारक, जड, नेत्रांला हितावह, रुक्ष, कफ आणि पित्त यांचें नाशक आहे.

## १०. खडू. ( सं. खटी. )

खडू पांढरा व मळीण या भेदानें दोन प्रकारचा आहे. त्यांत खडू मलीन असतो, आणि गौर खडू मऊ पाषाणासारखा, फार शुभ्र व जड, तो चांगला असतो. **खडू**–दाह, रक्तविकार, विष, शोष, कफ व नेत्रविकार यांचा नाश करितो, आणि थंड, मधुर, लेखन व बालकाला हितावह असा आहे. पाषाणखडू–व्रण, पित्त व रक्तविकार यांचा नाशक असून, शीत व लेपादिकांमध्यें गुणकारक, भक्षण केला असतां मातीसारखा लागतो.

## ११. गंधक.

गंधक–तांबडा, पिंवळा, पांढरा आणि काळा, असा चार प्रकारचा आहे. त्यांत तांबडा स्वर्णक्रियेमध्यें, पिंवळा रसायनाविषयीं उत्तम, पांढरा लेपांत किंवा लोहमारणाविषयीं घ्यावा; आणि काळा गंधक दुर्लभ आहे, तो जरा व मृत्यु यांचा नाश करितो. औषधांत आंवळ्या गंधक घ्यावा. **शोधन**–( १. ) दुधाच्या भांड्यावर फडकें बांधून त्यावर गंधक पसरून गंधकाला न लागे असें भांडें झांकण घालून त्यावर अग्नि करावा; ह्मणजे गंधक पातळ होऊन दुधांत पडेल, तो शुद्ध जाणावा. ( २. ) लोखंडाच्या कढईंत तूप घालून अग्नीवर पातळ करावें. नंतर घृताचे समान गंधक बारीक करून त्यांत टाकावा. गंधक पातळ झाल्यानंतर वस्त्रावर गाळावा.

तो असा, कीं वस्त्रांतून सर्व गंधक दुधांत पडेल. तो थंड झाल्यावर काढून धुवावा आणि वाळवावा. याप्रमाणें तीन वेळ निरनिराळे दुधांत शोधावा; ह्मणजे भक्षण करण्यास व योगांत योजण्यास शुद्ध होतो. **गंधक**–रसायन, मधुर, पाककाळीं कडू व उष्ण, अग्निदीपन, पाचक, आमाला शोषक व पाडणारा; पारदाला वीर्य देणारा असून त्याचें सत्व पारदबंधक आहे; आणि कंडू, कुष्ट, विसर्प, खरूज, विष, कृमि यांचा नाश करितो. **गंधकाचीं अनुपानें**–चार मासे शुद्ध गंधक दुधाशीं सेवन केला असतां कफविकार, वातविकार, पित्त, विष, कामला व कुष्टें यांचा नाश करितो, आणि कामवृद्धि करून नेत्ररोगाला दूर करितो. हा–त्रिफला, तूप व माक्याचा रस यांशीं घ्यावा ह्मणजे नेत्र चांगले होतात. रोगनाश व आयुष्याची वृद्धि होते. चार मासे गंधक व दूध हीं एक महिना घेतलीं असतां शौर्य व वीर्य यांची वृद्धि होते; व सहा महिने घेतलीं असतां संपूर्ण रोगांचा नाश होतो; दिव्य दृष्टि होते व आयुष्य वाढतें. गंधक–केळ्याशीं त्वग्दोषनाशक, चित्रकाशीं बलदायक; अडुळशाच्या काढ्याशीं क्षयकासांवर; त्रिफळ्याच्या काढ्याशीं मंदाग्नीवर आणि संपूर्ण ऊर्ध्वविकारांवर द्यावा. ( १. ) **खरजेवर**–गंधक कोहळ्यांत अ० केळ्यांत खावा; ह्मणजे सर्व खरूज बाहेर पडते. मग सायंकाळीं ह्मशीचें शेण अंगास लावून स्नान करावें. **दुसरा प्रकार**–शुद्धगंधक तुपाशीं अ० ताकाशीं घ्यावा. ( २. ) **रक्तविकारावर**–शुद्धगंधक दुधाशीं घ्यावा. ( ३. ) **शिब्यावर**–गंधक व जवखार शिरसेलांत कालवून लेप द्यावा. ( ४. ) **अपस्मारावर**–गंधकाची धुरी नाकांत द्यावी. ( ५. ) **कंडू व गजकर्णावर**–गंधक, टांकणखार, कापूर, मायफळ व मोहळाचें मेण हीं खोबऱ्याचे तेलांत खलून त्याचा लेप द्यावा. ( ६. ) **भूतज्वरावर**–शुद्धगंधक व आवळकाठी यांचें १० मासे चूर्ण द्यावें. अथवा गंधक व त्रिकटु यांचें चूर्ण तुपांतून द्यावें. ( ७. ) **प्रमेह व पिटिका यांवर**–शुद्धगंधक गुळाबरोबर खावा व त्यावर दूध प्यावें. ( ८. ) **कुष्ठ, कंडू व खरूज यांवर**–गंधक बाहव्याच्या मुळाच्या रसांत घोटून त्याचा लेप करावा. **गंधकरसायन**–४ तोळे गंधक व २ तोळे पारा यांची कज्जली करून कोरफडाच्या रसांत एक दिवस खल करावा, व पणत्यांत घालून संधिलेप करून अग्नीची आंच द्यावी व शीत झाल्यावर काढून हें एक महिना मध व तूप यांशीं घेतलें असतां जरा; व्याधि व दारिद्र्य यांचा नाश करितें. **दुसरा प्रकार**–गंधक व मिरें सभाग व त्रिफला सहाभाग घेऊन बाहव्याच्या मुळाच्या रसांत मर्दन क-

रावा व घ्यावा ह्मणजे संपूर्ण रोग नाश करितो. गंधकभक्षकानें खारट, आंबट, भाज्या, द्विदल धान्यें, स्त्रीगमन, घोड्यादिकांवर आरोहण किंवा पायांनीं चालणें वर्जावें.

## १२. गेरू.

गेरूस " सोनकाव " असेंही ह्मणतात. **शोधन**—गेरू गाईच्या दुधांत खलला असतां शुद्ध होतो; किंवा किंचित् तूप घालून भाजला असतां शुद्ध होतो. **गेरू**—रक्तपित्त, रक्तविकार, कफ, उचकी, विषमज्वर यांचा नाश करितो, व चक्षुष्य आणि बल्य असा आहे. (१.) **उचकीवर**—गेरूचें चूर्ण मधांत द्यावें. (२.) **मूल माती खातें त्यास**—मुलास गेरू खाण्यास द्यावी ह्मणजे वाढलेलें पोट झडून मूल सशक्त होतें.

## १३. गोपीचंदन.

गोपीचंदनास " सोरटी माती " असेंही ह्मणतात. गोपीचंदनाची उत्पत्ति सौराष्ट्रदेशांत ( काठेवाडांत ) होते. ही एक जातीची माती आहे. गोपीचंदनाचा रंग पांढरा असतो. **गोपीचंदन**—दाह, क्षत, रक्तविकार, पित्त, कफ, प्रदर, यांचा नाश करितें. वरकड गुण तुरटीसारखे आहेत. ( १. ) **हिराकशीचे विषास** व अन्नांत काचेची पूड घातल्यास गोपीचंदन उगाळून द्यावें. ( २. ) **गर्मीचे चट्ट्यांस**—गोपीचंदन उगाळून लावावें. ( ३. ) **मुलांच्या मस्तकावर पुरूळ येतो त्यास**—गोपीचंदन उगाळून लेप करावा. ( ४. ) **प्रदरावर**—गोपीचंदन १ तोळा व तुरटी ३ मासे एकत्र खलून मातकापड करून गजपूट द्यावें. तें एक गुंजप्रमाण साखरेशीं द्यावें. ( ५. ) **आगपैण व धांवऱ्यावर**—गोपीचंदन उगाळून लावावें. ( ६. ) **मुखरोगावर**—गोपीचंदन दुधांत उगाळून लावावें.

## १४. घेरोसा. ( सं० गृहधूम. )

चुलीवर धुरानें जी काजळी जमते तीस " घेरोसा " असें ह्मणतात. (१.) **गालगुंड, सूज,** इत्यादिकांवर—घेरोसा, गूळ व चुना खलून लेप लावावा. ( २. ) **डोळे येतात** त्यास—घेरोसा, गूळ व चुना यांची आंखावर पट्टी लावावी. ( ३. ) **मूळव्याधीवर**—घेरोसा दह्यांत अ० तुपांत खलून मोडांस लेप लावावा व रानशेणीनें शेकावें.

## १५. चुना.

चुना मुख्यत्वेंकरून दोन प्रकारचा उपयोगांत येतो. एक खड्याचा

चुना व दुसरा शिंपाचा चुना. हे चुनखडे किंवा शिंपा, भट्टींत जाळल्या ह्मणजे त्यांचा चुना होतो. ( १. ) **गर्भिणीचे अतिसारावर**—चुन्याची निवळी लहान चमचाभर दुधांतून द्यावी. ( २. ) **व्रण, बद बसविण्यास, कर्णमूळ व गालफ्यावर**—कळीचा चुना, गूळ व वेरोसा यांचा लेप द्यावा व वरून पातळ कागद किंवा कापूस बसवावा. ( ३. ) **डोळे येतात त्यास**—कळीचा चुना, गूळ व वेरोसा यांचा लेप मस्तकाचे आंखावर करून त्यावर कागद चिकटवावा. ( ४. ) **अजीर्णावर**—चुन्याची गोळी वालप्रमाण खावी. ( ५. ) **कामलेवर**—कळीचा भिजलेला चुना हरभऱ्या इतका, चार तोळे दह्यांत कालवून द्यावा दि० ७. पथ्य दहींभात. ( ६. ) **बिबा उततो त्यास**—ओला चुना व लोणी एकत्र करून लावावें. ( ७. ) **अंडवृद्धीवर**—कळीचा भिजलेला चुना १ तोळा घेऊन, त्यांत दोन तोळेपर्यंत उंची तपकीर कालवावी. घट्ट झाल्यास थोडें चुन्याचें पाणी घालून मिश्रण सारखें तयार करावें, व वाढलेल्या अंडास त्याचा लेप लावून मंद अग्नीचा सोसवेल तितका शेक घेत रहावें; ह्मणजे कांहीं वेळानें मस्तक जड झाल्यासारखें वाटून वांति होते आणि शिरेंतील पाणी वांतीनेंच पडतें. याप्रमाणें दोन तीन दिवस केल्यानें गुण येतो. ज्यास तंबाकू लागत असून यानें फारच घेरी आल्यास कांदा हुंगावयास व खावयास द्यावा. ( ८. ) **अग्निदग्धव्रणावर**—तिळांचे तेलांत कळीच्या चुन्यावरील निवळी ६ भाग मिश्र करून सुमारें १ घटकापर्यंत काडीनें ढवळीत राहावें, ह्मणजे दाट मलम होईल. तें मोराचे पिसानें फार हलक्या हातानें दोन तीन वेळा लावावें. याणें दाहशमन होऊन त्वचेच्या ठिकाणीं कठीणपणा येतो, व लवकरच गुण येतो. ( ९. ) **चामखिळीवर**—चामखिळीच्या मुळाबरोबर घोड्याच्या केसानें घट्ट बांधून ठेवावें ह्मणजे पांच सात दिवसांत ती निर्जीव होते. नंतर कापून काढून त्याजवर कळीचा सुका चुना बसवीत जावा ह्मणजे ती नाहींशी होते.

## १६. जवखार.

जवांचें ओलें पंचांग जाळून त्यापासून हा क्षार उत्पन्न करितात. याच्या पातळ वड्या असतात. याचा रंग पांढरा असतो. **जवखार**—सारक, उष्ण, तिखट, अग्निदीपक, सूक्ष्म, लघु, व वायु, कफ, शूल, अश्मरी, वातरोग, कंठरोग, आमशूल, यकृत्, प्लीहा, मूत्रकृच्छ्र, गुल्म, श्वास, अर्श, आनाहवात, हृद्रोग, आम, पांडु, व ग्रहणी यांचा नाश करितो. ( १. ) **बाळंतिणीस मक्कलशूल** होतो त्यास—जवखार गाईचे तुपांत अथवा उष्णो-

दकांत द्यावा. (२.) **मूत्रकृच्छ्र, अश्मरी** व **खर** पडते त्यास—ताकांत जवखार घालून द्यावा. (३.) **बालकांची तालु** पडली तर त्यास—जवखार व मध बोटावर घेऊन त्यानें लेप करावा. (४.) **उदावर्तरोगावर**—जवखार व साखर एकत्र करून द्यावी. (५.) **गुल्मावर**—जवखार ३ मासे व गूळ ३ मासे यांची गोळी करून द्यावी. (६.) **मूत्रकृच्छ्रावर**—जवखार पांच मासे घेऊन साखरेशीं खावा, अ० एक मासा जवखार, कोहळ्याचा रस ४ तोळे, साखर १ तोळा हीं एकत्र करून द्यावीं. (७.) **दमा व खोकला यांवर**—जवखार मधांत द्यावा. (८.) **कटिशूळ, हृदयशूळ, कुक्षिशूळ, व बस्तिशूळ यांवर**—जवखार, हिंग, सैंधव यांचें चूर्ण करून तें एरंडेलांत घालून द्यावें. (९.) **मूत्रावरोधावर**—जवखार दीड मासा तांदुळांचे धुणांत द्यावा.

## १७. जस्त. (सं. जसद.)

**शोधन**—जस्त पातळ करून दुधामध्यें ओतावें. याप्रमाणें २१ वेळ करावें ह्मणजे शुद्ध होतें. **जस्तभस्म**—जस्त खापरांत घालून रस करावा आणि निंबाचे काष्ठानें घोटावें. खालीं तीव्राग्नि लावावा, ह्मणजे भस्म होतें. तें घेऊन त्याला त्रिसंदी, कोरफड, त्रिफळा, व माका, या प्रत्येकाच्या बत्तीस बत्तीस भावना द्याव्या आणि प्रत्येक भावनेस अग्नीमध्यें पुट द्यावें. नंतर त्यांस वर सांगितलेल्या औषधींचें एक पुट द्यावें आणि एक पंचामृताचें पुट द्यावें. शीत झाल्यावर काढून खलून भांड्यांत भरून ठेवावें, व सर्व रोगांवर अनुपानानें दोन गुंजा द्यावें. जस्ताचें भस्म गाईच्या जुन्या तुपाशीं नेत्रांना हितावह व तांबूलाबरोबर घेतलेंतर प्रमेहनाशक, टाकळीशीं अग्नि वाढवितें आणि दालचिनी, तमालपत्र, वेलची यांशीं त्रिदोषनाशक आहे. **जस्ताचें फूल**—जस्त कढईत घालून लोखंडाचे सळईनें घोटावें ह्मणजे त्याचें भस्म होतें त्यास जस्ताचें फूल असें ह्मणतात. **जस्तभस्म**—तुरट, कडू, शीतल, कफ, पित्त, प्रमेह, आणि श्वास यांचा नाश करितें व डोळ्यांना हितकारक आहे. **डोळ्यांवर सारा आल्यास**—जस्ताचें फूल व खडीसाखर यांचा चांगला खल करून ती पूड रात्रौ निजतेवेळीं डोळ्यांत घालावी, किंवा १ भाग तुरटी व तिचा चौथा हिस्सा जस्ताचें फूल यांचा चांगला खल करून ती पूड २ गुंजा घेऊन त्यांत १। तोळा पाणी घालून दिवसांतून दोनवेळ पिसानें डोळ्यांत घालावें ह्मणजे आलेले डोळे, गळ, चिकटा व लाली यांची शांति होते. (२) **खुपऱ्या, सारा,** आलेले डोळे वगैरे नेत्र रोगांवर—जस्ताचें फूल, खडीसाखर, कात, तुरटी,

हीं समभाग व अष्टमांश मोरचूत यांचा खल करून दिवसा व रात्रीं डो-ळ्यांत घालावें.

## १८. टांकणखार. ( सं. टंकण. )

कित्येक तळ्यांत हा क्षार पाणी सुकल्यावर जमून राहिलेला सांपडतो. यास " स्वाहागी " असेंही ह्मणतात. **शोधन**—टांकणखार गाईच्या शेणांत ठेवून नंतर धुऊन घ्यावा ह्मणजे शुद्ध होतो; किंवा याची लाही करून घ्यावी. **टांकणखार**—अग्निकारक, सोनें व रुपें यांना शुद्ध करणारा, सारक, विषदोष, वायु व कफ यांचा नाश करितो. ( १. ) **कर्णशूलावर**—टांकणखाराची लाही करून कानांत घालावी. ( २. ) **पापणी झडली असल्यास**—टांकणखार निंबाच्या रसांत उगाळून पापणी झडलेल्या जागीं लावावा. ( ३. ) **धातु पडत असल्यास**—टांकणखाराची लाही मासे ७ व खडीसाखर तोळे ७ हीं एकत्र करून तें चूर्ण रोज १ तोळा याप्रमाणें सात दिवस घ्यावें. ( ४. ) **बहुमूत्रावर**—टांकणखाराची लाही अदपाव पाण्यांत घालून प्यावी. ( ५. ) **मोडशी व ओकारी यांवर**—दुधांत टांकणखाराची लाही घालून द्यावी. ( ६. ) **चातुर्थ्यादि सर्व विषमज्वरांवर**—टांकणखाराची लाही दोन गुंजा विड्यांत द्यावी, ह्मणजे त्याचा रस जसजसा पोटांत जातो तसतसें हिंव तत्काल पळून जातें. ( ७. ) **जिभेला खरे पडले** किंवा **हिरडीला क्षत पडलें तर त्यास**—टांकणखाराची लाही मधांत कालवून लावावी. ( ८. ) **नखासंबंधीं मांस ठेंचल्यामुळें तें दुखत असल्यास** व **नखुर्ड्यावर**—नखाच्या बाजूनीं टांकणखाराचें चूर्ण पाण्याशीं युक्त लावावें. ( ९. ) **सोमल, बचनाग, कृत्रिमविषें** व **सर्पाचे विषावर**—तुपांत टांकणखाराची लाही २ मासे घालून द्यावी. जास्त विष पोटांत गेलें असल्यास त्या मानानें जास्त टांकणखार तुपांत घालून द्यावा. ( १०. ) **बेंबींत फोड आल्यास**—टांकणखार व मोरचूत यांची लाही मधांत खलून फोडावर लावावी. ( ११. ) **नारूवर**—गुळवेलीच्या रसांत टांकणखार प्यावा; अथवा हिंग व टांकणखार हे प्रत्येक तीन तीन मासे घेऊन चूर्ण करून सात रोज सांज सकाळ द्यावें. ( १२. ) **त्वग्दोषावर**—टांकणखार व गंधक उगाळून लावावा. ( १३. ) **तोंड आल्यास**—टांकणखाराची लाही पाण्यांत घालून गुळण्या कराव्या. ( १४. ) **गांधील माशी चावल्यास**—टांकणखार ह्मशीचे लोण्यांत कालवून लावावा.

## १९. तेल्या टांकणखार.

( १. ) **दमा** व **खोकला यांवर**—तेल्या टांकणखाराची लाही १ मासा, आल्याचा रस व खडीसाखर यांशीं द्यावी. ( २. ) **वांतीवर**—तेल्या टांकणखाराची लाही दुधांत किंवा मधांत द्यावी. ( ३. ) **प्रदर, गर्मी** व **मुळव्याध यांवर**—खडीसाखर ३ मासे व तेल्या टांकणखाराची लाही १ मासा एकत्र वांटून गाईच्या पावशेर दुधांत घालून नंतर त्यांत निंबूचा रस पिळून तें प्राशन करावें. याप्रमाणें ३ दिवस करावें.

## २०. तांबें. ( सं० ताम्र. )

**शोधन**—वांति, भ्रांति, ग्लानि, दाह, शूल, कंडू, रेच, वीर्यनाश, हे तांब्याचे आठ दोष आहेत याकरितां याचें शोधन केलें पाहिजे. ( १. ) गोमूत्रांमध्यें चिंच व मीठ घालून त्यामध्यें तांब्याचे पत्रे अग्नीवर प्रहरपर्यंत शिजवावे; ह्मणजे तांबें चांगलें शुद्ध होतें. ( २. ) तेल, ताक, गोमूत्र, कुळित्थाचा काढा, यांत शुद्ध झालेलें तांबें घेऊन, त्याचे आठ दोष जाण्याकरितां प्राज्ञ पुरुषांनीं विशेष शोधन सांगितलें आहे, तें असें.—निवडुंग, रुई यांचा चीक व मीठ, हे पदार्थ एकत्र खलून त्या कल्कानें तांब्याचे पत्र्यांस लेप करावा; आणि अग्नीवर तापवून निर्गुंडीचे रसांत तीन वेळा बुडवावें; किंवा निवडुंग व रुई यांचे चिकांत बुडवावें; ह्मणजे तांब्याची शुद्धि होते. **मारण**—( १. ) लहान लहान व ते फार पातळ असे तांब्याचे पत्रे करून त्यांना निंबाचे रसांत घालून, तीन दिवसपर्यंत हलका हलका अग्नि देऊन पचवावें; नंतर ते पत्रे बाहेर काढून, त्यांचे चतुर्थांश पारा घेऊन, दोहोंला खलांत घालून निंबाचे रसांत एक प्रहरपर्यंत खल करून, ते पत्रे खलांतून काढून, त्यांचे दुप्पट गंधक घेऊन, तो गंधक निंबाचे रसांत घोटून त्याचा त्या पत्र्यांना लेप करून एक गोळा करावा; नंतर मीनाक्षी अथवा चुका अथवा पुनर्नवा, ह्यातून एक वनस्पति घेऊन वाटून त्या गोळ्याचे भोंवतीं एक अंगुळप्रमाण लेप देऊन, मडक्यामध्यें तो गोळा ठेवून त्याजवर मातीचा शराव उपडा घालून, त्याजवर वाळू, मडक्याचे तोंडापर्यंत घालून नंतर राख व मीठ पाण्यांत कालवून, त्याची, मडक्याचे तोंडाला मुद्रा देऊन, तें मडकें चुलीवर ठेवून क्रमेंकरून हलका, मध्यम, मोठा याप्रमाणें चार प्रहर अग्नि देऊन थंड झाल्यावर तो गोळा बाहेर काढून सुरणाचे रसांत एक दिवसपर्यंत खलून त्याचा गोळा करून, त्याचे अर्धा गंधक घेऊन तुपांत वाटून त्याचा त्या गोळ्याला लेप करून, मातीचे दोन शराव आणून, त्या एकांत तो गोळा ठेवून त्याजवर दुसरा

शराव उपडा घालून कापडमाती करून रानगोंवऱ्यांचें गजपुट द्यावें. थंड झाल्यावर तो शरावसंपुट बाहेर काढून, त्यांतून ताम्रभस्म काढून घ्यावें. हें भस्म फार चांगलें गुण देणारें आहे. यापासून ओकारी, भ्रांति, ग्लानि व मूर्च्छा हीं कधींही होत नाहींत. ( २. ) पारा ·।। भाग, गंधक २ भाग, दुर्वीच्या रसांत खलून, तांब्याचे शुद्ध केलेले पत्रे १ भाग घेऊन त्यांना लेप करावा; आणि गजपुट द्यावें ह्मणजे भस्म होतें. ( ३. ) शुद्ध केलेल्या तांब्याचा चुरा घेऊन, समान भाग पाऱ्याशीं, जंबीररसांत मर्दन करावा; नंतर दोहोंचे समभाग गंधकांशीं खल करावा आणि १ गजपुट द्यावें ह्मणजे भस्म होतें. ( ४. ) पारा १, गंधक १, हरताल ·।·, मनशीळ अष्टमांश, हे पदार्थ एकत्र खलून बारीक कज्जली करावी; त्या कज्जलीनें ताम्रपत्रे १ भाग घेऊन त्यांला त्या कजलीचा पर्यायानें लेप करावा, आणि त्यांस वालुकायंत्रांत चार प्रहर पचन करावें. थंड झाल्यावर काढून घ्यावें. हें ताम्र, दररोज दोन वाल ज्या ज्या रोगावरच्या अनुपानाशीं द्यावें, त्या त्या रोगाचा नाश करितें; आणि परिणामशूल, उदर, शूल, पांडु, ज्वर, गुल्म, प्लीहा, क्षय, मंदाग्नि, श्वास, कास, संग्रहणी यांचा नाश करितें. याला सोमनाथी ताम्र ह्मणतात. **ताम्रभस्मपरीक्षा**—ताम्र, रंगानें मोराच्या कंठासारखें दिसतें व त्याचें चूर्ण सहज होतें व पारदाचा योग असल्यास चकचकीत दिसतें. ताम्रभस्म दह्यांत घातलें असतां दह्यांचा रंग कायम राहिला तर तें पक्कें आहे असें समजावें. **ताम्रगुण**—शुद्ध रीतीनें केलेलें ताम्र, कोड, प्लीहा, ज्वर, कफ, वायु, श्वास, कास, झांपड, शूल, कृमि, वांति, पांडु, मोह, अतिसार, मूळव्याध, गुल्म, क्षय, भ्रम, मस्तकव्याधि व मेह यांचा नाश करितें आणि अग्नीला वाढवितें. **अशुद्धताम्र**—संपूर्ण धातूंचा शोष, नानाप्रकारचे रोग, कांतिनाश, व कुष्ठ, विषमज्वर, वांति, रेच, संताप व अनेक व्याधींला सहाय करितें आणि प्राणनाश करितें. **त्रिविधताम्रगुण**—मोरचूत, कडव्या करंजाचे तेलांत एक दिवस ठेवून त्याचे चतुर्थांश टांकणखार देऊन मुशींत घालून भात्यानें फुंकावें; किंवा मनुष्याचे निळे केश मिळवून फुंकावें; ह्मणजे रक्तासारखें लाल तांबें निघतें. याचप्रमाणें गांडुळांचेंही सत्व निघतें. मोरचूत किंवा तांबें यांच्या सत्वाची रविवारीं आंगठी करावी, आणि ती पाण्यांत बुचकळून तें पाणी प्यावयास द्यावें; ह्मणजे तत्काळ विषनाश होतो व अडलेल्या बाळंतिणीची सुटका लवकर होते. तसेंच हात धुऊन हातांचा स्नेह, “ रामवत्सोमसेनानी मुद्रितेति तथाक्षरं ॥ हिमालयोत्तरे पार्श्वे स्वकर्णश्च

मरुद्रुमः ॥ तत्र शूलं समुत्पन्नं तत्रैव विलयं गतः ॥" या मंत्रानें मंत्रविला असतां मोठा शूळ, त्रिदोषाची पीडा, भूतबाधा, ग्रहबाधा, यांचा नाश होतो; आणि सद्यः स्त्रीला प्रसूत करितें; व्रणाला भरून काढतें व नेत्रांमध्यें घातलें असतां हित होतें; असें पूर्वीं भालुकीनें सांगितलें आहे. **मयूरपिच्छादिकांपासून ताम्रोत्पत्ति**—मयूराचीं पिसें घेऊन शेळीच्या तुपाशीं भाजावीं; आणि गूळ, गुग्गुळ, मासे, लोंकर, टांकणखार, सज्जीखार, मध, गुंज, पिंपळी, लाख व तूप हीं एकत्र मिळवून अंधमुषेंत घालून फुंकावें; ह्मणजे मयूरपिच्छ व भूनाग ( गांडूळ ) यांचें ताम्र उत्पन्न होतें. तसेंच लहान गांडूळ घेऊन गोमयाशीं पिंड करून मुषेंत घालून फुंकिलें असतां तांबें उत्पन्न होतें. **भूनाग व मयूरपिच्छ यांच्या सत्वाचे गुण**—शीत; व संपूर्ण कुष्टें, व्रण, स्थावरजंगम विषें, विष यांचा नाश करितें व पारदाशीं योग केला असतां तो अग्नींत राहतो. **ताम्रभस्माचीं अनुपानें**—हें १ गुंज नित्य घ्यावें. १ श्वासकासास मधपिंपळींत. २ पित्तास साखरेशीं. ३ विषमज्वरास मिरीं व तुळशीचा रस यांशीं. ४ वातगुल्मास हिंगाशीं. ५ उदररोगास गुग्गुलाशीं ७ दिवस द्यावें. ६ मूत्रकृच्छ्रास हळद मध यांशीं. ७ मूतखड्यास जवखाराशीं. ८ मूळव्याधीस सुरणाचे रसांत मिरीं व लवंग यांचें चूर्ण घालून त्यांशीं द्यावें. ९ संग्रहणी व वातप्रमेहास गुळवेलीचें सत्व, ओंवा, साखर व मध यांशीं. १० पुष्टतेस मध, साखर व तूप यांशीं. यावर **पथ्य**—आंबट, तेलकट हें वर्ज्य करावें.

## २१. तुरटी. ( सं. तुवरी, स्फाटिका. )

तुरटी ही सौराष्ट्रदेशाचे अरण्यांतील मृत्तिका आहे. ही वस्त्रादिकांला लाविली असतां लाल डाग पडतो. ही पारदबंधक आहे. औषधांत हिची लाही करून घ्यावी. **तुरटी**—तिखट, कडू, तुरट, उष्ण, खारट, लेखन, आंबट, ग्राहक, नेत्रांला हित, पारदरंजक, केश्य, कंठ्य, व्रणनाशक, योनिसंकोचकारक; व विषूची, पांढरें कोड, नेत्ररोग, त्रिदोषकुष्ठ, पित्त, वांति, विसर्प व ताप यांचा नाश करिते. ( १. ) **मुखरोगावर**—तुरटीची लाही करून ती पाण्यांत घालून त्याच्या गुळण्या कराव्या. ( २. ) **कानांतून पू वाहतो त्यास**—तुरटीच्या लाहीच्या पाण्याची पिचकारी द्यावी, अ० लाहीचें वस्त्रगाळ चूर्ण कानांत घालावें. ( ३. ) **सर्पाचे विषारावर**—तुरटीचा खडा डोळ्यांत फिरवावा, अ० अर्धतोळा तुरटी पाण्यांत वाटून घ्यावी. (४.) **गर्मीचे चट्ट्यांस**—तुरटीची लाही करून चट्ट्यांवर लावावी ( ५. ) **गर्मीचे चट्ट्यांस**—तुरटीची लाही करून ती पाण्यांत विरघळून

त्यांत कात घालून पिचकारी द्यावी. (६.) **अग्निदग्धव्रणावर**—तुरटीच्या पाण्याची पट्टी लावावी. (७.) **विंचू चावल्यास**—तुरटीचा खडा दिव्यावर तापवून रस होऊं लागला ह्मणजे लागलीच जेथें चावला असेल तेथें लावावा; ह्मणजे त्वरित वेग शमतात. (८.) **गर्भिणीच्या स्तनाच्या बोंडाचा दाह होत असल्यास**—तुरटीचें पाणी करून त्या पाण्यानें स्तनांचीं बोंडें धुवावीं. (९.) **योनिदाहावर**—तुरटीच्या पाण्याची पिचकारी मारावी. (१०.) **डोळ्यांतून पाणी गळतें व त्यास चिकटा आल्यास**—दोन गुंजा तुरटीच्या लाहीची वस्त्रगाळ पूड, सव्वा तोळा पाण्यांत टाकून, तें सकाळसंध्याकाळ पिसानें डोळ्यांत घालावें. (११.) **दांतांतून रक्तस्राव होत असल्यास व दाढ दुखते त्यास**—तुरटीच्या लाहीची पूड, मध व तुपांत कालवून हिरड्यांस दिवसांतून २।३ वेळ लावावी. (१२.) **प्रमेहावर**—तुरटीची लाही १ गुंज घेऊन २॥ तोळे त्रिफळ्याच्या काढ्याच्या पाण्यांत वितळवून त्याची पिचकारी मारावी. (१३.) **नारूवर**—नारळाचे अर्धशेर पाण्यांत तुरटीची लाही १ मासा घालून घ्यावी; अ० तुरटीची लाही गुळांतून खावी. (१४.) **कफक्षय, कास, श्वास यांवर**—तुरटीची लाही मधांत द्यावी. (१५.) **अफूवर**—तुरटी व सरक्या एकत्र वाटून खाव्या. (१६). **प्रमेहावर**—तुरटीची लाही, प्रकृत्यनुमान पाहून योग्य प्रमाणानें दुधांत खडीसाखर घालून त्याशीं द्यावी. यानें उलट्या होतील.

## २२. दगडी पाषाणभेद. (सं. पाषाणभेद.)

हा एक दगडाचा भेद आहे. हा जिभेस लावला असतां चिकटतो. यास "पखाणभेद" असेंही ह्मणतात. यांत पांढरा व तांबडा अशा दोन जाति आहेत. **पाषाणभेद**—हिम, स्वादु, उष्ण; व मेह, मूत्ररोध, अश्मरी, शूल, पित्त व क्षय यांचा नाशक आहे. (१.) **प्रदर व प्रमेहावर**—३ मासे पाषाणभेदाचें चूर्ण मधांत द्यावें. (२.) **गर्मीनें शिश्न सुजल्यास**—पाषाणभेद, मनशील, मुरदाडशिंग व थोडें मोरचूत पाण्यांत उगाळून लेप द्यावा. (३.) **कंबरदुखी, अस्थिभंग, खोकला, व्रण, व धातुपुष्टीवर**—पाषाणभेद गाईच्या दुधांतून खावा. (४.) **बदावर**—बिब्बा व पाषाणभेद यांचा लेप करावा. (५.) **प्रदरावर**—पाषाणभेद व शंखजिरें यांचें चूर्ण तूपसाखरेंतून खावें.

## २३. नवसागर. (सं. नवसार.)

नवसागराची क्षारांत गणना आहे. हा मनुष्याच्या विष्ठेपासून व मूत्रा-

पासून तयार होतो; तसाच अन्य प्रकारानेंही तयार होतो. हा पांढरा सफेत असून रेषामय असतो. हा रुचीनें खारट आहे. **नवसागर**—अति उग्र, तीक्ष्ण, सारक व नेत्रांना हितावह असा आहे; आणि गुल्म, उदर, विष्टंभ, शूल, गुल्मशोष, मांसाजीर्ण व त्रिदोष यांचा नाश करितो. ( १. ) **मूर्च्छा, मस्तकशूल, पडसें, उन्माद व विंचवाचे विषावर**—नवसागर व चुन्याची कळी एका शिशींत भरून तिचें तोंड बंद करून ठेवावें व त्या शिशीचें तोंड उघडून ती हुंगावी. (२.) **हिराकसाचे विषास व कांचेची पूड अन्नांत घातल्यास**—नवसागर उगाळून द्यावा. (३.) **नारूवर**—नवसागराची भुकटी करून ती अर्धाटांक तुपांत घालून द्यावी. ( ४. ) **अपस्मारावर**—नवसागर निंबाच्या रसांत खलून त्याचें नस्य द्यावें. ( ५. ) **यकृत् व पाणथरीवर**—मासा अगर दोन मासे नवसागर ४ तोळे थंड पाण्यांत वितळवून तें पाणी प्यावें, ह्मणजे हे रोग त्वरित दूर होतात. ( ६. ) **शूळावर**—नवसागर गुळांत द्यावा. ( ७. ) **काच, माती, गेरू** इत्यादिकांचे विषावर—नवसागर भक्षण करावा.

## २४. पाणीशोक.

ही एक दगडाची जात आहे. याचा वर्ण पांढरका असतो. हा जिभेस चिकटतो. ( १ ) **व्रणांत पाणी फार येत असल्यास**—पाणीशोक लावावा.

## २५. पादेलोण. ( सं० सौवर्चल. )

यास " संचळ " असेंही ह्मणतात. हें जमिनींत सांपडतें. याचा रंग तांबूस असतो. **पादेलोण**—रेचक, खारट, तिखट, लघु, अपित्तल, भेदक, रुचिकर, अग्निदीपन, पाचक, विशद, उष्ण, सूक्ष्म, स्निग्ध, सुगंधि, उद्गारशुद्धिकारक, तीक्ष्ण, मलस्तंभक, शूलनाशक; व जंतु, ऊर्ध्ववात, गुल्म, आम, शूल, आनाह, अरोचक यांचा नाश करितें. ( १. ) **अजीर्णावर**—आलें व निंबूरस यांत पादेलोण द्यावें. ( २. ) **शूलावर**—पादेलोण तुपांत द्यावें. ( ३. ) **मलशुद्धीवर**—पादेलोण ओंव्यांत द्यावें, अ० ओंवा सुंठ यांशीं द्यावें.

## २६. पापडखार.

पापडखाराची उत्पत्ति सिंध व कच्छ या देशांत होते. याचा रंग पांढरका असतो. **पापडखार** हा गुणांनीं जवखारासारखा आहे. ( १. ) **नारूवर**—पापडखाराचें चूर्ण ३ मासे अर्धपाव दह्यांतून घ्यावें. याप्रमाणें दिवसांतून तीनचार वेळ घ्यावें. दिवसास भोजन करूं नये. रात्रौ भोजन

करावें. याप्रमाणें एक दिवस करावें. ( २. ) **मुलांचे ससणीवर**—गुळांत चण्याचे डाळिंबीहून कमी पापडखार घालून, त्यांत थोडेंसें अंगदूध घालून पाजावें. ओकारी होईल. हें औषध दोन तीन महिन्यांचे मुलास देऊं नये. ( ३. ) **डब्यावर**—एक तोळाभर पापडखार, एक मोठें वांगें, अशीं कल्हईचे भांड्यांत शिजवून त्याचा गोमूत्रांत खल करून त्यांतून दोन वाल घेऊन गुळाचे पाण्यांत पाजीत जावें. (४.) **पोटदुखीस**—लिंबाचे रसांत पापडखार वाल किंवा दोन वाल घालून खावा. ( ५. ) **गंडमाळा व इसबरोगावर**—पापडखार व कळीचा चुना एकत्र उगाळून लेप द्यावा. यानें नूतन झालेला विकार लौकर दूर होतो. ( ६. ) **गुडघीवर**—पापडखार व कळीचा चुना एकत्र करून सुपारीएवढ्या चार गोळ्या करून, त्या गुडघ्याच्या ४ डोळ्यांवर बांधून त्यावर एक तासपर्यंत पाणी थेंबथेंब टाकावें. नंतर तें काढून एरंडाचे पानास एरंडेल लावून तें बांधावें.

## २७. पारा. ( सं० पारद. )

पारा खाणींत सांपडतो. पाऱ्यामध्यें शिसें, वंग, मल, अग्नि, चांचल्य व विष हे असह्य दोष स्वभावतःच राहतात. त्यांमध्यें—जाड्य, अंगावर गंड हे शिशाचे; कुष्ठ वंगाचा; रज मलाचा; दाह अग्नीचा; नाश, विष हे चांचल्याचे, आणि मरण विषाचा दोष; असे उत्पन्न होतात. पाऱ्यांत हे असह्य दोष आहेत, याजकरितां त्याचें शोधन अवश्य झालें पाहिजे. तसेंच पारदामध्यें औपाधिक सप्तकंचुक आहेत. **शोधन**—पारदाची शुद्धि करण्यास मुख्य आठ संस्कार सांगितले आहेत तेः—स्वेदन, मर्दन, मूर्च्छन, उत्थापन, पातन, बोधन, नियमन, संदीपन. अनेक जातींचीं धान्यें घेऊन सडून कोंडा काढून पाण्यांत घालून मातीच्या भांड्यांत भरून आंबट होईपर्यंत तसेंच ठेवावें आणि त्यांत तांदुळजा, मुंडी, विष्णुक्रांता, पुनर्नवा, मत्स्याक्षी, थोर मुंगुसवेल, महाबला, शतावरी, त्रिफला, गोकर्णी, हंसपादी, चित्रक, या यथालाभ वनस्पतीचें पंचांग चूर्ण करून त्या धान्याम्लामध्यें टाकावें. हें धान्याम्ल पारदाच्या स्वेदनादि क्रियांचे ठायीं योजावें अथवा याच्या अभावीं अत्यंत आंबट कांजी योजावी. **पारदस्वेदन**—सुंठ, मिरीं, पिंपळी, मीठ, मोहऱ्या, हळद, त्रिफळा, आलें, चिकणा, तुपकड्या, तांदुळजा, पुनर्नवा, मेढशिंगी, चित्रक व नवसागर हीं सर्व पारदाच्या षोडशांश प्रत्येक घ्यावी; किंवा यथालाभ घेऊन धान्याम्लामध्यें वाटावीं, आणि त्या कल्कानें वस्त्रावर अंगुळभर जाड लेप करावा, नंतर त्यांत पारा बांधून धान्याम्लामध्यें दोलायंत्र करून एक दिवस शिजवावा ह्मणजे स्वेदित होतो. **मर्दन**—लाल

विटकरीचें चूर्ण, हळद, घेरोसा, कांबळ्याची राख व निंबाचा रस यांत पारा तीन दिवस मर्दन करावा ह्मणजे निर्मळ होतो. तो वस्त्रांत बांधून कांजीनें धुवून घ्यावा. **मूर्च्छन**—पारदाच्या मळाला कोरफड नाश करितें,आणि त्रिफळा दाहनाश करिते व चित्रकाचें मूळ विषनाश करितें. याकरितां प्रयत्नानें मिश्रित पारा, एकेकाचे रसांत सात सात वेळ मर्दन करावा ह्मणजे मूर्च्छित होतो. याप्रमाणें मूर्च्छित पारा दोषशून्य होतो. **कंचुकनिर्मोक**—पारा, कोरफड, चित्रक, लाल मोहऱ्या, रिंगणी व त्रिफळा यांचा काढा करून, त्यांत तीन दिवस मर्दन करावा; ह्मणजे सप्तकंचुकांपासून मुक्त होतो. **उत्थापन**—पारा निंब्रांचे रसांत घालून उन्हामध्यें ठेवून घोंटावा, आणि सुकल्यानंतर डमरूयंत्रांत ऊर्ध्वपातन करून घ्यावा. **ऊर्ध्वपातन**—तीन भाग पारा व एक भाग राईचें चूर्ण हीं किंचित् निंबूचा रस घालून गोळा होईपर्यंत घोंटावीं, आणि डमरूयंत्रांत चार प्रहर मध्यमाग्नि द्यावा, व युक्तीनें वरच्या भांड्याला लागलेला पारा काढून घ्यावा. **अधःपातन**—पारा, त्रिफळा, चित्रक, शेवगा, मीठ व मोहऱ्या हीं सर्व एकत्र करून खल करावा. पारा त्यांत मिळाल्यावर डमरूयंत्रांचीं दोन पात्रें घेऊन वरच्या पात्राला त्याचा लेप करावा; खालचे भांड्यांत पाणी ठेवावें आणि संधिलेप करून जमिनींत पुरावें व वर अग्नि करावा; ह्मणजे पारा खालच्या पात्रांत पाण्यांत जमतो. **तीर्यक्पातन**—दोन सोरकुल्यासारखीं मडकीं घेऊन एकांत पारा व एकांत पाणी घालून आडवीं धरून जोडावीं आणि संधिलेप करून, पारा घातलेल्या मडक्याला चुलीवर आडवें युक्तीनें ठेवून त्याखालीं अग्नि द्यावा, ह्मणजे पारा उदकांत प्रवेश करितो. **बोधन**—पूर्वोक्त प्रकारांनीं शोधित पारा षंढ होतो, याकरितां त्याची शक्ति वाढण्याकरितां भूर्जपत्रें, सैंधव व पाणी यांशीं पचन करावा. **नियमन**—थोर मुंगुसवेल ( सर्पाक्षी ), चिंच, वांझ कर्टोली, माका, नागरमोथे, धोतरा यांच्या रसांत किंवा काढ्यांत एक दिवस मंदाग्नीवर पचन केला असतां नियमानें स्थिर होतो. **संदीपन**—हिराकस व पंचलवणें घेऊन त्यांवर वारंवार निंबाचा रस घालावा; नंतर सैंधवाच्या खड्याला कोरून, त्यांत सैंधवयुक्त पारा घालून त्यावर पूर्वोक्त सैंधव व निंबू लावून त्यावर आठ अंगुळें धूळ लावावी; नंतर मोहऱ्या, मिरीं, शेवगा व कडू शेवगा यांचें बीज, टांकणखार हीं एकत्र वाटून कांजीस लावून त्या कांजीमध्यें दोलायंत्रानें तीन दिवस पचन करावा, ह्मणजे त्या पाऱ्याचें जारणसंस्कारामध्यें दीपन होतें. **अनुवासन**—दीपन केलेला पारा मृत्पात्रांत किंवा दगडाचे पात्रांत

निंबाच्या रसांत घालून एक दिवस उन्हांत ठेवावा. **मुखोत्पत्ति**–( १. ) वज्रीच्या ( वईनिवडुंगाच्या ) कांड्यांत तीन दिवस पारा घालून ठेवावा ह्मणजे त्याला मुख होतें. तो गंधक, सुवर्ण व अभ्रकसत्व यांना क्षणांत भक्षण करितो. ( २ ) रुई, निवडुंग, धोतरा, कळलावी, कण्हेर, गुंज, अफीण हीं सात उपविषें जाणावीं. यांमधून एकेकाला घेऊन पाऱ्याशीं सात दिवस खलून पारा धुवावा. नंतर दुसऱ्याशीं सात दिवस खलून धुवावा. असा वेगळा वेगळा सर्वांशीं खलून धुवावा. तेणेंकरून पाऱ्याचें पक्षच्छेदन होतें, ह्मणजे उडून जात नाहीं व त्याला मुख फुटून तो स्वर्णादि धातूंना ग्रासितो.(३) मृगकिडे ( बीरबरोटी ) आणून त्यांशीं निंबाचा रस व सैंधव एका जागीं करून पाऱ्याचा तीन दिवस खल करावा; ह्मणजे पाऱ्याला मुख फुटतें. **जारण**–पाऱ्याची शक्ति वाढण्याकरितां गंधकादिक पदार्थ पाऱ्यांत पचविणें या क्रियेस जारण ह्मणतात. षड्गुणगंधकजारणावांचून हा पारा रोगहरण करण्याविषयीं समर्थ होत नाहीं. जर पाऱ्यापासून मोठ्या फळाची इच्छा करितात, तर सुवर्ण व गंधकजारणावांचून अभ्रकसत्वजारण करूं नये. पारदाच्या समानभाग गंधक जारण केलें असतां, गुणांनीं शुद्धाहून शतपट अधिक होतो. द्विगुणगंधकजारणानें संपूर्ण कुष्ठांचा नाश करितो. त्रिगुणगंधकजारणानें संपूर्ण जाड्य नाश करितो. चतुर्गुणगंधकजारणानें वलीपलित नाश करितो. पंचगुणगंधकजारणानें क्षय नाश होतो. षड्गुणगंधकजारणानें संपूर्ण रोगहारक होतो. पारा, षड्गुणगंधकजारणाहून अभ्रकसत्व समभाग जीर्ण केलें असतां शतगुण अधिक होतो; आणि स्वर्णमाक्षिक, कलखापरी, इत्यादिकांनीं जीर्ण केला असतां गुणप्रद होतो; सुवर्ण जीर्ण केलें असतां एक हजार गुण देणारा होतो; आणि हीरकादि जीर्ण पाऱ्याचे गुण स्वतः शिवच जाणतो. **सिंदूरादिजारण**–पारा आणि सहापट गंधक एकत्र खलून वालुकायंत्रांत कुपींत घालून हळू हळू पचन करून जसा गंधक जळून जाईल या रीतीनें वारंवार षड्गुणगंधकजारण करावा, ह्मणजे सिंदूरादिकासारखा पारा होतो. **षड्गुणगंधकजारण**–मातीचे कुंडांत पाणी घालून त्यांत शराव ठेवावा आणि सर्व कुंडावर ढांकण ठेवण्याकरितां मध्यें त्या कुंडाला मेखला असावी. त्या मेखलेचा मध्य लिंपून शरावांत पारा घालून त्यावर गंधक घालावा. वर ढांकण देऊन चार रानगोंवऱ्यांचा अग्नि द्यावा. ( या यंत्रास कच्छपयंत्र ह्मणतात. ) याप्रमाणें पुनः पुनः षड्गुणगंधकजारण झालें ह्मणजे पारा तीक्ष्ण अग्नीसारखा होतो, आणि सर्व कार्य करितो. **वडवानलबीड**–शंखाचें चूर्ण रुईच्या चिकांत घालून

तीन दिवस उन्हांत ठेवावें. तसेंच निंबाच्या रसांत तीन दिवस उन्हांत ठेवावें,व एक दिवस धूमसार ( घेरोसा ) घालून उन्हांत ठेवावें, आणि संचळ व शेळीचें मूत्र याची चार प्रहर भावना द्यावी. तसाच अंतर्जिव्हारहित जेपाळ व शेवग्याचें मूळ यांचे रसाची एक भावना द्यावी; आणि टांकणखार व गुंज यांची एक दिवस भावना देऊन नंतर शेवग्याच्या मुळांच्या रसांत एक दिवस भावना द्यावी. संपूर्ण समभाग घेऊन निंबाच्या रसांत खलावें, आणि एकीकडे नीट कुपींत राखून ठेवावें. याचें नांव वैश्वानरबीड. या वैश्वानरबीडाशीं तप्तखलामध्यें पारा घोंटिला असतां, सुवर्णादि सर्व लोहांना क्षणांत ग्रास करितो. भूमीवर खळी करून त्यांत शेळीच्या लेंड्या घालून अग्नि करून, त्यावर खल ठेवून आंत औषध घालून खलतात, त्याला तप्तखल ह्मणतात. **हिंगुळांतून पारा काढावयाची कृति**—निंबाचे रसांत किंवा निंबाचे पानांचे रसांत हिंगूळ एक प्रहर खलून डमरूयंत्रांत घालून, खालीं चार प्रहर अग्नि द्यावा; ह्मणजे त्यांतील पारा वरती जाऊन जमतो तो शुद्ध जाणावा. त्याला संपूर्ण कामांत योजावा. **पारदबंधन**—( १. ) पारा, केळीच्या कांद्याचा रस, रुई, निवडुंग, बकाणनिंब, कंचुकशाक, नागरमोथे, गोमूत्र, मनुष्याचें दूध, मत्स्याक्षी व कावळी ( काकमाचिका ) यांचे चिकांत व रसांत घोंटिला असतां पुनः उठत नाहीं. **खेचरीगुटी**—तीन टांक शुद्ध पारा घेऊन काळ्या धोत्र्याच्या बियांच्या ८ तोळे तेलांत सात दिवस खलावा; कीं जोंपर्यंत त्याचें जलौकारूप होईल. नंतर उडदाचे पिठांत त्याची वात करून चांगले सुतळीनें बांधून उन्हांत सुकवावी, व रावणाच्या मतें शिरसेलांत तेल जळे तों पचन करावी; आणि उतरून शीतळ जाग्यांत ठेवावी. शांत झाल्यावर ती काढून घ्यावी. ती दुधानें भरलेल्या भांड्यांत सोडावी. जर संपूर्ण दूध सुकवून गुटिका राहील तर ती घेऊन बर्कराच्या ( पशूच्या ) मुखांत घालावी, ह्मणजे त्याच्या अंगाची आग होऊन तो मरतो, व ही गुटी जो मुखांत धरील त्याला काम व्याकुळ करील; त्याची देहावर अवस्था राहणार नाहीं. जर ही गुटी पोटांत उतरली तर तो मरेल. ती गोळी तोंडांत धरिली असतां शंभर योजनें जाण्याची शक्ति येते, व शंभर स्त्रियांशीं गमन करण्याची शक्ति येते. ही वीर्यस्तंभ करणारी आहे. ही मुखांत एक प्रहर ठेविली असतां मुखरोग, व आणखी मुख व दंत यांना उपद्रव करणारे, व जिव्हा, तालु, कंठरोग, उपजिव्हा, अधिजिव्हा, हृद्रोग व पीनस इत्यादिकांला ही गुटी नाश करिते. **अन्य गुटिका**—पारा धोत्र्याचे तेलांत सात दिवस मर्दन करावा ह्मणजे विषनाश होतो; नंतर गंधक तीन भाग घेऊन धोत्र्याचे

तेलांत खलून त्याची मूस करावी; त्यांत तो पारा ठेवून मुख बंद करावें. नंतर सात मातकापडें करून तो गोळा सुकवावा. पुनः मृत्तिकापटानें सात वेळ गुंडाळून बाहेरून शेणानें लिंपून त्या गोळ्याची पूजा करावी, आणि तीन हात खाडा करून त्यांत गोंवऱ्या घालून त्यांत गोळा ठेवून पुट द्यावें. शीत झाल्यावर काढावा आणि त्यांतील गुटिका कौतुक दाखविणारी घ्यावी. ती रोग्याच्या मुखांत धरावयास दिली असतां शोकनाश होतो; आणि सुख होतें. जोंपर्यंत ही गुटी मुखांत आहे तों पर्यंत वीर्यपात होत नाहीं.

**अन्य पारदबंधन**—पारद बांधण्याविषयीं औषधींचें वीर्य अचिंत्य आहे. ह्मणून क्रिया, मंत्र व विधान यांणीं सबीज पारा बांधिला जातो, त्या—वल्ली, तृण, गुल्म, लता, वल्ली, वृक्ष आणि वनस्पती अशा सहा प्रकारच्या आहेत. काकचंडेश्वर ग्रंथांत पारदबंधक ६४ वल्ली सांगितल्या आहेत; त्या येणें-प्रमाणें:—१ जी वल्ली पांढऱ्या व तांबड्या कंदाची मिळून दोन प्रकारची; जिला शुक्लपक्षीं पंधरा पानें येतात व कृष्णपक्षीं तीं गळून जातात, तिला **सोमवल्ली** ह्मणतात. ती पूर्णिमेस पारदबंधनाविषयीं किंवा रसायनाविषयीं घ्यावी. २ जलपद्मिनीसारखी वनामध्यें होणारी **स्थलपद्मिनी**. ३ जिचें अंग मंडलांनीं चित्रित असतें व जी अजगरासारखी दिसते व जी रस-भरित असून पानें थोडीं असतात ती **अजगरी**. ४ जी वेल घणसा-सारखी रसभरित असून अल्प पानांची, तिला **घणसकांडें** ( घोनशी ) असें ह्मणतात-ती पारदबंधन करणारी आहे. ५ जिचा आकार डुकरासारखा असून पारदाला बांधिते ती **त्रिजटा**. ६ **ईश्वरी** किंवा **शिवलिंगी**-इचा रस लाल आहे व ही लोकांमध्यें प्रसिद्ध आहे. ७ **भूतकेशी**-इचीं पानें लिंबासारखीं आहेत. ८ जिचें मूळ काळें असून जिला चीक फार ती **कृष्णवल्ली**. ती पार-दाला बंधन करिते. ९ जिच्या खालची जमीन सर्वदा भिजलेली असते, तिला **रुदंती** किंवा **स्रवंती** ह्मणतात. १० जिचीं पानें निवडुंगासारखीं असून चिकाळ असते, व जी वानरांला प्रिय असून कोठें कोठें दगडाखालीं होते तिला **सर्वरा** ह्मणतात. ११ जिच्या कांद्यावर केश असून वेलाला पानें येतात तीस **वाराही** किंवा **डुकरकंद** ह्मणतात. १२ जिला चीक असून वेल असते व तिचीं पानें अश्वत्थासारखीं असतात, तिला **अश्वत्थपत्री** ह्मणतात. १३ जी आंवट असून फार पसरत नाहीं, तिला **आम्लपत्री** ह्मणतात. १४ जिच्या पानांला गंध असून चीक येतो तिला **चकोरनासा** ह्मणतात. १५ जी वेल असून पानें अशोकवृक्षासारखीं असतात व चि-काळ असते, तिला **अशोकनाम्नी** ह्मणतात. १६ जिचीं पानें उंडिणी-

सारखीं असून सुगंधि असतात व जिला चीक येतो ती **पुन्नागपत्रिका.** १७ जी सर्पासारखी व सचीक असून वृक्षावर होते व जिच्याजवळ बहुश: सर्प राहतात तिला **नागिनी** ह्मणतात. १८ छत्राकार, सचीक व जिच्या मुळांत एकच कंद असतो अशी जी वेल, तिला **क्षेत्री** ह्मणतात. ती पारा बांधण्याविषयीं महा प्रबळ आहे. १९ जिचा चीक पिंवळा, जी फार उंच नसून गुल्म–जातीची, व जिचीं पानें नांदुरखीसारखीं असतात, तीस **संवीर** ह्मणतात. ती मूल, चीक, फल, पुष्प यांणीं पाऱ्याला क्षणांत बंधन करिते. २० जिचीं पानें वाळकासारखीं असून चीक पिंवळा, व जी कोमल असते, ती **देविलता.** हिचा पाला पारदबंधन करण्याविषयीं महौषधी आहे. २१ जिचीं पानें निवडुंगासारखीं असून चिकाळ असते, तिला **वज्रवल्ली** ह्मणतात. २२ तांबडा व काळा असा दोन जातींचा **चित्रक** आहे. त्यांतून काळा चित्रक गुप्त आहे. हा दुधांत घातला असतां दूध कृष्णवर्ण करितो. असे दोन जातींचे चित्रक पारद बांधण्याविषयीं समर्थ आहेत. २३ जी डोंगरावर होते व जिचीं फुलें कृष्णवर्ण असून शोभिवंत नसतात व तीवर थोडीं फळेंही येतात, ती **कालपर्णी.** २४ जिचीं पानें पळसासारखीं असून कांद्यांतून पिंवळा चीक येतो, ती **पालाशतिलका.** २५ जी निळ्या कमळासारखी असून पर्वतावर होते, ती **नीलोत्पली.** २६ जिचीं पानें हिरवीं असून चीक पिंवळा असतो, व जिचा कंद कुमारीकंदासारखा असतो, तिला **रजनी** ह्मणतात. २७ जिचीं कुळत्थासारखीं पानें, व फुलें पांढरीं आणि कंदाला डीक येतो ती **सिंहिका.** २८ ज्या वल्लीस चार पानें असतात व जिचा डीक स्नेहयुक्त असतो, आणि तिचा कंद आकारानें हस्तिदंतासारखा असतो, व जासवंदीसारखें फूल येतें व जी पर्वतावर उत्पन्न होते, व जिच्या कांद्यांतून दूध येतें आणि जिचीं पानें गाईच्या कानासारखीं असतात, ती **गोष्ठांगी.** २९ जिला तीन फळें येतात व तांबडे ठिपके असतात, व जिचीं पानें हिरवीं असून रस तांबडा निघतो, तिला **खदिरपत्री** असें ह्मणतात. ३० ज्या तृणांचीं मुळें रात्रीं चकाकतात व तेणेंकरून पर्वत पेटलासा वाटतो तीं **तृणें** पारदबंधक आहेत. ३१ जी पसरट वेल असून लाल असते, तिला **रक्तवल्ली** ह्मणतात. ३२ जिच्या कंदाला डीक येतो, ती **ब्रह्मदंडी,** पारदबंधन करण्यास श्रेष्ठ आहे. ३३ जिला पानें नसून मधासारखा वास येतो ती **मधुतृष्णा.** ३४ जिचा कंद कमलकंदासारखा व चीक येणारा, ती **पद्मकंदा.** ३५. जी सचीक असून काष्ठ पिंवळें आणि फुलेंही पिंवळीं, ती **हेमदंडी.** ३६ जी लाल वेल असून

पानें चिंचेच्या पानांसारखीं, ती **विजया.** ३७ जी पांढरी असून पसरट व सचीक असून आढकीच्या पानांसारखीं जिचीं पानें असतात ती **अजया.** ३८ जिचीं पानें त्रिकोणाकृति असून चित्रवर्ण असतास, व जी वेल आहे, आणि जिचा रस तिखट व कडू असतो, ती **जया.** ३९ जिला चंदनासारखा सुगंध येऊन पानें मोराच्या गळ्याच्या रंगाचीं असतात तिला **नली** ह्मणतात. ४० जी सचीक असून जिचीं मूळें कडू व लोण्यासारखीं गंधि, आणि फुलें आरक्त असतात, ती **श्री.** ही त्रिलोहांमध्यें वेष्टन करून मुखांत धरावी. ४१ जी वेल सचीक असते आणि पानें शेवग्याच्या पानांसारखीं असतात, ती **कीटभारी.** ४२ वृक्षावर चढणारी, सचीक असून पांढऱ्या भोंपळीसारखी असते, ती **तुंबिका.** ४३ जी सचीक असून भूमिगर्भासारखी असते, तिला **कडुतुंबी** ह्मणतात. ४४ **मयूरशिखा**—ही पारदाला बंधन करणारी आहे. ४५ जिचीं मुळ्यासारखीं पानें, जी पिंवळी असून चीक लाल येतो व फुलें पिंवळीं असतात, ती **हेमलता.** ४६ जिचीं पानें पांढऱ्या एरंडासारखीं असतात व फुलें तुंबिकेसारखीं असतात, ती **असुरी.** ४७ जी वेल असून पानें सातविणासारखीं असतात ती **सप्तपर्णी.** ४८ जिचीं पानें तरवारीसारखीं असून चीक येतो ती **गोमारी.** ४९ **पीतक्षीरा,** ही दिव्य असून पारदाला बंधन करिते. ५० जी, वेल असून त्रिकाळ असते, ती **व्याघ्रपादलता.** ५१ जी कोथिंबिरीसारखी असून त्रिकाळ असते व फुलें पिंवळीं येतात; ती **धनुर्वल्ली.** ५२ जी फार न पसरणारी, महावीर्यवान्, दिव्य औषधी आहे, तिला **त्रिशूली** ह्मणतात. ५३ जी, वेल असून पानें तीन तीन आणि लाल असतात; ती **त्रिदंडी.** ५४ जी चीक येणारी असून फुलें पिंवळीं येतात, आणि आकार शिंगासारखा, ती **शृंगा** जाणावी. ५५ जी चिकाळ असून मिऱ्यांसारखे कांटे येतात, आणि जिला मुळाशीं कंद असतो, ती **वज्रनामवल्ली.** ५६ जी अंगानें पांढरी असून पानें लाल असतात, ती दिव्य औषधी आहे. तिला **महावल्ली** ह्मणतात. ५७ जिचीं पानें व फुलें कण्हेरीसारखीं आणि कंद लाल असतो, ती **रक्तकंदवती.** ५८ जिचा चीक पेजेसारखा असून कांदा मस्तकावर पिंवळा असतो, व जिचा चीक फार व लाल असतो; आणि पानें वेलासारखीं असतात, ती **बिल्वदला.** ५९ जी बिल्वदलेसारखी असून पारदबंधन करणारी आहे, तिला **रोहिणी** असें ह्मणतात. ६० जी, वेल असून चिकाळ असते, व जिचीं पानें रात्रीं सतेज दिसतात; ती **बिल्वंतकी.** ६१ जिचा चीक व डांग गोरोचनासारखीं असतात, तिला **गोरोचना**

ह्मणतात. ६२ जी लहान असून कांदा व फुलें यांणीं युक्त अशी वेल आहे, तिला **कंदर्पत्रिका** ह्मणतात. ६३ जी लहान असून, जिचीं पानें देंठावांचून तिकडें असतें तशीं असतात, ती **विशल्या.** ६४ जिला थोडा व जलद चीक येतो, व जी पर्वतावर होते, ती **कंदक्षीरा.** या चौसष्ट औषधी, ज्यांची देवही पूजा करितात; त्या शुभ दिवशीं, शुभ नक्षत्रावर, बलि-पूजा इत्यादि देऊन, क्षेत्राला रक्षाबंधन देऊन, अघोरास्त्र किंवा शक्तिबीज अथवा अघोरमंत्र यांचा जप करून काढून घ्याव्या. मुनींनीं ज्या सहस्र औषधि सांगितल्या त्या समजून उमगणें फार कठिण आहेत; तर पारदबंधक वनस्पति तत्ववेत्त्यांजवळच असतात. **पारदभस्म. रससिंदूर**--पारा दूधीच्या रसांत एक दिवस सारखा घोटावा; नंतर कामोणीच्या रसांत घोंटावा ह्मणजे त्याचे दोष जातात. तो पारा १० टांक, गंधक १० टांक आणि नवसागर २॥ टांक याप्रमाणें घेऊन कज्जली करून काच-कुपींत घालून मातकापड करावें, आणि तिचें मुख बंद करावें. नंतर वालुकायंत्रांत लावून आठ प्रहर पाऱ्याला पचन करावा. याप्रमाणें साक्षात् तरुण सूर्यासारखा अरुणवर्ण, प्रवालासारख्या रंगाचा, संपूर्ण कार्यकारी, मनुष्यांना अत्यंत दुर्लभ असा सिंदूर घ्यावा. तो ९ गुंजा मिऱ्याशीं द्यावा; ह्मणजे अग्नीला प्रदीप्त करितो व कामदीप्ति करितो. हा, संयोगानें ज्वरादिक सर्व रोग नाश करितो, आणि हा ज्या ज्या रोगावर योजावा त्या त्या रोगाचा हा रसराज नाश करितो. **षड्गुणगंधक-जीर्णसिंदूर**--हिंगुळांतील पारा १ भाग, गंधक ६ भाग घेऊन कज्जली करावी, आणि कोरफडीचे रसांत मर्दन करावी. वाळल्यानंतर काचकुपींत भरून तीस वालुकायंत्रांत ठेवून सात अहोरात्र अग्नि द्यावा. शीत झाल्यावर काढून घ्यावा. हा रससिंदूर १ वाल मधाशीं घ्यावा; ह्मणजे स्तंभन, दंडवृद्धि, वीर्य, बळ, तेज, पुंस्त्व व पुष्टि यांना करितो, व मातलेल्या हत्तीप्रमाणें जोर देतो; आणि षंढत्व, वंध्यात्व आणि संन्यास इत्यादि रोगांचा नाश करितो. याला घेणारा एक दिवसांत १०० स्त्रियांशीं गमन करितो. आणि मनाला आनंद देतो. हा पांचसहाशें व्याधींचा नाश करितो. हा षड्गुणगंधक-जीर्णसिंदूर विश्वामित्रानें उत्पन्न केला. **रससिंदूर**--शुद्ध पारा ८ तोळे, शुद्ध गंधक २ तोळे आणि अर्धतोळा नवसागर यांची कज्जली करून निंबूरसांत खलावी, आणि काचकुपींत घालून त्या कुपीला सात मातकापडें करावीं. वाळल्यानंतर ती सच्छिद्र व वालुकायंत्रांत आकंठ पुरून ठेवावी; आणि इष्टदेवता व पांच कुमारी यांची पूजा करून चुलीवर ठेवून आठ प्रहर

अग्नि द्यावा. शीत झाल्यावर हिंगुळासारखा, देव-दैत्यांना दुर्लभ असा रससिंदूर काढून घ्यावा, आणि रोगनाशनार्थ रोगोक्त अनुपानाशीं वाल किंवा दोनवाल मधपिंपळीशीं द्यावा. हा रतिकालीं स्त्रियांना कौतुक दाखविणारा, वीर्यबंधक व स्त्रियांचा मदनाशक आहे. हा अग्निमांद्य, यक्ष्मा, क्षय, पांडु, शोक, उदर, गुल्म, प्रमेह, शूल, प्लीहा, ज्वर, दुष्टव्रण, अर्श, ग्रहणी, भगंदर, ओकारी आणि त्रिदोष, यांचा नाशक आहे. आणखी

**पारदयोगः**–( १. ) काळ्या उंबराचा चीक आणून त्यांत पाऱ्याचा थोडा खल करून, नंतर त्याच उंबराचे चिकांत हिंग घालून वाटून त्याच्या दोन मुसा करून, त्या एका मुशींत तो पारा ठेवून, त्याजवर दुसरी हिंगाची मूस उपडी घालून चांगल्या संधि मिळवून गोळा करून, मातीचे शराव-संपुटांत घालून कापडमाती करून रानगोंवऱ्यांचा हलका अग्नि द्यावा; तेणेंकरून पाऱ्याचें भस्म होतें. (२.) विड्याचे पानांचे रसांत पाऱ्याचा खल करून करटोलीचा कांदा आणून एक लहानसर व एक मोठी अशा दोन चकत्या कापून, त्या मोठ्या चकतीला कोरून त्यांत पारा घालून त्याजवर त्या कांद्याचा चुरा वसवून त्याजवर दुसरी चकती ठेवून संधि मिळवून, कापडमाती करून, त्याला मातीचे शरावसंपुटांत घालून कापडमाती करून रानगोंवऱ्यांचा हलका अग्नि द्यावा; तेणेंकरून पाऱ्याचें भस्म होतें. ( ३. ) पारा व गंधक, अंकोलाच्या मुळाच्या रसांत खलावा आणि सायंकाळीं मुद्रा देऊन भूधरयंत्रांत पचन करावा; ह्मणजे भस्म होतें. ( ४. ) पारा व अभ्रक हे दोन प्रहर वडाच्या चिकांत मर्दन करावें आणि त्याच काष्टांचा अग्नि द्यावा; ह्मणजे पाऱ्याचें भस्म होतें. ( ५. ) पारा १ तोळा व गंधक २ तोळे घेऊन, लोखंडी कढईत घालून चुलीवर चढवून खालीं अग्नि लावावा व वडाच्या ओल्या सोट्यानें घोंटावें, ह्मणजे थोडक्या वेळांत भस्म होईल. तें भस्म २ गुंजा घ्यावें, ह्मणजे वीर्यवृद्धि व पुष्टता हीं प्राप्त होतील. ( ६. ) पांढऱ्या आघाड्याचें बीज व एरंड्या यांचें चूर्ण करून, मातीच्या मुशींत पाऱ्याच्या वर व खालीं घालून संधिलेप करून पुट द्यावें, ह्मणजे भस्म होतें. ( ७. ) पारा कोरंट्याच्या रसांत घालून उन्हांत मर्दन करावा; ह्मणजे मृत होतो. तो सर्व कर्मांमध्यें योजावा. ( ८. ) तुषाच्या अग्नीवर शेळीच्या मुतानें भरलेलें मातीचें भांडें ठेवून, त्यांत पारा घालावा आणि शुष्क करावा; नंतर खैराच्या लांकडाचा अग्नि लावून खैराच्या दांड्यानें घोंटावा, ह्मणजे त्या क्षाराचें भस्म होतें; तें सर्व योगांत योजावें. ( ९. ) रिंगणी, कावळी, काळा धोत्रा यांच्या रसांत

पारा एक दिवस खलून, मडक्यांत भरावा. त्यावर मीठ घालावें, आणि वर पालथें दुसरें मडकें ठेवून संधिलेप करावा, व त्यावर जलपट धरावा; आणि त्या खालीं दीपाग्नी द्यावा; ह्मणजे वरच्या भांड्यांत भस्म जमेल तें काढून घ्यावें. ( १०. ) पारा खापरांत घालून त्याला दीपाग्नी द्यावा आणि रुईच्या पानांच्या रसाचा वारंवार चुवा द्यावा; ह्मणजे तीन प्रहरांनीं भस्म होतें. ( ११. ) पारा चिभडाच्या रसांत खलून ऊर्ध्वपातन करावें, ह्मणजे त्याचें भस्म होतें. ( १२. ) पाऱ्यांत फटकी, सैंधव, अघाड्याचें मूळ, हे पदार्थ क्रमवृद्धीनें घेऊन, चतुर्थांश कांजी घालून घोटावा; ह्मणजे बद्ध होतो. नंतर डमरू-यंत्रांत चुलीवर ठेवून अहोरात्र हलका अग्नि द्यावा, ह्मणजे वरच्या भांड्यांत कापुरासारखें भस्म जमतें, तें घेऊन सर्व रोगांवर द्यावें. हें वाजीकरणयोगांशीं संपूर्ण कार्य करितें, व कांति आणि पुष्टि यांतें देतें. याचें निरंतर सेवन करावें. हा सिद्ध-मुखरस, याच्याहून दुसरें रसायन उत्तम नाहीं. ( १३. ) शुद्ध पारा १, बचनाग चतुर्थांश, गंधक अष्टमांश, एकत्र करून निंबूरसांत खल करावा. सुकल्यानंतर निवडुंगाच्या चिकाचीं तीन पुटें द्यावीं. नंतर रुईचीं पुटें, जोंपर्यंत पारा घट्ट होई तोंपर्यंत द्यावीं; आणि थालीमध्यें मीठ भरून त्यांत तो पारदाचा गोळा ठेवून वर तोंडापर्यंत मीठ घालावें, आणि वर दुसरी थाली उपडी घालून संधिलेप करून चुलीवर चार प्रहर अग्नि द्यावा. शीत झाल्यावर शुक्रासारखें पांढरें, वरच्या थालींत लागलेलें भस्म काढून घ्यावें. हें योगवाहि आहे. सर्व रोगांवर द्यावें. ( १४. ) लोहपात्रांत पारा व निमा गंधक घालून आठ प्रहर अग्नि द्यावा, आणि त्यावर वारंवार निवडुंग व रुई यांचा चीक देत जावें आणि खैराच्या काष्ठानें घोटावें ह्मणजे भस्म होतें; तें एक गुंज, रोगोक्त अनुपानाशीं द्यावें. हें भस्म रसायन असून कांति, पुष्टि, बल, वीर्य व अग्नि यांना वाढवितें. ( १५. ) **चंद्रायुधरस**—पारा, गंधक व सैंधव हे समान घेऊन नागवेलीच्या पानांच्या रसांत खलून गोळा करून, त्याला नागवेलीच्या पानांनीं वेष्टण करावा, व ऊर्ध्वपातन यंत्रांत लावून एक दिवस अग्नि द्यावा. नंतर वरच्या भांड्यांतील पारा घेऊन, तीन गुंजा विड्याच्या पानाशीं एक महिना सेवन करावा; ह्मणजे सोपद्रवक्षय लयास जातो. याचें पथ्य मृगांकाप्रमाणें करावें. ( १६. ) गंधक, घेरोसा व पारा यांना निर्गुंडी व कुमारी ( कोरफड ) यांचे रसांत खलून पुट द्यावें, ह्मणजे काळें भस्म होतें. हें देवांनाही दुर्लभ आहे. ( १७. ) गंधक व पारा हे समभाग घेऊन डुकरकंदाच्या रसांत मर्दन करून पुट द्यावें, ह्मणजे पीतवर्ण भस्म होतें. तें व-

लीपलित यांचा नाश करितें. ( १८. ) पारा १ भाग, कथील २ भाग, खापरांत घालून निंबाच्या सोट्यानें वारंवार घोटावें. अग्नि १२ प्रहर द्यावा, ह्मणजे पाऱ्याचें पिंवळें भस्म होतें; तें रोगांवर अनुपान पाहून द्यावें. **पारदभस्माचीं अनुपानें**—शक्तिमानाप्रमाणें हें भस्म १ गुंजेपासून ४ गुंजांपर्यंत द्यावें. १ पित्तावर आंवळकठीचें चूर्ण व साखर यांशीं. २ वायूवर पिंपळीशीं. ३ कफावर आल्याच्या रसाशीं. ४ ज्वरावर निंबाच्या रसाशीं. ५ रक्तविकारावर मधाशीं. ६ रुधिरस्राव, प्रवाहिका व अतिसार, यांवर तांदुळज्याच्या रसाशीं घ्यावें. ७ कास, श्वास व शूल, यांवर पिंपळी, मिरें, सुंठ, भारंगमूळ, यांचें चूर्ण व मध यांबरोबर. ८ रक्तविकारावर हळद व साखर यांशीं. ९ कावीळ, पांडुरोग व अग्निमांद्य यांवर त्रिकटु, त्रिफळा व अडुळसा यांशीं. १० मूत्रकृच्छ्रावर शिलाजित, वेलची, खडीसाखर यांशीं. ११ धातुवृद्धीवर लवंग, केशर, पत्री, हिंगुल, अक्कलकाला, पिंपळी व भांग यांशीं. १२ सर्व ज्वरांवर सैंधव, लवंग, किराईत व हरीतकी यांचे चूर्णाशीं. १३ रेच होण्यास सैंधव, त्रिफला, लवंगा, केशर व हिंगूळ यांचे चूर्णाशीं. १४ धातुवृद्धीवर तांबूलाशीं किंवा भुइकोहळ्याशीं. १५ वांतिनाशनार्थ भांग व ओंवा यांशीं. १६ सद्यः उदरावर सैंधव, हरिद्रा, त्रिजया व ओंवा, यांच्या चूर्णाबरोबर. १७ कृमीवर चार वाल पळसाचें बीज व दुप्पट गूळ यांशीं. १८ सर्व अतिसारांवर अफू, लवंग हिंगूळ व भांग यांशीं. १९ अग्निमांद्यावर सैंधव व ओंवा यांशीं. २० पुष्टतेस गुळवेलीच्या सत्वाशीं द्यावें. **पथ्य**—पारद भक्षण करणारानें विडा व स्त्री हीं सोडावीं. २१ दिवस पारदभक्षणानें मनुष्य कामांध होतो, आणि त्याणें स्त्रीसंग केला असतां जगण्याविषयीं संशय उत्पन्न होतो, याकरितां स्त्रीशीं भाषण मात्र करावें, परंतु मैथुन करूं नये. पारदभक्षकानें पान, भक्षण, निद्रा, जागरण, मार्ग चालणें, कोप, हर्ष, दुःख, कोणते पदार्थाची इच्छा, हीं सर्व अति करूं नये. **पारदभक्षकाला**—सैंधव, तूप, धणे, जिरें, आलें, तांदुळजा, वांगें, पडवळ, लाह्यांचे पदार्थ, गहूं, जुने साळीचा भात, गाईचें दूध, तूप, दहीं, नदीचें कोऱ्या मडक्यांत उन्हांत व चांदण्यांत ठेवलेलें पाणी, मुगांचा यूप, अभ्यंग, सुगंध, माला, शालजोडी, नारायणादि तैल, स्त्री, मस्तकावर शीत पाण्याचें सिंचन आणि तहान लागली असतां साकर घालून नारळाचें पाणी किंवा मुगांचा यूप, द्राक्षें, डाळिंब, खजूर, यांचें पाणी प्यावें व केळें इ० भक्षण करावें ह्मणजे हित होतें. **पारदभक्षकास वर्ज्य.**—कोहळा, कांकडी, कारलें, कलिंगड, देवडांगर, केळें, कुळित्थ, अळशीचें तेल, तीळ, उडीद,

मसुरा, ताकभात, कडू, आंबट, तिखट, मीठ, पित्तकारक पदार्थ, पिंवळे पदार्थ; व बोर, नारळ, आंबे, जवखार, सुंठ, शेवगा, भांगसेवन, वांगें, मोहऱ्या व वातुल पदार्थ हे वर्जावे. **पारदादि लेप. ( १. ) खरजेवर.**—पारा, गंधक, धोत्र्याचें बीं, यांचा तेलांत खल करून तें लावावें. ( २. ) **पारदादि मलम सर्व व्रणांवर.**—पारा व गंधक यांची कज्जली १, मुरदाडशिंग १, कपिला २ भाग व किंचित् भाजलेलें मोरचूत हीं एकत्र करून खलून त्यांत चौपट जुनें तूप घालून तें मलम कापसाचे घडीवर घालून व्रणावर वसवावें; ह्मणजे हें आंतून जखम स्वच्छ करितें व संपूर्ण व्रणांचा नाश करितें. ( ३. ) **पारदादि लेप**—पारा, गंधक, हरताळ, हिंगूळ, मनशीळ हीं प्रत्येक एकेक तोळा व मुरदाडशिंग व शंखजिरें हीं दोन दोन तोळे, यांची बारीक कज्जली करून ती तुळशीच्या रसाशीं खलावी, व त्याची गोळी करून ती उपदंशावर गाईच्या तुपांत उगाळून लावावी; ह्मणजे तीव्र व्रणाला भरून आणते. **अशुद्ध पारा** भक्षिल्यापासून अनेक विकार होतात त्यावर—( १. ) कारलीची मुळी उगाळून प्राशन करावी. (२.) शुद्ध केलेला गंधक विड्याशीं सेवन करावा. ( ३.) द्राक्षें, कोहोळ्याचे तुकडे, तुळस, शेवती, लवंग, दालचिनी, नागकेशर यांचे समान गंधक घेऊन त्यानें दोन प्रहर सर्व गात्रांना मर्दन करावें, आणि थंड पाण्यानें स्नान करावें. याप्रमाणें तीन दिवस केलें असतां पाऱ्याचे दोष शांत होतात. ( ४. ) नागवेलीचा रस, माक्याचा रस, तुळशीचा रस व शेळीचें दूध हे पदार्थ प्रत्येकीं शेर शेर एकत्र करून सर्व गात्रांना दोन प्रहरपर्यंत मर्दन करावें आणि थंड पाण्यानें स्नान करावें. याप्रमाणें तीन दिवस करावें. ( ५. ) अगस्ता व माका यांचा रस व सोरा हे ताकांत घालून तें ताक चार तोळे प्यालें असतां, पाऱ्यानें झालेला अंतर्दाह नाश पावतो आणि पारा मूत्रमार्गानें निघून जातो. **रसायन शरीरांत जिरलें असतां उपाय.**—उन्हाळी, देवडांगरी, परळ झाडाचें बीज व कामोणी यांतून एकाचा काढा प्यावा.

## २८. पितळ. ( सं. पित्तल. )

पितळ ही मिश्रधातु आहे. ही, तांबें व जस्त यांच्या मिश्रणापासून होते. पितळ दोन प्रकारचें आहे. राजरीति व दुसरे काळतुंडी. पितळ तापवून कांजींत बुडवावें, ह्मणजे तांबडें होतें. त्याला राजरीति सोनपितळ ह्मणतात; आणि काळें होतें त्याला काकतुंडी ह्मणतात; हें कधींही औषधाकरितां घेऊं नये. **शोधन**—पितळेचे पत्रे करून तापवावे, आणि तेल, ताक,

कांजी, गोमूत्र व कुळित्थांचा काढा, यांत तीन तीन वेळ बुडवावे, ह्मणजे शुद्धि होते. ( २. ) पितळेचे पातळ पत्रे करून तापवून निर्गुंडीच्या रसांत बाळहिरड्याचें चूर्ण घालून त्यांत अथवा आम्ल द्रवामध्यें शिजवावे; ह्मणजे शुद्ध होतात. **मारण**—पितळ व कांसें यांचें मारण तांब्यासारखेंच करावें. ( १ ) पितळेचे पत्रे पातळ आणि शुद्ध घेऊन त्याच्या समान गंधक, रुईचे चिकांत खलून, त्या पत्र्यांस लेप करावा आणि शरावांत घालून गजपुट द्यावें. याप्रमाणें दोन पुटांनीं पितळेचें भस्म होतें. **पितळभस्मगुण**—पितळेचें भस्म-संपूर्ण मेह, वायु, अर्श, संग्रहणी, कफ, पांडुरोग, श्वास, खोकला, कावीळ व शूल यांचा नाश करितें.

## २९. पोलाद. ( सं. तीक्ष्णलोह. )

लोखंडाहून पोलाद हें शतपट गुणांनीं अधिक आहे. लोखंडांत फार दोष आहेत; करितां तें रसायनक्रियेंत घेऊं नये. **शोधन**—चवसष्ट तोळे त्रिफळा घेऊन आठपट पाणी घालून अष्टमांश काढा करावा आणि वीस तोळे लोहाचे पत्रे घेऊन तापवून सात वेळ त्या काढ्यांत बुडवावे; ह्मणजे शुद्धि होते. **मारण**—संपूर्ण लोहांना पारदभस्माच्या योगानें मारण उत्तम, मूलिका, वनस्पति इत्यादिकांनीं मध्यम; आणि गंधकादि क्षारांनीं मारण कनिष्ठ मानिलें आहे. ( १. ) शुद्ध पारा १ भाग, गंधक २ भाग, लोहचूर्ण ३ भाग, एकत्र करून दोनप्रहरपर्यंत कोरफडाशीं खल करावा; नंतर त्याचा गोळा करून एरंडाचे पानांनीं वेष्टन करावा; आणि सुतळीनें बांधून तांब्याच्या डब्यांत ठेवून वर झांकण लावून मृत्तिकेनें संधिलेप करून सुकवून, तो करंडा भाताचे राशींत तीन दिवस पुरून ठेवावा. चवथे दिवशीं काढून खल करून वस्त्रावर गाळून घ्यावा. हा वस्त्रावर गाळलेला लोह, जलावर हंसासारखा तरतो. या लोहभस्माला सोमामृत-लोहभस्म ह्मणतात. ( २. ) पोलादाचें चूर्ण, पारा व गंधक हे पदार्थ कोरफडीच्या रसाशीं खलावे, आणि कांशाच्या भांड्यांत उन्हांत ठेवावे; ह्मणजे पोलादाचें भस्म होतें. ( ३. ) पोलादाचें चूर्ण चिनीच्या प्याल्यांत घालून त्यावर जांभळीच्या पानांचा रस घालावा व उन्हांत ठेवावें. याप्रमाणें ७ दिवस करावें ह्मणजे भस्म होतें. ( ४. ) डाळिंबाच्या पाल्याचा रस काढून त्यांत लोहाचें चूर्ण घालून उन्हांत सात दिवस ठेवावें. दररोज रस नवा घालावा. आठवे दिवशीं त्याच रसांत खलून दोन गजपुटें द्यावीं. याप्रमाणें केलें ह्मणजे तें लोहभस्म शुद्ध, उदकावर तरणारें होतें. हें भस्म संपूर्ण योगांत योजावें. ( ५. ) गाईच्या दह्यांत पोलादाचें चूर्ण घालून तें दहीं सुकून

नाईपर्यंत तसेंच ठेवून नंतर धुऊन तें चूर्ण काढून घ्यावें, आणि तें त्रिफळ्याच्या काढ्यांत खढून गजपूट द्यावें. याप्रमाणें ३ पुटें दिलीं असतां पाण्यावर तरणारें असें भस्म होईल.

## ३०. प्रवाळ.

समुद्रामध्यें राहणारे एका जातीचे कीटक आहेत; ते समुद्राच्या तळापासून उकीर काढून पोंवळ्यांचे खडक बनवितात. हे खडक वेलीप्रमाणें असतात, ह्मणून त्यांस पोंवळ्यांच्या वेली असेंही ह्मणतात. पोंवळ्यांचा रंग लाल असतो. जें पिकलेल्या तोंडल्यासारखें लाल, वाटोळें, लांब, सरळ, स्निग्ध, अव्रण, मोठें असें पोंवळें असतें तें चांगलें. जें रंगानें पितळेसारखें, पोकळ, बारीक, सच्छिद्र, रूक्ष, काळें, लहान आणि पांढरें असतें तें वाईट; तें घेऊं नये. **प्रवाल**—मधुर, आंबट, वीर्यप्रद, कांतिकर, लघु, अग्निदीपक, रुचिकर, पौष्टिक, पाचक, सारक, नेत्र्य, धातुवर्धक, क्षयनाशक; व वायु, खोकला, कफ, पित्त, पांडु, ज्वर, प्रमेह, दमा, विष, रक्तपित्त, व भूतोन्माद यांचा नाश करितें. **प्रवालाचें शोधन**—( १. ) मणि, मोतीं व पोंवळीं हीं जयंतीच्या ( टाकळीच्या ) रसांत दोलायंत्रानें १ प्रहर पचन करावीं ह्मणजे शुद्ध होतात. ( २. ) पोंवळीं निंबूच्या रसांत १ प्रहर भिजूं घालावीं ह्मणजे शुद्ध होतात. ( ३. ) पोंवळीं दुधांत दोलायंत्रानें १ प्रहर शिजवावीं ह्मणजे शुद्ध होतात. ( ४. ) पोंवळी त्रिफळ्याच्या काढ्यांत शिजविलीं असतां शुद्ध होतात. **प्रवालाचें मारण**—( १. ) कुमारी ( कोरफड ), तांदुळजा व मनुष्याचें दूध यांत पोंवळें तापवून बुडवावें. याप्रमाणें प्रत्येक रसानें सात सात वेळ सेचन करावें ह्मणजे भस्म होतें. याप्रमाणेंच सूर्यकांतमणि व मोतीं यांचें भस्म होतें. ( २. ) पोंवळ्यांचें बारीक चूर्ण करून, त्यास निंबाचे रसांत घोंटून उन्हांत वाळवावें. याप्रमाणें निंबाचे रसाचीं तीन किंवा सात व गुलाबपाण्याचीं सात पुटें द्यावीं ह्मणजे पोंवळ्यांचें भस्म होतें. ( ३. ) पोंवळ्यांचे चूर्णास निंबूरसाचीं सात, कोरफडीचे रसाचीं सात व गुलाबपाण्याचीं सात याप्रमाणें सूर्यपुटें दिलीं असतां भस्म होतें. ( ४. ) पोंवळ्यांचे चूर्णास गुलाबपाण्याचीं २१ सूर्यपुटें द्यावीं ह्मणजे भस्म होतें. याचें घेण्याचें प्रमाण २ गुंजा आहे. **प्रवाळभस्माचीं अनुपानें**—१ जीर्णज्वर, कास, श्वास, उचकी, कोष्ठगत वायु यांस मधपिंपळींत द्यावें. २ ज्वरास किराईत, कुटकी, हरीतकी यांत द्यावें. ३ पित्तास दूध आणि खडीसाखर यांत. ४ धातुक्षयावर पिकलेले केळ्यांत. ५ कृश झाल्यास विड्यांत. ६ स्निग्ध परम्यास तांदुळांचें धूण व साखर यांत,

अ० त्रिफला व मध यांत. ७ धातुपुष्टीस तूपसाखरेंत. ८ प्रदररोगास गाईचे धारोष्ण दुधांत. ९ वायूस तुळशीचा रस आणि मधसाखर यांत. १० पित्तकासास आवळ्याचा रस व खडीसाखर यांत. ११ रातांधळ्यास उंदराची लेंडी तुळशीचे रसांत उगाळून त्यांत भस्म घालून अंजन करावें. १२ अस्थिभंग व संधिभंग यांवर प्रवाळभस्म मधाशीं द्यावें. १३ पित्तरोग व भ्रम यांवर—आंवळ्याचे मुरंब्यांत तूपसाखर घालून त्यांतून द्यावें. १४ उरक्षतः- क्षयावर तूप व मधांत. १५ कफमूत्रकृच्छ्रावर तांदुळांच्या धुणांत. १६ गर्भिणीचे ओकारीवर—तांदुळजाचे रसांत. १७ धातुस्थानच्या कडकीवर गाईच्या दुधांत खडीसाखर घालून त्यांतून द्यावें. १८ दाहावर वंशलोचन व साखरेंत. १९ उष्णता, दाह व लघ्वीची जळजळ यांवर तांदुळांच्या धुणांत मध व खडीसाखर घालून त्यांतून द्यावें. २० डोळ्यांची उष्णता व अंगावरील सुखी खरूज यांवर तूपसाखरेशीं अ० धारोष्ण दुधांत खडीसाखर टाकून त्याशीं द्यावें. २१ मस्तकशूळावर बदामाच्या खिरींत द्यावें. **खीर करण्याचा प्रकार**—बदामांच्या दहा बारा बिया घेऊन त्या ऊन्ह पाण्यांत भिजत घालून, सालें काढून वाटाव्या व पावशेर गाईचें दूध घेऊन त्यांत दोन तोळे खडीसाखर घालावी व त्यांत त्या वाटलेल्या बिया घालून खीर करावी व त्यांत वालभर प्रवाळ घालून घ्यावें; ह्मणजे मस्तकशूळ, पित्तविकार, नेत्रसंबंधी रोग दूर होऊन नेत्रांस थंडाई येते व शक्ति वाढते. २२ **पित्तोद्भव पांडूवर**—प्रवाळभस्म तूपसाखरेशीं द्यावें. पथ्य—संपूर्ण पित्तकारक पदार्थ वर्ज्य.

## ३१. बांगडखार. (सं. काचलवण.)

बांगडखार हा कांचेच्या भट्टींत उत्पन्न होतो. याचा वर्ण पांढरा आहे. **बांगडखार**—पित्तकारक, किंचित् खारट, रूक्ष, अग्निदीपक, उष्ण, चक्षुष्य, दाहकारक व शूल, गुल्म, कफ, वायु व पित्त यांचा नाश करितो. (१.) **अजीर्णावर**—बांगडखाराचें मासा दीडमासा चूर्ण उष्णोदकांत द्यावें.

## ३२. बिडलोण.

**बिडलोण**—लघु, उष्ण, रुचिकर, तीक्ष्ण, अग्निदीपक, वातानुलोमन, रूक्ष, व्यवायि, शूल, वायु, मेह, गुल्म, अजीर्ण, मलावष्टंभक, आनाह, वायु, जडता, कफ, दद्रु व हृद्रोग, यांचा नाश करितें. (१.) **अजीर्ण, वात, शूळ यांवर**—बिडलोण निंबूरसांत द्यावें. (२.) **नारूवर**—चुना व बिडलोण पाण्यांत वाटून लेप करावा.

## ३३. मनशील. ( सं. मनःशिला. )

मनशील ही हरताळाचा भेद आहे. हिचा रंग तांबूस असतो. **मनशील**—गुरु, वर्णकारक, सारक, उष्ण, लेखन, तिखट, कडू व स्निग्ध अशी आहे; आणि विष, श्वास, खोकला, भूतबाधा व रक्तविकार यांचा नाश करिते. **अशुद्ध मनशील**— बलनाशक, मलबंधक, मूत्ररोग, शर्करा, कृच्छ्र यांना करिते. **शुद्धि**—( १. ) मनशील हळदीच्या काढ्यांत दोलायंत्रानें पचन केली असतां शुद्ध होते. ( २. ) मनशिलेला अगस्त्याच्या पानांच्या रसाच्या सात भावना द्याव्या अथवा आल्याच्या रसाच्या सात भावना द्याव्या ह्मणजे शुद्ध होते. **उपयोगः**—( १. ) **खरूज, गजकर्ण, नायटे,** इत्यादि सर्व कुष्ठविकारांवर मनशील, हिराकस, व मोरचूत गोमूत्रांत वाटून लेप करावा. ( २. ) **सन्निपातावर अंजन**—मनशील, वेखंड, यांचें लसुणाच्या रसांत अ० मनशील घोड्याच्या लाळेंत उगाळून अंजन करावें ह्मणजे झांपड दूर होते. ( ३ ) **खोकल्यावर**—मनशील, मिरें, जटामांसी, नागरमोथे व हिंगणबेट, या औषधांत गूळ मिश्र करून, चिलमींत घालून त्याचा सुखोष्ण धूर प्यावा, ह्मणजे दोषज, द्वंद्वज, सान्निपातिक व शेंकडों औषधानें बरे न होणारे खोकले या औषधाच्या धूम्रपानानें शांत होतात. **दुसरा प्रकार**—बोरीच्या पानांला मनशील उगाळून लावावी व ती चिलमींत अगर गुरगुडींत घालून ओढावी ह्मणजे सर्व श्वास, कास दूर होतात.

## ३४. मीठ. ( सं. लवण. )

मीठ हें समुद्राच्या पाण्यापासून उत्पन्न होतें. आपल्या नित्याच्या भोजनांत येणारा हा एक पदार्थ आहे. मिठावांचून मनुष्याचें क्षणमात्र चालावयाचें नाहीं. जर मनुष्याचें मीठ तोडलें तर तो अशक्त होईल. मिठाच्या योगानें सर्व पदार्थांस रुचि येते. **मीठ**—रुचिप्रद, हृद्य, अग्निदीपक, केशांना पांढरें करणारें, भेदक, अविदाहक, कफकर, पाककाळीं मधुर, तिखट, कडू, गुरु, किंचित् उष्ण, पित्तल, खारट, स्निग्ध, शूलनाशक, वातनाशक व स्वादु आहे. ( १. ) **वमन होऊन कफ व पित्त** पडावयास—१० तोळे उष्णोदकांत मीठ घालून प्यावें. उतार तूप भात. ( २. ) **पानथरीवर** व **पटकीचा उपद्रव न बाधण्यास**—जेवणांत मीठ जास्त खावें. ( ३. ) **हिरडी सुजल्यास**—मिठाच्या खड्यानें सुजलेली हिरडी फोडून नंतर तुरटीच्या लाहीची पूड चोळावी. ( ४. ) **सुपारी लागल्यास**—थंड पाणी प्यावयास देऊन मिठाचा खडा तोंडांत

धरावयास द्यावा. ( ५. ) **विषमज्वरावर**—उष्णोदकांत मीठ. उकळून द्यावें. ( ६. ) **नारूवर**—तीन तोळे मीठ पिठांत घालून मळून त्याची एक दामटी भाजून ती संध्याकाळीं खावी व सर्व रात्र जागरण करावें; ह्मणजे नारू जळून जातो.

## ३५. मुलतानमाती.

ही पंजाबांत उत्पन्न होते. हिचा रंग पिंवळा असतो. ही रंगाच्या उपयोगीं पडते. ( १. ) **मुलाची बेंबी सुजल्यास**—मुलतानमातीचा तुकडा विस्तवांत लाल करून बाहेर काढावा, व त्यावर गाईचें दूध टाकावें ह्मणजे त्या तुकड्यांतून वाफ निघते, त्या वाफेनें बेंबीस शेक द्यावा. असें दिवसांतून दोन वेळ करावें. ( २. ) **गर्भिणीस** अपूर्णमासांत रजोदर्शन झाल्यास त्यावर मुलतानमाती १ तोळा, यांत ६ तोळे पाणी घालून रात्रौ कांचेच्या भांड्यांत भिजत घालावी. प्रातःकाळीं ती माती त्याच पाण्यांत चांगली कालवून कपडछान करावी. नंतर त्यांत थोडी जिऱ्याची पूड घालून द्यावी. ( ३. ) **कोरड्या खरजेस**—मुलतानमाती दह्यांत अगर खोबऱ्याचे तेलांत खलून लावावी.

## ३६. मुरदाडशिंग. (सं. कंकुष्ठ.)

मुरदाडशिंग हें हिमालयपर्वताच्या पायाजवळच्या टेंकड्यांत अबूच्या पहाडांत व गुजराथ देशांत उत्पन्न होतें. तें दोन प्रकारचें आहे; एक नालिकाख्य व दुसरें रेणुका. त्यांत जें पिंवळें, जड, चिक्कण, तें श्रेष्ट. आणि श्याम, पीत, लघु, ज्यांतलें सत्व निघून गेलें तें रेणुक. मुरदाडशिंग ही वंगाची उपधातु आहे. **मुरदाडशिंग**—सारक, उष्ण, कडू, कांतिकर, भेदक, व्रणरोपण, वांति, मल, मूत्र, प्रमेह, यांना करणारें, व कफ, वायु, व्रण, शूल, उदर, कृमि, सूज, आध्मानवायु, गुल्म, आनाह, मुजेपासून आलेला ज्वर, आणि उदावर्त यांचा नाश करितें. **शोधन**—मुरदाडशिंगाला सुंठीच्या काढ्याच्या तीन भावना द्याव्या ह्मणजे शुद्ध होतें. ( १. ) **गर्मीच्या चट्ट्यांस**—मुरदाडशिंग अर्धतोळा, राळ २ तोळे, यांचें तुपांत मलम करून लेप करावा; ह्मणजे व्रण लवकर भरून येतात. अथवा याचें अतिशय बारीक चूर्ण करून तें लावावें, किंवा हें चूर्ण मधांत खलून लावावें. ( २. ) **मुळव्याधीस**—मुरदाडशिंग लोण्यांत खलून मोडास लावावें व शेकावें. ( ३. ) **प्रमेह** व **उपदंश यांवर**—शुद्ध मुरदाडशिंग अर्धमासा विड्यांतून द्यावें.

## ३७. मोतीं. ( सं. मौक्तिक. )

मोत्यांची उत्पत्ति शिंपी, शंख, हत्ती, डुकर, सर्प, मासा, बेडूक व वेळू यांपासून होते असें सांगितलें आहे. जें मौक्तिक फिकें, व्यंग, शिंपीला लागलेलें, आरक्तवर्ण, मत्स्याक्षानें चिन्हित, रूक्ष, उखर, खोलगट, असें असतें तें बुद्धिमंतानें धारण करूं नये; तें दोषकारक आहे; आणि जें नक्षत्रासारखें, वाटोळें, स्निग्ध, स्थूल, निर्व्रण, निर्मळ व जड, तें मोतीं महामौल्यवान् सिद्धिसाधक आहे. **मोतीं**—मधुर, वृष्य, शीत असें आहे व वीर्य, बळ, पुष्टि, आयुष्य यांतें देणारें; व नेत्ररोग, विष, क्षयकोप, कफ, पित्त, कास, श्वास, अग्निमांद्य, दाह यांचा नाश करितें. **शोधन**—मणि, मोतीं व पोंवळीं हीं जयंतीच्या ( टाकळीच्या ) रसांत दोलायंत्रानें १ प्रहर पचन करावीं ह्मणजे शुद्ध होतात. दुसरा प्रकार—मोतीं अम्लवर्गात, कांजी, निंबूचा रस, गोमूत्र आणि दूध यांत शोधावें. **मारण**—( १. ) कुमारी, तांदुळजा व स्त्रीचें दूध, यांत मोतीं तापवून बुडवावें. याप्रमाणें प्रत्येक रसानें सात सात वेळ सेचन करावें ह्मणजे भस्म होतें. ( २. ) माक्षिकाच्या मारणाप्रमाणें मोतीं व पोंवळें यांचें मारण करावें. हें अर्धगुंजप्रमाण द्यावें. **अनुपानेः**—१ पित्तावर—दूध व खडीसाखरेशीं. २ उरक्षतःक्षयावर तूप व मधांत. ३ पुष्टतेस दूध व खडीसाखरेशीं. ४ नेत्ररोगास तूप व मधांत.

## ३८. मोत्यांची शिंप.

हिंदुस्थानच्या दक्षिणेस सिंहलद्वीपाजवळच्या समुद्रांत व इराणी अखातांत मोत्यांच्या शिंपा फार सांपडतात. या शिंपा पाणबुडे लोक समुद्रांत बुड्या मारून बाहेर काढतात. या शिंपांत मोत्यें सांपडतात. **मोत्यांची शिंप**—कडू, स्निग्ध, रुच्य, मधुर व दीपन अशी आहे आणि श्वास, हृद्रोग व शूळ यांचा नाश करिते. **शुद्धि**—मोत्यांची शिंप ताकांत एक रात्र भिजूं घालावी ह्मणजे शुद्ध होते. **मारण**—मोत्यांची शिंप कोळशांच्या अग्नींत चांगली फुलवून थंड झाल्यावर खलून ठेवावी. मौक्तिकभस्माच्या अभावीं हें भस्म घ्यावें. याचे गुणही त्याप्रमाणेंच आहेत.

## ३९. मोरचूत. ( सं. तुत्थ. )

मोरचूत तांब्यापासून उत्पन्न होतें. याची विषांत गणना आहे. **शोधन**—( १. ) मोरचुताचे समभाग मांजराची विष्ठा घेऊन त्यांत मध व टांकणखार घालून खलून त्यास पणतींत ठेवून मातकापड करून हलकें पुट

द्यावें. याप्रमाणें तीन पुटें दिलीं ह्मणजे शुद्ध, वांति.—भ्रांतिवर्जित होतें. ( २. ) मोरचूत अम्लवर्गांत घालून तैलानें सिंचन करावें आणि तें घोड्याच्या मुतांत दोलायंत्रानें एक दिवस पचन करावें ह्मणजे शुद्ध होतें. **मारण**—गंधक, टांकणखार आणि थोर चुका यांचा रस एकत्र करून त्यांत मोरचूत खलून अंधमुषेंत घालून दोन किंवा तीन लहान पुटें द्यावीं; ह्मणजे तुत्थाचें भस्म होतें. **मोरचुताचें सत्व**—मोरचूत व टांकणखार यांला निंबाचे रसांत खलून अंधमुषेंत घालून भात्यानें फुंकावें ह्मणजे ताम्ररूप सत्व उत्पन्न होतें. **मोरचूत**—तिखट, खारट, तुरट, विशद, लघु, लेखन, रेचक व चक्षुष्य आहे, आणि कंडू, कृमि व विष यांचा नाश करितें. ( १. ) **विद्रधि, गळवें** इ० पिकवण्यास—मोरचूत व साबण उगाळून वर लेप करावा. ( २. ) **विंचवाचे विषारावर**—मोरचूत दह्यांत उगाळून लावावें. ( ३. ) **खुपऱ्यांवर**—मोरचुताची सळई फिरवावी. ( ४. ) **वमन होण्यास**—मोरचुताची लाही करून ती तांदूळप्रमाण मधाशीं द्यावी व वर ऊन्ह पाणी पुष्कळ प्यावें. ( ५. ) **अम्लपित्तास**—मोरचुताची लाही तांदूळप्रमाण मधांत द्यावी. ( ६. ) **इसबावर**—मोरचूत पाण्यांत उगाळून लेप करावा, अथवा मोरचूत व कळीचा चुना एकत्र करून लेप करावा, मोरचूत जास्त उतल्यास पांढरा काथ पाण्यांत उगाळून लेप देत जावा. ( ७. ) **कांडराच्या विषारावर**—मोरचूत दोन किंवा तीन गुंजांपर्यंत लोखंडाचे तव्यावर साधारण भाजून दह्यांत कालवून द्यावा; ह्मणजे वमन होऊन कांडराचे विषारामुळें छातींत झालेला कफाचा गठा पडतो. विशेष वांति किंवा रेच होऊं लागले तर उतार—काताची पुड पाण्यांत कालवून तें पाणी थोडथोडें पाजावें. ( ८. ) **गर्मीचे चट्टयांस**—चट्टा उद्भवतांच त्यावर मोरचूत व गोपीचंदन उगाळून लावावें. ( ९. ) **अफूचे विषावर**—मोरचुताची लाही व टांकणखाराची लाही तुपांत खावी.

## ४०. रसकापूर. ( सं. रसकर्पूर )

शुद्ध पारा, फटकी, शुद्ध हिराकस व सैंधव हीं समभाग आणि विसांश नवसागर, हीं खलांत घालून खलावीं व कुमारीरसाची भावना द्यावी; मग डमरूयंत्रांत क्रमानें मोठा अग्नि लावून पचन करावें. ह्मणजे शुद्ध रसकापूर होतो. बाजारांतील अशुद्ध रसकापुराची विषांत गणना आहे. एक तोळा अशुद्ध रसकापुरास एकशेर गाईचें तूप घालून पचन करावें; नंतर काढून खलून ठेवावा. हा एक गुंज किंवा दोन गुंजा जुन्या गुळांत द्यावा. सर्व रोगांवर अनुपान योजून दिला असतां रोग दूर करितो. **पथ्य**—दूधभात व

तांबूल. **शुद्ध रसकापूर**—फिरंगोपदंशरूप हत्तीला सिंहासारखा, संपूर्ण कुष्ठांना कल्पाग्नीप्रमाणें आणि संपूर्ण व्रणनाशक असून कामोत्पत्तिकर, सुवर्णासारखी कांति, बल, अग्नि व तेज यांना करणारा, संपूर्ण रोगांना हरण करणारा असा आहे. ( १. ) **इसब, विसर्प, नायटे, खरूज** इत्यादिकांवर—शतधौत घृतांत रसकापूर खलून लावावा. ( २. ) **अग्निदग्धव्रण, गर्मीचे चट्टे,** शस्त्राची जखम, इसब यांवर—रसकापूर व काथ एकेक भाग, अर्धाभाग शेंदूर व सर्वांच्या चौपट गाईचें तूप घालून कांशाच्या ताटांत कांशाच्या वाटीनें दोन प्रहर खल करून त्या मलमास २१ वेळां पाण्यानें धुऊन तें लावावें. ( ३. ) **इसब व गर्मीचे चट्ट्यांस**—रसकापूर मोगली एरंडाचे चिकांत खलून लेप द्यावा. ( ४. ) **मुळव्याधीस**—रसकापूर निंबूचे रसांत खलून लावावा, व बोरीच्या कोळशांच्या विस्तवानें शेकावें. ( ५. ) **उपदंशावर**—शुद्ध रसकापूर, केशर, साखर, चंदन, लवंग, जायपत्री हीं समभाग घेऊन खलून मुगाएवढ्या गोळ्या कराव्या. या दोहींसांज याप्रमाणें सात दिवस घ्याव्या; ह्मणजे उपदंशविकार दूर होतो.

## ४१. रुपें ( सं. रौप्य. )

**शोधन**—( १ ) शिसें देऊन शोधलेलें रुपें घेऊन त्याचे कंटकवेधी पत्रे करावे व ते चिंच व द्राक्षें यांचे रसांत निरनिराळे शोधावे; ह्मणजे उत्तम प्रकारचें शुद्ध होतें. ( २. ) रुप्याचे पातळ पत्रे करून ते अग्नीवर तापवून अगस्त्याचे रसांत विझवावे. याप्रमाणें तीन वेळ करावें ह्मणजे शुद्धि होते. **मारण**.—( १. ) रुप्याचे फार पातळ पत्रे करून त्यांना रुप्याचे समभाग पारा व गंधक, या दोहोंच्या समभाग हरताळ, हे सर्व एकत्र करून कुमारीचे रसांत खल करावा आणि त्या कल्कानें लेप करावा, व. शरावसंपुटांत त्यांना ठेवून तीस गोंवऱ्यांचें पूट द्यावें. याप्रमाणें दोन पुटें दिलीं ह्मणजे रुप्याचें भस्म होतें. ( २. ) सुवर्णमाक्षिक आणि हिंगूळ यांचें चूर्ण करून तें खालींवर देऊन, मध्यें रुप्याचे पातळ पत्रे ठेवावे, आणि गजपुट द्यावें. याप्रमाणें दोन तीन पुटें द्यावीं ह्मणजे भस्म होतें. ( ३. ) रुप्याचे पत्रे गरम करून दुधीच्या रसांत ७ वेळ विझवावे. नंतर दुधीच्या लुगदींत ठेवून ४ गोंवऱ्यांचा अग्नि द्यावा. याप्रमाणें ७ वेळ करावें. नंतर दुधीच्या रसांत त्याचा खल करून २ लघु पुटें द्यावीं ह्मणजे भस्म होतें. ( ४. ) १ तोळा रुप्याचे पत्रे घेऊन ते एका गोंवरीवर ठेवावे व त्यांच्या खालींवर ६ तोळे ओंवा घालावा. नंतर दुसरी गोंवरी वर बसवून त्यांचीं तोंडें शेणानें लिंपावीं, व त्या गोंवऱ्या सुकल्या-

नंतर त्यांस अग्नि द्यावा. याप्रमाणें १२ पुटें द्यावीं ह्मणजे रुप्याचें भस्म उत्तम होतें. **रुपें**—तुरट, गोड, अग्निदीपक, वीर्यकर, मेध्य, आयुष्य वाढविणारें, पुष्टिकर आणि बलकर असें आहे; व पांडु, क्षय, यांचें नाशक, कांतिकारक, वृद्धांना तरुण करणारें, मंगलदायक, प्रीतिकर, आरोग्य व पुष्टि यांना देणारें, श्रेष्ठ; देह, अग्नि आणि बल यांना देणारें आहे. **रौप्यभस्माचीं अनुपानें**—हें १ गुंज घ्यावें. १ दाह होत असल्यास साखरेशीं द्यावें. २ वात व पित्त यांस त्रिफळ्यांत. ३ प्रमेहास दालचिनी, तमालपत्र व वेलचीं यांशीं. ४ पित्तविकारास आंवळ्याचे मुरंब्यांत द्यावें. ५ शतावरीशीं घेतल्यास बलवीर्य वाढेल, भूक चांगली लागेल. ६ वेलचीदाणे, साखर व तूप यांशीं घेतल्यास उन्माद, शिरोरोग, प्रमेह, ज्वर, पित्त, गर्मीचे सर्व रोग दूर होऊन पुष्टता प्राप्त होईल.

## ४२. रौप्यमाक्षिक.

रौप्यमाक्षिक हें रुप्याप्रमाणें पांढरें दिसतें. यांत रुप्याचे कांहीं गुण आहेत. हें रुप्याच्या अभावीं घेतात. जें कसोटीवर घांसलें असतां कसानें रुप्यासारखें लागतें, जड, स्निग्ध, पांढरें, तें रौप्यमाक्षिक श्रेष्ठ जाणावें. **रौप्यमाक्षिक**—रुप्यासारखें, सोन्यासारखें तेजस्वी, हें शोधिलें असतां अतिगुण देणारें, आणि सेवन केलें असतां प्रमेह, कुष्ठ, कृमि, सूज, पांडु, अपस्मार व अश्मरी यांचा नाश करितें. स्वर्णमाक्षिकासारखेंच रौप्यमाक्षिकाचे गुण जाणावे. **शोधन व मारण**—रौप्यमाक्षिकाचें चूर्ण करून करटोली, मेढशिंगी व जंबीर, या तिहींचे रसांत एकेक दिवस खलून उन्हांत तापविलें असतां रौप्यमाक्षिक शुद्ध होतें. याचें मारण सोनामुखीप्रमाणें जाणावें.

## ४३. लोणारखार.

'लोणार' ह्मणून वऱ्हाडांत एक सरोवर आहे तेथें याची उत्पत्ति होते. **लोणारखार**—अति उष्ण, तीक्ष्ण, पित्तकर; व वात, गुल्म इ० रोगांचा नाश करितो.

## ४४. लोहकीट. (सं. लोहकिट्ट.)

जें कीट थोडें रंगदार, जड, स्निग्ध, तें मुंडलोहाचें; जें काजळासारखें काळें, जड, निर्व्रण, ज्याला रंध्रें नाहींत तें तिख्याचें; आणि जें पिंगट, जड, ज्यावर चाळणीसारखीं छिद्रें नाहींत, व फोडलें असतां कांहीं रुप्यासारखें भासतें तें कांतलोहाचें कीट जाणावें. लोहकीटापासून मंडूर होतो. अच्छिद्र, जड, स्निग्ध, दृढ, शंभर वर्षें झालेलें, फार दिवस शहर ओस पडलें

त्या जाग्याचें कीट घ्यावें. शंभर वर्षांवर झालेलें कीट उत्तम, ऐशीं वर्षांचें मध्यम, साठ वर्षांचें कनिष्ठ आणि याहून कमी वर्षांचें तें विषासारखें जाणावें. **मंडूर करावयाचा प्रकार**—बेहड्याचे लांकडाचे कोळसे करून, त्यांत पुराण्या लोहाचें कीट घालून भात्यानें फुंकून लाल झाल्यावर तें कीट गोमूत्रांत विझवावें. याप्रमाणें सात वेळ तापवून गोमूत्रांत विझवून नंतर त्या कीटाचें बारीक चूर्ण करून गोमूत्रांत खलून शरावसंपुटांत घालून अथवा चूर्णाच्या दुप्पट त्रिफळ्याचा काढा करून मडक्यांत घालून त्यांत तें चूर्ण टाकून चांगलें ढवळून मडक्याचे तोंडाला कापडमाती करून रानगोंवऱ्यांचा गजपूट अग्नि द्यावा. थंड झाल्यावर तें मडकें बाहेर काढून त्यांतून त्या कीटाचा शुद्ध मंडूर होतो तो काढून घ्यावा. दुसरा प्रकार—शुद्ध केलेल्या कीटास त्रिफळ्याच्या काढ्याचीं पुटें २१, गोमूत्राचीं पुटें २१, कुमारीरसाचीं पुटें २१ व पंचामृताचीं पुटें २१; एकूण ८४ पुटें दिलीं असतां मंडूर सर्वोत्कृष्ट होतो. **मंडूरगुण**—तुरट, शीत व पांडूची सूज, सूज, हलीमक, कावीळ व कुंभकावीळ यांचा नाश करितो. ( १. ) **कावीळ व पांडुरोगास**—चार गुंजांपासून सहा गुंजांपर्यंत मंडूर गोमूत्राशीं किंवा मधपिंपळीशीं द्यावा. ( २. ) **सुजेवर**—मंडूर पुनर्नव्याचे काढ्याशीं द्यावा. ( ३. ) **संग्रहणीवर**—मंडूर ताकांत मिरपूड टाकून त्याशीं घ्यावा. ( ४. ) **शक्ति येण्यास**—मंडूर तूप व मधाशीं घ्यावा. ( ५. ) **कृमीवर**—मंडूर, मध व वावडिंगांची पूड यांशीं घ्यावा. ( ६. ) **जीर्णज्वरावर**—मंडूर मधपिंपळीशीं द्यावा. ( ७. ) **पांडुरोगास**—मंडूर ताकांत द्यावा. ( ८. ) **शूळावर**—मंडूर गोमूत्रांत शिजवून त्यांत त्रिफळ्याचें चूर्ण घालून तें मध व तूप यांत द्यावें.

## ४५. लोहचुंबक.

लोहचुंबक ही एक दगडाची जात आहे. लोहचुंबक हा लोखंडाला आकर्षण करितो. यांत कांतलोहपाषाणाचे—चुंबक व भ्रामक असे दोन भेद आहेत. **लो[illegible]क**—लेखन, शीत व लोहाला आकर्षण करणारा असा आहे; [illegible], विष, जरा, कंडू, क्षीणता, मोह आणि मूर्छा यांचा नाश करितो. **शोधन**—लोहचुंबक शेवग्याचा रस व आम्लवर्ग यांमध्यें पचन केला असतां शुद्ध होतो व पारदक्रियेमध्यें उपयोगीं पडतो. ( १. ) **मुतखड्यावर**—लोहचुंबकाचा खडा, तांदुळांच्या धुणांत उगाळून तीन मासे द्यावा ह्मणजे खडा विरून पडतो.

## ४६. शंख.

शंखांची उत्पत्ति समुद्रांत होते. नदींत व समुद्रांत उत्पन्न होणारे जे बारीक शंख, त्यांस क्षुद्रशंख ( शंबूक ) असें ह्मणतात. शंख दक्षिणावर्त व वामावर्त या भेदानें दोन प्रकारचा आहे. दक्षिणावर्त शंख पुण्ययोगानें मिळतो. तो ज्या घरीं असतो तेथें लक्ष्मी वास करिते. तो त्रिदोषशामक, शुद्ध व नऊ निधींतील एक निधि असा आहे. आणि ग्रह व अलक्ष्मी यांची पीडा, क्षय, विष, कृशता व नेत्ररोग यांच्या नाशनाविषयीं समर्थ आहे. जो पांढरा चंद्रकांतासारखा शंख तो उत्तम जाणावा. अशुद्ध शंख गुणकारी होत नाहीं; शुद्ध करून घेतला असतां गुण करितो. **शंख**—पौष्टिक, बलकर, तिखट, खारट, शीत, ग्राहक, चक्षुष्य व वर्ण्य असा आहे आणि शूल, गुल्म, संग्रहणी, रेच, नेत्रांतील फूल, दमा आणि मुरमाच्या पुळ्या यांचा नाश करितो. **क्षुद्रशंख**—शीत, ग्राही, दीपन, पाचन असा आहे; आणि नेत्ररोग, फोड व शीतज्वर यांचा नाशक आहे. **शोधन**—शंख, आम्लवर्ग व कांजी यांत दोलायंत्रानें पचविला असतां शुद्ध होतो; अथवा ताकांत एक रात्र भिजूं घालावा ह्मणजे शुद्ध होतो. क्षुद्रशंखाचें शोधन शंखाप्रमाणेंच करावें व मारण शिंपीप्रमाणें करावें. **मारण**—शंखाचे तुकडे कोळशाचे अग्नींत लाल होत तोंपर्यंत तापवून निंबाचे रसांत विझवावे आणि बारीक खलून ठेवावे. ( १. ) **शूळावर**—तूप अर्धतोळा व एक गुंज भाजलेला हिंग यांशीं दोन गुंजा शंखभस्म घ्यावें. अ० हें भस्म उष्णोदकाशीं घ्यावें. ( २. ) **अजीर्णावर**—शंखभस्म निंबाच्या रसांत साखर टाकून त्याशीं घ्यावें. ( ३. ) **खोकल्यावर**—एक गुंज शंखभस्म विड्यांत खावें. ( ४. ) **आमातिसारावर**—जायफळाचें चूर्ण अर्धमासा, तूप अर्ध तोळा यांशीं दोनगुंजा शंखभस्म घ्यावें. ( ५. ) **अहिऱ्यावर**—शंख मधांत उगाळून अंजन करावें. ( ६. ) **त्रिदोषशूळावर**—शंखभस्म, सैंधव, हिंग व त्रिकटु यांचें चूर्ण उष्णोदकशीं द्यावें. ( ७. ) **पक्तिशूलावर** (परिणामशूलावर)—क्षुद्रशंखाचें अगर शंखाचें भस्म उष्णोदकांत द्यावें. ( ८. ) **प्लीहोदरावर**—चांगल्या पिकलेल्या निंबाचे रसांत शंखभस्म ९।१० मासे घालून तें प्यावें; ह्मणजे निश्चयानें कांसवासारख्या वाढलेल्या प्लीहेचाही नाश होईल. ( ९. ) **सन्निपात संग्रहणीवर**—शंखभस्म व सैंधव तीन मासेपर्यंत मधांत द्यावें; ह्म०कठीणही संग्रहणीचा नाश होईल.

## ४७. शंखजिरें.

शंखजिरें ही एक दगडाची जात असून याचा वर्ण पांढरा असतो.

हें अतिशय मृदु असतें. ( १. ) **क्षतकास** व **रक्तपित्तावर**—शंखजिऱ्याची पूड तूपसाखरेंत द्यावी. ( २. ) **उपदंशादि** सर्व **व्रणांवर**—व उष्णतेनें अंगावर लाल व पसरणारे चट्टे पडतात त्यांवर—शंखजिरें तुपांत अ० लोण्यांत खलून लावावें. ( ३. ) **घायावर**( व्रणावर. )—शंखजिरें व पाषाणभेद तुपांत उगाळून लावावें. ( ४. ) **गळूं, जखम, भगंदर, बद,** यांवर मलम—शंखजिरें तोळे २, गेरू तोळा १, राळ तोळा १, मेण तोळे ३, तूप तोळे ९, याप्रमाणें घेऊन आधीं मेण व तूप कढवून नंतर त्यांत बाकीचीं औषधें टाकून पाण्यानें धुऊन टाकून नंतर त्याची पट्टी द्यावी. ( ५. ) **खवड्यांवर**—शंखजिरें, चिकणी सुपारी व पांढरा कात यांची पूड लोण्यांत खलून लावावी. ( ६. ) **कर्णस्रावावर** व **कानाचा दाह** होत असल्यास—शंखजिरें, पांढरा कात यांची वस्त्रगाळ पूड करून लोण्याचे विघरींतून कानांत घालावी. ( ७. ) **मुखरोगावर**—शंखजिऱ्याचें चूर्ण लोण्यांत कालवून तोंडांत लावीत जावें ह्मणजे तोंडांत फोड येऊन ती जागा फाटते तो ऊर्ध्व गुदरोग बरा होतो; अ०शंखजिरें व गेरू यांचें चूर्ण चोळावें. ( ८. ) **चिखल्यावर**—पांढरे काताची अ० शंखजिऱ्याची पूड वारंवार बसवावी. ( ९. ) **विटाळ फार पडतो त्यास**—शंखजिरें व पाषाणभेद यांचें चूर्ण दुधांत द्यावें.

## ४८. शिंप.

शिंपांची उत्पत्ति समुद्रांत व नदींत होते. शिंपा भाजून त्यांचा चुना करितात. ज्या शिंपांच्या मागील बाजूस रेषा असतात त्यांस रांगण्या शिंपा किंवा शिंपले असें ह्मणतात. हे शिंपले समुद्रांत होतात. **शिंप**—तिखट, स्निग्ध, दीपन, पाचक, रुचिकर, बलप्रद व गुल्मनाशक; नेत्रांला हितावह व विषदोष आणि शूल यांची नाशक आहे. **शुद्धि**—शिंप ताकांत एक रात्र भिजूं घालावी ह्मणजे शुद्ध होते. **मारण**—शिंपा कोळशांच्या अग्नींत चांगल्या फुलत तोंपर्यंत भाजून शीत झाल्यावर खलून ठेवाव्या. ( १. ) **अजगल्लिका**—ह्मणजे लहान मुलांच्या अंगावर बारीक मुगाएवढ्या पुटकुळ्या येतात त्यांस—शिंप व तुरटी उगाळून लेप करावा. ( २. ) **विसर्प, विस्फोट व श्लीपद यांवर**—शिंपा २॥ तोळे भार जाळून चुना करून रुईच्या चिकांत खलून लेप करावा. ( ३. ) **पेरें व नखुरड्यांस**—शिंपीचा चुना व शेंदूर लोण्यांत खलून त्याची पट्टी लावावी. ( ४. ) **उंदराच्या विषावर**—रांगण्या शिंपा भाजून चुना करावा व तो ‿ग विड्याच्या पानांत गुंडाळून रोग्यानें चावून त्याचा रस घेऊन तो सर्व सां-

ध्यांस व विपार फुटला असेल त्या जागीं चोळीत जावा. ( ९. ) **सर्व उदरांवर**–रांगण्या शिंपा, शेणीचे अग्नींत घालून भाजाव्या ह्मणजे चुना होतो; तो चुना, सैंधव व जवखार हीं गाईचे दह्यांतून घ्यावीं; अ० तो चुना दुधाबरोबर प्यावा.

## ४९. शिरगोळा. ( सं. वज्राभ. )

**शिरगोळा**–हा सफेतरंगाचा व कांचेप्रमाणें चकाकणारा पाषाण आहे. नमिर्जीत शिरगोळ्याचे थरचेथर सांपडतात. शिरगोळा कुटून त्याची रांगोळी करितात. शिरगोळा–किंचिदुष्ण, रुचिकर; हृद्रोग, ज्वर, शूल, खोकला, आध्मान, व पित्त यांचा नाश करितो. ( १. ) **अग्निदग्ध व्रणावर**–शिरगोळा भाजून बारीक करावा; नंतर त्यांत तेल घालून खलून तें लावावें. ( २. ) **प्रदरावर**–शिरगोळा भाजून तांदुळांचे धुणांतून द्यावा. ( ३. ) **ओकारीवर**–नारळाचें पाणी व बत्तासे यांशीं शिरगोळा भाजून द्यावा. ( ४. ) **दाहावर**–शिरगोळा भाजून नारळाचे पाण्याशीं द्यावा. ( ५. ) **पोटशूळास**–शिरगोळा पाण्यांत उगाळून द्यावा.

## ५०. शिलाजित.

ग्रीष्म ऋतूमध्यें पर्वतावर मोठमोठ्या शिला असतात; त्या उन्हानें बहुत तापून तापून त्यांना बहुत पाझर येऊन त्यांपासून रस गळून जमतो; त्याला शिलाजित ह्मणतात. शिलाजित दोन प्रकारचें आहे. एक पर्वतोत्पन्न आणि दुसरें उखर भूमीमध्यें माती व पाणी यांच्या योगानें होतें. शिलाजित सौवर्ण, राजत, ताम्र आणि आयस या भेदानें चार प्रकारचें आहे. तें, पीत व श्वेत इत्यादि भेदांनीं ओळखावें. सौवर्णशिलाजित जास्वंदीच्या फुलासारखें लाल असतें; तें मधुर, तिखट, कडू, शीतल आणि पाककालीं तिखट असें असतें. रौप्य शिलाजित पांढरें, शीत, तिखट, पाककालीं गोड असें असतें; ताम्र शिलाजित रंगानें मयूरकंठासारखें, तीक्ष्ण व उष्ण असतें; आणि लोहशिलाजित रंगानें गिधाडाचे पंखासारखें, कडू, खारट, पाककाळीं तिखट व शीत असतें; तें श्रेष्ठ आहे. सौवर्णशिलाजित वायु व पित्त यांवर, रौप्यशिलाजित कफ व पित्त यांवर, ताम्रशिलाजित कफरोगावर व लोहशिलाजित त्रिदोषावर द्यावें. **शोधन**–( १. ) शिलाजितामध्यें अनेक मळ मिळालेले असतात, याकरितां शोधन करावें तें असें:–लोहशिलाजित आणून, बाहेरचा मळ जाण्याकरितां मात्र केवळ पाण्यानें धुवावें. ( २. ) लोहपात्रामध्यें कडूनिंब, गुळवेल व तूप यांची भावना द्यावी. ( ३. ) शिलाजित गाईच्या दुधांत, त्रिफळ्याच्या काढ्यांत व माक्याच्या

रसांत वेगवेगळा एकेक दिवस खल करून उन्हांत ठेवून कोरडें करावें; ह्मणजे शुद्ध होतें. जें शिलाजित अग्नीवर टाकलें असतां धूर येत नाहीं, पाककाळीं लिंगाकार होतें, काडीनें पाण्यांत टाकलें असतां तंतूसारखें तळापावेतों गळत राहतें व गोमूत्रासारखी घाण येते तें शुद्ध जाणावें. हें अनुपानपरत्वें सर्व रोगांवर द्यावें. **शिलाजित**—तिखट, कडू, उष्ण, पाककाळीं तिखट, रसायन, छेदि असें आहे; आणि कंप, मेह, अश्मरी, शर्करा, मूत्रकृच्छ्र, क्षय, श्वास, वायु, अर्श, पांडुरोग, अपस्मार, उन्माद, सूज, कुष्ठ, उदर व कृमि यांचा नाश करितें. **सोरकाख्य शिलाजित**—श्वेतवर्ण किंवा अग्निवर्ण असतें. तें मूत्ररोगाविषयीं हितकारक आहे. **पांढरें शिलाजित**—मूत्रकृच्छ्र, अश्मरी, मेह, कामला व पांडुरोग यांचा नाश करितें. हें एलचीच्या पाण्यांत मिळवलें ह्मणजे शुद्ध होतें. ( १. ) **मूत्रकृच्छ्र, मूत्रावरोध, मेह** व **क्षय** यांवर—शिलाजित, एलची व पिंपळी यांशीं एक मासा भक्षण करावें. ( २. ) **मूत्रकृच्छ्रावर**—शिलाजित एक गुंज, चार तोळे थंड पाण्यांत वितळवून त्यांत तितकेंच गाईचें दूध व साखर घालून द्यावें; अथवा शिलाजित, लकड्या पाषाणभेद, पिंपळी, वेलदोडे, यांचें चूर्ण पाण्याबरोबर अथवा तांदुळांच्या धुणाबरोबर किंवा गुळाबरोबर खावें, ह्मणजे मूत्रकृच्छ्र रोगी आसन्नमृत्यु जरी असला तरी वांचेल. ( ३. ) **कुंभकामलेवर**—शिलाजित गोमूत्रांतून प्यावें. (४.) **मूत्राघात** वगैरे मूत्ररोगावर—शुद्ध शिलाजित, साखर, कापूर हीं एकत्र करून खावीं. ( ५. ) **अश्मरी** व **अश्मरीयुक्त मूत्रकृच्छ्र** यांवर—शिलाजित मधांत द्यावें. ( ६. ) **प्रमेह** व **प्रदर यांवर**—शिलाजित मधाशीं अथवा दूधसाखरेशीं घ्यावें.

## ५१. शिसें. ( सं. नाग. )

**शोधन**—( १. ) शिसें अग्नीवर पातळ करून सच्छिद्र हांडीमध्यें रुईचा चीक घालून ओतावें. याप्रमाणें तीन वेळ रस करून ओतावें; ह्मणजे शुद्ध होतें. रसांत ओततांना शिसें अंगावर उडून येण्याची भीति असतें, सबब जपावें. ( २. ) लोहपात्रांत शिसें पातळ करून त्रिफळाच्या काढ्यांत, किंवा फोरफडाचे रसांत अथवा हत्तीचे मूत्रांत सात वेळ गाळावें; ह्मणजे शुद्ध होतें. **मारण**—( १. ) शिशामध्यें शुद्ध मनशीळ मिळवून घट्ट खापरामध्यें घालून खालीं क्रमवृद्धीनें अग्नि लावावा, आणि अडुळशाच्या दांड्यानें वाटोळें घोंटावें ह्मणजे खापरांत हळू हळू भस्म होऊं लागतें. चांगलें

भस्म होईपर्यंत चांगला अग्नि लावावा, कीं जेणेंकरून सर्व शिशाचें भस्म होईल. ( २. ) शिसें आणि अगस्ती यांची साल एकेजागीं ठेंचून शिशाचे पत्रे करावे आणि ते खापरांत घालून पातळ करून अडुळशाचे काष्ठानें घोंटावें. सगळ्या शिशाचें भस्म झालें ह्मणजे एकत्र जमवून पुनः लाल अग्नीसारखें तापवावें. नंतर खापरांतून काढून अष्टमांश मनशीळ मिळवून अडुळशाचे रसांत खलून गजपुट द्यावें. याप्रमाणें सात पुटें द्यावीं; ह्मणजे शिशाचें शेंदुरासारखें भस्म होतें. ( ३. ) शिसें व मनशीळ यांचें चूर्ण अडुळशाचे रसांत खलून गजपुट द्यावें. याप्रमाणें तीन पुटांनींच शिशाचें चांगलें भस्म होतें. ( ४. ) शिसें कढईत घालून त्याचें पाणी करून केवड्याच्या सोट्यानें एक दिवस निरंतर घोटीत राहावें; ह्मणजे लाल भस्म होतें. हें नित्य १ अ० २ गुंजा ध्यावें. ( ५. ) शिशाचे समान सोरा घेऊन शिशास कढईत घालून खालीं तीव्राग्नि लावावा व शिशावर थोडा थोडा सोरा टाकून लोहाच्या सळईनें घोंटीत जावें. सर्व सोऱ्याचें चूर्ण संपल्यावर कढईतून भस्म काढून वाटून ठेवावें. (६.) पावभार शिसें कढईत घालून खालीं अग्नि लावावा व कढईत कोरफडीचा गीर घालीत जावा. याप्रमाणें २ मण गीर जळून जाईपर्यंत अग्नि लावावा; ह्मणजे शिशाचें भस्म उत्तम होईल. **कथील, जस्त व शिसें यांचें भस्म**—हीं सर्व मिळून २ तोळे घेऊन कढईत घालून रस करून त्यास गाईच्या तुपांत ओतावें. नंतर मातीचे पात्रांत घालून चुलीवर ठेवून रस करावा व त्यांत ३ छटाक पोस्ताचें चूर्ण करून तें वारंवार टाकीत जावें. सर्वांचें भस्म झालें ह्मणजे तें उतरून त्यास आंबट दह्यांत खलून वडी करावी व ती खापरांत ठेवून तीव्राग्नि द्यावा. त्यास चांगला बसंती रंग आला ह्मणजे तें खापर खालीं उतरून त्यांतील भस्म घ्यावें. हे धातुक्षयावर १ गुंज द्यावें. **नागभस्मगुण**—शिशाचें भस्म शंभर हत्तींचें बळ देतें, व्याधि नाश करितें, जीवित्व वाढवितें; व क्षय, वायु, गुल्म, पांडु, भ्रम, कृमि, कफ, शूळ, मेह, खोकला, संग्रहणी, गुदरोग, अग्निमांद्य यांचा नाश करितें, व काम वाढवितें. **नागभस्माचीं अनुपानें**—१ कफ, वायु, जलोदर यांस ओंवा, पिंपळी व मध यांत. २ उपदंशास शीतळचिनी व वेलची यांत. ३ धातुक्षीणतेस लोणी व खडीसाखरेंत. ४ प्रदरास वंशलोचन, जिरें, वेलची व खडीसाखर यांशीं. बाकीच्या सर्व रोगांस अनुपान योजून द्यावें.

## ५२. शेंदूर. ( सं. सिंदूर. )

शेंदूर ही शिशाची उपधातु आहे. शेंदूर तयार करण्याचे, विलायत व

चीन या देशांत मोठमोठे कारखाने आहेत. शेंदुराचा प्रयोग, पोटांत घेण्याच्या औषधांत कोठेंही सांगितला नाहीं. हा लेपादिकांमध्यें योजावा. हिमालयादि पर्वतांवरच्या लहान पाषाणामध्यें राहणारा पारा, सुकून लाल होतो; त्याला गिरिसिंदूर असें ह्मणतात. हा गिरिसिंदूर, शेंदुराहून अगदीं भिन्न जातीचा आहे. **शेंदूर**—तिखट, कडू, भग्नसंधानकारक, व्रणरोपण, उष्ण; व कंडू, विष, विसर्प, कुष्ठ, त्वग्दोष आणि व्रण यांचा नाश करितो. **गिरिसिंदूर**—त्रिदोषशामक, भेदक, पारदबंधक, वर्णानें अग्नीसारखा, लोहांना आरक्त करणारा, व नेत्रांना हितावह असा आहे. ( १. ) **कानांतून पू** वाहतो त्यास—शेंदूर मधांतून कानांत घालावा. ( २. ) **रांजणवाडीस**—शेंदूर लावावा. ( ३. ) **गळूं, जखम, भगंदर, बद, उपदंशव्रण** यांवर मलम्—शेंदूर तोळे ३, मुरदाडशिंग तोळा १, मोरचूत तोळा १, मेण तोळा १, व तिळांचें तेल तोळे ६, पैकीं तिळांचें तेल व मेण कढवून त्यांत इतर सर्व जिन्नस घालून तार येईपर्यंत विस्तवावर ऊन्ह करावें. नंतर त्याची पट्टी लावावी. ( ४. ) **गळूं, बद, व्रण** इत्यादिकांवर शेंदराचें काळें मलम—शेंदूर १२ तोळे, मेण ·॥· तोळा, गोडें तेल ९ तोळे हीं घेऊन प्रथम मेण व तेल हीं एका भांड्यांत घालून चुलीवर ठेवावें. मेण वितुळलें ह्मणजे त्यांत थोडथोडा शेंदूर टाकून त्यास चपट्याशा काडीनें ढवळूं लागावें; ह्मणजे कांहीं वेळानें त्यांतील शेंदूर काळा होतो. पुढें त्या मिश्रणाला कड येऊं लागतो; असे तीन चार कड आल्यावर काठीनें त्यांतील एक दोन थेंब पाण्यांत सोडावे आणि त्याची दोन बोटांचे चिमटीनें घट्ट गोळी बनते किंवा नाहीं तें पहावें. न झाल्यास तें मिश्रण गोळी होईपर्यंत तसेंच घोटीत रहावें. जाळ मात्र मंद करावा. या मलमाची पट्टी दिल्यानें व्रण लवकर भरून येतात. ( ५. ) **गुराचें शिंग** मोडल्यास—तेल, शेंदूर व माणसाचे केश एकत्र कुटून बांधावे; किंवा निवडुंगाचा चीक १ शेर, त्यांत ४ तोळे शेंदूर घालून शिंगाला फांसावें व वरून फडकें लपेटावें.

### ५३. शेंधेलोण. ( सं. सैंधव. )

शेंधेलोण हें खाणींत सांपडतें. याचा वर्ण अगदीं शुभ्र असतो. हें सर्व क्षारांमध्यें श्रेष्ठ आहे. जेथें मीठ वर्ज्य करावें असें पथ्य असेल तेथें सेंधेलोण थोडें खावें. हें पथ्यकर आहे. **सैंधव**—रुचिकर, वृष्य, चक्षुष्य, अग्निदीपक, शुद्ध, स्वादु, लघु, स्निग्ध, पाचन, शीतल, अविदाहि, सूक्ष्म, हृद्य, त्रिदोषनाशक; व व्रणदोष, मलस्तंभ व हृद्रोग यांचा नाश करितें. ( १. ) **शीतपित्तावर**—सैंधव तुपांत अ० तिळांचे तेलांत उगाळून ला-

द्यावें व कांहीं वेळानें गरम पाण्यानें स्नान करावें. ( २. ) **कर्णशूलावर**–बकरीचें मुतांत सैंधव घालून कोमट करून कानांत घालावें. ( ३. ) **कर्णशूलावर**–मेंढीचे मुतांत सैंधव उगाळून कानांत घालावें. ( ४. ) **ओकारीवर**–सैंधव तुपांत घालून द्यावें. ( ५. ) **ऊरुस्तंभावर**–गोमूत्रांत सैंधव घालून उकळून त्याची वाफ द्यावी. ( ६. ) **अंडवृद्धीवर**–गाईचे तुपांत सैंधवचूर्ण सात दिवस प्राशन करावें. ( ७. ) **मुळव्याधीवर**–सैंधव व देवडांगरीचें बीं हें कांजींत वाटून मुळव्याधीच्या मोडांना लेप करावा; ह्मणजे मोड गळून पडतात. ( ८. ) **कुत्र्याचे विषावर**–कोरफडाचे रसांत सैंधव घालून ऊन्ह करून प्यावें. दि० ३.

## ५४. सज्जीखार. ( सं. सर्जिक्षार. )

हा पंजाबांत उत्पन्न होतो. याचा रंग काळसर असतो. **सज्जीखार**–तिखट, उष्ण, तीक्ष्ण व गुल्म, शूल, वायु, कफ, कृमि, आध्मान वायु, पोटांतील वायु यांचा नाश करितो. ( १. ) **मुलांच्या पोटांतील सुशी** वगैरे रोगांवर–सज्जीखाराचें चूर्ण गुळांत द्यावें. ( २. ) **पोटांतल्या वायूवर** व शूलावर–सज्जीखार, पादेलोण, मध, हीं एकत्र करून त्यांत हिंग घालून तें द्यावें. ( ३. ) **सूज फुटण्यास**–सज्जीखार व जवखार यांचा सुजेच्या तोंडावर एक बिंदु द्यावा, ह्मणजे सूज फुटेल. ( ४. ) **पोटशूलावर**–सज्जीखार एक मासा थंड पाण्यांत द्यावा. ( ५. ) **अजीर्णावर**–सज्जीखार व पादेलोण हीं घ्यावीं.

## ५५. सांबरलोण.

हें सांबर नांवाच्या सरोवराच्या पाण्यापासून उत्पन्न होतें. **सांबरलोण**–दीपन, उष्ण, कोष्ठशुद्धिकारक, लघु, किंचित् आंबट, अभिष्यंदि, पाककाळीं तिखट, तीक्ष्ण, पित्तकारक, भेदक, व्यवायि, कफनाशक, सूक्ष्म; व अर्श, कफ, आनाहवायु, मल व वायु यांचा नाश करितें. ( १. ) **गुल्म, वात, पानथरी, अजीर्ण, शूल,** यांवर–सांबरलोण व गूळ हीं ऊन्ह पाण्याशीं द्यावीं.

## ५६. सुरमा. ( सं. अंजन. )

सुरमा श्वेत आणि कृष्ण या भेदानें दोन प्रकारचा. त्यांत काळा तो स्रोतोंजन आणि श्वेत तो सौवीरांजन, तो श्रेष्ठ आहे. **सुरमा**–मृदु, गोड, चक्षूंला हितावह, तुरट, लेखन, स्निग्ध, ग्राहि, शीत, आणि कफ व पित्त, ओकारी, विष, उचकी, क्षय व रक्तविकार, यांचा नाश करितो. **शुद्धि**–

( १. ) त्रिफळ्याच्या काढ्यांत किंवा माक्याच्या रसांत पचन करावा ह्मणजे सुरमा शुद्ध होतो. ( २. ) सुरम्याचें चूर्ण करून जंबीर ( ईड ) निंबाचे रसांत खलून एक दिवस उन्हांत ठेवला असतां शुद्ध होतो. याप्रमाणें गेरू, हिराकस, टांकणखार, कवडी, शंख, तुरटी व मुरदाडशिंग यांची ... करावी. ( १. ) **सर्व नेत्ररोगांवर** सौवीरांजन चूर्ण–सुरमा अग्नीवर तापवून त्याजवर त्रिफळ्याच्या काढ्याचें प्रोक्षण करून सुरमा थंड करावा. याप्रमाणें सात वेळ तो सुरमा तापवून सात वेळ त्या काढ्याचा आपका मारून थंड करावा. याच रीतीनें त्या सुरम्यावर स्त्रीच्या दुधाचा सात वेळ आपका मारून नंतर त्याचें बारीक चूर्ण करून डोळ्यांत अंजन करावें. तें अंजन डोळ्यांना फार हितकारक होतें, आणि त्यापासून सर्व नेत्रविकार दूर होतात. **दुसरा प्रकार**–सुरम्यास त्रिफळ्याच्या काढ्याच्या किंवा केळीच्या पाण्याच्या २१ दिवस २१ भावना देऊन त्याचें अंजन करावें, ह्मणजे तें नेत्रांस फार गुणावह होतें.

## ५७. सुवर्णमाक्षिक.

माक्षिक तीन प्रकारचें आहे. सुवर्णमाक्षिक, रौप्यमाक्षिक व कांस्यमाक्षिक. सुवर्णमाक्षिक हें तापी नदींत होतें. याचा रंग सुवर्णासारखा असतो. हें किंचित् सुवर्णगुणाशीं समान आहे, याकरितां सुवर्णाच्या अभावीं सुवर्णमाक्षिक देतात. तापीच्या तीरचें सुवर्णमाक्षिक पंचवर्ण असतें व जें कान्यकुब्ज देशांत होतें तें सुवर्णवर्ण असतें. सुवर्णमाक्षिक हें सुवर्णवर्ण, कोणरहित, जड आणि हातावर घांसलें असतां काळेपणा देतें. जें सुवर्णमाक्षिक सुवर्णवर्ण, जड, स्निग्ध, किंचिन्नीलवर्ण, कसोटीवर सोन्यासारखा कस लागणारें, तें उत्तम जाणावें. **सुवर्णमाक्षिक**–स्वादु, कडू, वृष्य, रसायन व चक्षुष्य असें आहे; आणि लिंगवर्ति, कंठरोग, पांडु, मेह, विष, उदर, मुळव्याध, सूज, विष, कंडू, क्षय व त्रिदोष यांचें नाशक आहे, **शोधन**–( १. ) तीन भाग सुवर्णमाक्षिक, चवथा भाग सैंधव घालून चुलीवर कढईंत ठेवून त्यांत निंबाचा व महाळुंगाचा रस घालून पचन करावें व लोखंडाच्या वत्यानें अगर पळीनें घोटावें. पात्र तांबूस रंगाचें दिसूं लागलें ह्मणजे शुद्ध झालें. ( १ ) एरंड्यांचें तेल, महाळुंगाचा रस यांत किंवा केळीच्या कांद्याच्या पाण्यांत सुवर्णमाक्षिक दोन घटका पचन करावें अथवा तापवून त्रिफळ्याच्या काढ्यांत बुडवावें ह्मणजे शुद्ध होतें. **मारण**–( १. ) सुवर्णमाक्षिकाचें चूर्ण करून कुळित्थांचा काढा, ताक व शेळीचें मूत्र यांत लोखंडी कढईंत ठेवून लोखंडाच्या प-

ळीनें क्रमेंकरून घोटावें; ह्मणजे भस्म होतें. ( २ ) सुवर्णमाक्षिकाचें चूर्ण करून खापरांत घालून चुलीवर ठेवून निंबाचा रस वारंवार घालून लोह-पळीनें दोन प्रहर घोंटावें. लाल दिसूं लागलें ह्मणजे भस्म तयार झालें. सुवर्णमाक्षिकाला त्रिफळा, त्रिकटु, मिरीं व तूप हीं अनुपानें योजावीं. (१) **डोळ्यांत पांढरीं फुलें** पडतात त्यावर—सुवर्णमाक्षिक मधांत किंवा दुधांत उगाळून अंजन करावें. ( २ ) **पांडुरोग, कामला**, वात, पित्त व हलीमक यांवर—३ वाल सुवर्णमाक्षिकभस्म मध व पिंपळींत घ्यावें. (३) **क्षीणता**, स्वप्नावस्था, जीर्णज्वर, प्रमेह, मूत्रकृच्छ्र, मस्तकशूल यांवर—१ वाल सुवर्णमाक्षिकभस्म लोणी व खडीसाखर यांशीं अथवा मध व खडीसाखरेशीं घ्यावें.

## ५८. सोनें. ( सं. सुवर्ण. )

**शोधन**—( १. ) उत्तम सोन्याचे पत्रे करून अग्नींत तापवून तिळांचें तेल, ताक, कांजी, गोमूत्र, कुळित्थांचा काढा व त्रिफळ्याचा काढा या प्रत्येकांत तीन तीन वेळ विझवावे ह्मणजे शुद्धि होते. या रीतीनें रुपें, तांबें, पितळ आदिकरून सप्तधातूंची शुद्धि करावी. ( २. ) सुवर्ण अग्नीवर पातळ करून कांचनार-रसामध्यें तीन वेळ ओतावें ह्मणजे शुद्ध होतें. **मारण**—( १. ) संपूर्ण धातूंचे पत्रे करून त्या पत्र्यांच्या भारंभार पारा व गंधक यांची कज्जली घेऊन पत्र्यांच्या मध्यें देऊन, वालुकायंत्रांत पृथक् पृथक् बारा बारा घटिका दीपाग्नि द्यावा; ह्मणजे स्वर्णादिक संपूर्ण धातूंचें भस्म होतें. ( २. ) पारा व गंधक समान भाग घेऊन कांचन वृक्षाच्या सालीच्या रसांत खलून बारीक कज्जली करून त्या कज्जलीचे समभाग सोन्याचे पत्रे घेऊन त्या पत्र्यांस कज्जलीचा लेप करावा. मग कांचनाची साल वाटून कल्क करून त्याच्या दोन मुसा कराव्या. त्या एका मुशींत ते सोन्याचे पत्रे ठेवून त्यांजवर दुसरी मूस घालून संधि मिळवून एक गोळा करून मातीचें शराव आणून त्यांत तो गोळा ठेवून दुसरा शराव त्याजवर उपडा ठेवून कापडमाती करून वाळवून रानगोंवऱ्याचा मोठा प्रखर अग्नि द्यावा. याप्रमाणें तीन अग्निपुटें दिलीं असतां सोन्याचें भस्म चांगलें होतें. फिरून जिवंत होत नाहीं. हें भस्म साऱ्या रोगांवर योजावें. याप्रकारें कळलावी, भार जांभूळ व मनशीळ यांतही सोन्याचें भस्म होतें. ( ३. ) मनशीळ व शेंदूर समभाग घेऊन बारीक चूर्ण करून रुईचे चिकांत खलून उन्हांत वाळवावें. याप्रमाणें सात पुटें त्या चूर्णाला देऊन नंतर सोन्याचा रस करून त्याचे समभाग चूर्ण त्यांत घालून मिळवून नाहींसें होईतोंपर्यंत भात्यानें अतिशय फुंकून, फिरून

त्या रसांत चूर्ण घालून फुंकावें. याप्रमाणें तीन वेळ केलें असतां सोन्याचें भस्म होतें. **सुवर्णभस्मगुण**—सुवर्णभस्म कांतिकारक, क्षत, श्वास, कास, क्षय, पित्त, वायु, प्रमेह, ग्रहणी, अतिसार, कुष्ट, ज्वर, षंढत्व व सर्वरोग यांचा नाश करितें. नित्य सुवर्णभक्षण, हें जरा व अपमृत्यु यांचा नाश करितें, देहाला दृढ करितें व स्त्रियांचा रतिसमयीं भंग करितें. **सोन्याचे वर्ख**—संपूर्ण विषें, शूल, आम्लपित्त यांचे नाशक व हृदयास प्रिय, पुष्टिकारक, क्षय, व्रण, अग्निमांद्य, उचकी, आनाह, वायु, वाढलेला कफ, यांचे नाशक आहेत, व सर्वदा नेत्रांना प्रिय आणि कोणंतेही रोगावर अनुपान योजून घेतले असतां संपूर्ण व्याधींचा नाश करितात. **सुवर्णभस्मानुपानें**— १ अगर २ गुंजा सुवर्णभस्म त्रिकटु व तूप यांतून घेतलें असतां, क्षय, अग्निमांद्य, श्वास, कास व अरुचि यांचा नाश करितें; ओज धातूला वाढवितें; बलकर, पांडुनाशक, पथ्यकारक, सर्पविष व संपूर्ण विषें आणि संग्रहणी यांचा नाश करितें. हें दुधाशीं बल देतें; पुनर्नव्याशीं नेत्रांस हितकारक; तुपाशीं जरा, व्याधि यांचा नाश करितें; वेखंडाबरोबर बुद्धिप्रद; केशराशीं कांतिकारक; दुधाशीं क्षयनाशक, निर्विषीबरोबर विषनाशक, व सुंठ, मिरें, लवंग यांशीं त्रिदोष व उन्माद यांचा नाश करितें. **पथ्यापथ्य**—दूध साखर यांनीं युक्त स्निग्ध व चिक्कण असें अन्न, वलीपलित नाश होण्याकरितां स्वर्णभक्षकाला पथ्य योजावें. ककार आहे पूर्वी ज्यांच्या नांवास अशीं अन्नें, भाजा व मांसें हीं स्वर्णभक्षकानें सोडावीं.

## ५९. सोमल. ( सं. मल्ल. )

सोमल दोन प्रकारचा आहे. पांढरा व पिंवळा. त्यांत पांढरा शंखासारखा असतो; यास शंख्या सोमल असेंही ह्मणतात. पिंवळा डाळिंबाच्या वर्णाचा असतो. पांढरा सोमल कृत्रिम असतो आणि पिंवळा पर्वतापासून होतो. पिंवळा सोमल फार महाग असून अतिशय विषारी आहे. सोमल हा प्राणघातक आहे, याकरितां अज्ञानाच्या हातीं कधींही देऊं नये. **सोमल**—सोमल, पारदबंधक, स्निग्ध, दोषघ्न, लोहभेदक, वीर्यकारक, कांतिवर्धक व त्रिदोष, सर्वव्याधि यांचा नाशक आहे. हा अशुद्ध असला तर सप्तधातूंचा नाश करणारा व दाह, चित्तभ्रम, लालास्राव, मृति, अनेक वेदना, बहुव्याधि, तृषा, यांतें करितो. **शोधन**—( १. ) तांदुळजाच्य रसांत दोलायंत्रानें मंदाग्नीवर सोमल एक दिवस पचन करावा ह्मणजे शुद्ध होतो. ( २. ) कांजींत अथवा टांकणखारांत किंवा गाईच्या दुधांत

सोमल दोलायंत्रानें दोन घटिका पचन करावा ह्मणजे शुद्ध होतो. **सत्व-पातन**—दोन्ही सोमल, आम्लवर्ग, क्षारवर्ग, गोमूत्र, गेरू व विमल ह्यांशीं एकत्र करून आंच द्यावी; ह्मणजे त्याचें सत्व पडतें. **मारण**—( १. ) चंदनबटव्याच्या रसांत सोमल २ दिवस भिजूं घालून चंदनबटव्याच्या लुगदींत ठेवून पांच मातकापडें करून त्यास वालुकायंत्रांत ठेवून तोंड बंद करून ३ प्रहर आंच द्यावी ह्मणजे भस्म होईल. हें एक तांदुळभार खावें. ( २. ) सोमल, दुधीच्या रसांत १ दिवस भिजूं घालून दुधीच्या लुगदींत ठेवून वालुकायंत्रांत सिद्ध करावा. सोमलाचें भस्म निर्धूम होईल तेंच औषधांत योजावें. हें वात, कफ, शीत इत्यादिकांवर द्यावें. ( १. ) **मुळव्याधीस**—सोमल तुपांत उगाळून लेप करावा व थोडासा शेक घ्यावा. ( २. ) **विंचवाचे विषावर**—सोमल, पाण्यांत उगाळून लेप करावा. ( ३. ) **नायटे, गजकर्ण व शिबें** यांवर—चंदनाचे गंधांत सोमल उगाळून लावावा.

## ६०. सोरा. ( सं. सूर्यक्षार. )

सोरा हा एक क्षार आहे. ज्या मातींत लोणा फार आहे अशा मातीपासून सोरा तयार करितात. दारूच्या कामांत सोऱ्याचा फार खप होतो. **शुद्धि**— काळसर सोरा ऊन्ह पाण्यांत टाकून गाळून घ्यावा व तो तसाच पुष्कळ वेळपर्यंत ठेवावा; ह्मणजे त्याचे खडे जमतात ते काढून घ्यावे. **सोरा** तीक्ष्ण, अति उष्ण, रेचक, तिखट, कडू, अग्निदीपक, सूक्ष्म, खारट, लघु, दाहक, शोषक, ग्राहक, वातनाशक, पित्तकर; व प्लीहा, मूर्च्छा, मूत्रकृच्छ्र, नेत्ररोग, वातरक्त, कुंभकामला, दमा, नासापाक, पिटिका, शिरःपाक, शूल व आध्मान यांचा नाश करितो. ( १. ) **मूत्रकृच्छ्रावर**—मुळ्याच्या पाल्याच्या रसांत सोरा घालून द्यावा. ( २. ) **मूत्र कोंडतें** त्यास—निंबू कापून त्यावर सोरा घालून तें ओंटीवर चोळावें; अ० सोरा गरम पाण्याशीं द्यावा. ( ३. ) **अंगांतील उष्णतेवर**—ताकांत सोरा द्यावा. ( ४. ) **नारूवर**— ३ मासे सोरा ताकांत टाकून प्यावा. दि० ३. ( ५. ) **दम्यावर**—१० तोळे सोरा घेऊन तो ८० तोळे ऊन्ह पाण्यांत घालावा. नंतर त्यांत जुन्नरी अगर अमदाबादी कागद दोन तीन मिनिटेंपर्यंत ठेवून बाहेर काढून उन्हांत सुकवावा. या कागदाची विडी करून ओढीत जावी ह्मणजे दमा त्वरित जातो. ( ६. ) **मूत्र थोडें** होत असल्यास—सोरा पाण्यांत कालवून प्यावा.

## ६१. हरताळ. ( सं. हरिताल. )

हरताळेची गणना उपरसांत आहे. फटकी व अभ्रक यांपासून हरताळ होते. हरताळ आठ प्रकारची आहे. त्या सर्वांमध्यें गोदंती हरताळ उत्तम आहे. त्याच्या अभावीं पत्री घ्यावी. ही वयस्थापक आहे. जी हरताळ सोन्यासारखी लखलखीत, अभ्रकासारखे पत्रे सुटणारी ती पत्री-हरताळ. ही रसायनाविषयीं उत्तम गुणकारक आहे. जी पिंडासारखी हलकी व जांत सत्व थोडें असतें ती पिंडहरताळ, ही स्त्रियांच्या पुष्पाचा नाश करिते. **शुद्ध हरताळ**—कांति व वीर्य यांना वाढविते आणि कुष्टें, कफरोग, जरा व मृत्यु यांचा नाश करिते. अशुद्ध हरताळ—आयुष्याचा नाश, कफ, वायु, मेह, ताप, फोड आणि अंगाचा संकोच हे विकार करिते. **शोधन**—हरताळाचे बारीक तुकडे करून त्यांची फडक्यांत पोतंडी बांधून दोलायंत्रांत घालून कांजीमध्यें एक प्रहरपर्यंत शिजवावी. तसेंच कोहळ्याचे रसांत एक प्रहर, तिळांचे तेलांत एक प्रहर, व त्रिफळ्याच्या काढ्यांत एक प्रहर शिजवावी ह्मणजे शुद्ध होते. **हरताळभस्म**—( १. ) शुद्ध हरताळ एकवीस दिवस पिंपळाच्या रसांत खलावी, आणि गोळा करून अश्वत्थाच्या राखेनें अर्ध्या भरलेल्या मडक्यां-
ठेवून नंतर मुखापर्यंत तीच राख घालून वर झांकण ठेवून मातकापड
रून हजार गोंवऱ्यांचें पूट द्यावें; ह्मणजे चार प्रहरांनीं भस्म होतें. हें
तप्त लोहावर टाकिलें असतां धूर निघत नाहीं व शुभ्रवर्ण होतें.
) एक भाग शुद्ध हरताळ व दोन भाग घेरोसा घेऊन मडक्यांत चिंचे-
केंवा पिंपळाची राख निंमे घालून त्यावर निंमे घेरोसा घालावा. त्यावर
ळ ठेवून पुनः घेरोसा वर घालून त्यावर राख आकंठमर्याद घालून
र परळ झांकण ठेवून मातकापड करून चुलीवर ठेवावी आणि चार
अग्नि द्यावा; ह्मणजे हरताळेचें भस्म शुद्ध व निर्धूम होतें. जें हरताळे-
भस्म अग्नीवर निर्धूम राहतें, तें भस्म चांगलें झालें आणि तेंच सधूम असलें तर कच्चें जाणावें. ( ३. ) हरताळ २ भाग, पारा १ भाग व तुरटी ५ भाग हीं सर्व औषधें एकत्र करून पांढऱ्या वेटुळीच्या रसांत खल करावा. वाळल्यावर त्याची वडी करून शरावसंपुटांत घालून संधिलेप करावा व गजपुट द्यावें; ह्मणजे सुंदर भस्म होतें. हें तांदुळाइतकें द्यावें. ( ४. ) शुद्ध हरताळ, कोरफड, कोहळा व दहीं यांत तीन तीन वेळ घोटून गोळा करून वाळवावा. मग मडक्यांत सहा अंगुळें मीठ घालून त्यावर हरताळ लोखंडाचे करंड्यांत भरून बत्तीस प्रहर क्रमानें अग्नि

द्यावा, ह्मणजे चुन्यासारखें भस्म होतें. हें तांदुळभार साखरेशीं दिलें असतां, वातरक्त व ज्वर यांचा नाश करितें. **हरताळसत्वपातन**—( १. ) हरताळ आणि लाख, मोहऱ्या, तीळ, शेवग्याची साल, टांकणखार, मीठ व गूळ हे पदार्थ हरताळेच्या निंमे घेऊन त्याशीं खलून सच्छिद्र मुशींत घालून मुशीचें तोंड बंद करावें आणि पातालयंत्रानें पुट द्यावें ह्मणजे सत्व निघतें. ( २. ) हरताळेस टांकणखार, ह्मशीचें तूप, मध, कुळथांचा काढा यांच्या भावना देऊन, ती हांडींत घालून त्यावर सच्छिद्र ढांपण ठेवून संधिलेप करावा व छिद्राला नळी लावावी, आणि चार प्रहर अग्नि द्यावा. नळींतून पांढरा धूर जाऊं लागला ह्मणजे अग्नि पुरे करावा; नंतर वरची थाली काढून सत्व घ्यावें. ( ३. ) जेपाळांतील बिया व एरंड्या यांच्याशीं हरताळ खलून कुपींत भरावी व वालुकायंत्रांत ठेवून सिद्ध करून कुपीच्या कंठस्थित सत्व घ्यावें. हरताळसत्व दुस्साध्य वातरक्तावर एक तांदुळभार द्यावें, आणि पथ्याला हरभरे व तूप योजावें; ह्मणजे चौदा दिवसांत रोगवर्जित कांति होईल. **हरताळभस्माचीं अनुपानें**—अर्धी गुंज हरताळभस्म सहा वाल खडीसाखरेशीं घेतलें असतां; ऐशीं प्रकारचे वायु, कफ, पित्त, कुष्ठ, मेह व अर्श यांचा नाश करितें. हरताळभस्म एक गुंज, गुळवेलीच्या काढ्याशीं घेतलें असतां उपद्रवयुक्त वातरक्त व अष्टादश कुष्ठें यांचा नाश करितें. हरताळभस्म, बचनाग व जिरें यांशीं अपस्मारावर, आंबेहळदीशीं रक्तविकारावर, समुद्रफळाशीं जलोदरावर, देवदालीच्या रसाशीं भगंदरावर, व फिरंगोपदंश, विसर्प, मंडल, कंडू, खरूज, फोड, वातरक्तसंबंधी विकार, विष, पित्त, कफ, व्रण यांवर अनुपानपरत्वें द्यावें. ज्वर, क्षय, पांडुरोग यांस खडीसाखरेशीं द्यावें. वायु, शूळ व बाळंतरोग यांस आल्याच्या रसांत द्यावें. सन्निपात, अर्धांगवायु, वायगोळा यांस याच अनुपानांत द्यावें. निर्बळ मनुष्यास जायफळाशीं, क्षयास विड्यांत, वीर्यवृद्धीस पिकलेले पानाबरोबर, ऊर्ध्वश्वासास हिरड्याबरोबर, सुस्तीस गुंडीबरोबर, दुर्गंधीस चाफ्याच्या फुलांशीं सुगंधी पदार्थाबरोबर, वायूस आल्याच्या रसाशीं, प्रमेहास तुळशीचे रसांत, जलोदरास शेळीचे मूत्रांत, शैत्यास केशर व जायपत्री यांशीं, अग्निमांद्यास मध व पिंपळी यांशीं, स्तंभनास लवंग, दालचिनी, कापूर यांजबरोबर, अष्टादश कुष्ठांस निर्गुंडीबरोबर, कामवृद्धीस गाईच्या दुधाबरोबर. पथ्यः—तूप, भात, खिचडी अथवा गाईचें दूध. ( १. ) **विंचवावर**—हरताळ व नवसागर पाण्यांत वांटून लेप करावा, अगर यांची गो-

ळी करून ती उगाळून लावावी; ह्मणजे वेदना तत्काल नाहींशा होतात. ( २. ) **कर्णकीट** दूर होण्यास—हरताळ गोमूत्रांत उगाळून लेप करावा. ( ३. ) **गंडमाला व गलगंडावर**—हरताळ गोमूत्रांत उगाळून लेप करावा. ( ४. ) **निर्लोमकरण**—हरताळ १ भाग, शंखचूर्ण ५ भाग, पळसाचें भस्म १ भाग हीं एकत्र करून लेप करावा. ( ५. ) **खवड्यांवर**—हरताळ व कळीचा चुना पाण्यांत वांटून लेप द्यावा. ( ६. ) **मुळव्याधीवर**—निवडुंगाच्या व करंजाच्या रसांत हरताळ उगाळून लेप करावा; ह्मणजे सूजयुक्त वातार्शाचा नाश होतो.

## ६२. हिंगूळ. ( सं. दरद. )

**हिंगुळाची उत्पत्ति**—अशुद्धपारा एक भाग व गंधक ४ भाग ांना लोहपात्रामध्यें कढवून एकत्र करून त्याचे तुकडे करून काचकुपींत रून तिला एक अंगुळ वस्त्र व माती यांचो लेप देऊन छायेंत सुकवून ळुकायंत्रांत एक दिवस अग्नि द्यावा; नंतर पांच दिवसपावेतों क्रमवृद्धीनें ग्न देऊन सातवे दिवशीं काढून घ्यावा. तो हिंगूळ फार उत्तम होतो. **शोधन**—( १. ) हिंगूळ खलांत घालून मेंढीचे दुधाचीं पुटें सात व निंबाचे रसाचीं पुटें सात अशीं चवदा पुटें द्यावीं ह्मणजे हिंगूळ निश्चयानें शुद्ध होतो. ( २. ) हिंगूळ आल्याच्या रसांत सात वेळ, थोरचुक्याच्या रसांत सात वेळ अशा भावना देऊन सुकवावा; ह्मणजे निर्दोष होतो. **मारण**—( १. ) एक वाल हरताळेची पूड शरावांत घालून तीवर एक ोळा हिंगुळाचा खडा ठेवून दोन तोळे आल्याचा रस द्यावा, आणि याच्या भोंवतीं ३ मासे लवंगा पसराव्या; आणि चुलीवर ठेवून मंदाग्नीनें ोन घटिका पचन करावा; नंतर उतरून वाटून ठेवावा; तो विड्याशीं क गुंज द्यावा. हा पुष्टिकारक आहे व पांडु, क्षय, शूळ आणि सर्व रोग ..वर द्यावा. ( २ ) हिंगुळाचे हरभऱ्याएवढे तुकडे करून चंद्रकांताच्या किंवा लोखंडाच्या पात्रांत घालून फुंकावें; ते उष्ण झाले ह्मणजे त्यांत मेंढीचें दूध दहा वेळ, रुईचा चीक दहा वेळ, दीप्त वर्गानें दहा वेळ, कपिला पांच वेळ आणि दुग्ध वर्गानें ५ वेळ अशा त्याच भांड्यांत भावना द्याव्या; ह्मणजे तयार होतो. हा शतार्कहिंगूळ अनेक रोगांचा नाश करितो आणि क्षुधा वाढवितो. हा अनुपानानें सर्व रोगांवर द्यावा. **हिंगूळ**—कडू, तुरट व तिखट असा आहे. आणि नेत्ररोग, कफ, पित्त, हृल्लास, कुष्ठ, ज्वर, कामला, प्लीहा व आमवात यांचा नाश करितो. ( १. ) **उपदंशावर**—रुई... मु-

त्याची लाल व हिंगूळ यांची शिश्नास धुरी द्यावी ह्मणजे चट्टे, सूज हीं त्वरित दूर होतात. ( २. ) **व्रणावर**—इसबंद व हिंगूळ यांची धुरी द्यावी.

## ६३. हिराकस. ( सं. कासीस. )

हिराकसाची उपरसांत गणना आहे. हिराकस वालुक व पुष्पवालुक असा दोन प्रकारचा आहे. हिराकसाचा रंग कांहींसा पांढुरका व निळा असतो. जो किंचित् पिंवळ्या रंगाचा हिराकस असतो त्यास पुष्पवालुक असें ह्मणतात. **हिराकस**—अतिप्रशस्त, उष्ण, तुरट, आंबट, नेत्रांस हितावह आहे; व विष, वायु, कफ, व्रण, श्वेतकोड, क्षय, केश व नेत्र यांचा कंडू, मूत्रकृच्छ्र, अश्मरी, यांचा नाश करितो. **शोधन**—हिराकस एक वेळ माक्याच्या रसांत पचन करावा, ह्मणजे शुद्ध होतो. **मारण**—गंधक आणि हिराकस यांस एकत्र पुट द्यावें ह्मणजे भस्म होतें. ( १. ) **गंडमाळेवर**—हिराकस व बिबा अ० हिराकस रुईच्या चिकांत उगाळून लेप करावा. ( २. ) **वृषणकच्छ** ( वृषणास खाजविल्यानें फोड येतात ) व अहिपूतन ( मुलांचें गुद न धुतल्यानें त्यांत कंडू उत्पन्न होऊन फोड होतात ) यांजवर—हिराकस, गोरोचन, मोरचूत, हरताळ, रसांजन हीं निंबूचे रसांत खलून लेप करावा. ( ३. ) **पांडु, क्षय, गुल्म,** प्लीहा, शूल व संपूर्ण मूत्ररोग यांवर हिराकसाचें भस्म, त्रिफला व मिरीं हीं एकत्र करून तें पावतोळा तूप व मध यांशीं एक महिना द्यावें.

## परिशिष्ट.

**लोहभस्माचे गुणः**—लोहभस्म काजळासारख्या रंगाचें व पारदयुक्त जो सेवन करील त्याला कधींही रोग होणार नाहीं; आणि नष्ट झालेला काम पुनः शरीरांत प्रवेश करील. **लोहभस्म**—जंतुविकार, पांडुरोग, वायु, क्षीणता, पित्तव्याधि, स्थूलता, मूळव्याध, संग्रहणी, कफ, सूज, प्रमेह (परमा), गुल्म, प्लीहा, विष, आमवात, कुष्ट, वलीपलित, वातरक्त, जरा, मरण, कामला क्षय, पांडुरोगानें पांडुरवर्ण झालेला देह यांचा नाश करितें, आणि बलकर, स्त्रीप्रसंगीं हितकर, सुखकारक, रसायन, मृतिहर, दृष्टि व कांति उत्तम करणा आहे. **लोहभस्माचीं अनुपानें**—लोहभस्म १ अथवा २ गुंजा नित्य सेव करावें. ( १. ) शूळावर हिंग व तूप यांत द्यावें. ( २. ) जीर्णज्वरा मध व पिंपळींत. ( ३. ) वातावर—लसूण व तूप यांत. ( ४. ) श्वासावर—सुंठ, मिरें, पिंपळी, मध यांत. ( ५. ) शैत्यावर—मिरीं व नाग ळीचे पानांत. ( ६. ) प्रमेहावर—त्रिफळा व खडीसाखर यांत. ( ७ त्रिदोषावर—आल्याचा रस व मध यांत. ( ८. ) वातज्वरावर तुपांत. ( ९

पित्तज्वरावर मद्यांत. ( १०. ) कफ-पित्तावर–आल्याचें रसांत. ( ११. ) ऐंशी प्रकारच्या वायूंवर–निर्गुंडीच्या रसांत. ( १२. ) वातावर सुंठींत. ( १३. ) पित्तावर साखरेंत. ( १४. ) कफावर मध व पिंपळींत. ( १५. ) संधिरोगावर–दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र यांत. ( १६. ) प्रमेहावर–त्रिफळ्यांत. ( १७. ) वलीपलितरोगावर त्रिफळ्यांत. ( १८. ) रक्तपित्तावर–खडीसाखर व चातुर्जात ( दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर ) यांत. ( १९. ) बलवृद्धीवर पुनर्नवा व गाईचें दूध यांत. ( २०. ) पांडुरोगावर–पुनर्नवाचे रसांत. ( २१. ) वीस प्रमेहांवर–हळद, पिंपळी व मध यांत. ( २२. ) मूत्रकृच्छ्रावर–शिलाजितांत. ( २३. ) पंचकासांवर–अडुळसा, पिंपळी, द्राक्षें व मध यांत. ( २४. ) अग्निमांद्यावर विड्यांत. ( २५. ) सर्व रोगांवर–त्रिफळा व मध यांत. ( २६. ) यथोक्त गुणावर–वाळहिरडे व साखर यांत द्यावें. या लोहभस्माचे गुण आणखी किती सांगावे ? जे मृत रुप्याचे गुण ते कांतभस्मांत आहेत. जेथें कांतभस्म मिळत नाहीं तेथें रुप्याचें भस्म द्यावें. **पथ्यापथ्य**–कोहळा, तिळांचें तेल, उडीद, मोहऱ्या, मद्य, आंबट पदार्थ, मत्स्य, जीवशाक, कुळित्थ, कारलें, व्यायाम, तिखट पदार्थ हे वर्ज करावे. **अशुद्ध लोहदोष**–अशुद्ध लोह–षंढत्व, कुष्ठ, मृत्यु, हृद्रोग, शूल, अश्मरी, नानाप्रकारचे रोग, हृल्लास, जीवहारी, मदकर, देहासंबंधीं अशुद्धपणा, मस्तकाचा अशक्तपणा व हृदयसंबंधीं दारुण व्यथा यांना उत्पन्न करितें. पाऱ्याशिवाय किंवा अभ्रकाशिवाय शरीरांत लोहाचें एकत्व होत नाहीं, किंवा तें शरीरांत ठरत नाहीं; याकरितां लोहास पारा व अभ्रक यांचे संस्कार करावे. जे वैद्य पाऱ्याशिवाय लोहाचें भस्म करितात, त्या लोहापासून रोग्यांचे उदरांत कृमि उत्पन्न होतात यांत संशय नाहीं. **लोहजदोषचिकित्सा**–शरीरांत लोहभस्मापासून विकार झाले असतां, अगस्त्याचे रसांत वावडिंग वाटून अगस्त्याचे ...तच भक्षण करावें, आणि उन्हांत फार वेळ बसावें; ह्मणजे अग्नि जसा सोन्यास पातळ करितो तद्वत् हें औषध लोहाच्या दोषांला पातळ करितें. वावडिंगाचे चूर्णाशीं अगस्त्याचे स्वरसांत अभ्रकभस्म घेतलें असतां, लोहाजीर्णापासून झालेला शूल त्वरित नाश पावतो. लोहापासून कृमि झाल्यास बाहव्याचा मगज रेचनार्थ द्यावा, ह्मणजे कृमिनाश होतो. रेच फार होऊं लागल्यास दूध पाजावें आणि औषध सोडावें. **लोहभस्मपरीक्षा**–संपूर्ण लोहाचें भस्म घेऊन तें मित्रपंचकाशीं फुंकावें. निरुत्थ आणि वारितर असें असतां घ्यावें. मध, तूप, मृतलोह व रुपें हे पदार्थ एकत्र करून

कढईंत घालून उकळावें; रुपें जेवढें घातलें होतें तेवढेंच जर निघालें तर लोहभस्म सिद्ध झालें असें समजावें, नाहीं तर पुनः मारण करावें. **लोहद्रावण**–( १. ) निंबाचे रसांत हिंगूळ घालून लोह तापवून त्यांत विझवावें. याप्रमाणें पुष्कळ वेळ केलें असतां लोहाचें द्रावण होतें. ( २. ) देवदालीची राख मनुष्यमूत्रांत एकवीस वेळ गाळून क्षार काढावा. मग कांतलोह तापवून त्यावर तो क्षार दिला असतां त्या कांतलोहाला पातळ करितो. ( ३. ) देवदालीच्या रसाच्या गंधकाला सात भावना द्याव्या. मग तो गंधक, लोह तापवून त्यावर दिला असतां, लोह पाण्यासारखा पातळ राहतो. ( ४. ) तिख्याचें चूर्ण आंवळ्यांच्या रसांत भिजवून सात दिवस उन्हांत ठेवावें. तसेंच क्षीरकंदाच्या रसांत भिजवून सात दिवस उन्हांत ठेवावें. नंतर मुशींत घालून फुंकिलें असतां तें पाण्यासारखें पातळ होतें. ( ५. ) एक तोळा लोहाचें चूर्ण फणसाच्या फळांच्या रसांत कालवून सात दिवस उन्हांत ठेवावें. नंतर अम्लवर्गानें मर्दन करावें, आणि मुशींत घालून रस करावा; ह्मणजे तें लिहिण्याजोगें द्रवरूप पातळ होतें. **सप्तधातुभस्मपरीक्षा**–संपूर्ण मृतभस्में मित्रपंचकाशीं मिळवून अग्नींत फुंकिलीं असतां धातु उत्पन्न होत नाहीं, व जीं पाण्यावर तरतात तीं सेवन करावीं. **मित्रपंचक**–गूळ, गुग्गुळ, गुंजा, तूप, मध व टांकणखार हे पदार्थ मृतधातूंस जीवनरूप आहेत. **निरुत्थान**–सिद्ध झालेलें भस्म व गंधक समान घेऊन कुमारीच्या रसांत १ दिवस खल करून शरावांत घालून मातकापड करून गजपुट अग्नि द्यावा. याप्रमाणें सर्व लोहांचें निरुत्थान करावें. **अपक्क धातुमारण**.–घोड्याचें नख, हस्तिदंत, ह्मशीच्या शिंगाचें मूळ, शेळी व ससा यांचीं नखें, मेंढ्याचें शिंग, मध, तूप, गूळ, गुंजा, टांकणखार, तेल व मीठ हे सर्व समभागानें एकत्र करून खल करावा आणि त्यांत सर्व लोहें मारावीं. **भस्मवर्ण**–सोनें व पितळ यांच्या भस्मांचा वर्ण कबूतरांच्या कंठासारखा किंवा पिंवळ्या कवडीच्या रंगासारखा; तांब्याच्या भस्माचा रंग मोराच्या कंठासारखा नीलवर्ण; रुपें व कथील यांचीं भस्में शुभ्रवर्ण; शिशाचें भस्म काळ्या सर्पाच्या रंगाप्रमाणें व तिख्याचें भस्म काजळासारखें काळें असावें. यांच्या योगानें वांति भ्रांति हीं होत नाहींत. हें समजून जो करितो त्याची बरोबरी कोणाच्यानेंही करवणार नाहीं. **भस्मसेवनप्रमाण**–सोनें, रुपें आणि तांबें यांचीं भस्में १ गुंजप्रमाण, आणि तिखें, वंग, शिसें, पितळ हीं दीड वाल द्यावीं; आणि या भस्मांबरोबर पिंपळी व मध हीं ग्रीष्म व शरदृतूंत योजावीं.

## अग्नि.

सहा प्रकारचे अग्नि आहेत ते असे:—धूमाग्नि, दीपाग्नि, मंदाग्नि, मध्यमाग्नि, खराग्नि व भडाग्नि. **काष्ठमान** व **धूमाग्नि.**—जें काष्ठ साडींव, चांगलें सुकलेलें, मुष्टीमध्यें येणारें व तें खदिरादिकांचें, त्याला काष्ठ ह्मणावें; आणि ज्वालेवांचून धूम उत्पन्न होतो तो धूमाग्नि जाणावा. **दीपाग्नि** व **मंदाग्नि**—काष्ठाचा द्वितीयांश किंवा अष्टमांश लावून जो अग्नि करावा तो दीपाग्नि; आणि एका काष्ठाचे चार भाग करून ते लावून जो अग्नि करावा तो मंदाग्नि जाणावा. **मध्यमाग्नि** व **खराग्नि**—एका लांकडाचे दोन तुकडे लावून करावा तो मध्यमाग्नि; व अर्धीं लांकडें पांच लावून करावा तो खराग्नि. हा सर्व कर्मांत योग्य आहे. **भडाग्नि**—चोहों दिशांकडून पात्राच्या मस्तकापर्यंत ज्या अग्नीच्या ज्वाला पसरतात तो भडाग्नि जाणावा.

## पुटें द्यावयाचा प्रकार.

**महापुट**—दोन हात औरसचौरस लांब, रुंद व खोल अशी खांच खणून रानशेणींनीं अर्धी खांच भरून वर कापडमाती केलेला शराव अथवा मूस ठेवून वर दुसऱ्या शेणी घालून पुट द्यावें तें. **गजपुट** व **माहिषपुट**—दीड हात औरसचौरस खांच खणून वर सांगितल्याप्रमाणें पुट द्यावें तें. **वराहपुट**—अरत्निमात्र ( हात ) प्रमाण चौरस खांच खणून त्यांत पुट द्यावें तें. **कुक्कुटपुट**—वीतभर चौरस खांच खणून त्यांत पुट द्यावें तें. **कपोतपुट**—वीतभर खांचेंत सात किंवा आठ शेणी घालून त्यांत पुट द्यावें तें. **गोंवरपुट**—भुईवर शेणाचा चूर निमा घालून त्याजवर शराव इत्यादि ठेवून वर दुसरा शेणाचा चूर घालून दडपून वर अग्नि द्यावा तें. ज्या पुटास खांचेचें व गोंवऱ्यांचें प्रमाण नाहीं तेथें मृदु किंवा कठीण द्रव्य असेल तसें पाहून १०० अथवा पन्नास किंवा ३० रानशेणींत पुट द्यावें. **कुंभपुट**—मातीची घागर घेऊन तीस करांगुलीप्रमाणें चाळीस पन्नास भोंकें पाडून, त्यांत अर्धे कोळसे भरून त्याजवर मातकापड केलेला शराव अथवा मूस ठेवून त्याजवर दुसरे कोळसे घालून पेटवून चुलीवर अथवा इटांवर ठेवावें. त्यांतील अग्नि तिसरे दिवशीं थंड झाल्यावर आंतील औषध काढून घ्यावें; यास कुंभपुट ह्मणतात.

## यंत्रें.

१. **डमरूयंत्र**—खालचें मडकें लहान आणि वरचें दुप्पट थोर अशीं दोन मडकीं आणून त्याचे आंतून व बाहेरून खडूचा किंवा गोपीचंदनाचा चांगला लेप करून वाळूं द्यावा. नंतर लहान मडक्यांत निंबाचे रसांत एक

प्रहर खललेला हिंगूळ घालून त्याजवर मोठें मडकें पालथें घालावें, आणि उभयतांचे तोंडाचे संधीस चुना एक भाग व कणीक दोन भाग एकत्र कालवून लावून घट्ट होई असें करावें. अथवा गोपीचंदनाचें मातकापड करावें. याला डमरूयंत्र ह्मणतात. तें यंत्र चुलीवर ठेवून खालीं ४ प्रहर अग्नि द्यावा, व वरचे मडक्याचे बुडावर ओली फडक्याची घडी घालून तिजवर पाणी वरचेवर घालीत जावें. वाळूं देऊं नये, ह्मणजे हिंगुळांतील पारा निघून वरचे मोठे मडक्याचे तळास जाऊन लागतो, तो कुंचीनें काढून घ्यावा. याप्रमाणें लहान यंत्र करून कापराचें फूल काढावें. परंतु खालीं तुपांत भिजलेला कांकडा लावून ठेवावा, ह्मणजे फूल चांगलें निघतें. **२. ऊर्ध्वनलिकायंत्र**—एक तपेलें आणून त्यांत द्रव्य घालून त्याचे तोंडावर करंड्यासारखें झांकण, मध्यें आंगठ्या एवढें भोंक पाडलेलें असें घट्ट बसवून, त्याचे भोंकांत नळी बसवून, तें तपेलें चुलीवर ठेवून खालीं अग्नि द्यावा, आणि त्या नळीचे तोंडाशीं एक भांडें ठेवावें; ह्मणजे त्या नळीवाटे त्या भांड्यांत अर्क पडतो, त्या अर्कावर तेल येतें त्यास अत्तर असें ह्मणतात. **३. वालुका यंत्र**—वाटोळी अग्निशिशी आणून तिजवर गोपीचंदनाच्या मातीचीं ७ मातकापडें करावीं. नंतर रुंद तोंडाचें मातीचें मडकें घेऊन त्याचे बुडास मोठ्या दाभणाएवढें छिद्र पाडावें, आणि जें रसायन करावयाचें असेल त्याची कज्जली त्या अग्निशिशींत घालून ती कुपी, त्या मडक्यांत छिद्रावर सारखीच उभी ठेवून, तिचे मुळास पाण्यानें कालवलेली माती अथवा कणीक घट्ट हालेनाशी बसवावी. नंतर शिशीचे सभोंवतीं गोडे पाण्यांतली वाळू गळ्यापर्यंत भरावी; आणि मडकें चुलीवर ठेवून जसा अग्नि सांगितला असेल तसा त्या यंत्राचे खालीं द्यावा. शिशींत कज्जली घालावयाची ती वाळलेली असावी. ओली राहूं देऊं नये. **४. भूधर यंत्र**—सवाहात चौरस खाडा करून त्याचे मध्यभागीं वीतभर चौरस अशीं लहान खळगी करून त्यांत औषध घातलेला शराव अथवा मूस ठेवून दोन अथवा तीन अंगुळें माती अगर वाळू वर घालून दडपून त्याजवर सांगितल्याप्रमाणें गोंवऱ्या घालून अग्नि द्यावा. **५. दोलायंत्र**—औषधीशीं मिश्र पारा घेऊन, त्याला तीन भूर्जपत्रांनीं वेष्टन करून, नंतर त्याची वस्त्रांत पोटली बांधावी, आणि एक मजबूत काडी घेऊन तिला मध्यें बांधावी. नंतर ती पोटली एका मडक्यांत पाचन द्रव्यें घालून, त्या मडक्याचे तोंडावर ती आडवी काडी ठेवून, ती पोटली, मडक्यांतील द्रव्यांत किंचित् बुडे अशी लोंबत ठेवावी, आणि मडकें चुलीवर ठेवून सांगितल्याप्रमाणें अग्नि द्यावा.